TEXT FLY WITHIN
THE BOOK ONLY

सारस्वत ब्राह्मण समाज

मडगांव – गोवा

रौप्यमहोत्सव स्मारक-ग्रंथ

गेल्या पावशतकांतील गोमंतक

संग्राहक:

केशव अनंत नायक

चिटणीस.

M
84
V 91C

जानेवारी १९३८.

UNIVERSAL
LIBRARY
OU_192836
UNIVERSAL
LIBRARY

मुद्रणः—

हिंदु छापखाना (‘थोरांचे आशिर्वाद’ व पृ. १७१ ते १९४),

‘ईंदिय पुर्तुगेज’ छापखाना (पृ. ११७ ते १३२ आणि भौगोलिक व ऐतिहासिक माहिती)

व

गोमन्तक छापखाना (ग्रंथाचा इतर भाग)

प्रस्तावना

करविली तैसी केली कटकट । वांकडी कीं नीट देव जाणे ॥
कोणाकारणें हें झालेंसे निर्माण । देवाचें कारण देव जाणे ॥
तुका म्हणे मी या अभिमानावेगळा । घालूनी गोपाळा भार असें ॥

परमेश्वराच्या कृपेनें **सारस्वत ब्राह्मण समाज** या संस्थेस गेल्या गुढीपाडव्याचे दिवशीं पंचवीस वर्षे पूर्ण झालीं. या आनंदाप्रीत्यर्थ तिचा रौप्यमहोत्सव साजरा करण्यांत यावा, असें सर्वसाधारण सभेकडून ठरविण्यांत आलें.

महोत्सवाकरतां जाहीर सभा, ललित कार्यक्रम, गोमंतकांतील मराठी वाङ्मयाचें प्रदर्शन वगैरे कार्यक्रम आंखण्यांत आले. पण हे सर्व प्रकार तात्कालिक स्वरूपाचे असल्यावरून त्यांपासून होणारा आनंद अल्पकालच टिकणारा असावयाचा. या दृष्टीनें विचार करतां, या प्रसंगाचें एखादें दीर्घकाल टिकणारें असें स्मारक केलें तर तें अधिक महत्वाचें होईल असें वाटून प्रस्तुत ग्रंथाची योजना कार्यकारी मंडळानें हातीं घेतली. वाङ्मयीन स्मारक हें केव्हांही झालें तरी अधिक उपयुक्त होय, हें उघड आहे. शिवाय त्यामुळें संस्थेच्या वाचनालय व व्याख्यानमाला या ज्ञानप्रसाराच्या आजवरच्या साधनांत वाङ्मयप्रकाशन या एका नव्या साधनाची भर पडेल, हीही कल्पना वरील योजनेच्या मुळाशीं होती.

पण वाङ्मयस्मारक करावें असें जरी ठरविण्यांत आलें, तरी त्याचें स्वरूप निश्चित करणें हेंही कांहीं सोपें नव्हतें. एकाद्या विषयावर एकटांकी स्वतंत्र ग्रंथ प्रसिद्ध करावयाचा म्हटलें तर ती गोष्ट अनेक दृष्टींनीं अशक्य होती. निरनिराळ्या गोमंतकीय लेखकांकडून प्रत्येकाच्या रुचिवैचित्र्यानुसार लेख लिहवून घेऊन एकत्र छापले असते, तर तो विस्कळीत लेखांचा एक संग्रह झाला असता. अशा लेखांपेक्षां एका विशिष्ट सूत्रांत गुंफलेले व एकाच महत्वाच्या विषयाची विविध अंगांनीं चर्चा करून त्याला परिपूर्णता आणणारे असे लेख ग्रंथांत संग्रहित करणें हें केव्हांही अधिक उपयुक्त होतें. शिवाय सर्वसाधारण जनतेप्रमाणेंच विद्वानांसही आवडेल आणि जेणेंकरून गोमंतकीयांना आत्मस्वरूपाची जाणीव होऊन इतर महाराष्ट्रीयांनाही गोमंतकाचें यथार्थ दर्शन होईल अशी या ग्रंथाची रूपरेखा आंखतां आली तर त्याच्या उपयुक्ततेंत भर पडेल असें दिसून आलें. आणि इतक्याहीउपर, ग्रंथ रौप्यमहोत्सवानिमित्त निघावयाचा ही गोष्ट लक्षांत घेतां, त्याचा विषय या उत्सवामागें असलेल्या कल्पनेशीं सुसंवादी असा निवडतां आला तर दुधांत साखर पडल्यासारखें होईल असें वाटूं लागलें.

अशा अनेक दृष्टींनीं विचार करतां अर्थात्, गोमंतकाच्या परिस्थितींत गेल्या पावशतकांत निरनिराळ्या बाजूंनीं जीं परिवर्तनें घडून आलीं त्यांचें समालोचन करणारा विषयच ग्रंथास अनुरूप होय हें ओघानेंच निश्चित झालें. संस्थेचें कार्य ज्या कालावधींत झालें त्याच

कालखंडांत समवायानें इतर कोणत्या घटना घडून आल्या किंवा समाजाच्या कोणत्या अंगांची कितपत व कशी प्रगति झाली त्याचा आढावा तिच्या रौप्यमहोत्सवाच्या स्मरणार्थ प्रसिद्ध होणाऱ्या ग्रंथांत घेतला जाणें हें औचित्याच्या दृष्टीनेंही समर्पक ठरतें.

अशा रीतीनें ग्रंथाचें स्थूल स्वरूप आंखलें गेल्यावर विषयांचें वर्गीकरण करण्यांत आलें, व तदनुसार त्या विषयांवर लेख लिहिण्याचें काम त्या त्या क्षेत्रांतील अधिकारी व्यक्तींकडे सोंपविण्यांत आलें. वरील वर्गीकरणांतून राजकीय विषय सकारण वगळण्यांत आला. ग्रंथांतील विवेचनाची कालमर्यादा जरी गेल्या पंचवीस वर्षांपुरती आंखलेली असली तरी कांहीं विषय जास्तच असे असतात कीं, त्यांची चर्चा करतांना अमुक इतक्या वर्षांमागची गोष्ट उल्लेखिली जाऊं नये असें बंधन पाळतां येत नाहीं. अर्थात् प्रस्तुत ग्रंथांतील कांहीं लेखांत पावशतकाची ही मर्यादा ओलांडली गेली असली तर तें अस्वाभाविक नव्हे, हें उघड आहे.

लेखांची संख्या वाढवून, 'देवस्थानांची माहिती', 'हिंदु व ख्रिस्ती या सहचर समाजांचे एकमेकांवर झालेले परिणाम', 'आरोग्यविषयक स्थिति' इ. आणखी कांहीं उपांगांचा विचार निरनिराळ्या लेखकांकडून करून घेतां आला असता. पण १०० पृष्ठांचा ग्रंथ तयार करावा असा पूर्वसंकल्प असल्यानें हात आंखडता घ्यावा लागला व इच्छा असूनहीं पुष्कळ चांगल्या लेखकांचें लिखाण प्रसिद्ध करतां आलें नाहीं. तरीदेखील संकल्पित स्वरूपांतील ग्रंथाचीच पृष्ठसंख्या मूळ अंदाजापेक्षां अडीचपटीनें वाढली.

वर सांगितल्याप्रमाणें सर्व प्रकारची खबरदारी घेतली असतांही ग्रंथाविषयींचे आमचे सारे मनोरथ पूर्णपणें सिद्धीस गेले असें म्हणतां यावयाचें नाहीं. लेख मुळांत ज्या अनुक्रमानें छापण्याचें ठरलें होतें तदनुसार ते हातीं न आल्यामुळें तो अनुक्रम पाळतां आला नाहीं. यामुळें वेळेच्या अभावीं लेखांचें फार तर संकलन झालें पण मनाप्रमाणें संपादन करतां आलें नाहीं, ही रुखरूख कार्यकारी मंडळाच्या मनांत राहिली. तथापि सर्वांच्या मदतीनें केलेला संकल्प अखेर तडीस गेला याबद्दल परमेश्वरास धन्यवाद दिले पाहिजेत.

ग्रंथाच्या मूळ कल्पनेपासून ती कृतींत उतरेपर्यंतचा हा इतिहास सांगितल्यावर त्यांतील लेखांचा व मुख्यतः ज्यांच्या परिश्रमानें त्याला मूर्त रूप मिळालें त्या लेखकांचा अल्प परिचय करून देणें हें अप्रासंगिक होणार नाहीं व गोमंतकीयेतर वाचकांच्या दृष्टीनें तर अत्यावश्यकही ठरेल, अशी आमची समजूत आहे.

पहिला लेख गेल्या पंचवीस वर्षांतील सामाजिक परिवर्तनाचा आढावा घेणारा असून तो श्री. शांबाराव सरदेसाई यांच्या लेखणींतून उतरला आहे. कोणत्याही विषयांत खोल शिरून त्यांतील मूलभूत तत्वें आकलन करण्याची तीक्ष्ण व विवेचक बुद्धि रा. शांबारावजींत आहे याचें प्रत्यंतर यापूर्वी अनेकदां आलेलें आहे. अनेक विषयांवर साधकबाधक विचार करून कांहीं निश्चित सिद्धांत त्यांनीं बांधलेले असल्यामुळें कोणत्याही विषयावरील त्यांचें मत भरींव व मननीय समजलें जातें. गोमंतकांतील हरएक चळवळींशीं त्यांचा संबंध येत गेल्यानें त्यांच्या मतांना अनुभवाचीही जोड मिळालेली आहे. समाजांतील स्थित्यंतरें व त्याजवर घडणारे संस्कार यांचें मर्म आकलन करणारा त्यांचा हा लेख त्यांच्या लौकिकास साजेसा आहे, यांत शंका नाहीं.

'कलात्म गोमंतक' हा दुसरा लेख प्रो. रामचंद्र शंकर नायक यांनीं लिहिला असून त्यावरून गोमंतकाची नैसर्गिक कलाभिरुचि दिसून येण्यासारखी आहे. प्रो. नायक हे सरकारी अध्यापनशाळेंत प्रोफेसर असून विविध विषयांत त्यांची गति असली तरी ते जन्मजात कलावंत असून त्यांचा कलात्म दृष्टिकोन प्रत्येक विषयावर आपली छाप उमटविल्याशिवाय राहात नाहीं. त्यांचें कोणत्याहो विषयावरील लेखन किंवा भाषण असो अगर त्यांनीं निर्मिलेली एखादी ललित वाङ्मयकृति असो, त्यांत त्यांची कुशाग्र बुद्धिमत्ता व सुसंस्कृत रसिकता विषयाला सजवीत असलेली आढळून येते. सार्वजनिक कार्यक्षेत्रांत तर ते आपल्या विचारशील स्वभावानें अनेक ठिकाणीं आघाडीस चमकत असलेले दिसून येतात. गोमंतकीय कलेविषयींचें त्यांच्या लेखांतील विवेचन तर मर्मग्राही आहेच, पण लेखाच्या अखेरीस परिश्रमपूर्वक मिळवून दिलेल्या यादीवरून गोमंतकीय कलावंतांनीं गोमंतकाबाहेर सर्वत्र कसें मानाचें स्थान मिळविलेलें आहे, तें उघड होतें.

गेल्या पंचवीस वर्षांत झालेल्या इतिहाससंशोधनाची माहिती देणारा तिसरा लेख सरकारी दप्तरखान्याचे क्युरेटर व स्वतःला इतिहाससशोधनास वाहून घेतलेले श्री. पांडुरंग स. पिसुर्लेकर यांनीं लिहिलेला आहे. पोर्तुगीज दप्तरखान्यांतील कागदपत्रांचे मेहनती संशोधक या नात्यानें श्री. पिसुर्लेकर हे महाराष्ट्राला तर सुपरिचित आहेतच, पण युरोपांतील कित्येक इतिहासविषयक संस्थांनींही त्यांना सन्मान्य सभासद करून घेतलेलें आहे. त्यांनीं एकनिष्ठपणानें चालविलेलें संशोधनकार्य भावी पिढ्यांच्या दृष्टीनें महत्वाचें ठरेल यांत शंका नाहीं. मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें पोर्तुगीज दप्तरखान्यांत व इतिहासग्रंथांत बरींच सांपडण्यासारखीं असून तीं अत्यंत मोलाचींही आहेत. महाराष्ट्रांतील इतिहाससंशोधनामधील उणिवा भरून काढण्याचेंही सामर्थ्य या साधनांत सांपडण्याचा संभव आहे. या अल्पपरिचित दालनाची तपशीलवार ओळख प्रस्तुत लेख संशोधकांस करून देईलच, पण शिवाय त्यांत दिलेली ग्रंथांची यादी गोमंतकाच्या इतिहासाचा अभ्यास करणारांसही निःसंशय बहुमोल वाटेल.

चौथा लेख हिंदु महिलांच्या हक्कांत कसकशी वाढ होत गेली त्याचें दिग्दर्शन करणारा असून त्याचे लेखक श्री. जनार्दन विष्णु कामत हे आहेत. श्री. कामत हे सार्वजनिक कार्यांतील आपला वांटा अत्यंत कळकळीनें व सेवाधर्माच्या भावानें नेहमीं उचलीत असतात. या त्यांच्या गुणांना विचारी व नेमस्त वृत्तीची आणि कार्यदक्षतेची जोड मिळाल्यामुळें हरएक सार्वजनिक चळवळींस त्यांची झालेली मदत बहुमोल ठरली आहे. सामान्यतः सर्व जनतेच्या व विशेषतः हिंदूंच्या हितसंबंधांस ज्या ज्या वेळीं अडथळा आला त्या त्या वेळीं कायदा व लोकमत यांच्या बळावर चळवळ करण्याची जागरूकता त्यांनीं सदैव दाखविलेली आहे. आज ब्रिटिश हिंदुस्थानांत स्त्रियांच्या हक्कांच्या वाढीबद्दल जोराची चळवळ चालू असल्यावेळीं, समान संस्कृतीच्या पण भिन्न राजवटीखालील गोमंतकीय महिलांना हे हक्क यापूर्वीच कसकसे प्राप्त झालेले आहेत, त्याचा हा इतिहास महाराष्ट्रीयांना बराच उद्बोधक व मनोरंजकही वाटल्याशिवाय राहणार नाहीं.

पांचवा लेख श्री. दत्तात्रय व्यंकटेश पै यांचा असून पंचवीस वर्षांतील शैक्षणिक स्थितीचें स्वरूप त्यावरून स्पष्टपणें दिसणारें आहे. ओजस्वी लेखक व परिणामकारक वक्ते

आणि 'हिंदु' पत्राचे संपादक व प्रत्येक सार्वजनिक चळवळींत धडाडीनें भाग घेणारे एक प्रमुख कार्यकर्ते या नात्यांनीं श्री. पै हे सर्वत्र सुपरिचित असले, तरी त्यांचें आयुष्य विशेषेंकरून अध्यापनकार्यांत गेलें आहे. आणि या दृष्टीनें शैक्षणिक बाबतींतील त्यांच्या विचारांस अनुभवाची जोड मिळालेली असल्यानें त्यांचें लिखाण महत्वाचें व मार्गदर्शक वाटेल यांत शंका नाहीं. कोणत्याही विषयाचें शास्त्रीय दृष्टीनें पृथक्करण करून त्यावरून तर्कशुद्ध सिद्धांत बांधण्याची तीव्र बुद्धिमत्ता श्री. पै यांच्यांत असल्यावरून शैक्षणिक परिस्थितीचा त्यांनीं घेतलेला आढावा पुढील दिशा ठरवतांना फार उपयोगी ठरेल.

सहाव्या लेखांत आमच्या आर्थिक परिस्थितीचें विवेचन श्री. काशिनाथ दामोदर नायक यांनीं केलें आहे. सामाजिक सुधारणेचा निर्भयपणें पुरस्कार करणारे व सार्वजनिक कार्यांत स्वार्थत्यागपूर्वक भाग घेणारे प्रागतिक विचारांचे गृहस्थ या नात्यानें श्री. नायक यांची कीर्ति असून, गोमंतकांत व गोमंतकाबाहेरही व्यापारी या दृष्टीनें त्यांना प्रमुख स्थान आहे. सार्वजनिक कार्याची कळकळ आणि व्यापारी घडामोडींचें सानुभव ज्ञान या गोष्टींची त्यांच्या ठिकाणीं सांगड पडली असल्यामुळें आमच्या प्रांताच्या आर्थिक परिस्थितीचा शास्त्रीय दृष्ट्या अभ्यास करण्याकडे त्यांचें लक्ष वेधणें साहजिकच होय. सर्व जनतेचें व विशेषतः हिंदु तरुणांचें लक्ष या विषयाकडे लागून ते महत्वाकांक्षी, उद्योगी व साहसी बनावे आणि त्यांनीं विविध मार्गांनीं आपला आर्थिक उत्कर्ष साधावा, ही लेखकांची तळमळ लेखांत जागोजाग प्रतिबिंबित झालेली दिसते. यापुढें आपलें आर्थिक भवितव्य कोणतें, या प्रश्नाच्या बाबतींत आज ज्या निरनिराळ्या विचारसरणींचें प्रतिपादन केलें जातें, त्यांतील ग्राह्य कोणत्या व अग्राह्य कोणत्या, त्याचें साधार विवेचन या लेखांत परिश्रमपूर्वक केलेलें आहे.

गोमंतकीय हिंदूंच्या सार्वजनिक संस्थांची माहिती करून देणारा सातवा लेख प्रो. बाळकृष्ण वामन सांवर्डेकर यांनीं लिहिला आहे. प्रो. सांवर्डेकर हे सार्वजनिक कार्यांत बऱ्याच कालापासून प्रामुख्यानें भाग घेणाऱ्यांपैकीं एक असून त्यांच्या अंगच्या मेहनती, उत्साही व खेळीमेळीच्या स्वभावाचा जनतेस फार फायदा झालेला आहे. कोणत्याही संस्थेचें अडेल व पडेल तें काम तत्परतेनें व आपुलकीच्या भावानें करण्यास ते नेहमीं तयार असतात. परीक्षक या नात्यानें असो किंवा व्याख्याते अगर अध्यक्ष म्हणून असो, येथील बहुतेक सार्वजनिक संस्थांशीं त्यांचा निकट संबंध आलेला आहे. आपल्या 'गोमंतक-परिचया'नें ते सर्वांच्या परिचयाचे झालेलेच आहेत. तेव्हां अशा अधिकारी गृहस्थांनीं लिहिलेला हा संस्थाविषयींचा लेख माहितीच्या दृष्टीनें किती महत्वाचा असेल, तें निराळें सांगावयास नकोच. समाजाच्या संस्कृतीचें मापन त्याच्या संस्थांवरूनही करतां येतें. सरकारी मदत नसतांही गोव्यांतील हिंदु समाज स्वसंस्कृतीचें रक्षण व संवर्धन यांकरतां केवढी घस सोशीत आहे, याची जाणीव हा लेख करून देईल.

श्री. सुब्राव रामकृष्ण सामंत यांनीं यापुढील लेखांत गोमंतकीयांनीं आजवर महाराष्ट्रशारदेची कायकाय सेवा केली त्याचें ओझरतें पण मोहक दर्शन वाचकांना घडविलें आहे. श्री. सामंत हे विशेषतः आपल्या आकर्षक व ठसकेदार वक्तृत्वानें लोकपरिचित आहेत. वादकौशल्य व विषयाची सजावट यांमुळें सभेवर त्यांची छाप पडते. परंतु ते केवळ वक्तेच

नसून कोणत्याही विषयाचा स्वतंत्र दृष्टिकोनानें मर्मस्पर्शी विचार करूं शकणारे लेखकही आहेत हें अनेकदां दिसून आलेलें आहे. सार्वजनिक कार्याविषयींची त्यांची आस्था प्रसिद्ध असून त्या बाबतींत कोणासही सल्लामसलत किंवा आपल्या लेखनाचा अगर वक्तृत्वाचा फायदा देण्याची त्यांची नेहमीं तयारी असते. प्रस्तुत लेखानें, गोमंतकीय मराठी वाङ्मयाचा परिचय करून घेऊं इच्छिणारांस त्यांनीं एक उत्तम साधन उपलब्ध करून दिलें आहे असें म्हणावयास हरकत नाहीं.

कोणत्याही समाजाच्या परिस्थितीचें यथार्थ ज्ञान करून घेऊन त्याच्या अभ्युदयाचे निश्चित उपाय शोधून काढावयाचे झाले तर पहिल्याप्रथम त्याच्या लोकसंख्येची शास्त्रीय दृष्टीनें पाहणी करणें हें आजकाल अत्यावश्यक होऊन बसलें आहे. तेव्हां अशा दृष्टीनें गोमंतकाच्या खानेसुमारीचा अभ्यास केला असतां कायकाय अनुमानें निघतात, त्याचें दिग्दर्शन करणारा नववा लेख श्री. विठ्ठल सदाशिव सुखठणकर यांनीं लिहिला आहे. त्यांची कुशल लेखणी अनेक विषयांत संचार करण्यास समर्थ असली तरी प्रस्तुत विषयाला मात्र त्यांच्याइतका अधिकारी लेखक लाभणें कठीण होतें. तीव्र व तरतरीत बुद्धिमत्तेबरोबरच सदैव ज्ञानसंग्रह करीत राहण्याची वृत्तिही त्यांच्या ठिकाणीं आहे आणि पोर्तुगीज, इंग्रजी व फ्रेंच या भाषांचा त्यांचा व्यासंग याचाच निदर्शक आहे. याच्या जोडीला सार्वजनिक कार्याबद्दलचें प्रेमही त्यांच्या अंगीं वसत असल्यामुळें त्या क्षेत्रांतही त्यांनीं मानाचें स्थान मिळविलें आहे. केवळ आंकड्यांशीं संबंध असलेला रुक्ष विषय असतांही तो भरघोस भाषासरणीनें नटवून त्यांनीं जी विपुल माहिती दिली आहे, ती या विषयाच्या अभ्यासकांस फार उपयुक्त होईल, यांत संशय नाहीं.

गोमंतकांतील स्त्रीशिक्षणाविषयींचा दहावा लेख श्री. शिवा फट्ट पै आंगले यांनीं लिहिलेला आहे. गोमंतकांतील कोणत्याही सार्वजनिक चळवळींचा नेहमीं अत्यंत कळकळीनें सक्रिय पुरस्कार करणाऱ्यांमध्यें श्री. आंगले यांची प्रामुख्यानें गणना होते. विशेषतः वाङ्मयीन स्वरूपाच्या कार्यांत त्यांनीं घेतलेला भाग फार महत्त्वाचा होय. निर्विकार, विनीत व सदिच्छ सल्लागार या नात्यानें असो, किंवा कोणत्याही सत्कार्यास उत्तेजन देणारे जबाबदार कार्यकर्ते म्हणून असो, त्यांची मदत केव्हांही बहुमोल गणली जाते. स्त्रीशिक्षणाचे ते एक आस्थेवाईक पुरस्कर्ते असल्यामुळें त्यांच्या लेखणींतून उतरलेला प्रस्तुत लेख या प्रश्नाला जोरदार चालना मिळण्याच्या दृष्टीनें निःसंशय उपकारक ठरेल. गोमंतकांत स्त्रीशिक्षणविषयक कोणकोणते प्रयत्न झाले त्याचा त्यांनीं दिलेला इतिहास वाचून पाहिला म्हणजे माहितीच्या दृष्टीनें देखील लेखाचें महत्व कुणालाही पटल्याशिवाय राहाणार नाहीं.

ग्रंथांतील शेवटचा लेख श्री. यशवंत सूर्यराव सरदेसाई यांचा आहे. त्यांत त्यांनीं गोमंतकांतील गेल्या दोन पिढ्यांतील अनेकविध सामाजिक दृश्यांचा चित्रपट वाचकांच्या डोळ्यांपुढें उभा केला आहे. त्यावरून जुन्या पिढींतील लोकांना आपल्या परिचितांची फारा दिवसांनीं भेट झाल्याचें समाधान मिळेल तर तरुणांना एका जुन्या अपरिचित गोमंतकांत प्रवेश केल्यासारखें वाटेल.

श्री. बाळकृष्ण भगवंत बोरकर व दामोदर अच्युत कारे यांच्या 'महन्मंगले!' व 'विचारजननीस' या कविता त्यांच्या पूर्वलौकिकास साजेशाच असून कविहृदयाच्या सद्भावनेची

उत्तम प्रकारें साक्ष पटवितात. महाराष्ट्र-सरस्वतीच्या मंदिरांत श्री. कारे यांनीं पेटविलेल्या 'नंदादीपा'च्या प्रकाशानें व श्री. बोरकर यांनीं घेतलेल्या 'जीवनसंगीता'च्या मधुर आलापांनीं शारदाभक्तांचीं अंतःकरणें प्रसन्न झालेलीं आहेत. थोडक्याच कालांत या कविद्वयानें महाराष्ट्रांत जी कीर्ति मिळविली आहे तींत या दोन्ही कविता भर घालतील यांत शंका नाहीं.

वर ज्या लेखकांचा अल्प परिचय करून दिला आहे व ज्यांच्या परिश्रमामुळेंच ग्रंथाला प्रस्तुतचें स्वरूप प्राप्त झालें, त्यांच्याबद्दल येथें कृतज्ञता व्यक्त करणें हें आमचें आद्य कर्तव्य होय. याशिवाय अन्य रीतीनें ज्यांच्याकडून मदत झाली त्यांचाही येथें साभार उल्लेख करणें अवश्य आहे. श्री. दत्तात्रय व्यंकटेश पै, प्रो. बाळकृष्ण वामन सांवर्डेकर, श्री. काशिनाथ दामोदर नायक व श्री. दामोदर अच्युत कारे यांचें ग्रंथाच्या संपादनाच्या बाबतींत पुष्कळच साह्य झालें आहे. श्री. कारे यांची मदत तर बिनमोल अशी आहे. त्यांच्या प्रयत्नामुळेंच ग्रंथ त्वरित व सुबकपणें प्रसिद्ध करतां आला. मुंबई येथील मेसर्स रेगे प्रोसेस स्टूडियोचे मालक श्री. बाळकृष्ण विश्राम रेगे यांनीं अल्पावधींत व निम्म्या किंमतींत छाया-चित्रांवरून ब्लॉक तयार करून दिले; तसेंच मुंबईतील गोमंतक छापखान्याचे मालक श्री. काशिनाथ श्रीधर नायक व बंधु यांनीं ब्लॉकछपाईचें काम सुबक रीतीनें व मोफत करून दिलें. श्री. काशिनाथ वासुदेव केंकरे यांनीं या बाबतींत जरूर ती खटपट करण्याकरितां फार मेहनत घेतली. प्रो. बा. वा. सांवर्डेकर यांनीं आपल्यापाशीं असलेले कांहीं ब्लॉक ग्रंथांत वापरण्यासाठीं दिले. पुस्तकाचें मुद्रण त्वरित उरकण्याकरतां 'गोमंतक', 'हिंदु' व 'ईंदिय पुर्तुगेज' या छापखान्यांनीं आणि 'भारत' कार्यालयानेंही बरीच तसदी घेतली. कार्यकारी मंडळ या सर्वांचें अंतःकरण-पूर्वक आभारी आहे.

अशा रीतीनें अनेकांच्या अनेक प्रकारच्या मदतीनें तयार झालेला हा ग्रंथ जनता-जनार्दनापुढें आज आम्ही सादर करीत आहों. हा प्रयत्न जनतेच्या पसंतीस उतरून त्याला जर तिचा भरपूर आश्रय मिळाला तर यापुढें अशा स्वरूपाचे आणखीही प्रयत्न करण्यास संस्थेला हुरूप येईल.

शेवटीं, संस्थेचा सुवर्णमहोत्सव साजरा करण्याचा सुयोग ज्या वेळीं येईल त्या वेळीं तिच्या कार्याचा सर्व दिशांनीं विस्तार झालेला पाहण्यासाठीं आजच्या तिच्या सर्व ऋणानुबंधीयांना उदंड आयुरारोग्य लाभो, अमें इच्छितों.

सा. ब्रा. समाज कार्यालय,
मडगांव, ता. ३१-१-३८.

यशवंत सूर्यराव सरदेसाई
सगुण विठ्ठल नायक
केशव अनंत नायक
कार्यकारी मंडळ.

शुद्धिपत्र

पृष्ठ	स्तंभ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
			पंचवीस वर्षांची कामगिरी	
६	१	३३	स्थानिक मंडळीचें	स्थानिक दहाजण मंडळीचें
७	२	७	मंडळाच्या	मंडळ या
			थोरांचे आशिर्वाद	
४	—	५	तिला मडगांवांत	जिला मडगांवांत
१४	—	३	पांच शतकांतील	पावशतकांतील
			गेल्या पावशतकांतील गोमंतक	
८	२	१४	आहे इ. इ.	आहे. स्वच्छता, टापटीप यांची आवड वाढत्या प्रमाणावर आहे, इ. इ.
१४	१	१४	'हॅम्लेट'	हॅम्लेटकडे
१६	२	,,	संकटांच्या	संकरांच्या
२६	,,	३५	आपली	आमची
३१	१	८	Sr.	Sra.
,,	२	२९	शिक्षक	अध्यापक
३६	१	२२	ही	हीही
३७	२	३०	होते.	होते. आणि
३८	१	१५	भिमाजी राय	भिमाजी राव
३९	,,	२९ व ३०	नानासाहेब वगैरे	नानासाहेब, माधवराव वगैरे
४०	२	१९	१८४५-१८४८	१८४६-१८४८
४१	१	१२	Dama	Dona
५१	२	१०	सन १८८७	सन १८८०
५६	१	२०	तीं सुसंगत	तीं सुसंस्कृत व सुसंगत
,,	२	६	मनाची सिद्धता	मनाची व शरीराची सिद्धता
,,	,,	२७	ठेवतो,	ठेवतो.
५८	१	२०	शेंकडा दोनवर	शेंकडा फक्त दोनवर
६३	२	१	प्रगतीचें	बौद्धिक प्रगतीचें
,,	,,	३३	हातोड्यानें	हातोड्यानें व टांकीनें
६५	,,	१३	गोव्यांतले	गोमंतकस्थ
,,	,,	१७	बापांचीं	बाबांचीं
६६	,,	,,	अशा अशा	अशा

पृष्ठ	स्तंभ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
६७	२	१०	त्या समाजाकडून	गोमंतकीयांकडून
८२	१	२२	(कुंभ = २०५ ते २१० रत्तल)	(कुंभ = २० खंडी)
८३	२	३	(१ खंडी = २० कुंभ)	(१ खंडी=२०५ ते २१० रत्तल)
,,	,,	३०	१९३७ पेक्षां	१९३६ पेक्षां
८५	,,	१२	पैसाफंड	वैद्यफंड
९७	१	३२	खाऊनही	खाऊन ही
१०४	२	१४	१९३६	१९१६
१०८	१	१६	ठराविक काम	ठराविक वेळेला ठराविक काम
१२०	२	२९	वाचक णेंही	वाचकांना कळणेंही
१२४	१	५	गोवंतकाच्या	गोमंतकाच्या
१२६	२	१०	इकडे	तिकडे
१२७	,,	३	कारापुरकूर	कारापुरकर
१२९	,,	२९	ताटेकर	नाटेकर
१३४	,,	१३	खानेसुमारींत	चारही खानेसुमारींत
१५३	१	७	धनुर्थर	धनुर्धर
,,	,,	६	कृर्तृत्वावांचून	कर्तृत्वाबांचून
१५६	,,	६	संकृति	संस्कृति
,,	,,	२३	धार्मि-	धार्मिक
,,	२	८	मात्रभाषा	मातृभाषा
१५७	२	१७ व १८	भरीतकाम	भरतकाम
१८०	,,	११	मिनोझिश ब्रागांस	मिनेझिश ब्रागांस
१८१	,,	१	थंडीवाजीचा	रंडीवाजीचा
,,	,,	१०	कृतिमत्व	कृत्रिमत्व
,,	,,	१७	फळें गाभा गाथा काथ्या	मुळें गाभा काथा
,,	,,	२१	ज्ञानीकां	ज्ञानीयां
१९४	१	२९ व ३०	ऋषींनें	ऋषींचें
,,	,,	३०	प्रगति	प्रतिष्ठा

अनुक्रमणिका

१ प्रस्तावना इ. (पृ. १ ते ११)

२ पंचवीस वर्षांची कामगिरी (पृ. १ ते १४)

३ थोरांचे आशिर्वाद (पृ. १ ते १५)

४ कविता (पृ. १–२)

१ **महन्मंगले!** — श्री. बाळकृष्ण भगवंत बोरकर

२ **विचारजननीस** — श्री. दामोदर अच्युत कारे

५ गेल्या पावशतकांतील गोमंतक (पृ. १ ते १९४)

१ **पावशतकांतील सामाजिक परिवर्तन** — श्री. शांबाराव कृ. सरदेसाई ३

२ **कलात्म गोमन्तक** — प्रो. रामचंद्र शंकर नायक ११

३ **गेल्या २५ वर्षांतील इतिहाससंशोधन** — श्री. पांडुरंग स. पिसुर्लेकर ३४

४ **हिंदु स्त्रियांच्या हक्कांची वाढ** — श्री. जनार्दन विष्णु कामत ४७

५ **२५ वर्षांतील शैक्षणिक स्थिति** — श्री. दत्तात्रय व्यंकटेश पै ५६

६ **आमची आर्थिक परिस्थिति** — श्री. काशिनाथ दा. नायक ६७

७ **गोमंतकांतील हिंदूंच्या सार्वजनिक संस्था** — प्रो. वा. वा. सांवर्डेकर ९५

८ **गोमंतकीयांची साहित्यसेवा** — श्री. सुब्राव रामकृष्ण सामंत ... ११७

९ **गोमंतकाची खानेसुमारी व तिजवरून निघणारीं कांहीं अनुमानें** — श्री. विठ्ठल स. सुखठणकर.... १३२

१० **गोमंतक व स्त्रीशिक्षण** — श्री. शिवा फट्टू पै आंगले.... .... १५३

११ **पंचवीस वर्षांचें गोमंतक** — श्री. यशवंत सूर्यराव सरदेसाई १७१

६ भौगोलिक व ऐतिहासिक माहिती (पृ. १ ते ६)

(**एकूण पृष्ठसंख्या २४२**)

छायाचित्रें इ.

संस्थेचे संस्थापक सभासद

संस्थेचे कांहीं सभासद

संस्थेची इमारत

वाचनालय – अंतर्भाग (एक बाजू)

,, ,, (दुसरी बाजू)

गोमंतकाचा नकाशा

वार्षिकोत्सवांचे अध्यक्ष (२४ छायाचित्रें)

दूधसागरचा धबधबा

गोमंतकाच्या खानेसुमारीसंबंधीं कांहीं आलेख

आग्वादचा किल्ला

श्री. बाळकृष्ण सी. कामत (रौप्यमहोत्सवाचे अध्यक्ष)



संस्थेचे संस्थापक सभासद



संस्थेचे कांहीं सभासद

GOMANTAK BOMBAY. 4.

सारस्वत ब्राह्मण समाज

मडगांव–गोवा

पंचवीस वर्षांची कामगिरी

स्थापना व हेतु

परमेश्वरी कृपेनें आणि सर्व सभासद, आश्रयदाते व हितचिंतक यांच्या सदिच्छेनें व सहाय्यामुळें संस्थेस गेल्या गुढीपाडव्यास २५ वर्षे पुरीं झालीं. आणि आज तिचा **रौप्य-महोत्सव** साजरा करण्याचा सुयोग जुळून येत आहे, याबद्दल कार्यकारी मंडळ आणि तिचे वरील सर्व ऋणानुबंधी यांस अत्यंत धन्यता वाटेल, यांत तिळमात्र संशय नाहीं.

संस्थेची स्थापना शके १८३४ (परिधावी संवत्सर) च्या वर्षप्रतिपदेस (मंगळवार ता. १९ मार्च १९१२) झाली. तो काळ पोटभेदांच्या एकीकरणाच्या चळवळीमुळें अखिल सारस्वत ज्ञातीस अत्यंत खळबळीचा गेला. आणि या खळबळीच्या लाटा गोमंतकांतही पसरल्याशिवाय राहिल्या नाहींत. गोव्यांत त्यावेळीं एकी व बेकी अशा दोन्ही पक्षांच्या दोन परिषदा भरल्या होत्या व त्यामुळें अखिल गोमंतकांत धामधूम माजून राहिली होती. त्या चळवळीमुळें गोमंतक खडबडून जागा झाला. शिवाय त्याच वेळीं पोर्तुगालांत प्रजासत्ताक राज्याची स्थापना झाल्यामुळें तरुणांत एक प्रकारच्या उत्साहाचा संचार झाला. देशाकरतां आपण कांहींतरी केलें पाहिजे, ही भावना सर्वत्र उद्दीपित झाली. याच मनोभूमिकेंतून व वातावरणांतून संस्थेचा जन्म झाला.

संस्थेची स्थापना ९ तरुणांनीं वर लिहिलेल्या दिवशीं एकत्र जमून केली. त्याकरतां निमंत्रणें, जाहीर सभा वगैरे गाजावाजा करण्याचे कोणतेही प्रकार अंमलांत आणले नव्हते. प्रथम शक्य तोंवर स्वतः झीज सोसून कार्य करावयाचें व संस्थेसंबंधीं लोकांत विश्वास उत्पन्न झाल्यानंतरच जनतेकडे मदतीकरतां याचना करावयाची; तोंपर्यंत जे कोणी स्वखुषीनें कांहीं मदत करतील, तिचा आभारपूर्वक स्वीकार करावयाचा असें धोरण संस्थापकांनीं ठेवलें. व त्याप्रमाणें त्यांनीं एक वर्षपर्यंत खर्चाचा बोजा उचलला. संस्थापकांच्या या इच्छेस परमेश्वराचा आशिर्वाद आहे, याचीं प्रचिती म्हणूनच कीं काय, मडगांवचे जुन्या पिढींतील एक मन्मान्य

नागरिक श्री. विष्णु रामचंद्र नायक हे त्या बाजूनें जातांना त्यांची दृष्टि जमलेल्या तरुणांकडे गेली. व त्यांनीं संस्थेची माहिती वगैरे करून घेतल्यावर स्वखुषीनें संस्थेच्या जागेचें भाडें देण्याची जबाबदारी पत्करली.

सुरवातीसच मिळालेल्या त्यांच्या मदतीनें चालकांस धीर आला. अशा रीतीनें संस्थेचें कार्य धिम्मे धिम्मे पण निश्चित स्वरूपांत पुढें चालूं लागलें. १९१८ च्या ६ मार्चच्या सरकारी गॅझेटमध्यें संस्थेची नियमावली प्रसिद्ध झाली. तींत संस्थेचा उद्देश खालीलप्रमाणें नमूद करण्यांत आला:-

सामान्यतः एकंदर लोकसमूह व विशेषतः विद्याभ्यासी तरुण पिढी यांची शारीरिक, मानसिक व नैतिक उन्नति, त्यांना आवश्यक साधनांची मदत करून साधणें हा संस्थेचा हेतु आहे.

संस्थेचें वैशिष्ट्य

संस्थेचें नांव जरी ज्ञातिविशिष्ट असलें, तरी या संस्थेचा एक विशेष आहे. तो म्हणजे, तिच्या कार्याचा फायदा सर्व ज्ञातींच्या व धर्मांच्या लोकांना मिळतो हा होय. संस्थेच्या कार्यांत सर्व धर्मांचे व वर्णांचे लोक सारख्याच प्रमाणानें भाग घेतांना दिसून येतात. त्याचप्रमाणें तिला मदत करणाऱ्यांतही सर्व धर्मांचे लोक आढळून येतात.

ज्ञातींतील सर्व भेदांत ऐक्य नांदावें, इतर ज्ञातींशीं सलोखा वाढावा व एकंदर जनतेंत ज्ञानाचा प्रसार होऊन स्वत्वाची जागृति व्हावी, या दिशेनें संस्थेचे प्रयत्न चालू आहेत.

संस्थेचें कार्य

संस्थेचें कार्य प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष अशा दुहेरी स्वरूपाचें आहे. प्रत्यक्ष कार्यांत वाचनालय व व्याख्यानमाला यांचा अंतर्भाव होत असून अप्रत्यक्ष कार्यांत संस्थेनें केलेल्या इतर विविध चळवळींचा समावेश होतो. प्रत्यक्ष कार्य मूर्त स्वरूपांत दिसत असलें तरी अमूर्त स्वरूपांत असलेलें तिचें अप्रत्यक्ष कार्यच फार मोठें आहे. किंबहुना हें अप्रत्यक्ष कार्यच तिची अधिक महत्त्वाची कामगिरी होय असें म्हटलें असतां अतिशयोक्ति होणार नाहीं. इमारत सोडली तर संस्थेच्या प्रत्यक्ष कार्याइतका जरी नसला तरी त्याच्या खालोखाल सभासदांचा पैसा व श्रम हीं या अप्रत्यक्ष कार्याकरतां खर्ची पडलीं आहेत.

संस्था स्थापन झाली, त्यावेळीं सार्वजनिक कार्य करणारी ही एकच संस्था मडगांवांत होती. आणि संस्थेचें धोरण भेदातीत व विविध स्वरूपाच्या कार्यांना चालना देणारें असल्यामुळें सार्वजनिक कार्याविषयीं आवड असणारी बहुतेक सभासद व सभासदेतर मंडळी, संस्थेला मध्यबिंदु कल्पून तिच्याभोंवतीं जमूं लागली. या सर्व मंडळीचा सार्वजनिक कार्यासंबंधींचा विचारविनिमय येथेंच होऊं लागला. या दृष्टीनें संस्था ही प्रगतिपर विचारसरणीचें केंद्र बनली. इतकेंच नव्हे तर प्रगमनशील विचारांच्या लोकांना संस्था आश्रयस्थान झाली. जुन्या विचारांच्या प्रतिष्ठित लोकांच्या तावडीतून सुटून निर्भयपणें संचार करण्यास त्यांना सत्तेचें स्थान मिळालें. कोणत्याही नवीन कार्याची मुहूर्तमेढ रोंवण्याचा ऊहापोह येथेंच होऊं लागला.

या केंद्रांतूनच ज्यांचा उगम झाला, ज्या प्रत्यक्ष संस्थेतर्फे चालविण्यापेक्षां निराळ्या संघटनेखालीं चालविणेंच भावी यशाच्या दृष्टीनें श्रेयस्कर वाटलें, ज्यांचा थोडाफार उल्लेख संस्थेच्या दप्तरांत सांपडतो, तेवढ्याच चळवळींचा उल्लेख करावयाचा झाल्यास, गोमंतकांतील मराठी शिक्षणक्रमांत एकसूत्रीपणा आणण्याच्या प्रयत्नाचा ओनामा, 'शिक्षण-प्रसारक संघा'-मार्फत चालविण्यांत आलेलें श्रीदामोदर विद्यालय, वाङ्मयोपासकांच्या संमेलनांतून उगम पावलेलें

"गोमंतक साहित्य-संमेलन" यांचा प्रामुख्यानें उल्लेख करतां येईल. तसेंच महाराष्ट्र-साहित्य-संमेलन भरवावें अशी मूळ कल्पना काढण्यापासून तें यशस्वी होईपर्यंत ज्यांनीं त्यास हातभार लावला त्यांत संस्थेचीही मंडळी प्रामुख्यानें होती.

याशिवाय लहानलहान प्रयत्नांना तर संस्थेची मदत नेहमीं मिळालेली आहे; हिंदु विद्यार्थी-समूह, बालचमू, युवक-संघ, विचार-विलास मंडळ, स्टुडंट्स् युनियन अशासारख्या संस्थांना, कोणास संस्थेची जागा, कोणास दिवाबत्तीची सोय, तर कोणास इतर तऱ्हेची मदत संस्थेकडून सदैव मिळालेली आहे. संस्थेची इमारत झाल्यावर तर हें तिचें कार्य वाढल्या प्रमाणावर चालूच आहे. कोणतीही सार्वजनिक व्याख्यानें, सभा-संमेलनें यांकरतां संस्थेच्या सभागृहाचा नेहमींच सर्रास उपयोग केला जातो. येथें भेदाभेद केला जात नाहीं.

सन १९२७ कालीं जेव्हां मुंबईची अस्पृष्ट मंडळी कीर्तनाकरतां येथें आली आणि कीर्तन करण्यास त्यांस गांवांत कुठेंही जागा मिळेनाशी झाली, तेव्हां ताबडतोब त्यांस संस्थेचा दिवाणखाना मोकळा करून देण्यांत येऊन अस्पृष्टांबरोबरच स्पृष्ट मंडळीही कीर्तनास एकत्र बसण्याची व शेवटीं हरिजनाकडून प्रसाद-पंचखाद्य वांटण्याचीही व्यवस्था चालकांनीं केली.

प्रत्यक्ष कार्य – वाचनालय

ज्ञानप्रसाराचें महत्वाचें साधन म्हणून संस्थेच्या स्थापनेबरोबरच वाचनालय सुरू करण्यांत आलें. गांवांत एकही वाचनमंदिर त्यावेळीं नव्हतें. सामान्य जनतेंत ज्ञानाची गोडी उत्पन्न करून तिला सुसंस्कृत करण्यास वाचनमंदिरासारखें दुसरें साधन नाहीं. वाचनालयें हीं जनतेचीं विश्वविद्यालयें होत, असें श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड यांनीं म्हटलें होतें, तें अगदीं सत्य होय. शाळेंत तरुण पिढीच्या भावी आयुष्यक्रमाचा नकाशा तयार करून दिला जातो. पण पालकांच्या शिक्षणाच्या अभावीं तो अमलांत आणणें दुष्कर होऊन बसतें. पालक-शिक्षणाचें, वाचनमंदिर हें एक प्रभावी साधन होय, या विचारसरणीनें प्रेरित होऊन वाचनमंदिराचें कार्य संस्थेनें प्रथम हातीं घ्यावें असें संस्थापकांनीं ठरविलें. याच वेळीं 'नवयुग' या नांवाचें एक हस्तलिखित साप्ताहिकही सभासदांनीं सुरू केलें होतें. पण कांहीं अंक निघाल्यावर तें बंद ठेवण्यांत आलें.

आरंभीं एका गुदामवजा खोलींत संस्थापक श्री. काशिनाथ दामोदर नायक व श्री. सदाशिव वासुदेव केंकरे यांनीं दिलेल्या १०० – १५० पुस्तकांनीं भरलेली एक लहानशी केरोसीनच्या डब्याची पेटी व एका मोडक्या मेजावर ४-५ नियतकालिकें एवढ्या सामुग्रीवर वाचनालयाच्या संसारास सुरवात झाली. १०-१५ वाचक नियमितपणें वाचावयास येत. दररोज वाचावयास बाहेर जाणाऱ्या पुस्तकांची संख्या ४-५ असे. संस्थेच्या या सुरवातीच्या संसाराची तिच्या आजच्या पसाऱ्याशीं तुलना केली तर आज तिचा ग्रंथसंग्रह दीडशेंवरून नऊ हजारांच्या घरांत गेलेला असून त्याची किंमत जवळजवळ १० हजार रुपये आहे, असें दिसून येतें. वाचनालयांत येणाऱ्या नियतकालिकांची संख्या, ७ दैनिकें, ५ अर्धसाप्ताहिकें, १३ साप्ताहिकें, २५ मासिकें, ३ त्रैमासिकें मिळून ५३ वर गेलेली दिसून येईल. दररोज नियमितपणें वाचनास येणाऱ्या वाचकांची संख्या सध्या ५० ते ७५ पर्यंत असते. वाचनालयाबाहेर वाचावयास नेण्यांत येणाऱ्या पुस्तकांची संख्या दरसाल ७ ते ८ हजारांपर्यंत वाढली आहे. व ती नेणाऱ्या वाचकांची संख्या तीनशें ते चारशेंपर्यंत असते. या पंचवीस वर्षांत पुस्तकें एक लक्ष एकुणचाळीस हजार

खेपा बाहेर वाचावयास गेलीं. वाचावयास गेलेल्या पुस्तकांची वर्गवारी परिशिष्टांत दिली आहे. तीवरून पुस्तकवाचनाचें प्रमाण व निरनिराळ्या विषयांची कमीअधिक आवड दिसून येईल. पुस्तक - संग्रहाच्या बाबतींत, नव्यांबरोबरच जुनीं व दुर्मिळ पुस्तकेंही शक्य तोंवर संग्रहित करण्याचें धोरण असून त्या दृष्टीनें महाराष्ट्र सारस्वतांतील ज्येष्ठ व श्रेष्ठ म्हणून ज्याची ख्याति आहे, त्या 'विविधज्ञान-विस्तार' वगैरेसारख्या मासिकांचा तसेंच इतर पुस्तकांचाही संग्रह संस्थेनें मुद्दाम केला आहे. वाचनालयाच्या बाबतींत झालेल्या कार्याचा वर जो आढावा दिला आहे तो जरी प्रगतिपर असला तरी गांठलेल्या पल्ल्यानें चालकांचें समाधान झालेलें नाहीं. वाचनालयास संदर्भग्रंथसंग्रहालयाची जोड मिळावी, समाजाचे भावी आधारस्तंभ जीं लहान मुलें त्यांच्याकरतां एक बालविभाग उघडला जावा, एकादा गोष्टींचा वर्ग किंवा अशासारखे दुसरे प्रयत्न चालवून त्यांच्या ज्ञानांत भर घालण्याची व्यवस्था करण्यांत यावी, महिलांकरितां एका स्वतंत्र विभागाची सोय असावी, फिरत्या वाचनालयाच्या द्वारा ठिकठिकाणच्या ज्ञानपिपासूंची तृप्ति करतां यावी, पुस्तकांचें वर्गीकरण व तीं देण्याघेण्याची व्यवस्था वगैरे बाबतींत अगदीं शास्त्रीय पद्धति अंगिकारिली जावी, वगैरे नवीन उपक्रम करण्याची त्यांची आकांक्षा आहे. ती कितपत पूर्ण होईल हें भविष्यकालच सांगेल.

प्रत्यक्ष कार्य – व्याख्यानमाला

संस्थेचें दुसरें कार्य व्याख्यानमाला होय. वार्षिक समारंभास जोडून व्याख्यानमाला गुंफण्याची प्रथा १९१९ सालापासून पाडण्यांत आली व गेल्या तीन वर्षांपासून ती समारंभास जोडून न होतां मधूनमधून होत असते. त्यापूर्वी १९१४ सालापासून संस्थेतर्फे साप्ताहिक व्याख्यानमाला चालू असे. नंतर असाच प्रयत्न 'हिंदु विद्यार्थी-समूहा'तर्फे चालू झाल्यामुळें त्याला जागा व दिव्याची सोय संस्थेतर्फे करून देण्यांत आली, व संस्थेतर्फे होणारीं साप्ताहिक व्याख्यानें बंद ठेवण्यांत आलीं, ही समूहातर्फे चालणारी व्याख्यानमाला १९१७ अखेरपर्यंत चालून नंतर बंद पडली. १९१९ सालीं या कल्पनेस व्यवस्थित व व्यापक प्रमाणांत चालना देण्याचें चालकांनीं योजिलें. व तदनुसार वार्षिक समारंभास जोडून वसंत व्याख्यानमालेच्या धर्तीवर एक लहानशी व्याख्यानमाला गुंफण्याचें ठरविण्यांत आलें.

या व्याख्यानमालेंत भाग घेण्यास महाराष्ट्रीय तसेंच गोमंतकीय हिंदु व ख्रिस्ती नामांकित वक्त्यांना आमंत्रणें देण्यांत आलीं. त्याप्रमाणें महाराष्ट्रांतील व गोमंतकांतील थोर व्यक्तींनीं या व्याख्यानमालेंत भाग घेऊन आपल्या विचारपरिप्लुत भाषणांच्या द्वारें तिचा लौकिक वाढविला व अशा रीतीनें ही कल्पना यशस्वी करण्यास मदत केली. ही प्रथा आतांपर्यंत अखंड रीतीनें अशीच चालू आहे.

वार्षिक समारंभाचे अध्यक्ष या नात्यानें असो किंवा व्याख्याते म्हणून असो, संस्थेच्या व्यासपीठाला महाराष्ट्रांतील व गोमंतकांतील बहुतेक प्रसिद्ध व थोर व्यक्तींचे पाय लागलेले आहेत. तसेंच व्याख्यात्यांतही निरनिराळ्या पक्षांच्या, धर्मांच्या किंवा मतांच्या लोकांचा समावेश झालेला दिसून येईल.

व्याख्यानमालेंतील वक्ते, विषय व अध्यक्ष यांची यादी परिशिष्टांत जोडलेली आहे, तीवरून व्याख्यानमालेंत झालेल्या व्याख्यानांचा तपशील कळून येईलच.

या व्याख्यानमालेच्या योगानें ज्ञानप्रसारास तर मोठी मदत झालीच. पण गोमंतक व महा-



सारस्वत ब्राह्मण समाजाची इमारत

GOMANTAK BOMBAY, 4.

राष्ट्र यांना एकत्र आणण्याचीही फार मोठी कामगिरी तिजकडून झाली.

राजकीय भिन्नतेमुळें एकाच संस्कृतीच्या या दोन विभागांची परस्परांना ओळख नव्हती, उलट पूर्वग्रह व गरैसमजुती यांनीं ते एकमेकांपासून दुरावले होते. या गैरसमजुती नाहींशा करून त्यांना एकमेकांच्या जवळ आणण्याचें श्रेय व्याख्यानमालेनें घेतलें.

व्याख्यानमालेंत व स्वतंत्र रीतीनें मिळून या २५ वर्षांत झालेल्या व्याख्यानांची वर्गवारी करावयाची झाली, तर ती सामान्यतः राजकीय, सामाजिक, धार्मिक, ऐतिहासिक, वाङ्मयविषयक, शैक्षणिक, व्यायामविषयक, प्रवासवर्णनात्मक, चरित्रात्मक, आर्थिक, आरोग्यविषयक इ., अशी करतां येईल, आणि तीवरून विविध विषयांना या व्याख्यानमालेंत कसें स्थान देण्यांत आलें आहे तें दिसून येईल. संस्थेकडून होणाऱ्या प्रत्यक्ष कार्याची ही ओळख झाली. आतां तिच्या अप्रत्यक्ष कार्याची माहिती करून दिली पाहिजे.

सभासद या नात्यानें असो किंवा सार्वजनिक कार्याची आवड बाळगणारी व्यक्ति या नात्यानें असो, निरनिराळ्या कार्यकर्त्या लोकांचा संबंध संस्थेकडे अधिकाधिक येऊं लागला. व त्यांच्यामध्यें सार्वजनिक प्रश्नांसंबंधीं विचारविनिमय होऊं लागला. अशा रीतीनें अशा सर्व समविचारी लोकांचें, संस्था हें मध्यवर्ति ठिकाण झालें. अशा विचारविनिमयांतून, गोमंतकीय मराठी शिक्षणाची आज जी विस्कळीत व अनिश्चित अशी स्थिति आहे, ती दूर करून त्याला एकसूत्रीपणा आणण्याच्या दृष्टीनें कांहीं तरी कार्य करावें असें ठरविण्यांत आलें. त्याप्रमाणें चालकांच्या खटपटीनें ता. ६ सप्टेंबर १९१६ रोजीं एक लहानशी कार्यकर्त्यांची सभा बोलावण्यांत येऊन यासंबंधींचा ऊहापोह करण्यांत आला, व सर्वानुमतें असें ठरविण्यांत आलें कीं, एक प्रश्नपत्रिका काढून, यासंबंधीं तज्ज्ञांचीं मतें अजमावण्यांत यावीं. व त्या सर्वांचें संकलन करून जनतेसमोर हा प्रश्न मांडावा, आणि नंतर एकादी संघटित व्यवस्था करण्याचा प्रयत्न करण्यांत यावा. प्रश्नपत्रिका खालीलप्रमाणें होती:—

१. फक्त प्राथमिक शिक्षणानें शिक्षणाची पूर्तता होत नाहीं. दुय्यम व उच्च शिक्षण या पुढच्या पायऱ्या आहेत. व त्यांतला अभ्यासक्रम ठरीव आहे. या गोष्टी लक्षांत घेऊन गोमंतकांतील प्राथमिक शिक्षणक्रम किती इयत्तांचा व किती वर्षांचा ठरविणें इष्ट होईल ?

२. प्राथमिक शिक्षणक्रमांत कोणकोणते विषय असावे व त्यांचें शिक्षण प्रत्येक इयत्तेंत कोठपासून कोठपर्यंत द्यावें ?

३. तूर्त जी शिक्षणपद्धति ठिकठिकाणीं आढळते, तिच्यांतील कोणकोणते विषय अगर उपांगें अनावश्यक समजून तीं सर्वांशीं किंवा अंशतः गाळण्यांत यावीं ?

४. गोमंतकांतील स्थानिक परिस्थितीस अनुसरून कोणत्या नवीन विषयांचा अथवा उपांगांचा समावेश प्राथमिक शिक्षणांत करण्यांत यावा ?

५. शिक्षणपद्धतीचें जें स्वरूप तत्वतः ठरेल व्यावहारिक रूप येण्याकरितां त्याप्रत काय उपाय योजावे ?

या पत्रकावर खालील सदगृहस्थांच्या सह्या होत्या.

१ श्री. दामोदर वासुदेव नायक.
२ ,, विष्णु रामचंद्र नायक.
३ ,, यशवंत विष्णु नायक.
४ ,, सखाराम राया धुमे.
५ ,, दत्तात्रय पांडुरंग नाईक दलाल.
६ ,, नागेश वासुदेव सडेकर.
७ ,, यशवंत सूर्याजी सरदेसाई.

८ श्री. शिवा फटू पै आंगले.
९ ,, रामचंद्र व्यंकटेश नायक.
१० ,, नीळकंठ विठ्ठल दळवी.

या प्रश्नांना उत्तरेंही बऱ्याचजणांकडून आलीं. पण पुढें त्यांचें संकलन होऊन तें जनतेपुढें मांडण्याचें कार्य झालें नाहीं. व इतक्यावरच ही योजनाही बंद पडली. पुढें मठग्रामस्थ हिंदुसभेनें हें कार्य हातीं घेऊन गोमंतकीय मराठी शिक्षण-संमेलनाचें प्रथम अधिवेशन भरविलें. सध्या या संमेलनाचीं पाळेंमुळें खोल रुजलीं असून भावी काळांत ही चळवळ जास्त जोमानें फोफावेल असें तिच्या आजच्या लोकप्रियतेवरून दिसून येत आहे. दुसरा उल्लेख **'शिक्षणप्रसारक संघा'** तर्फे चालविण्यांत आलेल्या 'श्रीदामोदर विद्यालया'चा केला पाहिजे. प्राथमिक शिक्षण हा सर्व शिक्षणाचा पाया होय. तोच जर डळमळीत असेल तर पुढील सर्व इमारत कोसळून पडल्याशिवाय राहणार नाहीं. या विचारसरणीमुळें प्राथमिक मराठी शिक्षण पायाशुद्ध, भरीव व नमुनेदार मिळण्यासाठीं एकादी व्यवस्था करावी असें सर्वांच्या विचारानें ठरलें व प्रत्यक्ष संस्थेतर्फेंच हें कार्य होण्यापेक्षां एकाद्या व्यापक संघटनेखालीं तें करावें,असें निश्चित होऊन वर उल्लेखिलेल्या शिक्षणप्रसारक संघाची स्थापना झाली. संघानें एखादें नवीन विद्यालय सुरू करण्यापेक्षां श्री.विष्णु रामचंद्र नायक यांच्या देखरेखीखालीं असलेलें श्रीदामोदर विद्यालय हातीं घेऊन चालवावें असें ठरलें. १९२४ ते १९२७ पर्यंत हें विद्यालय संघानें चालविलें. संस्थेच्या सभासदांनीं शाळा चालविण्याच्या खर्चाचा बराच आर्थिक बोजा स्वखुषीनें पत्करला. त्यानंतर स्थानिक मंडळीचें 'मठग्रामस्थ हिंदुसभा' या नांवानें पुनरुज्जीवन करण्यांत येऊन त्यामार्फत श्रीदामोदर विद्यालय चालविण्यांत येऊं लागलें. त्यानंतर वाङ्मयोपासकांच्या संमेलनाचा उल्लेख केला पाहिजे.

गोमंतकीय वाङ्मयसेवक एकत्र जमावे, त्यांनीं आपसांत गोमंतकीय मराठी वाङ्मयाच्या वाढीसंबंधीं विचारविनिमय करावा, व तेणेंकरून त्याला व्यवस्थित व प्रगमनशील वळण लावावें, या हेतूनें १९३४ सालीं प्रसिद्ध साहित्यिक मामा वरेरकर यांच्या अध्यक्षतेखालीं संस्थेनें एक वाङ्मयोपासकांचें संमेलन भरविलें. संमेलनास गोमंतकांतील बहुतेक वाङ्मयोपासक हजर होते. संमेलनाच्या बैठकींत दोन दिवस जो विचारविनिमय करण्यांत आला त्याचें फळ म्हणून खालील ठराव पास करण्यांत आले:-

ठराव १ ला — गोमंतकांतील वाङ्मयकार्याला संघटित व प्रगतिपर स्वरूप देण्यासाठीं अखिल गोमंतकाची साहित्य-परिषद् शक्य तितक्या लौकर भरविण्याची आजच्या या वाङ्मयोपासकांच्या संमेलनाला अत्यंत जरूरी वाटत आहे.

ठराव २ रा — वरील साहित्य-परिषद् भरविण्याची व्यवस्था गोमंतक साहित्यसेवक मंडळानें आपल्या अंगावर घ्यावी, अशी या संमेलनाची मंडळाला विनंति आहे.

ठराव ३ रा — गोमंतकाच्या राजकीय, सामाजिक व वाङ्मयीन अशा तिन्ही अंगांच्या एका सविस्तर व शक्य तितक्या प्राचीन कालापासूनच्या इतिहासग्रंथाची जरूरी आज तीव्रतेनें भासूं लागल्यानें हें कार्य इतिहास-प्रेमी तज्ज्ञ-मंडळानें शक्य तितक्या लौकर हातीं घ्यावें, आणि या कामीं सर्वांनीं अगत्यानें मदत करावी, अशी या संमेलनाची विनंति आहे.

(अ) हा इतिहास अधिकृत व विश्वसनीय होण्यासाठीं, प्रसिद्ध झालेल्या साधनांप्रमाणें अप्रसिद्ध साधनांचाही उपयोग करणें आवश्यक असल्यामुळें त्या साधनांचा म्हणजे जुन्या कागद-

पत्रांचा संग्रह व्हावा, आणि त्यांची एक सूचि तयार करण्यांत यावी. या कार्यांत प्रत्येकानें आपापल्यापाशीं असलेले कागदपत्र देऊन अगर त्यांची माहिती तरी पुरवून सहाय्य करावें अशी या संमेलनाची सर्वांपाशीं मागणी आहे.

ठराव ४ था — पोर्तुगीज सरकारनें मुंबई येथें नेमलेल्या इमिग्रेशन कमिटीनें कोंकणी भाषेला व्यवस्थित स्वरूप देण्याचे व तिची लिपि ठरविण्याचे प्रयत्न चालविले आहेत. या बाबतींत प्रस्तुत संमेलनाची सदर कमिटीस अशी जोराची शिफारस आहे कीं, तिनें रोमन लिपीचा कोंकणीसाठीं स्वीकार न करतां देवनागरीचाच स्वीकार करावा. कारण त्यामुळें सबंध कोंकणपट्टींत पसरलेल्या हिंदु व ख्रिस्ती बांधवांमध्यें वाङ्मयकार्याच्या बाबतींत जो दूरीभाव आहे तो नाहींसा होऊन कोंकणीच्या उत्कर्षाला तें पोषकच होईल.

ठराव ५ वा — गोमंतक साहित्यसेवक मंडळानें पुढील कार्यें वाङ्मयोन्नतीसाठीं हातीं घ्यावींत, अशी या संमेलनाची शिफारस आहे.

(१) गोमंतकांत निर्माण होणाऱ्या उत्कृष्ट वाङ्मयाला मदत देण्यासाठीं त्याचा पुरस्कार करणें.

(२) गोमंतकीय वाङ्मय प्रसिद्ध करणें.

(३) गोमंतकीय वाङ्मयाचा प्रतिवर्षी आढावा प्रसिद्ध करणें.

ठराव ६ वा — आमच्या मराठी शाळांतून सध्या शिक्षणक्रमांत जीं पुस्तकें लावलीं जातात त्यांतून, मुलांमधील सौंदर्यदृष्टि व कल्पकता हे गुण जागृत होण्यास आवश्यक असणारे वाङ्मयगुण पाहिजे त्या प्रमाणांत आढळत नाहींत. आणि त्यामुळें वाङ्मयाचा रसास्वाद घेण्याची व उत्कृष्ट वाङ्मयनिर्मिती करण्याची क्षमता त्यांच्या अंगीं येत नाहीं. म्हणून या संमेलनाची गोमंतकीय मराठी शिक्षण-संमेलनाला अशी शिफारस आहे कीं, वाङ्मयदृष्टि ठेवून क्रमिक पुस्तकांची नवी निवड त्यानें करून ती सर्व शाळांना अंमलांत आणण्यास लावावी.

दुसऱ्या ठरावानुसार दरसाल संमेलनें भरविण्याची व्यवस्था करण्याची जबाबदारी गोमंतक साहित्य-सेवक मंडळाच्या वाङ्मयविषयक मध्यवर्ति संस्थेवर टाकण्यांत आली. आणि त्याप्रमाणें १९३५ सालीं 'गोमंतक-साहित्य-संमेलन' या नांवाखालीं वरील संस्थेतर्फे १लें संमेलन भरविण्यांत आलें. हें संमेलन संस्थेच्या सभागृहांत सुप्रसिद्ध साहित्यिक श्री.विष्णु स. खांडेकर यांच्या अध्यक्षतेखालीं थाटानें साजरें झालें. अशा रीतीनें संस्थेच्या कल्पनेस मूळ धरलेलें पाहून चालकांस समाधान वाटत असून ती दिवसेंदिवस विस्तार पावेल अशी अपेक्षा केली असतां वावगें होणार नाहीं.

चौथा उल्लेख गोमंतकांत भरलेल्या १५ व्या 'महाराष्ट्र-साहित्य-संमेलना'चा केला पाहिजे. अखिल गोमंतकानें हें संमेलन यशस्वी होण्याबद्दल पराकाष्ठेचे प्रयत्न केले आहेत. संमेलन गोमंतकांत मागवावें या कल्पनेचा उच्चार प्रथम संस्थेच्या केंद्रांत झाला. व संस्थेच्या मंडळीकडून संमेलन यशस्वी होण्याकरतां इतरांबरोबर यथाशक्ति हातभार लावला गेला.

येथवर ठळकठळक गोष्टींचा निर्देश झाला. इतर सर्वच बाबींचा विस्तारपूर्वक उल्लेख करतां येणें शक्य नाहीं. तरी फर्स्टएडच्या शिक्षणाच्या वर्गाचा अवश्य उल्लेख केला पाहिजे. प. वा. नरसिंह दामोदर कीर्तनी या संस्थेच्या सभासदांनीं डॉ. मिरांद यांच्या देखरेखीखालीं कांहीं काळ हा वर्ग चालविला. नंतर श्री. कीर्तनी यांची नोकरीनिमित्त बदली झाल्यामुळें हा वर्ग बंद पडला. संस्थेकडून होणाऱ्या कार्यांत तरुणांच्या बहुतेक चळवळींना पाठबळ देण्याचें कार्य

संस्थेकडून नेहमीं चालू आहे. 'हिंदु विद्यार्थी-समूहा'चा उल्लेख वर केलाच आहे. त्याचप्रमाणें 'बालचमू' या संस्थेचाही उल्लेख केला पाहिजे. स्वयंसेवेची वृत्ति तरुणांत वाढावी यासाठीं 'बालवीर' चळवळीच्या धर्तीवर चाललेल्या त्या संस्थेला प्रस्तुत संस्थेनें शक्य तोंवर मदत केली आहे.

इमारत-फंड

संस्थेला स्वतःची इमारत नसल्यामुळें, विस्तृत जागेच्या अभावीं तिची फार कुचंबणा होत असे. पुस्तकसंग्रह व्यवस्थित ठेवण्याच्या बाबतींत फार अडचणी येत. एखादें व्याख्यान करावयाचें झालें तर नियतकालिकें ठेवण्यांत आलेलीं टेबलें तसेंच खुर्च्या वगैरे सामान बाहेर काढून जागा मोकळी करून घ्यावी लागे; व व्याख्यान झाल्यावर तीं पुन्हां जाग्यावर ठेवावीं लागत. इतकेंही करून १५० श्रोते व्यवस्थित बसण्याची सोय नव्हती. या सर्व अडचणींमुळें इमारतीचा प्रश्न तांतडीनें हातीं घेण्यांत आला. त्यापूर्वी गांवांत सार्वजनिक रीत्या बांधण्यांत येणाऱ्या श्रीदामोदर विद्याभुवनांत संस्थेच्या वाचनालयाची सोय करून देण्याचें ठरलें होतें. व त्यास अनुसरून संस्थेच्या सभासदांनीं 'राधामाधव' नाटकाचा प्रयोग करून त्याचें उत्पन्न ३१० रुपये भुवनाच्या फंडास दिलें. व इतर रीतीनेंही वर्गणी जमविण्याच्या कामीं फार मदत केली. पण इमारत पुरी झाल्यावर हा ठराव अंमलांत आला नाहीं. त्यामुळें संस्थेला इमारतीचा प्रश्न निकडीनें हातीं घेगें भाग पडलें, व १९१९ सालीं याकरतां कमिटी निवडण्यांत येऊन आंकडेही घेण्यांत आले. प्रारंभासच श्री. यशवंत विष्णु नायक यांनीं पांडुरंग विष्णु नायक यांच्या नांवें, तसेंच विष्णु रामचंद्र नायक यांनीं, प्रत्येकीं पांचशें रुपयेप्रमाणें वर्गणी घालून आशादायक सुरवात करून दिली. इतकी तयारी झाली. पण मध्यवर्स्तीत सर्वांना सोईस्कर होईल अशी जागा मिळण्याची पंचाईत पडूं लागली. तथापि परमेश्वरी कृपेनें ही अडचण दूर झाली.

त्या वेळचे गव्हर्नरसाहेब दो. ज्यायमि द मॉराइश् यांच्याकडे जागेकरतां मागणी करण्यांत आली. व ती सरकारनें उदार अंतःकरणानें मान्य करून सध्या इमारत असलेली जागा संस्थेस मोफत दिली. सदर्हू जागेवर सरकारी इमारत होती ती संस्थेनें विकत घेऊन मोडून टाकली. व त्याच जागेवर आजच्या सरस्वती-मंदिराची उभारणी केली.

सरकारचे तर संस्थेवर उपकार झालेच, पण त्याशिवाय आमच्या पणजीकर बंधूंचें या कामीं फार मोठें व बिनमोल सहाय्य झालें. त्यांच्या मदतीशिवाय पुढें पाऊल टाकणेंच शक्य झालें नसतें. हे आमचे बंधु म्हणजे Sr. Alberto Garcia da Silva – Reitor do Liceu Central, श्री. महादेव श्री. भोबे काकुले, श्री. शांबाराव सरदेसाई, श्री. कृष्णराव केणी, श्री. शांबाराव पिसुर्लेकर, डॉ. आत्माराम गोविंद बोरकर, श्री. विठ्ठल स. सुखठणकर, डॉ. बाळकृष्ण दत्ताराम साखरदांडे, श्री. व्यंकटेश वि. सू. सरदेसाई, श्री. शिवा फटू पै आंगले हे होत. याशिवाय Sr. Bernardino Camilo da Costa - Engenheiro, Sr. Sequeira Nazaré, परलोकवासी Sr. Joaquim Filipe Soares, Sr. Vieira de Castro Menezes यांचीही या कार्यास मदत झाली.

जागेची व्यवस्था झाली, पण 'सर्वारंभास्तंडुला प्रस्थमूलः' या म्हणीप्रमाणें, पैशाची अडचण दत्त म्हणून पुढें उभी राहिली. लक्ष्मीच्या प्रसादाशिवाय कोणतेंच पाऊल पुढें पडेना. या बाबतींत विशेष खटपट करण्याचें चालकांनीं ठरविलें व ईश्वरी कृपेनें व आश्रयदात्यांच्या

संस्थेचें वाचनालय—अंतर्भाग.

GOMANTAK BOMBAY, 4.

संस्थेचें वाचनालय—अंतर्भाग.

GOMANTAK BOMBAY, 4.

मदतीनें या त्यांच्या प्रयत्नांस यशही आलें. आणि १९२७ सालीं श्री. महादेव श्री. भोबे काकुले यांच्या यशस्वी हस्तें संस्थेच्या १५ व्या वाढदिवशीं नवीन इमारतीच्या पायाचा दगड समारंभानें बसविण्यांत आला. पुढें १९३१ सालीं श्री. काकुले यांच्याच हस्तें तिचें अनावरण करण्यांत आलें. अशा रीतीनें सर्व सभासदांच्या व हितचिंतकांच्या मदतीनें व सहाय्यानें प्रस्तुतच्या शारदामंदिराच्या उभारणीची कल्पना मूर्त स्वरूपांत आली.

इमारत-फंडास मोठी मदत मुंबईच्या काशिनाथ दामोदर नायक पेढीमार्फत मिळाली. या तिच्या मदतीशिवाय इमारतीच्या कार्याला चालनाच मिळाली नसती. पेढीकडून आतांपर्यंत जवळजवळ ३ हजार रुपये इमारत-फंडास मिळवून देण्यांत आले. श्री. काशिनाथ वासुदेव केंकरे व श्री. सदाशिव सीताराम दाभोळकर यांनीं ही कामगिरी बजावली. वर्गणी जमविण्याच्या कामीं संस्थेचे सभासद व अभिमानी श्री. काशिनाथ वा. केंकरे यांनीं आपुलकीच्या भावनेनें निरलसपणें जे श्रम घेतले व कष्ट सहन केले ते बिनमोल होत. त्यांचे आभार मानावयास संस्थेपाशीं शब्द नाहींत.

वरील मदतीच्या खालोखाल मदत नाटकांच्या प्रयोगांपासून मिळाली. गंधर्व नाटक मंडळीनें १९२२ सालीं दिलेल्या 'स्वयंवर' नाटकाच्या खेळापासून जवळजवळ नऊशें रुपये निव्वळ उत्पन्न राहिलें. हा खेळ प. वा. सर नारायण गणेश चंदावरकर यांच्या अध्यक्षतेखाली करण्यांत आला होता. या कामीं मुंबईकर स्वज्ञातीय समाज व गोमंतकीय मंडळी यांनीं बहुमोल मदत केली. या नाटकप्रयोगाच्या वेळीं मुंबईतील प्रसिद्ध व दानशूर स्वज्ञातीय पुढारी प. वा. बाबासाहेब दाभोळकर यांनीं इमारतफंडास ५०० रुपये दिल्याचें श्री. जिवाजी कृष्ण परुळकर यांनीं जाहीर केलें. इमारत-फंडाच्या बाल्यावस्थेंत या देणगीचें मोठेंच सहाय्य झालें. या सर्व प्रकरणीं आमचे प्रांतबंधु श्री. गणपतराव लाड यांचें मिळालेलें सहाय्य बिनमोल आहे. त्याचप्रमाणें श्री. जिवाजी कृष्ण परुळकर, श्री. पांडुरंगराव लाड - सॉलिसिटर यांनींही फार मेहनत घेऊन हें काम तडीस नेण्यास मदत केली. या बाबतींतील खटपट श्री. यशवंतराव सरदेसाई यांनीं मुद्दाम मुंबईस जाऊन केली.

बलवंत संगीत मंडळीच्या (१९२३) 'पुण्यप्रभाव' खेळापासून जवळजवळ ८०० रुपये व ललितकलादर्श संगीत मंडळीच्या (१९३५) 'संन्याशाचा संसार' या खेळापासून १६७ रु. इमारतफंडास मिळाले.

येथील कांहीं हौशी तरुणांनीं १९२६ सालीं 'बेबंदशाही' नाटकाचा प्रयोग २ दिवस करून दाखविला. त्याचें निव्वळ उत्पन्न १४२३ रुपये इमारतफंडास मिळालें.

यानंतर संस्थेचे सभासद श्री. दत्ता गिरी कारे यांचा उल्लेख केला पाहिजे. त्यांनीं हौसेनें इमारतफंडाकरतां वर्गणी जमविण्याचें कार्य हातीं घेऊन जवळजवळ ४०० रु. इमारतफंडाला मिळवून दिले. यानंतरचा उल्लेख इमारतफंडाला लहानमोठ्या देणग्या देणाऱ्या दात्यांचा केला पाहिजे. पुष्कळांनीं आपल्या शक्तीच्याबाहेर इमारतफंडाला वर्गणी घालून या सरस्वती-मंदिराच्या उभारणीला मदत केली. ह्या सर्व आश्रयदात्यांचा उल्लेख स्थलाभावामुळें येथें करतां येत नसला तरी त्यांची स्मृति संस्थेच्या अंतःकरणांत सदैव जागृत आहे. यांचीं नांवें परिशिष्टांत जोडलीं आहेत. इमारत बांधतांना श्री. विश्वनाथ दत्तू विर्जिनकर यांनीं बरेच परिश्रम घेतले. इमारत जसजशी वर चढूं लागली तसतशी पैशाची अडचण भासूं लागल्यानें

ल्या बाबतींत पुन्हां प्रयत्न करण्याची गरज उत्पन्न झाली.

अशा वेळीं इमारत-फंडाचे चिटणीस श्री. यशवंतराव सू. सरदेसाई व श्री. नागेशराव सडेकर यांनीं वर्गणीकरतां मुद्दाम मुंबईस खेप घालून फारच तसदी घेतली. इमारतीचें बांधकाम चालू असतांना श्री. गोपाळ म. नाडकर्णी यांनींही बरेच श्रम घेतले आहेत. वरील सर्व सदगृहस्थांची तसेंच नाटक मंडळ्यांची संस्था किती ऋणी आहे, तें शब्दांनीं व्यक्त करतां येत नाहीं. तें अंतःकरणानेंच जाणावें लागेल.

इमारतफंडाची एकंदर जमा रु.१४४७३-०-० होऊन खर्च रु. १७९९६-१२-६ झाला. त्यावरून इमारतीला अजून रु.३५२३-१२-६ ची तूट असल्याचें दिसून येईल. ही तूट भरून काढण्याकरतां खालील सद्गृहस्थांनीं उसनवट रकमा इमारतफंडाला दिल्या आहेत.

श्री. काशिनाथ दामोदर नायक	२५२३-१२-६
,, विष्णु रामचंद्र नायक	१५०-००-०
,, विष्णु नारायण नायक	२००-००-०
,, सगुण विठ्ठल नायक	१५०-००-०
,, केशव अ. नायक	१००-००-०
,, दत्ता गिरी कारे	२००-००-०
,, नागेश वा. सडेकर	१००-००-०
,, यशवंत सू. सरदेसाई	१००-००-०

हे सर्व सदगृहस्थ आपल्या रकमेचें व्याज संस्थेकडून घेत नाहींत. इमारत-फंडाचे खजिनदार श्री. काशिनाथ दामोदर नायक यांच्या या बाबतींतील स्वार्थत्यागानें संस्थेला सदैव ऋणी करून ठेवलें आहे. इमारतीला रक्कम अपुरी पडूं लागली, तेव्हां पांच हजारांपर्यंत रक्कम त्यांनीं फंडाला उसनवट दिली होती. तिचें व्याज तर त्यांनीं घेतलें नाहींच, पण उलट वेळोवेळीं इमारतीकरितां आलेल्या रकमा जितका काल त्यांचेकडे खर्च न करतां राहिल्या त्या मुदतीचें व्याज त्यांनीं इमारतफंडाला दिलें. शिवाय संस्थेच्या नांवें १९२१ सालापासून आपल्या मुंबईच्या पेढीवर त्यांनीं एक धर्मार्थ पेटी ठेवली असून सदर्हू पेटींतून आतांपर्यंत २३८। रुपये रोख व १०० रु. किंमतीचीं पुस्तकें मिळालीं. वासुदेव यशवंत नायक पेढीकडूनही एकदोन वर्षांमागें अशीच पेटी ठेवली गेली असून गेल्या सालीं सदर्हू पेटींत २५ रुपये जमा झाले.

गौरव-समारंभ

शिक्षणक्षेत्रांत अभिनंदनीय यश व कीर्ति मिळविलेल्या तसेंच सार्वजनिक आयुष्यक्रमांत पडून झीज सोसलेल्या कित्येक सभासद व सभासदेतर प्रांतबांधवांचे संस्थेतर्फे गौरवसमारंभ करण्यांत आले. प. वा. पुरुषोत्तम श्रीनिवास सुकेरकर यांची आजपर्यंतची सार्वजनिक कामगिरी व तीप्रीत्यर्थ त्यांनीं सोसलेले कष्ट, शिल्पकार रामचंद्र पां. कामत यांनीं शिल्पकलेंत मिळविलेली दिगंत कीर्ति, श्री. यशवंत मंगेश कारापुरकर यांनीं शास्त्रीय शिक्षणाकरतां जर्मनीस जाऊन विद्याभ्यास घालून दिलेलें उदाहरण वगैरे बाबतींत संस्थेकडून वरील गृहस्थांचा गौरव करण्यांत आला. शिवाय संस्थेचे सभासद प. वा. विश्वनाथ ना. महात्मे यांची इकडून पणजीस बदली झाल्यावेळीं, तसेंच श्री. उपी बाबली कामत हे नोकरीनिमित्त आंगोलास जातेवेळीं संस्थेतर्फे त्यांचेंही अभिनंदन करण्यांत आलें. त्याचप्रमाणें गो. म. शिक्षण-संमेलनातर्फे संस्थेच्या सभागृहांत गेल्या वर्षी भरलेल्या अध्यापन-वर्गास आलेली शिक्षक व इतर मंडळी यांस संस्थेतर्फे पानसुपारी देण्यांत आली.

दिवंगत सभासद व ऋणानुबंधी यांचें स्मरण

या २५ वर्षांत कित्येक सभासद व ऋणानुबंधी कालवश झाले. त्या सर्वांचें संस्थेला

सहाय्य झालेंच, पण यांपैकीं ज्यांचा संस्थेच्या कार्याशीं प्रत्यक्ष संबंध आला त्यांच्या स्मृतीला तिलांजलि अर्पण करणें हें संस्थेचें पवित्र कर्तव्य होय.

संस्थेचे संस्थापक प. वा. भिकाजी पुरुषोत्तम पै यांचें अकालीं निधन संस्थेस बरेंच जाणवलें. संस्थेसंबंधींचा त्यांचा अभिमान जाज्वल्य होता. त्यांच्या सहाय्याचा संस्थेस फार उपयोग झाला असता. 'वाली' सभासद प. वा. दामोदर वासुदेव नायक हे इमारत-फंड कमिटीचे अध्यक्ष होते. संस्थेवर त्यांचें फार प्रेम होतें. प. वा. रावबहादुर सखाराम विश्वनाथ राजाध्यक्ष हे १९२५ सालच्या वार्षिक समारंभाचे अध्यक्ष होते. चालकांनीं विनंति करतांच उदार मनानें ते संस्थेचे 'वाली' सभासद झाले. 'खास' सभासद प. वा. पंढरी वासुदेव हेगडे यांनीं संस्थेवरील संकटाच्या वेळीं दाखविलेलें धैर्य व दिलेला धीर कदापि विसरण्याजोगा नाहीं. प. वा. पुरुषोत्तम श्रीनिवास सुकेरकर यांनीं कार्यकारी मंडळावर कित्येक वर्षे काम केलें होतें. ते १९३० सालच्या वार्षिकोत्सवाचे अध्यक्ष होते. सार्वजनिक सेवेमुळें संस्थेला ते भूषणभूत झालेले होते. त्यांच्या निधनामुळें, एका सुविचारी सभासदास संस्था मुकली. संस्थेच्या पुरस्कारानें अनेक संस्थांची सभा त्यांच्या निधनानिमित्त दुःखप्रदर्शनार्थ भरली होती.

श्री. नरसिंह दामोदर कीर्तनी यांची संस्थेला हरएक प्रसंगीं बहुमोल मदत होत असे. संस्थेतर्फे 'फर्स्ट एड'चा वर्ग त्यांनीं चालविला होता. निरलसपणें कार्यकारी मंडळास ते मदत करीत असत. त्याचप्रमाणें प. वा. अच्युत भिकाजी नाईक, प. वा. गोविंद ज. देसाई, प. वा. दत्तात्रय आपा सरमळकर, प. वा. पांडुरंग यशवंत मोरडेकर, प. वा. शंभु देवाप्पा नरगुंदकर व प. वा. वासुदेव यशवंत नायक यांच्या निधनामुळें कार्यकारी मंडळाला अत्यंत दुःख होत आहे.

सभासदांशिवाय इतर ऋणानुबंधीयांचा उल्लेख करतांना सुब्रह्मण्यानंदतीर्थ यति यांची प्रथम आठवण झाल्याशिवाय राहात नाहीं. त्यांचा संस्थेवर नेहमीं अनुग्रह असे. हा अनुग्रह नुसता शाब्दिक आशिर्वादानें न करतां त्यांनीं प्रथम आपलीं पुस्तकें व १०० रुपये रोख देऊन व नंतर समाधिकालीं ५०० रुपये वाचनालयाकरतां ठेवून केला. पांचशें रुपयांच्या कायम निधीच्या देणगीनें संस्थेशीं त्यांचा संबंध अखंड राहण्याची व्यवस्था झाली. सुब्रह्मण्यानंदतीर्थ यति म्हणजे मडगांवचें एक भूषण होय. संस्थेच्या पुरस्कारानें मडगांवतर्फे त्यांना मानपत्र देण्यांत आलें होतें.

मुंबईचे प. वा. शांताराम नारायण दाभोळकर यांचा व संस्थेचा वरीलप्रमाणेंच ऋणानुबंध जुळून आला. ज्ञातींतील कोणत्याही चळवळीकडे त्यांचें नेहमीं बारीक लक्ष असे. या त्यांच्या वृत्तीमुळें मडगांवच्या 'सारस्वत ब्राह्मण समाजा'कडे त्यांचें लक्ष वेधलें तर ती आश्चर्याची गोष्ट नव्हे. इमारत-फंडाच्या मदतीसाठीं याचना करतांच त्यांनीं ५०० रुपये इमारत-फंडाला दिले, त्याचा उल्लेख वर आलाच आहे. संस्थेवरील त्यांचें प्रेम तसेंच ज्ञातीची त्यांनीं केलेली सेवा यांमुळें त्यांची आठवण तरुण पिढीच्या डोळ्यांपुढे सदैव राहण्याकरतां संस्थेनें त्यांच्या छायाचित्राचें अनावरण केलें. त्यांच्या निधनानिमित्त संस्थेतर्फे जाहीर सभा बोलावण्यांत आली होती.

त्यानंतर प. वा. यशवंत विष्णु नायक यांची आठवण झाल्याशिवाय राहात नाहीं. संस्थेला नेहमीं त्यांचें पाठबळ असे. कार्यकारी मंडळाला योग्य सल्लामसलत केव्हांही त्यांजकडून मिळे. संस्थेच्या स्थापनेपासून तिजवर त्यांचें निरतिशय प्रेम होतें. त्यांच्या निधनानें संस्थेचा एक जिव्हाळ्याचा आधार गेला.

प. वा. बाबै भगवंत नायक १९१७ सालच्या वार्षिक समारंभाचे अध्यक्ष होते. संस्थेच्या कार्याचें त्यांजकडून नेहमीं कौतुक केलें जाई.

प. वा. न्यायशास्त्री भवानीशंकर सुखठणकर १९२१ सालच्या वार्षिकोत्सवाचे अध्यक्ष होते. गोमंतकासंबंधींचें त्यांचें प्रेम दांडगें होतें. आपल्या विद्वत्तेनें गोमंतकाचें नांव त्यांनीं उज्ज्वल केलें होतें.

या सर्व आप्तसुहृदांचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करून त्यांच्या आत्म्यांस चिरशांति प्राप्त होवो, अशी परमेश्वराशीं प्रार्थना करतों.

छायाचित्रांचें अनावरण

थोर व्यक्तींचे आदर्श तरुणांच्या डोळ्यांसमोर नेहमीं असले पाहिजेत. कारण त्यांना ते सदैव मार्गदर्शक होत असतात. या आदर्शाचे दृश्य स्वरूपांतील जे निरनिराळे प्रकार आहेत त्यांत छायाचित्रांचा समावेश होतो. संस्थेनें या दृष्टीनें ज्ञातींतील व ज्ञातीबाहेरील अनेक थोर पुरुषांच्या छायाचित्रांचें अनावरण वार्षिकोत्सवाचा प्रसंग साधून केलें आहे. हे थोर पुरुष म्हणजे प.वा. गुरुवर्य डॉ. भांडारकर (१९१९), प. वा. न्या. तेलंग (१९२०), प. वा. डॉ. पावलीन दीयश (१९२०), प. वा. भारतसेवक गोखले (१९२४), डॉ. रवींद्रनाथ टागोर (१९२५), प. वा. लो. टिळक (१९२६), प. वा. डॉ. भाऊ दाजी लाड (१९२९), प. वा. बाबासाहेब दाभोळकर (१९३१) हे होत. या तसविरींपैकीं प. वा. गुरुवर्य भांडारकर, प. वा. न्या. तेलंग, प. वा. दाभोळकर यांच्या पेस्टलच्या तसबिरी श्री. गणपतराव लाड, प. वा. डॉ. पावलीन दीयश यांची वॉटर कलरची तसबीर श्री. प्रो. रामचंद्र शंकर नाईक, डॉ. टागोर व प. वा. गोखले यांच्या ऑइल पेंटिंगच्या तसबिरी श्री. मंगेश वासुदेव केंकरे व प. वा. भाऊ दाजी लाड यांची पेस्टलची तसबीर सौ. लक्ष्मीबाई रेगे यांनीं काढून संस्थेस अर्पण केल्या. प. वा. लोकमान्य टिळकांची तसबीर श्री. सगुण वि. नायक यांनीं विकत घेऊन संस्थेस अर्पण केली. याशिवाय आणखीही पुष्कळ तसबिरी कित्येकांनीं संस्थेस अर्पण केल्या आहेत. त्यांचीं नांवें परिशिष्टांत दिलीं आहेत.

आमचे प्रांतबंधु श्री. गणपतरावजी लाड यांनीं संस्थेस अर्पण केलेल्या तसबिरींचा व गंधर्व नाटक मंडळीच्या प्रयोगाच्या वेळीं केलेल्या मदतीचा उल्लेख वर आलाच आहे. पण एवढ्यानेंच त्यांची मदत पुरी होत नसून ती सर्वच येथें वर्णन करणेंही शक्य नाहीं. व्याख्यानमाला जुळविण्याच्या बाबतींत असो, वार्षिकोत्सवांचे अध्यक्ष निवडण्याच्या बाबतींत असो किंवा इतर कोणत्याही बाबतींत असो, त्यांच्या सल्लामसलतीचा व सहाय्याचा संस्थेस नेहमीं उपयोग झालेला आहे. याशिवाय व्याख्यानमालेच्या बाबतींत ती जुळविण्यापासून तडीस जाईपर्यंत श्री. यशवंतराव सरदेसाई, श्री. दत्तात्रय व्यं. पै व प्रो. बाळकृष्ण वा. सांवर्डेकर यांची संस्थेला नेहमीं बहुमोल मदत होत आली आहे. त्याचप्रमाणें वाचनमंदिराच्या कामाच्या बाबतींत श्री. नीलकंठ विठ्ठल दळवी यांचें बरेंच साह्य झालें आहे. या सर्वांची संस्था अत्यंत आभारी आहे.

थोरांच्या भेटी

निरनिराळ्या निमित्तानें येथें आल्यावेळीं कित्येक थोर गृहस्थांचें स्वागत करून त्यांच्या सहवासाचा व विचारांचा लाभ घेण्याचे सुप्रसंग संस्थेस बरेच लाभले आहेत. अशा थोर व्यक्ति म्हणजे S. Exa. o Governador Geral Capitão de Fragata Freitas Ribeiro, S. Exa. o Governador Geral João Carlos Craveiro Lopes, श्री.सौ. चिमणाबाईसाहेब गायकवाड

प.वा. न्या. सर नारायण गणेश चंदावरकर, न्या. सर गोविंदराव माडगांवकर, न्या. सीताराम सुं. पाटकर, रावराजे वासुदेव आ. प्रभु देसाई देशप्रभु, प्रि. कृ. म. खाड्ये, प्रो. धर्मानंद कोसंबी, श्री. विठ्ठल रा. शिंदे, श्री. न. चिं. केळकर, प. वा. डॉ. श्री. व्यं. केतकर, प्रो. यदुनाथ सरकार, प्रो. गोविंद स. सरदेसाई, श्री. लक्ष्मीकांत शां. दाभोळकर, प्रो. धोंडो के. कर्वे, Dr. Froilano de Melo, डॉ. वा. शि. मुंजे इ. होत.

वार्षिकोत्सवांचें अध्यक्षस्थान भूषविणाऱ्या सद्गृहस्थांचीं छायाचित्रें सोबत जोडलींच आहेत. याशिवाय श्री. ना. वा. गुणाजी, प. वा. गो. म. चिपळुणकर, श्री. मंगेश रा. तेलंग, Prof. Francisco Correia Afonso, प. वा. Dr. Loyola Furtado, श्री. वा. मं. दुभाषी, प्रि. गो. चि. भाटे, प्रो. वामन मल्हार जोशी, श्री. रा. भि. नाईक, सौ. इंदुमतीबाई नाईक, श्री. महादेवशास्त्री दिवेकर, प्रो. माधव दा. अळतेकर, प. वा. वाग्भट ना. देशपांडे, प्रि. तावडे, श्री. श्रीपाद दा. सातवळेकर, सौ. शांताबाई कशाळकर, श्री. सीताबाई अण्णिगेरी, श्री. ज. स. करंदीकर, श्री. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव, श्री. ना. ह. आपटे, श्री. पां. भा. गोठोस्कर, भि. रा. पां. वैद्य, कु. बाळूताई खरे, डॉ. सावरकर, श्री. अ. वि. चित्रे, श्री. गं. नी. सहस्रबुद्धे, श्री. श्री. ना. बनहट्टी, श्री. दिवाकर, प्रो. दांडेकर, श्री. कोकजेशास्त्री, श्री. वि. स. खांडेकर, श्री. ह. मो. जोशी, श्री. दा. वि. गोखले, प्रो. मायदेव, प्रो. माटे, श्री. चिं. ग. कर्वे, श्री. आबा चांदोरकर, श्री. वा. दा. मुंडले, श्री. सदाशिवशास्त्री भिडे, श्री लक्ष्मणशास्त्री जोशी, श्री. वर्दी वगैरे सद्गृहस्थांनीं संस्थेस भेटी देऊन उपकृत केलें आहे.

पंचवीस वर्षांचा जमाखर्च

या पंचवीस वर्षांतील संस्थेच्या जमाखर्चाचा आढावा घेतला तर तो खालीलप्रमाणें असल्याचें दिसून येईल.

जमा		खर्च	
सभासदांची प्रवेशफी	१६०२- ०-०	पुस्तक-खरेदी	३०४०- २-८
सभासदांकडून आलेली वर्गणी	७४५८- ६-०	नियतकालिकांची वर्गणी	२१७९- ०-९
		सामान-खरेदी	१३२५- ०-४॥
रोख देणग्या	३८१२- ३-०	पुस्तक-बांधणी	१०८४-१५-३
पुस्तक-भांडें	३०५७-१५-०	दिवाबत्ती, साफसुफी व किरकोळ	१२२८-१०-०
किरकोळ आदा	२७९- ०-६	पत्रव्यवहार, स्टेशनरी	३१०-१४-८॥
'राधामाधव'च्या प्रयोगाचें उत्पन्न	४५५- ०-०	छापणावळ	३६४-१४-६
		'राधामाधव' नाटकाच्या प्रयोगास खर्च	१४५- ०-०
व्याज	२५०- ०-०	श्रीदामोदर विद्याभुवन इमारत-फंडास	३१०- ०-०
भाडें	४८२- ०-०	घरभाडें	१६५०- ०-०
इमारतफंडाची जमा	१४४७३- ०-०	कांग्रेस प्रोव्हिंशियाल प्रतिनिधि-फी	३०- ०-०
उसनवट रकमा	३५२३-१२-६	वाढदिवस, इतर समारंभ व व्याख्यानमाला	१९४५- ३-६
		पगार	३१२५- ०-०
		इमारत-फंड कमिटीकडे दिले	४८२- ०-०
		सरकारी कर	३२- ६-९
		इमारतीस खर्च	१७९९६-१२-६
		शिल्लक	१४३- ४-०
एकूण	३५३९३- ५-०	एकूण	३५३९३- ५-०

संस्थेची मालमत्ता

संस्थेची इमारत व तीलगतची जागा, वाचनालय व त्याचीं उपकरणें, तसेंच संस्थेचें इतर सामान वगैरे मिळून तिच्या एकंदर मालमत्तेची किंमत आजघडीस जवळजवळ ४० हजार रुपये भरते.

आभार

या पंचवीस वर्षांत संस्थेच्या एकंदर कार्याचा व्याप वाढविण्यास ज्यांनीं ज्यांनीं हातभार लावला त्या सर्वांचे, तसेंच सभासद, आश्रयदाते, हितचिंतक, स्वयंसेवक, मोफत किंवा सवलतीनें नियतकालिकें अगर ग्रंथ पाठविणारे संपादक, प्रकाशक किंवा ग्रंथकार, वस्तुरूपी देणग्या देणारे सहाय्यक इत्यादिकांचे संस्था या प्रसंगीं अंतःकरणपूर्वक आभार मानीत आहे. त्यांच्या सहाय्याशिवाय संस्थेला एवढी मजल गांठतां आली नसती.

उपसंहार

संस्थेच्या २५ वर्षांच्या कामगिरीचें वर संक्षिप्त दिग्दर्शन केलें आहे. संस्थेला पंचवीस वर्षांचें आयुष्य लाभून तिनें आजचा हा रौप्यमहोत्सवाचा दिवस पहिला, याबद्दल तिच्या सर्व सुहृदांना या प्रसंगीं आनंद होणें हें साहजिक आहे. निव्वळ आयुर्दायाचा लाभ ही गोष्ट घेतली तरी ती मोलाची आहे. पुन्हा संस्थेच्या आयुष्यांतला आनंद हा माणसाच्या आयुष्यांतील आनंदापेक्षां शतपटीनें — सहस्रपटीनें अधिक होय. आणि तशांत या लाभलेल्या आयुष्याचे दिवस केवळ जगण्यासाठीं धडपड करीत कसेबसे कंठण्यापेक्षां कोणत्या तरी महनीय अशा सत्कारणीं लागले, तर ती गोष्ट विशेष महत्वाची होय, हें उघड आहे. या दृष्टीनें पाहतां, एका विशिष्ट ध्येयानें प्रेरित होऊन, एका नव्या विचारसरणीचें प्रतिपादन करून आणि त्याप्रीत्यर्थ पडतील ते कष्ट सोसून किंवा येतील त्या संकटांशीं तोंड देऊन संस्थेनें ज्या परिस्थितींत पंचवीस वर्षें पाहिलीं, तिचा चित्रपट आजच्या या प्रसंगीं डोळ्यांपुढून जाऊं लागतो. संस्थेनें प्रतिकूल परिस्थितींत जन्म घेऊन स्वतःभोंवतीं अनुकूल वातावरण निर्माण केलें, मतामतांच्या गलबल्यांतून वाट काढीत स्वतःचा नवा संप्रदाय निर्माण केला, बौद्धिक गुलामगिरीच्या शृंखला तोडून स्वतंत्र विचारांच्या नव्या क्षेत्रांत तरुणांना आणलें. संस्थेनें अप्रियता पत्करली, रागलोभाची क्षिति बाळगली नाहीं, पण ध्येयावरची दृष्टि अढळ ठेवली. संस्थेनें अनेक वादळें पाहिलीं, मोठमोठ्या खडकांना वळसे घेतले व चारही दिशांनीं झालेल्या कोंडमाऱ्यांतून मोठ्या शर्थीनें वाट काढली. संस्थेचें तराणूं कितीही हाललें तरी चालकांनीं आपल्या डोळ्यांतली बाहुली स्थिरच ठेवली आणि प्रवासाच्या आरंभीं ध्येयदिशा दाखविणाऱ्या ज्या दीपस्तंभावर नजर लावली, त्याजकडे वळविलेल्या सुकाणूवरील आपला हात विचलित होऊं न देतां आजवरचा पल्ला गांठला. हा गांठलेला पल्ला समाधानकारक असला तरी आकमावयाचा मार्ग अजून बराच राहिलेला आहे, याची जाणीव कार्यकारी मंडळाला आहे. इमारतीचें काम अजून पुरें झालेलें नाहीं, वाचनालयाच्या गरजा दिवसेंदिवस वाढल्याच आहेत. नवीननवीन कार्यें हातीं घ्यावयाचीं तर पैशाचें आनुकूल्य पाहिजे. पुढील पंचविशींत या सर्व आकांक्षांना मूर्त स्वरूप आलेलें पाहावयास मिळून तिचा सुवर्णमहोत्सव थाटानें साजरा करण्याचें भाग्य लाभो, अशी परमेश्वरापाशीं प्रार्थना करून हें वृत्तांतनिवेदन पुरें करूं.

मडगांव, ता. २५-१२-३७.

टीप:— अहवालांत यावयाच्या परिशिष्टांचा विस्तार फार झाल्यामुळें तीं या ग्रंथांत देतां आलीं नाहींत. पण तीं स्वतंत्र अहवालांत दिलीं आहेत.



श्री. बाळकृष्ण सीताराम कामत, बी. ए.

रौप्यमहोत्सवाचे अध्यक्ष

थोरांचे आशिर्वाद

१

श्री. बाळकृष्ण सी. कामत बी. ए., पुणें.

गोमंतकांत मडगांव शहरानें सार्वजनिक बाबतींत अलीकडे अनेक उपक्रम सुरू केले असून ते आतां वर्तमानपत्रद्वारा सर्वांच्या परिचयाचे झाले आहेत. या नानाविध कार्यगंगेचा उगम शोधूं गेल्यास तो मडगांव येथील "सारस्वत ब्राह्मण समाज" या उपयुक्त व कार्यक्षम संस्थेच्या कार्यालयांत सांपडेल. १९२० सालीं या संस्थेच्या वार्षिक समारंभाचा अध्यक्ष या नात्यानें आमचे मातृभूमींतील ही संस्था पाहाण्याची प्रथम सुसंधि आम्हांस मिळाली होती. तेथील कार्यकर्त्यांचा उद्योग, कळकळ, चिकाटी, एकोपा व स्वार्थत्याग हीं प्रत्यक्ष अवलोकनावरून आम्हांस कौतुकास्पद वाटलीं व त्यावेळेस या संस्थेचा उत्कर्ष होईल अशी केलेली अटकळ अलीकडे खरी झाल्याचें पाहून फार आनंद वाटतो.

संस्थेचें महत्वाचें कार्य म्हणजे गोमंतकांत केलेली अनेकविध लोकजागृति हें तर आहेच. परंतु याहूनही विशेष गोष्ट म्हणजे या संस्थेनें गोमंतकाचा महाराष्ट्राकडे अधिकाधिक परिचय करण्यासाठीं दरवर्षी व्याख्यानमालेच्या निमित्तानें महाराष्ट्रीय लोकांस निमंत्रण देऊन महाराष्ट्राशीं दळणवळण वाढविण्यास बहुमोल मदत केली आहे ही होय. गोमंतकासारख्या निसर्गरम्य प्रदेशाची आतां महाराष्ट्रास ओळख पटत चालली आहे व गोमंतकाबद्दल महाराष्ट्रास आपलेपणा वाटण्यास या संस्थेची चळवळ कारणीभूत झाली आहे.

आज या संस्थेस २५ वर्षें पूर्ण होत असून तिचा रौप्यमहोत्सव होत आहे ही अत्यंत आनंदाची गोष्ट होय. संस्थेच्याद्वारें पंचवीस वर्षांत झालेली कामगिरी अभिनंदनीय आहे. संस्थेच्या पुढील आयुष्यांत तिचें कार्य व गोमंतकाची कीर्ति याहूनही उज्ज्वल रीतीनें वृद्धिंगत होवो, अशी आम्ही मनःपूर्वक इच्छा बाळगितों.

२

न्या. गोविंद दीनानाथ माडगांवकर

आय्. सी एस्., मुंबई.

आपल्या संस्थेचा रौप्यजुबिली–समारंभ साजरा होणार हें वाचून आनंद झाला.

आपल्या संस्थेचें नांव जरी सारस्वत ज्ञातिदर्शक असलें तरी तिचें कार्यक्षेत्र मोठें असून त्याचा लाभ इतर जातींस व परधर्मीयांस मिळतो ही आनंदाची गोष्ट आहे व आपणांस भूषणावह आहे. आपला उत्साह व परिश्रम स्तुतीस पात्र आहेत.

परमेश्वरकृपेनें आपल्या संस्थेची भरभराट होवो व ती लोकहितास व उन्नतीस सहाय्यकारक होवो असें मी इच्छितों.

३

न्या. सीताराम सुंदरराव पाटकर

बी. ए. एल्. एल्. बी, मुंबई.

मडगांव येथील 'सारस्वत ब्राह्मण समाज' या संस्थेची स्थापना होऊन २५ वर्षें पुरीं होत असून त्या संस्थेचा रौप्यमहोत्सव करण्याचें योजिलें असल्याबद्दल आपण लिहिलें, तें वाचून आनंद झाला.

"सारस्वत ब्राह्मण समाज" ह्या संस्थेला भेट देण्याचा योग आम्हांला १९२८च्या डिसेंबरमध्यें आला. त्यावेळीं समाजानें चालवलेलें वाचनालय पहाण्यास मिळालें. पुस्तकांचा अमूल्य संग्रह आणि तो ठेवण्याबद्दल व वाचावयास देण्यासंबंधींचीही योग्य व्यवस्था पाहून आम्हांस अतिशय आनंद वाटला. वाचनालयाबरोबर व्याख्यानमाला चालवण्याची उपयुक्त जबाबदारी संस्थेनें घेतलेली पाहून जास्तच संतोष झाला.

ज्ञान प्रसृत होण्याचीं दोन प्रमुख साधनें म्हणजे लेखन व भाषण हीं होत. या दोन साधनांनीं समाजांत संस्कृतिवर्धन होत असतें. गोमंतक हा महाराष्ट्राचा नैर्ऋत्येकडील लहानसा भाग आहे. भिन्न राज्यकारभारामुळें इतर महाराष्ट्राच्या प्रगतीबरोबर त्याची प्रगति झपाट्यानें व्हावयाची कदाचित् राहिली असती. परंतु ती उणीव 'सारस्वत ब्राह्मण समाजा'च्या ह्या प्रयत्नांनीं खास भरून निघत आहे. बृहन्महाराष्ट्रांतील महाराष्ट्रसंस्कृतीचे व मराठी भाषेचे, अभिमानी ह्या प्रांतांत वेळोवेळीं येत गेल्यानें

गोमंतकास जरूर ती स्फूर्ति मिळून गोमंतक मागें रहाणार नाहीं अशी आतां खात्री वाटते.

'सारस्वत ब्राह्मण समाजा'ला स्वतःची इमारत लाभल्यानें योग्य तें स्थैर्य लाभलें असून त्यायोगानें अखिल गोमंतकाची सेवा करण्यास त्यास खात्रीनें सुलभ जाईल. अशा संस्थेचा रौप्यमहोत्सव करण्याची संधि यावी ही आनंदाची गोष्ट होय. ह्या शुभ प्रसंगाचे वेळीं वरील 'सारस्वत ब्राह्मण समाजा'चें व ती संस्था यशस्वी करणाऱ्या चालकांचें अभीष्ट चिंतून आणि त्यांचे हातून गोमंतकाची अशीच भरीव सेवा घडो अशी इच्छा प्रदर्शित करून हें पत्र पुरें करतों.

४

श्री. नरसिंह चिंतामण केळकर

बी. ए. एल्. एल्. बी., पुणें.

'सारस्वत ब्राह्मण समाजा'चें कार्य पूर्वी मी समक्ष पाहिलें त्याहून तें आतां पुष्कळच अधिक वाढलेलें दिसतें. समाजानें स्वतःची नवी इमारत बांधून स्वतःस एक प्रकारें स्थैर्य मिळविलें ही गोष्ट विशेष झाली. याबद्दल मी आपलें अभिनंदन करतों.

निरनिराळ्या राज्यांखालीं असणारे लोकही वंशाभिमान, भाषा, संस्कृति आणि प्रेम अशा निरनिराळ्या बंधनांनीं एकजीव राहूं शकतात. याचीं उदाहरणें जगांत इतरत्र अनेक पहावयास मिळतात. गोमंतक व महाराष्ट्र यांचें उदाहरण तशाच प्रकारचें आहे. फ्रेंच वसाहतीच्या ताब्यांतील लोकांचा स्नेहसंबंध बंगाली व मद्रासी लोकांशीं कितपत आहे याची माहिती मला नाहीं. पण गोमंतक व महाराष्ट्र यांच्यामधील स्नेहसंबंध मी सदैव पहात आलों आहें. आणि त्याचें श्रेय महाराष्ट्रांतील महाराष्ट्रीयांपेक्षांही गोमंतकांतील महाराष्ट्रीयांनाच मी अधिक देईन. मराठी भाषेवरील प्रेम गोमंतकांतील महाराष्ट्रीयांचें किती आहे याचें वर्णन करणेंच अशक्य.

गोमंतकांतील सारस्वत ब्राह्मण समाज हा उद्योगी, महत्वाकांक्षी आणि प्रगतिप्रिय आहे यांत शंका नाहीं. ते त्याचे गुण आणखी वाढावे आणि तुम्ही आम्ही मिळून संयुक्त महाराष्ट्रीय भावनेनें उत्कर्षाला चढावें अशी इच्छा प्रगट करून हा अल्प संदेश पुरा करतों.

५

प्रो. वसंत नारायण नाईक एम्. ए., मुंबई.

सारस्वत ब्राह्मण समाज, मडगांव, गोवें, या संस्थेचा रौप्यज्युबिली महोत्सव साजरा होत आहे, याबद्दल कोणाला आनंद होणार नाहीं? जी संस्था आज सतत पंचवीस वर्षें ज्ञानप्रसाराचें पवित्र कार्य करून जिवंत राहिली; तिला मडगांवांत मान्यता प्राप्त होऊन मालकीची इमारत असण्याचा सुयोग साधतां आला; जिनें स्वतःला उत्तम ग्रंथसंग्रहालय व वाचनमंदिराची आत्म प्रयत्नानें आणि लोकांच्या सहानुभूतीनें उत्तम जोड दिली; जिनें महाराष्ट्रांतील नामांकित वक्त्यांची, वाङ्मयभक्तांची व्याख्यानमालेच्याद्वारें गोमंतकीय स्वबांधवांना ओळख करून देऊन त्यांची ज्ञानपिपासा तृप्त केली, इतकेंच नव्हे तर त्यांचा दृष्टिकोन अजिबात बदलून त्यांची दृष्टि विशाल करण्याला मदत केली; ज्ञान हें विष नसून अमृत आहे याची साक्ष स्वबांधवांना लोकसंग्रहाच्या व उच्च ध्येयाच्या या मार्गानें पटवून दिली; जिनें गोमन्तक, पुणें आणि मुंबई या तीन ठिकाणच्या सुहृद् आणि वाङ्मयोपासक लोकांत एकमेकांबद्दल आपुलकीची भावना उत्पन्न केली; गोमंतकांत महाराष्ट्र-साहित्य-संमेलनासारखें अत्यंत जबाबदारीचें कार्य यशस्वी रीतीनें पार पडण्यास जिची चांगली मदत झाली; जिनें '**सारस्वत तेवढा मिळवावा, सारस्वत धर्म स्थापावा**', या बीजमंत्रानुसार संस्थेचें धोरण अद्यापि राखलें आहे; व उत्तरोत्तर अधिक व्यापक क्षेत्रांत उतरून आणि संकुचित वृत्तीचें निरसन करून गोमन्तकांत ऐक्य, उच्च विचारसरणी आणि व्यसनपरावृत्तता यांची जोपासना करण्याची जी संस्था महत्वाकांक्षा बाळगीत आहे, त्या संस्थेचें, तिला पंचवीस वर्षें पुरीं होऊन सव्विसाव्या वर्षांत ती पदार्पण करीत आहे याप्रीत्यर्थ जो कोणी अभिनंदन करणार नाहीं, त्याला पक्षांध याशिवाय दुसरा शब्दच लावितां येणार नाहीं.

हिंदुस्थानांतील जातिभेद जाईल तेव्हां जावो, पण जातिमत्सर तरी गेलाच पाहिजे, घालविलाच पाहिजे, असें न्यायमूर्ति तेलंग नेहमीं सांगत असत, त्याचप्रमाणें पक्ष, मतभेद यांचें आहे. राजकीय, सामाजिक, धार्मिक आणि शैक्षणिक कार्यांतही पक्ष आणि मतभेद हे केव्हांही असणार व राहाणार. परंतु त्याबरोबर पक्षांधपणा येऊं देणें युक्त ठरत नाहीं. म्हणून आपलें कार्य आणि गोमंतकांत आपल्याचसारख्या इतर संस्थांनीं चालविलेलें लोकोद्धाराचें कार्य यांच्यामध्यें मतभेद व पक्षभेद असले आणि प्रत्येक पक्षानें आपलें कार्य सरळपणें केलें तर तें जिवंतपणाचेंच लक्षण म्हणतां येईल. मात्र, यांत पक्षांधपणा आला म्हणजे एकमेकांच्या मार्गांत मलतींच विघ्नें उपस्थित झाल्याशिवाय राहाणार नाहींत. कोणत्याही व्यक्तीला अथवा संस्थेच्या चालकांना पक्षातीत राहून चालावयाचें नाहीं. कारण, तसें केल्यानें लोकसंग्रह करूनें संघशक्ति वाढविण्याचें साधनच नष्ट होईल.

आणि लोकमताला वादविवादानें—वितंडवादानें नव्हे—ज्या प्रकारचें वळण लागलें पाहिजे तसें न लागतां स्वातंत्र्य आणि लोकशाहीचा मार्ग उजळणेंही अशक्य होईल. देशांत किंवा समाजांत एकाच मताचे लोक, एकाच पक्षाचें प्राबल्य – यांचा सर्वत्र उदोउदो होऊं लागला आणि चिकित्सक बुद्धीला वाव मिळेनासा झाला, म्हणजे सत्ताधारी पक्षाची सुलतानशाही आणि इतरांचें मानसिक दौर्बल्य असा प्रकार सर्वत्र सुरू होतो. आणि आगरकरांच्या शब्दांत सांगावयाचें झाल्यास याचें पर्यवसान सर्वत्र गुलामांचेंच राष्ट्र नांदण्यांत झालेलें आढळतें. तेव्हां आपली संस्था चालवीत असतांना, तिच्या उत्कर्षासाठीं झटत असतांना, आणि तिचें अभीष्ट चिंतितांना आपण स्वतः परमतसहिष्णुता दाखविली पाहिजे हें जितकें स्पष्ट आहे, तितकेंच इतरांनीं स्वतःचें कार्य जोमांत आणण्याच्या ईर्षेंस बळी पडून पक्षांधपणा दाखवून चालणार नाहीं, ही परस्पर प्रेमाची, ऐक्याची आणि शहाणपणाची वृत्ति आपल्या समाजांत जोपासली जावी आणि गोमंतकांतील हरएक पक्षाचें व संस्थेचें कार्य लोककल्याणकारी व्हावें याकरतांच आपल्या संस्थेचा जन्म आहे असें मी समजतों. आपण गेल्या पंचवीस वर्षांत स्वसमाजांत ज्ञानप्रसार करण्याचें जें कार्य केलें त्याचें उद्दिष्ट हेंच होतें असें मला वाटतें, आणि म्हणूनच या शुभप्रसंगीं मी आपल्या संस्थेचें मनःपूर्वक अभिनंदन करतों.

आपल्या कार्याची एकंदर मदार तरुणांवर आहे हें केव्हांही विसरून चालणार नाहीं. ज्यांचीं मतें ठाम बनलीं, ज्यांच्या संवयी कायम ठरल्या, ज्यांच्या राहणींत व विचारसरणींत बदल होण्याची अपेक्षा करणें म्हणजे वठल्या वृक्षाला पाणी घालून नवीन पालवी फुटण्याची वाट पहाण्याइतकेंच व्यर्थ होय, त्या जुन्या पिढीचें मतपरिवर्तन करण्यास आपण झटणें म्हणजे कालापव्यय करणें होय. तथापि जुन्या पिढीबद्दल तुच्छता, अनादर, तिरस्कार, थट्टा वगैरे हीन प्रवृत्ति तरुणांत कोणीही माजवूं नये. आपली संस्था या मोहापासून दूर ठेविली पाहिजे. कारण, तरुणांत अपमान, उपहास, चेष्टा करण्याची वृत्ति एकदां बोकाळूं लागली म्हणजे त्याचा परिणाम खऱ्या सुधारणेंत न होतां, केवळ अहंमन्यता, डौल आणि स्वेच्छाचार यांतच होतो. आपलें कार्य भावी कालाकरतां आहे, पुढील पिढीच्या कल्याणाचें आहे; गतकालाला गोंजारण्याकरतां नव्हे. जी पिढी कालानेंच मागें खेंचली तिच्याकरतां तें नव्हे, हें लक्षांत बागविल्यास प्रत्येक नवीन उपक्रमांत निस्पृहपणा, निर्भीडपणा, स्पष्टोक्ति, बुद्धिवाद यांच्या उत्कर्षाबरोबरच समंजसपणा, दूरदृष्टि, विचारवंत आदर यांचीही फारकत न करतां सुवर्णमध्य कसा गांठावा हें लक्षांत येईल. गतकालांत जें जें कांहीं झालें, ज्या रूढी अमलांत आल्या, जे मार्ग रुळले गेले, ते मार्ग, आणि गोष्टी विवक्षित काळापुरत्या उपयुक्तच असल्या पाहिजेत यांत संशय नाहीं. आज काळ बदलला म्हणून त्या आपण सोडल्या

पाहिजेत हें निराळें. पण हें जुनें सोडतांना व नव्याकडे वळतांना ऐतिहासिक दृष्टि राखल्यानेंच इष्टानिष्टतेचें खरें मर्म पटतें, हें विसरून चालणार नाहीं. आपल्या संस्थेचें भावी कार्य या तत्वानुसार चाललें तरच इष्टफलदायी होईल असें मला वाटतें. ज्याला इंग्रजींत Extreme right आणि Extreme left म्हणतात तीं दोन टोकें सोडून आक्रमिलेला जो मार्ग तोच अंतीं सुधारणेचा खरा मार्ग ठरतो, प्रगतिपर होतो, विधायक कार्याला पोषक होऊन कल्याणप्रद बनतो अशी इतिहासाची साक्ष आहे, त्याचा संदेश आहे. काळाचा अनुभवही तोच आहे. गोमंतकांत आपण जुनें सोडून नव्याकडे जाण्याला अधिक उत्सुक दिसतां, पण उतावीळपणा न करतां आपणाला प्रत्येक पाऊल जपून पण जोमानें टाकावयाचें आहे, हें ओळखूनच वरील शब्द लिहिले आहेत. त्वरा करा, पण आस्तेकदम त्वरा करा (Hasten slowly) हें वाक्य आपण आमच्याप्रमाणेंच लक्षांत ठेविलें पाहिजे. किंवा दुसऱ्या एका वाक्याचा आधार देऊन हेंच तत्व सांगावयाचें झाल्यास तें Be bold, be bold, but be not too bold असें सांगतां येईल. असो.

आपण ज्ञानप्रसारार्थ, शुद्ध व विचारवंत राहणी लोकांत पसरावी एतदर्थ, तसेंच आळस, व्यसनासक्ति, चैन, निरर्थक खर्च करण्याची प्रवृत्ति यांपासून जनतेला, स्वसमाजाला परावृत्त करण्यासाठीं जी खटपट करीत आहां तिला यापुढें अधिक पद्धतशीर स्वरूप दिलें पाहिजे. केवळ व्याख्यानें करून, संमेलनें भरवून आणि वाचनालयें काढून आतां भागावयाचें नाहीं. आपणांकडे शिक्षणसंस्था आहेत. त्या आपापल्या परीनें योग्य कार्य करीत आहेत. परंतु त्यापलीकडे जाऊन विवक्षित धंदेशिक्षण देण्याचा संघटित प्रयत्न आपण केला पाहिजे. याकरितां गोव्यापुरती आणि स्वसमाजाच्या भावी समृद्धीच्या दृष्टीनें आपण औद्योगिक व आर्थिक पहाणी [Industrial and economic survey] केली पाहिजे. सांपत्तिक दृष्टीनें आपला मगदूर आजच्या घटकेस काय आहे, तो कमी असला तर त्याचीं कारणें काय, तो वाढण्यास आपल्या इकडे असलेल्या निसर्गजात संपत्तीचा उपयोग करून कोणते प्रयत्न करतां येतील, आयात आणि निर्गत मालाची विक्री करून केवळ कमिशनवर श्रीमंत होण्याऐवजीं खऱ्या स्वदेशीचा फैलाव, नवीन धंदे उभारून मालाची निपज करण्याची व तो विकण्याची तजवीज—वगैरे वगैरे उपक्रम, नारळ व शेतीवरच अवलंबून रहाणाऱ्या मिरासदारांना जागें करून कितपत करतां येतील, याला सहकारी चळवळीचा भांडवल आणि खप यांच्या दृष्टीचा फायदा घेतां येईल किंवा नाहीं, याचा विचार करण्याचें कार्य आपल्या संस्थेनें शिरावर घेतल्यास कालांतरानें जनतेला त्याचा चांगलाच फायदा होईल. व्यापार, शेती आणि बागाईत उत्पन्न या बाबतींत आपणाकडे अद्याप गतानुगतिकत्वानें चालण्याचीच परंपरा आहे. हें धोरण बदललें पाहिजे. हिंदु समाज समृद्ध, प्रगमनशील आणि जोमदार बनला पाहिजे. घरंदाज कुटुंबांतील तरुणांच्य

डोक्यांत या कल्पना शिरून आपल्या पिढीजाद धंद्याची, शेतीची व बागाईत उत्पन्नाची त्यांनीं वाढ केली पाहिजे. आपल्या कच्च्या मालाला जोडून जे लहान व किफायतशीर धंदे उभारतां येतील ते इतरांचा अनुभव आत्मसात् करून त्यांनीं अवश्य केले पाहिजेत. या कार्यांत तडफ, साहस, चिकाटी, उद्योग आणि भांडवल व व्यापाराचा चोखपणा यांची जोड स्वतः मिळवून लोकांना मार्गदर्शक बनण्याची जबाबदारी श्रीमंत घराण्यांतील तरुणांवर व गरिबांतील बुद्धिमान् लोकांवर नाहीं, असें कोण म्हणेल?

साक्षरता अवश्य पाहिजे. मुलांना तसें मुलींनाही लिहितां वाचतां आलें पाहिजे. परंतु साक्षरता म्हणजेच सर्व कांहीं नव्हे. आजच्या जगांत दारिद्र्य आणि दैना नष्ट झाल्याशिवाय समाजाचा तरणोपाय नाहीं. त्याचें पाऊल कोणत्याही इतर क्षेत्रांत कर्तृत्वाच्या मार्गानें पुढें पडणार नाहीं. **"आधीं पोटोबा मग विठोबा"** या वचनाचा थट्टेवजा विचार न करतां व्यापक दृष्टीनें केल्यास याची सत्यता पटेल. We must live before we can survive. आधीं जमिनीवर — आपल्या कार्यक्षेत्रांत — आपले पाय चांगलेच रुतल्याशिवाय आपणाला भरारीही मारतां येणार नाहीं, इतर प्रकारची कोणतीही उन्नति मनांत असूनही साधणार नाहीं. **"उत्पद्यन्ते विलीयन्ते दरिद्राणां मनोरथः"** हें वचन अगदीं खरें आहे. आणि दरिद्री व्यक्तीपेक्षांही दरिद्री समाजाला तर तें अधिकच लागू पडतें हें, आजच्या हिंदी जगांत महाराष्ट्र मागें कां, व गुजराथ पुढें कां, याचा विचार केल्यास कळून येईल. आरोग्य, सम्पत्ति आणि शहाणपण (Health, wealth and wisdom), शांतता, समृद्धि आणि सत्ता (Peace, plenty and power) या सहा लक्षणांनीं जो समाज युक्त असतो तोच समाज खरोखरी आघाडीस येतो, नांव करूं शकतो व तें टिकवितो. तेव्हां मागील पंचवीस वर्षांत आपण जो उपक्रम केला त्याचीच उजळणी पुढील पंचवीस वर्षांत करून जिवंत रहाण्यांत अर्थ नाहीं.

आपल्या समाजाची सुवर्ण ज्युबिली करण्याचा सुदिन जेव्हां येईल तेव्हां त्यानिमित्त अभिनंदन करणाऱ्या लोकांना या समाजानें वर दर्शविलेल्या मार्गानें जाऊन कार्य केल्याची साक्ष पटली पाहिजे. तरच संस्थेच्या मूळ संस्थापकांचे व आजच्या तिच्या हितचिंतकांचे आत्मे संतुष्ट होऊन स्वर्गांतून ते या संस्थेच्या त्यावेळच्या चालकांवर फुलें उधळल्याशिवाय रहाणार नाहींत.

आयुष्यांत प्रत्येकाला कांहींतरी उद्दिष्ट असलेंच पाहिजे. त्याशिवाय तो स्वतःची उन्नति केव्हांच करूं शकणार नाहीं. पण आपले हेतु आणि कर्तव्यें यांची सांगड उत्तम रीतीनें केव्हां पडते त्याचें गमक कान्ट नांवाच्या जर्मन तत्वज्ञानें पुढें दिल्याप्रमाणें सांगितलें आहे. तो म्हणतो: —

What are the aims which are at the same time duties? They are the perfecting of ourselves, and the happiness of others. व्यक्तीचें पूर्णत्व

आणि समाजाचें सुख यांचा ज्या उद्देशांत संगम होतो, ते उद्देशच कर्तव्यें म्हणून पुण्यप्रद ठरतात. आपल्या समाजानें असेंच कार्य सतत करीत रहावें आणि तद्द्वारा व्यक्ति आणि समाज यांचें एकसमयावच्छेदेंकरून कल्याण साधावें हाच माझा आपणाला आशिर्वाद आहे. आशिर्वाद म्हटल्याबरोबर हात आंखडला, कारण आशिर्वाद देण्याचा अधिकार माझा नाहीं. तशी देवाकडे माझी नम्र मागणी आहे, असेंच म्हणणें अधिक उचित होईल. पंचवीस वर्षें पुरीं होऊन सव्विसाव्या वर्षांत पदार्पण करण्याच्या वेळीं, मागचा आढावा आणि पुढील कार्याची रूपरेखा काढण्याचा प्रघात असतो. त्यामुळें आनंदाचा विरस होत नाहीं, उलट त्यांत भरच पडते. आत्मनिरीक्षण व जगांत काय चाललें आहे याची जाणीव या दोन गुणांचा संयोग झाल्याशिवाय पुढील मार्ग स्पष्ट दिसत नाहीं आणि निश्चित पाऊलही पडत नाहीं. तरीही "प्रयत्न करणें मनुजाहातीं। सिद्धि असे ईशेच्छेवरती" हें कविवचनही तितकेंच सत्य वाटतें. असा प्रयत्न आपल्या हातून होवो आणि त्याला भगवंताचें अधिष्ठान प्राप्त होवो, इतकें सांगून लेखणी आटोपती घेतों.

६

प्रि. कृष्णाजी महादेव खाड्ये बी. ए., (कँटब)

सारस्वत ब्राह्मण समाज, मडगांव, या संस्थेच्या रौप्यज्युबिलीनिमित्त प्रसिद्ध होणाऱ्या या वाङ्मयस्मारक ग्रंथासाठीं कांहीं तरी 'आशिर्वादपर लेख' मी लिहावा अशी संस्थेच्या अध्यक्षांची व चिटणिसांची तीव्र इच्छा असल्यामुळेंच हे चार शब्द मी लिहीत आहें. आशिर्वाद देण्याचा हक्क अजून तरी मी संपादन केलेला नाहीं. 'सारस्वत ब्राह्मण समाजा'नें मात्र माझा गौरव करून मला उपकारांत ठेविलें आहे.

गोमन्तकाचा व माझा संबंध फार नसला तरी जो थोडा आहे तो अत्यंत जिव्हाळ्याचा आहे. आणि गोमन्तकांतील मंडळी मराठी भाषेच्या अभिवृद्धयर्थ जे प्रयत्न करीत आहे त्यांबद्दल मला नेहमींच सादर कौतुक वाटतें. सारस्वत समाजांतील डॉ. भाऊ दाजी, डॉ. भांडारकर, न्यायमूर्ति तेलंग, शंकर पांडुरंग पंडित अशासारख्या थोर महात्म्यांनीं आमच्या प्राचीन संस्कृतीसाठीं जी कामगिरी केली आहे ती पाहून कोणालाही असें वाटेल कीं, सारस्वत समाजानें आमच्यावर अत्यंत उपकार केले आहेत. मडगांव येथील 'सारस्वत ब्राह्मण समाज' ही संस्था नांवानें जरी एक जातिविशिष्ट संस्था दिसली तरी मला जी या संस्थेविषयीं थोडीबहुत माहिती आहे तीवरून मला तरी अशी खात्री आहे कीं, सर्व जातींच्या प्रगतीसाठीं निर्मिलेलें गोमन्तकांतील आम्हां हिंदूंचें ही संस्था हें एक नमुनेदार केंद्र आहे. 'सारस्वत ब्राह्मण समाजा'ची उत्तरोत्तर भरभराट व्हावी हीच माझी इच्छा आहे.

७

श्री. विठ्ठल रामजी शिंदे बी. ए., पुणें.

आपलें कृपापत्र पोंचलें. आनंद झाला. आभारी आहें. मागें मी आपल्या सन्मान्य संस्थेस भेट दिली व आपण मला फार गौरवानें वागविलें त्याची आठवण झाली. आपण पुस्तक प्रसिद्ध करणार आहां ही कल्पना फार चांगली आहे. आपल्या संस्थेच्या रौप्यज्युबिलीबद्दल मी अंत:करणपूर्वक आपणा सर्वांचें फार अभिनंदन करितों. उत्तरोत्तर आपल्या संस्थेची भरभराट होऊन तिच्या द्वारें गोमन्तकांतच नव्हे तर अखिल भारतांत मोठें सत्कार्य घडो, अशी माझी ईश्वरचरणीं सदैव प्रार्थना राहील. सारस्वत ब्राह्मण समाज म्हणजे भारतमातेच्या मुकुटावरचा एक अत्यंत सोज्वळ चकाकणारा मणी आहे ह्याचा अभिमान इतर जातींना आहे. त्याचें उदाहरणही इतरांना प्रेरक आहे. तें तसेंच चिरकाळ राहो. अखेर ईश्वरप्रसादानें सर्व जातींचा व संस्कृतींचा मधुर लय होऊन विश्वबंधुत्वाचा व जागतिक शांतीचा अनुभव सर्वांना घडो. ह्या दैवी कार्यांत आपला समाज भाग घेवो ही प्रार्थना.

वयोमानानें व प्रकृतीच्या अस्वास्थ्यानें मला जास्त लिहवत नाहीं. माझा उजवा हात सारखा हालत आहे. लिहिणें अतिकष्टानें होतें. ह्याबद्दल क्षमा असावी.

८

प्रो. धर्मानंद कोसंबी, मुंबई.

आपल्या संस्थेनें पुस्तकालयद्वारा शिक्षणप्रसाराचें जें कार्य केलें, त्याबद्दल मी आपलें अभिनंदन करतों. पण तिचें नांव जातिविशिष्ट नसतें, तर आपणाकडून ह्याहीपेक्षां अधिक हितावह कार्य झालें असतें असें वाटतें. तेव्हां आपल्या ह्या रौप्यमहोत्सवाच्या शुभप्रसंगीं तिचें नांव असें ठेवा कीं, त्यामुळें कोणत्याही जातीच्या माणसाला तिच्या कार्याची उत्साहपूर्वक अभ्युन्नति करण्यास दिक्कत न वाटावी. येणेंकरून हिंदुस्थानच्या भावी ऐक्याला आपल्या संस्थेचें उदाहरण कारणीभूत होईल, आणि आज पावेतों आपण केलेली जनसेवा विशेष प्रशंसनीय ठरेल. ह्या कामीं आपणाला यश मिळो, असें मी मन:पूर्वक चिंतितों.

९

श्री. मामा वरेरकर, मुंबई.

समाजाच्या या उत्सवाच्या सुप्रसंगीं मनाला होणारा आनंद अवर्णनीय आहे.

गोमन्तक हें स्वतंत्र राष्ट्र आहे. ब्रिटिश संस्कृतीच्या आक्रमणानें महाराष्ट्रावर जे विशिष्ट परिणाम झाले आहेत आणि त्या परिणामाच्या अनुरोधानें महाराष्ट्रांत जी विकृति उत्पन्न झाली आहे ती गोमंतकाला बाधली नाहीं असा माझा सानुभव विश्वास आहे. गोमंतकानें हें आपलें वैशिष्ट्य कायम राखण्यासाठीं ब्रिटिश महाराष्ट्राचें अनुकरण करणें सोडून दिलें पाहिजे.

बुद्धिमत्तेची वांटणी करतांना निसर्ग पक्षपात दाखवीत नाहीं. महाराष्ट्र जेवढा बुद्धिमान् आहे तेवढा गोमन्तक नाहीं अशी न्यून-गंडात्मक भावना गोमन्तकांतून अजून नाहींशी होऊं नये हें दुर्दैव होय. ही वृत्ति झाडून झटकून टाकली पाहिजे. स्वाभाविक आणि कलात्मक जीवनाची संवेदना जितकी गोमन्तकांत संभवते तितकी ती महाराष्ट्रांत नाहीं.

नुसत्या महाराष्ट्रीयच नव्हे तर भारतीय कलांची पूर्वावस्था गोमन्तकानें आपल्या अपूर्व त्यागाच्या बळावर जगवली आहे. त्यासाठीं गोमन्तकाचें वैभव, गोमन्तकाचीं माणसें,नव्हे गोमन्तकाची अब्रूसुद्धां खर्ची पडली आहे. या आत्मत्यागाबद्दल गोमन्तकाचा बडिवार वाढविण्याऐवजीं, तो महाराष्ट्राच्या थट्टेचा विषय होऊन बसला आहे, हा गोमन्तकीयांच्या शालीनतेचा प्रभाव होय. हें शालीन्य आतां पुरे झालें. आपलें महत्व आपणच प्रस्थापित केलें पाहिजे. अपात्रीं दानानें दारिद्र्य येतें. मान देणें तो योग्य भूमिका पाहूनच दिला पाहिजे. विनयाची परिणति दुबळेपणांत होते आणि ज्याच्यासमोर आपण या विनयाचें प्रदर्शन करतों तो त्या विनयी व्यक्तीला खरोखरच हीन लेखूं लागतो. लघुत्वाची विनयशील जाणीव अंतःकरणाच्या देव्हाऱ्यांत पूजेला लावून ठेवावी. पण उघड्या जगाच्या व्यवहारांत छाती पुढें काढून तरवार परजीत वावरलें तरच जगतां येतें. कुणाला दंश करूं नये, पण फूत्कार केला नाहीं तर बलवानाचाही कपाळ-मोक्ष होतो.

आज कित्येक वर्षें प्रेमानें उराशीं कवटाळलेला न्यूनगंड गोमन्तकानें आतां झुगारून दिला नाहीं तर गोमन्तकाचें व्यक्तिमत्त्व नष्टप्राय होईल.

गोमन्तक हें कलेचें माहेरघर आहें. तें सोडलें, ब्रिटिश महाराष्ट्राच्या सासरीं आम्हीं आलों, त्याचीं फळें आम्हीं भोगीत आहोंत. या आमच्या दैन्याचा का तुम्हांला अभिलाष वाटतो ? ज्या या दुबळेपणामुळें आम्हीं मृतप्राय झालों आहोंत, परभृत झालों आहोंत तसेच का तुम्हीं होणार ?

वियोगानें प्रेम वाढतें—म्हणूनच गोमंतकासाठीं—माहेरासाठीं जीव तळमळतो. माहेराचें वैगुण्य कुणीं काढलें तर चीड येते. पण ही जाणीव खुद्द गोमन्तकाला नाहीं म्हणून डोळे भरून येतात. माहेराच्या वैभवानें सासर दिपून जावें असें कुठल्या कुलीनकन्येला वाटणार नाहीं?

गोमन्तकाच्या कलात्मक वैभवानें महाराष्ट्राला दिपवून टाकण्यासाठीं गोमन्तकीयांनो, आतां तरी लवकर अग्रेसर व्हा!

गोमन्तकाचें सार्वत्रिक राष्ट्रीय गीत आतां केव्हां ऐकवणार?

१०

भि. रामचन्द्र पांडुरंग वैद्य, केरी.

गीति.

जयतु श्रीसारस्वत विप्रसमाजोन्नतिप्रकृतिसंस्था ॥
ज्ञानं वितरत्यनिशं प्रथित मठग्रामनामनगरस्था ॥ १ ॥
व्याख्यातृविबुधसंघं प्रतिवर्षं यत्नतः समाहूय ॥
संपूज्य तन्मुखाभ्रात् बोधसुधावर्षणं यया क्रियते ॥ २ ॥
नहि केवल स्वजातिप्रमितः संकोचितः प्रयत्नोऽस्याः ॥
किंतु सकल गोमंतकजनसंघहितैकतत्परः ख्यातः ॥ ३ ॥
संस्थेयं विख्याता वाङ्मयसंवर्धिनी भरतखंडे ॥
शुक्लेंदुकलेव सदा शांतिसुखानंददायिनी भूयात् ॥ ४ ॥
विद्याशांतितपःश्रीशुचितास्वपरोपकारिता प्रभृशं ॥
वर्धतु सुचिरंजीवतु धनव्रजनविपुलसाह्यलाभेन ॥ ५ ॥
श्रीविजयादुर्गाकुलदेवीपदपंकजं नमस्कृत्य ॥
अभ्यर्थयति हृदीऽर्थं केरिस्थो रामचंद्र वैद्योऽयम् ॥ ६ ॥

इति शम्।

११

श्री. गणपत विश्वनाथ लाड, मुंबई.

मडगांवच्या 'सारस्वत ब्राह्मण समाजा'ची ज्युबिली येत्या डिसेंबरांत साजरी होणार आहे ही शुभवार्ता मला माझ्या आयुष्यांतील अत्यंत आनंददायक गोष्टींपैकीं एक होय.

रेल्वेच्या मार्गानें मुंबईस येण्याजाण्यास मडगांव शहर हें माझे आप्त श्री. विनायकराव रेगे व बंधु यांच्या तेथील निवासस्थानामुळें सोईस्कर व सुखकर झालें. व सुरुवातीस ज्या ज्या वेळीं मी मडगांवीं वास्तव्य केलें, त्या त्या वेळीं संयुक्त गौड सारस्वत ब्राह्मण परिषदेच्या तत्वानुसार स्थापन झालेल्या 'सारस्वत ब्राह्मण समाजा'कडे प्रेमानें व आदरानें पाहूं लागलों.

थोड्याच काळांत श्री. यशवंतराव सरदेसाई, कै. सोनू पै भले, कै. पंढरीबाव हेगडे, नागेशराव सडेकर, केशवराव नायक, कै. बोंबी नायक, काशिनाथ नायक, विष्णु नायक, दत्तोपंत पै, सुकेरकर, केंकरे, कारे, विर्जिनकर इत्याद्यनेक समाजकार्यकर्त्यांच्या साहचर्यानें या संस्थेशीं आपुलकीच्या भावनेनें विशेष निगडित झालों. या भावनेची विशेष वाढ माझे मित्र श्री. वसंतराव नाईक यांच्या व्याख्यानकालापासून झाली.

'सारस्वत ब्राह्मण समाजा'चीं प्रत्यक्ष अंगें दोन. एक ग्रंथालय व वाचनालय व दुसरें वाढदिवस–समारंभ व व्याख्यानमाला. संस्था ज्ञातिविशिष्ट, पण त्याचा फायदा सर्वज्ञातीयांस, धर्मीयांस सारखाच. समाजाचें महाद्वार सर्वत्रांस सारखेंच खुलें. हें या संस्थेचें वैशिष्ट्य प्रत्येक प्रागतिक सारस्वतास अभिमानास्पद होय.

समाजाच्या प्रतिवार्षिक व्याख्यानमालेंत महाराष्ट्रांतील निरनिराळ्या विद्वज्जनांना आमंत्रण करून त्या द्वारें मालेंत विशेष सुवासिक अशीं पुष्पें गुंफण्याची जी प्रथा गोमन्तकांत समाजानें प्रथम पाडली त्यायोगें सुविचारांचा फैलाव होऊन परस्पर सहवासानें, विचारविनिमयानें, गोमन्तकाच्या अंतर्बाह्य निरीक्षणानें परस्पर ओळख पटण्यास, गोमन्तकीय तरुणांत आत्मविश्वास उत्पन्न होण्यास, गैरसमज दूर होण्यास, या मालेचा बराच उपयोग झाला आहे, हें यापुढील कालाचें गोमन्तकीय तरुणांचें वाङ्मयकार्य व बृहन्महाराष्ट्रांतील विद्वानांचें गोमन्तकाबद्दलचें लिखाण यांचें बारकाईनें निरीक्षण केल्यास आढळून येईल.

अखिल गोमंतकानें महाराष्ट्र–साहित्य–सम्मेलन मडगांव शहरीं मोठ्या थाटानें व उत्साहानें यशस्वी करून दाखविलें. बृहन्महाराष्ट्रांतील विद्वज्जनांस ज्ञानाचा लाभ परस्पर झालाच. पण त्याबरोबर गोमन्तकाचें वाङ्मयांतील उच्च स्थान, सामाजिक दर्जा व

या सुंदर प्रदेशाची अंतर्बाह्य माहिती झाल्यानें बाहेरच्या पाहुण्यांना आतांपर्यंत या प्रदेशांतील "सुविचारी जनांना मुकलों होतों" असें वाटून "हिंदुस्थानचें नन्दनवन काश्मीर तर महाराष्ट्राचें नन्दनवन गोमन्तक" हे खरेखुरे व आपुलकीच्या भावनेचे उद्गार एका ज्ञानवृद्धाच्या तोंडून बाहेर पडले. सम्मेलनाच्या योगानें प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष असा जो परस्पर लाभ झाला तो आत्मनिरीक्षण करणाऱ्यांशिवाय इतरांस काय दिसणार ? इतके हजार फुकट गेले म्हणून रडणाऱ्यांस त्याची किमत काय ?

या सम्मेलनांत समाज हा मध्यबिंदु कल्पून मडगांवकरांनीं जो वांटा उचलला तो अभिनन्दनीय व अभिमानास्पद होय.

यापुढें तर सा. ब्रा. समाज हें केंद्रस्थान धरून त्यायोगें शिक्षणकार्य व निरनिराळीं सामाजिक कार्यें यथाशक्ति पार पाडून समाजकार्यकर्त्या पुढाऱ्यांनीं मडगांव हें गोमन्तकीय चळवळीचें जवळजवळ केंद्रस्थान बनविलें असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं.

ज्या संस्थेपासून ज्ञानाचा लाभ, आत्मविश्वासाचा उगम, सुविचारांचा फैलाव माझ्या जन्मभूमींत झाला, त्या संस्थेची ज्युबिली-समारंभ-वार्ता मला अत्यानन्ददायी वाटल्यास नवल काय ?

ज्युबिलीच्या या गोड व मंगल प्रसंगीं 'सारस्वत ब्राह्मण समाजा'ची कर्तृत्वशक्ति वाढीस लागो, उत्तरोत्तर अनेक सत्कार्यें या संस्थेकडून घडोत व तिच्या सुवर्णमहोत्सवाचा सुयोग येवो अशी जगन्नियंत्यापाशीं प्रार्थना करून समाजास त्याचा आशिर्वाद मागतों.

११

श्री. श्रीनिवास नारायण कर्नाटकी, पुणें.

मडगांवचा 'सारस्वत ब्राह्मण समाज' स्थापन होऊन आज पंचवीस वर्षें झालीं. या पंचवीस वर्षांत त्या संस्थेनें केवढें तरी उपयुक्त काम केलें आहे. "सरस्वतीची सेवा" हें सारस्वत ब्राह्मणांचें कुलपरंपरागत ब्रीद आहे. तें ब्रीद सदरील समाज मोफत वाचनालय व व्याख्यानमाला, या साधनांच्या योगानें अक्षरशः पाळीत आहे. त्यांत पुन्हां समाधानाची गोष्ट ही कीं, संस्था सारस्वत ब्राह्मणांनीं चालविली असली तरी तिनें आपलें ज्ञानमंदिर सर्व जातींच्या व सर्व धर्मांच्या लोकांस खुलें ठेविलें आहे. या उदार धोरणाबद्दल चालकांची कोणीही स्तुतिच करील.

प्रस्तुत समाजाच्या रौप्यज्युबिलीच्या प्रीत्यर्थ चालकांनीं एक लहानसा स्मारक-ग्रंथ प्रसिद्ध करण्याचें ठरविलें आहे, ही आनंदाची गोष्ट आहे. त्या ग्रन्थांत गोमन्तका-संबंधीं गेल्या पांच शतकांतील हरएक प्रकारची माहिती अधिकारी लेखकांकरवीं देण्यांत येणार आहे. मडगांवची मंडळी मराठी वाङ्मयक्षेत्रांत किती संस्मरणीय काम करीत आहे हें गोव्याबाहेरील देशबांधवांना या ग्रंथाच्या द्वारें उत्तम रीतीनें कळून येईल. किंबहुना कित्येकांस सदरील ग्रंथ उद्बोधकही वाटेल यांत शंका नाहीं. माझ्या माहिती-प्रमाणें, अशेष महाराष्ट्रांत फक्त एक पुणें अगर मुंबई सोडून बाकीच्या जिल्ह्यांतील मराठी जाणणाऱ्या सामान्य लोकांत ज्ञानप्रसार करण्याच्या कामीं आजवर फारच थोड्या मण्डळीकडून प्रयत्न झाले असतील व जे झाले असतील ते पंचवीस वर्षें तर क्वचितच टिकले असतील, या दृष्टीनें मडगांवकर मण्डळीचा उपक्रम खरोखर स्तुत्य व अभिनन्दनीय आहे. अशा उत्साही मण्डळींनीं चालविलेल्या संस्थेचा—सारस्वत ब्राह्मण सभाजाचा—उत्तरोत्तर उत्कर्ष होत जावो व तिच्या हातून अधिक विस्तृत प्रमाणावर ज्ञानप्रसाराचें काम चालू राहो असें मी अन्तःकरणपूर्वक इच्छितों.

१३

भि. रामचंद्र वामन नायक करंडे, माशेल.

"शतंजीव शरदो वर्धमानः।" ऋग्वेद.

ऋक्पादाचा भावार्थ "अखंड वाढत शताब्द तूं वांच" असा आहे. माणसाच्या आयुष्याशीं एकाद्या संस्थेच्या आयुष्याची तुलना करणें एका अर्थीं सयुक्तिक वाटत नाहीं. 'शतायुर्वै पुरुषः' अशी मनुष्यशरीराची जीवमानाची अवधि मानण्यांत येते. पण मनुष्यनिर्मित संस्थेच्या आयुर्मानाची अवधि अशी कल्पिणें ठीक दिसत नाहीं. त्याअर्थीं 'दशशतादिशब्दा अनन्तवाचिनः' ही परिभाषा अशा ठिकाणीं लागू करणें युक्तियुक्त आहे. 'चारचौघांसारखें आपण वागलें पाहिजे', 'पांचांमुखीं परमेश्वर', दहा तेथें देव' वगैरेसारखे शब्दप्रयोग आपण ज्या अर्थानें करतों, तसाच अशा ठिकाणीं शत शब्दाचा अर्थ असंख्य, अनेक असा घेतला पाहिजे. अशा दृष्टीनें पाहिलें असतां एकाद्या संस्थेस पंचवीस, पन्नास किंवा साठ वर्षें अस्तित्वांत येऊन गुदरलीं म्हणजे पाश्चात्यानुकृतीनें सिल्व्हर ज्युबिली, गोल्डन ज्युबिली, डायमंड ज्युबिली वगैरे प्रकार आपल्यांत रूढ झालेले आहेत. मनुष्याच्या आयुर्मानाच्या मापानें हे प्रकार आपण करतों, तें वाईट तर नाहींच किंबहुना प्रशस्तही आहे. एक प्रकारें सिंहावलोकनानें आपली प्रगति

कितपत झाली हें पाहून पुढें आपण आपल्या उद्देशासिद्धीसाठीं काय केलें पाहिजे किंवा काय करणें उचित आहे, हें ठरविण्यास व तदनुसार पुढचा मार्ग आक्रमण करण्यास हा प्रकार फार हितावह ठरेल.

मनुष्याच्या आयुर्मानाच्या दृष्टीनें विचार केल्यास, त्याच्या आयुष्यांतील पहिली पंचविशी ही अनेक प्रकारचे अनुभव घेऊन, अनेक प्रकारच्या चुका करून, आपला आयुष्क्रम सुसंघटित करण्यांत व वागणुकींत ठामपणा आणण्यांत सहज निघून जाते. संस्थेच्या बाबतींतदेखील थोड्याफार अशीं असा प्रकार नसतो असें म्हणतां येणार नाहीं.

गेल्या ४० वर्षांत या प्रान्तांत वर्तमानपत्रें, मासिकें इ. लोकाशिक्षणाचा प्रचार झाला. व त्याबरोबरच मातृभाषाप्रचाराचीं जीं वाचनालयें, पुस्तकालयें, वगैरे अंगोपांगें तींही प्रचारांत येऊं लागलीं.

मडगांवसारख्या प्रमुख शहरांत स्थापन झालेला 'सारस्वत ब्राह्मण समाज' व त्याचें वाचनालय याच हंगामांत जन्मास आलें होतें तरी केवळ एक टूम म्हणून सुरू करण्यांत आलें नसून त्याचें धोरण निराळें होतें. वार्षिक समारम्भ रीतीप्रमाणें करावयाचे, त्यांत आवश्यक असलेला अध्यक्ष वक्ता पहावयाचा तो महाराष्ट्रांतील इतर प्रदेशांतून बोलावून व पुढें पुढें व्याख्यानमालेचें स्वरूप वार्षिक समारम्भास देऊन महाराष्ट्रीय प्रसिद्ध मण्डळीचा परिचय गोमन्तकीय मण्डळीस देण्याचा आणि त्या परिचयामुळें गोमन्तकीयांना आपल्या कार्यांत विशेष स्पृहणीयता आणण्याचा पायण्डा या सा. ब्रा. समाजानें पाडला. मठग्रामीय मण्डळीनें याप्रमाणें आपल्या या संस्थेचा उत्कर्ष क्रमशः साधून आज पंचवीस वर्षांत या संस्थेला प्रशंसनीय स्वरूप दिलें आहे, तें लोकांच्या नजरेसमोर आहेच. वरती आरंभींच सांगितल्याप्रमाणें संस्थेच्या आयुष्यांत २५ वर्षांचा काळ म्हणजे फार मोठासा मानणें जरी एका दृष्टीनें अयोग्य वाटलें, तरी 'वर्धमान' प्रमाणांत तो गांठल्यामुळें आजचा हा 'सिल्व्हर ज्युबिली'चा मंगल प्रसंग प्रशंसनीयच होय.

या प्रसंगीं इतर मंडळींकडून अनेक प्रकारें अभिनंदनीय विचार प्रदर्शित केले जाणार, 'त्यांत आपला आशिर्वादरूप लेख आल्यावांचून पूर्णता येईल असें वाटत नाहीं' असें कळवून 'तशा अर्थाचा लेख यावा,' अशी कार्यकर्त्या मंडळीची सूचना मिळाल्यानें हे चार शब्द लिहून पाठविले आहेत.



महन्मंगले !

अधिष्ठिले तूं सरस्वतीचें पावन चरण इथें
फळली पूजा, भरुनी आले घरचे कलश रिते
मिरवित कटिं ते आल्या दारीं बघ या गृहदेवी
हरिकरुणाही मंगल पाउल प्राचीवर ठेवी
याच मुहूर्ता, महन्मंगले ! स्वीकारीं जल तें
मायमोगरी फुलवीं अमुची, भुलवीं गे हरितें
वेल तियेचा चढवीं, भिडवीं गगनाच्या देंठा
कळ्याफुलांची मिळो पर्वणी दुर्लभ वैकुंठा
भक्तांचा मेळावा जमला आज तुझ्या दारीं
दाखव आम्हां कशी करावी सत्याची वारी
ललकारित तव बिरुदें झेंडा खांद्यावर मिरवूं
आणि यशाची द्वाही तुझिया अष्टदिशा फिरवूं

—बाळकृष्ण भगवंत बोरकर

विचारजननीस—

मम कोशाचें पटल फेडुनी मज जननीनें दाखविला
दिव्य नवलमय दृश्य जगींचा विलास तेजाचा पहिला
दिक्कालाचें परी आवरण वेष्टुनि जें या राहि जिवा
तव पंखांच्या मधुर उबेनें गळुनी लाभे जन्म नवा
दो पंखांचे अंकुर इवले कुशींत दोन्ही मम दिसले
आणि समोरी स्वैरविहारा अनंत अंबर नील खुलें
जीवन दे तव अमृत-चारा, फुलविसि मिटले मम नयन
गहन निळीमधिं हळुहळु केलें मग जीवाचें उन्नयन
ऊनझळी वा पाउसगारा प्रेमळ पांखर तव वारी
तेजीं न्हाल्या धवल गिरींची घडवुनि आणी मज वारी
कलकोलाहल करोत वायस दरींत खालीं कितिहि परी
अतां विहरणें घेत भरारी या शिखराहुनि त्या शिखरीं
तरंग निर्मित तरंगणें नित अथांग या वातावरणीं
ऊर निरामय प्राणवायुनें आकंठचि घेउनि भरुनी
चित्रित गतिनें सहज कराया मार्ग नवोनव शून्यांत
पाठराखणी प्रेरक तव ही जीवनिं लाभो दिनरात
प्रथम किरणिं वंदिलें हिमालय-शिर तुजयोगें स्पर्शियलें
आणि कितीदां मानससरिचें स्फटिकाचें जल प्राशियलें.

—दामोदर अच्युत कारे

गेल्या पावशतकांतील गोमन्तक

(मागील सिंहावलोकनासह)


गोमंतकाचा
नकाशा
चिन्हांचें स्पष्टीकरण
किल्ला
गांव
शहर
रस्ता
रेल्वे
पर्वत
नदी
सीमारेषा
पणजी
मडगांव
वास्को

पावशतकांतील सामाजिक परिवर्तन

श्री. शांबाराव कृ. सू. सरदेसाई

'सारस्वत ब्राह्मण समाज - मडगांव' या संस्थेच्या रौप्यमहोत्सवाप्रीत्यर्थ, संस्थेच्या पावशतकाच्या कामगिरीचें इतिवृत्त व त्याचबरोबर गोमंतकांतील हिंदु समाजाच्या त्या अवधींतील स्थितिगतीचें सर्वांगीण सिंहावलोकन यांनीं युक्त असा जो स्मारकग्रंथ प्रसिद्ध करण्याचें चालकांनीं योजिलें आहे, त्यांतील सामाजिक अंगाचें विवेचन माझ्याकडून व्हावें अशी झालेली सूचना आदरपूर्वक मान्य करणें मला प्राप्त आहे.

वस्तुतः, 'सारस्वत ब्राह्मण समाजा'च्या स्थापनेमुळेंच नव्हे, तर इतरही अनेक घटनांच्या योगानें एका पिढीइतक्या या कालखंडाचें वैशिष्ट्य प्रतीत होत आहे. समाजाच्या जागृतीचा तो **प्रभातकाल** असें म्हणतां येईल. कारण, त्याच कालखंडांत समाजाच्या सर्व थरांतून हालचाल होऊं लागलेली आहे. त्यापूर्वी हालचाल मुळींच नव्हती असें नाहीं; पण ती सुसंघटित व पद्धतशीर स्वरूपाची नसल्यानें फार तर भावी हालचालींचा पूर्वरंग असें तिला म्हणतां येईल.

या कालखंडाच्या सुरुवातीसच पोर्तुगालमध्यें **लोकसत्ताक राज्यपद्धतीची स्थापना** होऊन तदनुसार गोमंतकाच्या राजकीय जीवनाचा प्रवाह बदलला. आणि "राजा कालस्य कारणम्" या न्यायानें तेव्हांपासून नव्या युगास सुरुवात झाली.

गोमंतकस्थ हिंदु समाजांतील प्रमुख वर्ग म्हटला म्हणजे **गौड सारस्वत ब्राह्मणांचा.** नव्या युगाच्या सुरुवातीसच या वर्गांत पोटभेदांच्या एकीकरणाची चळवळ चालली होती. आणि तद्विषयक क्रियात्मक व प्रतिक्रियात्मक अशा दोन परिषदा अनुक्रमें म्हापसें येथें कारवारचे रा. ब. गांगोली यांच्या अध्यक्षतेखालीं व कवळें येथें राजमहेंद्रीचे प्रो. शेषगिरी प्रभु यांच्या अध्यक्षतेखालीं सन १९१० सालीं भरल्या.

गौडांच्या मानानें **द्रविड ब्राह्मणांचा** वर्ग एकंदरींत थोडा व आधुनिक कालानुरूप जीवनांत मागसलेला. पण त्याच्यांतही भट्टप्रभु-पद्ये-ऐक्याची चळवळ होऊन तद्विषयक परिषद् कपिलेश्वर येथें श्री. नरसिंह चिंतामण केळकर यांच्या अध्यक्षतेखालीं सन १९२४ मध्यें भरली.

दैवज्ञ ब्राह्मणांमध्येंही स्वोद्धाराची चळवळ चालून त्यांची परिषद् मडगांव येथें श्री. डॉ. शामराव गोरे यांच्या अध्यक्षतेखालीं सन १९२७ मध्यें भरली.

ब्राह्मणेतरांपैकीं इतरांचे मानानें अल्पसंख्य पण जास्त पुढारलेला वर्ग **वैश्यांचा.** त्यांची परिषद् धारगळ येथें श्री. नारायण बळवंत पडते, एम्. ए. एल्एल्. बी. यांच्या अध्यक्षतेखालीं सन १९२५ च्या अखेरीस भरली.

बहुसंख्य वर्ग जो **मराठे व तत्सम जाती** यांचा त्यामार्फत भंडारी शिक्षण परिषदेचें

१३ वें अधिवेशन पणजी येथें श्री. आनंदराव नारायण सुर्वे, बी. ए. एल्एल्. बी. यांच्या अध्यक्षतेखालीं सन १९२६ च्या डिसेंबरांत भरलें.

याखेरीज खुद्द गोमंतकांतच उद्भवलेली व विकास पावलेली चळवळ म्हटली म्हणजे **मराठा गायक समाजाची**. या समाजाच्या प्रथमतः चार लहानलहान परिषदा सन १९२५ पासून अनुक्रमें नागेशीं, जांबावली, बांदिवडें व काकोडें येथें भरून त्यांची परिणति शिरोडें येथें सन १९२९ सालीं श्री. प्रो. रामचंद्र नारायण वेलिंगकर बी. ए. (ऑक्सफर्ड) यांच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या मोठ्या परिषदेंत झाली.

या सर्व परिषदा केवळ मामुली स्वरूपाच्या नसून नवयुगारंभाच्या त्या सूचक आहेत हें त्यांमधून झालेलीं भाषणें व पास केलेले ठराव यांवरून दिसून येतें. त्याचप्रमाणें त्यांपैकीं प्रत्येकीचें उद्दिष्ट जरी निरनिराळ्या शब्दांनीं व्यक्त झालेलें असलें, तरी त्या सर्वांचा समावेश **"ऐक्य व प्रगति"** या एकाच सर्वसामान्य सदराखालीं करितां येईल.

ऐक्य-प्रगतीची भावना **गावडे समाजां**तही उदित होऊन तिचें पर्यवसान सन १९२८ सालीं चिंबल येथें थाटानें साजऱ्या झालेल्या शुद्धिसमारंभांत झालें.

अस्पृश्य समाजांतही ऐक्य-प्रगतीची ईर्षा उद्भवलेली दिसते. आणि या समाजामार्फत जरी परिषदा भरलेल्या नसल्या तरी, संमेलनें, उत्सव, विद्याप्रसार, मंदिरप्रवेशार्थ प्रयत्न इ. प्रकारांनीं अस्पृश्योद्धाराची चळवळ बऱ्याच वर्षांपासून पणजीचे श्री. सीताराम वामन कामत प्रभृतींच्या नेतृत्वाखालीं चाललेली असून स्पृश्य समाजाकडून त्या कामीं विरोध न दिसतां सहानुभूतीच प्रकट होत गेली आहे.

राजकीय परिस्थितीनें जरी पृथक् असला तरी गोमंतक हा **महाराष्ट्राचा एक भाग** असून तदनुसार गोमंतकस्थ हिंदु समाज हा महाराष्ट्रीय हिंदु समाजाशीं अभिन्न व महाराष्ट्रीय संस्कृतीशीं एकरूप असल्यानें, महाराष्ट्रांतील एकंदर हालचालींचा – चळवळींचा – प्रतिध्वनि येथें उमटावा हें स्वाभाविक आहे. जागृतीची–स्वोद्धाराची–प्रेरणाच त्याला महाराष्ट्रांतून मिळाली ही गोष्ट निर्विवाद होय. यामुळें, महाराष्ट्राच्या जीवनाशीं त्यानें समरस व्हावें, महाराष्ट्राच्या पावलावर पाऊल ठेवून चालावें हेंही साहजिकच आहे. तेव्हां सामाजिक बाबतींत महाराष्ट्राचाच कित्ता त्यानें गिरविला, महाराष्ट्रापुढील जीवनविषयक प्रश्न आपलेसे केले, त्या प्रश्नांना महाराष्ट्रानें दिलेलीं उत्तरेंच (soluções) अंगीकृत केलीं त्यांत मुळींच आश्चर्य नाहीं. मात्र केवळ अंधपरंपरेनें, सर्वस्वी उसन्या तत्वांवर त्यानें निर्वाह चालविलेला नाहीं; आपल्या कार्यपद्धतींत व कार्यक्रमांत तारतम्यभाव राखून परिस्थितिभेदानुसार योग्य फेरफार केलेले आहेत, ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

महाराष्ट्रांतील सामाजिक चळवळींचे **रानडे-भांडारकर** हे जरी प्रणेते असले तरी तिला पद्धतशीर प्रारंभ **आगरकर-कर्वे** यांच्यापासून, म्हणजे जवळजवळ एका पिढीपूर्वी, झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. यावेळीं, सुशिक्षितांची संख्या ब्राह्मण समाजाबाहेर फारशी नव्हती. व त्यामुळें, बहुधा ब्राह्मण समाजाच्या हितसंबंधाच्या प्रश्नांचाच अंतर्भाव सामाजिक सुधारणेच्या कार्यक्रमांत होत असे. अनुभवांतीं आणि सुशिक्षित समाजाचें क्षेत्रही वाढल्यानें परिस्थित्यनुरूप नवीन प्रश्नांची त्यांत भर पडून आस्तेआस्ते त्याला जास्त व्यापक स्वरूप येऊं लागलें. गोमंतकाच्या --एक पिढीनंतरच्या-

जागृतिकालांत हा व्यापक स्वरूपाचाच कार्यक्रम त्याच्यापुढें आला.

जीवनाचा सर्वांगीण विकास हें सामाजिक सुधारणेचें ध्येय आहे. राजकीय, आर्थिक वगैरे इतर सुधारणांचें कार्य या विकासास अनुकूल परिस्थिति निर्माण करून देणें हें होय; पण समाजास विकासक्षम बनविणें हें कार्य सामाजिक सुधारणेचें. **शास्त्रें, विद्या, कला, धंदे, व्यापार यांचा उत्कर्ष; स्वातंत्र्य-युक्त राष्ट्रीय जीवन; न्याय व समता यांच्या पायावर आधारलेले परस्परसंबंध; सत्य, सोय, सदभिरुचि यांस अनुसरून असणारा वैयक्तिक व कौटुंबिक जीवनक्रम; सामुदायिक स्वास्थ्यसाधनार्थ समाजाच्या घटकांमधील [संघटनात्मक] परस्परसहकार्य; तद्विषयक अनुशासनांचें (कायद्यांचें) यथायोग्य-स्वयंप्रेरित-परिपालन,** इ. इ. हीं विकसित – सुधारलेल्या – समाजाचीं लक्षणें होत. या लक्षणांनीं युक्त असा समाज बनावा एतदर्थ त्याचा सांस्कृतिक दर्जा (Nível cultural) वाढविणें हें पहिलें कार्य असून शिक्षण – सर्व प्रकारांनीं द्यावयाचें सर्वांगीण शिक्षण – हें त्याचें एकमेव साधन होय.

असें – सांस्कृतिक दर्जा वाढविणारें – शिक्षण हें **स्वभाषेंतून दिलें गेलें तरच** तें इष्टफलदायी होऊं शकेल. परंतु गोमंतकांत स्वभाषेला योग्य तसा राजाश्रय नसल्यानें या शिक्षणकार्याचा बहुतेक भार समाजावरच पडला व तो त्यानें शक्त्यनुसार उचललाही आहे. या शिक्षणकार्यासंबंधाचें व्यापक विवेचन तज्ज्ञ लेखकाच्या लेखांतून अन्यत्र यावयाचें असल्यानें येथें विस्तार करण्याची जरुरी दिसत नाहीं. थोडक्यांत एवढेंच सांगितलें असतां पुरे कीं, शिक्षणसंस्थांची वाढती संख्या, शिक्षणाचा वाढता दर्जा, शिक्षक व शिक्षणप्रेमी यांचे संघटित प्रयत्न, मुख्य मुख्य ठिकाणांतील शिक्षणसंस्थांचें स्वावलंबित्व व वाढती दृढमूलता, इतरांचें त्या दिशेनें मार्गक्रमण, इत्यादिकांच्या अवलोकनांतीं हें शिक्षणकार्य उत्तरोत्तर विशेष प्रगत होत जाण्याचीं सुचिन्हें दिसत आहेत.

शिक्षणसंस्थांखालोखाल नामनिर्देश करण्यासारख्या संस्था म्हटल्या म्हणजे **वाचनालयें** हीं होत. यांत पणजी येथील महालक्ष्मीप्रासादिक वाचनमंदिर व श्रीसरस्वतीमंदिर, मडगांव येथील सारस्वत ब्राह्मण समाज वाचनालय व श्रीदामोदर वाचनमंदिर, म्हापसें येथील ज्ञानप्रसारक व सारस्वत वाचनमंदिर या दृढमूल संस्था, तसेंच कमीअधिक दृढमूलता आलेलीं इतर ठिकाणचीं वाचनालयें (ज्यांची संख्या पन्नासांच्या आंतबाहेर असेल) यांच्याकडून बरीच स्पृहणीय कामगिरी होत आहे. विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे हीं सर्व वाचनालयें मोफत आहेत.

यांच्याखालोखाल उल्लेखनीय संस्था म्हणजे **व्याख्यानमाला** या होत. पैकीं मडगांवच्या सारस्वत ब्राह्मण समाजाची व्याख्यानमाला हीच काय ती एक स्थिर स्वरूपाची आहे. तीखेरीज अनेक व्याख्यानमाला झाल्या व लयास गेल्या; आणि आतांही मधूनमधून होत आहेत. असें असलें तरी वेळोवेळीं समाजाच्या मनोभूमिकेवर कांहीं ना कांहीं संस्कार त्यांनीं घडवून आणले आहेत यांत संशय नाहीं.

वर्तमानपत्रें, मासिकें, इ. **नियतकालिकांचें** महत्व तर सांगावयासच नको. पण त्यांच्याविषयीं वेगळा विचार अन्य लेखांतून होईल.

आजपर्यंतच्या या प्रयत्नांनीं झालेली जागृति, महाराष्ट्राशीं होणाऱ्या अविरत दळणवळणाचे व विचारविनिमयाचे एकसारखे घडणारे संस्कार,

भिन्न संस्कृतीच्या ख्रिस्ती समाजाशीं असलेल्या सान्निध्यानें स्वसंस्कृतींतील विशिष्ट दोषांची झालेली जाणीव, इ. मुळें गोमंतकस्थ हिंदु समाजाच्या जीवनक्रमांत **महत्त्वाचीं स्थित्यंतरें** घडून आलीं असून त्या सर्वांचा रोंख प्रगतीच्याच दिशेकडे असलेला स्पष्ट दिसतो.

पहिल्याप्रथम दिसून येणारी गोष्ट म्हटली म्हणजे **तरुण पिढीच्या सांस्कृतिक दर्जाची झालेली वाढ** ही होय. पूर्वी प्राथमिक शाळांतूनही हिंदु विद्यार्थ्यांची संख्या बेताचीच दिसे. त्याऐवजीं आतां प्राथमिक, दुय्यम, उच्च इ. सर्व विद्यालयांतून ही संख्या भरपूर नसली तरी बरीच नजरेंत भरण्यासारखी दिसत असून, समाजाच्या सर्व वर्गांतून ती येत आहे.

विद्याविभूषित होऊन समाजाच्या वरच्या थरांत वावरणारे **वकील, डॉक्टर, प्रोफेसर, सरकारी कामदार,** इत्यादिकांची संख्या जी पूर्वी हाताच्या बोटावर मोजतां येण्याइतकीही नव्हती, ती आतां आशादायक रीतीनें वाढली व वाढत आहे.

याशिवाय ग्रंथकार, लेखक, कवि, साहित्यिक, कलावान्, समाजसेवक, इ. ही वाढल्या प्रमाणानें दिसत असून खुद्द महाराष्ट्रांतही वाखाणले जाण्याइतका दर्जा त्यांपैकीं कांहींनीं संपादन केला आहे. त्यांकडून झालेली **वाङ्मयसेवा व समाजसेवा** यांचें विवेचन अन्य लेखांतून यावयाचें असल्यानें येथें त्याचा विस्तार करीत नाहीं.

* * *

सांस्कृतिक दर्जाच्या या वाढीस ज्या विचारक्रांतींतून प्रेरणा मिळाली, त्याच विचारक्रांतीमुळें **आचारांतही क्रांति** व्हावी हें क्रमप्राप्त होय.

यांपैकीं, परस्पर व्यवहारात्मक – सामाजिक – आचारांकडे पाहतां, **परधर्मीयांचा विटाळ** – भ्रष्टाकार – मानण्याची प्रवृत्ति प्रचारांतून साफ गेली म्हटल्यास चालेल. परधर्मीयांचा स्पर्श प्रौढ माणसें होतां होईतों टाळीतच. पण पोर्तुगीज शाळांतून परधर्मीय मुलांशीं शिवाशीव होत असल्यानें, शाळेंतून आल्याबरोबर कपडे बाहेर खुंटीवर टांगून ओला पंचा नेसल्यावरच घरांत प्रवेश मिळण्याचा अनुभव पुष्कळांना आहे. यामुळें, शाळेची वेळ होईपर्यंत पुस्तकांची व त्यांची गांठ पडत नसे हें सांगावयास नकोच. (पुस्तकें बाहेर काढून ठेवण्याचीही सोय नव्हती. कारण तीं सुतानें शिवलेलीं असत.) आतां, केवळ शाळेंतच नव्हे, तर इतर ठिकाणींही परधर्मीयांच्या स्पर्शाचा विधिनिषेध मानला जात नाहीं. ख्रिस्ती रोटीवाल्यांचे पाव तर सोवळ्या सोवळ्या म्हणविणाऱ्या कुटुंबांत स्वीकारले जातात व उपोषणाचे दिवशीं त्यांचा विशेष उपयोग होत असतो!

शुद्धीच्या चळवळीनें तर परधर्मांत गेलेल्यांना, किंवा असणारांनाही स्वधर्मांत पुनः प्रवेश मिळण्याची सोय झाल्यानें, **धर्मांतराचा बाऊ**-ही आतां कोणास वाटेनासा झाला आहे.

जातिभेदाची तीव्रताही पूर्वीच्याइतकी आज नाहीं. विराट्पुरुषाचें मस्तक, बाहु, मांड्या व पाय यांच्यांतून अनुक्रमें ब्राह्मण--क्षत्रिय-वैश्य-शूद्र हे चार वर्ण निघाले व तदनुसार त्यांचा सामाजिक दर्जा ठरतो ही कल्पना आतां कोणी ग्राह्य मानीत नाहीं. कनिष्ठ मानलेल्या जातींतील पुढारलेल्या मंडळीस – ते केवळ कनिष्ठ जातींतले म्हणून – भेदभावानें वागविण्यांत येत नाहीं. आणि, सहभोजनें जरी प्रचारांत आलीं नसलीं तरी, सहपानास किंवा सह-उपाहारास हरकत राहिलेली नाहीं. जातिविषयक उच्चनीचभाव आहे; पण कनिष्ठ

जातींचा सांस्कृतिक दर्जा ज्या मानानें वाढेल, त्या मानानें त्याचा निरास होईल असें मानायला जागा आहे.

ब्राह्मणब्राह्मणेतरवाद हळूं हळूंच जरी दिसून येऊं लागला आहे तरी महाराष्ट्रांतल्याइतक्या तीव्र स्वरूपाचा तो नाहीं. महाराष्ट्रांत तो तीव्र व्हायला ज्या राजकीय घटना कारणीभूत झाल्या, त्यांना येथें वाव मिळालेला नाहीं. शिवाय "पोट व अवयव" यांमधील वादासारखा हा अयुक्तिक वाद टिकेल असेंही वाटत नाहीं.

अस्पृश्योद्धाराच्या चळवळीचा उल्लेख वर आलाच आहे. या चळवळींत, केवळ अस्पृश्यतानिवारण, मंदिर-प्रवेश, स्पृश्यास्पृश्य-संमेलनें, इ. आगंतुक बाबींना प्राधान्य मिळून, अस्पृश्यांची सांस्कृतिक उन्नति ही जी मूलभूत गोष्ट तिला गौणत्व येत आहे हा मोठाच दोष आम्हांस दिसतो. शिवाय, अस्पृश्यांतील निरनिराळ्या वर्गांची, परस्परांमधील अस्पृश्यता दूर करण्याची तयारी नसणें हाही या चळवळीच्या यशस्वितेस मोठाच अडथळा आहे.

परदेशगमनविषयक निर्बंधही फारच ढिले झाले आहेत असें म्हणतां येईल. यापूर्वी पोर्तुगालास प्रथमच जाऊन आलेले डॉ. सखाराम विठ्ठल लाड यांना बहिष्काराची तीव्र झळ सोसावी लागली. आणि त्यामुळें, एकदां समाजापासून ते जे अलग झाले ते झालेच. त्यांचे आप्त प्रो. धर्मानंद कोसंबी यांनासुद्धां या बहिष्काराचा तडाखा बराच जाणवला. पण त्यानंतर जाऊन आलेले दो. राव यांना तो तितका बाधला नाहीं. व नंतरचे श्री. इंजिनियर खंबटे, प्रो. तळावलीकर, श्री. यशवंतराव कारापूरकर यांना तर तो म्हणण्यासारखा झालाच नाहीं म्हटल्यास चालेल. आणि, जरी सनातनी म्हणविणारी मंडळी अजून या "विलायतवाल्यां"पासून दूर राहत असली, तरी त्यांच्या संसर्ग्यांशीं ती पंक्तिप्रपंच करीत नसल्यामुळें संसर्गी होण्याला अडचण राहिलेली नाहीं!

यांशिवाय **बुद्धीला न पटणाऱ्या अनेक चालीरीती** नामशेष झाल्या आहेत व होत आहेत. शिवाशीव व सोवळेंओवळें या त्यांपैकीं होत. न्हावी व धोबी यांच्या शिवाशिवीचा विटाळ केव्हांच निघून गेला आहे. सोवळ्याचीही तीच गोष्ट. पूर्वी मुकटा नेसल्याशिवाय भोजनास बसण्याची सोय नसे. आणि सार्वजनिक भोजनगृहांतून येणाऱ्याजाणाऱ्या मंडळींतून, या चालीमुळें, अनेक स्पर्शजन्य रोगांचा प्रसार व्हायला वाव मिळे. आतां मुकटा अजीबात गेला, आणि सोवळी मंडळीसुद्धां आपल्याला "मुकट्याशिवाय चालतें" असें सांगायला लाजत नाहीं!

कौटुंबिक बाबतींत, पूर्वीची **सामायिक कुटुंबपद्धति** जाऊन तिच्या जागीं वैयक्तिक कुटुंबपद्धति रूढ होत आहे. प्रखर जीवनार्थकलहाच्या या कालांत, प्रत्येक व्यक्तीच्या कर्तृत्वशक्तीचा शक्य तितका विकास होण्याची आवश्यकता भासत असल्यानें, एक पक्षीं कुटुंबांतील प्रमुखावर त्याला न झेपण्याइतका अतिरिक्त भार घालणारी व दुसऱ्या पक्षीं कुटुंबांतील इतर व्यक्तींच्या जबाबदार कर्तृत्वास वाव न देऊन त्याचा लोप करणारी ही कुटुंबपद्धति असमर्थनीय ठरत आहे. अर्थातच कालाच्या प्रभावानें ती नष्ट होत जाणें हें स्वाभाविक आहे.

वैवाहिक बाबतींत **प्रौढविवाहाची चाल** आतां सर्वमान्य होऊं पाहत आहे. या बाबतींत गोमंतक हा महाराष्ट्राच्याही पुढें आहे म्हटल्यास चालेल. तेथें शारदा कायद्यानें विवाहाची वयोमर्यादा पुढें ढकलली; पण येथें शारदा कायद्याच्या मर्यादेपुढें ती केव्हांपासूनच गेली आहे. बालविवाहाची चाल जरी सर्वस्वी नष्ट

झाली नसली तरी तिचा प्रसार आतां कमी कमी होत चालला आहे.

प्रौढविवाहाचा एक अपरिहार्य परिणाम या नात्यानें, **विवाह जुळविणें** हें जें पूर्वी सर्वस्वी वडील मंडळीच्या इच्छेवर व मध्यस्थांच्या करामतीवर अवलंबून असे, तें आतां कमी होत जाऊन, खुद्द वधूवरांची इच्छा त्या कामीं प्रभावी होत जात आहे. आणि टिपणें, देवाचा कौल, इत्यादिकांना गौणत्व मिळून आवडीनिवडीच्या तत्वास प्राधान्य मिळूं पाहत आहे.

विधवांची स्थिति पूर्वीच्याइतकी असहाय राहिलेली नाहीं. पोर्तुगीज कायद्याप्रमाणें बापाच्या इस्टेटीवर मुलांइतकाच हक्क मुलींनाही असल्यानें वैधव्यावस्थेंत निराधार होण्याची पाळी त्यांवर येत नाहीं. विधवांचें दर्शन हा अपशकुन मानण्याची प्रवृत्ति लोपत असून त्याऐवजीं अनुकंपेची दृष्टि वाढत जात आहे. उच्च वर्णांत विधवाविवाहाचा प्रयोगही एक झाला व त्याला समाजाचा विरोध दिसून आला नाहीं. यामुळें, भावी विवाहेच्छूंच्या अडचणी कमी झाल्या आहेत.

केशवपनाची हिडीस चाल सर्वस्वी लोपलेली नसली तरी तिच्यांतील सक्तीचें तत्व जाऊन स्वेच्छा व सवड यांवर तें राहिलें आहे. पतीच्या स्वर्गप्राप्तीला पत्नीच्या केसांची जरुरी आहे असें आतां कोणी मानीत नाहीं. आणि त्या चालीला अजिबात फांटा दिला गेल्याचीं जीं कांहीं उदाहरणें घडलीं, तीं समाजाकडून अक्षम्य मानलीं गेलेलीं नाहींत.

स्त्रीशिक्षणाचा तुरळक प्रचार पूर्वीपासून होता; आणि आतां तर पायाशुद्ध रीतीनें त्याची मांडणी स्त्रीशिक्षणसंस्थांच्या रूपानें होत जात असल्यानें या संस्थांतून उत्तीर्ण होऊन जो महिलावर्ग बाहेर पडेल तो स्त्रियांच्या प्रगतीस वेग देण्याच्या कामीं महत्वाची कामगिरी बजावील, अशी आशा करण्यास बरीच जागा आहे.

वैयक्तिक राहणीतही बराच फेरबदल घडून आला आहे. गृहरचनेंत निवळ सुरक्षितपणापलीकडे सोइस्करपणा, हवाशीरपणा व कलाभिरुचि हीं दिसून येत आहेत. खुर्च्या, टेबलें, कपाटें इत्यादिकांचा समावेश आवश्यक सामुग्रींत होत आहे. मिणमिण जळणाऱ्या समया व लांबणदिवे यांची जागा लख्ख प्रकाश देणाऱ्या कांचेच्या दिव्यांनीं पटकावली आहे. पोषाख, अलंकार व वेषभूषा यांत वाढती कलाप्रियता प्रतीत होत आहे. चालीरीतींतील कडवेपणा जाऊन त्यांत जास्त मार्दव व सौम्यता येत आहे, इ. इ. प्रकारांवरून नवयुगानुसारित्वाकडे (Modernização) होत जाणारा समाजाचा कल स्पष्टपणें दिसतो.

* * *

आतांपर्यंत वर्णन केलेली ही सामाजिक क्रांति मुख्यतः **पुढारलेल्या वर्गांतून** झालेली आहे. आणि समाजक्रांतीचें महत्वमापन करितांना तोच वर्ग ध्यावयाचा. इतर वर्ग कमीअधिक मानानें जुन्या कल्पनांना चिकटून राहिलेले दिसत असले तरी पुढेंमागें ते पुढारलेल्या वर्गाच्याच पावलांवर पावलें टाकून जावयाचे व त्यांनीं गांठलेली मर्यादा गांठावयाचे म्हणून त्यांचें वेगळें वर्णन करावयाची जरूरी नाहीं.

क्रिया व प्रतिक्रिया यांच्या झगड्यांतून सुधारणा निघते असें म्हणतात. प्रागतिकांच्या क्रियेनें ती होत नसते. किंवा गतानुगतिकांच्या प्रतिक्रियेनें व्हायची राहत नसते. क्रियाप्रतिक्रियांच्या झगड्याचे जे संस्कार बहुजनसमाजाच्या मनोभूमिकेवर उमटतात, ते त्याच्या आचारविचारांना प्रेरक होतात. हा क्रियाप्रतिक्रियांचा झगडा गोमंतकांत तितका तीव्रपणें झालेला दिसत नाहीं यांचें कारण

महाराष्ट्रांतील त्या झगड्यानें गोमंतकाची मनोभूमिका आयतीच तयार केली हें होय.

तथापि खुद्द गोमंतकाशीं खास संबंध असलेल्या सामाजिक घटनांच्या बाबतींत (सारस्वतांतील पोटभेदांच्या एकीकरणाची चळवळ, भट्ट-प्रभु-पद्ये ऐक्याची चळवळ) तसा झगडा दिसला व त्यांत गतानुगतिक सनातनी पक्ष पराभूत होऊन प्रागतिकांच्या गळ्यांत विजयश्रीची माळ पडली. उभय पक्षांमधील या द्वंद्वांत, सनातनी पक्षाचें एकमेव हत्यार जें धार्मिक व सामाजिक बहिष्कार तें अगदीं बोथट झालें असल्याचा प्रकार उघडकीस आला. आणि अर्थातच आज त्याचें कोणासही भय वाटत नसून, सारासार विचार न करितां तें वापरणाऱ्या **धर्मपीठांचें दौर्बल्य** मात्र तें प्रकट करीत आहे.

जुन्याला चिकटून राहणारीं धर्मपीठें व त्यांचाच अनुकार करणारे समाजांतील (पुराणमतवादी अर्थात् प्रगतिविरोधी) शिष्टजन, हे नूतन परिस्थितींत समाजनियमन करण्याच्या कामीं असमर्थ ठरल्यानें, **समाजाची शिस्त** सुटल्याचा अनुभव मात्र पदोपदीं येतो. बुद्धिप्रामाण्याच्या नांवाखालीं गुरुजनांची अवहेलना, स्वातंत्र्याच्या नांवाखालीं उच्छृंखलपणा, कलाप्रियतेच्या नांवाखालीं चाललेली चैन व व्यसनासक्तता इत्यादि प्रकार बोकाळलेले दिसतात; पण तूर्तच्या सामाजिक संक्रमणावस्थेंत असें होणें हें अपरिहार्य आहे.

अनिश्चित स्वरूपाची ही संक्रमणावस्था संपून समाज स्थिर भूमिकेवर यावा आणि समाजनियमनाचें कार्य सुयंत्रित चालावें याकरितां, स्थानच्युत झालेल्या या **समाजनियामक शक्तीला नूतन अधिष्ठान** प्राप्त करून देणें जरूरीचें आहे. आणि यास, प्रस्तुतच्या लोकशाहीच्या कालाला अनुरूप असा **संघटना** हाच एक उपाय होय.

दुसऱ्याही दृष्टीनें संघटनेची ही आवश्यकता, किंबहुना अपरिहार्यता, दिवसेंदिवस विशेष तीव्रतेनें भासत जात आहे. सामाजिक परिवर्तनाच्या वर थोडक्यांत केलेल्या पर्यालोचनावरून पाहतां, जरी समाज एकंदरींत प्रगत्यभिमुख दिसला तरी ही प्रगति बरीच मंदपणें चाललेली आहे. आणि यामुळें, जास्त वेगानें पुढें जाणाऱ्या इतर समाजांशीं योग्य स्पर्धा करितां न आल्यानें, या धकाधकीच्या मामल्यांत — जीवनार्थकलहांत — आपण अखेर मागेंच पडत जात आहों.

ख्रिस्ती व हिंदु या दोन्ही समाजांची लोकसंख्या गोमंतकांत जवळजवळ सारखी अशी आहे. तथापि, गोमंतकाच्या सार्वजनिक जीवनांतील ख्रिस्ती समाजानें उचललेला भाग व हिंदु समाजानें उचललेला भाग यांची तुलना करितां, आपण त्या समाजाच्या किती मागें आहों हें सहज दिसून येतें.

ही गोष्ट विशेष स्पष्टपणें लक्षांत यावी म्हणून उभय समाजांचा सांस्कृतिक दर्जा दाखविणारे कांहीं आंकडे देत आहों*:-

	हिंदु	ख्रिस्ती
बॅरिस्टर्स	१	९
डॉक्टर्स	५०	२८८
वकील	३३	१६३
केमिस्ट(Farmacêuticos)	२०	६१
दंतवैद्य	१	२१
प्रोफेसर्स (वरिष्ठ)	०	१२
,, (दुय्यम)	६	२५
,, (प्राथमिक)	३०	१३८

* Do Anuário da India Portuguesa, 1934 — 1935.

		हिंदु	ख्रिस्ती
इंजिनियर्स		३	११
वरिष्ठ अंमलदार (चीफ्स)		२	३५
दुय्यम अंमलदार (सेक्रेटरीज व तत्सम)		४९	१४१
नियतकालिकें	दैनिकें	०	४
	अर्धसाप्ताहिकें	१	१
	साप्ताहिकें	१	८
	पाक्षिकें	०	२
	मासिकें	३	३

याशिवाय, पोर्तुगाल, पोर्तुगीज वसाहती, ब्रिटिश इंडिया, आफ्रिका व जगांतील इतर देश यांतून पसरलेल्या गोमंतकीय ख्रिस्ती समाजाची प्रकट होणारी कर्तृत्वशक्ति व त्यांकडून बजावण्यांत येणारी कामगिरी वरच्याहून कितीतरी पट जास्त आहे!

वरील माहितीवरून, संख्येनें जवळजवळ समान असणारा ख्रिस्ती समाज सांस्कृतिक दृष्टया आपल्याहून किती पुढें आहे व त्याच्याशीं बरोबरी करावयाची झाल्यास आपल्याला किती व कसें मार्गक्रमण केलें पाहिजे यांचें दिग्दर्शन होईल. मंदपणें चाललेल्या प्रगतीस जास्त वेग दिल्याशिवाय ही गोष्ट साध्य होणें नाहीं. व ती साध्य न झाली तर आपल्याला एकंदरींत मागेंच रेंगाळत रहावें लागेल.

यार्करितां, ठिकठिकाणच्या एकाकी प्रयत्नांत एकसूत्रीपणा, कार्यक्षमता व जोम आणून, समाजाच्या प्रगतीला जास्त वेग देण्याचें कार्यही संघटनेनेंच होणार असल्यानें, **संघटना हीच आतां पुढची पायरी आहे.** येत्या पंचविशींत या पायरीवर समाज अधिष्ठित होवो अशी इच्छा प्रकट करून वाचकांची रजा घेतों.

*

२

कलात्म गोमन्तक

श्री. प्रो. रामचंद्र शंकर नायक

Finalmente, a par de tudo isto, a Colónia tem nos seus habitantes o seu maior recurso, a sua máxima riqueza.

Dr. Jaime de Morais
Governador Geral da India Portuguesa
(Sessão do Cons. do Govêrno de 9 - 10 - 1920)

गर्भवतीची कायिक व मानसिक प्रकृतीच कुसव्यांतील जीवात्म्याचे प्रकृतिधर्म रचीत असते, हा एकंदर मानवजातीचा अनुभवजन्य सिद्धांत आहे. आपल्याकडे तर 'डोहाळे पुसणें आणि पुरविणें' या सोहाळ्यांचें महत्व पुराणकालापासून स्पष्ट दिसतें. गर्भारणीच्या या प्रभावी मनःस्थितीला एका पाश्चात्य तत्वज्ञानें (Taine) "मानसिक उष्णतामान" (Temperatura moral) असें सुंदर आणि सूचक नांव दिलें आहे.

विज्ञानदृष्ट्या उष्णतामान (Temperatura) हा केवळ स्थितिदर्शक शब्द असून दाहशक्तीचा (Calor) तो एक विशिष्ट परिस्थितींतील परिणाम होय. दाहशक्ति आणि उष्णतामान हीं जितकीं अन्योन्याश्रयी आहेत तितक्याच मनुष्याच्या कायिक व मानसिक प्रकृती त्याही आहेत.

हीच दृष्टि थोडीशी व्यापक केली आणि जन्मदात्रींत दिसून येणारे धर्म जन्मभूमींत शोधून पाहिले तर, एखाद्या देशाची स्वाभाविक रचना, हवामान, पाऊसपाणी इत्यादि समाजाच्या आर्थिक पोषणास साहाय्यभूत होणारे निसर्गविशेष हे त्याची "कायिक प्रकृति" असून तेथील सुखसमृद्धि, सौंदर्य आणि खुद्द समाजाचे वांशिक व सांस्कृतिक गुणधर्म इत्यादि मानसिक प्रवृत्तिपोषक विशेष हे त्यांचें "मानसिक उष्णतामान" आहेत असें म्हणावयास प्रत्यवाय नाहीं. अर्थात् हे दोन्ही विशेष वरीलप्रमाणेंच परस्परावलंबी असले पाहिजेत.

या म्हणण्याचें प्रत्यंतर मानवांच्या सामुदायिक आवडीनिवडींत, स्वभावविशेषांत, चालीरीतींत वगैरे वारंवार प्रतीत होतें. "अँग्लो-सॅक्सन, जर्मन किंवा रशियन लोकांच्या आणि आम्हां इटालियनांच्या आवडीनिवडी कदापि समान असणें शक्य नाहीं", असें जें Dr. Mário Pilo यांचें विधान आहे, तेंही समाजांच्या मनोव्यापारांचें वैधर्म्य कसें निसर्गजन्य आहे हेंच दाखवितें.

गार आणि धूसर वातावरणांतील इंग्रजांची धिम्मी मनोवृत्ति भूमध्य समुद्राळ्यातच्या समशीतोष्ण, सस्मित, सुप्रकाशित प्रदेशांतील युरोपियनांत दिसत नाहीं. इकडे, उत्कट, रसरशीत, अनावर प्रवृत्तींचा स्वैर विलास आढळतो. आणि त्यांतही, विशिष्ट नैसर्गिक परिस्थितीच्या

एखाद्या क्षेत्रांत समानधर्मीय मानववंशांचें बीं पेरलें गेलें तर त्याचे परिणाम स्पष्टतर होतात. पोर्तुगाल-स्पेनकडील लोकांचे देशीय गुण जे पराकोटीला गेलेले दिसतात ते त्यांच्या नसांत पूर्वेकडील धाडशी अरबांचें रक्त शिरल्याचा परिणाम आहेत हें का सांगितलें पाहिजे?

लहानशा क्षेत्रांतसुद्धां मनोवृत्तींचे निसर्गजन्य पोटभेद कसे पडतात हें पाहावयाचें झाल्यास पोर्तुगालविषयीं Antero de Figueiredo हे लेखक काय म्हणतात पाहावें :-

"उत्तरेस तसा दक्षिणेस चित्रकार आपला रंगफलक पांढऱ्या, पोपटी व निळ्या रंगानें भरून घेईल तर मध्यप्रदेशांत तो गाढ हिरवा आणि जांभळा हेच रंग पसंत करील.

"उत्तरेकडील इसम आपल्या परसांत जगतो, तर दक्षिणेकडील उघड्या माळावर राबतो. एक आपल्या वीतभर जागेंतच समाधानानें गुरफटून घेऊन गात गात कष्टेल आणि जपमंत्र गुणगुणत (a rezar) देह ठेवील! तर दुसरा विशाल माळाचा विस्तार आपल्या डोळ्यांनीं आक्रमील आणि हृदय उंचावून तें उत्कंठेनें आणि लालसेनें भरून घेईल. पहिला स्थिरचित्त तर दुसरा चुळबुळ्या आहे.

.....

"मुलुखगिरीच्या कालांत "मोंदेगु"च्या दक्षिणेस लढाया देण्यांत आल्या तर उत्तरेस गनिमी छापे घालण्यांत आले!

"संत उत्तरेकडील तर कवि मध्यप्रदेशांतील आणि दर्यावर्दी दक्षिणेंतील आहेत!"

अशीं पोर्तुगिजांच्या आंतर व बाह्य जीवनाचीं विविध चित्रें रंगवून झाल्यावर तिकडील मानववंशांच्या मेसळीकडे ते बोट दाखवतात:-

"अलीकडे आर्य, तर पलीकडे सेमीत
"अर्धा देश सेल्त, तर अर्धा अरब.

"पोर्तुगालांत वैशिष्ट्यपूर्ण असे दोन पोर्तुगाल आहेत ..... (Portugal tem dois Portugais distintos....)"

अवघ्या ९०,००० चौ. किलोमीटरच्या घरांतील, सांस्कृतिक दृष्ट्या अगदीं अलीकडील, पोर्तुगालची जर ही गोष्ट, तर ३,५०,००,००० पेक्षांही अधिक चौ. कि. च्या, अत्यंत प्राचीन हिंदुस्थानची स्थिति कल्पनेनेंच अजमावली पाहिजे.

भिन्न भिन्न प्रदेशांतून, निरनिराळ्या काळीं, नाना संस्कृतींचे आणि अनेक मानववंशांचे लोक येऊन येथें स्थिरावले आहेत. नाना धर्म, कितीतरी संप्रदाय, वैचित्र्ययुक्त चालीरीती, शेंकडों भाषा अनेक शतकांपासून येथें नांदत आहेत. भौगोलिक दृष्ट्यासुद्धां हिंदुस्थान हा जणूं एक खंडच आहे. सर्व प्रकारचें हवामान, नाना तऱ्हेचें पीकपाणी, असंख्य जातींचा प्राणिसंभार आणि वनस्पति जर कोठें एकाच देशांत पाहावयास मिळत असतील तर तो भारतदेश होय. त्यामुळें येथील जनतेंत एकरूपता दिसूं नये यांत काय नवल?

तरी गोमंतकाच्या मनोधर्माचा पृथक् विचार करण्याचा हा प्रयत्न आकुंचित दृष्टिकोणाचें द्योतक आहे, असें कोणी म्हणेलसें वाटत नाहीं.

भारतीयांमधें एकरूपता नाहीं हें जरी निर्विवाद असलें तरी ज्या ज्या ठिकाणीं वांशिक आणि नैसर्गिक परिस्थिति समान असते, त्या त्या ठिकाणीं— धार्मिक किंवा राजकीय मैदानुसार बाह्य जीवनांत वैधर्म्य दिसलें तरी— आंतरिक जीवनांत एकात्मता दिसते, ही गोष्ट या विवेचनांत विसरून चालणार नाहीं.

हिंदपुत्रांचे म्हणून कांहीं विशेष आहेतच. "सहा वर्षांच्या कोवळ्या उमरींत परमेश्वरचिंतनाची अशी ओढ लागण्यास भारतमातेच्या कुशींतच जन्म घेतला पाहिजे, ही आपली पक्की

खात्री आहे" अशा अर्थाचे उद्गार D. Sylvain Levi या सुप्रसिद्ध विदुषीनें आपल्या Dans l'Inde या पुस्तकांत ('सहा वर्षांची संतीण' या प्रकरणांत) काढले आहेत. Levi पतिपत्नींचें हिंदुस्थानच्या भूतकालावरील प्रेम घटकाभर बाजूस ठेवलें तरी धार्मिकता — मग तो धर्म कोणताही असो — हा एक आपला प्रमुख गुण आहे हें नाकबूल करण्यांत अर्थ नाहीं. अंतर्मुख विश्वनिरीक्षण-प्रवृत्ति हा आपला दुसरा विशेष आहे. भारतीय कवींद्राचा गूढगुंजन (Misticismo) हाच प्रमुख गुण असावा आणि जगाला चिरंतन सत्यें पटविण्याची हिंदी परंपरा चालविणाऱ्या विज्ञानविशारदानें वनस्पतींत आत्म्याचा शोध करावा, या गोष्टी भारतीय मनोधर्माच्या निदर्शक वाटत नाहींत काय?

शिकंदराच्या कालीं ग्रीकांचा हिंदुस्थानशीं संबंध आला असतां, त्यांच्या यथादर्शन-पद्धतीचा हिंदी कलेवर झालेला परिणाम निर्बल, अल्पजीवी ठरला ही विस्मयकारक (Frappant) गोष्ट हिंदवासीयांची प्रबल वांशिक व्यक्तिमत्ता व्यक्त करते असें G. L. Bon चें म्हणणें आहे. हीच व्यक्तिमत्ता आपल्या धार्मिक व सामाजिक आचारविचारांत आणि वाङ्मयीन अगर कलाविषयक जीवनांत प्रतीत होणाऱ्या प्रतीकात्मक सृष्टीची निर्माती होय.

* * *

निसर्गाला मानवी सौंदर्यदृष्टीची जोड मिळाली कीं कलेची निपज होते. निसर्गाचे वस्तुगत धर्म आणि कलावंताचे व्यक्तिगत मनोधर्म यांचा कलाकृतींत समन्वय(Síntese)झालेला असतो.

कलावंतानें आपल्या भोंवतालच्या सौंदर्य-प्रेरक वस्तूंतूनच आपले कलाविषय निवडावे हें स्वाभाविक आहे. इतिहासपूर्व कालांतील अवशेषांवर कोरण्यांत आलेलीं 'मामूथ'सारख्या प्राण्यांचीं चित्रें; चीन-जपानकडील बांबू, लांब चोंचीचे पक्षी आणि शुभ्र शिखरांचे ज्वालामुखी; इजिप्तचे ताड आणि मगर; दक्षिण युरोपांतील द्राक्षांचे वेल हीच गोष्ट दर्शवितात. आपल्या देशांत, केळ, कमळ, माड, पोफळ, मोर, माकड, हरीण, हत्ती, वाघ, सिंह वगैरे विषय जे चित्रालंकार (Motivos ornamentais) म्हणून निवडले गेले तेही असेच.

कलोत्पादनाला प्रेरक होणाऱ्या वरीलसारख्या वस्तु आणि कलाकृतींच्या साधनचतुष्टयापैकीं कृतिनिष्ठ अशीं उपादान व करण संज्ञक साधनें हीं सर्व निसर्गाची देणगी आहेत. आणि राहिलेलीं कल्पना व प्रयोजन हीं कर्तृनिष्ठ साधनें मानवी मनोधर्माचीं द्योतक आहेत असें मानलें जात असे. परंतु आजला निसर्ग व मानव यांची फारकत फार तर विवेचनाच्या सोयीपुरतीच करतां येईल. एरवीं आजचे व्यक्तिगत मनोधर्म हे एका काळच्या बाह्य वस्तुगत धर्मांचाच परिणाम आहेत, हें दृष्टीआड करून चालणार नाहीं. म्हणूनच अनादि कालापासून घडून आलेल्या संस्कारांमुळें ज्या प्रवृत्ति मानवांमध्यें मुरतात व अनुकूल स्थलकालीं स्फुरतात त्यांस आपण नैसर्गिक हें नांव देतों.

या दृष्टीनें मानवी जीवनाच्या एकंदर आविष्कारांमध्यें असलेले गूढ संबंध उकलून पाहाणें– अर्थात् उकलण्याचा प्रयत्न करून पाहाणें – अभ्यासाच्या दृष्टीनें जितकें उपयुक्त तितकेंच मनोरंजकही झालें आहे.

चिनी वास्तुकलेंत जी तिर्कस रेषांची आवड व्यक्त होते तिचें मूळ तेथील माणसाच्या चेहऱ्यावरील रेषांत दिसतें असें दाखविणाऱ्या Humbert de Superville ची निरीक्षणशक्ति जितकी कौतुकास्पद तितकीच धाडसी समजली पाहिजे. सदर Superville यांनीं तुलनेसाठीं दिलेलीं, चिनी माणसाच्या चेहऱ्याचें एक आणि चिनी बंगल्याचें एक, अशीं त्यांमधील

विस्मयकारक साम्य दाखविणारीं चित्रें पाहून "हे कलावंत सुतानें स्वर्गास जाण्यांत अधिक कुशल आहेत" असेंच कोणीही म्हणेल. परंतु इजिप्त, युरोप आणि हिंदुस्थान येथील वास्तु-रचनेंत अनुक्रमें रुंदी, उंची आणि खोली या अंगांस दिलेलें प्राधान्य पाहून व त्या त्या प्रदेशांतील हरएक विशेषांचें, हवामानाचें आणि पारलौकिक आकांक्षांचेंसुद्धां प्रतिबिंब तिच्या रूपरंगांत कसें उमटलेलें दिसतें, याची मीमांसा वाचून (Charles Blanc-Grammaire des Arts du Dessin) भावग्राही आणि विचारशील माणसाच्या मनास अननुभूत असा धक्का बसल्यावांचून राहाणार नाहीं. आणि 'हॅम्लेट' पाहून "अरे, हें वेड तर खरें, पण यांत कांहीं शिस्त दिसते!" असे उद्गार काढणाऱ्या पोलोनियसप्रमाणें, "अरे, या कल्पना तर खऱ्याच, पण यांत कांहींतरी सूत्रबद्धता असली पाहिजे," असे उद्गार त्याच्या तोंडून नकळत बाहेर पडतील.

मिसर देशांतील नग्न, विशाल आणि अभंग मनोऱ्यांचा तेथील उघड्या, अमर्याद आणि अविचल क्षितिजांशीं जो संबंध दिसतो, तोच त्यांचा आत्म्याच्या अमरत्वावरील दृढ विश्वास आणि दीर्घ परिश्रमानें अनंत कालपर्यंत मृतांचीं कलेवरें व खजिने संरक्षित केल्याअंतीं, त्यांत ते आत्मे एक दिवस पुन्हा प्रवेश करून सुखसंपत्तीचा चिरकाल उपभोग घेणार असल्याबद्दलची दृढतर आकांक्षा दर्शवीत आहे. आणि अति-परिचयामुळें ज्याची आपणाकडून अवज्ञा होते, त्या कैलासासारख्या खुज्या पण खोल व विस्तीर्ण लेण्यांत आम्हां हिंदी आर्यांचें ऐहिक ऐश्वर्यपराङ्-मुख पण अंतर्मुख, अथांग व विशाल तत्वज्ञान खोदलें असलें पाहिजे, याची साक्ष पटूं लागते. तसेंच, दक्षिणेंतील सूचिरूपी घुमटांवर व होय-सळकालीन गुहातुल्य व छायापूर्ण देवालयांवर कोरण्यांत आलेल्या असंख्य पुराणचित्रांची, वृक्षवेलींची व प्राण्यांची गर्दी, तिकडील आकाशांत होणारी रंगांची 'खातड' आणि घन-घोर अरण्यांत वाढणाऱ्या वृक्षराजींची व त्याच्या सावलींत विहरणाऱ्या स्वैर श्वापदांची खेंचाखेंच प्रतिबिंबित करीत आहेत, असें वाटूं लागतें.

वास्तु, चित्र, शिल्प या कलांप्रमाणेंच संगीत, नाट्य व वाङ्मय या कलांवरही निसर्गाचें प्रभावी संस्करण झालेलें दिसतें. विशिष्ट देशांतील मौलिक वस्तु व तेथील भाषालंकार, तद्देशीयांचे मनोधर्म आणि बोलींतील आवडीचे वर्णविशेष, आविर्भाव व अंगविक्षेप यांमध्यें फार निकटचे संबंध प्रत्ययास येतात. आणि कोणत्याही देशांतील असामान्य स्वयंस्फूर्त कलावन्ताच्या कृतीचें निरीक्षण केलें तर त्यांत त्याच्या मातृ-भूमीच्या सनातन गुणविशेषांचें निकट किंवा दूरस्थ प्रतिबिंब आढळून येतें. Wagner च्या संगीतरचनेंत जर्मनीची, तर Bellini च्यो स्वरसंगतींत इटालीची जातिवंत आवाजी घुमत असल्याचें रसिकांनीं ओळखलें आहे.

आपल्या वेदकालीन देवता तर केवळ निसर्गशक्तीचीं प्रतीकें आहेत. इतकेंच नव्हे, तर सावित्री-सत्यवानाची कथा ही, पृथ्वीनें आपला भर्ता जो सूर्य तो हिमवृष्टीमुळें उद्भवलेल्या प्रलयांतून महत्प्रयासानें परत मिळविल्याच्या विजयावरील रूपक आहे, आणि क्षोभकाळीं आपला तृतीय नेत्र उघडून मदनदहन करणारा इंदुशेखर जटाधारी महादेव ज्वालामुखीचें दैवी स्वरूप आहे, ही विचारसरणी लक्षांत घेतली तर कलाच नव्हे तर मानवाचा धर्म, इतिहास, वाङ्मय, एकंदर जीवन निसर्गानें कसें व्यापिलें आहे, तें दिसून येईल. मग "हिंदुस्थानच्या वाङ्मयीन कलाकृति तेथील दगडी कलाकृतींच्या जवळच्या नातेवाईक आहेत" हें G. Le Bon चें म्हणणें कोणास पटणार नाहीं?

परंतु हीं नातीं ओळखणें, अर्थात् निसर्ग आणि कला यांमधील संबंध निश्चित करणें ही तेवढी सोपी गोष्ट नाहीं.

या विषयांतील एक जगन्मान्य तज्ज्ञ Prof. Jean Brunhes हे या प्रकरणांत जो इषारा देतात तो मननीय आहे. ते म्हणतातः–

"कलाविषयक भूवर्णन (Géographie artistique) जें ऐतिहासिक भूवर्णनाचा एक भाग झालें असतें त्याची पद्धतशीर रचना होणें खरोखरच योग्य होतें. कारण तेणेंकरून जडतेची चौकट आणि कलेचे हे किंवा ते आविष्कार यांमधील अनेक संबंध आणि संयोग-बिंदु निश्चित करण्याची सोय झाली असती." (Géographie Humaine, Vol. II) पण ह्या उद्योगांत त्यांच्या मतें घिसाडघाई मुळींच उपयोगी नाहीं. "जितका शहाणपणा तितकीच शांतिशील वृत्ति वापरली पाहिजे". (Autant de prudence que de pacience) आणि हे संबंध "कार्यकारणदर्शक नसून संयोगदर्शक आहेत" (Pas de causalité mais de connexion) हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

वरील एकंदर विवेचनावरून जी गोष्ट वाचकांच्या नजरेस आणून द्यावयाची आहे, ती हीच कीं, कोणत्याही राष्ट्राची किंवा समाजाची कलात्म प्रकृति आणि त्याच्या मातृप्रदेशाचे भौगोलिक विशेष व खुद्द त्या समाजाचे वांशिक व सांस्कृतिक गुणधर्म हे अन्योन्याश्रयी, परस्पर-सापेक्ष आहेत. आणि त्यांमधील संबंध अत्यंत गुंतागुंतीचे असून ते आज सर्वसंमत असले तरी सुस्पष्ट झालेले नाहींत.

* * *

गोमंतकाच्या कलात्म प्रकृतीचा विचार करतांना, भौगोलिक, वांशिक आणि सांस्कृतिक (धार्मिक, सामाजिक, ऐतिहासिक इ.सामुदायिक) जीवनदृष्ट्या त्याचें स्वरूप काय आहे याचें अल्प विवेचन या ठिकाणीं अप्रस्तुत होणार नाहीं.

प्रथम त्याच्या भौगोलिक विस्ताराकडे आणि नैसर्गिक स्वरूपाकडे वळूं.

स्थूल मानानें, ३॥ कोटी चौ. किलोमीटरच्या हिंदुस्थानांत आजच्या गोमंतकाच्या बांध्यास अवघे ३॥ हजार चौ. किलोमीटर येतात. जुन्या संस्कृत वाङ्मयांत उल्लेखिलेला "गोमन्त", प्रो. विल्सनचें "गोवराष्ट्र" (गोपराष्ट्र नव्हे), अशोकाच्या शिलालेखांतील "अपरान्त" यांचा विस्तार काय होता हें समजण्याची सोय नाहीं. तथापि गोमंतक इतका लहान नव्हता हें खास. कोंकणाख्यानांत वर्णिलेले ५ महाल, १८ तपे, ५ कर्याती, २ फुटखेडीं, २ संमती, २ कोट व १ परगणा एवढा प्रदेश त्यांत संभवत असावा. पंधराव्या शतकाच्या अखेरपर्यंत त्याचा विस्तार सध्याच्या गोमंतकाच्या मानानें कितीतरी मोठा होता यांत संशय नाहीं. आणि त्या मोठ्या गोमंतकाशीं आजच्या गोमंतकाचें जें बऱ्याच बाबतींत साधर्म्य आहे तेंही कोणास नाकबूल करतां येणार नाहीं. तथापि येथें आपणास तेरेखोलपासून काणकोणच्या दक्षिण सीमेपर्यंतचाच टापू विचारांत घेणें भाग आहे.

हा प्रदेश निसर्गसुंदर आहे याविषयीं दुमत नाहीं. एकमुखानें त्याची आपण सर्वत्र स्तुति झालेली ऐकत आलों आहों. कोणीं त्याला महाराष्ट्राचें "काश्मीर", तर कोणीं "नंदनवन" अशा उपनामांनीं गौरविलें आहे. प्रसिद्ध फिरस्ते, कवि, लघुकथाकार वगैरेंचीं अशीं अनेक नांवें दाखवितां येतील कीं जीं या प्रदेशाच्या सौंदर्य-वर्णनांत सहभागी झालीं आहेत. येथें तीं उद्धृत करण्याची आवश्यकता दिसत नाहीं; किंवा लेखकाला स्वतः त्या वर्णनांत शिरण्यांत औचित्य वाटत नाहीं. दाखलाच हवा झाला तर भावनावशतेचा संशयसुद्धां घेणें शक्य

नाहीं अशा एका प्रसंगीं, आपले माजी गव्हर्नर Dr. Jaime de Morais हे गव्हर्नमेंट कौन्सिलच्या अध्यक्षस्थानावरून काय म्हणतात तें वाचकांनीं पाहावें:–

"*As extraordinárias belezas naturais* da India continuam desconhecidas da nuvem de touristas que percorrem a India visinha, *onde nunca encontrarão pontos de vista mais belos; com as praias mais belas da Península*, nem as aproveitamos devidamente, nem delas fazemos a necessária propaganda."

वरील उताऱ्यांत, अखिल हिंदुस्थानांतील कोणत्याही प्रदेशाच्या सौंदर्यगुणांस या भागाचें असामान्य नैसर्गिक सौंदर्य हार जाणारें नाहीं आणि येथील समुद्रकिनाऱ्यासारखा दुसरा, उभ्या हिंदी द्वीपकल्पांत गवसणें शक्य नाहीं असें जें म्हटलें आहे, त्याचा हेतु गोमंतकांत फिरस्त्यांची (touristas) रहदारी वाढविण्याची सोय करण्याचा सरकारतर्फे कांहीं आर्थिक उपक्रम करण्याची आवश्यकता प्रतिपादन करणें हा होता. तेव्हां, वरील विधानांत कोणाही संशयात्म्याला गौण हेतूंचा वास येईल, असें वाटत नाहीं.

अशा सुंदर, समृद्ध आणि रमणीय प्रदेशांत कोणत्या मानववंशाचें बीं लावलें गेलें या प्रश्नाकडे आपणास आतां वळलें पाहिजे.

अनादिकालापासून कोंकण व महाराष्ट्र या भागांतील वरिष्ठ जाती आपण आर्यकुलोत्पन्न असल्याचा अभिमान वाहात आहेत. शास्त्रीय दृष्टीनें काढलेल्या अनुमानाचें नांव सांगून या अभिमानाच्या विरुद्ध असणारेंही एक मत आज प्रचलित आहे. या मताचे प्रणेते Sir Herbert Risley हे होत. वांशिक लक्षणांच्या दृष्टीनें भारतीयांचें वर्गीकरण करण्याच्या उद्देशानें Sir Risley हिंदुस्थानचे सात भौगोलिक विभाग करतात. आणि त्यांपैकीं गुजराथपासून कुर्गपर्यंत पसरलेल्या भूभागांतील एकंदर रहिवाश्यांचा वंश ते Scito-dravidiano या नांवानें संबोधितात. वंश, जात, प्रजा किंवा जनता, या लोकसमुदायांस एकाच मापानें मोजणें शास्त्रदृष्टीला मान्य नाहीं, हें खरें आहे. तसेंच केवळ भाषेवरून, धर्मावरून, चालीरीतींवरून अथवा पारंपरिक समजुतींवरून वांशिक उगम निश्चित करतां येत नाहींत हेंही मनुस्मृतींतील संकटांच्या उल्लेखांवरून व डॉ. भांडारकरांसारख्यांच्या विवेचनावरून सिद्ध आहे. तथापि Sir Risley यांचें वरील मत आज अग्राह्य ठरलें आहे.

डॉ. केतकरांच्या म्हणण्याप्रमाणें Scitas हा शब्द वंशवाचक नाहीं. ऐतिहासिक उल्लेखांपलीकडे या लोकांची फारशी माहिती उपलब्ध नसून त्यांचा वंशही निश्चित झालेला नाहीं. मग Scitas या शब्दांत वांशिक दृष्ट्या कांहींच अर्थ नाहीं. शिवाय आपल्या लोकांस Scito-dravidianos असें म्हणण्यास त्यांनीं जो आधार घेतला आहे (Braquicefalia) तो अगदींच निर्बल आहे. कारण, वंशनिश्चितीस कवटीचा व्यास (Indice cefálico) हें लक्षण गौण मानलें जात असून या बाबतींत मान्यतर समजलीं जाणारीं आपल्या लोकांचीं लक्षणें (Indice naso-malar ou órbito nasal) त्यांच्या सिद्धांतास विरोधक आहेत. वास्तविक त्यांना इतकें आडरानांत शिरण्याचें कारण नव्हतें. हिंदुस्थानांत प्रथम वायव्येकडून आलेले आर्य Dolicocéfalos होते, पण मध्य आशियांतून नंतर उतरलेले Braquicéfalos होते व ते गंगा-यमुनेचीं

खोरीं व्यापून काठेवाड, गुजरथ धरून कुर्गपर्यंत पसरले, या गोष्टी आज निर्विवाद समजल्या जात आहेत आणि त्यांसही त्या मान्य होत्या. तेव्हां Braquicefalia सारख्या वस्तुतः आमच्या पुराणसमजुतीस विरोधक नसलेल्या आणि त्यांतही गौण लक्षणावरून इकडील एकंदर लोकांचा व आर्यांचा संबंध तोडून टाकण्यांत Sir Risley यांनीं घाई केली असेंच म्हटलें पाहिजे. आजही कोठें कोठें या मताचा जाणून न जाणून उल्लेख केलेला आढळतो म्हणून हा येथें पाल्हाळ करावा लागला, इतकेंच.

कसेंही झालें तरी ही गोष्ट प्रस्तुत प्रश्नाच्या बाबतींत तेवढी महत्वाची नाहीं. कारण, आर्य काय किंवा द्रविड काय, उभय वंश आज भारतमातेचीं लेणीं झालेले आहेत. उच्चतम सौंदर्यानुभूति व तज्जन्य कलोत्पादन हीं हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत सर्वत्र पाहावयास मिळतात. खाटमंडू, नागडा, अबूपहाड, भुवनेश्वर धरून घारापुरी, कैलास, कार्ले, भाजें, अंजठा आणि तसेंच दक्षिणेस कांजीवरम्, विजयनगर, मदुरा, त्रिचनापल्ली, म्हैसूर, कुंभकोणम्, श्रीरंगम् वगैरेकडील कलाकृति, वरील दोन वंशांच्याच गुणनिदर्शक आहेत. त्यांच्यापैकीं कोणत्याही एकाला कलादृष्टीचें वावडें होतें, असें म्हणण्यास कांहींच कारण नाहीं.

या दृष्टीनें महाराष्ट्रीय जनतेचा अनुक्रम बराच खालीं लागतो, अशी समजूत आहे. "ज्ञानकोश"कार म्हणतात :–

"उच्चतम सौंदर्याभिरुचि महाराष्ट्रांत बेताबाताचीच आहे. त्यामुळें कलाकुसरीला वाव मिळाला नाहीं. महाराष्ट्रांत सोनार, सुतार किंवा शिल्पी कोठें नांवाजलेले दिसत नाहींत, याचेंही कारण हेंच. मराठ्यांच्या अमदानींत गुजराथी सुतार आणून राजवाडे, घरें बांधावीं हें सुप्रसिद्धच आहे. महाराष्ट्रीयांचे दागिने अगदीं सोधे असतात. त्यांचीं भांडीं, कपडे किंवा रोजच्या व्यवहारांतल्या वस्तु ओबडधोबड असतात, हें सांगावयास नकोच. संगीत, चित्रकला किंवा इतर ललितकला यांत महाराष्ट्रीय परावलंबी आहेत. नाट्यकला मात्र जरा पुढारलेली दिसते. कलांचे बाबतींत जे महाराष्ट्रीय मागासलेले आहेत त्याचें मुख्य कारण त्यांच्या सभोंवारचा राकट प्रदेश व निकृष्ट परिस्थिति हें होय."

या दुष्ट परिस्थितीचें कारण वंशभिन्नता आहे असें कांहीं त्यांचें म्हणणें नाहीं. याशिवाय "महाराष्ट्र" या शब्दाच्या त्यांच्या दुसरीकडे पाहावयास मिळणाऱ्या अभिप्रेत अर्थांत कोंकणचा समावेश होत नाहीं. वरील उताऱ्यांतील प्रदेशाच्या राकटपणाचा उल्लेखही हेंच दर्शवितो. तेव्हां गोमंतकाला त्यांचीं विधानें बाधूं शकत नाहींत. इतर तपशिलासंबंधीं पुढें लिहावयाचें असल्यानें आपण आतां गोमंतकाच्या पूर्वकालीन जीवनाकडे वळूं.

इ. स. पूर्व सात शतकेंपर्यंत आर्य लोक विंध्याद्रीच्या अलीकडे उतरले नव्हते, असें स्थूल मानानें गृहीत धरलें जातें. तरी ज्या आर्यांनीं नंतर आपली वस्ती या भागांत स्थिर केली त्यांचा किंवा द्रविडवंशीय जनतेचा सांस्कृतिक जीवनारंभ हिंदुस्थानांतील इतर कोणत्याही भागांतील लोकांइतकाच जुना आणि मनोविकास समप्रगल्भ असला पाहिजे.

पौराणिक श्रद्धाजन्य ग्रह सोडून दिले तरी जुन्या संस्कृत वाङ्मयांत जो कांहीं तरी पूर्णपणें ऐतिहासिक व विश्वसनीय स्वरूपाचा भाग असतोच, त्याच्या आधारावर आपल्या संस्कृतीचें प्राचीनत्व व महत्व सिद्ध आहे.

राजसत्ता, धार्मिक विकास व व्यापारी भरभराट या त्रयीच्या आश्रयाखालीं कलेची वेल

फुलत असते. पाश्चात्य लेखक त्याला Mecenatismo do poder, religião e comércio असें म्हणतात. गोमंतकाला हीं अंगें कितपत पोषक किंवा नाशक झालीं हें पाहावयाच्या हेतूनें आपल्या इतिहासाचें आलोचन केलें तर अनेक राजवंशांची कर्मभूमि, राजधान्यांचा प्रदेश, अनेक धर्मक्रांत्यांचें क्षेत्र आणि व्यापारी दळणवळणाचें पहिल्या प्रतीचें बंदर या नात्यांनीं गोमंतकाचें सामुदायिक जीवन येथील लोकांच्या कलासक्तीला पोषक झालें असलें पाहिजे, असें म्हणावेंसें वाटतें.

शिलाहार, कदंब, देवगिरीचे यादव, दिल्लीचे सुलतान, बहामनी शहा, विजयनगरचे राय, पुन्हा बहामनी शहा आणि शेवटीं विजापूरकर यांच्या राजवटींत, जवळजवळ आठ शतकांइतक्या दीर्घ कालखंडभर भोगलेल्या वैभवाबरोबरच परिस्थितीनें चारलेले लोखंडाचे चणेही त्यानें रगडले आहेत.

महंमद गवाननें विजयनगरच्या सत्तेखालील गोमंतक जिंकला त्यावेळीं जेत्यांनीं सात दिवसपर्यंत अपूर्व उत्सव केला (१४७०). आदिलशाहीला गोमंतकाचें महत्व सर्व दृष्टींनीं पटलें होतें. या शाहीचें चालून आलेलें राजधानीपद भोगण्याची संधि पोर्तुगिजांच्या बोलावून आणिलेल्या हल्ल्यामुळें गमावली असली तरी आल्बुकेर्कला प्रथमदर्शनींच गोवापुरीची "Mãe de tôda la India" (अखिल हिंदुस्थानची माता) करण्याची स्फूर्ति झाली. तिचा परिणाम असा झाला कीं, खुद्द लिज्बोवशीं तिची स्पर्धा! जवळजवळ दीड शतक सत्तेनें आणि ऐश्वर्यानें गोमंतक धुंद होता, असें म्हणण्यांत अतिशयोक्ति नाहीं.

वल्लीपत्तन (बाळळी), चंद्रपुर (चांदर), गोपकपत्तन (थोरलें गोवें), आदिलशाहीची दुय्यम राजधानी जुनें गोवें आणि त्याचेंच नवरूप पोर्तुगीज गोवें इतक्या राजधान्यांचा वैभवपूर्ण जीवनक्रम या लहानशा क्षेत्रांत साजरा झाला, याला इतिहास साक्षी आहे. Oliveira Martins म्हणतात कीं, पोर्तुगिजांनीं हिंदुस्थानाचें जें अपरिमित नुकसान केलें, त्याचा पुरा सूड त्यांस पूर्णपणें चैनबाज, ऐषआरामी आणि सुखलोलुप बनवून त्यानें घेतला. हे वैभवोपचाराचे धडे त्यांनीं विशेषतः याच भूमींत गिरविले असले पाहिजेत.

वर वर्णिलेल्या राजकीय पूर्वकालाचीं स्मृतिचिन्हें, वास्तु, शिल्प किंवा चित्र कृतींच्या अवशेषांच्या रूपानें आज पाहावयास मिळालीं असतीं तर या लेखांतील विधानांस जो प्रत्यक्ष आधार मिळाला असता तो दुर्दैवानें आज नष्ट झाला आहे.

हल्लींच चंद्रपुरास फादर हेरास यांनीं उत्खनन केलेलें एक शिवमंदिर व नंदीचे अवशेष, कारंबळीच्या ब्रह्मदेवासारखी एखादीदुसरी मूर्ति, S. Francisco de Assis व S. Caetano च्या जुन्या गोव्यांतील पुराणसंग्रहालयांत गोळा केलेले कांहीं किरकोळ मूर्तिखंड आणि जुनीं मंदिरें यांपलीकडे त्या काळचें उल्लेखनीय असें इकडे कांहींच राहिलेलें नाहीं. आणि जें राहिलें आहे तें कलादृष्टीनें तेवढें महत्वाचें नाहीं. परंतु मागाहून आलेल्या राज्यकर्त्यांनीं जुन्या कलाकृति, इमारती व वाङ्मय "परिश्रम"पूर्वक नष्ट केल्याचे उल्लेख मात्र भरपूर आढळतात. खुद्द पोर्तुगिजांच्या "पूर्वेकडील रोम"चे (जुन्या गोव्याचे) जे कांहीं अवशेष राहिले आहेत, तेसुद्धां त्या काळच्या वैभवाची व कलाकौशल्याच्या प्रगतीची पूर्ण कल्पना देण्यास पुरेसे नाहींत, असें इतिहासज्ञांचें म्हणणें आहे.

राजकीय तशाच धार्मिक क्रांत्याही ज्या या देशांत झाल्या त्यांचा या ठिकाणीं अवश्य उल्लेख

झाला पाहिजे. आर्यांचा वैदिक धर्म आणि द्रविडांचा वैतालिकी धर्म यांचा संगम त्या उभय धार्मिक संस्कृतींच्या मध्यभागीं असलेल्या या गोमंतकांत विशेष झाला आहे. येथील शाक्त व शैव दैवतें व धार्मिक आचार याची साक्ष देतील. ख्रिस्तजन्मकालाच्या सुमारास त्याला बौद्ध धर्माची दीक्षा मिळाली. त्यानंतर मूळच्या वेदधर्मी कदंबांनीं जैनधर्म स्वीकारून त्याच्या प्रसारासाठीं इकडील ब्राह्मणांना खूप छळल्याचा पुरावा "शणै गोंयबाब" यांनीं दिला आहे. मागाहून त्यांनीं नव्यानें वैदिक धर्म स्वीकारला. गोव्याचे शिलाहार वेदधर्मी होते, या इतिहासावरून गोमंतकानें वैदिक, बौद्ध, जैन हे धर्म पचविले आहेत, हें स्पष्ट दिसतें. आज मध्वाचार्यांचें द्वैत व शंकराचार्यांचें अद्वैत हीं येथें हातांत हात घालून नांदत आहेत. मुसल्मानी व ख्रिस्ती धर्मांची परदेशी प्रखर लज्जतही त्यानें ओळखली आहे. इतक्या या उलाढाली पचविल्याची खूण येथें सामान्यपणें दिसणाऱ्या परधर्म किंवा परपंथसहिष्णुतेंतही असूं शकेल.

गोमंतकाचें जुन्या काळचें व्यापारी महत्वही फार थोर होतें. Périplo चें "टिंडिस" बंदर हेंच Rennel च्या मतें गोवा बंदर होय. इतक्या प्राचीन कालापासून (ख्रिस्त शक १००) तें मलबार किनाऱ्याचें एक भूषण मानलें जात आहे. पोर्तुगिजांच्या वैभवकालांत तर पौर्वात्य राष्ट्रांचा युरोपशीं होणारा व्यापार गोव्यामार्फतच होत असे. तात्पर्य गोमंतकाचें व्यापारी महत्व पोर्तुगिजांच्या सत्तेचा ऱ्हास होऊन मुंबईचा उदय होईपर्यंत अबाधित होतें, हें सांगण्यास विशेष पुराव्यांची आवश्यकता दिसत नाहीं.

मलबार किनाऱ्यावरील मध्यवर्तित्वामुळें, प्रचंड व्यापारी दळणवळणामुळें, सर्वकाल केलेल्या परदेशगमनामुळें, पाश्चात्यांशीं आलेल्या खोल संबंधामुळें, राजकीय आणि धार्मिक उलाढालींच्या अप्रत्यक्ष परिणामांमुळें मागें सांगितलेल्या Mecenatismo do poder, da religião e do comércio गोमंतकास मिळाला असावा.

मानवी मन हें अथांग असल्यामुळें त्याला सागराची उपमा देतात. अशा असंख्य मानवी मनांच्या साकल्यानें बनलेल्या प्रकृतीस, अर्थात् एका समाजाच्या — दीर्घजीवी हिंदुस्थानांतील एका सर्वसंग्रही समाजाच्या — मनाला आकाशाचीही उपमा अपुरी पडेल! त्याला गवसणी कोणीं घालावी?

तरी येथील निसर्गसुंदर भूप्रदेश, कर्तृत्वशाली मानववंश, स्पृहणीय सांस्कृतिक जीवन हीं अंगें (Temperatura moral) गोमंतकीयांची कलात्म प्रकृति संपन्न होण्यास अनुकूल आहेत असें म्हटलें पाहिजे.

* * *

कला या सदरांत काय काय विषय घ्यावे, असा एक प्रश्न कदाचित् या ठिकाणीं उपस्थित होणें शक्य आहे. आपल्याकडील गीतं, वाद्यं, वाद्यं..... पासून वैतालिकी विद्याज्ञानं पर्यंत चौसष्ट कला प्रसिद्धच आहेत. त्यांत जे धंदे समाविष्ट केले आहेत त्यांचा विचार, अर्थातच, आम्हांस येथें कर्तव्य नाहीं.

तरी प्रचलित असलेल्या वर्गीकरणांपैकीं विशेष सुटसुटीत, साधें असें Lucílio Tarra यांचेंच वर्गीकरण आपण पसंत करून त्यांत कोणते कलाविषय संभवतात तें पाहूं.

कलांचे ते प्रथम दोन वर्ग पाडतात. एक स्थलविषयक भाव व्यक्त करणारा तर दुसरा कालविषयक भाव व्यक्त करणारा; एक चित्रणप्रधान तर दुसरा सूचकताप्रधान; एकाची मदार सौंदर्याविष्कार व आकारशुद्धि यांवर तर दुसऱ्याची तालबद्धता आणि संवेदनावाहकता यांवर; एक

दीर्घजीवी आणि वस्तुनिष्ठ कृतिप्रधान तर दुसरा अल्पजीवी व भावनिष्ठ कृतिप्रधान. पहिल्यांत वास्तु, शिल्प व चित्र या कला संभवतात तर दुसऱ्यांत नृत्य-नाट्य, संगीत व ललित वाङ्मय हे प्रकार समाविष्ट होतात.

एवढेच विषय प्रस्तुत विवेचनांत अभिप्रेत आहेत. तेव्हां त्यांमध्यें आपल्या बांधवांनीं काय कामगिरी करून दाखविली आहे तें पहाणें आपणास प्राप्त आहे.

* * *

प्रारंभीं एक गोष्ट सांगितली पाहिजे कीं, गोमंतकीयांच्या कर्तृत्वाला आजच्या गतवैभव मातृदेशाला अवसर नाहीं. त्यांच्या नैसर्गिक गुणांचें चीज व बोज व्हायला त्यांस मातृदेश सोडायाच लागतो. त्यावांचून त्यांच्या गुणांचा विकास होत नाहीं आणि त्यांवर मान्यतेचा शिक्काही पण बसत नाहीं. मातृदेशाबाहेर दूरवर जाऊन आपल्या गुणांचा उत्कर्ष करून घेण्यास लागणारी अनुकूल परिस्थिति शेंकडा कितीशा माणसांस लाभत असेल? त्यामुळें पुष्कळच कलाप्रवण माणसांची येथें कुचंबणा होते. त्यांच्या आकांक्षा गुदमरून जातात. केव्हां केव्हां अस्सल नाणें उकिरड्यावर पडलेलें आणि चिखलानें माखलेलें आढळतें. अशा परिस्थितींत यशस्वी बांधवांच्या गुणगौरवाचा आनंद सहृदय गोमंतकीयांस पूर्णपणें सुखावह होत नाहीं; कुठेतरी खुपल्यासारखें होतें, हा अनुभव पुष्कळांना असेल. असो.

वास्तु, शिल्प आणि चित्र या प्रथम वर्गांतर्गत प्रकारांपैकीं वास्तुकला ही आज विभागली गेली आहे. वास्तुकलाकृति या मोठें भांडवल, राजाश्रय आणि उपयुक्तताजन्य प्रयोजन यांविना निपजूं शकत नाहींत. आज या क्षेत्रांत भांडवलशाहीची सत्ता आणि श्रम-विभागाचें तत्व शिरलें असल्यानें तिच्यांतील कलेच्या स्वरूपाचा भाग, शिल्प आणि चित्र या कलांनीं आक्रमिलेला आढळतो. आणि उरलेला कारागिरांच्या व्यवसायांत येतो. भांडवलशाहीला जपानांत, युरोपांत किंवा अमेरिकेंत राहून येथील धंदे व त्यांस संलग्न असलेले कलाप्रकारही बुडविता येतात. त्यामुळें आजच्या या यंत्रयुगांत या कलेच्या उरलेल्यापैकीं एक भाग भांडवलशाहीनें आणि दुसरा शास्त्रीय तंत्रानें (Técnica científica) बळकावलेला दिसतो.

तरी इकडील कारागीर फार कुशल म्हणून नांवाजलेले असून त्यांस सर्वत्र मागणी असते. आणि आपल्या लोकांच्या – विशेषेंकरून ख्रिस्ती जनतेच्या – वास्तुविषयक आवडीनिवडी अभिजात कोटींतील असतात. या म्हणण्याचें प्रत्यंतर येथील घरें, चर्चें, देवालयें, शहररचना, वगैरे वास्तुविशेष वरवर पाहाणाऱ्यालासुद्धां सहज मिळूं शकेल.

इकडील इतर कारागिरांविषयींही तेंच सांगतां येईल. गोमंतकीय सोनारांची कीर्ति पोर्तुगालपर्यंत पसरली आहे. धार्मिक छळाच्या कालांत जुन्या काबिजादींतून हिंदूंस हुसकून लावण्यांत आलें तरी सोनारांस आणि वैद्यांस मात्र विशेष परवानगीची सवलत ठेवण्यांत आली असल्याचा उल्लेख इतिहासांतही मिळतो. इकडील सुतारकामही प्रेक्षणीय होतें. चंदनी किंवा इतर लांकडावर केलेल्या येथील नक्षीच्या कामास युरोपियनांकडून फार मागणी आहे. हस्तिदंती मूर्तींचीं कामें येथें फार सुबक होत असत. आज परदेशी नकली मालाच्या सवंगपणामुळें या कलेस अवनति आली आहे. उद्यां जपानांतून गणपतीच्या मूर्तींचा पुरवठा अल्प खर्चांत होऊं लागला तर शाडूंच्या मूर्ती करणाऱ्या आजच्या कलावंतांवर जपानी मालाचीं दुकानें काढण्याचा प्रसंग ओढवणें संभवनीय आहे.

तथापि शिल्पकार किंवा मूर्तिकार या नात्यानें गोमंतकीयांचा कस कुठवर लागूं शकतो याचें उदाहरण म्हणून **श्री. रामचंद्र पां. कामत** यांचें नांव मोठ्या अभिमानानें आपणास पुढें करतां येईल. अखिल भारताचे "रॉयल अॅकॅडमी ऑफ आर्ट्स्-लंडन"चे पहिले सुवर्णपदक-विभूषित कलावान्, भारतीय प्रतीकात्मक कलेचे आधुनिक प्रतिनिधि, गोमंतकीय आहेत!

चित्रकलेच्या रंगणांतही गोमंतकीयांचें स्थान असेंच मानाचें आहे. तिच्या कोणत्याही दालनांत त्यांना परकेपणा वाटत नाहीं. वास्तवदर्शन पद्धतींत जसा **A. X. Trindade** यांचा कुंचला अतुल सामर्थ्य प्रकट करतो तसाच ध्येयदर्शन पद्धतींत **श्री. र. गो. चिमुलकर** यांचा हात अत्यंत विशाल आणि गहन सत्यांवरील वास्तवतेचें आवरण फेडून त्यांचें चिरंतन सौंदर्य उकलून दाखवूं शकतो. आणि म्हादोळसारख्या गरीब खेड्यांत फुल-माळ्याचा पिढीजाद धंदा करणारा एक तरुण **श्री. पांडुरंग नाईक**, "सिनेफोटोग्राफी"मध्ये पहिल्या प्रतीच्या स्थानावर गोमंतकाचा हक्क सांगतो. कलागुणांची विविधता व उत्कटता या दोन्ही दृष्टींनीं मातृभूमीचें सामर्थ्य व्यक्त करणारे कितीतरी कलावान् गोमंतकाच्या कुशीस आले आहेत. या लेखाच्या मर्यादेंत त्यांच्या कर्तृत्वाचा परामर्ष घेणें शक्य नसलें तरी अभ्यासू वाचकांच्या सोईसाठीं व सामान्य वाचकाला गोमंतकाच्या कलाकर्तृत्वाची थोडीफार अटकळ करतां येण्यासाठीं, लेखाच्या शेवटीं त्यांच्या प्रमुख गुणनिर्देशासह दिलेली नामावली पहावी. कारण लेखकाला विशेष खोलांत शिरावयाचें नाहीं. एक तर त्यांच्या कलेची चर्चा करण्याचें हें स्थल नव्हे आणि दुसरें त्यासाठीं लागणाऱ्या पात्रतेचाही लेखकाच्या ठिकाणीं अभाव आहे.

या पहिल्या वर्गातील (वास्तु, शिल्प, चित्र) प्रकारांचें साकल्यानें आलोचन केलें तर गोमंतकांत आपणास काय दिसतें, हें पाहिलें पाहिजे. जुन्या काळच्या अवशेषांत बुद्धकालीन व दक्षिणेकडील द्रविड संस्कृति दर्शविणारे कांहीं मूर्तिखंड व रचना सांपडतात. तरी आजच्या गोमंतकांत जे वस्तुविशेष प्रेक्षणीय या विशेषणास पात्र दिसतात त्यांवर मुसलमानी नाहींतर पाश्चात्य कलेची छाप अधिक दिसते. ख्रिस्ती लोकांचीं चर्चें वगैरे तर पूर्णपणें पाश्चात्य पद्धतीचीं आहेत. शिवाय एकंदर जीवनांत जी सौंदर्यदृष्टि प्रबळ दिसते तींत – हिंदु धार्मिक जीवनांतील पारंपरिक स्वरूपाचा भाग सोडून दिला तर – पाश्चात्यांच्याच सौंदर्यदृष्टीचा प्रभाव व्यक्त होतो.

पोर्तुगिजांशीं समरस झालेल्या ख्रिस्ती बांधवांच्या उच्च अभिरुचीचा व साहचर्याचा हा परिणाम आहे, यांत संदेह नाहीं. सामान्यपणें गोमंतकीय लोक स्वतःस कोणत्या ठराविक सांच्यांत कोंडून घेतील असें होणार नाहीं. मग तो गुण असो नाहींतर अवगुण ठरो. पण त्यांच्यांत सर्वसंग्राहक वृत्ति फार दिसते. आमच्या ख्रिस्ती बांधवांची समरसक्षमता (Poder de adaptabilidade) ज्यांनीं अभ्यासिली असेल त्यांस ही गोष्ट विशद करून सांगण्याची आवश्यकता नाहीं. तात्पर्य, सर्वसंग्रही सूर्यप्रकाशांतील हवा तो रंग ज्याप्रमाणें एखाद्या लोलकांतून योग्य पृथक्करणक्रियेच्या द्वारा घेतां येतो, त्याचप्रमाणें योग्य संस्कारानें गोमंतकीयांतून हवा त्या गुणाचा विकास करून घेतां येतो. या मनोवृत्तीस व्यवहारांत पाण्याची उपमा देतात. "पानी तेरा रंग कैसा? जिसमें मिलावे वैसा" अशीच गोष्ट आपल्या लोकांची सांगतां येईल.

तथापि आपल्या बऱ्याच जातिवंत कलावानांच्या आवडींत भारतीय विशेषांचें ठळक प्रतिबिंब आढळतें, हें विसरून चालणार नाहीं. मुंबईस असतां ग्रीक पद्धतीच्या उत्तम कला-

कृतींमुळें प्रशंसेस पात्र झालेले शिल्पकार कामत लंडनास जाऊन हिंदी प्रतीकात्मक कलेकडे वळतात हें कदाचित्, आत्मीयतेचें आकर्षण आकृष्ट विषयांमधील अंतराशीं व्यस्त प्रमाणांत असतें, या नियमाची साक्ष देत असेल. तरीही श्री. कामत, श्री. चिमुलकर, Sr. Fonseca यांच्या कलाकृतींत जी तीच आवड प्रतीत होते ती केवळ "फॅशन" आहे, असें म्हणवत नाहीं. एका फ्रेंच लेखकाच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे, ती ओढ कदाचित् "गतात्म्यांच्या दीर्घ हांकेचा सर्वंजय प्रतिध्वनि" (L'echo souverain de la grande voix des morts) असणें अधिक संभवनीय आहे.

दुसरा वर्ग भावनिष्ठ कृतिप्रधान कलांचा (गायन-वादन, नृत्य-नाट्य व ललित वाङ्मय). यांपैकीं शेवटचा ललित वाङ्मय हा प्रकार सोडून इतरांचा येथें परामर्ष घेऊं आणि विवेचनाच्या सोयीसाठीं गायन-वादनाचा एक आणि नृत्य व नाट्याभिनयाचा दुसरा असे त्यांमध्यें पोटभेद पाडूं.

गोमंतकीय गायकांचें वैशिष्ट्य असें सांगतात कीं, तालदस्तपणा हा त्यांचा सर्वसामान्यपणें प्रमुख गुण असतो. आणि याचें कारण म्हणून आपल्या प्रांतांत "घुमट" वादनाचा जो प्रसार व आवड दिसून येते तिच्याकडे बोट दाखविलें जातें. कदाचित् तसेंही असूं शकेल. जन्माच्या सहाव्या दिवशीं जी पहिलीच तडफदार छाप गोमंतकीयांच्या कानावर पडते ती बहुतेक "घुमटा" चीच असते, हें खरें आहे. अगदीं अलीकडेपर्यंत केवळ वादनव्यवसायी मंडळींतच नव्हे तर श्री. सरदेसाई, श्री. केंकरे, श्री. सांवर्डेकर, श्री. काणे, श्री. हेगडे अशा खानदानीच्या घराण्यांतसुद्धां हें घुमटवादनाचें प्रस्थ फार होतें. आज त्याला आळा बसलेला असला तरी त्या वादनाचे शौकी या प्रांतांत, बरेच आढळतात. परंतु या बाबतींत कार्यकारणभाव पाहूं नये, केवळ संयोगस्थळ तेवढें लक्षांत ठेवावें, हें मागें सांगितलेंच आहे. शिवाय घुमटवादनाचा शौक येथेंच कां असावा, हा प्रश्न शिल्लक राहातोच! असो.

गायनाच्या क्षेत्रांत गोमंतकाचें यश गावें तितकें थोडेंच होईल. **प्रो. रामकृष्णबुवा वझे** यांच्यासारखे अखिल भारतीय कीर्ति जोडणारे गायनगुरु, **कै. बाबलीबाई पालकर** किंवा **श्री. केसरबाई केरकर** यांच्यासारख्या गायिका, **कै. प्रो. मुरारबा पेडणेकर** यांच्यासारखे वादनाचार्य किंवा **प्रो. खांपरूजी पर्वतकर**सारखे अद्वितीय तालज्ञ ज्या प्रांतांत जन्माला आले, त्याच्या अलौकिक कलात्मतेविषयीं कोण संशय घेईल?

या कलाविशेषांत जे इतर गायक, गायिका किंवा वादनकुशल कलावान् अपूर्व तेजानें चमकत आहेत त्यांचा अल्प नाम-गुण-निर्देश या लेखाच्या शेवटीं केला आहे तो वाचकांनीं अवश्य नजरेखालीं घालावा.

गोमंतकीयांचें वादनकौशल्य हा एक खरोखरच आश्चर्याचा विषय आहे. बहुतेक परगुणासहिष्णु असणारे हरिदासही या गोष्टीची साक्ष देतील.

कलेच्या या दालनांतून दुसरीकडे वळण्यापूर्वी, गोमंतकीयेतर सोडाच पण खुद्द गोमंतकीय बहुसंख्य हिंदूंना अज्ञात अशा आपल्या ख्रिस्ती बांधवांच्या योग्यतेचें स्वरूप आपणास पाहिलें पाहिजे. चित्र-शिल्पादि कलेंत कीर्तिविभूषित अशीं त्यांचीं अनेक नांवें आपल्या परिचयाचीं आहेत. त्यांच्या कलेशीं आणि नांवांशीं कमीअधिक प्रमाणांत हिंदु लोकांचा संबंध आल्याशिवाय राहात नाहीं. परंतु, संगीताच्या प्रांगणांत त्यांनीं परिस्थित्यनुसार सवता सुभा निर्माण केल्यामुळें ते आम्हांस जवळजवळ अज्ञात राहिले आहेत.

चित्र-शिल्पादि कलांची विश्वस्पर्शी भाषा मनुष्यांनाच काय पण पशुपक्ष्यांनासुद्धां ज्ञात असते. पण त्या मानानें संगीत हें विजातीय मनोवृत्ति तल्लीन करूं शकत नाहीं. फार तर क्षणभर आकर्षूं शकेल, इतकेंच. यामुळें परस्परांच्या संगीतकलांविषयीं हिंदु व ख्रिस्ती या समाजांमध्यें सामान्यपणें अज्ञानजन्य तिटकारा असलेला दिसतो. परंतु, ज्या हिंदूंना पाश्चात्य गुणग्राहक कलाचतुरांनीं आपल्या ख्रिस्ती बांधवांना Italianos do Oriente म्हणजे "पूर्वेकडील इतालियन" ही पदवी बहाल केलेली माहीत आहे आणि, ही थोर योग्यता ज्या निसर्गदत्त गुणांमुळें त्यांस प्राप्त झाली ते गुण येथील उभय समाजांची सामायिक संपत्ति असल्याची जाणीव ज्या ख्रिस्त्यांची बुजालेली नाहीं, त्यांना वर सांगितलेल्या तिटकाऱ्याचें प्रदर्शन दुःखद होत असल्यास काय नवल?

या वर्गांतील कलाप्रकारांत नृत्यकला हा एक आजवाढत्या महत्वाचा प्रकार गणला पाहिजे. वास्तविक नृत्य हें संगीताची जननी आहे. नृत्यानंदाचें आदिकारण जें लय-साधन त्याचेंच संगीत हें उच्चतर स्वरूप होय. तथापि आजची नृत्यकला ही संगीत व अभिनय यांच्या परिवेषांत नियमबद्ध व आकारशुद्ध हालचालींतून रस व भाव यांचें प्रकटीकरण साधणारी फार कठीण कला बनली आहे. या दुर्गम प्रदेशांतही गोमंतकीय नृत्यांगनांनीं स्पृहणीय कीर्ति मिळविली आहे. **कै. बाबलीबाई मालपेकर** किंवा **श्री. सरस्वतीबाई वेलिंगकर** यांसारखीं नांवें भूषणभूत म्हणून येथें उल्लेखितां येतील.

यापुढें ज्या कलेमध्यें अनेक कलांचा सुंदर संगम झालेला दिसतो त्या नाट्यकलेकडे आपणास वळलें पाहिजे.

नट म्हटला कीं आम्हांस Dr. Azevedo Neves यांच्या पुढील शब्दांची आठवण होते.

Do actor, mais ainda do que do orador, nada fica além do nome; as suas palavras leva-as o vento; os seus gestos perdem-se. Tudo se vai delindo e esfumando na retentiva dos contemporâneos, tudo desaparece, tudo se oblitera. A vida do actor é uma gôta de água que a terra absorve.

Dr. Azevedo Neves हे विश्वविद्यालयाचे आयुर्वेदाचार्य असतां, एका नटाच्या (Augusto Rosa) मुद्राभिनयानें आणि अंगविक्षेपानें भाळून जाऊन (मग तो कितीही लोकोत्तर असला म्हणून काय झालें?) त्यावर त्यांनीं स्वतः एक ग्रंथ लिहावा, हें पुष्कळ तत्वज्ञानजड पंडितांना कसेंसेंच वाटेल. परंतु याबद्दल इतरांना वाईट वाटण्याचें कारण नाहीं. Cavour सारखा राजकारणी पुरुष, सौंदर्य आणि कला या गोष्टींचा आपल्यावर मुळींच परिणाम होत नाहीं, अशी स्वमुखानें कबुली देतो. Humphray Davy ला Venus de Milo च्या पुतळ्यांत उत्तम चुनखडी दगड (Carbonato de cálcio) तेवढाच दिसला. इतकेंच नाहीं Goncourt बंधु, Gauthier, Balzac, Hugo, Lamartine सारख्या वाङ्मयवीरांना कांहीं कलाविषयांत सदभिरुचीच नव्हती, हें प्रसिद्ध आहे. असो.

Azevedo Neves स्वतः या "नसत्या फंदांत" पडून इतरांस काय उपदेश करतात पाहा.

Cumpre aos outros grandes artistas das belas artes, levar à memória das gerações futuras

ó colega ilustre, cuja obra se apagará com a morte. Representem-no nos seus papéis, com a forma do gesto e a côr do rosto e do trajo, já que não podem esculpir no mármore, nem transportar à tela, e bem o mereciam, as inflexões preciosas, múltiplas e variadíssimas da sua voz, que dá realce à poesia e que na prosa descobre reconditas belezas.

जो भाग्यशाली नट, Columbano Bordalo Pinheiro, Rafael Bordalo Pinheiro, Roque Gameiro, Teixeira Lopes, अशा यशस्वी कलावंतांच्या हातीं अमरत्व पावला, ज्याच्या वांड्मय Dr. Azevedo Neves सारख्या रसिक शारीरशास्त्रविशारदाकडून "मुद्रा व भावनाविष्काराच्या बाबतींत शास्त्र व कला या दोन्ही दृष्टींनी इतकी संपूर्ण प्रकटीकरणशक्ति आपण पाहिली नाहीं" असें म्हणून घेण्याचें भाग्य आलें, त्याच्या संबंधानें तरी, "A vida do actor é uma gota de água que a terra absorve" असें म्हणण्याची गरज नाहीं.

आपल्या गोमंतकांत मात्र गेल्या पिढींतील नटांच्या बाबतींत (नटांच्याच कां ? एकंदर कलावानांच्या, असेंच म्हणतां येईल) ही गोष्ट अक्षरशः अनुभवास आली आहे. आणि आजही या वीतभर प्रांतांत इतक्या उच्च प्रतीच्या नटप्रकृति आढळून येतात कीं त्यांबद्दल अभिमान बाळगण्यापेक्षां त्यांचें योग्य चीज होत नसल्याबद्दल खेद मानणेंच अधिक योग्य होईल. या ओळी लिहितेवेळीं **कै. माधव विठ्ठल शिरोडकर** या दिवंगत नटाच्या स्मृतिसमाधीवर दोन शब्द वाहाणें मला योग्य वाटतें. महाराष्ट्रांत त्यांच्या "महाराणा प्रतापसिंहा"च्या भूमिकेनें एक वेळ उत्तम लौकिक मिळविला होता असें ऐकतों. परंतु त्यांच्या गुणांची खरी किंमत झाली नाहीं. बरींच वर्षें झालीं, त्यांच्या गांवीं (शिरोडा-फोंडा) 'चारुदत्ता'च्या भूमिकेंत रंगभूमीवर चढत असतां त्यांनीं तोंडास रंगसफेती मुळींच न चोपडलेली पाहून एका "शौकी" गृहस्थानें "अं ? रंग नाहीं फासला ?" असा डोळे विस्फारून त्यांना प्रश्न केला. "छे, छे, चारुदत्ताच्या चेहऱ्यावरील उदात्त, रसिक, कुलीन, शालीन, वत्सल, करुण, इत्यादि सूक्ष्म भाव न बुजविण्याइतका पारदर्शक रंग अजून तयार झालेला नाहीं" असें स्मितपूर्वक उत्तर देऊन ते रंगभूमीवर आले. त्यानंतर बरेच "नटवर्य" चारुदत्ताच्या भूमिकेंत आम्हीं पाहिले. पण कै. माधवबुवांची ती धीरोदात्त करुण मुद्रा त्या एकांतही दिसली नाहीं. त्यांची आठवण झाली म्हणजे "नटाचें जीवित हें जमिनीवर पडलेल्या पाण्याच्या थेंबासारखें आहे." हें Dr. Azevedo Neves यांचें वाक्य गोमंतकाच्या बाबतींत तरी पुष्कळ वेळां खरें असलें पाहिजे याची साक्ष पटते. असो.

आजच्या नाट्यसृष्टींत (चलच्चित्रपटांसह) अनेक गोमंतकीय नटनटी पूर्ण तेजानें चमकत आहेत. **श्री. दिनानाथ मंगेशकर, श्री. रघुवीर सावकार, श्री. गोविंद माशेलकर, श्री. दुर्गा केळेकर** (ज्योत्स्ना भोळे) **श्री. विठा धारगळकर** (मिस रत्नप्रभा), इत्यादि नांवें कोणाच्या ओळखीचीं नाहींत ? यांशिवाय इतर अनेक यशस्वी नांवें लेखाच्या शेवटील नांवनिशींत वाचकाला पाहावयास मिळतील. तथापि ज्याला गोमंतकाच्या नाट्यप्रकृतीच्या विस्ताराची खरी कल्पना करून घ्यावयाची असेल त्यांनीं, इकडील उत्सवांत होणाऱ्या नाट्यप्रयोगांत, केवळ Amadores या नात्यानें करण्यांत येणाऱ्या भूमिका पाहिल्या

सारस्वत ब्राह्मण समाजाच्या वार्षिकोत्सवांचे अध्यक्ष

श्री. विष्णु रामचंद्र नायक
(१९१३)

श्री. विनायक बाळकृष्ण रेगे
(१९१४)

श्री. कृष्णराव नारायण पै
(१९१५)

प. वा. बाबै भगवंत नायक
(१९१७)

भि. रामचंद्र वामन नाईक करंडे शास्त्री
(१९१८)

GOMANTAK BOMBAY. 4.

वांचून राहूं नये, अशी सूचना करावीशी वाटते.

गोमंतकीयांची कलात्म प्रकृति स्वभावतः इतकी संपन्न व समृद्ध असूनही ललित वाङ्मयांतील त्यांचें कार्य अन्य कलांतील कार्याइतकें भरीव व हृदयस्पर्शी नाहीं हें कबूल करणें भाग आहे. मात्र उच्च वाङ्मयनिर्मितीला लागणाऱ्या कला-गुणांचा अपुरेपणा या गोष्टीला कारण झालेला आहे, असें म्हणवत नाहीं. दुर्दैवानें गोमंतकी-याला स्वभाषेला मुकावें लागलें आहे. ख्रिस्ती मनुष्य परकीय संस्कृतीचा दत्तक झाल्यामुळें आपल्या मायबोलीला आंचवला आहे तर हिंदु त्याच्या मायबोलीला क्षेत्र नसल्यामुळें मराठीची उसनवारी करीत आहे. त्याच्या बौद्धिक प्रगतीला विरोधक होण्याइतकी मराठी त्याला परकी नसली तरी भावनांची सजीव रंगत करण्यास लागणारा जातिवंत, रसपूर्ण शब्दसमुच्चय (Vocabulário emotivo) स्फुरणें अवश्य असल्यावेळीं हें उसनें अवसान टिकत नाहीं. आणि म्हणूनच या प्रांगणांत पदोपदीं ठेंचाळलेली त्याची भावना स्वैरसंचार करूं शकत नाहीं. असें असलें तरी ललित वाङ्म-याच्या सेवेला वाहून घेतलेल्या आपल्या हिंदु किंवा ख्रिस्ती बांधवांच्या कार्याकडे दृष्टिक्षेप टाकला तर तें वैशिष्ट्यपूर्ण व अभिनंदनीय असल्याचें दिसून येईल. विशेषतः ललित वाङ्मयांतील इतर कोणत्याही प्रकारापेक्षां काव्य-प्रकारावरील त्यांचें स्वामित्व विशेष प्रत्ययास येतें. स्वर व ताल यांचें स्वाभाविक आकर्षण हेंही कदाचित् त्यांचें कारण असूं शकेल. या अंगाचा विचार "गोमंतकाची वाङ्मयसेवा" या प्रकरणांत होणें योग्य असल्यामुळें एवढ्यांतच त्याचा संक्षेप करणें उचित आहे.

* * *

येथवर केलेल्या विवेचनावरून गोमंत-कीयाच्या स्पृहणीय कलात्म प्रकृतीला कारण झालेल्या घटकांची आणि तिच्या व्यक्त रूप-रेषेची योग्य अटकळ चतुर वाचकाला होईलच. येथील निसर्गश्रीचे वस्तुगत धर्म व कलावंताचे व्यक्तिगत मनोधर्म यांतील सुसंवाद त्यास त्या रूपरेषेंत पहावयास मिळतील. इकडील आकाशाची रंगकांति, सागराची विशालता, निसर्गाचें रचनासौष्ठव, फुलांफळांचें मनोहारित्व व तृणपर्णांचें रूपसौंदर्य त्याच्या कुंचल्याचें सामर्थ्य इतकें प्रभावी बनवीत असेल तर निर्झरांची झुळझुळ, पर्जन्याची सळसळ, वृक्ष-लतांचें आंदोलन व पक्ष्यांची किलबील यांतील अक्षय्य लय त्याच्या गळ्यांत उतरत असेल आणि विद्युल्लतेची चमचम, विहंगमांचें चांचल्य, मेघांचें गांभीर्य व वसंताचें हास्य त्याच्या नृत्याभिनयांत स्फुरत असेल!

पूर्व वैभवांकित जीवनाची स्मृति कौटुंबिक मंगलकार्यांत व देवतांच्या मिरवणुकीच्या सोहा-ळ्यांत तो जागृत ठेवील असेल तर परंपरागत औदार्याची खूण त्याच्या प्रेमळ व आतिथ्यशील वृत्तींत व्यक्त होत असेल.....

या दिशेनें विचार करूं गेल्यास असें दिसून येईल कीं, मागें वर्णिलेल्या दीर्घकालीन राजकीय, धार्मिक व सामाजिक जीवनामुळें त्याचें मन खोलवर ढवळून निघालें आहे. मानव्याच्या कोणत्याही हाकेला तें ओ देऊं शकतें. देशीय मर्यादांनीं त्याच्या अनुभूतीला आळा बसत नाहीं. आणि विश्वभर पसरलेल्या विराट् व अथांग मानवी मनाचा शोध घेऊन त्यांतील चिरंतन सत्यें हाताळणें त्याला अशक्य होत नाहीं.

मात्र खुद्द गोमंतकांत त्याच्या या गुणांचा प्रकाश पडत नाहीं.

या दृष्टीनें येथील दृश्य कांहींसें विरोधी आहे असें म्हटलें पाहिजे.

उत्तर व दक्षिण या दिशांनीं आपल्या मातृभूमीस स्वाभाविक अशा सीमा नाहींतच. तेव्हां गोमंतक-दर्शनाचे राजमार्ग दोनच

राहातात. एक पूर्वेकडील स्थलमार्ग आणि दुसरा पश्चिमेकडील जलमार्ग. दोन्ही उदात्त आणि सुंदर दृश्यांनीं अलंकृत आहेत. एकंदर गोमंतकाचा रम्य प्रदेश आकलन करतां येईल इतकी दृष्टि व हृदय उंचावून कोणी मांडवी-अघनाशिनीच्या संगमावर उभा राहील तर दोहों बाजूंला कोसांनीं मोजाव्या लागणाऱ्या पांढऱ्या शुभ्र समुद्रकिनाऱ्यांची रांगोळी, आग्वाद-मुरगांवच्या तिवईवर उभारलेल्या दीपस्तंभांच्या समया, जागोजाग पसरलेलें सरिताजाल व अंथरलेले हरितवर्ण गालिचे, कुळागरांचे व नारळीबागांचे मांडव व पलीकडे दूधसागरानें उंच उभारलेली अमृतधार, हा सगळा थाट निसर्गदेवतेनें कोणाच्या पूजनासाठीं चालविला होता बरें? असा प्रश्न त्याच्या हृदयांत जागृत झाल्यावांचून राहाणार नाहीं. कारण निसर्गश्रीचें तें दैवत आज स्वस्थानावर नाहीं.

विंध्याद्रीपलीकडील कालीमाता येथें येऊन लक्ष्मीसरस्वतीचीं रूपें नटली होती. हो, होती. प्रस्तुत ती चंचल लक्ष्मी येथून दुसरीकडे गेली आहे. गोमंतकाचा वैभवदीप आज निस्तेज आहे. त्याची व्यापारी भरभराट आज केवळ स्मृतिशेष तेवढी राहिली आहे. अशा रीतीनें पेठ बदलल्यामुळें सरस्वतीला आपले गुण पटवायला अखिल हिंदुस्थानचीच नव्हे तर परदेशाचीसुद्धां वारी करावी लागते. येथील हिंदु कलावान् बाहेर अमुक ठिकाणीं प्रसिद्ध आहेत किंवा ख्रिस्ती कलाचतुरांना "Italianos do Oriente" या नांवानें बाहेर संबोधिलें जातें, असा दाखला आज पुढें करावा लागतो. आणि म्हणूनच आपल्या गुणवंत बांधवांच्या कपाळीं परदेश लिहिलेला आढळतो.

या परिस्थितीमुळें, एखादे वेळीं, वधूवरें उठून गेल्यानंतर "सव्या"वर भटजीनें घोरत पडावें, त्यासारखें दृश्य येथें दिसतें. परंतु ही मंगलभूमि गुणखाणी आहे हें रसिकांनीं विसरून चालणार नाहीं. दागिन्यांची किंमत जाणणारानें सोनें कुठें पिकतें हें न जाणून कसें चालेल?

वैभवकाळीं पोर्तुगीज लोक गोवा नगरीला "पूर्वेकडील मोतीं" (Pérola do Oriente) म्हणत असत. आजच्या पडत्या काळांत हें नांव उपहासाचा विषय झाल्यास नवल नाहीं. कारण दुर्दैवानें तें मोतीं गळून आज शिंपला तेवढा राहिला आहे. गोवा बेटाचा किंवा सध्याच्या गोमंतकाचा भौगोलिक आकार कोणी नजरेसमोर आणील तर अरबी समुद्राच्या किनाऱ्यावर पडलेल्या शिंपल्याची त्यास दिलेली ही उपमा त्याला योग्यच वाटेल. असो. पण मोतीं हरवलें त्याचें काय?

स्वाति नक्षत्राचा पर्जन्य बसल्या ठिकाणीं मोतीं उत्पन्न करतो ही शिळी कल्पना आज आपण त्यजिली पाहिजे. आणि शिंपल्यांत जगणारा जीव एका विशिष्ट क्लेशकारक तळमळीनें शिणून अखिल जगाच्या सौंदर्यदृष्टीला शिरोधार्य वाटणारा मौक्तिकबिंदु प्रसवत असतो, या सत्य घटनेस अनुसरलें पाहिजे. गोमंतकाच्या या शिंपल्यांत जगणारा जीवात्मा आत्मप्रत्ययाच्या हांकेनें जागृत होऊन आणि तज्जन्य भावनाकुलतेच्या तीव्र आंचेनें द्रवून अमोल मौक्तिकतुल्य गुण प्रसवत राहील तर आपलें मानाचें स्थान त्याला अढळ राखतां येईल.

"अहिच्छत्रां"तून किंवा कुठून तरी उचलून आणिलेल्या कुलदैवतांबरोबरच आपल्या रक्तांतून नकळत आलेलें आणि या पुण्यक्षेत्रांत स्थापन झालेलें आम्हां अखिल गोमंतकीयांचें एक कुलदैवत आपल्या हृदयाच्या देव्हाऱ्यांत सदैव जागत आहे. कोणत्याही धर्मक्रांतीला तें बाटवतां येणार नाहीं. केवळ्याही साम्राज्यशाहीला त्यावरील आपली महाजनीय सत्ता

नाकबूल करतां येणार नाहीं. मात्र या सत्यावर आत्मविस्मृतीचें पाणी आपण सोडतां नये. ही आत्मश्लाघा नाहीं. कुणाची खुशामत तर नाहींच नाहीं. केवळ स्वबांधवांस आत्मगुण-निरीक्षणास प्रवृत्त करण्यासाठीं केलेला अल्प प्रयत्न आहे. तरी,

"शेवटीं, या सर्वांच्या जोडीस, या प्रदेशाचें प्रबलतर असें उत्कर्षाचें साधन आणि महत्तम संपत्ति येथील रहिवासी जनतेंत आहे."

हें या लेखाच्या शिरोभागीं दिलेलें Dr. Jaime de Morais यांचें वाक्य कोणासही सत्यपूर्ण वाटेल अशी खात्री वाटते.

गोमंतकीय कलावंतांची नामावली

प्रस्तुत नामावलीसंबंधानें एक गोष्ट येथें अवश्य सांगावीशी वाटते ती हीच कीं, निरनिराळ्या कलाविशेषांत गोमंतकीयांच्या कार्याचा विस्तार व खोली (Extensão e intensidade) लक्षांत यावी या दृष्टीनें ती तयार करण्यांत आली असल्यानें, तींत, आपल्या कलागुणांनीं उच्चतम कीर्ति मिळविलेल्या नांवांबरोबरच कोणत्या ना कोणत्या तरी विशेषामुळें प्रसिद्धीस आलेल्या आणि नव्या पिढींतील उदयोन्मुख अशा कलावानांचीं मिळतील तेवढीं नांवें समाविष्ट करण्यांत आलीं आहेत. मुद्दाम ज्येष्ठ व श्रेष्ठ म्हणून एखादेंदुसरें नांव प्रथम देण्यांत आलें असलें तरी त्यांमधील अनुक्रमांत योग्यतासूचक अनुक्रम – मग तो कोणत्याही दृष्टीनें असो – वाचकांनीं पाहूं नये. गैर-माहितीमुळें आणि साधनांच्या अभावामुळें ही नामावली अपूर्ण आहे, याची पूर्ण जाणीव लेखकाला आहे. तथापि ती तयार करण्याच्या बाबतींत शक्य तो प्रयत्न करण्यांत त्यानें मुळींच कसूर केलेली नाहीं.

गायनकला

प्रो. रामकृष्णबुवा वझे — अखिल भारतीय कीर्ति जोडणारे गायनगुरु. ठुंबरी-गायनाचा रसपूर्ण अस्सल ढंग आज त्यांजकडूनच ऐकावा. त्यांचे गुरु निसार हुसेनखांसाहेब, ग्वाल्हेर, हे होत.

श्री. शिवरामपंत वझे — उल्लेखित वझे-बुवांचे चिरंजीव आणि शिष्य. वडिलांची कीर्ति खात्रीनें पुढें चालवितील.

श्री. अनंतबुवा दामले — वझेबुवांचे शिष्य व एक प्रख्यात गवई.

प.वा. नागलीबाई शिरोडकर — एक सुविख्यात गायिका.

प. वा. बाबलीबाई पालकर — मुंबई, मद्रास, कलकत्ता व प्रमुख संस्थानांतून नांवाजलेली गायिका. भावनगर संस्थानांत नोकरीस होती. गुरु नतनखांसाहेब आग्रावाले.

प.वा. दुलू पर्वतकर—मागील पिढींतील एक प्रख्यात गायिका.

प. वा. विठाबाई काकोडकर— मागील पिढींतील एक प्रख्यात गायिका.

श्री. अंजनी मालपेंकर — मुंबईत व अनेक संस्थानांत थोर कीर्ति संपादिलेली गायिका. गुरु नजीरखांसाहेब दिल्लीवाले.

श्री. केसरबाई केरकर — मुंबई, कलकत्ता, अनेक संस्थानें वगैरेकडे उत्तम नांव

कमावलेली गायिका. गु. रामकृष्णबुवा वझे, भास्करबुवा बखले व अल्लादियाखांसाहेब यांची शिष्या.

श्री. ताराबाई शिरोडकर — ख्याल गायनांत उत्तम कीर्ति.

श्री. मोगूबाई कुर्डीकर — सुप्रसिद्ध रेडियोस्टार.

श्री. सरस्वतीबाई फातर्पेकर — रेडियोस्टार व "कोलंबिया"ची गायिका.

श्री. मेनकाबाई शिरोडकर — मुंबईत नांवाजलेली गायिका.

श्री. केसरबाई बांदोडकर — रेडियोस्टार व "ओडियन"ची गायिका.

श्री. गिरिजाबाई केळेकर — रेडियोस्टार व "ओडियन"ची गायिका.

श्री. विजयाबाई केरकर — रेडियोस्टार.

,, वत्सलाबाई पर्वतकर — रेडियोस्टार व "ओडियन"ची गायिका.

श्री. शरणाबाई पैंगिणकर — रेडियोस्टार व "यंगइंडिया"ची गायिका.

श्री. मोगाबाई पैंगिणकर — रेडियोस्टार.

,, चंपाबाई कवळेकर — सुप्रसिद्ध गायिका.

श्री. यशवंत लोलयेंकर — "हिज मास्टर्स"चे गायक.

विविध वादनकला

प. वा. मुरारबा पेडणेकर (गोवेकर) — तबला, गाणें, सुरश्रृंगार, पखवाज, वगैरेंत उत्तम तयारी. यांनीं संगीत विषयांत ग्रंथरचनाही केली आहे. फार मान्यता पावलेले. यांचे गुरु इमदादखां हे होत.

प. वा. सखारामजी मांजरेकर — तबला-वादनांत फार नांवाजलेले. यांचा शिष्यसमुदाय फार मोठा आहे. गुरुः शिवलालजी हिंदुस्थानी.

प.वा. पांडोबा उर्फ पांडी मंगेशकर — अखिल महाराष्ट्रांत नांवाजलेले सारंगीवाले. मुंबईत यांची वादनशाळा होती. शिष्यसमुदायही मोठा आहे. गुरुः गोविंद वस्तादजी दतियांवाले.

प. वा. विनायक बांदिवडेकर — कीर्तिमान् सारंगीवाले. गुरुः डुलेरामजी दतियांवाले.

प. वा. हरिश्चंद्र जांबावलीकर — एक प्रसिद्ध तबला-वादनपटु.

प. वा. विनायक पर्वतकर — एक प्रसिद्ध तबला-वादनपटु.

प. वा. दत्तू मंगेशकर — एक प्रसिद्ध तबला-वादनपटु.

प. वा. राम फातर्पेकर — एक प्रसिद्ध तबला-वादनपटु.

प. वा. कृष्णा मंगेशकर — सुप्रसिद्ध सारंगीवाले.

प. वा. वामन काळे — सुप्रसिद्ध तबला-वादनपटू.

प. वा. लक्ष्मण काळे — सुप्रसिद्ध तबला-वादनपटु.

प.वा. हरिश्चंद्र पर्वतकर — सुप्रसिद्ध तबला-वादनपटु.

प.वा. रामकृष्ण पर्वतकर — सुप्रसिद्ध तबला-वादनपटु.

श्री. खांपरूजी पर्वतकर — तालज्ञ. सर्व हिंदुस्थानांत ताल व लय यांत या योग्यतेचा दर्दी दुसरा नाहीं अशी यांची कीर्ति आहे. तालावधान हा गुण यांच्यांत इतका उत्कर्षास गेला आहे कीं, उजव्या हातानें एक, तर डाव्यानें दुसरा, मानेनें तिसरा व पायानें चौथा असे अनेक ताल एकाच वेळीं ते चालवून दाखवूं शकतात. — "त्यांचें काय विचारतां ? त्यांच्यासारखे अवलिया, सिद्ध कलावान तेच" असे अत्यंत आदरभावाचे उद्गार एका प्रसिद्ध गाय-

कानें लेखकाजवळ काढले. ही गोष्ट त्यांची अलौकिक योग्यता दर्शविते. यांचे गुरु रघुवीरजी पर्वतकर.

श्री. कामूराव उर्फ **कामेश्वर मंगेशकर** — तबला-वादनांतील यांची थोर कीर्ति सर्वत्र प्रसिद्ध आहे.

श्री. दत्तारामजी नानोडकर—तबला-वादनांत यांची कीर्ति दूरवर पसरली आहे. यांचे गुरु बाबूराव म्हार्दोळकर.

श्री. विष्णुपंत शिरोडकर — "हिज मास्टर्स"चे कलावान. सुप्रसिद्ध नर्तकी 'मेनका' (सौ. सोखी) यांच्याबरोबर युरोपांत हिंदी कलेचा ध्वज फिरविणारे.

श्री. रघुवीर शाणू रामनाथकर— हे एक अष्टपैलू कलावान असून हार्मोनियमवादनांत व चित्रकलेंत विशेष प्रसिद्ध आहेत.

श्री. मनोहर रघुवीर रामनाथकर व **रत्नकांत रघुवीर रामनाथकर** — श्री. रघुवीर रामनाथकरांचे चिरंजीव व शिष्य. हार्मोनियम-वादनकौशल्याबद्दल फार वाखाणलेले.

श्री. विठ्ठल कोरगांवकर — हार्मोनियम-वादनपटु.

श्री. सखारामपंत बर्वे — ललितकलादर्श मंडळीचे सुप्रसिद्ध हार्मोनियम-वादनपटु. "संगीतसाधना"चे कर्ते.

श्री. बाजी घनःश्याम गुरव पर्वतकर — सतार व बीन वादनांत उत्तम कीर्ति मिळविलेले कलावान.

श्री. केशव जांबावलीकर — तंतुवाद्यामध्यें फार नांवाजलेले. बांसदा स्टेटमध्यें रहिवासी आहेत.

प. वा. विनायक म्हार्दोळकर — सारंगी-वादनांत प्रख्यात. अल्पवयांत मृत्युमुखीं पडले.

श्री. दत्ताराम पर्वतकर — सुप्रसिद्ध सारंगीवाले.

श्री. अनंत केरकर — सुप्रसिद्ध सारंगीवाले.

प. वा. विठ्ठल कवळेकर --- विख्यात सनईवाले.

श्री. बाबय कांसारपालकर — सनई, फ्लूट यांच्या वादनांत खूप वाखाणलेले.

श्री. दत्तू तळावलीकर — सुप्रसिद्ध सनईवाले.

श्री. जयवंत जांबावलीकर — सारंगीवादनांत कीर्तिमान.

श्री. श्रीधर पार्सेकर— फिडल-वादनांत प्रसिद्ध असलेले एक उदयोन्मुख कलावान.

नाट्यकला

प. वा. माधव विठ्ठल हेदे — गेल्या पिढींतील एक कुशल नट. यांनीं केलेली नाट्यरचनाही प्रसिद्ध आहे.

श्री. मास्टर दिनानाथ (मंगेशकर)— "बलवंत संगीत मंडळी"चे एक मालक, सुविख्यात गायक व नट.

श्री. रघुवीर ना. सावकार — "रंगबोधेच्छु नाट्यसमाजा"चे मालक आणि सुप्रसिद्ध नट.

श्री. गोविंद माशेलकर — "ललितकलादर्श मंडळी"तील एक विख्यात नट व गायक.

श्री. मास्टर शांताराम — सुप्रसिद्ध गायक व नट.

श्री. श्रीपाद गो. नेवरेकर— "रंगबोधेच्छु नाट्यसमाजा"चे सुप्रसिद्ध नट व प्रख्यात गायक.

श्री. गोविंद अग्नि — "रंगबोधेच्छु नाट्यसमाजा"चे सुविख्यात नट व गायक.

श्री. बाबुराव शिरोडकर(एस्. बाबुराव) — एक प्रसिद्ध सिनेमा-नट.

श्री. दुर्गा केळेकर (सौ.ज्योत्स्ना भोळे) — "नाट्यमन्वंतरा" ची नटी व सुप्रसिद्ध गायिका.

श्री. प्रेमा केळेकर — (सौ. मंगला रानडे) "नाट्यमन्वंतरा" ची नटी.

श्री. वत्सला कोलवाळकर (मिस् दुलारी) — "इम्पीरियल फिल्म कंपनी" ची सुप्रसिद्ध नटी.

श्री. विठा धारगळकर (मिस् रत्नप्रभा) "हंस पिक्चर्स" ची सुप्रसिद्ध नटी व गायिका.

श्री. मैनाबाई जांबावलीकर — "मनोहर स्त्री संगीत मंडळी" ची यशस्वी नटी.

श्री. महानंदा फातर्पेकर — "महानंदा स्त्री संगीत मंडळी" ची प्रमुख नटी.

नृत्यकला

प. वा. बाबलीबाई मालपेंकर — सुविख्यात नर्तकी.

श्री. सरस्वतीबाई वेलिंगकर — विख्यात नर्तकी. भावाविष्कारांत हिनें फार मोठें नांव मिळविलें असून मुंबईस नृत्यशाळा चालवीत आहे. हिचे गुरु मजलखांसाहेब लखनूर.

श्री. बाळाबाई काळे — सुप्रसिद्ध नर्तकी व गायिका.

श्री. दत्तीबाई नागेशकर — गायन व नर्तनांत प्रसिद्ध असलेली गु. वझेबुवांची शिष्या.

श्री. मेनकाबाई शिरोडकर — एक प्रसिद्ध नर्तकी.

श्री. कलावतीबाई म्हार्दोळकर — एक प्रसिद्ध नर्तकी.

पाश्चात्य संगीत

Sr. Tolentino da Fonseca (ख्रि.) — कराचीस प्रसिद्धीस आले. यांनीं रचलेलें एक Marcha अमेरिकेंत फार वाखाणलें गेलें.

Sr. Gelásio de Sousa (ख्रि.) — मध्यप्रांत व बलुचिस्थान येथें फार प्रसिद्धीस आले.

Sr. Augusto da Fonseca (ख्रि.) —"क्लारिनेति" वाद्यकुशल. यांस Rouxinol हें गुणनिदर्शक नांव देण्यांत येत असे.

Sra. Mᵉ Costa Alvares (ख्रि.) — पियानीश्त.*

Sr. António Dias (ख्रि.) — व्हियोलिनीश्त.†

Sr. Zacarias do Rosário (ख्रि.) — कोंपोझितोर.‡

Sr. Carlos Eugénio Ferreira (ख्रि.) — कोंपोझितोर. देशी गाणीं, मांडे वगैरेच्या संगीतरचनेबद्दल वाखाणलेले.

Sr. Carlos da Costa Alvares (ख्रि.) — व्हियोलिनीश्त.

Sr. Augusto da Cruz (ख्रि.) — पियानीश्त. कराचीस फार प्रसिद्ध.

Sr. Sebastião Vás (ख्रि.) मुंबईमध्यें प्रसिद्ध.

Sr. Dominic Pereira — व्हियोलिनीश्त या नात्यानें अखिल हिंदुस्थानांत वाखाणलेले.

Sra. D. Olga Ataíde — पियानीश्ता या नात्यानें लंडनपर्यंत प्रसिद्धी मिळविलेली.

---

* पियानो-वादनपटु. † व्हायोलिन-वादनपटु. ‡ संगीत-रचनाकुशल.

Sr. Napoleão Lobo — "व्हियोलीनु" व "फ्लाव्ता" या वाद्यांत कलकत्त्यास फार प्रसिद्ध.

Sr. Eleutério Pereira — मद्रास व कलकत्त्याकडे कीर्ति मिळविलेले.

Sr. Prof. Lopes— मुंबईंत विशेषेंकरून पारशी समाजांत फार प्रिय झालेले.

Sr. D. Helena da Cunha Pereira — गाणारी.

Sra. D. Júlia Lobo— पियानीश्त.

Sra. D. Ida Ribeiro e Sá — पियानीश्त.

Sr. João Mousinho Lopes— व्हियोलिनीश्त आणि कोंपोझितोर.

Sr. Alfredo Lopes— पियानीश्त.

Sr. ..... de S. Lázaro — पियानीश्त.

Sr. Alfredo da Gama — पियानीश्त.

Sr. Varela Caiado—कोंपोझितोर.

Sr. Prof. António Figueiredo— लिसेव सेंत्राल-पणजी येथील संगीत-शिक्षक. व्हियोलिनीश्त.

Sr. Alvaro Miranda -- व्हियोलिनीश्त.

Sr. Pedro Afonso -- व्हियोलिनीश्त.

चित्रकला

Sr. António Xavier Trindade (ख्रि.) — जे. जे. स्कूल ऑफ आर्टचे माजी अध्यापक,वर्कशॉपचे सुपरिंटेंडेंट. बॉंबे आर्ट सोसायटीचें सुवर्णपदक मिळविणारे. अत्यंत उच्च दर्जाचे कलावान. "इंग्लंडसारख्या देशांत असते तर त्यांचा राष्ट्रगौरव झाला असता" असे श्री. मा. खं. बागल यांनीं आपल्या "कला आणि कलावंत" या पुस्तकांत त्यांजविषयीं काढलेले उद्गार खरोखरच सार्थ आहेत.

श्री. गणपत विश्वनाथ लाड— पेस्टल वर्क आणि रंगकामाबद्दल अनेक प्रशंसापत्रकें मिळविलेले विख्यात चित्रकार.

श्री. कृष्ण जगन्नाथ थळी — मागील पिढींतील चित्रकलेचा अभ्यास केलेले एक गोमंतकीय.

श्री. पंढरीनाथ मु. खंवटे — मागील पिढींतील स्कूल ऑफ आर्टमधील एक यशस्वी गोमंतकीय.

श्री. तुकाराम मुकुंद सांवर्डेकर — जे. जे. स्कूल ऑफ आर्टचा पेंटिंगमधील डिप्लोमा घेतलेले.

श्री. अनंत आत्माराम भोंसले—मेयो मेडल, सदर स्कूलचें गोल्ड मेडल व अनेक बक्षिसें मिळविलेले सुप्रसिद्ध कलावान. जे. जे. स्कूल ऑफ् आर्टचे अध्यापक आहेत.

Sr. António Piedade da Cruz — जर्मनी, पोर्तुगाल, हिंदुस्थान वगैरेकडे प्रदर्शनांत खूप वाखाणले गेलेले कलावंत.

Sr. D. J. M. Colaço — जे. जे. स्कूल ऑफ आर्टचे फेलो, डॉली कर्सेटजी सेकंड प्राइझ व अनेक प्रदर्शनांत बक्षिसें मिळालेले.

श्री. मंगेश वासुदेव केंकरे— ॲड्. पेंटिंगमध्यें पहिला नंबर. बॉम्बे आर्ट सोसायटीचें व इतर बक्षिसें व मेडल्स मिळविणारे. पणजी येथील Escola Profissionalचे शिक्षक.

श्री. पुरुषोत्तम त्रिविक्रम चोडणकर– ॲड्. पेंटिंग.

श्री. अच्युत जीवोत्तम कामत— ॲड्. पेंटिंग.

श्री. रघुवीर गो. चिमुलकर — जे. जे. स्कूल ऑफ् आर्टचे फेलो. डॉली

कर्सेटजी फर्स्ट प्राइझ व अनेक प्रशंसापत्रें मिळविणारे. भारतीय चित्रपद्धतींत खूप वाखाणलेले.

Miss. Angela Trindade — मास्तर त्रिंदादची मुलगी. जे. जे. स्कूल ऑफ आर्टची फेलो. डॉली कर्सेटजी सेकंड प्राइझ व अनेक प्रशस्तिपत्रकें मिळविणारी चित्रकर्त्री.

Miss Lourdes Fernandes — पेंटिंग डिप्लोमा.

Miss Florrie Amor Vás — पेंटिंग डिप्लोमा.

श्री. शंकर प्रभाकर मुळगांवकर व कै. प्रभाकर शं. मुळगांवकर — पणजी येथील सुप्रसिद्ध "मुळगांवकर स्टुडियो"चे मालक.

श्री. विश्वनाथ गो. नागेशकर—पेंटिंग डिप्लोमा. पारीसला कलेचें शिक्षण घेतलेले उदयोन्मुख कलावान.

श्री. श्रीराम बाळकृष्ण देशप्रभु — "टाटा मेमोरियल इन्स्टिट्यूट" तर्फे "ॲनाटॉमिकल आर्ट"च्या शिक्षणाकरतां अमेरिकेंतील "जॉन हॉपकिन्स" युनिव्हर्सिटींत दाखल झालेले.

Sr. Pantaleão Fernandes — पेंटिंग डिप्लोमा.

श्री. शामराव गणपतराव लाड — चित्रकार लाडांचे चिरंजीव. स्कूल ऑफ आर्टचें मेयो मेडल व अनेक प्रशस्तिपत्रकें मिळविणारे.

Sr. Angelo da Fonseca — ख्रिस्ती धार्मिक विषयांना भारतीय चित्रकलेचा साज चढविणारे एक प्रसिद्ध कलावान.

श्री. रघूत्तम श्रीधर सांवर्डेकर — पेंटिंग डिप्लोमा.

Miss Susie de Sá (Mrs. Rogers)— पेंटिंग डिप्लोमा.

श्री. लक्ष्मण व्यंकटेश बांदेकर — पेंटिंग डिप्लोमा.

श्री. सर्वोत्तम पु. दणाईत — पेंटिंग डिप्लोमा.

श्री. जयवंत त्रिविक्रम केळेकर— पेंटिंग डिप्लोमा.

श्री. दिनानाथ दामू नायक दलाल — ॲड्. पेंटिंग.

श्री. श्रीरंग कृष्णनाथ नाईक — ॲड्. पेंटिंग.

श्री. रामराव अनंतराव बोरकर — पेंटिंग डिप्लोमा – पहिला नंबर. मेयो मेडल मिळविणारे.

श्री. रघुवीर आत्माराम रायकर — पेंटिंग डिप्लोमा.

Sr. Francisco João Fernandes — ॲड्. पेंटिंग.

श्री. भगवंत रघुवीर हेदे — ॲड्. पेंटिंग.

प. वा. पुंडलीक घोटिंग —एक अमेच्युअर कलावान.

श्री. रावजी श्री. गावणेकर — एक अमेच्युअर कलावान.

Sr. Inácio Vás — एक अमेच्युअर कलावान.

शिल्पकला

श्री. रामचंद्र पांडुरंग कामत — जे. जे. स्कूल ऑफ आर्टचे यशस्वी शिल्पकार. "राजाध्यक्ष परदेशी शिष्यवृत्ति" मिळवून आणि लंडनला जाऊन रॉयल अकॅडेमी ऑफ आर्टस्‌चें सुवर्णपदक व इतर पदकें मिळविणारे अखिल हिंदुस्थानांतील पहिलेच सुविख्यात कलावान

श्री. नारायण गोविंद न्हावेलकर — जे. जे. स्कूल आफ आर्टचें मेयो मेडल मिळविणारे उदयोन्मुख शिल्पकार.

श्री. नारायण नरसिंह पै — जे. जे. स्कूल ऑफ आर्टचा डिप्लोमा घेतलेले एक शिल्पकार.

Sr. Constâncio Fernandes— स्वयंस्फूर्तीनें कलाविषयास वाहून घेतलेले एक शिल्पकार.

सिने-फोटोग्राफी

श्री. पांडुरंग सां. नाईक — अनेक सिनेमा कंपन्यांतून नांव कमावल्यानंतर १९३४ त यांनीं युरोपची सफर केली. आणि आपल्या जातिवंत कलागुणांचें चीज केलें. आज ते "हंस पिक्चर्स"चे एक मालक असून "The King of Cameramen", "The Photography Wizard", "The Celluloid Artist" अशा नांवांनीं सर्वत्र वाखाणले जात आहेत. सुप्रसिद्ध चित्रपट "इंदिरा एम्. ए.", "छाया", "धर्मवीर" हे त्यांच्याच हातचे होत.

वास्तुकला

श्री. रामचंद्र मंगेश अडवलपालकर — पोर्तुगीज सरकारच्या Obras Públicas चे वाखाणलेले वास्तुकलाविशारद.

Sr. Zeferino Avelino Trindade — (Dipl. Arq.)

श्री. रामकृष्ण आत्माराम शिरोडकर — (Ad. Arq.)

श्री. विठ्ठल नारायण मयेकर — (Dipl. Arq.)

Sr. Júlio Lázaro Vás — (Dipl. Arq.)

श्री. शंभु विनायक वागळे — (Dipl. Arq.)

श्री. मधुकर पुंडलीक घोटिंग — (Adv. Arq.) लोकप्रिय चित्रकार प. वा. पुंडलीक घोटिंग यांचे चिरंजीव.

३

गेल्या पंचवीस वर्षांतील इतिहास-संशोधन

श्री. प्रो. पांडुरंग सखाराम पिसुर्लेकर
(Cavaleiro da Ordem de Santiago,
लिस्बन येथील Academia das Ciências चे सदस्य.)

प्राचीन काळीं गोमंतक प्रांताच्या सीमा आजच्याइतक्या आकुंचित नव्हत्या; तर, कुडाळपासून सदाशिवगडापर्यंत तो पसरलेला होता. या प्रदेशावर ८ व्या शतकाच्या मध्यापासून पोर्तुगीज लोकांनीं सन १५१० मध्यें तो घेईपर्यंत, शिलाहार, कदंब, देवगिरीचे यादव, दिल्लीचे सुलतान, बहामनी सुलतान, विजयनगरचे राय, पुनः बहामनी सुलतान आणि विजापूरचे आदिलशहा या वंशांची अधिसत्ता चालून गेली आहे.

गोमंतकाच्या मर्यादा वर सांगितल्याप्रमाणें होत्या हें सोळाव्या शतकांतील, बार्रुश् गाश्पार कुर्रेय, ब्राझ दे आल्बुकेर्क यांच्या पोर्तुगीज ग्रंथांवरून सिद्ध होतें. गोमंतकाची राजधानी जें "गोवें" शहर तें आल्बुकेर्कनें पहिल्या खेपेस काबीज केल्यावर सगळा प्रांत पोर्तुगिजांच्या स्वाधीन झाला, तेव्हां कुडाळ प्रांतांत मांग दळवी — ज्याला पोर्तुगीज इतिहासकार Mandoloy असें संबोधितात तो — हिंदु अधिकारी होता. त्याच्याजवळ दोनचार हजार सैन्य जमविण्याचें सामर्थ्य होतें. गोवें शहर पोर्तुगिजांनीं सर केल्यावर त्यानेंही त्यांची सत्ता मान्य केली. त्याचप्रमाणें इतर भागांतील सरदार म्हणजे तत्कालीन ठाणेदारही गोवेश्वराच्या सत्तेखालीं आले.

पोर्तुगिजांच्या पूर्वी, युसुफ आदिलशहानें बहामनी सुलतानाकडून गोवें घेतलें, त्यावेळीं-देखील कुडाळपासून सदाशिवगडापर्यंत गोमंतकाचा विस्तार होता हें Barrosच्या Década II वरून दिसून येतें.

विजयनगरच्या सत्तेखालीं जेव्हां गोवें शहर होतें तेव्हांही या प्रांताच्या सीमा इतक्याच विस्तृत होत्या, हें "गोवाभिधां कौंकण राजधानीम्" असें वाक्य दुसऱ्या हरिहररायानें सन १३९१ मध्यें दिलेल्या ताम्रपटांत आहे त्यावरून कळून येतें. विजयनगरच्या सत्तेखालीं असलेल्या गोमंतकांतील प्रदेशांपैकीं बांदोडें (फोंडें) व वेळूज (सत्तरी) या दोन ठिकाणीं दोन तत्कालीन मराठी शिलालेख उपलब्ध आहेत.

विजयनगरच्या पूर्वीही 'गोमंतक प्रांत' या शब्दांनीं उपरोच्चारित प्रदेशच अभिप्रेत धरला जात असावा. अर्थात् "गोमंतकाचा इतिहास" म्हणजे आज ज्या लहान प्रदेशाला हें नांव शिल्लक उरलेलें आहे, त्याचाच तेवढा इतिहास नव्हे, तर त्या विस्तृत प्रदेशाचा इतिहास म्हणजेच खऱ्या गोमंतकाचा इतिहास होय. किंबहुना असेंही म्हणतां येईल कीं, आजच्या लघु गोमंतकाचा इतिहास जाणून घ्यावयाचा तर प्राचीन बृहद्गोमंतकाचा इतिहास अभ्यासणें

अपरिहार्यच होय. फक्त पोर्तुगीज अमदानी-पासूनची गोष्ट घेतली तरच मात्र आजच्या गोमंतकाचा इतिहास स्वतंत्रपणें शिकतां येईल. परंतु तत्पूर्वीचा इतिहास जर समजून घ्यावयाचा तर समग्र बृहद्गोमंतकाचा आणि त्यावर राज्याधिकार चालवलेल्या सर्व राजवंशांच्या इतिहासाचा अभ्यास करण्याशिवाय गत्यंतर नाहीं. हें कार्य फार दगदगीचें असल्यानें गोमंतकाच्या इतिहासाची रचना तशाच योग्य लेखकाकडून होणें जरूर आहे. आजच्या इतिहास-संशोधकांनीं आपली नजर केवळ गोमंतकावर ठेवून चालावयाचें नाहीं. कारण आजकाल इंग्रजी व इतर भाषांतून हिंदुस्थानच्या इतिहासास वाहिलेल्या नियतकालिकांमध्यें प्रत्यहीं नवीन नवीन शोध जाहीर होत आहेत. त्यांपैकीं पुष्कळांचा संबंध गोव्याच्या इतिहासाशीं प्रत्यक्षाप्रत्यक्ष रीतीनें येत असतो. अशा सुसंबद्ध इतिहासाची रचना केव्हां होईल ती होवो. तूर्त, **सारस्वत ब्राह्मण समाज या संस्थेच्या रौप्यमहोत्सवाच्या** प्रसंगी गोमंतकाच्या इतिहासाचीं साधनें, मुख्यतः या २५ वर्षांत कोणीं कशीं उपलब्ध करून ठेवलीं आहेत त्याची माहिती देत आहें.

दक्षिण कोंकणांतील सील्लर ऊर्फ शिलाहार हे मूळचे गोव्याचे. त्यांच्या राज्याची राजधानी बलिपट्टण या बंदरांत, थोरल्या गोव्याच्या उत्तरेस असावी असें सन १०५४ मधील एका ताम्रपटावरून दिसून येतें. या शिलाहारांचे आजपर्यंत दोनच ताम्रपट मिळाले आहेत. त्यामुळें त्यांचा इतिहास चांगल्रसा कळत नाहीं. बनारस विश्वविद्यालयांतील भारतीय इतिहासाचे अध्यापक डॉ. अळतेकर यांनीं शिलाहारांच्या इतिहासावर Indian Culture Vol. III मध्यें एक निबंध प्रसिद्ध केला आहे.* रा. शणै गोंयबाब यांनीं "गोंयकारांची गोंया-भायली वसणूक" या कोंकणी पुस्तकांत दिलेली एतद्विषयक माहितीही उपयुक्त आहे.

कदंबांच्या कारकिर्दीत गोमंतकाची राजधानी पहिल्यांदां चंद्रपुर म्हणजे आजचें चांदर येथें असून पुढें ती थोरलें गोवें म्हणजे "व्हडलें गोंय" येथें नेण्यांत आली. मुंबईच्या सेंट झेवियर कॉलेजचे प्रो. मोराइश यांनीं कदंबांचा इतिहास प्रसिद्ध केला आहे, तो वाचनीय आहे.

विजयनगरच्या इतिहासास पोर्तुगीजमध्यें भरपूर साधनें असून इंग्रजीमध्येंही पुष्कळ विद्वन्मान्य ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत. डॉ. सालिटोर यांचा Social & Political Life in the Vijayanagar Empire हा ग्रंथ फारच महत्वाचा आहे. प्रो. रामनय्या-कृत नुकताच प्रसिद्ध झालेला Studies in the History of the Third Dynasty of Vijayanagar हा ग्रंथ म्हणजे इतिहासाचा नमुना वाटतो.

मुसलमानी अंमलाखालील गोमंतकाच्या इतिहासाचीं साधनें मात्र प्रायः फारशी भाषेंत आहेत. त्यांपैकीं कित्येक इंग्रजींत भाषांतर-रूपानें प्रसिद्ध झालीं आहेत. मेजर किंग यांनीं लिहिलेल्या The History of the Bahamani Dynasty founded on the Burhan-i-Maasir, चौधरीकृत Social & Economic Conditions of the People under the

* दक्षिण कोंकणांतील शिलाहार हे राष्ट्रकूट सम्राटांचे मांडलीक. डॉक्टरमजकुरांनीं राष्ट्रकूट साम्राज्याचा साधार सविस्तर इतिहासही इंग्रजींत लिहिला आहे. या सुप्रसिद्ध ग्रंथाचें नांव Rashtrakuta and their Times असें आहे.

Bahmani Sultanate, Journal of the Bengal Asiatic Society वगैरे-मध्यें थोडीबहुत पण महत्वाची माहिती मिळते.

रा. दत्तात्रय व्यंकटेश पै यांचा "मुसलमानी अंमलांतील गोमंतक" हा सुंदर निबंध नुकताच प्रसिद्ध झाला आहे. गोव्यांतील हिंदूंनीं आपला प्रांत फिरंग्यांच्या स्वाधीन कां केला, या प्रश्नाचें उत्तर देण्याचा प्रयत्न या निबंधांत त्यांनीं केला आहे. मला वाटतें कीं, त्याचें उत्तर, आल्बुकेर्कचीं पत्रें, Barros कृत Décadas II, आल्बुकेर्कच्या मुलानें लिहिलेला Comentário आणि आल्बुकेर्कच्या गाश्पार कुर्रेय नांवाच्या चिटणिसानें तयार केलेला Lendas da India हीं पोर्तुगीज साधनें अभ्यासिलीं असतां सहज मिळण्यासारखें आहे. याविषयीं Comentário मध्यें तर स्पष्टच उल्लेख आहे! हिंदु लोकांनीं तिमोजला गोवें घेण्याविषयीं विनंति कां केली हें कोडें त्या सरदाराचा विजयनगर, होनावर व गोवें येथील संबंध लक्षांत घेतां उकलण्यासारखें आहे. गोमंतक प्रांत हा शंभरांवर वर्षें विजयनगरच्या सत्तेखालीं पूर्वी होता, ही गोष्ट विसरून चालावयाचें नाहीं. वास्तविक गोवें आल्बुकेर्कच्या हातांत पडण्यापूर्वी विजयनगरच्याच ताब्यांत पुनः जावयाचें, पण या वेळीं कृष्णदेवरायाची परिस्थिति या कामीं प्रत्यक्ष लढाई करण्याइतकी सबल नव्हती. आंध्र विश्वविद्यालयांतील Gurti Venkat Rao यांच्या Krishna Deva Raya and the Portuguese या निबंधावरून व अनेक इतर पुराव्यांवरूनही ही गोष्ट दिसून येते. तिमोजीचा विश्वास आल्बुकेर्कला वाटत नव्हता, हेंदेखील लक्षांत ठेवण्यासारखें आहे. विजयनगर येथें असलेल्या पोर्तुगिजांच्या फ्रे लुईज या वकिलानेंही आल्बुकेर्क यास कळविलें होतें कीं, तिमय्या हा गोवें विजयनगरच्या ताब्यांत देणार आहे! असो.

पोर्तुगीज लोकांच्या गोव्यावरील कारकिर्दी-संबंधानें तर हजारों कागदपत्र छापलेले आहेत आणि विवेचनात्मक ग्रंथही प्रसिद्ध झालेले आहेत.

सन १५१० मध्यें गोवा बेट पोर्तुगिजांच्या हातांत गेल्यावर थोड्याच वर्षांनीं सासष्टी व बार्देश येथेंही त्यांची सत्ता प्रस्थापित झाली. पोर्तुगिजांच्या शौर्यानें तत्कालीन लोक दिपून गेले. पोर्तुगीज अधिकाऱ्यांस आपलीं कृत्यें वर्णन करून पुढील पिढीसाठीं ठेवण्याची आवश्यकता भासूं लागली. त्यामुळें गोव्यांत इतिहासलेखन लौकरच सुरू झालें. अर्थात् हे सर्व लेखक पोर्तुगीज असल्यामुळें त्यांच्याच भाषेंत पोर्तुगिजांचा इकडील इतिहास लिहिला जाऊं लागला.

गाश्पार कुर्रेय (१४९५—१५६१) नामक आल्बुकेर्कचा चिटणीस होता. त्यानें Lendas da India नांवाचा एक मोठा ग्रंथ लिहून त्यांत सन १५५० पर्यंत फिरंग्यांचा एतद्देशीय इतिहास वर्णन केला. काश्ताञ्जेद हा पोर्तुगीज लेखक सन १५२८त हिंदुस्थानांत आला व येथें पुष्कळ ऐतिहासिक माहिती मिळवून, त्यानें आपला História do descobrimento e Conquista da India pelos Portuguezes हा ग्रंथ तयार केला.

पोर्तुगालमध्येंही सोळाव्या शतकांतील कित्येक ग्रंथकारांनीं हिंदुस्थानांतील पोर्तुगिजांचा इतिहास लिहिला आहे. त्यांत बार्रुश (१४९६-१५७०), ओझोरियु (१५०६-१५८०), दामियांव द गॉइश (१५०१-१५७४), ब्राज द आल्बुकेर्क (१५००-१५८०) व फ्रांसीश्कु द आंद्रादि (१५४०-१६१४) हे प्रमुख आहेत.

पोर्तुगीज लोक इतक्यानेंच संतुष्ट राहिले नाहींत. तर सतराव्या शतकाच्या सुरुवातीस

गोव्यांत दप्तरखाना स्थापून त्याच्यावर त्यांनीं दियोगु द कौतु (१५४२–१६१६) या पोर्तुगीज विद्वानास क्युरेटर नेमलें. आणि त्याच्यावर बारुशनें लिहिलेला इतिहास पूर्ण करण्याची कामगिरी सोंपविली. बारुश आणि दियोगु द कौतु या लेखकद्वयांचा ग्रंथ बावीस भागांत सन १७७७–१७८८ मध्यें लिस्बन येथें प्रसिद्ध झालेला आहे.

दियोगु द कौतुच्या जागेवर पुढें बुकार्रु नांवाचा ग्रंथकार नेमला गेला. त्यानें Década XIII लिहून पोर्तुगिजांचा इतिहास मराठ्यांचा उदय होण्याच्या काळापूर्वी आणून ठेपविला. बुकार्रु यानें 'हिंदुस्थानांतील (पोर्तुगीज लोकांचे) किल्ले' नामक एक उत्कृष्ट ग्रंथही सन १६३६ त लिहिला.

उपरिनिर्दिष्ट पोर्तुगीज इतिहास-लेखक आपलें लिखाण एका विशिष्ट दृष्टीनें तयार करीत होते. ते फार विद्वान् होते. पण त्यांपैकीं बहुतेकांस आज ज्याला इतिहासशास्त्र म्हणतात त्याचें ज्ञान नव्हतें. त्यामुळें त्यांनीं लिहिलेल्या एतद्देशीय इतिहासाचा अभ्यास करतांना चिकित्सक दृष्टि ठेवावी लागते.

सोळाव्या शतकांतील इतिहास-लेखकांप्रमाणें सतराव्या व अठराव्या शतकांतही पोर्तुगिजांनीं आपल्या इतिहासाविषयीं लहानमोठीं वर्णनें लिहून त्यांपैकीं कित्येक छापलींही आहेत. या सर्व साधनांमुळें केवळ **गोमंतकाच्याच नव्हे तर महाराष्ट्राच्याही** इतिहास-लेखकांस पुष्कळ साह्य होण्यासारखें आहे.

गोव्यांतील हिंदु विद्वानांनीं कित्येक पोर्तुगीज इतिहास-लेखकांस माहिती पुरवून मदत केली असेल; पण त्यांचीं नांवें प्रसिद्ध नाहींत. गोव्यांतील सारस्वत ब्राह्मण पोर्तुगीज लोकांशीं आल्बुकेर्कच्या कालापासून दळणवळण ठेवीत. त्याबद्दल आज बरीच माहिती उपलब्ध झाली आहे. तिमोज प्रभृति हिंदु लोकांच्या मदतीनें गोवें फिरंग्यांनीं घेतल्यावर दुसऱ्या दिवशीं कृष्ण नांवाच्या सारस्वत ब्राह्मणानें आल्बुकेर्कला भेटून त्याकडे गोवा बेटांतील ब्राह्मणांस व इतर लोकांस कौल मागितला आणि इकडील निरनिराळ्या उत्पन्नांची माहिती त्यास पुरविली. हा कृष्ण पुढें पोर्तुगालला जाऊन आला.

कृष्ण शेणवीं प्रमाणें गोपू, लखू, दादाजी, अनू सेणय वगैरे सारस्वत ब्राह्मणांची हकीकत १६व्या शतकाच्या पूर्वार्धांतील पोर्तुगीज लिखाणांत थोडीबहुत मिळते. चोडणें येथील लखूनें सहकुटुंब काथोलिक धर्माचा स्वीकार करून Lucas de Sá हें नांव घेतलें. लखूचें धर्मांतर म्हणजे जेजुइट लेखकांस एक फार महत्वाचा विषय होऊन राहिला होता. कारण त्यापूर्वी जेजुइट पाद्र्यांनीं केलेले एतद्विषयक बरेच प्रयत्न फोल ठरले होते. लखूच्या धर्मांतरानंतर गोव्यांतील हजारों ब्राह्मण बाटले गेले. हजारों ब्राह्मण वाट मिळेल तिकडे पळून गेले. कित्येकांस हद्दपार करण्यांत आलें. असो. पोर्तुगीज इतिहास-लेखक बारुश यानें सन १५३२त पोर्तुगीजमध्यें भाषांतरित केलेल्या एका संस्कृत ताम्रपटाचा उल्लेख केला आहे. हा ताम्रपट माधवमंत्री (?) याचा असून तो लखूनें एका खटल्यांत पोर्तुगीज भाषांतरासह गोवेकर सरकाराकडे सादर केला होता. या गोष्टीची बारुशनें नोंद केली आहे. त्यावरून सिद्ध होतें कीं, सन १५३२ मध्यें संस्कृत लेखांचें पोर्तुगीज भाषांतर करणारे विद्वान् ब्राह्मण गोव्यांत होते. त्यांच्या ज्ञानाचा फायदा, अप्रत्यक्षतः का होईना, बारुश या पोर्तुगीज इतिहास-लेखकास झाला.

पणजी येथील ऐतिहासिक दप्तरखान्यांत सोळाव्या शतकाच्या मध्यास लिहिलेला एक हस्तलिखित पोर्तुगीज ग्रंथ आहे. त्यांत सन

१५५३ मधील एका लेखांत 'गोवें शहरांत राहाणारा सांतू शेणय, ब्राह्मण' ह्याचा उल्लेख पुढीलप्रमाणें केलेला आहेः— "ह्या इसमाची दुभाषी म्हणून निवड केलेली आहे. कारण त्याला पोर्तुगीज भाषा समजते. इतकेंच नव्हे तर त्याला आमच्या (पोर्तुगीज लोकांच्या) चालीरीती माहीत आहेत. व तो पोर्तुगीज लोकांत सतत मिसळतो."

सोळावें शतक सोडून दिलें, आणि सतराव्या व अठराव्या शतकांतील गोव्यांतील हिंदु लोकांकडे नजर फेकली तर ह्या कालांतही कित्येक विद्वान् सारस्वत ब्राह्मण लक्षांत भरल्याखेरीज राहत नाहींत. विठोजी शेणवीं धुमे, रामकृष्ट शेणवीं घोडेकर, बहुगुण सदाशिव कामत वाघ, भिमाजी राय, वेंकट कामत हे पोर्तुगीज भाषा समजणारे होते. विठोजी शेणवीं धुमे ह्यांचा पत्रव्यवहार शाहूमहाराज, आंग्रे, वाडकर भोंसले, बाजीराव वगैरे थोर पुरुषांकडे होता. ह्यांनीं विजरईस लिहिलेलीं पोर्तुगीज पत्रें मीं पाहिलीं आहेत. त्यांवरून त्यांच्या कालांत पोर्तुगीज भाषेचा प्रचार गोव्यांतील ब्राह्मणांमध्यें तरी झाला होता असें म्हणावें लागतें. ह्यांपैकीं कित्येकांचा पोर्तुगीज इतिहासलेखकांनीं उपयोग करून घेतला असावा. इतिहासकार दियोगु द कौतु यानें तर स्पष्ट लिहिलें आहे कीं, आपण हिंदु विद्वानांशीं परिचय करून त्यांकडून बरीच माहिती मिळविली.

उपरिनिर्दिष्ट विद्वानांपैकीं बहुगुण कामत वाघ यानें लिहिलेली एक 'ऐतिहासिक जंत्री' उपलब्ध आहे. ही जंत्री 'प्राचीप्रभे'त मागें प्रसिद्ध झालेली आहे. वाघ हा गोवेंकर सरकारचा 'लिंग्विस्तादे' म्हणजे दुभाषी होता. आणि त्यामुळें त्याच्या वाचनांतून महाराष्ट्रांतील राजकीय बाबींसंबंधांचे हजारों कागद गेले होते. शिवाय एतद्देशीय भाषेंत लिहिलेल्या कागदपत्रांचें गोवें सरकारचें दप्तर त्याच्या हातांत होतेंच. पण पोर्तुगीज इतिहास-लेखकांनीं ज्याप्रमाणें आपले ग्रंथ लिहिले त्याप्रमाणें आपणही एखाद्या ऐतिहासिक ग्रंथाची रचना करावी, अशा उद्देशानें सदर 'जंत्री' वाघानें लिहिल्याचें दिसत नाहीं. तर केवळ आपणास असलेली ऐतिहासिक माहिती एखाद्या पोर्तुगीज लेखकाच्या उपयोगासाठीं त्यानें लिहून काढली असावी, असा मला संशय येतो. प्रथमतः आपली माहिती मराठींतून लिहून काढून नंतर त्याचें पोर्तुगीज भाषांतर वाघ कित्येक वेळां करीत, याबद्दल आधार आहे.

बहुगुण कामत वाघ ह्यांच्या काळीं 'कोंकणाख्यान' हा ग्रंथ निर्माण झाला. कोंकणाख्यानाची छापील प्रत जी उपलब्ध आहे ती केवळ एकाच प्रतीवरून तयार झालेली असल्यामुळें तिचें महत्व चिकित्सक दृष्ट्या कमी झालेलें आहे. ग्रंथकर्त्यानें आपलें नांव गुलदस्तांत ठेविलें आहे. पण तो सासष्ट प्रांतांतील मुळचा राहणारा कौशिक गोत्रज सारस्वत ब्राह्मण होता, असें त्यानें लिहिलेलें आढळतें. कोंकणाख्यान हा ग्रंथ त्यांतच म्हटल्याप्रमाणें "शके सोळासें त्रेचाळिशी। प्लवनाम संवत्सरासी। आणि उत्तम उत्तरार्धासी" संपविला, म्हणजे सन १७२१ त तयार झाला, असें मानावें लागतें.

हा ग्रंथ ज्या परिस्थितींत निर्माण झाला तिची कल्पना पुष्कळ लेखकांस नसल्यामुळें कित्येकांनीं ह्या ग्रंथास एखाद्या धर्मग्रंथाप्रमाणें किंवा ऐतिहासिक प्रबंधाप्रमाणें महत्व दिलेलें आहे, तर कित्येक लेखक त्याच्यावर तुटून पडलेले आहेत.

असें जरी असलें तरी एक गोष्ट खरी आहे कीं, कोंकणाख्यान-कर्त्यानें सन १७२१ च्या सुमारास बहुजनसमाजांत प्रचलित असलेल्या आख्यायिका व दंतकथा आपल्या ग्रंथांत प्रयत्न-

पूर्वक ग्रथित केल्या आहेत. पण त्यांच्या ग्राह्याग्राह्यतेबद्दल चर्चा करून योग्य अनुमानें काढण्याची पात्रता कर्त्यास असल्याचें दिसत नाहीं. तथापि तो ग्रंथ टाकाऊ नसून त्यांतील कांहीं माहिती फार महत्वाची आहे.

बहुगुण कामत वाघ यानें व 'कोंकणाख्यान'-कर्त्यानें आपलें लिखाण मराठींत केलें. पण ह्याच काळीं गोव्यांतील बहुश्रुत पाद्री लिओनार्द पाइश कृत Promptuário das Diffiniçõeş Indicas हें पुस्तक पोर्तुगीजमध्यें लिहिण्यांत आलें. तें सन १७११ त छापण्यास तयार झालें होतें. पण त्याचें प्रकाशन लिस्बन येथें सन १७१३ सालीं करण्यांत आलें.

कोज्मि दे ग्वार्द नामक एका इसमानें 'शिवाजीचें चरित्र' लिहिलें आहे. ग्वार्द यानें आपला जन्म मुरगांव (गोवें) येथें झाला असें सदर चरित्राच्या मुखपृष्ठावर म्हटलें आहे. हा चरित्रकार शिवाजीच्या वेळीं गोव्यामध्यें राहात असे, हें ह्या चरित्रांतर्गत पुराव्यावरून सिद्ध होतें. कोज्मि दे ग्वार्द हा बहुतकरून पोर्तुगीज इसम असावा, असें आम्हांस वाटतें. ग्वार्दकृत "शिवाजी-चरित्र" आमचे परम मित्र प्रो. सुरेंद्रनाथ सेन (कलकत्ता) यांनीं इंग्रजींत प्रसिद्ध केलें आहे.

गोव्याचा राजकीय संबंध निरनिराळ्या शेजारच्या संस्थानांशीं आला. केवळ मराठ्यांसंबंधानेंच बोललों तर शिवाजी, संभाजी, राजाराम, शाहू वगैरे मराठे छत्रपति राजे; छत्रपति संभाजी राजे कोल्हापूरकर; बाजीराव, नानासाहेब वगैरे पेशवे; कान्होजी, संभाजी, मानाजी, तुळाजी वगैरे आंग्रे; वाडकर भोंसले; संवदेकर इत्यादिकांचे संबंध गोव्याकडे आले. त्यांपैकीं कित्येकांच्या गोवेंकरांशीं लढाया झाल्या. अशा कित्येक लढायांचीं वर्णनें पोर्तुगीज लोकांनीं लिहून ठेवलीं आहेत. त्यांतील कांहीं 'वर्णनें' (Relações) प्रसिद्ध झालेलीं आहेत, आणि तीं मराठी ऐतिहासिक साधनांस पूरक आहेत.

सन १८५५ सालीं कुन्ज्य रिव्हार ह्या बहुश्रुत पोर्तुगीज ग्रंथकाराची गोव्यांत मोठ्या हुद्दयावर नेमणूक झाली. रिव्हार हा येव्हर (पोर्तुगाल) येथील ग्रंथसंग्रहालयाचा क्युरेटर असतांना त्यानें तेथील शेंकडों ऐतिहासिक हस्तलिखितांचा अभ्यास केला होता. तसेंच त्याचा इतिहासशास्त्राचाही व्यासंग खोल होता. कुन्ज्य रिव्हार यानें गोव्यांत इतिहास-संशोधनाच्या कार्याला नवीन दिशा लावली आणि कागदपत्रांचें युग सुरू केलें. हिंदुस्थानांतील पोर्तुगिजांच्या इतिहासास उपयोगी पडणारी अशी विपुल सामुग्री गोवें दप्तरांत त्यास सांपडली. त्यांपैकीं शेंकडों महत्वाचे कागदपत्र त्यानें संशोधून प्रसिद्ध केले.

कुन्ज्य रिव्हार येथें २२ वर्षें होता. इतक्या दीर्घ कालावधींत त्यानें अत्यंत महत्वाची अशी ऐतिहासिक माहिती पुढें आणली.

Archivo Portuguez Oriental नामक ऐतिहासिक पत्रांचा संग्रह दहा भागांत सन १८५७–१८७७ च्या दरम्यान रिव्हार यानें उजेडांत आणला. ह्या प्रचंड संग्रहानें पोर्तुगिजांच्या हिंदुस्थानांतील इतिहासावर व प्रामुख्येंकरून गोमंतकाच्या धार्मिक इतिहासावर फार प्रकाश पडतो. गोव्यांत व वसई प्रांतांत हिंदु धर्मीयांचा पोर्तुगीज लोकांनीं कोणत्या पद्धतीनें छळ केला त्याचीही उत्कृष्ट कल्पना कुन्ज्य रिव्हारच्या ह्या ग्रंथामुळें होते.

उपरोक्त Archivo नामक लेखसंग्रहाशिवाय Chronista de Tissuary हें ऐतिहासिक विषयास वाहिलेलें मासिक त्यानें सतत तीन वर्षें (१८६६-१८६९) चालविलें. त्यांत त्याचे कित्येक संशोधनात्मक लेख प्रसिद्ध

झाले आहेत. त्याचप्रमाणें Instituto Vasco da Gama ह्या मासिकामध्यें व Boletim do Govêrno ह्या सरकारी पत्रांत रिव्हार यानें संशोधनात्मक लिखाण छापलें आहे. Boletim do Govêrno मध्यें त्यानें प्रसिद्ध केलेले 'करारमदार' (Pazes e Tratados) पोर्तुगाल येथें बिकेर ह्या विद्वानानें चौदा भागांत स्वतंत्र छापले. हे 'करारमदार' हिंदुस्थानच्या इतिहासास फार उपयोगी असून मराठ्यांच्या इतिहासावर तर त्याच्या प्रसिद्धीमुळें महदुपकार झाले आहेत.

रिव्हार यानें उपरिनिर्दिष्ट लेखांशिवाय पोर्तुगीज, लॅटिन, फ्रेंच आणि इंग्रजी ह्या भाषांत लेखन केलें आहे. त्याचें स्वतंत्र ग्रंथकर्तृत्वही कांहीं थोडें नाहीं. त्यापैकीं Brados a favor das Comunidades हा ग्रामसंस्थेसंबंधींचा ग्रंथ आणि A Conjuração de 1787 em Goa म्हणजे 'सन १७८७ सालांतील गोमंतकांतील गुप्त कट' हीं दोन पुस्तकें वाचनीय आहेत.

रिव्हारनें कोंकणी भाषेचा अभ्यास गोव्यांत व्हावा एतदर्थ कांहीं वाङ्मय प्रसिद्ध केलें. Ensaio Histórico da Lingua Concanim म्हणजे 'कोंकणी भाषेसंबंधानें ऐतिहासिक प्रबंध' हा ग्रंथ लिहिला. रिव्हारनें कोंकणीचीं कांहीं जुनीं व्याकरणें व कोश छापून काढले. ह्या कामीं त्याला सूर्याजी आनंदराव ह्या विद्वान् हिंदूची मदत झाली. हीं कोंकणी भाषेचीं व्याकरणें व कोश भाषाशास्त्रदृष्ट्या उपयुक्त आहेत. कारण ते ग्रंथ सतराव्या शतकांत लिहिले गेले होते. त्यामुळें तत्कालीन मराठी भाषेच्या इतिहासाच्या अभ्यासू विद्वानांस दे ील ते ग्रंथ उत्कृष्ट साधनें होतील.

कुऱ्ज्य रिव्हारच्या काळीं दुसऱ्या एका काथोलिक विद्वानानें गोमंतकीय इतिहाससंशोधनकार्यांत बरीच मोठी कामगिरी केली. हा विद्वान् इकडील रहिवासी असून त्याचें नांव फिलिप नेरी शाव्हियेर हें होतें. ह्याचा जन्म सासष्टींतील लोटली गांवांत झाला. त्यानें पुष्कळ इतिहाससंशोधनात्मक लेख व पुस्तकें प्रसिद्ध केलीं. गोमंतकांतील जुन्या काबिजादीमधील ग्रामसंस्थेच्या इतिहासावर फिलिप नेरी शाव्हियेर ह्यानें लिहिलेला ग्रंथ सर्वमान्य आहे. तसेंच त्यानें 'गोमंतकांतील जुनीं नाणीं' हा प्रबंध परिश्रमपूर्वक लिहिला. गोमंतकाच्या इतिहासावर त्यानें इतकें वाङ्मय प्रसिद्ध केलें कीं, आजकाल त्याचें नांव कुऱ्ज्य रिव्हारप्रमाणें विख्यात झालें आहे. मार्केज द आलोर्न ह्या गोव्याच्या विजरईसंबंधाचा शाव्हियेर यानें प्रसिद्ध केलेला ग्रंथ वाचला म्हणजे गोमंतकाच्या इतिहासासंबंधींचें त्याचें ज्ञान केवढें मोठें होतें तें सहज लक्षांत येतें. O Gabinete Literário das Fontainhas नांवाचें मासिक सन १८४५-१८४८ च्या दरम्यान शाव्हियेरनें चालविलें होतें. त्याचे तीन भाग उपलब्ध आहेत.

गोमंतकांतील दप्तरामधील पुष्कळ कागदपत्र बाल्सेमांव नांवाच्या विद्वानानेंही छापले आहेत. त्यानें लिहिलेला 'Os Portugueses no Oriente' हा ग्रंथ वाचनीय असून त्याच्या तिसऱ्या भागांत मराठ्यांच्या आरमारी इतिहासासंबंधानें उपयुक्त अशी माहिती आहे.

कुऱ्ज्य रिव्हार, फिलिप नेरी शाव्हियेर व बाल्सेमांव यांचीं नांवें घेतल्यावर इज्माएल ग्रासीयश यांचें नांव सहज आठवल्याखेरीज राहत नाहीं. इज्माएल ग्रासीयश हा फिलिप नेरी शाव्हियेर ज्या गांवांत जन्मास आला त्या लोटली गांवचाच होय.

इज्माएल ग्रासीयश यानें इतिहासशास्त्राचा चांगला अभ्यास केला होता. त्यानें इतिहास-

संशोधनात्मक शेंकडों लेख लिहिले. O Oriente Português नामक इतिहास-संशोधनास वाहिलेल्या सरकारी मासिकांतील त्याचे बहुश्रुत लेख वाचले म्हणजे प्रासीयश यांच्या ज्ञानाबद्दल आदर वाटतो. त्यानें प्रसिद्ध केलेले पुढील ग्रंथ माहितीनें भरलेले आहेत:-

(१) "A Imprensa em Goa nos Séculos XVI, XVII e XVIII." म्हणजे "सोळाव्या, सतराव्या व अठराव्या शतकांतील गोमंतकामधील मुद्रणकला" हा ग्रंथ सन १८८० मध्यें प्रसिद्ध झाला.

(२) "Uma Dama Portuguesa na Côrte do Grão Mogol" म्ह. "मोंगल दरबारांतील एक पोर्तुगीज महिला" हा ग्रंथ सन १९०७ सालीं प्रसिद्ध झाला.

(३) "O Bispo de Halicarnasso" म्ह. "आलिकार्नासचा बिशप" सन १९०३.

ह्या शेवटल्या पुस्तकांत "आलिकार्नासचा बिशप" ह्या एका गोवानीज पाद्र्याचें हृदयंगम चरित्र दिलें असून त्या पुस्तकाचें हल्लीं फ्रेंचमधून भाषांतर झालें आहे. ह्या पाद्र्याचा संबंध पाँडिचरी येथील Dupleix ह्या अधिकाऱ्याकडे तसेंच हैदरअल्ली याकडे आला होता.

'मोंगल दरबारांतील एक पोर्तुगीज महिला' ह्या पुस्तकांत पोर्तुगीज लोकांचा मोंगलांकडे अकबराच्या कालापासून कसा संबंध आला आहे हें अस्सल साधनांवरून दाखविलें आहे. ह्या पुस्तकाचा त्रोटक सारांश पुणें येथील इतिहास-संशोधक मंडळाच्या एका पुस्तकांत मराठींत आला आहे.

'गोमंतकांतील मुद्रणकला' विषयक प्रासीयशचें पुस्तकही विद्वन्मान्य आहे.

सन १९१९ या सालीं इज्माएल प्रासीयश मरण पावला. O Oriente Portuguez चें संपादकत्व त्या सालपर्यंत त्याजकडे होतें. हें भारदस्त मासिक पुढें थोडे दिवस चालून बंद पडलें.

सन १९२५ सालीं गोवेकर सरकारनें Instituto Vasco da Gama ह्या विद्वत्सभेचें पुनरुज्जीवन केलें. निरनिराळ्या व्यक्तींच्यामार्फत होणाऱ्या कार्याला संघटित स्वरूप देण्याच्या हेतूनें ही संस्था जन्मास आली. या संस्थेमार्फत Boletim do Instituto Vasco da Gama हें त्रैमासिक निघतें. या त्रैमासिकाद्वारें आतांपर्यंत बराच मजकूर बाहेर पडला.

सन १९३१ त पुराणवस्तु-संशोधक कमिटीची सरकारनें पुनर्घटना केली. ह्या कमिटीमार्फत O Oriente Portuguez हें नियतकालिक पुन्हा चालू झालें. ह्याच सालीं ऐतिहासिक दप्तरखाना खुद्द पणजीच्या राजवाड्यांत स्थापण्यांत आला.

उपरोक्त दोन्ही संस्थांमध्यें संशोधन करणारी मंडळी प्रायः एकच आहे.

कुळ्ळ्य रिव्हारनें जी दिशा लावून दिली, ती अद्याप चालू आहे असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. गोव्यांत दर वर्षी अप्रसिद्ध असे शेंकडों कागदपत्र प्रसिद्ध होत असून इतिहास-रचनेचें काम तूर्त दिरंमाईवर पडलें आहे. राजकीय, लष्करी व आरमारी, वाङ्मयिक, आर्थिक, सामाजिक, धार्मिक, शास्त्रीय व कलाविषयक या निरनिराळ्या संशोधनांच्या शाखांत इकडील संशोधक व्यग्र असलेले दिसतात. त्रागांस पेरैर, आमांसियु प्रासीयश, जेरोनिमु कादुश, रिकार्दु तेलिश प्रभृति संशोधकांनीं बरीच माहिती पुढें आणून गोमंतकाच्या इतिहासावर उपकार केले आहेत. प्रस्तुत लेखकास वरील दोन्ही संस्थांत जागा असून ऐतिहासिक दप्तरखान्याचा तो क्युरेटर आहे. त्यामुळें त्यालाही ह्या

इतिहास-संशोधनाच्या कार्यास शक्त्यनुसार हातभार लावण्याची सुसंधि मिळाली आहे.

ब्रागांस पेरैर हे पणजीच्या हायकोर्टाचे न्यायाधीश आहेत. त्यांची बुद्धिमत्ता, विद्वत्ता आणि परिश्रम सुप्रसिद्ध असून त्यांनीं (१) Portuguezes em Baçaim म्हणजे वसईकडील पोर्तुगिजांचा इतिहास, (२) Portuguezes em Diu म्हणजे दीवमधील पोर्तुगिजांचा इतिहास, (३) História Religiosa de Goa म्हणजे गोव्याचा धार्मिक (काथोलिक) इतिहास वगैरे विषयांवर Oriente Portuguez मधून लेखमाला प्रसिद्ध केल्या आहेत. रिव्हारकृत Arquivo Portuguez Oriental या ग्रंथाच्या नवीन आवृत्तीचे कांहीं भाग संपादण्याची कामगिरी पुराणवस्तुसंशोधक कमिटीनें त्यांच्यावर सोंपविली असून, आजपर्यंत दोन भाग त्यांनीं प्रसिद्ध केले आहेत. व पुढील तिसरा भाग बाहेर पडण्याच्या बेतांत आहे. त्यांनीं ह्या भागांस ज्या भरपूर टिपा दिल्या आहेत त्या पाहतां त्यांच्या परिश्रमाचें कोणीही कौतुक केल्यावांचून राहणार नाहीं. गोव्याच्या इतिहासाचीं साधनें जिकडेतिकडे विखुरलीं आहेत. तीं पद्धतशीरपणें संकलित करण्याचें काम ब्रागांस पेरैर यांनीं आपल्याकडे घेतलें आहे.

आमांसियु प्रासीयश ह्यांचा गोव्याच्या आर्थिक इतिहासाचा अभ्यास खोल असून त्यांनीं या विषयावर Subsídios para a História Económica de Gôa नामक एक चांगला ग्रंथ लिहिला आहे. शिवाय Boletim do Instituto अगर Oriente Portuguez मधून 'इंग्लिश लोकांचा गोव्याकडील संबंध' (Os Ingleses em Goa) ह्या विषयावर, तसेंच फ्रेंच लोकांच्या हिंदुस्थानांतल्या इतिहासांतील एका प्रसंगावर त्यांनीं लेखमाला प्रसिद्ध केली आहे. अप्रसिद्ध कागदपत्र तर प्रासीयश यांनीं बरेच उजेडांत आणले आहेत.

काद्रुश या संशोधकाचे दीवच्या इतिहासाबरील लेख विद्वन्मान्य आहेत. रिकार्द तेलिश हे निरलस संशोधक असून त्यांनीं शेकडों पोर्तुगीज शिलालेख प्रसिद्ध केले आहेत.

डॉ. मारियान साल्दान्ज्य हे तूर्त लिस्बन येथें विश्वविद्यालयांत संस्कृतचे अध्यापक आहेत. त्यांचे गोव्यांतील मुद्रणकलेबद्दलचे लेख वाचनीय आहेत. हे लेख Boletim do Instituto Vasco da Gama मध्यें प्रसिद्ध झाले आहेत.

ह्याच विषयावर प्रो. फेर्नांदिश यांचेही लेख सदर मासिकांत छापले आहेत.

प्रस्तुत लेखकाच्या संशोधनासंबंधानें अतिशयोक्तिपर असे लेख पाहण्यांत आले. यामुळें स्वतःच्या संशोधन-कार्याची माहिती स्वतःच लिहिणें अगत्याचें झालें आहे. प्रस्तुत लेखकाचा पहिला मराठी लेख सन १९१७ सालच्या "विविधज्ञानविस्तारां"त प्रसिद्ध झाला आणि पहिला पोर्तुगीज निबंध १९१८ सालीं O Oriente Portuguez मध्यें छापला गेला. मराठी, पोर्तुगीज, इंग्रजी आणि फ्रेंच ह्या भाषांत प्रस्तुत लेखकाचें लिखाण प्रसिद्ध झालें आहे. पण त्याचे बहुतेक संशोधनात्मक लेख पोर्तुगीजमध्यें लिहिलेले असून ते प्रामुख्यानें O Oriente Portuguez अगर Boletim do Instituto Vasco da Gama ह्या संशोधनास वाहिलेल्या गोव्यांतील दोन नियतकालिकांमध्यें छापले आहेत. त्यांपैकीं कित्येक लेख पुस्तकरूपानें निराळे (Off-print) काढले आहेत.

ह्या लेखकानें पुढील पुस्तकें स्वतंत्रपणें प्रसिद्ध केलीं आहेत :-

(१) A antiga India e o mundo externo. 1922. (प्राचीन हिंदुस्थान आणि जग).

(२) Aspectos da civilização da India antiga. 1925. (प्राचीन भारतीय संस्कृतीचें स्वरूप).

(३) Shivaji Maharaj com sangue Português? 1922. शिवाजी महाराजांच्या अंगांत पोर्तुगिजांचें रक्त खेळत होतें काय? (खंडनात्मक विवेचन)

(४) Rustomji Maneckji. (रुस्तमजी माणकजी)

(५) Sindabur de Ibn Batuta आणि Ainda Sindabur de Ibn Batuta (इब्न बातूतचें 'सिंदबूर'–२ निबंध) सन १९३२.

प्रथमतः नियतकालिकांतून प्रसिद्ध करून नंतर निराळे काढलेले निबंध (Off-print) पुढील विषयांवर आहेतः–

[अ] पोर्तुगीज आणि मराठे यांचा संबंध

(१) A Extinção do Reino de Nizam Shah (निजामशाहीचा अंत.)

(२) A Idade de Murtiza Nizam Shah II (दुसऱ्या मुर्तिजा निजामशहाचें वय).

(३) Shivaji e Portugueses (शिवाजी आणि पोर्तुगीज).

(४) शिवाजी आणि पोर्तुगीज (शिवचरित्रप्रदीप).

(५) Shivaji and the Portuguese (Shivaji Souvenir).

(६) Attitude of the Portuguese towards Shivaji during the Campaigns of Shahistha Khan & Jaisingh (इंडियन हिस्टॉरिकल रेकॉर्ड कमिशनपुढें वाचलेला निबंध).

(७) Sambhaji e Portugueses (संभाजी आणि पोर्तुगीज).

(८) Prince Akbar & the Portuguese (इंडियन हि. रेकॉर्ड कमिशनपुढें वाचलेला निबंध).

(९) A Portuguese Embassy to Raygad (पुणें येथील भारतीय इतिहास-परिषदेंत वाचलेला निबंध).

(१०) Rajaram & Portuguese (राजाराम आणि पोर्तुगीज).

(११) Como se perdeu Baçaim (फिरंग्यांनीं वसई कशी घालविली?).

(१२) Maratas em Baçaim (वसईकडील मराठ्यांचा इतिहास).

(१३) Restauração da Provincia de Bardez e Salsete (बार्देश व सासष्टी या प्रदेशांतील फिरंग्यांच्या सत्तेची पुनःस्थापना).

(१४) Raghoba & the Portuguese (इं. हि. रे. कमिशनपुढें वाचलेला निबंध).

(१५) Um Frade Capucho na côrte de Puném (पुणें दरबारांतील एक कापूश पंथाचा पाद्री).

[आ] पोर्तुगिजांचे हिंदु वकील व त्यांचा पत्रव्यवहार

(१) Os primeiros Goeses em Portugal (पोर्तुगालमध्यें गेलेले पहिले गोवेंकर).

(२) Agentes Hindús da Diplomacia Portugueza na India (पोर्तुगिजांचे हिंदु वकील).

[६] फिरंग्यांच्या आगमनापूर्वीचें गोवें.

(१) O Etimo de Goa (गोवें या शब्दाची व्युत्पत्ति).

(२) Goa há 1500 anos (दीड हजार वर्षांपूर्वीचें गोवें).

(३) As Primitivas Capitais de Goa (गोव्याच्या जुन्या राजधान्या).

(४) O descobrimento dum Santuário Shivaita do Século XIV em Goa. (१४ व्या शतकांतील गोवें येथील एका शिवालयाचा शोध).

(५) Goubat, Macaji e Basovaraza. (गौबाट, मकाजी आणि बसवराज).

(६) Um passo de Cronista Barros elucidado à luz duma Inscrição sânscrita (इतिहासलेखक बार्रुश यांच्या ग्रंथांतील एका उताऱ्याचें स्पष्टीकरण).

[ई] किरकोळ

(१) Medicine Portugais dans l'Inde (पोर्तुगीज वैद्यकशास्त्राचा हिंदुस्थानांतील इतिहास).

(२) Túmulo de S. Francisco Xavier (सेंट झेवियरचें थडगें).

(३) Padre José Vás (पाद्री ह्युजे व्हाज).

(४) O Elemento Hindu da Casta Chardó(चाडी जातीचे हिंदु घटक).

(५) भारतपुत्र आबे द फारीय (प्रथमतः सन १९१८ त विविधज्ञानविस्तारांत प्रसिद्ध झालेला निबंध).

प्रस्तुत लेखकाच्या संशोधनात्मक लिखाणाची ही यादी देण्यावें कारण असें कीं, त्या बहुतेक लिखाणाचा गोव्याप्रमाणेंच महाराष्ट्राच्या इतिहासाशीं संबंध आहे.

हें संशोधन प्रायः अप्रसिद्ध व कित्येक वेळां दुष्प्राप्य अशा शेंकडों हस्तलिखित कागदपत्रांवरून तयार झालेलें आहे. त्या कामीं गोव्यांतील ऐतिहासिक दप्तरखान्यांतील अमूल्य कागदपत्र, सातारा येथील ऐतिहासिक म्युझियममधील पुस्तकसंग्रह, मुंबईच्या सेक्रेटरिएटमधील दप्तर, पुणें येथील भारत-इतिहास-संशोधक मंडळांतील दुर्मिळ ग्रंथ वगैरे लेखकानें शक्त्यनुसार अभ्यासिले असून लिस्बन, येव्हर, आज्युद, लंडन, पारीस, हेग आणि रोम येथील ग्रंथसंग्रहालयांतील व दप्तरखान्यांतील मराठ्यांच्या गोव्याकडील इतिहाससंबंधानें कित्येक हस्तलिखितें नकलवून आणिलीं आहेत.

उपरनिर्दिष्ट पोर्तुगीज निबंधांपैकीं कित्येकांचे बंगालींत, मराठींत, इंग्रजींत किंवा फ्रेंचमधून विस्तृत सारांश प्रसिद्ध झाले आहेत. शिवाजोवरील पोर्तुगीज निबंधाचा सर जदुनाथ सरकार, डॉ. बाळकृष्ण, रा. ब. गोविंदराव स. सरदेसाई, डॉ. सेन, द. वि. आपटे, प्रो. ओतूरकर, रा. ब. वैद्य प्रभृति संशोधकांनीं उपयोग केला आहे. 'संभाजी' त्यांचे निबंधाचा विस्तृत सारांश सर जदुनाथ सरकार यांनीं History of Aurangzeb मध्यें घेतला आहे. वसईवरील निबंधांतील पुष्कळ भाग रा. य. न. केळकर यांनीं आपल्या 'वसईची मोहीम' वरील मराठी पुस्तकांत अनुवादरूपानें आणला आहे. Rustomji Maneckji ह्या पुस्तकाचें इंग्रजी भाषांतर मुंबईच्या सेंट झेवियर कॉलेजमधील प्रो. सिल्वा यांनीं प्रसिद्ध केलें आहे. 'प्राचीन भारतीय संस्कृतीचें स्वरूप' हा ग्रंथ केवळ संकलनात्मक आहे. तरी पण लोव (पोलंड)

सारस्वत ब्राह्मण समाजाच्या वार्षिकोत्सवांचे अध्यक्ष

प्रो. वसंतराव नारायण नाईक, एम.ए.
(१९१९)

श्री. बाळकृष्ण सीताराम कामत, बी.ए.
(१९२०)

प. वा. न्यायशास्त्री भवानीशंकर सुखठणकर
(१९२१)

श्री. जिवाजी कृष्ण परुळकर, एफ.सी.आर.ए., जे.पी.
ऑनररी प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट. (१९२२)

श्री. श्रीनिवास नारायण कर्नाटकी
(१९२३)

COMANTAK BOMBAY, 4.

विश्वविद्यालयांतील संस्कृत पंडित प्रो. डॉ. स्टेफन स्ताक्षियक यांनीं आपल्या विद्यार्थ्यांस ह्या पुस्तकाची शिफारस केली आहे. शिवाजी-महाराजांसंबंधानें डॉ. फ्रागोझुनें केलेल्या विधानास ऐतिहासिक दृष्ट्या आतां कांहीं महत्व राहिलें नसून लिस्बन येथील विश्वविद्यालयांतील प्रो. डॉ. दाविद लोपिश (यांनीं सिवेल यास विजयनगरच्या इतिहासावरील पुष्कळ माहिती पुरविली) सारख्यांनीं डॉ. फ्रागोझु यांच्या विवेचनामध्यें 'ना ताळ ना तंत' (A tese do sr. Dr. Fragoso não tem pés nem cabeça) असे उद्गार काढले आहेत!

'चाड्डी जातीचे हिंदु घटक' ह्या पोर्तुगीज निबंधाचा मराठी अनुवाद प्रसिद्ध होणार आहे. बाकी राहिलेल्या कित्येक पोर्तुगीज निबंधांचा मराठी त्रोटक सारांश 'भारतमित्र' कर्ते वेळोवेळ उजेडांत आणीत आहेतच. विविध-ज्ञानविस्तार, भारतमित्र, प्रभात वगैरे मराठी मासिकांत लेखकांचीं कांहीं ऐतिहासिक टिपणें प्रसिद्ध झालीं आहेत तीं प्रायः पोर्तुगीज साधनांवरून लिहिलेलीं आहेत.

आतांपर्यंत उल्लेख केलेल्या इतिहाससंशोधकां-खेरीज कांहीं ख्रिस्ती व हिंदु विद्वानांचा निर्देश करावयाचा राहिलेला आहे. त्यांपैकीं मिगेल व्हिसेंत द आब्रेव, फिलोतेयु पेरैर द आंद्रादि, डॉ. जर्सन द कुञ्ज्य व जुजे निकोलाव द फोंसेक ह्यांचीं नांवें प्रामुख्यानें लक्षांत येतात. ह्या शेवटल्या दोघांनीं आपलें लिखाण इंग्रजींत लिहिलें. फोंसेककृत Historical Sketch of the City of Goa आणि डॉ. जर्सन द कुञ्ज्य यांचे 'मुंबईचा उगम', 'चौल व वसई', 'आंजेदीव' वगैरे इंग्रजी ग्रंथ विद्वन्मान्य आहेत. डॉ. जर्सन द कुञ्ज्य याचे नाणक-शास्त्रावरील ग्रंथही महत्वाचे आहेत. प. वा. दाल्गादु यांचे 'Concani não é dialecto do Marata' (कोंकणी ही मराठीची पोटभाषा नाहीं) शीर्षक निबंध वाचनीय आहेत.

"श्रीसप्तकोटीश्वर देवस्थानचा प्राचीन व अर्वाचीन इतिहास" हें पुस्तक रा. सरदेसाई यांनीं लिहिलें असून त्यांत सदर देवस्थाना-विषयीं बरीच माहिती संकलित केली आहे. हें पुस्तक लहानसें असलें तरी महत्वाचें आहे. शेळडेंकर बंधूंनीं 'गोमंतकांतील श्रीशांतादुर्गा संस्थानचा संक्षिप्त इतिहास' लिहिला असून त्यांतील कांहीं माहिती गोमंतकांतील इतिहास-संशोधकांस उपयुक्त होणार आहे. करंडेशास्त्री-कृत 'श्रीसंस्थान कैवल्यपुर मठाच्या संक्षिप्त इतिहासा'स जोडलेले ऐतिहासिक लेखही महत्वाचे आहेत.

रा. शणै गोंयबाब (वामनराव वर्दे वालावली-कर) ह्यांचें नांव त्यांनीं केलेल्या कोंकणी भाषेच्या सेवेमुळें सुविख्यात झालें आहे. कोंकणी भाषेस जें आज नवजीवन प्राप्त झालें आहे त्याचें श्रेय केवळ वामनरावांस आहे, असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. त्यांचें इतिहाससंशोधन-कार्यही मोठें असून त्याही दृष्टीनें गोमंतकीयांवर त्यांचे फार उपकार झाले आहेत. 'गोंयकारांची गोंयाभायली वसणूक' आणि 'कोंकणी भाशेचें जैत' हीं त्यांचीं दोन पुस्तकें प्रसिद्ध आहेत. 'नवें गोंय' व 'विविधज्ञानविस्तार' ह्या नियतकालिकांतील त्यांच्या कित्येक लेखांचेंही स्वतंत्र पुस्तक प्रसिद्ध होणें अगत्याचें आहे. असो.

गोव्याच्या पोर्तुगीज-कालीन इतिहासाचें संशोधन हिंदु विद्वानांपेक्षां ख्रिश्चन विद्वानांनींच अधिक केलें आहे असें वरील माहितीवरून सहज दिसून येईल. तथापि या बहुतेक साऱ्याच ख्रिश्चन विद्वानांना मराठी आदिकरून पौर्वात्य भाषांचें ज्ञान नसल्यानें त्या भाषांतील अस्सल साधनें त्यांना स्वतः तपासतां येत नाहींत.

त्यामुळें, त्यांच्या संशोधनांत सहजच एकांगीपणा राहून जातो व प्रसंगीं त्यांचीं अनुमानें सपशेल चुकीचींही ठरणें संभवनीय असतें. यासाठीं युरोपियन भाषांबरोबरच देशी भाषांचें ज्ञान असणाऱ्या इतिहाससंशोधकानेंच गोव्याचा इतिहास लिहिला तर तो विशेष विश्वसनीय उतरेल असें म्हणावें लागतें. सारस्वत ब्राह्मण समाजाच्या सुवर्णमहोत्सवाच्या प्रसंगीं तरी गोव्याचा सुसूत्र, सुसंबद्ध व सर्वांगीण असा इतिहासग्रंथ, एकाद्या विद्वान् हिंदु संशोधकाच्या हातून निर्माण होवो अशी सदिच्छा आम्ही सर्वच व्यक्त करूंया!

४

हिंदु स्त्रियांच्या हक्कांची वाढ

श्री. जनार्दन विष्णु कामत

गोमंतक या नांवानें ओळखला जाणारा प्रदेश हा आज अकरा महालांनीं बनलेला असून जुनी काबिजाद व नवी काबिजाद असे त्याचे दोन विभाग आहेत. तिसवाडी, बार्देश, सासष्टी व मुरगांव हे महाल जुन्या काबिजादींत आणि फोंडा, केपें, सांगें, काणकोण, सांखळी, सत्तरी व पेडणें हे महाल नव्या काबिजादींत मोडत आहेत. सन १५१० सालीं गोवा बेट म्हणजे तिसवाडी महाल प्रथमतः पोर्तुगिजांच्या ताब्यांत आला. त्यापूर्वी आदिलशाहीची सत्ता त्या महालावर चालत असे. तेव्हां तेथील हिंदु प्रजा कुटुंबव्यवस्था, संपत्तीची वांटणी, वारसाहक्क वगैरेंच्या बाबतींत परंपरागत व धर्मशास्त्रानुसार रूढ असलेल्या चालीरीतींस धरून आपले व्यवहार चालवीत असे. पोर्तुगीज सरकारनें त्या व इतर महालांतील पंडितांच्या साह्यानें त्या चालीरीती संकलित करून १६ सप्टेंबर १५२६ तारखेस एक जाहीरनामा प्रसिद्ध केला. त्यांत पूर्वीच्या राजवटींत चालू असलेले ग्रामसंस्थांचे आणि त्यांच्या गांवकऱ्यांचे अधिकार दिग्दर्शित करून संपत्तीची विभागणी व वारसा यांचे हक्क पूर्वीप्रमाणें फक्त पुरुषांपुरतेच राखण्याचें आश्वासन देण्यांत आलें होतें.

सन १५४३ सालीं बार्देश व सासष्टी-मुरगांव हे महाल पोर्तुगिजांच्या ताब्यांत आल्यावर वरील जाहीरनामा तेथील रहिवाशांसही लागू करण्यांत आला. पुढें सन १५५६ च्या सुमारास बाटाबाटीचें सत्र सुरू झालें आणि उपरोक्त महाल म्हणजे सध्याची जुनी काबिजाद ख्रिस्तीमय झाली. तेव्हां हिंदु चालीरीतींचें उच्चाटन करून नवख्रिस्ती प्रजेसाठीं पोर्तुगालांत त्यावेळीं अंमलांत असलेले कायदे सरकारनें लागू केले. सन १६९१, १६९५, १७४०, १८१८ व १८३४ या सालांत पोर्तुगालांतील कायदे वारंवार बदलण्यांत आले तेव्हां त्यांचा अंमल जुन्या काबिजादींत जारीनें होऊं लागला. या भागांत ख्रिस्ती धर्मप्रसारार्थ वरचढपणानें अंमल गाजविणारी "धर्मसमीक्षण-सभा" नामशेष होऊन सक्तीच्या बाटाबाटीचा पूर ओसरूं लागल्यावर तेथें हिंदु लोक परत वस्ती करण्यास आले. तेव्हां त्यांसही ख्रिस्ती प्रजेस लागू झालेले कायदे पाळण्याखेरीज गत्यंतर नव्हतें. परंतु, अविभक्त कुटुंबपद्धतीचे भोक्ते जे हिंदु लोक त्यांस कुटुंबांतील एका व्यक्तीच्या मरणानंतर होणारी सक्तीची वांटणी मानवली नाहीं म्हणून त्यांनीं पोर्तुगीज बादशहाकडे तक्रारअर्ज केले. त्यांचा इष्ट परिणाम होऊन ता. २३ फेब्रुवारी १७७९ चें बादशाही फर्मान निघालें आणि तेव्हांपासून अविभक्त हिंदु कुटुंबांतील संपत्तीची वांटणी सक्तीनें होण्याचे बंद झालें. पणजी येथील प्रसिद्ध म्हामाय कामत यांच्या घराण्यांत अद्याप ती प्रथा चालू असून त्या घराण्याच्या संपत्तीचा सर्व तऱ्हेचा कारभार वयोवृद्ध पुरुष व्यक्तीच्या नांवानें कायदेशीरपणें चालत असतो.

सन १७४१ सालीं पो. सरकार व श्री. मौदेकर राजे यांच्यामध्यें झालेल्या तहाअन्वयें

चंद्रवाडी महालांतील (सध्याच्या केपें महालांतील) पारोडें, मुळें व तळवडें हे तीन गांव पोर्तुगिजांच्या मालकीचे झाले. ते शेजारच्या सासष्टी महालास जोडल्यामुळें त्या गांवच्या रहिवाशांस जुन्या काबिजादींतील प्रजेस लागू असलेले कायदे पाळणें भाग झालें.

सन १७६३ ते १७८३ या काळांत नव्या काबिजादींतील फोंडा वगैरे महाल पोर्तुगीज अंमलाखालीं आल्यावर वेळोवेळ म्हणजे, ता. ५ जून, ५ आगस्ट व १२ सप्टेंबर १७६३ आणि ता. २५ आगस्ट व १५ सप्टेंबर १७८१ असे जाहीरनामे प्रसिद्ध करून पो. सरकारनें तेथील ग्रामिक अधिकार, करपद्धति, वारसाहक्क वगैरेसंबंधींच्या चालीरीती परंपरागत पद्धतीनुसार चालू ठेवण्याचीं आश्वासनें दिलीं.

ता. १५ जानेवारी १७७४ च्या बादशाही सनदेनें फोंडा महालांतील प्रजेच्या चालीरीतींस धक्का न लावण्याचें सरकारनें आश्वासन दिलें. आणि त्यांची व्यवस्थित माहिती सरकार व प्रजा या उभयतांसही नसल्यानें, महालसंस्थांच्या (Câmara) व तज्ज्ञ लोकांच्या बैठका बोलावून त्यांच्या सल्ल्यानें चालीरीतींचें संकलन करण्याकरितां नव्या काबिजादीचे न्यायाधीश-देझेंबार्गादोर आंतोनियु रिबैर कार्व्हाल्यु यांची नेमणूक करण्यांत आली. त्यांनीं महालसंस्था-मंडळांकडे आणि हिंदु समाजांतील निष्णात लोकांकडे वारसाहक्क, दत्तकविधान, दानपत्र, मृत्युपत्र, शपथविधि, साक्षीपुरावे वगैरेसंबंधीं १७ प्रश्नांची मालिका पाठवून त्यांचीं उत्तरें मागविलीं. फोंडा, डिचोली व पेडणें येथील महालसंस्था-मंडळांनीं त्या प्रश्नमालिकेवर चव्वेचाळीस कलमी उत्तर दिलें. तेंच त्या वेळच्या व्हाइसरॉयांनीं आपल्या १८ नोव्हेंबर १८२४ तारखेच्या आज्ञापत्रानें चालीरीती व रूढी म्हणून अंमलांत आणलें. त्यानंतर फोंडा महालसंस्था-मंडळानें (Câmara Geral) पंचायतपद्धति, वारसाहक्क, अंमलबजावणी, अनाथ – वेश्याव्यवसायी– व्यभिचारिणी स्त्रिया आणि कौमार्यावस्थेंत जन्मलेलीं मुलें यांसंबंधीं आणखी एक दहा कलमी पुरवणी तयार करून पाठविली; तर इतर महालसंस्था-मंडळांनीं सतरा कलमी पुरवणी २२ मे १८२५ तारखेस पाठवून तिला कायद्याचें स्वरूप देण्याची शिफारस केली. परंतु, व्हाइसरॉयांनीं त्या अमान्य करून अप्रासंगिक असल्याचें महालसंस्था-मंडळांना कळविलें.

वरीलप्रमाणें नवीन काबिजादींतील हिंदु चालीरीतींचें संकलन सरकारी रीत्या झालें तरी हरतऱ्हेच्या व्यवहारांचें नियमन करण्याइतकें पूर्णत्व व स्थैर्य त्या संकलनास आलें नाहीं. हें जाणून, ना. गोव्हेर्नादोर जेराल यांनीं आपल्या ता. २१ मार्च १८५१ च्या फर्मानानें त्या चालीरीतींचा कायदा तयार करण्यासाठीं पुढील गृहस्थांचें एक मंडळ निवडलें :– अध्यक्ष:- तिसवाडी विभागाचे न्यायाधीश ज्योआकीं आंतॉनियु द मॉराइश कार्नेरु; सभासद :- सासष्टी विभागाचे न्यायाधीश ज्योआकीं आउगूश्त द फ्रैतश मोंज, मुख्य सरकारी वकील जुझे बेर्नार्दु कुलासु, कॉनिगु पावलु आंतॉनियु दीयश द कोंसैसांव, वकील जुझे द मिनेझिश, मुलकी खात्यांतील अधिकारी फिलीप नेरी शाव्हियेर आणि चिटणीस :- वकील फ्रांसीश्क द आस्सीश्च द पियेदाद रिबेलु.

या मंडळानें महालसंस्था-मंडळें (Câmaras agrárias), ग्रामसंस्था-मंडळें त्याचप्रमाणें त्या विषयांतील तज्ज्ञ व अनुभवी लोकांचा सल्ला घेऊन नवीन काबिजादींतील हिंदु लोकांच्या व्यवहारांचें नियमन करण्यासाठीं म्हणून एक कायद्याचा मसुदा बनविला. तो ना. गोव्हेर्नादोर जेराल, व्हिश्कोंदि द व्हील नॉव्ह द ओवरें यांनीं ता. १४ आक्टोबर

१८५३, क्र. १४५ च्या फर्मानानें पसंत करून १ नोव्हेंबरपासून अंमलांत आणला. १५ विभागांच्या आणि १२२ कलमांच्या या कायद्यास पुढें ४ डिसेंबर सन १८६५ च्या फर्मानानें बादशाही संमति मिळाली.

त्यानंतर १ जुलै सन १८६७ तारखेस पोर्तुगालांत दिवाणी कायदा (Código civil) अंमलांत येऊन तो ता. १८ नोव्हेंबर १८६९ चें बादशाही फर्मान, कलम ८ चें पहिलें पोटकलम, याच्याअन्वयें सर्व वसाहतींस लागू करण्यांत आला. त्यामुळें दिवाणी कायद्याच्या सदरांत येणारे पूर्वीचे सर्व कायदे रद्द झाले. तथापि गोव्यांतील नवीन काबिजादींत जारी असलेला हिंदु चालीरीतींचा कायदा आणि दमण व दीव येथील ख्रिस्तीतरांसंबंधींचे कायदे अंमलांत राहतील असा अपवाद नव्या कायद्यांत सांगितला होता.

जुन्या काबिजादींतील हिंदूंस ख्रिस्त्यांप्रमाणें वरील दिवाणी कायदा अर्थातच लागू होऊन संपत्तीची विभागणी, वारसाहक्क वगैरे बाबतींत त्या कायद्यानुसार निर्णय व्हावा लागला, तरी कुटुंबरचना, विवाहसंस्कार, दत्तकविधान, शपथविधि इत्यादि धार्मिक कक्षेंत संभवणाऱ्या बाबी नवीन काबिजादींतील हिंदु चालीरीतींच्या कायद्यानुसार ठरविण्यास, सरकारी पत्रक अं. ५९ वर प्रसिद्ध झालेल्या ता. १ आगस्ट १८७० क्र. १७५ च्या सरकारी फर्मानानें संमति दिली होती.

नवीन काबिजादींतील हिंदु चालीरीतींच्या कायद्याचा अपुरेपणा, विशेषतः स्त्रियांविषयींची त्याची उपेक्षा लक्षांत घेऊन, त्यांत दिवाणी कायद्यानुसार योग्य सुधारणा सुचविण्यासाठीं ता. ३१ मे १८७८ क्र. २८६ च्या बादशाही फर्मानानें पुढील गृहस्थांचें एक मंडळ निवडण्यांत आलें:- अध्यक्षः- ना. तोमाज एन्. द सेर्र इ मौर, वरिष्ठ न्यायालयाचे सरन्यायाधीश; सभासद :- माज्योर, मिगेल आ. द लेमुश पिमेंतेल, तिसवाडीचे मामलेदार; तेनेंति इंजिनियर, जुझे एफ्. द आस्स काश्तेल ब्रांकु; प्रो. लुईश एम्. ज्यूलियु फ्रेदेरीकु गोंसाल्व्हेश; श्री. सूर्याजी आनंदराव, सरकारी दुभाषी आणि चिटणीस :- मुलकी खात्यांतील कारकून जुझे क्रिस्तोव्हंव पींतु. या मंडळानें पूर्वीच्या कायद्यांत फेरफार करून जो मसुदा तयार करून दिला तो १६ डिसेंबर १८८० च्या बादशाही फर्मानानें कायद्याच्या स्वरूपांत येऊन ता. २७ जानेवारी १८८१ पासून अंमलांत आला. नव्या स्वरूपांतील हा कायदा नवीन काबिजादींतील हिंदूंपुरताच न राहतां त्याची व्याप्ति गोमंतकांतील सर्व हिंदु समाजाइतकी वाढविण्यांत येऊन त्यास पतिपत्नींच्या सहभागित्वाच्या बाबतींत, विवाहपूर्व करार नसेल तर ११०८ ते ११२४ आणि वारसाहक्काच्या बाबतींत १९६९ हीं दिवाणी कायद्याचीं कलमें लागू करण्यांत आलीं.

या शेवटच्या १९६९ व्या कलमांत ३१ आक्टोबर १९१० च्या लोकसत्ताक सरकारच्या फर्मानानें बदल करून संततीच्या किंवा आईबापांच्या अथवा आज्यापणज्यांच्या अभावीं जो वारसाहक्क भावंडें किंवा त्यांची संतति यांकडे जावयाचा तो पतिपत्नींपैकीं हयात असणाऱ्याकडे जावा असें ठरविण्यांत आलें. पति किंवा पत्नी हयात असतांना भावंडांकडे किंवा त्यांच्या संततीकडे वारसाहक्क जाऊं नये म्हणून केलेला बदल इष्टफलदायी झाला नसल्याचा अनुभव नंतरच्या वीस वर्षांच्या कालांत आला. आपल्यामागें पत्नीकडे वारसाहक्क जाण्याचा संभव जाणून कित्येक नवऱ्यांनीं देवगीपत्रांनीं किंवा मृत्युपत्रांतून संपत्तीचा आपला अर्धा वांटा आपल्या भाऊबंदांस दिल्याचीं बरींच उदाहरणें

घडून आली. हें जाणून सर्वाधिकारी सरकारनें १९३१ सालीं, वीस वर्षांपूर्वी केलेला बदल रद्द करून भावंडें व त्यांची संतति यांच्या अभावीं वारसाहक्क पतिपत्नींपैकी हयात व्यक्तीकडे जावा असें ठरवून अंमलांत आणलें. मात्र पति किंवा पत्नी यांच्या हयातींत वारसाहक्क भावंडांकडे जावयाचा झाला तर तदनुषंगिक संपत्तीच्या वहिवाटीचा अधिकार पति किंवा पत्नीकडे हयातींत राहण्याची तरतूद या नव्या कायद्यानें केली आहे. यानंतरच्या कालांत सहभागित्व, वारसाहक्क किंवा संपत्तीची विभागणी यांसंबंधीं कांहीं फरक झाला नसून तूर्त वरील-प्रमाणेंच अंमलबजावणी चालू आहे.

वर दिलेल्या माहितीवरून पोर्तुगीज अंमलाच्या जवळजवळ सव्वाचार शतकांच्या कालांत वारसाहक्क, सहभागित्व व संपत्तीची विभागणी यांच्या बाबतींत कोणकोणते कायदे झाले हें वाचकांच्या लक्षांत येईल. आतां त्या कायद्यांतून स्त्रीपुरुषांच्या सांपत्तिक हक्कांसंबंधीं कोणकोणतीं तत्वें ग्रथित केलीं होतीं व आज त्यांची प्रगति कितपत झाली आहे हें पाहिलें पाहिजे.

पोर्तुगिजांचा अंमल येथें सुरू होण्यापूर्वी आणि नंतर १५५६ सालीं, हिंदु प्रजेचें ख्रिस्तीकरण होण्याच्या कालापर्यंत, जुनी काबिजाद म्हणजे तिसवाडी, बार्देश व सासष्टी-मुरगांव या महालांत वारसाहक्क, संपत्तीची विभागणी वगैरेसारखे कौटुंबिक व्यवहार परंपरागत चालीरीतींस अनुसरून चालत असल्याचें मागें सांगितलेंच आहे. त्या चालीरीती कशा पद्धतीच्या होत्या हें समजण्यास **नव्या काबिजादींतील ख्रिस्तीतर रहिवाशांच्या चालीरीतींचा कायदा** (क्र. १४५, ता. १४-१०-१८५३) पाहणें अगत्याचें आहे. या कायद्यांत स्त्रियांना कोणत्याही नात्यानें वारसाहक्क नव्हता त्याचप्रमाणें पतीशीं विवाहोत्तर भागिदारी नव्हती. उलट, मृताच्या पाठीमागें त्याच्या कुटुंबांतील किंवा घराण्यांतील सातव्या पिढीपर्यंत पुरुष वारस नसला तर मुलीचे मुलगे अथवा त्यांच्या अभावीं नातीचे मुलगे वारस मानले होते. अशा परिस्थितींत कुटुंबांतील विधवा स्त्रियांना पोटगीचा म्हणजे अन्नवस्त्राचा अधिकार होता. शेवटच्या सातव्या पिढींतील वारसाच्या अभावीं मृत पतीची संपत्ति सरकारजमा होण्याच्या स्थितींत असली तर मात्र त्या संपत्तीच्या आजन्म वहिवाटीचा हक्क विधवांना राखून ठेवण्यांत आला होता.

एकंदरींत त्या कायद्याअन्वयें पुढीलप्रमाणें वारसाहक्कदार ठरविले होते :- (१) पुरुष संतति (मग ती कितव्याही पत्नीपासून झालेली असो किंवा दत्तकविधानानें घेतलेली असो), (२) भाऊ किंवा त्याची पुरुष संतति, (३) चुलते किंवा त्यांची पुरुष संतति, (४) सातव्या पिढीपर्यंतचे पुरुष दायाद. अविभक्त कुटुंबव्यवस्था असली तर कुटुंबाच्या संपत्तीची वहिवाट कुटुंबाच्या मालकाच्या नांवें चालत असे. त्या कुटुंबांतील एखादा वर्गी मृत झाला तर त्याच्या संपत्तीचा वारसा जवळचा विभक्त वारस असतांनासुद्धां कुटुंबाकडे येत असे. कोणत्याही स्थितींत मृत्युपत्रानें किंवा देणगीपत्रानें कायदेशीर मर्यादेंत म्हणजे, पुरुष संतति असल्यास एक तृतीयांश हिश्शाचा आणि नसल्यास इच्छेनुसार संपत्तीचा वारसदार करतां येई. त्यांची अंमलबजावणी मरणानंतर होई.

हा कायदा जुन्या काबिजादींतील ख्रिस्ती प्रजेस लागू नव्हता. तिच्या व्यवहारांचें नियमन करणारे कायदे वरचेवर पोर्तुगालांतून रवाना होत असत. या कायद्यांत वारंवार फेरफार होत असत. पण सन १५८१ ते १६४० या साठ वर्षांच्या कालांत लागोपाठ सिंहासनाधिष्ठित झालेले पहिले, दुसरे व तिसरे दों फिलीप बादशाहा, यांच्या राजवटींत

निघालेल्या तद्विषयक आज्ञापत्रांत (Ordenações Filipinas) प्रस्थापित झालेलें मूळ धोरण सुटत नसे. त्या काळीं इतर बहुतेक उदयोन्मुख युरोपियन राष्ट्रांतील कायदे स्त्रियांचें विवाहोत्तर सहभागित्व व वारसाहक्क यांच्या बाबतींत फारसे अनुकूल नव्हते, परंतु पोर्तुगीज राष्ट्रानें स्त्रियांना हक्कांचें दान करण्याच्या बाबतींत फारशी कसुर केली नाहीं. सहभागित्व व वारसाहक्क यांच्यापुरती स्त्रीपुरुषांची भूमिका समतेचीच असे. मात्र कांहीं मर्यादेपेक्षां अधिक श्रीमंत अशा घराण्यांत बादशहांच्या खास अनुज्ञेनें, वडील मुलाला संपत्तीचा एकुलता एक वारस (Morgado) बनविण्याचा हक्क असे. सर्व बाबतींत युरोपियन राज्यकर्त्यांचें अनुकरण करण्यांत भूषण मानणाऱ्या येथील ख्रिस्ती समाजांत 'मोर्गाद' या नांवानें ओळखलीं जाणारीं जीं कित्येक बडीं घराणीं ठिकठिकाणीं दिसून येतात तीं म्हणजे त्या हक्काची बजावणी त्या घराण्यांतून केली असल्याचा दाखलाच होय. जुन्या काबिजादींतील हिंदु लोकांची अनुकरणप्रियता त्या काळीं आजच्याइतकी शिगेस पोंचली नव्हती म्हणून म्हणा किंवा बाटाबाटीच्या सत्रांत जमीनजुमला, ग्रामसंस्थांचे हक्क, व्यापारउद्योग, घरदार वगैरे मालमत्ता गमावावी लागल्यानें श्रीमंतीची ठराविक मर्यादा उल्लंघन करतां न आल्यावरून म्हणा, हिंदु समाजांत ही 'मोर्गादीये'ची चाल शिरली नाहीं.

वरील सर्व कायद्यांस निश्चित व व्यवस्थित स्वरूप देणारा आणि हिणकस भाग गाळून त्यांस एकसूत्री व उजळ बनविणारा अस **सन १८६७ चा दिवाणी कायदा** (Código Civil Português) पोर्तुगालांत होऊन सन १८६९ च्या बादशाही आज्ञापत्रानें सर्व वसाहतींत अंमलांत आला. या कायद्यानें ख्रिस्ती समाजांतील व जुन्या काबिजादीमधील हिंदु समाजांतील स्त्रीपुरुषांस असलेले सहभागित्वाचे व समान वारसदारीचे हक्क कायम राखले. परंतु, नव्या काबिजादींतील हिंदु स्त्रियांना त्या हक्कांच्या बाबतींत पूर्वीप्रमाणेंच परावलंबी ठेवलें. ही परिस्थिति पालटण्यास **सन १८८० चा गोमंतकीय हिंदूंच्या चालीरीतींचा कायदा** जन्मास येऊन सहभागित्व व वारसदारी यांच्या बाबतींतली जुन्या-नव्या काबिजादींमधीलच नव्हे तर हिंदु-ख्रिस्त्यांमधीलही विषमता गाडून टाकली गेली.

सन १८६७ चा दिवाणी कायदा, सन १८८७ चा चालीरीतींचा कायदा व त्यानंतरचे लोकशाही अंमलांतील सन १९१० व १९३१ चे कायदे जमेस धरून सध्या गोमंतकीय स्त्रीपुरुषांना सहभागित्वाचे व वारसदारीचे हक्क कोणकोणते व कसकसे आहेत, हें सांगणें आवश्यक आहे.

सहभागित्व

(१) स्त्री आणि पुरुष यांचा कायदेशीर (नोंदणीनें) विवाह होतांच उभयतांस सहभागित्वाच्या तत्वावर, एकमेकांच्या मागील व पुढील संपत्तीचा मालकी हक्क प्राप्त होतो.

(२) मरण, विवाहविच्छेद (Divórcio) किंवा भागीदारीच्या मोकळिकीचा दावा (Separação de bens e pessoa) यांनीं ही भागीदारी मोडली जाते.

(३) पति हा कुटुंबाचा मालक मानला गेल्यानें त्याला सर्व संपत्तीची स्वयंसिद्ध वहिवाट करतां येते. तो परदेशांत असल्यास तो हक्क पत्नीकडे येतो.

(४) संपत्तीच्या मालकीसंबंधींचे व्यवहार किंवा सरकारदरबार करण्यास विवाहित स्त्रियांस पतीची अनुज्ञा लागते.

(५) विवाहपूर्व करारानें सहभागित्व गैरलागू समजून पतिपत्नींस स्वतंत्र मालकी प्रस्थापित करतां येते.

(६) प्रथम पत्नीच्या किंवा पतीच्या मरणोत्तर, विवाहविच्छेदोत्तर किंवा कायदेशीर विभागणीनंतर औरस संतति असल्यास द्वितीय संबंधाच्या पतिपत्नींस मृताच्या संपत्तींतून अर्धा हिस्सा न मिळतां तिसरा हिस्सा मिळतो.

(७) हिंदु समाजांत, संततीखेरीज पत्नीला २५ वर्षें उलटलीं असल्यास किंवा पुरुष संततीखेरीज तीस वर्षें होऊन गेल्यास अथवा मासिक विटाळ बंद होऊन दहा वर्षें गुदरलीं असल्यास पतीला तिच्या हयातींत द्वितीय संबंध करतां येतो. मात्र त्यासाठीं वरील कारणें पटवून न्यायाधीशाची अनुज्ञा किंवा प्रथम पत्नीची कायदेशीर संमति मिळवावी लागते.

(८) अशा संबंधाच्या स्त्रियांचे सहभागित्वाचे हक्क समसमान मानले जाऊन पत्नी या नात्यानें पतीच्या संपत्तींतील अर्धा हिस्सा त्या स्त्रियांमध्यें समप्रमाणांत विभागला जातो.

(९) गोमंतकांतील मुसलमान समाजांतील बहुपत्नीकत्वाची चाल क्रमांक ७ व ८ यांतील निर्बंधांखालीं कायदेशीर मानली आहे.

(१०) पतीच्यामागें संपत्ति नसेल तर विधवा स्त्रियांना कुटुंबांतील संपत्तीच्या मानानें पोटगी मागतां येते.

(११) पतीच्या मरणोत्तर, त्याला वडिलांच्या किंवा इतर नातेवाईकांच्या मरणानें मिळालेल्या संपत्तींत विधवांना भागिदारी मिळत नसून तिचा हक्क पतीच्या संततीस किंवा इतर कायदेशीर वारसांस प्राप्त होतो.

वारसाहक्क

मरणकाळीं असलेल्या संपत्तीचा हिस्सा सहभागी या नात्यानें पतिपत्नींपैकीं हयात व्यक्तीकडे जावयाचा तो जाऊन राहिलेल्या हिश्शाचे अनुक्रमें पुढीलप्रमाणें वारस समजले जातातः—

१ औरस संतति.

२ आईबाप किंवा त्यांचे वडील.

३ भावंडें किंवा त्यांची औरस संतति.

४ हयात पत्नी किंवा पति.

५ चुलतभावंडें, आतेभावंडें, मामेभावंडें, मावसभावंडें किंवा त्यांची औरस संतति.

६ इतर सहाव्या पिढीपर्यंतचे नातेवाईक आणि यांच्या अभावीं सरकार.

क्रमांक १ आणि २ यांत दर्शविलेल्या वारसांच्या अभावीं भावंडांस किंवा त्यांच्या औरस संततीस मिळणाऱ्या संपत्तीची वहिवाट करून आजन्म उपभोग घेण्याचा अधिकार हयात पत्नीस किंवा पतीस सन १८३१ च्या कायद्यानें सांप्रतच्या सर्वाधिकारी सरकारनें राखून ठेविला आहे. या परिस्थितींत पतिपत्नींपैकीं हयात व्यक्तीस सन १९१० सालच्या कायद्यानें लोकशाही सरकारनें दिलेला हक्क या १९३१ च्या कायद्यानें काढून घेऊन त्यांस चौथ्या क्रमांकांत बसविलें आहे. मात्र आजन्म वहिवाटदारीचे व उपभोगाचे हक्क राखून ठेविले असल्याचें मागें सांगितलेंच आहे.

अनौरस संतति

अनौरस संतति औरस बनविण्याचा हक्क ख्रिस्ती समाजास आहे. तसा तो हिंदु समाजास नाहीं. सन १८८० च्या चालीरीतींच्या कायद्यांतील ९ व्या कलमानें स्पष्ट मनाई केली असून वेश्यांस व इतर अविवाहित स्त्रियांस मात्र त्यासंबंधीं अपवाद सांगितला आहे.

असें असलें तरी अनौरस संतति कायदेशीर रीत्या औरस मानल्याचा दाखला देतां येईल. वेश्येपासून झालेल्या मुलांस औरस बनवून त्यांस आपणास असलेले ग्रामसंस्थेचे अधिकार एका हिंदु गृहस्थानें मिळवून दिले. ग्रामसंस्थेच्या इतर वर्ग्यांनीं त्यावर उच्चारित ९व्या कलमाचा

आधार दाखवून वसाहतींच्या वरिष्ठ सल्लागार-मंडळापर्यंत तक्रार नेली. परंतु लोकशाहीच्या कारकिर्दीत सन १९१० सालीं अंमलांत आलेल्या कौटुंबिक कायद्याकडे (Lei de família) बोट दाखवून मंडळानें तक्रार धुडकावून लाविली. वेश्या व इतर अविवाहित स्त्रियांना आपल्या मुलांची जन्मनोंद करतांना हा औरसीकरणाचा विधि स्वतः येऊन करावा लागतो.

दत्तकविधान

पुरुष संततीच्या अभावीं दत्तक पुत्र घेण्याचा अधिकार धर्मशास्त्रानें हिंदु समाजास दिला असल्यानें हिंदु समाज तो अधिकार प्राचीन काळापासून बजावीत आला आहे. सन १८५३ सालच्या नवीन काबिजादीपुरत्या अंमलांत आलेल्या कायद्यानें त्या अधिकारास संमति दिल्यावर सन १८७० सालच्या उपरिनिर्दिष्ट फर्मानानें हा दत्तकविधानाचा अधिकार जुन्या काबिजादींतील हिंदूंनाही दिला होता. त्यानंतरच्या १८८० च्या चालीरीतींच्या कायद्यानें त्या अधिकाराची व्याप्ति उभय काबिजादींतील हिंदूंपुरती न ठेवतां सर्व ख्रिस्तीतरांपर्यंत वाढविली आहे.

विधवा स्त्रीनें किंवा विधुर पुरुषानें घेतलेल्या दत्तक मृत पतीचा किंवा पत्नीचा वारस ठरत नाहीं. मात्र मरणापूर्वी मान्यता दिली असल्यास तो उभयतां पतिपत्नींचा वारस ठरेल.

वेश्या व तत्सम स्त्रिया यांसही संततीच्या अभावीं आपापल्या नातेवाइकांतून दत्तक घेण्याचा अधिकार आहे.

विवाहविच्छेद

सन १८५३ च्या आणि १८८० च्या चालीरीतींच्या कायद्यांत पत्नीचा व्यभिचार न्यायाधीशापुढें सिद्ध केल्यानंतरच विवाहविच्छेद करून घेण्याचा अधिकार हिंदु पुरुषांना दिलेला आहे. येथील ख्रिस्ती समाज आणि पोर्तुगालचें बादशाही सरकार काथोलिक धर्माचें कट्टे अभिमानी असल्यामुळें आणि त्या धर्मास विवाहविच्छेदाचें वावडें असल्यामुळें या बाबतींत त्या काळीं कायदा होऊं शकला नाहीं. व्यभिचार, महारोग वगैरेसारखीं कारणें असल्यास फार तर पतिपत्नींस परस्परांमध्यें फारकत करून घेऊन सामाईक जिंदगीची वांटणी करून घेतां येत असे. धर्मापासून अलिप्त असणारें लोकशाही सरकार स्थापन होऊन एक महिना लोटल्यानंतर त्यानें १३ नोव्हेंबर १९१० च्या फर्मानानें पुढील कारणांच्या बाबतींत विवाहविच्छेदास मान्यता दिली:- (१) व्यभिचार, (२) दीर्घकालपर्यंत हद्दपारीची शिक्षा, (३) एकानें दुसऱ्यावर भयंकर आरोप करणें किंवा वाईट पद्धतीनें वागविणें, (४) तीन वर्षेपर्यंत विभक्त राहणें, (५) चार वर्षेपर्यंत परदेशांत अज्ञात असणें, (६) न्यायाधीशामार्फत सिद्ध झालेला वेडेपणा तीन वर्षेपर्यंत चालू राहणें, (७) परस्पर-संमतीनें दहा वर्षेपर्यंत विभक्त राहणें, (८) जुगाराचें भारी व्यसन असणें, (९) कधींही बरा न होणारा सांसर्गिक रोग असणें इत्यादि.

सन १९२३ सालच्या जननमरण-नोंदणी कायद्यानें (क. १८२ वें) १८८० सालचा हिंदु चालीरीतींचा कायदा अपवादादाखल गणला गेला असल्यानें या कायद्याच्या ५ व्या कलमांत सांगितल्याप्रमाणें पत्नीचें व्यभिचारित्व दाखवून विवाहविच्छेद करून घेण्याचा फक्त तिच्या नवऱ्यास अधिकार राहतो. आणि तशा स्थितींत त्या बंधमुक्त पत्नीस आपला संपत्तीवरील हक्क सोडावा लागून ती फक्त पोटगीची अधिकारी राहते.

परपुरुषाशीं किंवा परस्त्रियेशीं व्यभिचार हा धर्मशास्त्रांत गुन्हा मानला आहे तसाच राजशासनशास्त्रानेंही मानला आहे. असें असतां हिंदूंच्या बाबतींत फक्त स्त्रियांपुरताच तो गुन्हा मानणें हा निव्वळ पक्षपातीपणा आहे. स्त्रियांच्या बाबतींत दाखविलेलीं सर्व कारणें पुरुषांना लागू न करण्यांत होत असलेला हा अन्याय जितक्या लवकर नाहींसा करतां येईल तितक्या लवकर करणें हें 'धर्मेच अर्थेच कामेच नातिचरामि' या विवाहकाळच्या वचनास मान देणाऱ्यांचें कर्तव्य होय.

स्त्रियांच्या हक्कांसंबंधींची ही माहिती वैवाहिक वयोमर्यादेंत झालेल्या वाढीचा विचार केल्याशिवाय पुरी होणार नाहीं. कारण ही वाढ म्हणजे पर्यायानें स्त्रियांच्या हक्कांचीच वाढ होय.

विवाहवयोमर्यादा

लोकसत्ताक अंमलापूर्वीच्या कायद्यांत विवाहकाल मर्यादित केल्याचें दिसत नाहीं. सज्ञान दशा येण्यापूर्वी विवाह कायदेशीर होण्यास आईबापांची किंवा त्यांच्या अभावीं योग्य पालकांची संमति मिळाली कीं पुरेसें होई. सज्ञान दशा येण्यास साधारणपणें एकवीस वर्षें उलटावयास पाहिजे असलीं, तरी १८६७ च्या दिवाणी कायद्याच्या ३०६ व्या कलमान्वयें विवाहित पुरुषास १८ आणि स्त्रीस १६ वर्षें पुरीं झालीं म्हणजे सज्ञान दशा येऊन तीं आपापला कारभार स्वतः पाहावयास पात्र ठरत. नवीन काबिजादींतील हिंदूंस लागू असलेल्या १८५३च्या चालीरीतींच्या कायद्यानें विवाहित पुरुषांस २५ वर्षें व स्त्रीस १६ वर्षे उलटावयास पाहिजे होतीं. त्यांत १८८० च्या सर्व गोमंतकीय हिंदूंना लागू करण्यांत आलेल्या चालीरीतींच्या ६ व्या कलमानें सुधारणा होऊन विवाहित स्त्रीपुरुषांचा सज्ञान दशा येण्याचा काल उपरोक्त ३०६ व्या कलमाप्रमाणें अनुक्रमें १६ व १८ वर्षें इतका करण्यांत आला.

सन १९१० सालीं पोर्तुगालांत लोकसत्तेचा उदय झाला तेव्हां सामाजिक सुधारणांसंबंधानें जे कायदे केले गेले त्यांत ता. २५ डिसेंबर १९१० चा कौटुंबिक कायदा (Lei da Família) याची प्रमुखत्वानें गणना होते. त्या कायद्याच्या कलम ४ पोटकलम ३ मध्यें स्पष्टपणें सांगितलें आहे कीं, पुरुषांस १८ व स्त्रियांस १६ वर्षें उलटल्याविना विवाह करतां येणार नाहीं. हें कलम मोडणाऱ्यास फौजदारी कायद्याचें कलम १३६ पोटकलम २ प्रमाणें १ ते २ वर्षेपर्यंत कैदेची आणि १ महिना ते १ वर्षपर्यंत दंडाची शिक्षा सांगितली आहे. त्यानंतर ता. ९ नोव्हेंबर १९१२चा जनन-मरण-विवाहनोंदणीचा कायदा १९१४ सालापासून पो. हिंदुस्थानांत अंमलांत आला. त्याच्या १८२ व्या कलमास जो एक अपवाद जोडण्यांत आला, त्यांत हिंदु व इतर ख्रिस्तीतर यांना १८८० च्या चालीरीतींच्या कायद्याप्रमाणें वागण्याची मुभा ठेविली होती, म्हणून स्त्रीपुरुषांचीं वयोमर्यादा ख्रिस्तीतरांना जाचक होऊं शकली नाहीं. ख्रिस्ती लोक धर्मानें ख्रिस्ती म्हणवून घेत असले तरी ते परंपरागत सामाजिक भावनांपासून फारसे दूर गेले नसल्यानें त्यांतील बहुसंख्य लोकांस ती वयोमर्यादा असह्य झाली. हें लक्षांत घेऊन लोकसत्ताक राज्यपद्धतींतील येथले पहिले गव्हर्नर जनरल दो. कौसैर द कॉश्त यांनीं आपल्या क्र. १९४, ता. २-५-१९१४ च्या फर्मानांत सदरील वयोमर्यादा पुरुषांस १४ व स्त्रियांस १२ इतकी कमी केली.

पो. हिंदुस्थानांत कमी करण्यांत आलेली विवाहवयोमर्यादा खुद्द पोर्तुगालांत कायम होती. परंतु तपा-सवा-तपाच्या अनुभवानें तेथेंही मुलींपुरत्या अडचणी दिसूं लागल्या. त्या

काढून टाकण्यासाठीं क्रमांक ११७१९, ता. १२ मे १९२६ चा कायदा निर्माण झाला. त्याच्या १० व्या कलमांत, ज्या १४ वर्षांवरील व १६ वर्षांखालील मुलींना विवाहित होण्याची आवश्यकता असेल त्यांनीं कारणें दाखवून ती आवश्यकता सरकारी वकिलास पटवावी व विवाहाचा परवाना घ्यावा अशी सवलत दिली गेली. हा कायदा क्रमांक १३५१८, ता. २५ एप्रिल १९२७ च्या कायद्यानें येथें लागू करण्यांत येतांच विवाहवयोमर्यादेच्या बाबतींत घोटाळा उडाला. त्याचें निराकरण, गव्हर्नर जनरल जेनेराल मास्सान द आमोरीं यांनीं आपल्या क्रमांक ६४३, ता. २५ आक्टोबर १९२७ (सरकारी पत्रक, अं. ८७, ता. १-११-१९२७) च्या फर्मानानें करून वयोमर्यादा कमी करणारें १९१४ सालचें फर्मान रद्द ठरविलें आणि वयोमर्यादेचा कायदा, ज्या जमातीस तत्सम स्वतंत्र कायदे नाहींत अशांनाच लागू असल्याचें स्पष्टीकरण केलें. अर्थातच विवाहवयोमर्यादेच्या बाबतींत हिंदु, मुसलमान, पारशी वगैरे जमातींना कोणतेंच बंधन नसल्याचें आणि तें फक्त ख्रिस्त्यांनाच लागू असल्याचें सिद्ध झालें.

त्याच कालांत ख्रिस्ती गावड्यांच्या शुद्धीकरणाची चळवळ जोरांत चालू झाली व १९२८च्या मार्च महिन्याच्या सुरवातीस चिंबल येथें पहिला बार उडून त्याच्यामागोमाग कुर्का, कालापूर, ताळगांव वगैरे ठिकाणीं मिळून हजारों गावडे आपल्या पूर्वजांच्या धर्मांत प्रविष्ट झाले. यक्षिणीची कांडी फिरल्याप्रमाणें हा चमत्कार कसा झाला हें शोधण्यास स्थानिक ख्रिस्ती नियतकालिकांनीं पुष्कळ श्रम घेऊन अखेर जीं कारणें दाखविलीं त्यांत विवाहवयोमर्यादेचा कायदा ख्रिस्ती गावड्यांस त्यांच्या अडाणी चालीरीतींमुळें मानवत नसल्यानें ते वयोमर्यादेचें बंधन नसलेल्या हिंदु धर्मांत जाऊन अडकले असल्याचेंही एक कारण प्रसिद्ध झालें होतें. हें निदान स्थानिक बड्या ख्रिस्ती अधिकाऱ्यांना – धर्माधिकाऱ्यांना पटून त्यांनीं विद्युन्मार्गानें त्याचा प्रतिध्वनि पोर्तुगालच्या अध्यक्षमहाराजांपर्यंत पोंचविला. त्याचा इष्ट परिणाम होऊन ख्रिस्ती धर्मीयांतून होऊं पहात असलेली गळती थांबविण्याकरितां गावडे, कुंभार व महार या ख्रिस्तीधर्मीय जातींपुरती पूर्वीप्रमाणें १४ व १२ इतकी वयोमर्यादा राखण्यांत आल्याबद्दलचा क्र. १५१२७, ता. ७ मार्च १९२८ चा कायदा तांतडीनें निघाला व तो येथील सरकारी पत्रकांत ता. ३ माहे एप्रिल १९२८ रोजीं प्रसिद्ध होऊन अंमलांत आला.

त्यापुढील कालांत आणखी पांचसात हजार गावड्यांचें हिंदुकरण होऊन झटपट दिलेल्या सवलतीची निष्फळता प्रत्ययास आली असली तरी त्या तीन जातींपुरती वयोमर्यादा १४ व १२ इतकी कमी झाली ती तशीच आहे.

या एकंदर विवेचनावरून हिंदु समाजास विवाहवयोमर्यादेचें बंधन लागू नाहीं हें उघड असलें तरी गेल्या २५ वर्षांपासून स्त्रीपुरुषांचा विवाहकाल पूर्वापेक्षां वाढतच आहे. अगदीं खालच्या वर्गांतदेखील विवाहवयोमान मुलींच्या बाबतींत दहाबारा वर्षांवर गेलें असून मुलांचें वयोमान त्या मानानें चौदासोळांवर गेलें आहे. पांढरपेशा वर्गांत मुलींच्या विवाहवयाची मर्यादा सोळाअठरा वर्षांइतकी वाढली असून मुलांनीं तर विशीपंचविशीची सीमा ओलांडली आहे. आणि यापुढें ही वयोमर्यादा किती वाढत जाईल हें सांगणें कठीण आहे.

५

पंचवीस वर्षांतील शैक्षणिक स्थिति

श्री. दत्तात्रय व्यंकटेश पै

१. शिक्षणाचें साध्य

गेल्या पावशतकांत गोमंतकाची शैक्षणिक बाबतींत कितपत प्रगति होत आहे तें यथार्थ सांगावयाचें तर शिक्षणाचें साध्य काय तें आधीं पाहावें लागतें. साध्य निश्चित झालें असतां, जर तें अधिकाधिक लोक आपल्या पदरांत अधिकाधिक प्रमाणांत पाडून घेत आहेत असें आढळून आलें तर आपली प्रगति होत आहे असें म्हणतां येईल हें उघड आहे. परंतु, सर्वसंमत होईल असें शिक्षणाचें साध्य कोण कसें सांगूं शकेल? अर्थात् ज्या त्या विवेचकाची दृष्टि लाबूनच या प्रश्नाचा विचार करणें प्राप्त होत असतें.

आधुनिक मानसशास्त्राचे मुख्यमुख्य सिद्धांत कबूल केले तरीही मनुष्याच्या विविध शक्तींचें शारीरिक, मानसिक व बौद्धिक असें जें वर्गीकरण प्राचीन कालापासून करण्यांत आलेलें आहे तें त्याज्य मानण्याचें कारण पडत नाहीं. या तिन्ही शक्तींचीं अधिष्ठानें जीं शरीर, मन व बुद्धि तीं सुसंगत करणें हें शिक्षणाचें खरें साध्य होय. परंतु हें विधान फारच मोघम वाटतें, म्हणून थोडेंसें तपशिलांत शिरणें जरूर पडतें.

श्रमसहिष्णुता व निरालस्य हे शारीरिक मुख्य सुसंस्कार होत. मानसिक सुसंस्कारांत सत्यप्रियता, अन्यायदुःसहता, संयम व स्वावलंबन यांचा अंतर्भाव प्रामुख्यानें होतो. आणि ज्ञाताचें ग्रहण व संकलन सत्वर करून अज्ञाताचें अधिकांत अधिक अचूक अनुमान काढतां येणें आणि त्याची सहजासहजीं विस्मृति न होणें हा मुख्य बौद्धिक सुसंस्कार होय. अमुक एका प्रसंगीं विवक्षित प्रकारें वागणें इष्ट आहे असा निर्णय बुद्धीनें लावला म्हणजे तदनुसार स्वतःचा आचार ठेवण्याची मनाची सिद्धता असणें म्हणजेच या संस्कारांची सुसंगति राहाणें होय. तिहींपैकीं प्रत्येक शक्ति स्वतःपरी संस्कृत बनली पण त्या एकमेकांशीं मात्र सुसंगत राहिल्या नाहींत तर शिक्षणाचा हेतु संपूर्ण सिद्धीस गेला असें म्हणतां यावयाचें नाहीं. उदाहरणार्थ, एकाद्या शिक्षण-संमेलनाच्या अधिवेशनास उपस्थित होणें अवश्य आहे असें ठरलें तर त्याला स्वतः जावें अशी मनाची प्रवृत्ति झाली पाहिजे आणि तदनुसार वागण्यासाठीं शरीराची अनुकूलता असावी याबद्दलही सुशिक्षित म्हणवणाऱ्याचे प्रयत्न राहिले पाहिजेत.

याहीपेक्षां थोडा आणखी विस्तार केला तर शिक्षणाच्या साध्याची कल्पना विशेष चांगली होईल. खरोखरीचा सुशिक्षित तोच कीं, ज्याला आपण शतायु व्हावें व आरोग्यसंपन्न असावें असें वाटतें आणि त्यासाठीं जो आपला आहार-विहार नियमित सांभाळतो; आपलें शरीर, कपडालत्ता, चीजवस्त स्वच्छ राखतो; स्वतःचें घरदार सफाईनें सांभाळून त्यांतील सामानसुमान नीटनेटकें व जास्तींत जास्त सोइस्कर रीतीनें मांडून ठेवतो, ज्याला परकष्टांवर खाल्लेल्या मिष्टान्नांहून स्वकष्टानें खाल्लेलें कदान्नही अधिक

स्वादिष्ट लागतें; जो तात्पुरतें सुख देणाऱ्या मोहांस बळी न पडतां दीर्घकालिक सुखसंपादनासाठीं अवश्य असलेला संयम राखूं शकतो; असत्याचरण करून बाह्य वैभव संपादन करण्यापेक्षां सत्याचरणानें प्रसंगोपात प्राप्त होणारें संकट पत्करून त्यांतच समाधान मानूं शकतो; स्वतःच्या हिताइतकेंच दुसऱ्याचें हितही ज्याला प्रिय असतें, तोच खरा सुशिक्षित होय. आणि शेवटीं, सुशिक्षित त्यालाच म्हणतां येतें कीं, ज्याला आपली बुद्धि सत्यासत्य, हिताहित, न्यायान्याय यांची मेदरेषा अचूक आंखण्यास समर्थ असावी असें वाटतें व म्हणून ज्याची ज्ञानलालसा नेहमीं प्रज्वलित असते!

शिक्षणाचें मापन

परंतु "शिक्षण" या शब्दाकडे वरील व्यापक अर्थानें कोणी क्वचितच पाहात असतो. शिक्षण व बौद्धिक संस्कार यांचीच सांगड बहुतेकांकडून बहुतेक वेळीं घातलेली आढळून येते; आणि तीही केवळ शाळांतून केल्या गेलेल्या संस्कारांशींच मुख्यतः असते. गणित, तत्वज्ञान, भूगोल, इतिहास, चित्रकला, वाङ्मय इत्यादींच्या अभ्यासाच्या द्वारें मेंदूवर जे संस्कार करावयाचे त्यांचें संकलित फल म्हणून हेंच पदरांत पडलें पाहिजे कीं, अत्यंत गुंतागुंतीच्या प्रकरणींही बुद्धीला अचूक व हितकर निर्णय देण्याचें सामर्थ्य प्राप्त व्हावें आणि तिचा उपयोग प्रत्येक कृतींत निरलसपणें करण्याची संवय अंगांत बाणून जावी. परंतु बौद्धिक संस्कारांचें मोजमाप, ही कसोटी लावून कोणी क्वचितच घेत असावेत. तर, तिच्यावर उपरोच्चारित विषयांच्या विद्यमानें जे सुटेसुटे संस्कार उमटविले गेले त्यांचें मोजमाप घेऊनच, मनुष्यांची सुशिक्षित-अशिक्षित ही वर्गवारी लावणारेच बहुतेक होत. आणि म्हणूनच "शिक्षण" ह्या शब्दानें विद्यालयांतून बुद्धीवर झालेले हे संस्कारच सामान्यतः अभिप्रेत धरण्यांत येतात.

हें जें काय अभिप्रेत धरलें जातें तें अगदींच निष्कारण होय असें म्हणण्याचा अर्थातच उद्देश नाहीं. मनुष्याच्या शरीरावर संस्कार करण्याचें काम गृहशिक्षणांत अंतर्भूत झालें किंवा व्यायामशाळांच्या वांट्यास गेलें, आणि मानसिक संस्करणाचें कार्य गृहसंस्था व धर्मसंस्था यांच्या क्षेत्रमर्यादेंत घातलें गेलें म्हणजे बुद्धीवर संस्कार करण्याचें शिल्लक उरलेलें कार्य तेवढें भिन्न संस्थांकडे जावें आणि त्यांना कोणतें तरी व्यवच्छेदक नांव पाहिजे म्हणून त्यांना विद्यालयें असें संबोधावें, हें एका अर्थी साहजिकच झालें असें म्हणावें लागतें. पण जें जें साहजिक असतें तें तें योग्य असलेंच पाहिजे असें मात्र म्हणतां यावयाचें नाहीं. उलट, ज्या समाजांत गृहसंस्था व धर्मसंस्था स्वकार्यक्षम राहिलेल्या नसतात त्या समाजांत शाळा किंवा विद्यालयें यांच्याचकडे मानवी तिन्ही शक्तींचें संस्करण करण्याचें कर्तव्य येऊन पडतें. परंतु, अशा म्हणजे तिन्ही शक्तींवर संस्कार करणाऱ्या शाळा गोमंतकांत नाहींत; ज्या आहेत त्या केवळ बुद्धिसंस्कारी होत. तशी विद्यालयें जर असतीं तर त्यांतून बाहेर पडणाऱ्या व्यक्तींची संख्या या पंचवीस वर्षांत वाढत आहे, घटत आहे कीं स्तिमित आहे तें पाहून तिन्ही शक्तींच्या संस्करणाच्या प्रगति-परागतीचें माप घेतां आलें असतें. तथापि, गोमंतकांतील आजच्या विद्यालयांवरून फक्त बौद्धिक संस्करणाचें माप तेवढें घेणें शक्य आहे. इंग्लंडांत "पब्लिक स्कूल्स" नांवानें ओळखलीं जाणारीं विद्यालयें आपल्या विद्यार्थ्यांच्या सर्व शक्तींवर संस्कार करीत असतात. आणि इंग्लंडच्या वैभवास ज्या विविध घटना कारणीभूत झालेल्या आहेत त्यांत यांची गणना प्रामुख्यानें करण्यांत येत असते.

हें व्यक्तिसंख्येवरून केलेलें प्रगतिमापन वस्तुस्थितीचें दर्शन यथार्थ करतें असें मात्र

नव्हे. शरीर काय किंवा मन-बुद्धि काय यांच्यावरील सुसंस्काराचें खरें मापन समुदायशःच करावें लागतें. समाजाचें आरोग्यमान व आयुर्मर्यादा यांची संकोच-वृद्धि लक्षांत घेऊन शारीरिक संस्करणाच्या प्रगति-परागतीचीं अनुमानें मुख्यतः बसवावयाचीं असतात. अन्यायाच्या प्रतिकारासाठीं आणि परस्परांना साह्यार्थ पुरवण्यासाठीं अस्तित्वांत आलेल्या शिस्तबाज व संघटित संस्थांची कार्यतत्परता हें मानसिक संस्कार मोजण्याचें मुख्य साधन असतें, आणि कलोपासना, वाङ्मयोत्पत्ति व शास्त्रीय संशोधन या मुख्य साधनांवरून बौद्धिक संस्करणाची खरी मोजदाद करतां येते.

हें माप लावून पाहिलें असतां, या पंचवीस वर्षांत गोमंतकाचें शारीरिक संस्करण प्रगतिपर आहे असें म्हणतां येत नाहीं. कारण सरकारी खानेसुमारीवरून असें दिसून येतें कीं, सन १९११ मध्यें एकंदर लोकसंख्येशीं मृत्युसंख्येचें प्रमाण जें शेंकडा २·४ होतें तें सन १९३१ सालीं शेंकडा दोनवर उतरलेलें दिसतें. त्याचप्रमाणें सरासरी आयुर्मानाचा आंकडा १९१० सालीं जो २२ होता तो तेविसांवरही अद्याप आलेला नसावा. युरोपांत हा पन्नासांवर आहे.

सबंध प्रांतांत मडगांवशिवाय एकाही गांवांत व्यवस्थित व्यायामशाळा नाहीं, इतर विषयांच्या शाळांतून व्यायामाकडे लक्ष दिलें जात नाहीं आणि लोकांत व्यायामाची हौसही दिसून येत नाहीं, यावरूनदेखील शरीरसंस्करणदृष्ट्या आपणांस पुष्कळच कार्य करावयाचें आहे असें म्हणावें लागतें. अन्यायाच्या प्रतिकारार्थ धीटधाकटपणें उभी असलेली एकही संघटना आपल्यामध्यें नाहीं, सहकारी संस्थांचा अभावही पूर्ववतच आहे, आणि आपल्या सामुदायिक मनांत ज्या भावना इतस्ततः संचरत असतात त्या निःस्पृहपणें व्यक्त करण्याचें सामर्थ्यही आपल्यांत भासमान होत नाहीं, यावरून मनःसंस्करणाच्या बाबतींत आपण अधोगतच आहों असें म्हटलें असतां चुकणार नाहीं. या उभय शक्तिसंस्करणांच्या बाबतींत प्रगतिपर स्थिति नाहीं ही गोष्ट बुद्धिसंस्करणाला अंशतः तरी प्रतिकूल ठरते हें उघड आहे.

तथापि असें असूनही या बाबतींत चालू २५ वर्षांत गोमंतकाची प्रगति होत आहे, यांत शंका नाहीं. सरकारी व बिनसरकारी विद्यालयांची संख्या आणि त्यांतून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या यांच्या आंकड्यांवरून तर ही प्रगति दिसून येतेच. पण या व्यक्तिसंख्यात्मक मापाशिवाय कलोपासना, वाङ्मयोत्पत्ति हीं सामुच्चयिक मापें घेतलीं तरी त्यांवरूनही ती दिसून येते. शास्त्रीय शोधांच्या बाबतींत मात्र कांहींच सांगतां येत नाहीं.

भाषा

बौद्धिक संस्कारांच्या बाबतींत, जिच्यामधून ते करावयाचे त्या भाषेच्या प्रश्नाला फार महत्व असतें. आणि म्हणून विद्यालयें व विद्यार्थी यांच्यासंबंधींच्या आंकड्यांकडे पाहाण्याआधीं भाषेकडे लक्ष द्यावें लागतें.

गोमंतकाची सार्वत्रिक बोली म्हणजे कोंकणी. येथील द्रविड ब्राह्मण व मुसलमान इतरांशीं याच बोलींत व्यवहार करतात; पण आपापसांत बोलतांना पहिले कोंकणी स्वरयुक्त मराठी व दुसरे अपभ्रष्ट हिंदी वापरीत असतात. कांहीं कॅथोलिकांनीं व विशेषतः त्यांच्यांतील ब्राह्मणांनीं, बादेशांत इंग्रजी व इतरत्र पोर्तुगीज भाषा घरांत वापरण्याचा प्रघात पाडला आहे. परंतु ज्या प्रसंगीं भावना अत्युत्कट होणें अपरिहार्य असतें अशा वेळीं परभाषेची ही कृत्रिम आयाळ स्वाभाविकच गळून पडून मायबोली जी कोंकणी ती उसळी मारून वर येत असलेली पाहून गंमत

वाटल्याशिवाय राहात नाहीं! नेहमीं मराठी किंवा सर्वकाल पोर्तुगीज बोलणाऱ्या लोकांची संख्या प्रत्येकीं दोनअडीचशांपलीकडे जाणार नाहीं. त्यांच्या जवळपास कानडी व गुजराथी बोलणाऱ्यांचे क्रमांक लागत असतील.

कांहीं कॅथोलिक आपलें लेखन रोमन लिपि व कोंकणी शब्द यांच्या द्वारें करीत असतात. वाक्यांतील पदक्रम मात्र पोर्तुगीज भाषेच्या रचनेवर गेलेला असतो. मुसलमानांमध्यें अरबी लिपि वापरण्याचा प्रघात असला तरी बरेचसे देवनागरीचाही उपयोग करतात. गोव्याची राज्यकारभाराची भाषा पोर्तुगीज असल्यानें तिचें शिक्षण घेणारे सर्व धर्मीयांत सांपडतात हें साहजिक होय.

गोव्यांतले सर्व साक्षर हिंदु लोक मात्र आपलें धार्मिक, सामाजिक, व्यापारी, वाङ्मयीन इत्यादि व्यवहारांतील लेखनवाचन देवनागरी लिपि व मराठी भाषा यांच्यामधून अशा प्रकारें करतात कीं, मराठी हीच त्यांची मातृभाषा होय असें म्हणण्यास प्रत्यवाय राहात नाहीं.

सरकारी विद्यालयें

पंचवीस वर्षांपूर्वीपासूनच नवीन-गोवें येथें एक वैद्यक-पाठशाळा (स्थापना सन १८४२), एक औषधसिद्धिशाळा व एक अध्यापक-शाळा (स्थापना सन १८४१) हीं तीन विशिष्ट शिक्षणाचीं व लिसेव नासियॉनाल (व्यवस्थित पुनर्घटना सन १८५४) हें दुय्यम शिक्षणाचें अशीं चार विद्यालयें सरकारनें चालविलीं होतीं. त्यांचे अभ्यासक्रम अनुक्रमें पांच, दोन, तीन व पांच वर्षांचे होते. आज वैद्यक-पाठशाळेचा अभ्यासक्रम तितक्याच वर्षांचा आहे. पण त्याला जोडून रुग्णशुश्रूषा व सुईणपण यांचे दोनदोन वर्षांत पुरे करण्यांत येणारे वर्ग उघडण्यांत आले आहेत.

औषधसिद्धि-शाळेचा अभ्यासक्रम तीन वर्षांचा करण्यांत आला असून अध्यापक-शाळेचा दोन वर्षांचा करण्यांत आलेला आहे. लिसेवच्या पहिल्या तीन वर्षांचें शिक्षण देणाऱ्या दोन पाठशाळा म्हापसें व मडगांव येथें सन १९१४ पासून उघडण्यांत आल्या आहेत. १९१९ पासून नवीन गोव्याच्या लिसेवचा अभ्यासक्रम सात वर्षांचा करण्यांत आला असून त्याला लिसेव सेंत्राल हें नांव देण्यांत आलें आहे. हा पांच वर्षांचा असतांना त्यांत तत्वज्ञान, अर्थशास्त्र, मराठी आणि सन १९१३ पासून संस्कृत भाषा हे विषय पूरक म्हणून शिकविले जात असत व लिसेव पुरा करण्यास मराठी, तत्वज्ञान व अर्थशास्त्र यांचाही दाखला मिळवावा लागे. आज तत्वज्ञान हा विषय इतरांसारखा एक म्हणून सामान्य अभ्यासक्रमांत अंतर्भूत झाला असून अर्थशास्त्र हा विषय अजिबात काढून टाकण्यांत आला आहे. मराठी व संस्कृत मात्र पूरक किंवा जोडविषय म्हणून अद्याप चालू आहेत; पण ते ऐच्छिक ठेवले आहेत! लिसेवांत पोर्तुगीजशिवाय पहिल्या तीन वर्षांत फ्रेंच व पुढच्या तीन वर्षांत लॅटिन, तसेंच इंग्रजी व जर्मन या दोहोंपैकीं कोणती तरी एक भाषा सक्तीनें शिकावी लागते. याशिवाय पहिल्या तीन वर्षांत भूगोल, सृष्टिशास्त्र, गणित, चित्रकला, हस्तव्यवसाय, नीति-नागरिक-शिक्षण, व्यायाम व गायन हे विषय; पुढच्या तीन वर्षांत चित्रकला सोडून पहिल्या तीन वर्षांतील विषयांसह इतिहास आणि शेवटच्या एका वर्षांत वरील विषयांसह, जीवशास्त्र, सृष्ट पदार्थ व रसायनशास्त्र, तत्वज्ञान आणि पोर्तुगीज साम्राज्याची राज्यव्यवस्था हे जादा विषय शिकविले जातात. नागर-नीति-शिक्षणांत येशूख्रिस्ताचें जीवनचरित्र व पॅलेस्टाइनचा इतिहास हा मुख्य भाग असून तो विषय कॅथोलिक पाद्रीकडूनच शिकविला जावा असा कायदा नुकताच झाला आहे.

व्यापारी शिक्षणासाठीं दोन वर्षांच्या अभ्यासक्रमाची एक शाळाही सरकारकडून सन १९१७ सालीं उघडण्यांत आली होती. पण ती सन १९२८ सालापासून बंद करण्यांत आली.

शिवाय पणजी व वाळपई येथें एकेक हातकाम व कलाकौशल्य शिकवण्याचें विद्यालय आणि सांगें येथें शेतकीची एक प्राथमिक प्रायोगिक शाळा हींही सरकारनें या वर्षपंचकांत निर्माण केलीं आहेत. त्याचप्रमाणें खास महिलांसाठीं नवीन गोवें येथें सन १९११ पासून 'राष्ट्रीय महिला-विद्यालय'ही सरकारनें चालवलें आहे. त्यांत पोर्तुगीज, फ्रेंच, इंग्रजी या भाषा आणि शिवण, चित्रकला, गायन-वादन, गृहव्यवस्था इत्यादि विषय शिकवण्यांत येतात.

प्राथमिक पोर्तुगीज शाळांची संख्या पंचवीस वर्षांपूर्वी होती तिच्या दुपटीच्याहीवर आज गेलेली आहे, म्हणजे १०३ झालेली आहे.

मराठी-पोर्तुगीज नांवाच्या ७ शाळा ज्या नवीन काबिजादींत होत्या त्यांची संख्या जरी ६ झालेली असली तरी त्यांच्या अभ्यासक्रमांत बरीच सुधारणा झालेली आहे.

प्राथमिक पोर्तुगीज शाळांसाठीं सर्वत्र एकाच जातीच्या इमारती असाव्या असें ठरवून सरकारनें हें आपलें धोरण या वर्षदशकांत बव्हंशीं अंमलांत आणलेलें आहे. नॉर्मालचें शिक्षण पुरें केल्याशिवाय प्राथमिक शिक्षकाच्या जागीं कोणाचीही नेमणूक होऊं शकत नाहीं. आज तर लिसेवचा कोर्स केल्याशिवाय नॉर्मालांत प्रवेशच करतां येत नसल्यानें प्राथमिक शिक्षकांची लायकी बरीच वाढलेली आहे. त्यांना पगारही ७० पासून ९० पर्यंत देण्यांत येत असल्यानें या वर्गाला कुरकुरीस जागा नाहीं. प्राथमिक शिक्षणाचा अभ्यासक्रम ४ वर्षांचा आहे. हा सर्व पूर्ण करीपर्यंत विद्यार्थ्याला परीक्षा इत्यादींचे दाखले व नांवनोंदणी यांप्रीत्यर्थ ५ रुपयांहून अधिक खर्च करावा लागत नाहीं.

सार्वजनिक विद्यालयें

रायतूर येथील सेमिनरी ही एका अर्थी निमसरकारी आहे म्हटलें तरी चालेल. पण कायदेशीर दृष्ट्या तिची गणना सार्वजनिक विद्यालयांतच करावी लागते. हिचा अभ्यासक्रम सामान्यतः ८ वर्षांचा असून पहिल्या चार वर्षांचें शिक्षण देणारी तिची एक शाखा म्हापसें येथें आहे. कॅथोलिक पंथाचें तत्वज्ञान व धर्माचरण हीं शिकवणें व त्या पंथाचे प्रचारक-पुरोहित तयार करणें हेंच या विद्यालयाचें उद्दिष्ट आहे व प्रचारकार्यास मदत व्हावी या हेतूनें यंदांपासून मराठी भाषा शिकवण्याची योजनाही रायतूरच्या सेमिनरींत झाली आहे.

गोव्यांतील एकंदर सुमारें ४०० गांवांत मिळून अडीचशांवर लहानमोठीं खिश्चन देवळें आहेत. त्यांपैकीं सुमारें निम्म्यांत, थोडेंसें पोर्तुगीज भाषेचें ज्ञान, चालचलाऊ धर्मशिक्षण आणि गायनवादनाची सामान्य माहिती देणाऱ्या शाळा त्यांच्या धर्मसंस्थेनें चालवलेल्या आहेत.

कॅथोलिक मिशनांनीं केवळ मुलींसाठीं चालवलेलीं तीनचार इंग्रजी हायस्कुलें गोव्यांत या पांचसहा वर्षांत दिसत आहेत. आणि त्यांत कॅथोलिक संन्यासिनी म्हणजे माद्री, मुलींनीं आपला Lar व Sala म्हणजे पाकशाळा व शृंगारशाळा यांचा प्रपंच कसा थाटावा यांचें शिक्षण देत आहेत.

नवीन गोव्याची मिझेरिकॉर्दिय व मडगांवची ओश्पीसियु या लॉटऱ्यांच्या उत्पन्नावर पैसा कमावून दीनसहाय्यक स्वरूपाचीं कामें करणाऱ्या दोन संस्थांनीं अनुक्रमें रायबंदर व मडगांव येथें एकेक रुग्णालय ठेवलें असून प्रत्येकांत रुग्णशुश्रूषा व सुईणपण यांचें शिक्षण देण्याचे

वर्ग उघडले आहेत. यांचा अभ्यासक्रम सरकारी अभ्यासक्रमासारखाच आहे.

फोंडें येथील आल्मैद कॉलेज "गोवा विद्या-प्रसारक मंडळ" नांवाच्या संस्थेनें चालविलें असून त्यांत पोर्तुगीज प्राथमिक शिक्षणापासून लिसेवचीं पहिलीं तीन वर्षें व इंग्रजी तीन इयत्ता यांचें शिक्षण देण्याची व्यवस्था आहे.

गोव्यांत उर्दू भाषेंतून प्राथमिक शिक्षण देणाऱ्या चार शाळा असून त्या सर्वांना मिळून वार्षिक १२०० रुपयांची मदत सरकारकडून मिळत असते.

परंतु प्राथमिक शिक्षणाच्या दृष्टीनें अत्यंत महत्वाचीं सार्वजनिक विद्यालयें म्हणजे मराठी शाळा होत. यांची संख्या आजमितीस सरकारी पोर्तुगीज प्राथमिक शाळांच्या दुपटीहूनही अधिक म्हणजे सुमारें सव्वादोनशें आहे. गोव्याच्या दर दोन गांवांस एक अशी यांची सरासरी लागते. या शाळांतून अभ्यासक्रम, परीक्षा, दप्तर इत्यादि हरेक बाबतींत एकसूत्रीपणा आणावा, त्यांना स्थैर्य प्राप्त करून द्यावें व एकंदरींत मराठी शिक्षणाचा दर्जा वाढवून त्याचा प्रसार करावा या हेतूनें "गोमंतकीय मराठी शिक्षण-संमेलन" ही संस्था सन १९३३ पासून अस्तित्वांत आली असून तिचें काम धिम्मेधिम्मे पण चिकाटीनें चाललें आहे. शाळा चालवणाऱ्या संस्थांसंबंधींची विशेष माहिती याच पुस्तकांत दुसरीकडे देण्यांत आली आहे, ती वाचकांनीं जरूर तर पाहावी.

खासगी विद्यालयें

खासगी मालकीच्या विद्यालयांत इंग्रजी हाय-स्कुलांचें महत्व विशेष आहे. त्यांची संख्या ५०।५५ असून त्यांतील ८।१० ना मुंबई विश्व-विद्यालयाची मान्यताही मुदतबंदीनें मिळत आलेली आहे. पोर्तुगीज प्राथमिक शिक्षणाच्या निदान ३ इयत्ता म्हणजे प्रिमैरु प्राव पास असल्याचा सरकारी दाखला ज्याला नाहीं अशा विद्यार्थ्याला इंग्रजी ५ व्या इयत्तेंत बसवूं नये, असा निर्बंध सरकारनें या हायस्कुलांना घातला असून ती सारीं नोंदलीं जावीं याबद्दलही त्याचा बराच कटाक्ष असतो.

लिसेवचें ७ वर्षांपर्यंतचें शिक्षण देणारीं ३ खासगी विद्यालयें पणजी येथें असून त्यांतून कित्येकांना वसतिगृहेंही जोडलेलीं आहेत.

खासगी रीत्या पोर्तुगीज प्राथमिक शिक्षण देणाऱ्या शाळांची संख्या शंभरांच्या घरांत असेल असा अंदाज आहे.

शिक्षणावरील सरकारी खर्च

सार्वजनिक व खासगी विद्यालयांवर जनते-कडून किती खर्च केला जातो हें नक्की काढणें अशक्यप्राय, निदान महत्प्रयासाचें आहे हें उघड होय. तथापि सरकार किती खर्च करतें तें सहज सांगतां येतें. ठोकळ आंकड्यांनीं बोलावयाचें तर असें म्हणतां येईल कीं, वैद्यकीय व तदंगभूत पाठशाळा ३८॥ हजार, अध्यापक-पाठशाळा १५ हजार, हातकाम व कलाविषयक उभय शाळा २७॥ हजार, शेतकीची प्रायोगिक शाळा ३ हजार, राष्ट्रीय महिला-विद्यालय १० हजार याप्रमाणें विशिष्ट शिक्षणावर ९४ हजार; दुरुस्त शिक्षणावर, लिसेव सेंट्राल २ लक्ष ५ हजार, मडगांव-लिसेव १४॥ हजार व म्हापसेंचा १२॥ हजार याप्रमाणें एकंदर २ लक्ष ३२ हजार आणि प्राथमिक शिक्षणावर एकंदरींत २ लक्ष ३३ हजार रुपये सरकार दर वर्षी खर्चीत असतें. प्राथमिक शिक्षणावरील खर्चाचा तपशील स्थूल मानानें, शाळा-तपासनीस व त्याची कचेरी ६ हजार, ६ मराठी शिक्षक ४। हजार, ४ उर्दू शाळांस मदत १। हजार, १ गुजराथी शिक्षक ·॥। हजार, पोर्तुगीज शाळां-वरील १६६ शिक्षक १ लक्ष ६० हजार व शालेय उपकरणादि इतर कामें ६१ हजार रुपये

असा आहे. पोर्तुगीज हिंदुस्थान सरकारचें आजचें वट्ट उत्पन्न ९९ लक्ष ३९ हजार रुपये आहे. त्यांत ३४॥ लक्ष रुपये विशिष्ट खात्यांवर खर्च करण्यासाठीं राखून ठेवलेले आहेत. यांत केवळ शिक्षणखातीं खर्च करावयास म्हणून १ लक्ष ४३॥ हजार रुपये निराळे काढून ठेवलेले आहेत. त्यांचा तपशील पाहातां वैद्यक-पाठशाळेवर १९ हजार, द्रव्यम शिक्षणावर ६६ हजार व प्राथमिक शिक्षणावर ५८ हजार रुपये खर्चावयाचे आहेत. वर शिक्षणावरील खर्चाचे जे आंकडे दिले आहेत त्यांत हेही जमेस धरलेले आहेत. हे आंकडे अर्थातच त्या त्या वर्गाच्या शिक्षणाचें उत्पन्न समजतां येईल. अर्थात् तें वजा करतां एकंदर शिक्षणावर निव्वळ खर्च ४ लक्ष १५॥ हजार रुपये व प्राथमिक शिक्षणावर निव्वळ खर्च १॥। लक्ष रुपये होत आहे म्हटलें पाहिजे. विशिष्ट खातीं खर्च करावयाची ३४॥ लक्ष रुपयांची रक्कम वगळली तर खास सरकारचें उत्पन्न ६४ लक्ष ८९ हजार आहे असें म्हणावें लागतें. या उत्पन्नाच्या मानानें एकंदर शिक्षणावर होणाऱ्या निव्वळ खर्चाचें प्रमाण पाहिलें तर तें शेंकडा ६·८ असून फक्त प्राथमिक शिक्षणावर होणाऱ्या खर्चाचें प्रमाण २·७ आहे असें दिसून येतें.

विद्यार्थी व साक्षरता

सरकारी खानेसुमारीवरून पाहातां गोव्यांतील एकंदर विद्यार्थ्यांची संख्या सन १९१० सालीं जी १० हजार होती ती सन १९३१ सालीं स्थूल मानानें १५ हजारांवर आलेली दिसून येते. त्याच सालांतील साक्षरतेचे आंकडे घेतले तर ते अनुक्रमें १२ व १८ होते असें आढळतें. अर्थात् या उभय बाबतींत गेल्या २५ वर्षांत आपली दीडपट प्रगति झाली आहे असें म्हणावयास प्रत्यवाय नाहीं. इतकेंच नव्हे तर ही प्रगति थोडी अधिकच आहे असेंही म्हटल्यास चालेल. कारण खानेसुमारींतील विद्यार्थ्यांच्या संख्येंत मराठी शाळांतील विद्यार्थ्यांचा आणि साक्षर लोकांत केवळ मराठी अगर इतर हिंदी भाषा जाणणाऱ्या लोकांचा आंकडा धरलेला असेलच असें सांगतां येत नाहीं. त्याचप्रमाणें जे गोमंतकीय विद्यार्थी ब्रिटिश हिंदुस्थानांत शिकत आहेत त्यांच्या आंकड्यांच्या बाबतींत काय स्थिति आहे तेंही सांगणें कठीण आहे.

अगदीं ठोकळ असे किमान आंकडे घेतले तरीही आजमितीस गोव्यांत खालीलप्रमाणें सुमारें ३३ हजार विद्यार्थी असलेले दिसून येतातः- वैद्यक-पाठशाळा व तदंगभूत रुग्णपरिचर्यादि इतर शाळा १५०; अध्यापक-शाळा ५०; नवीन गोवें, मडगांव व म्हापसें येथील लिसेव १०००, पणजी, वाळपई व सांगें येथील व्यावसायिक शाळा १५०; राष्ट्रीय महिला-विद्यालय १००; पोर्तुगीज सरकारी प्राथमिक शाळा १२०००; सरकारी मराठी शाळा १५०; दोन्ही सेमिनरींत मिळून ५००; इगर्जांतील शाळा २०००; माद्रींचीं इंग्रजी हायस्कुलें ३००; आल्मैद कॉलेज १००; उर्दू शाळा २००; इंग्रजी हायस्कुलें ६०००; लिसेवचें खासगी शिक्षण घेणारे ३००; प्राथमिक पोर्तुगीज खासगी शाळा २००० आणि मराठी शाळांत शिकणारे ८०००.

सरकारी खानेसुमारींतले आंकडे घेतले तर ठोकळ मानानें दर दोन ख्रिश्चन विद्यार्थ्यांस १ हिंदु विद्यार्थी, त्याचप्रमाणें दर २ साक्षर ख्रिश्चनांस १ साक्षर हिंदु असें प्रमाण निघतें. पण, तींत मराठी शाळांतील हिंदु विद्यार्थी आणि युरोपियनेतर भाषांत असलेले साक्षर लोक यांचे आंकडे धरलेले नसल्यानें हें प्रमाण चुकीचें ठरतें. माझ्या मतें हिंदूंतील साक्षरता ख्रिश्चनांपेक्षां मुळींच कमी नाहीं. उलट साक्षरतेच्या भरीवपणाच्या किंवा हेतूच्या दृष्टीनें

हिंदूंतली साक्षरता खरीखुरी असून ख्रिश्चनांतली दिखाऊ आहे. कारण रोमन लिपींतून लिहिली जाणारी कोणतीही भाषा ख्रिश्चनांची जन्मभाषा नसल्यानें केवळ लिपिज्ञानानें त्यांना भाषाज्ञान होऊं शकत नाहीं. पण हिंदूंना मराठी भाषा लहानपणापासून सहजच समजत असल्यानें देवनागरी लिपीची नुसती ओळख झाली तरी त्यांचें भाषाज्ञान दृढ व वृद्धिंगत होऊं शकतें. पोर्तुगीज ४ इयत्ता शिकलेला ख्रिश्चन व मराठी ४ इयत्ता शिकलेला हिंदु यांच्या लेखन-वाचनाचा क्षेत्रविस्तार आणि ज्ञानग्रहणशक्ति यांत जमीन-अस्मानाचा फरक असतो हें कोणासही पटण्यासारखें आहे.

सामुच्चयिक माप

बौद्धिक संस्करणाच्या बाबतींत गोमंतकाची कशी प्रगति होत आहे तें व्यक्तिसंख्येवरून दाखवून झालें. ही प्रगति मोजण्याचीं, कलोपासना, वाङ्मयोत्पत्ति व शास्त्रीय संशोधन हीं जीं तीन सामुच्चयिक साधनें, त्यांपैकीं पहिल्या दोन्ही साधनांसंबंधीं याच पुस्तकांत स्वतंत्र लेख आलेले आहेत. यामुळें येथें, मागें म्हटल्याप्रमाणें, इतकेंच सांगितलें म्हणजे पुरे कीं, त्या बाबतींत आपण प्रगत होत आहों, असें दिसून येतें. शास्त्रीय संशोधन येथें होत नाहीं याचें खरें कारण गोमतंकीयांची बौद्धिक संस्कारक्षमतेची अपात्रता हें नसून त्याला आवश्यक असलेल्या साधनसामुग्रीचा अभाव हेंच होय असें म्हणणें भाग पडतें. कारण परप्रदेशीं गेल्यामुळें ज्यांना साधनांचें आनुकूल्य लाभलें त्या गोमंतकीयांनीं आपल्या बुद्धीची तेजस्विता जगास पटविल्याशिवाय सोडलेलें नाहीं.

उत्पन्न होत असलेलें वाङ्मय संकलित करून वाचकांना पुरवण्याचें काम **वाचनालयें** करीत असतात. व त्यांच्यावरूनही समाजाच्या प्रगतीचें माप घेतां येतें. पण यांच्यासंबंधींची माहितीही या पुस्तकांत इतरत्र देण्यांत आली आहे.

पुरुष व स्त्री हीं आपापल्या कार्यक्षेत्रांत सुसंस्कृत झाल्याशिवाय शिक्षणाचें शक्तित्रय-संस्काराचें कार्य यथायोग्य होऊं शकत नाहीं. या दृष्टीनें, स्त्रियांच्या बुद्धीवरील संस्करणाचें माप घेणें, एकंदर शैक्षणिक परिस्थितीच्या अवलोकनासाठीं जरूर असतें. पण तेंही प्रस्तुत पुस्तकांत स्वतंत्रपणें घेण्यांत आलेलें असून तें आशादायक असेंच आहे.

प्रगतिपर पण समाधानकारक नव्हे

गोमंतकाचें शारीरिक व मानसिक संस्करण स्तिमित असून बौद्धिक संस्करण प्रगतिपर आहे हें आतांपर्यंत केलेल्या विवेचनावरून कळून येईलच. पण प्रगतिपर म्हणजे समाधानकारक नव्हे हेंही अवश्य सांगितलें पाहिजे. दगडावर मूर्ति कोरावयाची असतां तिच्याची जाडजूड टांकी घेऊन हातोड्यानें ठोकावें लागतें. पण सुवर्णावर चित्रसंस्कार करण्यास साधी लोखंडी कोरणी पुरी पडते. करावयाचा संस्कार सुलभपणें व टिकाऊ व्हावयाचा झाला तर संस्कारसाधनाकडे दुर्लक्ष करून चालावयाचें नाहीं. शिलेवर चित्र खोदण्यास हलकी कोरणी घेऊन जाणें हें अशक्य म्हणून जर मूर्खपणाचें, तर सुवर्णावर मूर्ति उठवण्यास हातोडा घेऊन बडविणें हेंही तितकेंच किंबहुना अधिकच मूर्खपणाचें होय. कारण त्यामुळें ठोकणाराचे जसे हात दुखतील तशी सुवर्णाची लडीही बेढब होईल. गोमंतकाची बुद्धिमत्ता बावनकशी सोन्यासारखी आहे; पण तिच्यावर होत असलेले बहुतेक संस्कार परभाषेच्या हातोड्यानें केले जातात; त्यामुळें तिच्यावर ज्ञानमूर्ति तर सुंदर उठतच नाहीं, पण उलट अंगाला भलत्या ठिकाणीं व्रण आणि बोंगे मात्र

उठत असतात. स्वभाषेंतून शिक्षण झालें तर संस्कार सुलभपणें होतात व ते चिरस्थायीही ठरतात. परभाषेंतील शिक्षणामुळें आधीं संस्कार उठणें कठीण असतें आणि दीर्घप्रयासानें उठला तरी टिकणें दुरापास्त होतें. विषयज्ञानापेक्षां शब्दार्थज्ञानाकडे, विचारापेक्षां उच्चाराकडे, समजण्यापेक्षां सांगण्याकडे आणि ज्ञानग्रहणापेक्षां पांडित्यप्रदर्शनाकडे विद्यार्थ्याची शक्ति अधिक खर्च होत असते. आत्मप्रत्ययापेक्षां परप्रत्ययावर अवलंबून राहण्याची संवय त्याला नकळत जडत जाते. आत्मावलंबी जीवन घालवण्याची धमक नष्ट होत जाऊन दुसऱ्याच्या हातापायां पडून आयुष्य व्यतीत करण्यास कमीपणा वाटेनासा होतो. अशा रीतीनें शब्दार्थज्ञान व उच्चारानुकरण यांत बुद्धिमत्तेचा फाजील व्यय झाल्यामुळें ती तेजस्वी विचार करण्यास व ते प्रसरविण्यास असमर्थही ठरूं शकते! जगाचें सोडाच, पण अखिल हिंदुस्थानाचें तरी चित्त आपल्याकडे आकृष्ट करून घेईल असे कितीसे ग्रंथ किंवा ग्रंथकार या चारशें वर्षांत पोर्तुगीज हिंदुस्थानांत निपजले आहेत? याला आणखीही कारणें असतील, पण एक कारण आपलें बौद्धिक संस्करण मातृभाषेंतून होत नाहीं हें आहे, यांत शंका नको.

उच्च किंवा दुय्यम शिक्षण सोडून द्या. पण आपलें प्राथमिक शिक्षणही मातृभाषेंतून होत नाहीं ही गोष्ट उपेक्षणीय नव्हे, असें अनेक सरकारी शिक्षकांनीं व विद्वान् ख्रिश्चन अधिकाऱ्यांनीं खुद्द शिक्षण-सल्लागार मंडळांत स्पष्टपणें बोलून दाखविलें आहे. शिक्षणशास्त्राचीच गोष्ट घेतली तरदेखील असें कळून येतें कीं, वाचन, लेखन व गणन शिकविणें हेंच प्राथमिक शिक्षणाचें काम होय. परभाषा शिकविणें हें त्याच्या क्षेत्रांत येऊं शकत नाहीं. मग परभाषेंतून विषयज्ञान करूं जाणें हें तर दूरच राहिलें. पण शिक्षणशास्त्राचा हा सिद्धांत आमच्या आचारांत अद्यापही हवा तितका येऊं शकलेला नाहीं!

प्रत्यक्ष व्यावहारिक उपयोगाच्या दृष्टीनें पाहतांही या शिक्षणांत आमूलाग्र फरक झाले पाहिजेत असें खुद्द सरकारलाच वाटत असल्यानें लिसेव मुनिसिपालांचें रूपांतर उद्यमीय शाळांत करण्याचा बेत त्यानें गेल्याच महिन्यांत जाहीर केला आहे. पुस्तकांच्या रचनेकडे नजर टाकली तर विद्यार्थी समरस होईल असे धडेच त्यांत नाहींत अशी टीका अनेक सरकारी शिक्षकांनीं वृत्तपत्रांतून जाहीर रीत्या केलेली आहे.

जगांत सर्वत्र प्राथमिक व दुय्यम शिक्षण प्रादेशिक स्थित्यनुरूप दिलें जातें. अनेक विश्वविद्यालयेंदेखील प्रादेशिक स्वरूपाचीं आहेत. गोव्यांत आज तर विश्वविद्यालय नाहींच, पण आकुंचित क्षेत्रामुळें तें यापुढेंही अस्तित्वांत येणें शक्य नाहीं. येथील शिक्षणाचा कारभार पाहाण्यासाठीं

"शिक्षण-सल्लागार मंडळ"

नांवाची एक समिति असते. या समितींत दिवाणी राज्यव्यवस्था खात्याचा मुख्याधिकारी, वैद्यक-पाठशाळेचा मुख्याध्यापक, लिसेव सेंत्रालचा मुख्याध्यापक, अध्यापक-शाळेचा मुख्याध्यापक, प्राथमिक शाळांचा तपासनीस व सरकारनें नेमलेले ४ लायक नागरिक याप्रमाणें ९ सभासद असून गव्हर्नर जनरल हा दहावा सभासद मंडळाचा अध्यक्ष असतो. या मंडळाचें मुख्य काम वरिष्ठ शिक्षणाधिकाऱ्याकडून येणारे शिक्षणविषयक कायदेकानू गोव्याच्या परिस्थित्यनुरूप लागू करणें एवढेंच असतें. मूळ अभ्यासक्रम आंखणें, प्राध्यापकांची निवड व नेमणूक करणें इत्यादि कामें लिस्बन येथें शिक्षणमंत्र्याच्या हातीं आहेत. गोव्याहून लिस्बनचें अंतर ७ हजार मैल आहे हें नकाशा-

वरून कोणासही कळून येऊं शकतें व खुद्द सरकारही तें नाकबूल करूं शकत नाहीं. गोव्यांतलें शिक्षणखातें हें स्वतंत्र खातें नसून दिवाणी राज्यकारभार खात्याचें एक पोटखातें आहे. अर्थात् शिक्षणमंत्र्याकडून निघालेले व शिक्षणसल्लागार मंडळानें स्थानिक स्थितीशीं शाब्दिक फरकांनीं जुळवून घेतलेले हुकूमनामे दिवाणी राज्यव्यवस्था खात्यामार्फत अंमलांत यावे लागतात हें उघड आहे.

मराठीचें महत्व

त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट म्हणजे येथील हिंदु लोकांनीं आपलें शिक्षण शक्य तितकें मराठींतून करण्याचें महत्कार्य स्वावलंबनावर अत्यंत त्यागपूर्वक चालू ठेवलें आहे. पण त्याचेंही खरेंखुरें महत्व साऱ्या हिंदूंना पटलें आहे, असें दुर्दैवानें म्हणवत नाहीं. वास्तविक हिंदु धर्म आणि मराठी भाषा यांची सांगड आज जितकी पडली आहे तितकी पडण्याचें कारण नव्हतें. अंगावर येऊन पडलेला ख्रिश्चन धर्म पत्करावा लागलेल्यांनींही मराठी भाषा सोडून देण्याचें पाप सहजासहजीं केलें नसतें. पण गोव्याचा इतिहास असाच घडत आला आहे कीं, मराठी आणि हिंदु यांचीच तेवढी सांगड पंडावी व इतरांची ती तुटावी. एक भाषा तुटल्यामुळें आपलें पुष्कळच नुकसान झालें ही गोष्ट आमच्या अनेक विचारी ख्रिश्चन बंधूंच्या लक्षांत स्पष्ट येऊं लागली आहे.

मराठी भाषेचा पाट गोव्यांत वाहात राहिला नसता तर येथील हिंदु समाजाचें हें छोटेंसें तळें महाराष्ट्रीय हिंदु समाजाच्या गंगेपासून कायमचें तुटून एकाकी पडलें असतें व त्यामुळें एक तर तें कुजून गेलें असतें किंवा जवळच्या ख्रिश्चन समाजाच्या बलवान् तलावांत विलीन झालें असतें. मराठी भाषेमुळें यांतलें एकही न घडून महाराष्ट्रीय हिंदुगंगेच्या प्रवाहास गोव्याच्या हिंदु-तलावाचें पाणी मिसळत राहिलें आहे व म्हणून तें न कुजतां किंवा न आटतां वाहतें तरी राहिलें आहे. या सामाजिक दृष्टीप्रमाणेंच धार्मिक दृष्टीनेंही गोव्यांतल्या हिंदु धर्मीयांवर मराठी भाषेचे महदुपकार आहेत. सीतेची पत्नी राम होय, असें पोर्तुगीज शालेय पुस्तकांनीं कितीही पढविलें तरी हिंदु विद्यार्थी तें खरें मानीत नाहीं, याचें कारण मराठी भाषा हेंच होय.

पण ही दृष्टि क्षणभर बाजूस फेकली आणि केवळ व्यापारी दृष्टीनें पाहिलें तरी हिंदूंना काय, ख्रिश्चनांना काय किंवा मुसलमानांना काय मराठी भाषा सारखीच आवश्यक ठरते. गोव्यांतले ख्रिश्चन लोक व्यापारांत हिंदूंहून मागासलेले दिसतात त्याचें एक कारण त्यांमधील मराठी भाषेचें अज्ञान हें आहे. ज्यांचीं पोटें फार मोठीं झालीं आहेत अशा कांहीं बड्या बापांचीं पोटें युरोपियन भाषांमुळें भरत असतील. पण शेंकडों लहानसहान व्यापारी लोकांचीं पोटें मराठी व इतर देशी भाषाच भरीत असतात. गोव्यांतल्या आयातनिर्यातींतील सुमारें १। कोटी रुपयांची वार्षिक तूट भरून यावयाची तर त्यांतल्या लोकांना परप्रांतगमनाशिवाय अन्य मार्ग नाहीं, ही गोष्ट याच पुस्तकांत श्री. काशिनाथ दामोदर नायक या अर्थशास्त्राच्या अभ्यासू व्यापाऱ्यांनीं फार चांगल्या रीतीनें दाखवून दिली आहे. आणि आमच्या परप्रांतगमनाचें मुख्य स्थान म्हणजे मुंबई इलाखा हें होय. तेथें प्राथमिक व दुय्यम शिक्षण देशी भाषेंतून दिलें जाण्याची वेळ येऊं घातली आहे. अर्थात् तेथील गोमंतकीय लोकांपैकीं ज्यांना आपल्या बौद्धिक शक्तीच्या मोबदल्यांत अर्थसंपादन करावयाचें असेल त्यांना देशी भाषेंतून, आणि ख्रिश्चन गोमंतकीयांना सर्व हिंदी भाषांत अधिक जवळची म्हणून मराठींतून शिक्षण घेणें प्राप्त होईल हें कोणासही सहज दिसणारें आहे.

आज गोव्यांत इंग्रजी शिक्षण जें इतकें प्रस्तृत होत आहे, त्याचें कारण गोमंतकीयांचें इंग्रजी भाषाप्रेम हें नसून ही भाषा ब्रिटिश हिंदुस्थानांत त्यांना अर्थोत्पादनक्षम बनवते हेंच होय. अर्थात् तेथें इंग्रजीचें स्थान मराठीकडे गेलें म्हणजे येथीलही तिचें स्थान मराठीकडे जाईल ही गोष्ट, दोन आणि दोन मिळून जसे चार, तितकीच सत्य आहे. हें सत्य गोमंतकीय लोक वेळींच खडबडून जागृत होऊन जर न ओळखतील व कामास न लागतील तर भवितव्य भीषण आहे ! गोव्यांत मिळणें शक्य असलेलें सर्व पोर्तुगीज शिक्षण घेतलेला आणि युरोपियनाची पोशाखी नक्कल हुबेहूब करून मारे खांदे उडवीस मराठीला तुच्छ लेखणारा गांवठी साहेब आपल्या दीडवीत प्रांताची हद्द ओलांडली रे ओलांडली कीं आजच मेंढीहूनही नरम बनतो आणि डोक्यांत कोंबलेला आपल्या ऐटबाज भाषाज्ञानाचा गड्डा जशाचा तसा सोबत असतांना रानावनांत सांपडल्याप्रमाणें गोंधळून जातो हें दृश्य कोणी पाहिलें किंवा पाहिलेल्यानें सांगितलेलें ऐकिलें आहे काय ? असल्यास त्याचें एक कारण मराठीचें अज्ञान होय हें त्यानें ताडलें आहे काय ? आजच जर ही स्थिति, मग तेथें इंग्रजीची जागा मराठीनें पटकावल्यावर आमची गत काय ?

मनीषा

अशा या सर्वतोपरी उपयुक्त अशा मराठी भाषेला गोव्यांतल्या सर्व विद्यालयांतून हक्काचें व मानाचें स्थान न मिळतां कमी महत्वाच्या अशा बाह्य गोष्टींच्या बाबतींत चाललेल्या भपक्याकडेच केवळ पाहून आमची होत असलेली शैक्षणिक प्रगति समाधानकारक होय असें कोण म्हणूं शकेल ? जेव्हां बुद्धीबरोबरच शरीर व मन यांच्यावरही आवश्यक ते परस्पर-संवर्धक सुसंस्कार करणारीं भरपूर विद्यालयें निघून विद्यार्जनक्षम अशीं सर्व मुलें त्यांत जाऊं लागतील आणि तेथें सुसंस्कृत झाल्यामुळें दीर्घायु, निरोगी, स्वावलंबी, संयमी, सत्यभाषी, कर्तव्यदक्ष, ज्ञानपिपासु, कलोपासक, संशोधक, समाजसेवा-तत्पर अशा अशा अनेक व्यक्ति निपजत राहातील तेव्हांच आपली शैक्षणिक स्थिति समाधानेकारक आहे असें मानतां येईल. परंतु..... ही ध्येयवादात्मक अपेक्षा भावी पिढ्यांपैकीं कितव्या पिढीनें करावी ? "सारस्वत ब्राह्मण समाजा"च्या हीरक-महोत्सवाच्या प्रसंगीं या प्रश्नाचें उत्तर निदान न्याहाळूं तरी लागो अशी परमेश्वरापाशीं मागणी आहे.

६

आमची आर्थिक परिस्थिति

श्री. काशिनाथ दामोदर नायक

Não é, pois, perigosa a nossa situação económica; não estamos bem perto do abismo, da ruina. Nem outra cousa seria de esperar do admirável esprito dos filhos desta terra, tão disciplinados, inteligentes e previdentes.

Dr. Jaime de Morais
Governador Geral da India Portuguesa
(5° Congresso Provincial da India Portuguesa, 11-3-1923).

तात्पर्य, आमची आर्थिक परिस्थिति धोक्याची नाहीं. विनाशाच्या खोल गर्तेजवळ आपण अजून येऊन ठेपलेलों नाहीं. आणि या भूमीच्या शिस्तबाज, बुद्धिमान् व दूरदर्शी सुपुत्रांच्या आदरणीय मनोभूमिकेकडे लक्ष देतां त्यांच्या हातून अशी परिस्थिति ओढवणें शक्यच नव्हतें.

गव्हर्नर ज. **दो. ज्यायमि द मॉराइश्**
(पोर्तुगीज हिंदुस्थानची काँग्रेस प्रोव्हिंसियाल, ५ वें अधिवेशन, ११-३-१९२३.)

कोणत्याही समाजाची किंवा राष्ट्राची प्रगति त्याच्या आर्थिक परिस्थितीवर अवलंबून असते. किंबहुना आर्थिक सुस्थिति हाच राष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीचा पाया होय. महायुद्धानंतर जर्मनीची आर्थिक परिस्थिति अत्यंत बिकट झाली व त्यामुळें त्या राष्ट्राचें नांव प्रमुख राष्ट्रांच्या मालिकेतून गळालें. त्या वेळीं ही परिस्थिति सुधारण्याला कोणातरी व्यक्तीनें पुढें येणें अगत्याचें होतें. जर्मनीची ही आर्थिक पुनर्घटना करून त्याला पूर्वीचें स्थान मिळवून देण्याला हिटलर कारणीभूत झाला, व त्यामुळें जर्मनीचा पुढारीपणा त्याच्याकडे येणें क्रमप्राप्तच झालें. हिटलरच्या सर्व यशाचें मर्म यांत आहे.

अशा रीतीनें आर्थिक **सुस्थितीवरच** राष्ट्राचा उत्कर्ष अवलंबून असल्यानें आपापल्या विशिष्ट आर्थिक परिस्थितीचा बारकाईनें अभ्यास करणें हें प्रत्येक राष्ट्राचें कर्तव्य होऊन बसलें आहे. या अभ्यासाचे सर्वसामान्य नियम ज्या शास्त्रांत संकलित केलेले असतात तें अर्थशास्त्र होय. आपल्या जुन्या संस्कृत ग्रंथांतून अर्थशास्त्राची व्याख्या 'अर्थस्य भूमि धनादेः प्रापकं शास्त्र'— भूमि व धन या विषयांचें ज्ञान देणारें शास्त्र — अशी केलेली आहे. आधुनिक अर्थशास्त्रज्ञ सामान्यतः "मनुष्याच्या आधिभौतिक सुखसाधनांचें शास्त्र" अशी व्याख्या करतात. तेव्हां अशा या महत्वाच्या शास्त्राच्या

दृष्टीनें गोमंतकाच्या गेल्या पंचवीस वर्षांचा विचार केला असतां काय निष्कर्ष निघतो, तें या लेखांत पाहण्याचें योजिलें आहे.

परंतु गेल्या पावशतकांतील आर्थिक परिस्थितीचें विवेचन करतांना, त्याचें चांगलें आकलन होण्यासाठीं, तत्पूर्वकालीन परिस्थितीचीही थोडी कल्पना असणें अगत्याचें आहे.

या दृष्टीनें गोमंतकाच्या इतिहासाकडे नजर फेकली असतां असें दिसून येतें कीं, गोमंतकाच्या आजच्या व पूर्वीच्या क्षेत्रविस्तारांत महत्वाचा फरक आहे. आजच्या गोमंतकाची लांबी १०५ किलोमीटर (६५ मैल), रुंदी ६० किलोमीटर (३७ मैल) व क्षेत्रफळ १४७२ चौरस मैल असून लोकसंख्या १९३१च्या मोजणीप्रमाणें ५०४९९४ आहे. परंतु पोर्तुगीज अंमलापूर्वी गोमंतक या नांवाखालीं आजच्यापेक्षां बराच मोठा प्रदेश येत असे. सुप्रसिद्ध इतिहासकार रा. वामनबाब वर्दे वालावलीकर हे आपल्या "गोंयकारांची गोंयाभायली वसणूक" या पुस्तकांत पृ. २ वर म्हणतात :– "ता. ३० एप्रिल १५५५ रोजीं व्हाइसरॉय पेद्रु माश्कारेञ्ज्यश व विजापुरचा बादशाही राजपुत्र अबदुल्ला यांच्यामध्यें जो तह झाला, त्यावरून, दापोली, खेड, चिपळूण, संगमेश्वर, रत्नागिरी, राजापूर, देवगड, मालवण व वेंगुर्ले हे नऊ तालुके, कुडाळसह सावंतवाडी संस्थान, सध्याचा पोर्तुगीज सत्तेखालील मुलूख आणि आतांच्या उत्तर कर्नाटकाची समुद्रकिनाऱ्यावरील थोडीशी पट्टी, एवढा मुलूख त्या वेळच्या गोव्यांत समाविष्ट होत असे, असें सिद्ध होतें."

गोमंतकांत आर्यांची वसाहत केव्हां व कां झाली, याबद्दल रावबहादूर तालमक्की यांनीं, आपल्या 'सारस्वत घराणीं' या ग्रंथांत असें मत दिलेलें आहे कीं, इसवी सनपूर्व ३०० च्या सुमारास हें देशांतर घडून आलें असावें. चंद्रगुप्ताच्या कारकीर्दीच्या अखेरीस म्हणजे इसवी सनपूर्व २९७ सालीं जेव्हां बारा वर्षांचा दुष्काळ पडला त्यावेळीं बारा हजार जैन आपल्या भद्रबाहु नामक पुढाऱ्यासह दक्षिणेस आले. त्याचप्रमाणें सारस्वत हे आपला पुढारी परशुराम यासह दक्षिणेंत आले असावे.

त्या काळीं गोमंतक हें महत्वाचें व्यापारी केंद्र असल्याबद्दल उत्तर हिंदुस्थानांत प्रसिद्धी होती. आणि कांहीं धाडसी कुटुंबें धनार्जनासाठीं गोव्यांत आलीं असावीं. हें विधान जरी केवळ अनुमानात्मक असलें तरी त्यांत सत्याचा पुष्कळच अंश आहे, यांत शंका नाहीं. याचें कारण गोमंतकाची निसर्गरचनाच अशी आहे कीं, त्यामुळें हा प्रांत व्यापारी दृष्ट्या मध्यवर्ति गणला जाई. आरबी समुद्रावरचें हें एक तोंड असल्यानें समुद्रावरून चालणारा व्यापार येथूनच होत असे. इ. स. ११० मध्यें मौर्य राजापासून १५१० त मुसलमानी अंमलापर्यंत ज्यांच्या ज्यांच्या सत्तेखालीं हा प्रांत आला त्यांतील पुष्कळांनीं आपली राजधानी येथे केली. विजापूरचे बादशहा युसुफ आदिलशहा यांच्या मनांत विजापूर सोडून गोवें हीच आपली राजधानी करण्याचें होतें, परंतु पोर्तुगिजांचा प्रवेश झाल्यामुळें ही गोष्ट घडून आली नाहीं, असें वर्णन पोर्तुगीज बखरकारांनीं लिहून ठेवलें आहे. पोर्तुगिजांच्या आगमनापूर्वीचा इतिहास जरी तितका उपलब्ध नसला तरीपण त्या काळापर्यंत हा प्रांत अत्यंत भरभराटींत होता, असें अनुमान काढतां येतें. पोर्तुगीज अंमलाखालीं गोमंतक गेल्यानंतर येथें पुष्कळ युरोपियन प्रवासी येऊन गेले व त्यांनीं येथील परिस्थितीचीं जीं वर्णनें लिहून ठेवलेलीं आहेत, त्यांवरून त्या वेळच्या आर्थिक परिस्थितीची चांगली कल्पना येते. इ. स. १५८५ मध्यें John Hughen Van Linschoten या नांवाचा

सारस्वत ब्राह्मण समाजाच्या वार्षिकोत्सवांचे अध्यक्ष

श्री. गणपतराव विश्वनाथ लाड
(१९२४)

प. वा. रावबहादुर सखाराम विश्वनाथ राजाध्यक्ष,
एल्.सी.ई.,एम्.आय्.ई.,जे.पी.
(१९२५)

डॉ. आत्माराम गोविंद बोरकर
(१९२६)

श्री. महादेव श्रीनिवास भोबे काकुले
(१९२७)

श्री. गोविंद पुंडलीक हेगडे देसाई
(१९२८)

GOMANTAK BOMBAY, 4.

एक डच प्रवासी आलेला होता. त्यानें लिहिलेल्या प्रवासवर्णनावरून गोमंतकाच्या त्या काळच्या परिस्थितीची चांगली कल्पना येते.

हा डच प्रवासी लिहितो कीं, "गोव्यांत जगांतील बऱ्याच देशांतील मालाची आयात होते. व त्यामुळें बंगाल, पेगू, सयाम, अरबस्तान, आर्मेनिया, पर्शिया, खंबायत, मलाका, जावा, चीन या देशांतील व्यापारी येथें असून ते या ठिकाणाहून माल रवाना करीत असतात. शहरांत युरोपियन पद्धतीचीं घरें व राजमार्ग असून घरांच्या मागें मोठमोठ्या बागा आहेत. गोव्यांत एक प्रकारचे लोखंडमिश्रित दगड मिळत असतात. त्यांपासून सोनें व तांबें मिळूं शकेल असें इटालियन शास्त्रज्ञांचें मत आहे. परंतु येथील अधिकारी त्याची निर्गत करूं देत नाहीं. येथें प्रत्येक दिवशीं बाजार भरत असतो, तो सकाळपासून दुपारपर्यंत चालतो व तेथें निरनिराळ्या मालाची विक्री होत असते. येथें अरबस्तानांतील घोडे, सर्व प्रकारच्या मसाल्याचे जिन्नस, मद्य, तसेंच खंबायत, सिंधुनद, बंगाल, चीन वगैरे देशांतून सर्व प्रकारचा माल येत असतो. येथील व्यापारी पोर्तुगालमधून आलेलें नाणें घेऊन ठेवतात व एप्रिल महिन्यांत ज्या वेळीं जहाजें चीनमध्यें जात असतात त्यावेळीं शेंकडा पंचवीस ते तीसपर्यंत फायदा घेऊन त्याचे बदलीं फारशी नाणें घेतात. परत सप्टेंबर महिन्यांत ज्यावेळीं पोर्तुगीज इकडे येतात, त्यावेळीं पुन्हा आणखी पंचवीस ते तीस टक्के फायदा घेऊन विक्री करतात. हें नाणें कोचीनमध्यें मसाल्याचे पदार्थ घेण्यास उपयोगी पडत असतें. पागोदा (नाणें) ची देवघेव करणारे बरेच व्यापारी येथें असून त्यांनीं या धंद्यांत फार पैसा मिळविलेला आहे.

गोमंतकांत जे मूर्तिपूजक आहेत ते अत्यंत संपन्न व्यापारी असून शहरांतील मुख्य मुख्य रस्त्यांवर त्यांचीं मोठमोठीं दुकानें आहेत. व तीं रेशीम, साटीण, चीनचें पॉर्सेलोन, पोर्तुगालमधील जिन्नस वगैरे मालानें भरलेलीं आहेत. हे लोक स्वभावतः धूर्त व चतुर असल्यामुळें त्यांनीं व्यापारांत बराच पैसा मिळविलेला आहे. दुसऱ्या मुख्य रस्त्यावर खंबायतमधील व्यापाऱ्यांचीं दुकानें असून रौप्य व सुवर्ण यांच्या पेठा निराळ्याच आहेत. याशिवाय या कलेंतील उत्तम शिल्पकारांचींही बरींच दुकानें आहेत. याशिवाय तांदूळ, धान्य वगैरे जिन्नस व इतर माल यांची देवघेव करणाऱ्या दलालांचींही दुकानें असून प्रत्येक जिनसाच्या पेठा निरनिराळ्या आहेत. या लोकांत वाक्पटुत्व उत्तम असल्यामुळें ते आपला धंदा उत्कृष्ट रीतीनें चालवितात. याशिवाय सराफ लोकांचींही दुकानें आहेत. हे लोक यहुदी असून हिशेबांत अत्यंत निष्णात असल्यानें, तसेंच त्यांना नाण्याच्या व्यवहाराचें पूर्ण ज्ञान असल्यानें त्यांच्या मध्यस्थीशिवाय नाण्यांचा व्यवहार करणें नुकसानीचें ठरतें.

गुजराथी वाणी हे खंबायतमधील असून ते गोवा, दमण, दीव, कोचीन या व हिंदुस्थानांतील इतर बऱ्याच ठिकाणीं पसरलेले आहेत. या लोकांचा व्यापार धान्य, कापड व इतर जिनसांचा असून ते व्यापारांत इतके निष्णात आहेत कीं, त्यांच्यापुढें पोर्तुगीज, यहुदी व इतर युरोपियन व्यापारी यांचा टिकाव लागत नाहीं." (हा उतारा 'समसामयिक भारत' या बंगाली पुस्तकांतून घेतला आहे.)

याशिवाय Ryleys Fitch, Francisco Pirard वगैरे प्रवाशांनीं अशाच प्रकारचीं वर्णनें लिहून ठेवलेलीं आहेत.

यावरून गोमंतकाची तत्कालीन आर्थिक परिस्थिति कशी भरभराटीची होती याची

कल्पना होईल. पोर्तुगिजांचा हिंदुस्थानांत प्रथम प्रवेश संपत्तीच्या लोभानें झाला व त्यानंतर त्यांना धर्मप्रसाराची हांव सुटली. त्यामुळें येथील परिस्थिति बिघडत जाऊं लागली. लोकांनीं आपली संपत्ति, घरेंदारें यांचा त्याग करून परदेशगमन करण्यास सुरुवात केली व थोडक्याच काळांत या प्रांताचें स्वरूप इतकें उजाड झालें कीं, त्याची कल्पना कॉन्दि द सां व्हिसेंत या व्हाइसरायांनीं पोर्तुगालमधील आपल्या राजास जें पत्र लिहिलें, त्यावरून करतां येईल. ते लिहितातः–

"..... हिंदूंपाशीं शेतवाडी नाहींत आणि नेटिव्ह ख्रिश्चन फक्त खाण्यापुरती लागवड करतात. दगडापासून का मध काढतां येतो किंवा वाळूंतून का तेल निघतें? हे चमत्कार फक्त देवानें करावयाचे असतात. महाराजांनीं अशक्य गोष्टी शक्य करून दाखवील अशा दुसऱ्या कुणाला तरी हिंदुस्थानला पाठवावें. जावें तिथें सभोंवार हालअपेष्टा व नजर द्यावी तिकडे दारिद्र्य पसरलेलें पाहून खेद करण्याशिवाय माझ्या हातांत काय आहे? जर या गोष्टीला मी कारण असेन, तर माझ्याऐवजीं दुसरा येऊं द्या; जर तिचा उगम येथल्या लोकांत असेल तर महाराजांना त्यांची दया येऊं द्यावी. दगडांचीसुद्धां दया यावी इतकी हिंदुस्थानची दुर्दशा झाली आहे. कारण माणसांची कींव करायला माणसेंच नाहींत. आणि या उजाड जागेंतून पीक काढायला शेतकरी तर मुळींच नाहींत. परमेश्वर महाराजांचें रक्षण करो. गोवा, २६ जून १६६९." (सि. आंतॉनियु ब्रूत द कॉश्त कृत 'पोर्तुगीज सत्तेखालील गोमंतक'. स. १८९७. पृ. ५३.)

एका शतकापूर्वी ज्या देशाची परिस्थिति अत्यंत भरभराटीची होती व ज्याच्याबद्दल युरोपियन प्रवाशांच्या तोंडून "ज्यानें गोवा पाहिला असेल त्याला लिस्बन पाहाण्याची गरज नाहीं." असे उद्गार निघत, तो देश एका शतकाच्या आंत इतका कसा खालावला याचें कोणालाही आश्चर्य वाटेल. परंतु याला कारण त्या काळच्या राज्यकर्त्यांचें धार्मिक धोरण होय. सांपत्तिक भरभराट व मालमत्तेची सुरक्षितता यांचा परस्पर संबंध असतो. व ज्या वेळीं ही सुरक्षितता धोक्यांत असते, त्यावेळीं सांपत्तिक भरभराटीलाही अडथळा येतो. हिंदुस्थानच्या इतिहासांत अशीं पुष्कळ उदाहरणें आहेत. प्रो. भाटे आपल्या 'अर्थशास्त्र' या ग्रंथांत पृष्ठ ५६ वर अयोध्या प्रांताचें उदाहरण देऊन म्हणतात, " हा प्रांत फार सुपीक असून कांहीं नबाबांच्या कारकिर्दींत अत्यंत भरभराटींत होता. परंतु पुढील नबाबांची कारकीर्द फार जुलमी व अंदाधुंदीची झाल्यामुळें, राज्यांत सुनियंत्रित राज्यपद्धति नाहींशी झाली. व त्यामुळेंच तो प्रांत कांहीं काळ उजाड पडल्यासारखा झाला." आपल्या गोमंतकाचीही अशीच परिस्थिति झाली. परंतु यानंतर लगेच आपल्या राज्यकर्त्यांच्या लक्षांत ही गोष्ट येऊन ती सुधारण्याकरतां त्यांनीं प्रजेला अनेक सवलती देऊं केल्या. परंतु एकदां बिघडलेली घडी पुन्हा नीट बसणें फारच कठीण असतें व तसें तें घडूनही आलें.

युरोपियन प्रवाशांच्या एकंदर लिखाणावरून आपणाला असें अनुमान काढतां येतें कीं, गोमंतक हा पोर्तुगिजांचा प्रवेश झाल्यानंतरसुद्धां कांहीं काळपर्यंत अत्यंत भरभराटींत होता. परंतु याचें कारण, येथील जमीन सुपीक होती अगर येथें खनिज द्रव्यांची विपुलता होती असें नव्हे, तर नैसर्गिक रीत्या हा प्रांत समुद्रावरचें एक मध्यवर्ति ठिकाण असल्यानें अरबी समुद्रांतून येणारा बहुतेक माल येथें उतरत असे. आणि या देशाच्या शेजारीं विजापूरचें तसेंच विजयनगरचें राज्य असल्यामुळें, येथें उतरणारा बहुतेक माल त्या राज्यांत जात असे. व त्यामुळें या प्रांताला भरभराटीचे दिवस आलेले होते.

त्या वेळीं चलनांत असलेल्या निरनिराळ्या नाण्यांकडे लक्ष दिलें तरी त्यांवरून त्या वेळच्या आर्थिक भरभराटीची बरीचशी माहिती होईल. पुढील पिढीला या गतकालीन नाण्यांची कल्पनासुद्धां होणें कठीण असल्यानें त्यांची थोडीशी माहिती येथें देणें अप्रासंगिक होणार नाहीं.

सतराव्या शतकांत गोव्यांत जें खालचें नाणें होतें त्याला दुडू (Durú) असें म्हणत. शंभर दुडूंचें १ तांग व १० तांगांचा एक रुपया असे. ता. १२ एप्रिल १८८० च्या कायद्यापूर्वी सर्वसाधारण जनतेच्या भाषेंत २५ दुडू म्हणजे पाव तांग, वीस दुडू म्हणजे १ पंचमांश, १० दुडूंचा एक दशांश, पांच दुडूंचा एक विसांश व अडीच दुडूंचा एक चाळीसांश असें मानलें जात असे. दुडू हा कानडी भाषेंतील शब्द असून पोर्तुगीज भाषेंत त्याला Basaruco असें म्हणत. सन १६०८ ते १६१० मध्यें गोव्यांत असलेला प्रसिद्ध प्रवासी फ्रां. पिरार्द म्हणतो, एका तांगाला नवे ७५ दुडू व जुने १०५ दुडू मिळत असतात. जुन्या दुडूंत जी ५ ची वाढ झाली ती वटाव होय. त्यानंतर ४-८-१६१९ मध्यें कायद्यानें दुडू नाण्याला Real चें स्वरूप दिलें. सुप्रसिद्ध गोमंतकीय इतिहासकार फिलीपि नॅरि शाव्हियॅर आपल्या Esboço de um Diccionário Histórico Administrativo मध्यें म्हणतातः–

त्याकाळीं गोव्यांत नाणें, सोनें, रुपें व तांबें या तीन धातूंचें होतें. पार्दाव ऊर्फ शेराफीं म्हणजे असुर्फी (३०० रेस) व रुपया अगर दुट्टी असुर्फी (६०० रेस) हें नाणें सोन्यांत तसेंच रुप्यांतही होतें. पार्दाव अगर असुर्फीला प्रत्येकीं ६० रेसांचीं ५ तांगें मिळत. सोन्याच्या नाण्याला S. Thomé असें नांव होतें. आपल्या लोकांत याला सतमी असें म्हणत. या नाण्याच्या एका बाजूस क्रूस व दुसऱ्या बाजूस पोर्तुगीज सरकारचें ध्वजचिन्ह असून याची किंमत ६ रुपये अगर १२ असुर्फ्या असावी असा कायदा व्हाइसराय ज्युवांव द साल्दाञ्ज्य गाम (सन १७२५ ते १७३२) यांच्या अमदानींत झाला. यापूर्वी सांतोमे दुहेरी किंमत ३००० रेस, सांतोमे साधा १५०० रेस, अर्धा सांतोमे ७५० रेस, अशींही नाणीं होतीं. याशिवाय पार्दाव व तांग हींही नाणीं सोन्याचीं होतीं.

रुप्याचीं नाणीं पुढीलप्रमाणें होतीं:- रुपया ६०० रेस, पार्दाव ३०० रेस, अर्धा पार्दाव १५० रेस. या नाण्यांवर एका बाजूस ध्वजचिन्ह व दुसऱ्या बाजूस त्यावेळच्या राज्यकर्त्याचा मुखवटा असे. यापूर्वी तांगसुद्धां रुप्याचें होतें. याशिवाय तांब्याचीं नाणीं म्हणजे तांग, अर्धें तांग व २०, १५, १२, १०, ७॥, ४॥ व ३ रेस हीं होतीं. वरील नाणीं १८१७ मध्यें पाडण्यांत आलीं. या नाण्यांचें वजन खालीलप्रमाणेंः- सांतोमे, १ वैताव २४ ग्रांव (५ मासे); रुपया, २ वैताव ७१ ग्रांव (११ मासे १॥ गुंज); तांग (तांब्याचें), १० वैताव १८ ग्रांव (३ तोळे २ मासे ३॥ गुंजा).

या काळीं नाणें पाडण्याची सर्वांना सर्रास मुभा होती. सरकारास कांहीं ठराविक मेहनताना दिल्यानंतर नाणें पाडून घेतां येत असे. यामुळें तांब्याच्या नाण्याचा पुरवठा इतका झाला कीं, १८१० ते १८३० मध्यें त्यांतून शेंकडा १ ते ४ पर्यंत वटाव कापून बाकी नाणें घ्यावें लागे. याशिवाय शेजारच्या राज्यांतून तांब्याचें नाणें भरमसाट आंत आल्यामुळें, वटावाचें प्रमाण वाढत जाऊन २५ टक्क्यांवर आलें व शेवटीं Junta da Fazenda Pública याला ही आयात बंद करण्याची खबरदारी घ्यावी लागली. व इकडे असलेल्या तांब्याच्या नाण्यावर शेंकडा वीस टक्के वटाव

कायम करून सरकारी देणें असलेल्यांना आपली फेड या प्रमाणांत करावी लागली. त्यामुळें रुप्याच्या असुर्फीची किंमत वाढून ५ तांगांवरून ६ तांगांवर आली. सरकारी रीत्या असुर्फीची किंमत पांच तांगें होती; परंतु सरकारी खजिन्यांत पैसे भरतांना दोन तृतीयांश रुप्याचें नाणें व एक तृतीयांश तांब्याचें नाणें भरावें लागे. यामुळें असुर्फीची किंमत जी पूर्वी ३०० रेस होती, ती वाढून ३४० झाली. या दोन तृतीयांश रुपें व एक तृतीयांश तांबें या स्वरूपांत द्यावयाच्या नाण्याला आपल्यांत रसद नाणें म्हणत. यानंतर १८८० सालीं आमच्या सरकारचा ब्रिटिश सरकारशीं मिठाचा करार झाला. व तेव्हांपासून इकडील नाणें ब्रिटिश अंमलांतील नाण्यासारखें झालें. आतां हें प्रास्ताविक विवेचन पुरें करून मुख्य विषयाकडे वळूं.

आपला मुख्य विषय गोमंतकाची गेल्या पंचवीस वर्षांतील आर्थिक परिस्थिति हा आहे. पुष्कळांच्या मतें आपली परिस्थिति खालावत असून दिवसेंदिवस बिकट होत जाणार आहे. व याचें प्रत्यंतर म्हणून ते आपल्या शेतीच्या उत्पादनाकडे बोट दाखवितात. त्यांच्या मतें ज्या अर्थी या उत्पादित मालाच्या किंमती दिवसेंदिवस उतरत जात आहेत, त्या अर्थी आपल्या उत्पन्नाची बाब घटत जाणार आणि आपल्या आयातीची तूट भरणें शक्य होणार नाहीं. या म्हणण्यांत कांहीं तथ्य आहे असें मानलें तरी आज ही परिस्थिति केवळ आपलीच नसून सबंध जगाची आहे, हें लक्षांत घेतलें पाहिजे. तथापि या बाबतींत निष्कर्ष काढावयाचे ते अत्यंत काळजीपूर्वक काढले पाहिजेत. याकरतां आपली परिस्थिति पूर्वी काय होती व आतां काय आहे याचा विचार आपण तुलनात्मक दृष्टीनें करणें अवश्य आहे. तसें केलें म्हणजे यापुढें आपण काय केलें पाहिजे हें आपल्याला निश्चित ठरवतां येईल.

कोणत्याही देशाच्या आर्थिक परिस्थितीचें विवेचन करतांना सरकारचें उत्पन्न व आयात-निर्यात यांच्या आंकड्यांकडे लक्ष देणें जरूर असतें. इ. स. १९०६-७ सालीं आपल्या सरकारचें उत्पन्न खालीलप्रमाणें होतें:-

प्रत्यक्ष कर	१२७४५००	रु.
अप्रत्यक्ष कर	७२४३७॥	
विशेष उत्पन्न	३८४४५७॥	
	२३८३३३५	

म्हणजे एकूण उत्पन्न अंदाजें २.४ लक्ष रुपये व खर्चही जवळजवळ तितकाच होता. यांत जकातीचें उत्पन्न ४।॥ लक्ष रुपये होतें.

आतां आपण आयात-निर्यातीच्या आंकड्यांकडे वळूं.

इ. स.	आयात रु.	निर्यात रु.	तूट रु.
१९००	४३६५४३८	१४४८९०३	२९१६५३५
१९०५	४९१०४८६	१६७४५५५	३२३५९३१
१९१०	६२७१४३६	२५५००९१	३७२१३४५

पांचपांच वर्षांच्या अंतरानें हे जे तीन वर्षांचे आंकडे दिलेले आहेत, त्यांवरून असें दिसून येतें कीं, इ.स. १९०० पासून आयातीचें प्रमाण वाढत असून त्यामुळें तुटीचेंही प्रमाण वाढतेंच आहे. पंचवीस वर्षांपूर्वी आपल्या आयातनिर्यात व्यापाराची परिस्थिति काय होती, तें पुढील तक्त्यावरून कळून येईल. त्यांत मुख्यमुख्य अशा जिनसांचे आंकडे दिलेले आहेत. १९३४ पर्यंतचेच आंकडे उपलब्ध असल्यानें विचाराकरितां घ्यावयाचीं पंचवीस वर्षें सन १९१० ते १९३४ हीं घेतलीं आहेत.

१९१० मधील निर्यात माल

			रक्कम रु.
नारळ	नग	३४९२०७५७	१३८१२३९
खोबरें	मण	१८१७८	१०६९९२
सुपारी	,,	३१२८५	१६५१९०
काजू	,,	३८१८४	१२५१६२
काजूगर	,,	७४९५	५०८१५
आंबे	नग	६८८३२९५	१४३७९७
मासळी	मण	५७५२०८	२२१९९०
मीठ	,,	५४६४४३	१२१३५८
लांकूड	,,	१०२२६	३६७२२
			२३५३२६५
इतर जिन्नस			१९६८२६
एकूण निर्यात			२५५००९१

१९१० सालांतील आयात माल

			रक्कम रु.
तांदूळ	खंडी	१३०५००	१५३५११९७
भात	,,	७०१३८	३४८४३१
साखर	शेर	१६९६७७५	२४२५४९
गूळ	,,	७१४१५५	१०९६७९
गहूं	खंडी	१५६२२	२१६४८२
पीठ	शेर	३७१०४४	४८८८६
धान्यें	खंडी	१९६२२	२०५८३३
मिरची	शेर	१२६२००	२०७१२
साबण	,,	८१६६७	२१३२४
आगपेट्या	ग्रोस	४३०९८	३३४६२
केरोसीन	ग्यालन	४३५५५९	१५७०२३
तंबाकू	शेर	६३८०११	१९७४३०
सिगार सिगारेट	शेर	१६८९२	३४१६२
लांकूड	टन	४३७८	७४२१९
नळे	नग	४२८६५७	१२०८५
कापड	शेर	३६४३८४	८४७३७७
चहा	,,	२८९७७	२२९४६
			४१२७७८७
इतर जिन्नस			२१४३६३९
एकूण आयात			६२७१४२६

यानंतर आपण आजच्या परिस्थितीचें अवलोकन करूं. आज आपल्या सरकारचें उत्पन्न खालीलप्रमाणें आहे:-

प्रत्यक्ष कर	८४९५००
अप्रत्यक्ष कर	२८५४३००
विशिष्ट करपद्धतीखालील धंदे	७७४३००
विविध बाबतींतील उत्पन्न	२३९४००
खासगी उत्पन्न	५९१३१७।-
परतफेडीची रक्कम	११४५८३॥-॥
विशिष्ट खातीं खर्चावयास वसूल केलेल्या रकमा	६१८३४७७-॥
एकूण	६०४१७८८

यांत जकातखात्याचें उत्पन्न २५९०२०० रु. आलें. सरकारचें एकंदर उत्पन्न २४ लक्षांवरून आज ६० लक्षांवर गेलें असून त्या मानानें खर्चाचें प्रमाणही वाढलें आहे. म्हणजे सरकारच्या एकंदर उत्पन्नांत २॥ पट वाढ झाली असून जकातखात्याचें उत्पन्न सुमारें पांचपट वाढलें आहे.

आतां आपण आयातनिर्यातीचे आंकडे पाहूं.

१९३४ साल

आयात	निर्यात	तूट
१४२६४८५१	२१६०४३५	१२१०४४१६

या मालाचा तपशीलवार तक्ता खालीलप्रमाणें:-

१९३४ मधील निर्यात माल

			रक्कम रु.
नारळ	नग	३३४५३०५८	५६९९७८
खोबरें	मण	२५९६१	१६४१९१
काजू	,,	२२८६४	६०११६
काजूगर	,,	१३७८०	२५०७५६
सुपारी	,,	३१५९९	१४९१२०
आंबे	नग	३२६५०९७	११०९४०
मासळी	मण	१३३५२	७६६२८
मीठ	,,	१३३७७९	१३२६३९
लांकूड	,,	१४	८३
			१५१४४५१
इतर जिन्नस			६४५९८४
एकूण निर्यात			२१६०४३५

१९३४ मधील आयात माल

			रक्कम रु.
तांदूळ	खंडी	१६८५८७	१८९१४३६
भात	,,	९२३२६	४४६२०३
साखर	शेर	५२५२७१८	५८५३२१
गूळ	,,	६१३५१८	८९११४
गहूं	खंडी	१७६२२	२१९९९१
पीठ	शेर	२१७९४३७	२२०७३७
धान्यें	खंडी	२१९५२	२५००१४
मिरची	शेर	४०३२००	११४५४७
साबण	,,	३५४७११	१०७४९५
आगपेट्या	ग्रोस	१५३९६२	१११७५७
केरोसीन	ग्यालन	९४५२९८	४४०३९४
तंबाकू	शेर	३९३०९८	१९३६४९
सिगार सिगारेट	शेर	४४२६५	२१३९२२
लांकूड	टन	१२३६३	२७४४३७
नळे	नग	४१००४४४	१५३५५६
कापड	शेर	५८५९५८	१६५११५५
चहा	,,	७५०५४	८२८२३
			७०४६५५१
इतर जिन्नस			७२१८३००
		एकूण आयात	१४२६४८५१

यावरून असें दिसून येईल कीं, पंचवीस वर्षांमागें आमची आयात ६२ लक्ष होती ती आज १ कोट ४२॥ लक्षांवर जाऊन पोंचलेली असून तूट जी ३७ लक्ष होती ती आज १ कोट २१ लक्षांवर गेलेली आहे. आमच्या आयात-निर्यातींत पडत चाललेलें हें फार मोठें अंतर लक्षांत घेतां कोणीही असेंच म्हणेल कीं, आपल्या प्रांताची परिस्थिति दिवसेंदिवस हलाखीची होत जात असून लौकरच तो दिवाळखोर बनण्याचीं चिन्हें दिसत आहेत. कारण, या येत असलेल्या तुटीची भरपाई तो आपल्या पूर्वीच्या भांडवलांतून करीत असला पाहिजे. आणि असें असेल तर, हें भांडवल संपल्यावर मग काय, असा प्रश्न साहजिकच उपस्थित होतो. तेव्हां, ही तूट आम्ही कशी भरून काढली अगर काढीत आहों याचा नीट विचार करणें अगत्याचें ठरतें.

इ. स. १९०० पासूनचे आंकडे घेतले तर त्यांवरून, ही तूट आकस्मिक नसून दर वर्षीं सारखी वाढत असल्याचें दिसून येईल. इ. स. १९१० ते १९३४ पर्यंतच्या पंचवीस वर्षांत ही तूट आम्हीं किती भरली हें खालील आंकड्यांवरून कळून येईल.

इ. स. १९१० ते १९३४

आयात	निर्यात
३२५१७८६९०	८८८६२४७५

तूट

२३६३१६२१५

आम्हीं वर जे १९१० व १९३४ सालचे २ तक्ते दिलेले आहेत, त्यांवरून असें दिसून येतें कीं, पंचवीस वर्षांपूर्वी आम्हांस आयात मालांत अत्यावश्यक जिनसांकरितां ४१। लक्षांची व इतर जिनसांकरितां २१॥ लक्षांची जरूर होती. तें प्रमाण १९३४ सालीं अनुक्रमें ७०॥ व ७२ लक्षांवर आलें. यावरून असें उघड होतें कीं, आम्ही आमच्या गरजा वाढवीत गेलों आहों. गरजा वाढण्याचें एक प्रमुख कारण म्हणजे सांपत्तिक भरभराट हें असतें. 'अर्थ' साप्ताहिकांत (ता. १७-११-३७) हिंदुस्थानच्या १९३६-३७ च्या आयात-निर्गतीचे आंकडे देऊन संपादक म्हणतात, "गेल्या वर्षी हिंदुस्थानच्या निर्गत व्यापाराची एकूण किंमत १९६ कोटी भरली. म्हणजे १९३५-३६ च्या मानानें ३६ कोटींची वाढ झाली; व आयात १२५ कोटींची झाली. पूर्वीच्या वर्षाचा आंकडा १३४ कोटींचा होता. आयात व्यापारांत एवढी घट केवळ मालाच्या स्वस्ताईमुळें झाली नाहीं. देशांत मालच कमी आला हें मुख्य कारण होय. हिंदी जनतेची कमाई

कमी होऊन माल विकत घेण्याचें लोकांचें सामर्थ्य मर्यादित झालें हें प्रस्तुत आंकड्यांवरून सिद्ध होत आहे." यावरून आयातींतील वाढ किंवा घट ही देशाची सांपत्तिक बरीवाईट स्थिति दर्शविते, हें उघड होतें. एकाद्या माणसाचा आर्थिक दृष्ट्या उत्कर्ष झाला म्हणजे त्याला आपली राहणी अधिक सुखसोयीची असावी असें वाटूं लागतें, आणि त्याच्या दृष्टीनें पूर्वी आवश्यक नसलेल्या गोष्टीही अगदीं गरजेच्या होऊन बसतात. गोमंतकाच्या गरजा वाढल्या आहेत त्या अशाच प्रकारें सांपत्तिक सुस्थितीमुळें, कीं मागचापुढचा विचार न करतां केवळ मूर्खपणानें आपण त्या वाढवून बसलों आहों, हें पाहिलें पाहिजे.

कित्येक असें म्हणतात कीं, आमच्या निर्यात मालाची परिस्थिति दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. अशा स्थितींत गरजा वाढविल्यानें हळूहळू आम्हांला आमचें भांडवल गमावून बसावें लागेल. याचें प्रत्यंतर म्हणून, आजकाल ज्या जमिनी लिलांवांत जात आहेत, त्यांच्याकडे ते बोट दाखवितात. परंतु, एक गोष्ट त्यांच्या लक्षांत आलेली दिसत नाहीं. ती ही कीं, या लिलांवांत गेलेल्या जमिनी विकत कोणीं घेतल्या? बाहेरील लोकांनीं कीं गोमंतकीयांनीं? ज्याअर्थी त्या विकत घेणारे जर्मनींतील ज्यू किंवा ब्रिटिश हिंदुस्थानांतीलही लोक नसून आपले गोमंतकीय बांधवच आहेत, त्याअर्थी फार झालें तर गोव्यांतल्या गोव्यांत त्या जमिनींची अदलाबदल झाली असें म्हणावें लागेल. आणि एकदां हें सिद्ध झालें म्हणजे आपल्याला असा निष्कर्ष काढावा लागतो कीं, आपल्या गरजा आपण वाढविल्या आहेत याचें कारण, त्या भागविण्याचें सामर्थ्य आपल्या अंगीं आहे, हेंच होय. नपेक्षां या तुटीच्या भरपाईकरतां आम्ही आमचें जमीनरूपी सबंध भांडवल जरी विकावयास काढलें असतें तरी तिची भरपाई झाली नसती, हें खालील आंकड्यांवरून दिसून येईल.

आमच्या सरकारच्या उत्पन्नापैकीं जमिनीवरील कराचें उत्पन्न (Contribuição predial) १९३१-३२ च्या आंकड्यांप्रमाणें ५४९४०० रु. आहे. सरकार हा कर निव्वळ उत्पन्नावर १२ टक्केप्रमाणें घेतें. त्या हिशोबानें आमच्या जमिनींचें कच्चें उत्पन्न ९२ लक्ष रु. ठरतें. हें उत्पन्न म्हणजे मूळ भांडवलाचें ५ टक्केप्रमाणें व्याज असें धरल्यास मूळ भांडवल अर्थात् जमिनींची किंमत १८ कोटी ४० लक्ष रु. होते. सन १९१० ते १९३४ या पंचवीस वर्षांतील आमची तूट २३॥ कोटी आहे. अर्थात् वर सांगितल्याप्रमाणें, आमच्या सगळ्या जमिनी जरी विकल्या असत्या तरी तूट भरून निघाली नसती, हें उघड होतें.

शिवाय आणखी एका मुद्द्याचा आपण येथें विचार केला पाहिजे. आयातनिर्यातीच्या आंकड्यांवरून देशाची सांपत्तिक स्थिति ठरवण्याची एक पद्धत असते खरी. परंतु ती सर्व ठिकाणीं जशाची तशी लागू करणें बरोबर नव्हे. श्री. देवनारायण द्विवेदी हे आपल्या "देशकी बात" (श्री. देऊसकर यांच्या 'देशेर कथा' या पुस्तकाचा अनुवाद) ग्रंथांत लिहितात, "वस्तुतः या दोन्हींपैकीं एकही गोष्ट देशाच्या समृद्धीचें लक्षण नव्हे. आपण हिंदुस्थानचेंच उदाहरण घेऊं. हिंदुस्थानची निर्यात जास्त आहे. परंतु हिंदुस्थानाइतकी गरिबी आणखी कोठेंही दिसणार नाहीं." याच मताचा अनुवाद 'महाराष्ट्र-सांवत्सरिक' पृष्ठ ४५८ वर केला आहे.

दुसरें उदाहरण इंग्लंडचें. इंग्लंडची आयात निर्गतीपेक्षां अधिक आहे. यासंबंधीं 'महाराष्ट्र-सांवत्सरिक'कर्ते पृष्ठ ४५८ वर म्हणतात, "आंतर्राष्ट्रीय व्यापार हिंदुस्थानला फायद्याचा

असून इंग्लंडला तो नाहीं. यावरून त्या राष्ट्राच्या सांपत्तिक स्थितीबद्दल कोणीही विधान करूं शकत नाहीं. इंग्लंडला अनेक राष्ट्रांकडून आपल्या भांडवलावरील व्याज वसूल करावें लागतें."

तथापि आपल्या प्रांताला येणाऱ्या तुटीचा विचार अजून आपणाला करावयाचा आहे. आज बऱ्याच वर्षांपासून आमची ही तूट वाढत असून ज्यांना आपल्या जन्मभूमीची काळजी आहे, त्यांच्यासमोर हा प्रश्न प्रामुख्यानें उभा आहे. आपल्या हिंदु समाजांत या प्रश्नाचा विचार फारच थोड्या लोकांनीं केलेला आहे. पंचवीस वर्षांपूर्वी 'सत्संग' मासिकांत या विषयावर तीन लेख प्रसिद्ध झाले होते. ते म्हणजे 'गोव्यांतील सांपत्तिक स्थिति' (वर्ष १, पृ.१७६) 'आमच्या राष्ट्राचा जमाखर्च' (व.५, पृ. १४२) व 'आमचा आयात-निर्गत व्यापार' (व. ५, पृ. १८३) हे होत. लेखकांनीं या प्रश्नाचा विचार करून, ही तूट (त्यावेळीं ही ३०-३२ लाखांची होती) भरून काढण्याचे उपाय म्हणजे निर्गत वाढविणें व आयात घटविणें, असा निष्कर्ष काढला होता.

आपल्या मानानें ख्रिश्चन समाजानें या प्रश्नावर पुष्कळ अधिक विचार केलेला आहे. इतकेंच नव्हे तर नुसता विचार करून न थांबतां, ज्या मार्गांनीं ही तूट भरून निघून आपली सांपत्तिक स्थिति सुधारणें शक्य आहे, त्यांचें अवलंबनही त्या समाजानें धडाडीनें केलें आहे. व त्यामुळेंच ती भरून निघण्याचें साधन उपलब्ध झालेलें आहे. आपल्या गोमंतकीय हिंदु समाजापेक्षां ख्रिश्चन समाज आर्थिक बाबतींत निःसंशय प्रगतिपर आहे. त्या समाजापुढें प्रामुख्यानें जर कोणता प्रश्न असेल तर तो आर्थिक होय व हा प्रश्न तो केव्हांही दृष्टीआड करीत नाहीं. त्यामुळें त्या समाजांतील अभ्यासकांकडून या विषयावर इतकें लिखाण प्रसिद्ध केलें जातें कीं आपल्या हिंदु समाजानें त्याचा अभ्यास करणें जरूर आहे. याशिवाय, आपल्या प्रांताच्या आर्थिक उत्कर्षाशीं प्रत्यक्ष संबंध असलेल्या विषयांची चर्चा करण्याच्या उद्देशानें (Destinado a tratar assuntos que directamente interessam ao desenvolvimento dêste país) काँग्रेस प्रोव्हिंसियाल नांवाची एक संघटित संस्थाही त्या समाजाकडून स्थापन करण्यांत आली होती. इ. स. १९१५ सालीं आफोंस दे आल्बुकेर्क याचा चतुर्थ शतसांवत्सरिक उत्सव साजरा करण्याचें ठरलें होतें, त्या प्रसंगीं गोव्याची 'काँग्रेस प्रोव्हिंसियाल' भरवावी, अशी एक कल्पना निघून तिच्यांतून सदर संस्थेचा जन्म झाला. त्यावेळीं दो. कौसैर द कॉश्त हे गोव्याचे गव्हर्नर होते. काँग्रेसची पद्धत अत्यंत आधुनिक व नमुनेदार होती. विषयांची अगोदर निवड करून त्यांवर निबंध मागविण्यांत येत; हे निबंध विषयवारीनें मुख्य तज्ज्ञांकडे जात व ते छापून त्यांची एकेक प्रत सभासदांकडे पाठविली जाई. मुख्य तज्ज्ञांकडून विषयवारीनें निबंधांचें समालोचन होऊन व चर्चेचे मुख्य मुद्दे निवडून आल्यावर ते सभासदांपुढें ठेवले जात व मग त्यांच्यावर काँग्रेसच्या बैठकींत ऊहापोह होऊन ठराव पास होत. हे निबंध त्या त्या विषयांतील तज्ज्ञांकडून अत्यंत परिश्रमपूर्वक लिहिले जात. काँग्रेसच्या पहिल्या अधिवेशनांत निरनिराळ्या विषयांवर सुमारें पाऊणशें निबंध आलेले होते. यांत हिंदु लेखकाकडून एकाददुसरा आला असेल. बाकी सर्व ख्रिश्चन लेखकांकडून आलेले होते. यावरून त्या समाजांत तज्ज्ञांची संख्या कशी विपुल आहे याची कल्पना होईल.

काँग्रेसचीं नऊ अधिवेशनें भरलीं. निबंध पुष्कळ आले, तात्विक विवेचनही भरपूर झालें.

पण त्या मानानें प्रत्यक्ष फायदा पदरांत पडला असें म्हणतां येत नाहीं. तथापि आर्थिक प्रश्नांसंबंधीं इतका ऊहापोह झाला कीं, त्यामुळें आपल्या आर्थिक परिस्थितीवर निःसंशय अधिक प्रकाश पडला आणि या विषयाचा अभ्यास करणाऱ्यांना एक महत्त्वाचें साधन निर्माण झालें. काँग्रेसच्या सर्व अधिवेशनांचे अहवाल प्रसिद्ध झाले आहेत. आपल्या आर्थिक परिस्थितीचें ज्ञान करून घेऊं इच्छिणारांनीं, विशेषतः आपल्या हिंदु समाजांतील व्यासंगी व्यक्तींनीं त्यांचा अवश्य अभ्यास करावा, अशी येथें आग्रहाची सूचना केल्याशिवाय राहवत नाहीं.

काँग्रेसमुळें प्रत्यक्ष व्यवहारांत कांहीं फायदा झाला नाहीं, याचें कारण हेंच कीं, सर्वांनीं विषयाच्या व्यावहारिक बाजूपेक्षां तात्विक विवेचनावर अधिक भर दिला. काँग्रेसच्या अध्यक्षस्थानावरून किंवा व्यासपीठावरून झालेल्या बहुतेक सर्व भाषणांतून, शेतीची वाढ करून किंवा उद्योगधंदे निर्माण करून आपली आयात घटविणें व निर्गत वाढविणें यांतच आपला तरणोपाय आहे, असा एकच सूर निघत होता.

इ. स. १९२३ सालीं कॉ. प्रोव्हिंसियालच्या ५ व्या अधिवेशनांत त्यावेळचे गोव्याचे बुद्धिमान् गव्हर्नर दो. ज्यायमि द मॉराइश् यांनीं कांहीं आंकड्यांच्या सहाय्यानें असें सिद्ध करून दाखविलें कीं, आमची निर्गत १० लक्षांनीं वाढवून आयात ४० लक्षांनीं घटविणें शक्य आहे. परंतु तें आंकड्यांनीं सिद्ध झालें तरी प्रत्यक्ष व्यवहारांत घडून आलें नाहीं. उलट निर्यात कमी होत जाऊन आयात मात्र वाढतच गेली.

तथापि जास्ती उत्पादन करून निर्गत वाढविणें कितपत शक्य आहे, याची आपण अधिक बारकाईनें छाननी करूं. अर्थशास्त्रांतील सिद्धांताप्रमाणें, भूमि, श्रम व भांडवल हे संपत्तीच्या उत्पादनाचे तीन मुख्य घटक होत. तेव्हां गोमंतकाच्या दृष्टीनें त्यांचा विचार करूं. गोमंतकांतील भूमि कितपत सुपीक आहे हा तज्ज्ञांचा प्रश्न आहे. रा. धनुर्धारी आपल्या 'व्यापारी भूगोल' या पुस्तकांत पृष्ठ ४०७ वर म्हणतात, "ही भूमि तितकीशी सुपीक नाहीं." हें मत सयुक्तिक दिसतें. शिवाय दुसरी एक गोष्ट लक्षांत घेणें जरूर आहे, ती ही कीं, आज हजारों वर्षे एकसारखें पीक काढण्यांत आल्यानें दिवसेंदिवस तिचा कसदारपणा कमी होत गेला असावा. गोमंतकांत लागवडींत येणाऱ्या जमिनीचा विस्तार किती व ती कोणकोणत्या पिकांत गुंतलेली आहे, याचे एकंदर आंकडे उपलब्ध नाहींत. तिसवाडी, फोंडा व सांखळी या तीन तालुक्यांचे तेवढे आंकडे सांपडतात; बाकीचे अजून तयार झालेले नाहींत. कां. प्रो.च्या ९ व्या अधिवेशनांत सि. आल्व्हरु व्हियॅगश् यांच्या 'आर्थिक मंदी' या निबंधावर चर्चा करतांना सि. ज्युवांव द फिगैरेद यांनीं सांगितलें कीं, "या बाबतींतले विश्वसनीय आंकडे उपलब्ध असते तर सि. व्हियॅगश् यांच्या निबंधाला परिपूर्णता आली असती. तथापि काँग्रेस प्रत्येक वर्षी मागणी करीत असतांही ही आंकड्यांची उणीव अजून भरून निघालेली नाहीं." परंतु या अधिवेशनाचे अध्यक्ष आणि गोमंतकांतील एक बुद्धिमान् व व्यवहारज्ञ इंजीनियर बॅर्नार्दीनु कामीलु द कॉश्त यांच्यासारख्यांनीं, आंकड्यांची जरूर नाहीं, असें मत द्यावें याचें फार आश्चर्य वाटतें. आजची जगाची परिस्थिति अशी आहे कीं, अमेरिकेंत यंदां कापसाची लागवड किती एकर झालेली आहे व गेल्या वर्षी किती झाली होती याचे आंकडे प्रसिद्ध होतांच त्यांना अनुसरून जगाच्या बाजारांत कोट्यवधि रुपयांची उलाढाल होते. यावरून आंकड्यांचें महत्व किती आहे तें कळून येतें.

सि. व्हियॅगश् यांच्या वर उल्लेखिलेल्या निबंधांत, गोमंतकाच्या उत्पादनाच्या मुख्य बाबी कोणत्या, तें सांगितलें आहे. व त्या म्हणजे तांदूळ, नारळ व परदेशगमन या होत. या इतक्या महत्वाच्या आहेत कीं, सि. व्हियॅगश् यांनीं म्हटल्याप्रमाणें, त्यांपैकीं कोणत्याही एका बाबींत जरासा बिघाड झाला तरी सबंध प्रांताच्या आर्थिक परिस्थितीवर त्याचा परिणाम झाल्याशिवाय राहत नाहीं.

गोमंतकांतून निर्गत होणारा मुख्य जिन्नस नारळ होय. नारळीच्या झाडास आपल्याकडे कल्पवृक्ष म्हणतात आणि तें बऱ्याच अंशीं खरेंही आहे. या झाडाचें कांहींच फुकट जात नाहीं; प्रत्येक भागाचा कांहीं ना कांहीं उपयोग होतो. आश्चर्याची गोष्ट ही कीं, नारळाच्या करवंटीचा कोळसा हा विषारी गॅसपासून संरक्षण करण्याच्या कामीं फार उपयोगी पडतो असें युरोपियन शास्त्रज्ञांना अलीकडे आढळून आलें असून कोलंबोहून आठशें टन करवंट्या युरोपला रवाना झाल्या, अशी बातमी गेल्या तीन महिन्यांमागें प्रसिद्ध झाली होती. यावरून, या सर्वोपयोगी तसेंच येथील भूमीला अधिक मानवणाऱ्या अशा झाडाची लागवड करण्यांत आमच्या पूर्वजांची बुद्धिमत्ता दिसून येते, असें म्हटलें पाहिजे. ब्रिटिश हिंदुस्थानांत याची लागवड पूर्वी कमी प्रमाणांत होत असल्यानें गोमंतकांतील नारळाला तेथें भरपूर मागणी असे. परंतु दिवसेंदिवस त्याची लागवड तेथें अधिकाधिक होत असून त्यावरील संरक्षक जकातही वाढविण्याबद्दल तेथील लोक सरकारकडे मागणी करीत आहेत. आणि आज नसली तरी भविष्यकाळीं या जकातवाढीची शक्यता आहे, हें आम्हीं लक्षांत ठेवलें पाहिजे. गोमंतकांत नारळाचें उत्पन्न आपल्या जरुरीपेक्षां अधिक होत असल्यानें त्याची आपणास कोठेंतरी निर्गत ही केलीच पाहिजे. अर्थशास्त्राच्या सिद्धांताप्रमाणें उत्पादन केलेल्या जिनसाची कोठेंतरी जरुरी असावी लागते. परंतु बाहेरप्रांतांतला नारळाचा दुर्मिळपणा दिवसेंदिवस कमी होत चालला आहे. व त्यामुळें नारळाची किंमत उतरत गेल्यास नवल नाहीं.

आज आफ्रिका, मलाया, जावा, सिंगापूर वगैरे ठिकाणीं नारळाची लागवड मोठ्या प्रमाणावर होत आहे. तथापि या लागवडीच्या बाबतींत गोमंतकाचा सर्वांत जवळचा प्रतिस्पर्धी म्हणजे सिलोन हा होय. 'लंकेंत सोन्याच्या विटा' अशी आपल्यांत एक जुनी म्हण आहे. आणि तेथील भूमीचा सुपीकपणा पाहतां ती सार्थ आहे असें म्हटलें पाहिजे. सिलोनची लोकसंख्या ५४ लक्ष असून तो देश ४० कोटी रुपयांची निर्यात व ४२ कोटींची आयात करतो. तेथें दरवर्षी ३॥ अब्ज नारळ उत्पन्न होत असून लोकांच्या खाण्यांत दररोज ३ लक्ष म्हणजे वर्षाकांठीं १० अब्ज ८ कोटी अर्थात् एकंदर उत्पादनाचा एक तृतीयांश खर्च होतो. व राहिलेले दोन तृतीयांश निर्गत होतात. १९२९ सालचे सिलोनचे निर्यातीचे आंकडे पुढीलप्रमाणें:-

खोबरें व कीस	हंड्रेडवेट	६९०४६९	रु.११८७५७८०
तेल	,,	८७८५२३	,,१८०२४३५९
पेंड	,,	३३३४२६	,, २११४८९८
नारळ	नग	२०८२१२८४	,, १२८१९१०

गोमंतकांत नारळाचें उत्पन्न पूर्वीपेक्षा वाढलें आहे कीं काय याचा विचार, आंकडे नसल्यानें केवळ अनुमानावर करावा लागतो १९१० सालीं नारळाची निर्गत, प्रत्यक्ष नारळ कोटी ३५ लक्ष व खोबरें १८ हजार मण इतकी झाली. तीच १९३४ सालीं नारळ ३ कोटी ३४ लक्ष व खोबरें २५ हजार मण अशी झाली यावरून या पंचवीस वर्षांत फारशी वाढ अगर घ

घडून आलेली दिसत नाहीं. .किंमतींत मात्र बरीच घट झालेली आहे. १९१० सालीं निर्यात नारळाची किंमत १४ लक्ष ८७ हजार रु. आली होती, ती १९३४ सालीं ७ लक्ष ३४ हजार रु. म्हणजे अवघी निम्म्यानें आली. मालाची किंमत वाढविणें अगर घटविणें हें आज एकट्या-दुकट्या राष्ट्राच्या हातांत नसून जगाच्या बाजारावर अवलंबून आहे. त्यांतल्या त्यांत या बाबतींत मोठ्या राष्ट्राच्या हातीं कांहीं सत्ता असूं शकेल; पण आमच्यासारख्या लहान प्रांताला कांहींच करतां येण्याजोगें नाहीं. गोमंतकांतल्या गोमंतकांत मात्र नारळाचा खप पूर्वीपेक्षां बराच वाढलेला असून जवळजवळ अर्धें पीक म्हणजे अंदाजें तीन कोटी नारळ येथें उपयोगांत येत असावा, असें माहितगारांचें मत आहे. यावरून एकंदरींत पूर्वीपेक्षां पीक वाढलेलें आहे, असें म्हटलें पाहिजे.

नारळाचा अधिक उपयोग करण्याच्या बाबतींत, काँग्रेस प्रोव्हिंसियालच्या ९ व्या अधिवेशनांत भरपूर चर्चा झाली. कित्येकांचें असें मत दिसलें कीं, आमच्या अन्नांतला मुख्य पदार्थ जो तांदूळ तो कमी करून नारळाचा अधिक उपयोग करावा. परंतु यावर दो. दुर्मींगुश् द सौझ यांनीं दिलेलें उत्तर मुद्देसूद आहे. ते म्हणाले, "नारळ हा नेहमींच पचनाला सुलभ जाईल असा पदार्थ नव्हे. त्याच्यांत चरबीयुक्त तत्वें विपुल असतात हें खरें, पण ज्या तांदुळांऐवजीं आपण तो वापरूं पाहात आहों त्यांत पिष्टमत्वें (Hidratos de carbono) भरपूर प्रमाणांत असतात हें लक्षांत घेतलें पाहिजे. आहारपद्धति ठरवितांना कोणत्या पदार्थांची उष्णत्वसंख्या (Caloria) जास्ती आहे, एवढेंच केवळ पाहून भागत नाहीं. सहजप्रेरणा हीसुद्धां समाजाला आपल्या आहारसच्या घटकांची निवड करतांना मार्गदर्शक होते. एकाद्या समाजाचा आहार जो निश्चित होतो त्याला, शेंकडों वर्षांपासून आनुवंशिक रीतीनें चालत आलेले प्रघात, अन्नाचें प्रमाण, रुचि, पाचकता, हवामान आणि रासायनिक घटना या गोष्टी निःसंशय कारणीभूत होत असतात." (९ व्या कॉं. प्रो. चा अहवाल, पृ. १३३.)

यावरून आहारांतील मुख्य घटक या नात्यानें नारळाचा उपयोग करणें व्यावहारिक दृष्ट्या शक्यतेच्या कोटींतलें नाहीं, हें उघड होतें. परंतु गौण स्वरूपांत का होईना, नारळ आपल्या खाण्यांत पूर्वीपेक्षां अधिक येऊं लागला आहे, हें कोणालाही नाकबूल करतां येणार नाहीं.

तथापि, एकंदरींत विचार करतां, आपल्या नारळाचा भविष्यकाल उज्ज्वल नाहीं. याचीं कारणें अनेक आहेत. त्यांपैकीं कित्येकांचा येथें उल्लेख करूं. पहिल्याप्रथम, सिलोनमधील जमीन इकडील जमिनीपेक्षां अधिक सुपीक असल्यानें तेथील पीक सरस असतें. गोव्यांत पहिल्या प्रतीच्या एक हजार नारळांचें खोबरें सरासरी २६० रत्तल येतें (बादेशमध्यें तें याहून थोडें अधिक येतें); तर सिलोनमध्यें तें ५२० रत्तल येतें. दुसरें कारण असें कीं, इकडील मजुरी तिकडच्यापेक्षां बरीच महाग असते. ब्रिटिश हिंदुस्थानांतील जकात व वाहतूकखर्च भरावा लागल्यानें नारळाच्या किंमतींत येणारी तूट हें तिसरें कारण होय. याशिवाय आणखीही एक कारण आहे व तें म्हणजे आमच्या आळशीपणामुळें मशागतींत होणारी हेळसांड हें होय. यांपैकीं पहिलीं तीन कारणें दूर करणें हें जरी आम्हांला शक्य नसलें तरी शेवटचें कारण नष्ट करणें हें मात्र पूर्णपणें आपल्या हातांत आहे. व याच गोष्टीकडे आम्ही विशेष लक्ष पुरविलें पाहिजे.

प्रो. भाटे हे आपल्या 'सिलोनचा प्रवास' या पुस्तकांत (पृ. १७७) म्हणतातः- "लंका

बेटांतील सर्व शेतकरी इसापनीतींतील अक्रोडाचें झाड लावणाऱ्या वृद्धाच्या वंदनीय कोटींतील आहेत. म्हणूनच नारळीच्या बागा ओस पडूं नयेत म्हणून आधींपासून ते तजवीज करतांना दृष्टीस पडतात. नारळाच्या बागेंत बायकापुरुषांना कामें तरी किती तऱ्हेचीं करावीं लागतात, व करण्यास सवड सांपडते, हेंही मला आगगाडींतून सहज पाहतां आलें. कित्येक बायका नारळाच्या चोडांतून काथ्या काढीत होत्या, तर कित्येक तो काथ्या पिंजीत होत्या. कित्येक पुरुष नारळ चोडांतून वेगळे करीत होते, तर कित्येक नारळाचीं चोडें काढ्यांच्या कुंपणानें केलेल्या खाडींतील खाऱ्या पाण्याच्या कुंडांत कुजविण्याकरितां टाकीत होते. कित्येक बायका नारळींच्या पानांचे झाप विणीत होत्या, तर कित्येक पानांपासून हीर (केरसुण्यांकरतां) वेगळे करीत होत्या. कांहीं बायका ताडाच्या पानांच्या बारीक बारीक चिरफळ्या करीत होत्या व त्यांच्या टोपल्या व चटया विणीत होत्या. अशा नाना व्यवसायांत गुंतलेले बायकापुरुष आपापल्या अंगणांत व बागांत कामें करीत असतांना आगगाडींतून सहज माझ्या दृष्टीस पडले."

या दृश्याशीं गोमंतकांतील परिस्थितीची तुलना केल्यास असें आढळून येईल कीं, आमचा जमीनदार वर्ग मशागतीकडे फारच दुर्लक्ष करीत आहे. आजच्या जमीनदार वर्गाला श्रमाची आवड राहिलेली नाहीं, किंबहुना श्रमाची त्याला लाज वाटूं लागली आहे. यामुळें घरीं स्वस्थ बसून मिळेल तें उत्पन्न घ्यावें व दैवाला दोष देत राहावें, यापलीकडे त्याच्या हातून कांहीं होत नाहीं. पण आज जगाच्या घालमेलींत जो जास्त श्रम करील त्याचाच टिकाव लागेल, या गोष्टीकडे आमच्या जमीनदार वर्गानें यापुढें डोळेझांक करून चालणार नाहीं.

निर्गत वाढलेली वस्तु म्हणजे काजू ही होय. संख्येंत आणि किंमतींतही काजूचें उत्पन्न वाढलेलें आहे. परंतु तें तसेंच राहील असें सांगतां येत नाहीं. याचें कारण याही वस्तूचें उत्पादन जगांत वाढतें आहे. सुपारी व मीठ यांच्या बाबतींत मोठासा फरक झालेला दिसत नाहीं. मिठाचें भवितव्य मात्र बरेंच भीतिजनक आहे. तूर्त ब्रिटिश हिंदुस्थानास प्रांतिक स्वायत्तता मिळाली असून महात्मा गांधींच्यापुढें मिठाचा प्रश्न प्रामुख्यानें आहे. मीठ हें गरिबांचें अन्न असल्यानें, त्यावरील कर काढून त्याचें उत्पादन जर वाढविलें गेलें व आयातीवर संरक्षक जकात बसविण्यांत आली, तर आमची ही निर्गत बंद झाल्याशिवाय राहणार नाहीं. मासळीचीही गोष्ट अशीच झाली आहे. पंचवीस वर्षांपूर्वी तिची निर्गत २ लक्ष २२ हजारांची होती ती आज संरक्षक जकातीमुळें फक्त ७६ हजारांवर येऊन ठेपली असून बंद होण्याच्या मार्गांत आहे.

राहतां राहिलेला जिन्नस म्हणजे आंबे हा होय. गोव्यांतील आंब्याची रुचि कांहीं निराळीच असते. जुन्या काळीं पेशवेसुद्धां इकडून मुद्दाम आंबे मागवून नेत असत, असा उल्लेख ब्रह्मेंद्रस्वामी धावडशीकर यांच्या पत्रांत सांपडतो. आंबा हा केवळ रुचकर असतो, असें नव्हे, तर त्यांत अनेक पौष्टिक द्रव्येंही असतात. पंचवीस वर्षांमागें गोव्यांतील आंब्याला बाहेरप्रांतीं फार मागणी असे. परंतु आज रत्नागिरीच्या बाजूला त्याची लागवड पुष्कळ झाली असल्याकारणानें आमची आंब्याची निर्यात बंद होण्याच्या मार्गांत आहे. पंचवीस वर्षांपूर्वी ६९ लक्ष फळें (१ लक्ष ४४ हजार रु. किंमतीचीं) बाहेरप्रांतीं रवाना झालीं, तींच १९३४ सालीं ३२॥ लक्ष फळें (१ लक्ष १० हजार रु. किंमतीचीं) निर्यात झालीं. या आंकड्यांवरून कुणालाही सहजच असें वाटेल

कीं, निर्यात निम्म्यावर आली असतां किंमतींत त्या मानानें घट झालेली दिसत नाहीं. परंतु यांतली मख्खी अशी आहे कीं, पूर्वीप्रमाणें बाहेरचे लोक येथून हा माल नेत नसून आपल्याच लोकांना तो बाहेर नेऊन विकावा लागतो. त्यामुळें जकातनाक्यावर केवळ अंदाजीं किंमत नोंदली जाते. परंतु पुढें त्यांना बाजारच्या परिस्थितीप्रमाणें येईल ती किंमत घेणें भाग पडतें. पुष्कळदां ब्रिटिश सरकारची जकात व वाहतूकखर्च यांचीही भरपाई होण्याची मारामार पडते.

आपण एक सिद्धांत नेहमीं लक्षांत बाळगला पाहिजे तो हा कीं, निर्गत होणारी वस्तु जगाच्या स्पर्धेमध्यें उच्च दर्जाची ठरली, तरच जगांत तिचा टिकाव लागेल व याकरतां ती वस्तु आपण परिश्रमपूर्वक पहिल्या प्रतीची उत्पन्न केली पाहिजे. पूर्वकाळीं गोव्यांतील आंब्याच्या लागवडीला व तिच्या सुधारणेला पोर्तुगीज लोकांचे श्रम बरेच कारणीभूत झाले असावे, असें आंब्यांच्या निरनिराळ्या जातींच्या नांवांवरून दिसतें. पण आज आपल्याला श्रमाचें वावडें आहे. व यामुळें आंब्याच्या बाबतींतील पहिल्या प्रतीचा मान जो आमच्याकडे होता, तो आज दुसरीकडे गेला आहे. सन १९३६ सालीं मुंबईस जें आंब्यांचें प्रदर्शन भरलें, त्यांत पहिल्या प्रतीचें बक्षीस मुंबईचे श्री. बाटलीवाला यांना त्यांच्या मलबार हिलवरील लागवडींत निपजलेल्या आंब्याला मिळालें. (प्रकाश, पणजी, ता. १०-६-३६.)

कॉं. प्रो.च्या ९ व्या अधिवेशनांत, आंब्याचा खप बाहेरगांवीं होण्याकरितां जारीनें प्रचार करण्यांत यावा, असा ठराव पास झाला. परंतु ही वस्तु 'प्रिझर्व्ह' करून स्वस्तांत इकडेच विकतां यावी याबद्दल जर कांहीं तजवीज झाली असती तर निर्गत बंद होऊन येणाऱ्या तुटीची भरपाई तर अन्य रीतीनें झालीच असती, पण शिवाय आरोग्याच्या दृष्टीनेंही गोमंतकाचा फायदा झाला असता, असें लेखकाचें मत आहे.

एकंदरींत आपल्या निर्यात मालाचा भविष्यकाल उज्ज्वल नाहीं व याचीं कारणें खालीलप्रमाणें आहेत:-

१. आज आर्थिक बाबतींत 'बळी तो कान पिळी' अशी परिस्थिति असल्यामुळें मोठ्या राष्ट्रांपुढें लहान राष्ट्रांना कांहीं करतां येण्यासारखें नाहीं.

२. प्रत्येक राष्ट्र शेतीच्या उत्पादनांत गुंतलेलें असून शास्त्रीय ज्ञानामुळें त्यांचें उत्पादन अधिकाधिक वरच्या दर्जाचें, स्वस्त व वाढत्या प्रमाणांत होत आहे. (आज जगांत उत्पादन इतकें प्रमाणाबाहेर होत आहे कीं, किंमती योग्य मर्यादेखालीं उतरूं नयेत म्हणून पुष्कळदां उत्पादित मालाचा नाश करण्यांत येत असतो. तुपाचा दर वाढविण्याकरितां हॉलंडमध्यें २ लाख दुभत्या गाईंचा संहार करण्यांत आला!. तर हंगेरीमध्यें धान्याचें पीक कमी करण्यासाठीं, शेतीच्या सुधारलेल्या यांत्रिक आउतांना बंदी करण्यांत आली!)

३. आमचें क्षेत्र व अर्थात् उत्पादनही त्या मानानें अल्प आहे. यामुळें सुधारलेली यंत्रसामुग्री इकडे वापरणें शक्य नाहीं व फायदेशीरही नाहीं.

४. आज प्रत्येक राष्ट्र आपल्या सभोंवार संरक्षक जकातीचे तट उभारीत आहे.

वरील कारणांकडे लक्ष देतां, गेल्या पंचवीस वर्षांत आमची प्रगति झाली नाहीं, याचा दोष सर्वस्वी आमच्यावर येत नसून परिस्थितीच तशी बिकट आहे असें म्हणावें लागतें. तथापि, आल्या परिस्थितीवर कांहींतरी तोड काढण्यासाठींसुद्धां आपण हातपाय हलवीत नाहीं, हा आपला आळशीपणा मात्र अक्षम्य होय.

यानंतर आयात मालापैकीं जो येथें कमी प्रमाणांत उत्पन्न होतो, त्याचें उत्पादन वाढविणें शक्य आहे कीं काय, याचा आपण विचार करूं. यापैकीं मुख्य म्हणजे तांदूळ हा होय. याच्या उत्पादनाचे नक्की आंकडे उपलब्ध नसल्यानें अनुमानावर विसंबून राहावें लागतें. व यामुळें कित्येकजण तें वर्षांतून तीन महिने पुरेसें आहे असें प्रतिपादन करतात, तर कित्येकजण ६ महिने पुरेल असें म्हणतात. कॉं. प्रो. च्या दुसऱ्या अधिवेशनाचे अध्यक्ष जॅनेराल मॅदिकु सि. कॉश्त आल्व्हरिश् यांनीं तें जवळजवळ पांच महिने पुरतें असें मत दिलें.

आपल्या गोमंतकीयांचें मुख्य अन्न तांदूळ होय. म्हणून या बाबतींत आपण परावलंबी राहूं नये, एतदर्थ काय करतां येईल, हा अनेकांच्या विचाराचा विषय झालेला आहे. सन १९२१ सालीं सि. मिनेझिश् बागांस यांच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या कॉं. प्रोव्हिसियालच्या ४ थ्या अधिवेशनांत यासंबंधीं बराच विचार झाला. अध्यक्ष आपल्या भाषणांत म्हणाले, "आमची तांदळांची तूट सरासरी १७११७ कुंभांची (कुंभ = २०५ ते २१० रत्तल) असून तीकरितां अंदाजें २९ लाखांची रक्कम आम्हांला भरावी लागते. अर्थात् आमची सरासरी आयात जी ८४ लाखांची, तिच्यांतील एक तृतीयांश आयात तांदळांची आहे. (आंकडे १९१६-१७ सालचे आहेत.) अतिशयोक्ति न करतां असें म्हणतां येईल कीं, आमचें तांदळांचें वार्षिक उत्पन्न ४१६९० कुंभ भातांचें असून आयात १७११७ कुंभ त्यांत मिळविले म्हणजे एकूण ५८८०७ कुंभ होतात." उत्पन्न वाढविण्याच्या बाबतींत त्यांनीं सांगितलें, "तांदळांच्या तुटवड्याची भरपाई करण्याकरितां केवळ शेतीचें क्षेत्र वाढविण्यावरच आपण विसंबतां उपयोगी नाहीं. आणि सध्या लागवडींत आहे त्याच जमिनींतून जास्त पीक काढण्याच्या बाबतींतही, यंत्रशक्ति परमावधीस पोंचलेल्या पाश्चात्य राष्ट्रांतून ज्या ज्या पद्धति फायदेशीर ठरल्या त्या त्या सर्व येथील परिस्थितींत उपयुक्त ठरतील असें नाहीं." या विषयावर आलेल्या निबंधांवर अधिवेशनांत जी चर्चा झाली तिच्यांतूनही असाच निष्कर्ष निघाला. पुण्याचे रावबहादुर केळकर यांनीं असें सांगितलें कीं, पिकांचें प्रमाण वाढविणें (Cultura intensiva) हाच येथील तांदळांचें उत्पन्न वाढविण्याचा एकमेव मार्ग होय. माज्यॉर लैति द मागाल्यांइश् म्हणाले, "तांदळांचें पीक काढण्याला इकडे जो खर्च येतो, त्या मानानें पिकाचें प्रमाण चांगलें असत नाहीं." इंजिनीयर बॅर्नार्दीनु द कॉश्त म्हणाले, "नवीन काबिजादींतील जमिनी जंगलवजा असून दऱ्यांतल्या खोलगट जागा तेवढ्या थोडेंसें पीक देतात. पण पाऊस फार पडतो त्यावेळीं तेंही कुजून नासून जातें." सि. मिलाग्रिश् लोबु यांनीं कांहीं आंकड्यांनीं असें सिद्ध केलें कीं, नवीन काबिजादींतील जमिनी तांदळांच्या लागवडीला निरुपयोगी आहेत. सि. फ्रांसीश्कु शाव्हियॅर व्हालिश् यांनीं तर स्पष्टच असें मत दिलें कीं, "मी माझ्या निबंधांत दाखवून दिल्याप्रमाणें, जरी आम्ही असतील नसतील त्या सगळ्या जमिनी लागवडींत आणल्या, तरी आमची तांदळांची तूट भरून निघणें शक्य नाहीं, याबद्दल माझी खात्री झाली आहे." या एकंदर चर्चेंतून असें निष्पन्न झालें कीं, आज पडीत असलेल्या जमिनींतून पीक काढूं गेल्यास तें खर्चाच्या मानानें पुरवणार नाहीं; तेव्हां लागवडींत असलेल्या जमिनींवरच खतपाण्याचे प्रयोग करून त्यांतून जास्त पीक काढण्याची तजवीज केली पाहिजे.

यानंतर सन १९३१ साल जागतिक मंदीचें गेलें व इकडील उत्पन्नाच्या संरक्षणाकरतां सरकारकडून बरीच संरक्षक जकात बसवली गेली. परंतु कॉं. प्रो. च्या ९ व्या अधिवेशनांत

यावर चर्चा होऊन अशा जकातीपेक्षां आयाती-वरील नियंत्रण (कंट्रोल) यासारखा एखादा कायदा करण्यांत यावा, असें मत देण्यांत आलें. तांदूळ हें गोमंतकीयांचें मुख्य अन्न असल्यानें या वेळीं गोमंतकांत फार मोठी खळबळ उडाली व एकीकडे जमीनदार वर्ग तर दुसरीकडे जनता असे दोन पक्ष निर्माण झाले. पहिल्या पक्षाचें म्हणणें असें होतें कीं, "या मंदींत सरकारनें कायदा करून बाहेरील आयात प्रमाणबद्ध केली पाहिजे आणि इकडील पीक बुडूं नये यासाठीं अवश्य तो दर ठरविला पाहिजे. असें न झाल्यास बाहेरून भरमसाट आयात होऊन येथील शेतजमिनी ओस पडतील." दुसऱ्या पक्षाचें म्हणणें असें होतें कीं, "जमीन-दार वर्गानें यापूर्वी किंमतवाढीचा भरपूर फायदा घेतला आहे. तेव्हां आतां जी जागतिक मंदीची लाट आलेली आहे तिचा फायदा गरीब जनतेला कां मिळूं नये? गरिबांचें अन्न तुम्ही कां महाग करतां?" दोघांच्याही मतांत थोडाफार तथ्यांश होता. कारण, संरक्षक जकातीच्या अभावीं, बाहेरून येणाऱ्या स्वस्त मालाशीं टक्कर देणें शक्य झालें नसतें व उत्पन्न फार कमी झालें असतें. बाकी जमिनी ओस पडण्याची भीति फार थोडी होती. कारण सर्व जमिनी ओस पडल्यास आणखी २५ लक्षांची तूट आली असती व बाहेरचा माल स्वस्त असला तरी तो घेण्याकरतां पैसा हा पाहिजेच. तेव्हां जनता बेकार राहून जमिनी ओस पडणें हें शक्य नव्हतें. परंतु शेवटीं सरकारला कायदा करणें भाग झालें व 'मानि-फेस्ता'चा कायदा निर्माण झाला. या कायद्या-प्रमाणें, उत्पन्न झालेलें सर्व भात नोंदलें पाहिजे. सन १९३६-३७ सालचें नोंदलें गेलेलें उत्पन्न पुढीलप्रमाणें:-

सर्द	४२०११५
वायंगण	७८२१६
	४९८३३१ खंडी (१ खंडी=२० कुंभ)

हें एकंदर पीक झालें. आजपर्यंत आमच्या तज्ज्ञांचा अंदाज असा असे कीं, गोमंतकाचें भाताचें पीक ८ ते १० लक्ष खंडी असावें. कॉं. प्रो. च्या ४ थ्या अधिवेशनांत सि. मिनेझिश ब्रागांस यांनीं तें ८३८८०० खंडी असावें, असें आपलें अनुमान बोलून दाखविलें होतें. नोंदणीनें अर्थातच हीं अनुमानें चुकीचीं असल्याचें उघड झालें. परंतु या नोंदणीवरही अशी शंका निघाली कीं, आज जे ३ महालांचे आंकडे उपलब्ध आहेत, ते लक्षांत घेतल्यास हें पीक जास्त असावयास पाहिजे. यावरून पाहतां, नोंदणी नीट झाली नसावी. (Herald-do, ता. २२-१२-३६ च्या अंकांतील A nossa produção de arroz हा लेख.) तथापि, या वर्षांत आयात घटत चालली आहे, यांत शंका नाहीं. ता.२५-८-३७ रोजीं कौन्सिलांत भाषण करतांना जकात-खात्याच्या मुख्याधिकाऱ्यांनीं तांदळांच्या आयातीचे आंकडे सादर केले ते खालीं दिले आहेत:-

साल	तांदूळ खंडी	रक्कम रु.
१९३२	२२६२९४	३२१७९१९
१९३३	२७४१९८	३१६२५७२
१९३४	२१४७५०	२३३७६३९
१९३५	१९२४७६	१९०१११९
१९३६	१३७४९३	१५९३२२१

चालू १९३७ सालचा ११९५३३ खंडींचा आंकडा पाहतां १९३७ पेक्षां यंदां कमी आयात झाली असें म्हणावें लागतें. परंतु यंदांची आयात थोडी अधिक असावयास पाहिजे होती.

ही आयात घटण्याचें कारण मानिफेस्ताचा कायदा होय, व त्यामुळेंच भाताचें उत्पन्न वाढत

गेलें, असें बहुतेकांचें मत आहे. परंतु यावर मुंबईचें गोमंतकीय वर्तमानपत्र Portugal e Colónias हें ता. १६-१०-३७ च्या अंकांत म्हणतें, "अशा कुठल्या गांवांत, कुठल्या तालुक्यांत शेतीचें क्षेत्र वाढविण्यांत आलें अगर कोणाच्या कुठल्या शेतांतून सुधारलेल्या शास्त्रीय पद्धति अंमलांत आल्या, कीं जेणेंकरून हें जास्त उत्पन्न आलें, तें जाहीर करण्यांत यावें." या वृत्तपत्राचें मत असें कीं, हा माल सरहद्दीवरून आंत येत असावा. परंतु त्याच्याशीं आम्हांस कांहीं कर्तव्य नाहीं. एकंदरींत पाहतां, आयात घटण्याचें मुख्य कारण उत्पादनांत झालेली वाढ हेंच होय. ही वाढ नवीन जमिनी लागवडीस आल्यानें किंवा नव्या पद्धति स्वीकारल्या गेल्यानें झालेली नसून या वर्षांत पाऊसपाण्याचें प्रमाणच ठीक लाभल्यामुळें झालेली आहे. याला पुरावा पाहिजे असल्यास ब्रिटिश हिंदुस्थानांतील तांदळाच्या उत्पादनाचे गेल्या दोन वर्षांतील आंकडे (टाइम्स ऑफ इंडिया, ता. २७-२-१९३७) तुलनेदाखल घेतले म्हणजे झालें.

साल	लागवडींतील जमीन (एकर)	उत्पन्न (टन)	एकरीं उत्पन्न हंड्रेडवेट
१९३५	८३४३४०००	२८२६९०००	६॥।
१९३६	८३५५६०००	३२९६२०००	७॥।

यावरून १९३५ पेक्षां १९३६ सालीं ब्रिटिश हिंदुस्थानांतही तांदळांचें पीक दर एकरीं एक हंड्रेडवेट म्हणजे ११२ पौंड जास्त आलें, असें दिसून येतें.

गोव्यांत १९३६-३७ सालीं सर्द व वायंगण मिळून ४९८३३१ खंडी भात पिकलें, हें मागें सांगितलेंच आहे. १९३६ ची तांदळाची आयात १३७४९३ खंडी आहे. या तांदळांचें मूळ भात २७५९८६ खंडी असावयास पाहिजे. तेव्हां तूर्त तरी, आम्हांस आवश्यक असलेल्या तांदळांपैकीं अंदाजें दोन तृतीयांश म्हणजे आठ महिन्यांपुरता तांदूळ येथें पिकतो, असें म्हणतां येतें.

तांदळांनंतर आयातीपैकीं विचारांत घ्यावयाचे पदार्थ म्हणजे गूळ व मिरची हे होत. यांचें येथील उत्पन्न पूर्वीपेक्षां वाढलेलें आहे. परंतु त्यांच्या उत्पादनाला येथें बराच खर्च येतो. आज पंधरा वर्षें गुळाच्या धंद्यांत असलेल्या एका इसमानें आपला अनुभव असा सांगितला कीं, गुळाचा भाव दर मणीं ३ रुपयांपेक्षां वर गेला तरच थोडाबहुत फायदा होतो, नपेक्षां भांडवलांतील रक्कम गमावून बसावें लागतें.

भात, गूळ, मिरची अशा जिनसांचे गोमंतकांतील दर किती महाग असतात, याची कल्पना येण्याकरतां कांहीं आंकडे खालीं देत आहे. गोमंतकांत भाताचा दर सरकारी रीत्या ठरलेला आहे हें सर्वांना माहीतच आहे.

भात (२१० रत्तलांस) गोवा १०।≈
,, ,, ,, रंगून ४।·, हल्याळ ५
गूळ (मणास) गोवा ३ रु., महाराष्ट्र १।· रु.
मिरची (,,) ,, ६ ते ८ रु. ,, २॥ ते ३ रु.

यावरून गोमंतकीय जनतेला या महाग वस्तु घेण्याचा स्वार्थत्याग कसा करावा लागतो तें कळून येईल. आणि यावरून झालें तरी तिची क्रयशक्ति चांगली आहे हेंच सिद्ध होतें.

एकंदरींत गोमंतकांतील शेतीच्या उत्पादनाची परिस्थिति वर वर्णिल्याप्रमाणें आहे. याशिवाय आपल्याकडे तंबाकू, जोंधळे, भुईमूग, कापूस वगैरे नवीन पिकें काढल्यास तीं फायदेशीर होतील असें म्हणणाऱ्यांचा एक वर्ग आहे. परंतु त्यांच्या तात्विक विवेचनावर विसंबून ज्यांनीं निरनिराळ्या ठिकाणीं, विशेषतः कुळें येथें मोठमोठ्या रकमा गुंतवून प्रयोग केले, त्यांपैकीं एकाला तरी यश आलें, असें उदाहरण दाखवितां

येणार नाहीं. यावरून निष्कर्ष निघतो तो हाच कीं, केवळ तात्विक विवेचनावर विसंबून या बाबतींत मोठें धाडस करणें धोक्याचें असून, असें कांहीं करावयाचें झाल्यास अगोदर लहान प्रमाणावर अनुभव घेऊन पाहणें अवश्य आहे.

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे गोमंतकांत शेतीच्या उत्पादनास जास्ती खर्च येण्याचीं मुख्य कारणें खालील आहेतः—

१. जमीन मोठी सुपीक नसल्यामुळें उत्पादनाचें प्रमाण कमी निघतें.

२. मजुरी महाग असल्यानें त्यांत भर पडते.

३. हवामान उष्ण व दमट असल्यानें थोड्या श्रमानें थकवा येतो.

याशिवाय, जमीन लहान प्रमाणांत विभागली गेल्यानें जगांतली सुधारलेली यंत्रसामुग्री वापरणें शक्य नाहीं, वगैरे कारणें मागें निर्यातीचा विचार करतांना सांगितलींच आहेत.

एकंदरींत उत्पादनाच्या बाबतींतही आपली मोठीशी प्रगति झालेली नाहीं. याचें कारण बऱ्याच अंशीं बिकट परिस्थिति हें असलें, तरी बँकेंतल्या ठेवीच्या व्याजाप्रमाणें शेतवाडीचें उत्पन्न घरबसल्या मिळावें, अशी आपल्या लोकांची दृष्टि असते, हें विसरून चालणार नाहीं. आज आपल्या शेतीचा प्रश्न अशा रीतीनें घरीं बसणारांनींच मुख्यतः सोडवला पाहिजे. ज्यांच्या अंगीं परदेशगमन करून पैसा आणण्याची धमक आहे, त्यांना इकडे शेतींत गुंतवून आपला फायदा नाहीं. या बाबतींत आपल्यामधील बादेंश महालांतील ख्रिश्चन समाजाचें उदाहरण आपण घेतलें पाहिजे. नपेक्षां ब्रिटिश हिंदुस्थानांतील शेतकऱ्यांसारखी आपली स्थिति होईल.

शेतीकडून आपण आतां इतर उद्योगधंद्यांकडे आपली नजर वळवूं. उद्योगधंद्यांना जें भांडवल पाहिजे, त्याची गोमंतकांत इकडच्या मानानें कमतरता नाहीं. आज पोस्टल बँक, देवस्थानें, ओस्पीस, मिझेरिकोर्द वगैरेमध्यें पुष्कळ पैसा पडलेला आहे. याशिवाय बाहेरच्या बँकांतूनही गोमंतकीयांचा बराच पैसा आहे.

हा पैसा उद्योगधंद्यांत गुंतला असता तर फायदा झाला असता, असें कित्येकांना वाटतें. गेल्या पंचवीस वर्षांत या दृष्टीनें बरेच प्रयत्न झाले. कॉं. प्रो. च्या १ ल्या अधिवेशनांत भि. रामचंद्र पांडुरंग ऊर्फ दादा वैद्य यांनीं कांचकारखाना इकडे फायदेशीर होईल असें सिद्ध करून दाखविलें. व तें सर्वांस पटून पैसाफंड निर्माण झाला. परंतु ही योजना दृश्य स्वरूपांत उतरली नाहीं, हें एका दृष्टीनें चांगलेंच झालें. कारण हा कारखाना इकडे यशस्वी होऊं शकला नसता. गोमंतकांत कारखान्यांना वाव कसा नाहीं आणि यापूर्वी त्या दिशेनें करण्यांत आलेले अनेक प्रयत्न कसे विफल झाले, तें मी गोवा हिंदु असोसिएशनच्या १९३६ च्या वार्षिक समारंभांत केलेल्या भाषणांत साधार दाखविलेंच आहे.

कॉं. प्रो.च्या ७ व्या अधिवेशनांत या विषयावर चर्चा करतांना दो. कार्लुश् द आल्पोईं म्हणाले, "उद्योगधंद्यांचा प्रश्न हा खरोखरच फार महत्वाचा आहे. पण त्याचा वरवर विचार करून भागणार नाहीं. कारण जे धंदे भरपूर नफा मिळवून देतात व देशाचे महत्वाचे आर्थिक घटक गणले जातात, ते सर्व येथें मोठमोठीं भांडवलें गुंतवून यशस्वी करतां येतील असें नाहीं. व्यवहार्य वाटणारा एकादा कारखाना येथें सुरू करण्यापूर्वी, तो फायदेशीर होण्यास कमींत कमी जेवढें उत्पादन करावयास पाहिजे त्याला लागणाऱ्या कमींत कमी कच्च्या मालाचा कमींत कमी दरांत कसा पुरवठा होत राहील, तयार केलेल्या मालास बाजारपेठ कशी मिळेल, वगैरे प्रश्नांचा सूक्ष्म अभ्यास करणें अवश्य आहे."

दो. आल्पोईं यांचें म्हणणें अगदीं बरोबर आहे. उद्योगधंद्यांच्या प्रगतीला क्षेत्र अत्यंत विस्तृत पाहिजे. आज जगांत जास्त उत्पादन करून डंपिंग (Dumping) कसें करतां येईल याचा विचार प्रत्येक राष्ट्र करीत आहे. शिवाय प्रत्येक राष्ट्र आपल्या सभोंवार जकातीचे तट उभारीत आहे. त्यांचा भेद करणें मोठमोठ्यांना कठीण जातें. जावा म्हणजे साखरेचें माहेरघर. परंतु हिंदुस्थानांत साखरेचे कारखाने निघाल्यानें जावाचें गिऱ्हाईक बुडालें. तेथील एका कारखानदारानें नुकतेंच असें सांगितलें कीं, आमचे शास्त्रज्ञ 'बीट'पासून दुसरा जिन्नस कोणता तयार करतां येईल, याच्या शोधांत गुंतलेले आहेत. हिंदुस्थानांत आज साखरेचे कारखाने पुष्कळ निघालेले आहेत. परंतु त्याचें कारण हेंच कीं, संरक्षक जकात दोनशें टक्के आहे. नाहींतर कारखाने निघालेच नसते. यावरून गोमंतकासारख्या लहान प्रांतांत कारखान्यांस कितीसा वाव आहे तें कळून येईल. केवळ तात्विक कल्पना डोळ्यांपुढें ठेवून ज्यांनीं यापूर्वी गोव्यांत कारखाने काढण्याचे प्रयत्न केले, त्यांना जबर ठोकर बसली आहे. तेव्हां यापुढें ज्यांना नवीन उद्योगधंदा सुरू करावयाचा असेल, त्यांनीं सर्व बाजूंनीं पूर्ण विचार करून जपून पाऊल टाकलें पाहिजे. तथापि एकंदरींत सांगावयाचें म्हणजे येथें फार झालें तर घरगुती उद्योगधंद्यांस तेवढा वाव मिळण्यासारखा आहे. बाकी याही धंद्यांत फायद्याची अपेक्षा करतां येत नसून फार तर केलेल्या श्रमांची मजुरी मिळेल इतकेंच.

गेल्या पंचवीस वर्षांत उद्योगधंद्याच्या दृष्टीनें थोडेफार यशस्वी झालेले प्रयत्न सांगावयाचेच झाले तर भात व तेल यांच्या गिरण्यांकडे बोट दाखवितां येईल. परंतु त्यांच्या कार्याचा व्याप गोमंतकापुरताच असल्यानें बाहेरून संपत्तीचा ओघ देशांत आणणाऱ्या मोठ्या कारखान्यांच्या सदरांत त्यांना घालतां येत नाहीं. कारण या उपक्रमानें शेवटीं तांदूळ किंवा तेल तयार करण्याची मजुरी तेवढी पदरांत पडणार.

गोमंतकाच्या उत्पन्नाच्या मुख्य घटकांपैकीं राहतां राहिलें परदेशगमन. **गोमंतकाच्या उत्पन्नाचा जिवंत झरा जर कोणता असेल तर आमचें परदेशगमन होय.** गोमंतकीयांची राहणी सुखाची करून त्यांची सांपत्तिक परिस्थिति सुधारण्याला, गोमंतकीयांच्या अंगीं असलेल्या अनेक गुणांची व विशेषेंकरून बुद्धिमत्तेची जाणीव जगाला करून देण्याला त्यांचें परदेशगमन कारणीभूत आहे. गोमंतकीयांचें हें परदेशगमन आजकालचें नसून शेंकडों वर्षांपासूनचें आहे. पोर्तुगिजांच्या धर्मप्रसारामुळें त्याला जोर आला असला तरी त्यापूर्वी आमचें परदेशगमन चाललें होतें याला अनेक पुरावे आहेत. गोमंतकाची परिस्थितीच अशी आहे कीं, त्याला परदेशगमन आवश्यक व इष्टही आहे.

गोमंतकाच्या आयातनिर्यातींत मागें दाखविल्याप्रमाणें जें फार मोठें खिंडार आहे तें भरून काढण्याचें आमचें एकमेव साधन म्हणजे परदेशगमन हेंच होय. दुसऱ्या कोणत्याही रीतीनें तें भरून निघालें नसतें. आयातीला कात्री लावून तूट येईनाशी करावयाची म्हटलें तरी सर्व सुखसोयींना काट देऊन केवळ पोट भरण्यास आवश्यक तेवढेच पदार्थ बाहेरून आणावे लागतील. आणि इतक्याहीउपर तें कितपत शक्य होईल याची शंकाच आहे. तथापि मनुष्यप्राणी हा निव्वळ जनावराप्रमाणें पोट भरून आयुष्य घालविण्याकरतां उत्पन्न झालेला नसून त्याच्यापुढें विशिष्ट प्रगतीचें ध्येय असतें. विशेषतः गोमंतकीयांसारख्या निसर्गदत्त बुद्धिमत्ता अंगीं असलेल्या लोकांच्यापुढें तर हें ध्येय प्रामुख्यानें असतें. आणि

त्यामुळें त्यांना साहजिकच आपलें जीवन अधिक सुखसोयींनीं संपन्न व्हावें असें वाटतें. इतकेंच नव्हे तर या आकांक्षेनें प्रेरित होऊन ते परदेशांतसुद्धां जाऊन श्रम करावयास तयार होतात.

गोमंतकाचे एक माजी गव्हर्नर दो. ज्यायमि द मॉराइश् यांनीं कॉं. प्रो. च्या ५ व्या अधिवेशनांत भाषण करतांना परदेशांत असलेल्या गोमंतकीयांकडून निरनिराळ्या रूपांत किती पैसा येतो, याची माहिती पुढीलप्रमाणें दिली होती.

"ही तूट कोणत्या मार्गानें भरून येते?

जे आंकडे मला मिळवणें शक्य झालें, ते जरी थोडेफार चुकलेले असले — आणि असे आंकडे नेहमींच चुकत असतात — त्यांवरून पाहतां ते मार्ग पुढील होत :—

बाहेरून गोव्यांत येणाऱ्या मनीआर्डरी	रु. ४३७०००
बाहेरून येणारीं विमा उतरलेलीं पत्रें	३७८०००
बाहेरून येणारीं रजिस्टर्ड पत्रें	६०००००
गोवें व दीव येथें सरकारच्या मार्फतीनें बाहेरून येणारें पौंडांचें नाणें	१७५०००
बँका, पेढ्या वगैरेंच्या मार्फतीनें बाहेरून येणारा पैसा (अंदाजें)	२०००००
किनाऱ्यालगत मालाची नेआण करणाऱ्या गोमंतकीय तारवांना मिळणारें वाहतुकीचें भाडें	२०००००
परदेशांतून परत येणारांनीं बरोबर आणलेल्या रकमा (अंदाजें)	३५०००००
	१०७०००००

हे आंकडे १९२१-२२ सालांतील असून त्या वेळीं आमची तूट इतकी होती व ती वरीलप्रमाणें भरून निघत होती. यावरून, परदेशीं असलेल्या आपल्या गोमंतकीय बांधवांकडून येणाऱ्या रकमांतूनच आपल्या तुटीची भरपाई कशी होते, तें कोणालाही सहज दिसून येईल.

असें असतां परदेशगमनाच्या बाबतींत आमच्यांतील कित्येक सुशिक्षितांकडून निरनिराळे आक्षेप घेतले जातात व Emigrante हा शब्द, केवळ पोट भरण्यासाठीं परदेशीं गेलेला, अशा हीनताव्यंजक ध्वनीनें पुष्कळदां वापरण्यांत येतो. १९१८ सालीं भरलेल्या कॉं. प्रो. च्या २ ऱ्या अधिवेशनांत जवळजवळ हेंच धोरण होतें, पण पुढें १९२७ सालीं दो. तावमातूर्ग पेरैर यांच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या ७ व्या अधिवेशनांत दिशा बदलली गेली. २ ऱ्या अधिवेशनांत मुख्यत्वेंकरून परदेशगमनाच्याच प्रश्नावर चर्चा झाली. गोमंतकीय लोक परदेशीं कां जातात, याबद्दल अनेकांनीं अनेक मतें दिलीं, पण त्यांत दो. फ्रोयलानु द मॅल व सि. सॅतोरियु लोबु यांचें मत अधिक सयुक्तिक वाटतें. त्यांच्या मतें, बेकारी, आर्थिक अडचणी, मनोजोगतें क्षेत्र किंवा काम मिळविण्याची महत्वाकांक्षा, स्वतःची परिस्थिति सुधारण्याची इच्छा वगैरे कारणांमुळें गोमंतकीय लोक परदेशगमनास प्रवृत्त होतात.

वरील कारणमालिका पाहिली तरी परदेशगमनाची आवश्यकता लगेच पटते. पण सि. रुबॅर्त ब्रूत द कॉश्त यांनीं त्यावर असा आक्षेप घेतला कीं, "या परदेशगमनाला आमच्यावरील संकटाचेंच रूप आलेलें आहे. कामकरी लोक बाहेरप्रांतीं गेल्यामुळें येथें त्यांची चणचण भासत असून परिणामीं शेतीची मजुरी वाढली आहे, कित्येक जमिनी पडीत राहिल्या आहेत व एकंदरींत राहणीही पूर्वीपेक्षां महाग झाली आहे."

यावर सि. मिलाग्रिश् लोबु यांनीं दिलेलें उत्तर मुद्देसूद आहे. ते म्हणतात, "सन १८५०

सालीं जेव्हां आमचे (खालच्या वर्गांतील) लोक परदेशीं जात नसत, त्या काळीं मजुरीचा दर दिवसाला १६ पै व भाताचा दर खंडीमागें २॥ रु. होता. महायुद्धापूर्वी १९१४ सालीं मजुरीचा दर ४ आणे व भाताचा दर ९ रु. झाला. अर्थात् मजुरींत तिप्पट तर भाताच्या दरांत साडेतीनपटीपेक्षां अधिक वाढ झाली. याचा अर्थ असा कीं, जमीनदाराला १८५० पेक्षां १९१४ सालीं अधिक प्राप्ति होऊं लागली, तर कामकऱ्याला पूर्वीप्रमाणें कुटुंबाचें पोषण करतां येईनासें झालें. म्हणजे पूर्वीच्या प्रमाणबद्धतेंत बिघाड उत्पन्न झाला."

कॉं. प्रो. च्या या २ ऱ्या अधिवेशनांतील चर्चेवरून असें दिसून आलें कीं, या अशिक्षित लोकांच्या परदेशीं जाण्यानें कामकऱ्यांचा तुटवडा पडून आमच्या देशाच्या शेतीच्या प्रगतींत अडथळा येतो, तेव्हां त्यांनीं येथेंच राहून शेतीचें काम करावें याबद्दल कायदेशीर रीत्या कांहीं तजवीज झाली पाहिजे, असें आमच्या वरिष्ठ जमीनदार वर्गांतील बऱ्याचजणांना वाटत असतें, व सुशिक्षितांच्या परदेशगमनाला त्यांचा विरोध नसतो. परंतु जर त्यांना त्या अशिक्षित किंवा गरीब लोकांनीं असा प्रश्न केला कीं, "तुम्हांला जर देशाच्या शेतीची इतकी काळजी वाटते, तर तुम्ही तुमच्या मुलांना उच्च शिक्षणाकरतां परदेशीं कां पाठवितां? तुमच्या मुलांनीं Bacharel होऊन परदेशीं रमावें व आम्ही शेतजमिनी नांगरण्याकरतां अर्धपोटीं राहावें हा कोठला न्याय? आज जरी आमचें काम कुकबटलरचें असलें तरी आमच्या मुलांबाळांना तुमच्याप्रमाणेंच बनविण्याचें ध्येय आम्ही कां बाळगूं नये?" तर वरिष्ठ वर्गापाशीं त्याला काय उत्तर आहे? आणि खरोखरच, कुकबटलर म्हणून परदेशीं काम करणारांनीं आपल्या मुलांना देववेल तितकें उच्च शिक्षण देऊन उच्च पदाला चढविल्याचीं उदाहरणें पुष्कळ देतां येतील. गरीब काय किंवा श्रीमंत काय, अगर अशिक्षित काय किंवा सुशिक्षित काय, या जगांतील प्रत्येक व्यक्ति आपला — म्हणजे स्वतःचा व आपल्या संततीचा — भविष्यकाळ सुखाचा व्हावा, याकरतां आजघडीला थोडे अधिक कष्ट करावयालासुद्धां तयार होते.

बाकी अशिक्षितांच्या परदेशगमनावर निर्बंध ठेवणें हें कायद्याच्याच दृष्टीनें मुळीं शक्य नाहीं. कॉंग्रेसच्या याच अधिवेशनांत "नागरिक स्वातंत्र्य ही श्रीमंतांची मिरास नव्हे, आणि गरीब गोमंतकीयाच्या परदेशगमनाला अडथळा आणणें म्हणजे दिवाणी कायद्याच्या ३६१ व्या कलमांत नमूद असलेल्या व्यक्तिस्वातंत्र्याच्या हक्काला हरताळ फासून बुरख्यांतील गुलामगिरीला उत्तेजन देणें ठरेल." असें दो. ब्रागांस पेरैर या विख्यात कायदेपंडितांनीं स्पष्ट शब्दांत बजावून सांगितलें.

१९२७ सालीं भरलेल्या कॉंग्रेसच्या ७ व्या अधिवेशनांत दो. तावमातूर्ग पेरैर यांनीं जें अध्यक्षीय भाषण केलें, त्यांत, ज्या अर्थी गोमंतकाला परदेशगमन हें इष्ट व आवश्यक आहे त्या अर्थी परदेशीं जाणारांसाठीं पूर्वतयारीदाखल एक शिक्षणक्रम (Curso de emigração) सुरू करण्यांत यावा अशी त्यांनीं सूचना केली. ते म्हणाले, " या शिक्षणक्रमांत इंग्रजी, पोर्तुगीज, फ्रेंच व जर्मन या भाषांचें व्यवहारोपयोगी ज्ञान, तसेंच व्यापारी भूगोल, जमाखर्च आणि शक्य तर संगीत या विषयांचें शिक्षण देण्यांत यावें. अशा शिक्षणक्रमांतून उत्तीर्ण झालेला गोमंतकीय केवळ ब्रिटिश हिंदुस्थानांतच नव्हे, तर पोर्तुगीज अगर ब्रिटिश आफ्रिकेंत आणि ब्राझीलमध्येंही जाण्यास विशेष लायक होईल. आणि विशेषेंकरून या शेवटच्या देशांतच आपले लोक

जातील याबद्दल आपण खटपट केली पाहिजे. सदर शिक्षणक्रमांतील अध्यापक वर्गानें अर्थातच, त्यांत शिकणारे लोक जगाच्या पाठीवर कुठेंही गेले तरी मातृभूमीच्या प्रेमाची ज्योत त्यांच्या मनांत सदैव तेवत राहील, असें वळण त्यांच्या मनाला दिलें पाहिजे."

वरील विवेचनावरून, परदेशगमनाशिवाय गोमंतकाचा तरणोपाय नाहीं, हें उघड होईल. आमचें सांपत्तिक स्थैर्य शेतीवर किंवा उद्योग-धंद्यांवर अवलंबून नसून परदेशगमनावर अवलंबून आहे. अर्थात्, आमचें खरें कार्यक्षेत्र सर्व जगभर पसरलेलें आहे, हें लक्षांत घेऊनच आम्ही आमची भावी दिशा आंखली पाहिजे.

गोव्यांतून बाहेर जाणारांना जो १० आण्यांचा कर भरावा लागतो त्याचा हेतु परदेशगमनावर निर्बंध ठेवण्याचा आहे, अशी आपल्यामधील कित्येकांची समजूत आहे. परंतु खरी गोष्ट अशी आहे कीं, मुळांत जरी हा कर परदेशगमन करणारांवर बसविण्यांत आला होता तरी पुढें त्याची दिशा बदलण्यांत आली, व तो इकडून बाहेर जाणारे व बाहेरून येथें येणारे अशा उभयतांना लागू करण्यांत आला. परंतु कराची येथील गोमंतकीयांनीं सि. रुबॅर्त द कॉश्त यांच्यामार्फत त्या वेळचे गव्हर्नर दो. ज्यायमि द मॉराइश् यांना या बाबतींत एक अर्ज केल्यावर त्याचें स्वरूप पुन्हा बदलण्यांत येऊन गोमंतकांतून बाहेर जाणाऱ्यांपुरताच तो ठेवण्यांत आला. या करांचें उत्पन्न बंदरांची व पुलांची सुधारणा करण्याच्या कामीं उपयोगांत आणलें जातें. वरील खुलासा खुद्द सि. रुबर्त द कॉश्त यांनीं कॉंग्रेसच्या ७ व्या अधिवेशनांत केला.

या पंचवीस वर्षांत गोमंतकीय जनतेनें जर कोणत्या क्षेत्रांत खरी प्रगति केली असेल तर ती याच होय. परदेशांत आपले किती लोक आहेत याचा नक्की आंकडा मिळत नाहीं. तरीपण तो १ लाखाच्या आगेमागें असावा. कॉं. प्रो. च्या सन १९१८ मधील २ ऱ्या अधिवेशनाच्या अहवालांत परदेशगतांचा तक्ता प्रसिद्ध झालेला आहे. तो जुना असला तरी साधारण कल्पना येण्याकरतां पृ. ९० वर देत आहों.

परदेशीं जाणाऱ्या गोमंतकीयांचें कार्यक्षेत्र फक्त आगबोटीवरील खलाशाची किंवा कुकबटलरची नोकरी करण्यापुरतेंच मर्यादित असतें, असा कित्येकांचा गैरसमज झालेला दिसतो. परंतु जो कोणी नीट डोळे उघडून सभोंवार जगांत नजर फेकील, त्याला असें आढळून येईल कीं, मानवी कर्तबगारीचें असें कोणतेंही क्षेत्र नाहीं कीं ज्यांत गोमंतकीयांनीं आपलें मानाचें स्थान प्रस्थापित केलेलें नाहीं. जिथें गोमंतकीय खिश्चन आढळणार नाहीं, असा जगाचा कोणताही भाग दाखविणें आज कठीण आहे. आफ्रिकेंत तर त्यांनीं आपली कर्तबगारी विशेष स्वरूपांत दाखविलेली आहे. बंगाली वाङ्मयांत बंगालबाहेर असणाऱ्या बंगाली व्यक्तींची माहिती एकत्र जमवून प्रसिद्ध करण्याचें कार्य चालत असतें, तशा पद्धतीचा प्रयत्न ज्यावेळीं गोमंतकांत होईल, त्यावेळीं जगांत सर्वत्र आपल्या गोमंतकीय खिश्चन बांधवांचें स्थान किती उच्च आहे, गोमंतकाच्या बुद्धिमत्तेचें वैशिष्ट्य काय आहे व जगाच्या उभारणीला गोमंतकीयांकडून किती मदत झाली याची कल्पना आपल्याला होऊं शकेल. परंतु हें कार्य करणारा पाहिजे.

परदेशगमनाच्या बाबतींत गोमंतकांतला जर कोणता समाज अत्यंत मागें असेल तर तो हिंदु समाज होय. या समाजाची मजल फार तर मुंबई किंवा क्वचित् कलकत्ता येथपर्यंत जाते. यापलीकडे जाण्याचें नांव नको. आफ्रिकेचा किनारा हाताच्या बोटांवर मोजण्याइतक्या

परदेशगतांच्या तालुकावार माहितीचा तक्ता

तालुका	तालुक्याची एकंदर लोकसंख्या			एकंदर परदेशवासी			शेंकडे-वारी	साक्षर			निरक्षर		
	पुरुष	स्त्रिया	एकूण	पुरुष	स्त्रिया	एकूण		पुरुष	स्त्रिया	लोकसं. प्रमाण	पुरुष	स्त्रिया	लोकसं. प्रमाण
तिसवाडी	२९०९१	२९७१९	५८८१०	२९१६	८२०	३७३६	७·५	१२२४	२०९	४१·८	१७४३	६४४	६४·१
सासष्टी व मुरगांव	५५२११	६३८२७	११९०३९	१२३१७	३२३६	१५५५३	१४·९	५४६७	५१७	३८·५	७६२८	२८२५	६१·३
बार्देश	४९१६४	६२७४८	१११९१२	२१७९६	६३४६	२८१४२	२५·१	११३३९	३०१७	५०·९	८६७६	२७९५	४८·५
पेडणें	—	—	३८५६३	१२६३	३४५	१६०८	४·४	५५६	१२९	४२·८	६८४	२३४	५३·६
सांखळी	१४९६५	१५७५४	३०७१९	८४३	११०	९५३	३·१	८२	१२	९·८	६२५	६४	७७·५
सत्तरी	९५५८	९८३८	१९३९६	६	१	७	०·०७	२	—	२८·५	४	१	७१·४
फोंडें	२४०५१	२४२८६	४८३३७	५५८	२९७	८५५	१·७	१३९	१४५	३०·२	४३९	१६९	६९·५
केपें	१०७१२	१०७९६	२१५०८	४०७	८६	४९३	२·५	१५६	४३	४०·३	२४७	४३	५८·८
सांगें	१०७९९	९६००	२०३९९	२१८	५४	२७२	१·३	३४	४	१३·९	१८६	४९	८६·३
काणकोण	—	—	—	—	—	—	—	—	—	—	—	—	—
						५१६१९							

लोकांनींच पाहिलेला असेल. वास्तविक घरच्या स्थिरशन बांधवांचें उदाहरण आमच्या डोळ्यांपुढें होतें. परंतु आपण तिकडे ढुंकूनसुद्धां पाहिलेलें नाहीं. कदाचित् याला आमचा दैववाद किंवा धर्मवेडेपणाही कारणीभूत झाला असेल. परंतु हा धर्म दीव येथील हिंदूंना आडवा आलेला नाहीं, हें जरूर लक्षांत घेण्यासारखें आहे. 'टाइम्स ऑफ इंडिया' च्या गेल्या ता.४-१०-३७ च्या अंकांत लौरेंसु मार्किश (मोसांबीक, पोर्तुगीज आफ्रिका) येथील एक गुजराथी व्यापारी श्री. नटवरलाल हरिलाल यांची मुलाखत प्रसिद्ध झाली आहे. तींत ते म्हणतात, "ब्रिटिश आफ्रिकेंत हिंदी व युरोपियन लोकांचा जसा लढा आहे तसा येथें नसून उभयतांचे हक्क समान आहेत. या वसाहतींत ३९०० ब्रिटिश प्रजाजन व ४२०० पोर्तुगीज प्रजाजन असून त्यांतील बहुतेक व्यापारांत आहेत." या ४२०० पोर्तुगीज प्रजाजनांत गोमंतकीय हिंदु किती आहेत याची मोजदाद करूं गेल्यास एखाददुसरा देखील सांपडेल कीं काय, याची वानवा आहे. परंतु आमच्या या कमतरतेची भरपाई दीवमधील हिंदूंनीं पुरेपूर केलेली आहे.

यापुढें आमचा हा घरकोंबडेपणा टाकून देणें आम्हांला भाग आहे. एव्हांच जर आमचे डोळे उघडले नाहींत तर घरांतली चीजवस्त चोरीला गेल्यावर दारें मजबूत करणारांमध्यें आपली गणना होईल. गोमंतकाची परिस्थितीच अशी आहे कीं, त्याच्या रहिवाशांना घरीं बसून पोटभर अन्न मिळणें कठीण आहे. परिस्थितीच आम्हांला यापुढें परदेशीं जाण्याला भाग पाडल्यावांचून राहणार नाहीं. तेव्हां या भावी कालाची जाणीव बाळगून आपण त्याला अनुरूप अशी पूर्वतयारी करावयाला एव्हांपासूनच लागलें पाहिजे. नाहींतर पुढें आपली स्थिति फार बिकट होईल.

गोमंतकीयांच्या परदेशगमनावर नेहमीं घेण्यांत येणारा एक आक्षेप असा कीं, हे परदेशीं जाणारे लोक तेथेंच स्थाईक होतील व मग त्यांचा फायदा गोमंतकाला मिळणार नाहीं. ब्रिटिश हिंदुस्थानापुरतें बोलावयाचें झाल्यास तेथें नागरिकत्वाचा कायदा अंमलांत येऊं पहात असल्यानें बऱ्याच गोमंतकीयांना त्या कायद्याअन्वयें तेथील नागरिकत्व पत्करावें लागेल हें खरें. परंतु यांत आम्हांला तरी खेद मानण्यासारखें कांहीं नाहीं. ही गोष्ट आम्हांला नवीन नसून शेंकडों वर्षांपासून ती आमच्या अंगवळणीं पडलेली आहे. आपला इतिहास काय सांगतो? यापूर्वी उत्तरेस शिंदेशाहींत ग्वाल्हेरकडे जिवबादादा, लखबादादा, होळकरशाहींत इंदूरकडे वागळे, दक्षिणेंत कोल्हापूरकडे शिरगांवकर, विजयनगरच्या राज्यांत धाकण्णा व मादण्णा, तसेंच मुंबईस व मलबारकडे गेलेलीं सारस्वत घराणीं तिकडेच स्थाईक झालीं नाहींत काय?

हिंदुस्थानाबाहेर परदेशीं जाणारांच्या बाबतींत पाहिलें, तर अगोदर ते तिकडे सहसा स्थाईक होणार नाहींत. कारण मातृभूमीचें जबरदस्त आकर्षण त्यांच्या मनांत असतें, हें आपल्याला प्रत्यक्ष उदाहरणांवरूनसुद्धां दिसून येतें. आणि समजा कीं, ते तेथें स्थाईक झाले, तर त्यांतसुद्धां कांहीं वावगें नाहीं, असें माझें मत आहे. हे लोक मायभूमींत आपल्या कर्तृत्वाला वाव नाहीं म्हणूनच परदेशीं जात नाहींत काय? मग ते येथें राहिले असते तर त्यांचा फायदा या प्रांताला मिळाला असता असें म्हणण्यांत काय अर्थ आहे? शिवाय ते परदेशीं गेल्यानें इथें असलेल्यांचें कार्यक्षेत्र अधिक मोकळें होत असतें, हे त्यांचे मायभूमीवर पर्यायानें उपकारच होत. पाश्चात्य राष्ट्रांचें उदाहरण घेतलें तरी इंग्लिश लोक अमेरिका, ऑस्ट्रेलिया वगैरे ठिकाणीं वसाहत करून तेथें स्थाईक

झालेले नाहींत काय? मग आम्हीच परदेश-गमनामुळें आमची बुद्धिमत्ता बाहेर जाते अशी भीति कां बाळगावी? आमची परिस्थितीच अशी आहे कीं, कांहीं झालें तरी परदेशगमनाशिवाय आमचा आर्थिक प्रश्न सुटणें कठीण आहे. तेव्हां अर्थातच यापुढें आपण आपल्या ख्रिश्चन बांधवांप्रमाणें जगाच्या पाठीवर कुठेंही जावें लागलें तरी त्यासाठीं मनाचा धडा केला पाहिजे.

आर्थिक परिस्थितीचें अवलोकन करतांना व्यापाराचाही विचार करणें अत्यंत आवश्यक आहे. गोमंतकांतील व्यापार त्याच्या क्षेत्राप्रमाणेंच मर्यादित आहे. येथील निर्गत व्यापारांत आमच्यापेक्षां परकीयांचें स्थान थोडें उच्च आहे हें खरें; पण त्याचें कारण असें कीं, ज्या ठिकाणीं हा निर्यात माल रवाना होतो, तेथील लोकांची ओळख आपल्यापेक्षां परकीयांना अधिक असते. शिवाय युरोप अगर जपानप्रमाणें इकडे बँकांमार्फत व्यवहार होत नसल्यामुळें, आपल्या लोकांना परठिकाणीं माल पाठवावयाचा असतां तेथील लोकांच्या अब्रूच्या पतीवर पाठवावा लागतो व पैशाची जोखम घ्यावी लागते.

आयात व्यापार पंचवीस वर्षांमागें सर्वस्वी परकीयांच्या हातांत होता, तो आज बहुतेक आमच्या हातीं आला आहे. या व्यापारांत मेमण खेरीज करून आज परकी कोणी नाहींत. गुजराथी लोकांचें प्रमाण जवळजवळ शून्यावर आलें आहे. मारवाड्यांचा तर येथें शिरकाव झालेला नाहीं व होणेंही शक्य नाहीं. या व्यापाराच्या बाबतींत मात्र गोमंतकीय हिंदु समाज ख्रिस्ती समाजापेक्षां बराच पुढें आहे. दारू, कांहीं चैनीच्या वस्तु, औषधें यांखेरीज इतर क्षेत्रांत ख्रिश्चनांचा प्रवेश झालेला नाहीं. पण यशाचें प्रमाण मात्र हिंदूंपेक्षां ख्रिश्चनांत अधिक आहे. बाकी याचें कारण बुद्धिमत्ता नसून त्या समाजाच्या अंगवळणीं पडलेले नियमितपणा, मितव्ययीपणा, आवांक्याबाहेरचें धाडस न करणें वगैरे गुण होत.

हिंदु समाजाला येथें आपली कर्तबगारी दाखविण्यास हेंच एक क्षेत्र आहे. पण त्यांतही प्रगति करण्यासारखें पुष्कळ आहे. व्यापाराचें शास्त्र आहे हें फारच थोड्यांना माहीत असेल. ज्यांना दैवानें हात दिला, त्यांना आपण बुद्धिमान् व्यापारी समजतों. पण वास्तविक व्यापारांतील बुद्धिमत्ता, कोणाचीं धोरणें कितपत बरोबर ठरली, शिवाय धकाधकीच्या मामल्यांत त्याचें स्थान कोठें आहे, यावरूनच अजमावावयाची असते. आणि आज तरी हीं धोरणें ठरवावयास सबंध जगाच्या परिस्थितीकडे लक्ष दिलें पाहिजे. आपल्या आकुंचित क्षेत्रामुळें आपली दृष्टि आकुंचित झालेली असते व जगांतील घडामोडींकडे आपलें दुर्लक्ष होतें. मुंबईस कापूस, शेअर, रोखे यांच्या बाबतींत कोट्यावधि रुपयांचा व्यापार चालतो; पण पुष्कळांना त्याची माहितीदेखील नसते. अमेरिकन सरकारनें कापसावर अमुक 'लोन' (कर्ज) दिलें अशी बातमी प्रसिद्ध झाल्यावर एखादा गुजराथी पोरगा त्याचा बाजारावर काय परिणाम होईल तें चटकन् सांगतो. परंतु आम्ही, 'लोन' म्हणजे काय, येथपासून सुरुवात करतों. या व्यापारांत धोका जास्त असून तो कोट्याधीशांच्या हातांत असतो, म्हणून लहानांनीं त्यांत जपूनच पाऊल टाकलें पाहिजे हें खरें, पण या गोष्टींचा अभ्यास केल्याशिवाय आज गत्यंतर नाहीं.

गोमंतकाबाहेरच्या व्यापारांत गोमंतकीय हिंदूंचा बहुतेक अभावच आहे. मुंबईंत कांहीं तुरळक उदाहरणें दाखवितां येतील तेवढींच. पण हिंदुस्थानांतील व्यापाराचें क्षेत्र फार विस्तृत आहे, हें आपल्या हिंदूंनीं लक्षांत घेतलें पाहिजे.

सारस्वत ब्राह्मण समाजाच्या वार्षिकोत्सवांचे अध्यक्ष



श्री. सुब्राव रामकृष्ण सामंत
(१९२९)

प. वा. पुरुषोत्तम श्रीनिवास सुकेरकर
(१९३०)

श्री. व्यंकटेश विनायक सूर्यराव सरदेसाई
(१९३१)

श्री. शिवा फट्टू पै आंगले
(१९३२)

प्रो. रामचंद्र शंकर नायक
(१९३३)

GOMANTAK BOMBAY, 4.

परदेशांतील व्यापारांत ख्रिश्चन समाजाचें स्थान आपल्यापेक्षां निःसंशय उच्च आहे. आफ्रिकेंत आपल्या ख्रिश्चन बांधवांनीं व्यापारांत बरीच प्रगति केलेली आहे.

सारांश, व्यापाराच्या बाबतींतसुद्धां आपण यापुढें स्वतःला ठराविक कोंडींत गुरफटून घेऊन चालणार नाहीं. व्यापार हा राष्ट्राचा एक आधारस्तंभ होय, या गोष्टीकडे आपलें आजवर बरेंच दुर्लक्ष झालें. इकडील पोर्तुगीज दैनिकांतून 'आर्थिक परिस्थिति,' 'दर्यावरील व्यापारी हालचाल' वगैरे सदरें या दोन वर्षांतच प्रसिद्ध होऊं लागलीं आहेत, यावरून ही गोष्ट नुकतीच कुठें आपल्या लक्षांत येत आहे, असें म्हणावें लागतें. या बाबतींत बंगालचे सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ सर प्रफुल्लचंद्र राय यांनीं बंगाली तरुणांना केलेला उपदेश आमच्या लिसेवच्या पदवीधरांनीं मनन करण्यासारखा आहे. ते म्हणतात, "हिंदुस्थानचा आयात-निर्यात व्यापार ६०० कोटींचा आहे. कलकत्त्यांत हा व्यापार युरोपियन व मारवाडी लोकांच्या हातांत आहे. आम्हीं उत्पन्न केलेल्या मालावर ते लोक भरपूर फायदा मिळवितात, आणि माल उत्पन्न करणारा जमीनदार एखाद्या मॅजिस्ट्रेटकडे आपल्या मुलाला नोकरी देण्याबद्दल मागणी करीत बसतो. याऐवजीं आमच्या बंगाली तरुणांनीं जर हा व्यापार आपल्या हातांत घेतला असता तर आमचा आर्थिक प्रश्न इतका बिकट झाला नसता." आमच्या तरुणांनीं यापुढें केवळ नोकरीच्या मागें न लागतां व्यापारांतील आमचें हक्काचें स्थान कायम राखण्याकडे अधिक लक्ष पुरवलें पाहिजे.

गोमंतकाच्या गेल्या पंचवीस वर्षांतील आर्थिक परिस्थितीचें वर जें विवेचन केलें त्याचें आपण आतां थोडक्यांत साकल्यानें सिंहावलोकन करूं.

म्हैसूरचे माजी दिवाण सर विश्वेश्वरअय्या यांनीं हिंदी राष्ट्राची आर्थिक सुधारणा व्हावी म्हणून एक योजना आंखली असून ती सध्याच्या प्रांतिक सरकाराकडे पाठविलेली आहे. तींत आर्थिक प्रगतिकार्याचा अर्थ सारांशरूपानें पुढीलप्रमाणें दिला आहेः- (१) लोकांना काम मिळवून देणें, (२) कामाच्या योगानें देशांतील अर्थोत्पादन वाढविणें व लोकांचें उत्पन्न वाढवून त्यांची राहणी अधिक सुखाची करणें आणि (३) निरोगी, स्वावलंबी, सामर्थ्यवान् व संपत्तिमान् अशा नागरिकांचें राष्ट्र बनावें म्हणून राष्ट्रसंवर्धनाच्या सर्व उद्योगांस मदत करणें. या तीन गोष्टी जिथें सत्यसृष्टींत उतरल्या आहेत, तें राष्ट्र अर्थातच आर्थिक दृष्ट्या प्रगत व संपन्न म्हटलें पाहिजे.

तेव्हां हीं गमकें गोमंतकाला लागू करून काय निष्कर्ष निघतात तें आपण पाहूं. आपणा सर्वांस माहीतच आहे कीं, गोमंतकांतले मजुरीचे दर महाग आहेत. याचा अर्थ असा कीं, सर्वांना काम भरपूर असून बेकारी नाहीं. बेकारी असती तर मजुरीचे दर खालीं उतरले असते. कित्येकांना असें वाटतें कीं, मजुरी कमी असती तर आपली प्रगति अधिक झाली असती. पण ते या प्रश्नाच्या सर्व बाजू लक्षांत घेत नाहींत. कारण जनतेची राहणी सुखसोयीची असणें या गोष्टीचाही आर्थिक प्रगतींतच समावेश होतो. आणि कामगारांना मजुरी कमी मिळाल्यास त्यांची राहणी सुखाची कशी राहील? गोमंतकीयांची राहणी, अगदीं खालच्या वर्गांतील मजूर घेतले तरी, एकंदरींत सुखाची आहे, हें कोणालाही नाकबूल करतां येणार नाहीं. आठवड्यांतून एक दिवस बिनचूक रजा घेणें, कामास गेल्यावर ठराविक वेळीं जेवण उरकणें, जेवणानंतर पुन्हा कामास लागण्यापूर्वी दीडदोन तास विश्रांति घेणें इत्यादि गोष्टी आपल्या मजुरांच्या अगदीं

अंगवळणीं पडल्या आहेत. गोमंतकीय ख्रिश्चनांची राहणी तर हिंदूपेक्षां अधिक सुखसोयींनीं युक्त अशी आहे. तो समाज आपल्यापेक्षां निःसंशय जास्त स्वावलंबी व संपत्तिमान् आहे. तसें नसतें तर त्याला आज सर्व जगभर पसरतां आलें नसतें.

एकंदरींत या पंचवीस वर्षांच्या कालावधींत गोमंतकाची आर्थिक प्रगति बरीच झाली असून आजची त्याची परिस्थिति चांगली आहे हें खरें, पण ती अशीच कायम टिकविणें हें बरेंच कठीण जाणार आहे. येतीं कित्येक वर्षें जागतिक मंदीचीं असून अशीच परिस्थिति पुढें चालू राहिली तर भविष्यकाळ फार कष्टप्रद आहे. आज प्रत्येक राष्ट्र याच विवंचनेंत गुंतलेलें आहे. नवीननवीन वसाहती शोधून काढून किंवा बळकावून तेथें आपल्या लोकांचीं सोय कशी लावतां येईल, याबद्दल प्रत्येक राष्ट्राची धडपड चालली आहे. गोमंतकीयांपाशीं जर कांहीं भांडवल असेल तर तें मुख्यत्वेंकरून बुद्धि हेंच होय. आम्ही हिंदु लोक आजवर घरीं बसून जमीन हीच आपली संपत्ति असें समजत आलों; परंतु यापुढें आपण श्रम हीच खरी संपत्ति व जग हेंच आपलें घर हें लक्षांत घेऊन कार्याला लागलों तरच आपला तरणोपाय आहे. हिंदु समाजांतील तरुणांनीं या प्रश्नाकडे अधिक लक्ष दिलें पाहिजे.

शेवटीं, वरील सर्व विवेचनांतून निघणारे निष्कर्ष देऊन हा लांबलेला निबंध पुरा करूं.

१. गोमंतकाच्या आर्थिक परिस्थितींत या २५ वर्षांत प्रगति झालेली आहे.

२. यामुळेंच आयात मालांत वाढ झालेली आहे.

३. आयात-निर्यातींतील अंतर घटविण्याचे, आयात कमी करणें व निर्यात वाढविणें, हे उपाय निदान आम्हांला तरी शक्य नसून परदेशगमन हाच आमचा मुख्य मार्ग होय.

४. यामुळें परदेशगमनाच्या मार्गांत असलेल्या अडचणी नाहींशा करणें हेंच ध्येय आपण प्रामुख्यानें आपल्यापुढें ठेवलें पाहिजे.

५. शेतीच्या उन्नतीकरतां म्हणून परदेशगमनाला आळा घालणें ही गोष्ट आमची प्रगति खुंटविण्यास कारणीभूत होणारी आहे.

६. यापुढें प्रत्येक आईबापानें आपल्या मुलांना असें शिक्षण दिलें पाहिजे कीं, ज्याच्या योगानें त्यांना जरूर पडल्यास जगाच्या पाठीवर कुठल्याही प्रदेशांत जाऊन प्रामाणिकपणें आपल्या चरितार्थाचा प्रश्न सोडवितां यावा. कारण प्रांतांतल्या प्रांतांतच सर्वांचा प्रश्न सुटावा, अशी आज आपली परिस्थिति नाहीं.

७. गोमंतकांतील शेतीचा प्रश्न गोमंतकांत असलेल्यांनीं सोडवावयाचा आहे.

८. मोठ्या धंद्यांना येथें क्षेत्राच्या आकुंचितपणामुळें वाव नसून कांहीं घरगुती धंदे मात्र चालूं शकतील.

९. श्रम हीच खरी संपत्ति या सिद्धांताचा विसर पडूं न देतां श्रमांत आनंद मानण्याची प्रवृत्ति अंगीं बाणली पाहिजे. किंबहुना आपल्या गोमंतकाचे एक महान् सुपुत्र सि. फ्रांसीश्कु लुईज गॉमिश् यांचा खालील संदेश आपण नेहमीं डोळ्यांपुढें ठेवला पाहिजेः- Foi um Deus que inscreveu na minha fronte: Trabalha e vive.

("प्रभुनें लिहिलें माझ्या भालींः-
श्रम करुनी जग या भूमितलीं")

गोमंतकांतील हिंदूंच्या सार्वजनिक संस्था

प्रो. बाळकृष्ण वामन सांवर्डेकर

विषय-प्रवेश

'सारस्वत ब्राह्मण समाजा'च्या चालकांनीं हा विषय प्रस्तुत लेखकाकडे सोंपविला आहे. पण हा विषयच मुळीं असा आहे कीं, त्याबद्दलची माहिती केवळ प्रत्यक्ष परिश्रमानेंच मिळवावी लागते. अर्थात् अहवाल इत्यादि साधनांच्या अभावीं त्यांत उणिवा राहण्याचा बराच संभव आहे. ही माहिती मिळविण्याच्या प्रयत्नांत लेखकानें मुळींच कसूर केली नाहीं. तरीही मिळालेली माहिती अपुरी असल्यामुळें कित्येक संस्थांच्या वर्णनांत अपुरेपणा उरणें तर कित्येक संस्थांचा नुसता नामनिर्देशही न होणें असे प्रमाद या लेखांत राहूं शकतील. परंतु त्यावरून, अनुल्लेखानें मारण्याचा किंवा अपुरी माहिती देऊन गैरसमज पसरविण्याचा त्याचा हेतु आहे अशी कोणी समजूत करून घेऊं नये असें प्रारंभींच सांगणें आवश्यक दिसतें. असा हा विषय नाजूक स्वरूपाचा असूनही लेखकानें ही जी जबाबदारी पत्करली ती, 'समाजा'च्या चालकांनीं केलेली प्रेमाची सक्ति त्याला अवमानतां आली नाहीं आणि प्रिय गोमंतकाची अल्पस्वल्प सेवा हातून घडेल हेंही आमिष त्यांत होतें, म्हणूनच होय.

लेखाचें धोरण

गोमंतकीयांच्या सार्वजनिक संस्थांविषयीं लिहावयाचें म्हणजे येथील ख्रिस्ती व हिंदु या उभय समाजांतील संस्थांचा त्यांत समावेश होणें अवश्य होतें. परंतु विहंगमदृष्टीनेंच विचार केला तरी ख्रिस्ती समाजांत, मिझेरिकोर्द, ओश्पीस, आझील, पांव द सांत आंतोनियु (कुडतरी), लोटलीची तत्सम संस्था अशा केवळ दीनजनसहाय्यक संस्थाच काय त्या दिसतात. याखेरीज त्या समाजांत सांस्कृतिक, शैक्षणिक वगैरे संस्था फारशा दिसून येत नाहींत म्हटलें तरी चालेल. आणि ज्या थोड्याशा आहेत त्यादेखील एकाद्या धनिकानें पैसे देऊन उत्पन्न केल्या असल्यामुळें त्यांत त्या समाजाचा सामुदायिक स्वार्थत्याग मुळींच दिसून येत नाहीं. वर ज्या मिझेरिकोर्द वगैरे दीनजनसहाय्यक संस्था सांगितल्या त्यादेखील बऱ्याच अंशीं सोडतीच्या उत्पन्नावर चालत असतात. म्हणजे या संस्थांतदेखील त्या समाजाचा सामुदायिक स्वार्थत्याग दिसत नाहीं. या व इतर अनेक कारणांमुळें प्रस्तुत लेखांत केवळ हिंदु समाजांतील सार्वजनिक संस्थांचीच माहिती देण्याचें लेखकानें ठरविलें. तरी पण, ख्रिस्त्यांच्या या संस्थांच्या एका अंगाकडे मात्र त्याला वाचकांचें लक्ष वेधावेंसें वाटतें व ती बाब म्हणजे त्यांच्या कारभारांतील चोख व्यवस्थेची होय.

हिंदूंच्या सार्वजनिक संस्थांची जी माहिती पुढें दिली आहे तिजवरून पाहतां दीनजनसहाय्यक अशा संस्था हिंदूंतून मुळींच दिसत नाहींत आणि उलट थोड्याशा दीनजनसहाय्यक संस्थांशिवाय, संस्कृतिवर्धक, शैक्षणिक किंवा वाङ्मयात्मक अशा स्वरूपाच्या संस्था ख्रिस्ती समाजांत अगदीं थोड्या किंबहुना मुळींच नसाव्या याचें कारण काय तें पाहाणें आवश्यव

ठरतें. आणि हें कारण या उभय समाजांच्या मनोरचनेंत व तदनुरूप झालेल्या समाजरचनेंत दिसून येतें.

हिंदु समाज हा सामान्यतः आतिथ्यशील व दानप्रिय असल्यामुळें दीनजनसहाय्यक अशी स्वतंत्र व्यवस्था त्याला करावी लागत नाहीं. परंतु पोर्तुगीज संस्कृतीखेरीज इतर संस्कृतींचें अस्तित्वच पोर्तुगीज राज्यव्यवस्था जमेस धरीत नसल्यामुळें इतर संस्थांपूर्वी संस्कृतिवर्धनक्षम अशा संस्था चालविणें हिंदु समाजाला भागच पडतें. पूर्वकालांत हें कार्य कांहींसें आपल्या देवालयांतून व मठांतून चालत असे. परंतु आजकाल या संस्था परिस्थितीनुरूप बदलण्याच्या चिवट स्वरूपांतून निघून कांहींशा स्फटिकीभूत होत चालल्या आहेत. आणि म्हणूनच गेल्या पंचवीसतीस वर्षांत स्वतंत्र संस्था उत्पन्न करूनच हें कार्य चालविणें हिंदु समाजाला भाग पडलें आहे. ख्रिस्ती समाजाचें तसें नाहीं. धर्मांतराच्या गडबडींतून निघतांना आपली पूर्व-परंपरा सोडून पोर्तुगीज संस्कृतीचें आंगडें चढवूनच तो बाहेर पडला. त्यामुळें आरंभीं त्याला त्या वेळच्या राज्यव्यवस्थेनें बरेच फायदे बहाल केले. शिवाय आर्थिक प्रश्नांपुढें इतर सर्व प्रश्नांना त्या समाजानें महत्वच दिलें नाहीं. कारण हे प्रश्न त्यांच्यासमोर उत्तराकरतां मुळींच नव्हते. केवळ युरोपियनांचें अनुकरण केल्यानेंच ते सुटत होते. त्यामुळें त्यांच्यांत कुटुंबापासून विस्तृत होऊन समाजापर्यंत पोंचणारी आत्मीयतेची भावना वाढली नाहीं. अर्थात् एका बाजूनें युरोपियनांचें अनुकरण व दुसरीकडून समाजाची गरज म्हणून केवळ दीनजनसहाय्यक संस्थाच उत्पन्न करणें त्यांना भाग पडलें. त्यांतही वर सांगितल्याप्रमाणें या संस्थादेखील एकाददुसरा स्तुत्य व वैयक्तिक अपवाद सोडल्यास लहानमोठ्या सोडतींवरच चालत आहेत. समाजाच्या त्यागबुद्धीचा त्यांत मागमूसही आजला लागत नाहीं. एवढें सांगून आपण विषयाकडे वळूं.

जुन्या सार्वजनिक संस्था [स्मरण]

शिक्षणांत हिंदु समाज मागसलेला असतांनाही जुन्या काळीं सार्वजनिक कार्याविषयीं लोकांत बरीच धडपड चालली होती असें, लहानपणची जी थोडीफार आठवण आहे तिजवरून म्हणावें लागतें.

१८८५ सालीं मे महिन्यांत प. वा. श्रीयुत रामचंद्र दत्ताजी आजरेकर यांनीं व्यवस्थित अभ्यासक्रम असलेली पहिलीच मराठी शाळा स्थापन केली होती. आणि पुढें त्यांनींच निरनिराळ्या गांवीं सुमारें १५-२० शाळा स्थापन केल्या. श्री. आजरेकर यांच्या सहीचें एक प्रसिद्धिपत्रक हातीं आलें त्यांत सुमारें ६४ सद्गृहस्थांनीं शाळांना मदत करण्याचें अभिवचन दिल्याचें लिहिलें आहे आणि त्यांपैकीं तीस जणांनीं अजून तें पाळलें नसल्याची तक्रार आहे. या पत्रकावर तारीख मात्र नाहीं.

ता. २९ जानेवारी १८८८ रोजीं, वैद्यराज रामचंद्र पांडुरंग ऊर्फ दादासाहेब वैद्य व श्रीयुत पंढरीनाथ केळेकर यांच्या परिश्रमामुळें पुण्यांतील सार्वजनिक सभेच्या धर्तीवर, **सार्वजनिक सभा** या नांवाची एक संस्था श्रीस्थळ मंगेशीं येथें सभा भरून स्थापन झाली होती.

१८८९ सालीं माशेल येथें कै. महेश्वरभट्ट सुखठाणकर यांच्या स्मारकाप्रीत्यर्थ **सारस्वत विद्यापीठ** नांवाचें वाचनमंदिर स्थापन झालें होतें. तें १९१३ पर्यंत चालत होतें. स्वतःची इमारतही त्याला मिळाली होती. शेवटचा जो अहवाल हातीं आला तो शके १८३२ (१९१२) सालचा होय. त्यांत ४२ सभासद, वार्षिक उत्पन्न ४२ रुपये व पुस्तकसंग्रहांत १४८ पुस्तकें अशी माहिती मिळते.

मडगांव येथें १८८९ सालच्या सुमारास श्रीयुत अनंत रामकृष्ण रेडकर यांनीं मराठी शाळा चालविली होती. गोमंतकाचा पहिला मराठी भूगोल याच शाळेनें शिक्षणांतील उणिवा भरून काढण्यासाठीं प्रसिद्ध केला.

१८९० सालच्या सुमारास मडगांव येथेंच प. वा. श्री. तात्याजी सीताराम पाटकर यांनींही एक मराठी शाळा सुरू केली होती. गोमंतकाचा पहिला मराठी नकाशा या पाटकरांनींच प्रसिद्ध केला. ही शाळा १८९७ सालच्या सुमारास मडगांवचे व्यापारी श्री. सांभारी यांच्या घरीं भरत होती. म्हणून तिला **सांभाऱ्याची शाळा** म्हणत. तींत त्या सालीं ओट्यावर बसून दोन अस्पृश्य मुलेंही शिकत होतीं.

म्हापसें येथें १८८५ सालीं 'गोवापंच' या नांवाचें एक वर्तमानपत्र चालत होतें. त्यांतील कार्यकर्त्या मंडळीनें स्वतःला **पंचमंडळी** असें नांव घेतलें होतें. म्हापसें येथील जुन्या सार्वजनिक घडामोडींत या पंचमंडळाचा बराच भाग आहे.

मडगांवची सुमारें पंधरावीस मंडळी १८९१ सालीं सांवर्डे येथें प्रस्तुत लेखकाच्या घरीं महिनाभर अज्ञातवासांत होती. घरांतील वडील मंडळीच्या बोलण्यावरून **दहा जणांच्या कामांत पडल्यानें** त्यांना लपावें लागलें होतें असें समजलें. परंतु त्याच वेळीं सर्व लहानथोर माणसें या मंडळीस फारच आदरानें वागवीत असल्यानें **दहा जणांच्या कामांत पडल्यानें** लपावें लागलें तरी माणूस आदरणीय होतो, हा ठसा त्या बालवयांत मनावर खोल उमटला. १८९१ च्या सप्टेंबर २१ रोजच्या निवडणुकीच्या प्रचंड गडबडींत गोळ्या खाऊनही त्या वेळची लॉयॉलपक्षीय मंडळी आली होती.

१९०१ सालीं, लिसेवच्या शिक्षणासाठीं प्रस्तुत लेखक पणजी येथें गेला. त्यावेळीं त्याला वाचनाचा थोडाफार नाद होता. परंतु पुस्तकें मिळेनात. शोधाअंतीं **गोवा हिंदु पुस्तकालय** अशी पाटी एका माडीवर दिसली. परंतु माडी मात्र बंद होती. खालच्या दालनांत एक मराठी शाळा चालत होती. तिला **धेंप्याची शाळा** म्हणत असत. पणजींतील देशपांडे यांच्या वाड्यांत त्याच वेळीं **हितचिंतक प्रेस** नांवाचा पोर्तुगीज मराठी छापखाना चालत होता. त्यांतून **हितचिंतक** नांवाचें वर्तमानपत्रही निघत होतें. ऐकीव माहितीवरून या तिन्ही संस्था सार्वजनिक होत्या असें समजतें.

१९०२ सालीं सांवर्डे येथें प्रस्तुत लेखकाचे घरीं **श्रीशांतादुर्गा वाचनमंदिर** नांवाची संस्था स्थापन झाली ती १९१३ सालापर्यंत चालली होती. मंदिरांत सुमारें पांचसहाशें पुस्तकें असून पंधरावीस नियतकालिकेंही येत असत. १९०७ च्या सुमारास झालेल्या पुनर्घटनेमुळें दर शुद्ध पंचमीच्या दिवशीं त्यांत एक व्याख्यान होई. या मंदिराचा मुख्य विशेष म्हणजे सांवर्डेकर कुटुंबांतील व्यक्तींनींच तें चालविलें होतें. त्यांतील पुस्तकेंही सांवर्डेकर घराण्यांतील खासगी पुस्तकसंग्रह एकत्र करून जमविलीं होतीं. मुष्टिफंडासारख्या व्यवस्थेनें तें चालत असे. १९१३ सालीं चालू असलेल्या बंडांत सरकारनें आपलें ठाणें ठेवण्यासाठीं माऱ्याची जागा म्हणून मंदिराची माडी पसंत केली तेव्हां हें वाचनमंदिर बंद पडलें.

गोवा – हिंदु – क्लब:— १९०६ सालीं पणजी येथें हिंदु पुस्तकालयाच्याच माडीवर (हें घर श्री. धेंप्यांच होतें) शहरांतील उत्साही सद्गृहस्थांची सभा भरून क्लबाची स्थापना झाली. जुन्या पुस्तकालयाची राहिलेली ग्रंथसंपत्ति क्लबाला मिळाली व छोटेंसें स्वदेशी मालाचें दुकानही क्लबातर्फे चालूं लागलें. प. वा. डॉ. पुरुषोत्तम वामन शिर-

गांवकर या उत्साही व त्यागी गृहस्थांचा क्लबाच्या स्थापनेच्या कामीं फार उपयोग झाला होता. पुढें क्लबाची व्यवस्था चित्ताकर्षक ग्रंथप्रसारक मंडळीकडे गेली आणि त्या मंडळीच्या अवतार-समाप्तीबरोबरच क्लबही कांहीं वर्षें चालून बंद झाला.

ठिकठिकाणचीं वाचनमंदिरें

१९०५ ते १९०८ हा काल अखिल भारत-वर्षाला अनेक राष्ट्रीय चळवळींमुळें फार खळ-बळीचा गेला. या अवकाशांत गोमंतकांत ठिकठिकाणीं वाचनमंदिरें स्थापन झालीं. शिरोडें, वाडी, तळावली, फोंडें, कवळें, नेरूळ, म्हापसें, चिखली, पेडणें, पणजी, करमळी, सांखळी, डिचोली, कुंभारजुवें, वगैरे ठिकाणीं वाचनमंदिरें झालीं व कित्येक विरामही पावलीं.

१९०७ ते १९१३ मधील बालगोपाळ मंडळी

१९०७ सालीं ७ मेच्या कायद्यानें गोमंतकीय हिंदूंना पोर्तुगीज प्राथमिक शाळांवर शिक्षक होण्याची बंदी झाली होती. या कायद्याच्या निषेधासाठीं १९ सप्टेंबर १९०७ रोजीं पणजी येथें श्रीमहालक्ष्मीच्या सभामंडपांत प. वा. प्रो. व्यंकटेश रामचंद्र नायक यांच्या अध्यक्षतेखालीं प्रचंड जाहीर सभा भरली. त्यापूर्वी नेरूळ येथें रामनवमीच्या उत्सवास बंदी झाल्यामुळें हिंदु समाजांत खळबळ माजली होती. म्हणजे हिंदुस्थानांतील चळवळीमुळेंच कां होईना, पण आपल्या हक्कांस जागण्याची आवश्यकता हिंदु समाजास पटूं लागण्याचा तो काळ होता. या चळवळींना प्रसिद्धिसाधनाची मुळींच मदत नसल्यामुळें त्या वेळच्या बऱ्याच चळवळी लुल्या पडल्या होत्या. सत्संग वर्ष ६ वें अंक ८ वा मध्यें "वर्तमानपत्राची आवश्यकता" हा लेख याच कालावधींत प्रसिद्ध झाला.

दरम्यान १९०८ सालीं मंगळूर येथें श्री. सुब्बाराव पै यांच्या प्रमुखत्वाखालीं **समस्त गौड सारस्वत ब्राह्मण परिषद** भरून गौड सारस्वतांच्या ज्ञातींतील दुही नष्ट करण्याचा प्रयत्न झाला. या परिषदेच्या दुसऱ्या अधिवेशनास तीन गोमंतकीय प्रतिनिधि गेले होते. गोमंतक मागसलेला प्रांत आहे ही जी कल्पना गोमंतकी-येतरांच्या मनांत होती, तिला पहिला धक्का या परिषदेंतील भाषणें व खासगी संभाषणें यांमुळेंच मिळाला. पुढें या परिषदेंत फाटाफूट होऊन बेळगांव येथें १९१० च्या मेंत पहिली **संयुक्त गौड सारस्वत ब्राह्मण परिषद** भरली, त्यावेळीं तर वरील भ्रामक कल्पना बरीच गड-गडली व त्याच सालीं डिसेंबरमध्यें म्हापसें व कवळें येथें भरलेल्या परिषदांमुळें तर ही कल्पना अगदीं फोल आहे, अशी त्यांत भाग घेतलेल्या गोमंतकीयेतरांची खात्री पटली. या उभय परिषदांतून, लेखक, स्वयंसेवक, वक्ते, व्यवस्था-पक इत्यादि अनेक मार्गांनीं ज्या तरुण मंडळीनें सार्वजनिक कार्याची दीक्षा घेतली होती, त्यांचेंच अजूनही गोमंतकीय सार्वजनिक चळवळींत प्रामुख्यानें अंग आहे. प्रकृतिभेदामुळें यांपैकीं बरीच मंडळी आज एकमेकांचे विरोधक बनले आहेत. परंतु त्यानंतरच्या पिढींतून मात्र इतके बहुसंख्य कार्यकर्ते निपजले नाहींत म्हटल्यास तें फारसें सत्यास सोडून होणार नाहीं.

आजकालच्या संस्था

श्रीमहालक्ष्मीप्रासादिक हिंदु वाचन-मंदिर, पणजी:— ही संस्था नापित वर्गाची आहे. १९०७ च्या जानेवारींत ती स्थापन झाली. शेवटचा जो रिपोर्ट हातीं आला, तो १९१३ सालचा होय. त्या वेळीं या मंदिरांत दोन हजारांवर ग्रंथ व ५८ नियतकालिकें येत होतीं. संस्थेला स्वतःची इमारत आहे. "शिशिर-व्याख्यानमाला" नांवाची व्याख्यानमाला सुरू

करून व्याख्यानद्वारा लोकशिक्षण करण्याची प्रथा याच मंदिरानें सुरू केली. ही व्याख्यानमाला आज बंद आहे. त्याचप्रमाणें मंदिरांतील पुस्तकें भाड्यानें मिळण्याची व्यवस्थाही याच मंदिरानें सुरू केली. **श्रीमहालक्ष्मी-प्रासादिक मोफत मराठी शाळा** या नांवाची शाळाही या मंदिरातफ चालत असून १९३२ सालीं त्या शाळेंत एक शिक्षक व सुमारें ४८ मुलें होतीं. शिक्षण चार इयत्तांपर्यंत आहे. ही संस्था सरकारांत रजिस्टर झाली आहे.

सारस्वत ब्राह्मण समाज वाचन-मंदिर:— हें मंदिर १९०७ सालींच म्हापसें येथें 'सारस्वत ब्राह्मण समाज' या संस्थेतर्फे सुरू झालें. १९२० सालीं तें **सारस्वत विद्यालय** संस्थेंत नेण्यांत आलें. १९३० सालीं त्यांत सुमारें दीड हजार ग्रंथ व २७ नियतकालिकें येत होतीं व रोजची वाचकांची संख्या २५।३० होती. आज तें मुख्यतः सारस्वत विद्यालयाचा ग्रंथसंग्रह या स्वरूपांत आहे.

ज्ञानप्रसारक मंडळ:— ही संस्था वैश्य-वर्गानें १९०८ सालीं स्थापन केली. संस्थेकडून 'दुर्गा वाचनमंदिर' व 'मोफत मराठी शाळा' अशीं दोन कार्यें चालतात. १९३० सालीं या वाचन-मंदिरांत सुमारें एक हजार ग्रंथ होते व २३ नियतकालिकें येत असत. रोजची वाचकांची संख्या ३०।३५ होती. दरसाल सरस्वत्युत्सवांत तीन दिवस व्याख्यानमाला चालते. संस्थेला म्हापसें म्युनिसिपालिटीकडून मासिक २० रुपये व Fundo Escolar Geral या सरकारी फंडांतून मासिक १५ रुपये मदत मिळते. शाळेंत गोमंतकीय मराठी शिक्षण-संमेलनाच्या अभ्यासक्रमाप्रमाणें ४ इयत्तांपर्यंत शिक्षण चालतें. बालवीर चळवळ, व्यायामशिक्षण, शिक्षक-वाचनालय व बाल-वाचनालय व शिक्षण मोफत अशा सोयी असून ४ शिक्षक व १७८ विद्यार्थी आहेत.

मुष्टिफंड संस्था, पणजी:—ही संस्था प्रारंभीं मूठ मूठ तांदूळ देणाऱ्यांच्या सहाय्यानें ५ अक्टोबर १९०८ रोजीं स्थापन झाली. १९१३ सालीं ती सरकारांत रजिस्टर झाली. तूर्त हिच्या दोन शाळा चालतात. श्रीमहालक्ष्मी देवालयाच्या मालकीच्या जागेवर देवालयाच्या कार्यकारी मंडळानें मुष्टिफंड संस्थेसाठीं बांधून दिलेल्या इमारतींत **श्रीमहालक्ष्मी विद्यालय** या नांवानें एक शाळा चालत असून तींत १९३६ सालीं तीन शिक्षक, ९७ मुलगे व ७५ मुली होत्या. **श्रीसरस्वती विद्यालय ही** दुसरी शाळा मळयांत सरकारनें दिलेल्या जागीं बांधलेल्या इमारतींत चालत असून तींत तीन शिक्षक, ८२ मुलगे व ७१ मुली होत्या. १९३४ सालीं या संस्थेचा सुरुवातीपासूनचा अहवाल कार्यकारी मंडळानें प्रसिद्ध केला. आणि त्यानंतरचे अहवाल वेळोवेळ प्रसिद्ध होत आहेत. माजी विद्यार्थी-संघही या संस्थेतर्फे स्थापन झालेला असून त्याची संस्थेला मदत होत असते. उभय विद्यालयांचे सरस्वत्युत्सव, बालोत्सव वगैरे समारंभ श्रीसरस्वती विद्यालयांतच होत असतात.

श्रीपांडुरंग प्रासादिक विद्याभुवन, मळें, पणजी:- ता. १ नवंबर १९१० रोजीं पणजीच्या क्षत्रिय भंडारी समाजांतील तरुणांनीं ही संस्था स्थापन केली. वाचनालय व शाळा असे दोन कार्यक्रम या संस्थेंतून चालत. संस्थे-तर्फे एक व्याख्यानमालाही चालली होती. तूर्त या साऱ्या उपक्रमांपैकीं श्रीपांडुरंग-प्रासादिक मराठी शाळा ही मात्र चालते. १९३२ सालीं या शाळेंत १ शिक्षक व ३४ विद्यार्थी होते. आणि संस्था मळयांत स्वतंत्र इमारतींत आहे.

सारस्वत विद्यालय, म्हापसें :— १९१० सालीं डिसेंबरांत म्हापसें येथें भरलेल्या दुसऱ्या संयुक्त गौड सारस्वत ब्राह्मण परिषदेमुळें उत्पन्न झालेल्या फंडांतून ही शाळा चालली

आहे. २ मार्च १९११ रोजीं हिची स्थापना झाली. सुरुवातीस दोन शिक्षक व ३९ मुलें होतीं. १९१३ ते १९१८ पर्यंत तिसऱ्या इयत्तेपर्यंत इंग्रजी शिक्षणही विद्यालयांत मिळे. संस्थेच्या मालकीची इमारत १९१९ सालीं पूर्ण झाली असून तिची किंमत १६००० रुपये आहे. शाळेचें उत्पन्न १८५० रुपये असून तेवढाच खर्च आहे. पैकीं १९५ रुपये म्हापसें म्युनिसिपालिटीकडून मदत मिळत असून प. वा. बाळकृष्ण बाबुराव तेलंग यां अकालीं कालवश झालेल्या तरुणानें आपली जी इस्टेट या विद्यालयाला अर्पण केली आहे तिचें सुमारें शें-पाऊणशें रुपये उत्पन्न येतें. १९१९ सालापासून येथें सरस्वत्युत्सवांत पांच दिवस व्याख्यानमाला चालते. १९२० सालीं सारस्वत ब्राह्मण समाज, म्हापसें या संस्थेची लायब्ररी या विद्यालयांत आली ती आतां पुस्तकसंग्रहाच्या रूपानें त्यांत आहे. १९२४ सालीं "माजी विद्यार्थी-संघ" स्थापन झाला. १९३१ सालीं संस्था सरकारांत रजिस्टर झाली. १९३२ सालापासून त्यांत बालवाचनालय व शिक्षक-वाचनालय सुरू झालीं आहेत. १९३४-१९३५ सालचें कार्यकारी मंडळ बहुतेक माजी विद्यार्थ्यांचेंच होतें. या मंडळानेंच तोंपर्यंत प्रसिद्ध न झालेला विद्यालयाचा सांद्यंत अहवाल परिश्रमपूर्वक तयार करून प्रसिद्ध केला. १९३५ सालीं विद्यालयांत पांच शिक्षक असून २०६ मुलें होतीं. गोमंतकांतील उत्तम शाळांपैकींच या म्हापसेंच्या उभय शाळा आहेत असा त्यांचा वाजवी लौकिक आहे.

श्रीशांतादुर्गा वाचनमंदिर, कुंभारजुवें:— हें वाचनमंदिर १९१० सालीं दिवाळीच्या दिवशीं स्थापन झालें. व १९२० सालीं सरकारांत रजिस्टर झालें. ग्रंथसंख्या दोन हजार असून १९ नियतकालिकें येतात. सभासद २५ आहेत. व रोजची वाचकसंख्या २५ असते.

गोवा विद्याप्रसारक मंडळ:— ही संस्था १९११ सालीं विजयादशमीच्या दिवशीं स्थापन झाली व १९१३ सालीं सरकारांत रजिस्टर झाली. **आल्मैद कॉलेज** हें तिचें मुख्य कार्य आहे. पहिल्या वर्षाच्या अहवालावरून "देशी भाषेंतून कोणताही विषय शिकवितां येतो व विद्यार्थ्यांच्या स्मरणशक्तीवर फाजील ताण पडत नाहीं" हें प्रत्यक्ष दाखविण्यासाठीं व "रेपुब्लिकांत लौकरच प्राप्त होणाऱ्या स्वराज्याच्या हक्कांस पात्र होण्यासाठीं व्यापक शिक्षण लोकांस द्यावयाच्या हेतूनें" हें कॉलेज चालकांनीं काढल्याचें दिसून येतें. संस्थेचीं स्थित्यंतरें बरींच झालीं. परंतु आज सव्वीस वर्षें शिक्षणदानाचें कार्य ती करीत आहे. गोमंतकांत सुरुवातीचें विद्यार्थीवसतिगृह याच संस्थेनें चालवून यशस्वी करून दाखविलें. आरंभींच्या वर्षांत फ्रेंच, इंग्रजी, धंदेशिक्षण, सहकारी दुकान, वाचनालय, त्याचप्रमाणें कुंडई, मडकई, कपिलेश्वर व म्हाडदोळ अशा चार ठिकाणीं मराठी शाळा इतका गोवा विद्याप्रसारक मंडळाचा व्याप होता. यासाठीं मंडळानें 'विद्याप्रसार' नांवाचें नियतकालिकही चालविलें होतें. तूर्त पोर्तुगीज प्राथमिक शिक्षण, लिसेवचीं तीन वर्षे, मराठी शिक्षणाची एक शाळा व मधूनमधून इंग्रजी एवढेंच मंडळाचें कार्यक्षेत्र आहे. १९३२ सालीं कॉलेजमध्यें शिक्षण घेणाऱ्या मुलांची संख्या १८७ होती. केवळ मराठी शाळेंतच ४० मुलें होतीं. फोंडे म्युनिसिपालिटी, निरनिराळीं देवस्थानें, कोमुनदादी वगैरेकडून संस्थेला वार्षिक मदत मिळते. संस्थेचें स्थायी उत्पन्न या मदतीसह सुमारें १२०० रुपये असून चल उत्पन्न २४०० रुपये आहे.

श्रीसरस्वती वाचनमंदिर व शाळा, करमळी:— ता. ११ फेब्रुवारी १९१२ रोजीं हीं संस्था तिसवाडी महालांतील करमळी

गांवीं स्थापन झाली. वाचनमंदिरांत १९१६ सालीं ३७० पुस्तकें होतीं व शाळेंत एक शिक्षक व तीस विद्यार्थी होते. शिक्षण मोफत चालत होतें. तूर्त या संस्थेचें नांव ऐकूं येत नाहीं.

सारस्वत ब्राह्मण समाज, मडगांव:- ता. १९ मार्च १९१२ रोजीं गुढीपाडव्याच्या दिवशीं ही संस्था स्थापन झाली.तिचाच हा रजत-महोत्सव आहे. संस्थेच्या कार्याच्या माहितीसाठीं स्वतंत्र व्यवस्था आहे. व लेखकाला जें सांगावयाचें आहे तें पुढें देण्यांत आलें आहे.

विद्यावर्धक मंडळ, डिचोली:— ता. १ आगस्ट १९१२ रोजीं ही संस्था स्थापन झाली. व १९१३ च्या जानेवारींत तिची **श्रीशांतादुर्गा विद्यालय** नांवाची मराठी शाळा सुरू झाली. पुढें **राष्ट्रीय वाचन-मंदिर** नांवाचें एक वाचनमंदिरही या संस्थेतर्फे सुरू झालें आहे. १९२२ सालीं सरस्वत्युत्सवा-निमित्त व्याख्यानमाला चालू होती. आणि इंग्रजी शिक्षणाचा वर्गही सुरू झाला होता. संस्थेच्या संस्थापकांपैकीं श्री. धुंडाप्पा ईश्वराप्पा गाडवी यांनीं संस्थेकरतां इमारतही बांधली आहे. कार्यकर्त्यांच्या परिश्रमांमुळें संस्थेला सुमारें चार हजार रुपयांचा कायम फंड करतां आला आहे. संस्थेंत चार शिक्षक असून ११४ विद्यार्थी होते.

श्रीरवळनाथ वाचनमंदिर, पेडणें:- ता. १४ सप्टेंबर १९१२ रोजीं ही संस्था स्थापन झाली. संस्थेतर्फे एक व्याख्यानमाला चालत होती. ही संस्था सरकारांत रजिस्टर झाली होती. १९२४ पर्यंत ती चालू होती. नंतर १९३० ते ३२ पर्यंत ती चालली असें ऐकूं येतें.

श्रीनवदुर्गा विद्यालय, मडकई: —हें विद्यालय आरंभीं गोवा विद्याप्रसारक मंडळानें आपली शाखा म्हणून उघडलें व दोनतीन वर्षें चालविलें. पुढें विद्याप्रसारक मंडळाच्या १९२१ सालीं प्रसिद्ध झालेल्या अहवालांत या शाळेला दरसाल ३० रुपयांची मदत देत असल्याचा उल्लेख आहे. अलीकडे हें विद्यालय श्रीनवदुर्गा देवस्थानांतून चालत आहे. शिक्षण मोफत देण्यांत येतें. श्रीनवदुर्गेच्या देवालया-जवळ एक, करंझाळ वाड्यावर एक व धाकणें वाड्यावर एक अशा तीन शाखा असून तीन शिक्षक व एकंदर १३१ मुलें आहेत.

श्रीदामोदर विद्यालय, मडगांव :— हें विद्यालय ता. १४ सप्टेंबर १९१३ रोजीं स्थापन झालें. आजवर या विद्यालयाचीं तीन स्थित्यंतरें झालीं. पहिल्या स्थितींत त्याची व्यवस्था मडगांवांतील कांहीं शिक्षणप्रेमी सद्-गृहस्थांनीं वार्षिक २२० रुपयांची आपसांत वर्गणी काढून पत्करली होती. सार्वजनिक कोठींतून विद्यालयाला वार्षिक २०० रुपयांची मदत मिळत असे. विद्यालयाला स्वतःची जागा नसल्यानें तें भाड्याच्या जागेंत भरे. पण प. वा. बाबय भगवंत नायक यांनीं श्रीदामोदर विद्याभुवनास जोडून दोन धर्मशाळा बांधल्या त्या विद्यालयाला मिळाल्या. १९२० सालीं नव्या बाजारांतील मराठी शाळा तिच्या चालकांसह विद्यालयास जोडली गेली व जुन्या बाजारांतही एक शाखा उघडली गेली. वाढलेल्या खर्चाची सोय या नवीन मिळालेल्या शाळेच्या चालकांत व पूर्वीच्या चालकांत ६६१ रुपये वर्गणी मिळवून करण्यांत आली. मुख्य विद्यालय मिळालेल्या धर्मशाळांत भरूं लागलें व शाखा भाड्याच्या घरांत भरूं लागल्या. तिन्ही शाळा मिळून सहा शिक्षक व ४०० विद्यार्थी त्यावेळीं होते व अभ्यासक्रम पांच इयत्तांचा होता.

दुसऱ्या स्थित्यंतरांत विद्यालय ता. ५ मे १९२४ रोजीं "शिक्षण-प्रसारक संघ" नांवाची संस्था स्थापन होऊन तिच्या हवालीं झालें. या

संघाचा १ ला (विद्यालयाचा १२ वा) अहवाल हातीं आला त्यांत वर सांगितलेली व्यवस्था फार काल न चालतां जुन्या बाजारांतील शाखा बंद झाल्याचें ध्वनित केलेलें आहे. संघ प्रत्येक वर्षी सुमारें ४५० रुपये वर्गणी देई. या अमदानींत पोर्तुगीज प्रिमैर ग्राव शिकविण्याची सोयही विद्यालयांत करण्यांत आली होती. पण ती अल्प कालच टिकली. माजी व विद्यमान विद्यार्थ्यांचें संमेलन, स्वयंसेवक-पथक, गणेशोत्सव, वनभोजन, शिक्षकांकरितां प्रत्यक्ष पाठ देऊन दाखविणें इत्यादि नवीन उपक्रम यावेळीं झाले. मुलींकरितां उपयुक्त शिक्षण हवें याची तळमळ चालकांना होती असें संघाच्या दुसऱ्या अहवालावरून दिसतें.

तिसऱ्या स्थित्यंतरांत १९२७ सालीं **मठ-ग्रामस्थ हिंदुसभा** स्थापन होऊन तिच्या ताब्यांत विद्यालय गेलें. हिंदुसभेच्या शिक्षण-मंडळामार्फत तें आतांपर्यंत चालविण्यांत येतें. या नव्या व्यवस्थेंत जुन्या बाजारांतील श्री. दळवी यांची शाळा विद्यालयांत विलीन होऊन जुन्या बाजारांतील शाखेच्या रूपानें चालू झाली. १९३२ सालीं पालक व पालिका-संमेलनें डिसेंबरांत भरविण्यांत आलीं. व हिंदु स्त्रियांच्या कलाकौशल्याचें प्रदर्शनही भरविलें गेलें. पुष्कळसें शालोपयोगी सामान, छोटी प्रयोगशाळा व विद्यार्थि-वाचनालयही शाळेला मिळालें. फारा दिवसांची पोर्तुगीज शिक्षणाची आकांक्षा पुरी करण्यांत आली. ता. ३० एप्रिल १९३३ रोजीं **पहिलें गोमंतकीय मराठी शिक्षण-संमेलन** शिक्षणमंडळातर्फे भरविण्यांत आलें. पोर्तुगीज वर्ग कांहीं कारणामुळें मध्यें बंद झाला होता तो १९३६ सालीं परत सुरू झाला. मराठी चवथ्या इयत्तेपासून मुलांना इंग्रजी किंवा मराठी शिक्षण मिळतें. दरम्यान १९३३ सालीं स्त्रीशिक्षणाचा प्रश्न सोडविण्याचा प्रयोग म्हणून कन्यावर्ग उघडला गेला. परंतु पुढें तो वर्ग व श्री. जयराम भिकाजी राऊत यांची कन्याशाळा एकत्र होऊन त्यांचें स्वतंत्र **महिला-विद्यालय** बनलें. तरी अजून दामोदर विद्यालयांत स्वतंत्र बालिका-विभाग असून त्यांत मुलींना उपयुक्त असें शिक्षण मिळतें.

एकंदरींत या तिन्ही स्थित्यंतरांत विद्यालयाची प्रगति अखंड चालू आहे. विद्यालय व तिन्ही शाखांत मिळून १९३६ सालीं ११ शिक्षक व १ अध्यापिका काम करीत होते. आणि २८६ मुलगे व १४६ मुली त्यांत शिक्षण घेत होतीं.

खास विद्यालयाचे असे श्रीगणेशोत्सवाशिवाय बरेच उत्सव होतात व प्रसंगोपात त्यांतून व्याख्यानेंही होतात.

श्रीलक्ष्मी-प्रासादिक सत्योन्नति समाज, बाणावली:— ता. २९ अक्टोबर १९१३ रोजीं ही संस्था "लक्ष्मीपूजनोत्सव फंड" या नांवानें सुरू झाली. ता. १५ नवंबर १९२३ रोजीं संस्थेचें नवीन नामकरण होऊन एक लहानसें वाचनमंदिर उघडण्यांत आलें. १९२३ सालींच संस्थेकरतां लहानशा इमारतीसह जागा विकत घेण्यांत आली व 'श्रीकात्यायनी-बाणेश्वर विद्यालय' नांवाची शाळा संस्थेच्या जागेंत स्थापन करण्यांत आली. १९२४ सालीं व्यापास साजेशी नवी इमारत बांधण्यांत आली. जागा व इमारत मिळून तीन हजार रुपयांवर खर्च झाला. संस्थेचे तूर्त ३९ सभासद आहेत. ता. १५ सप्टेंबर १९३३ रोजीं संस्था सरकारांत रजिस्टर झाली. १९३४ सालीं शाळेची संपूर्ण जबाबदारी संस्थेनें स्वीकारली. शाळेंत ४० मुलें आहेत.

श्रीसरस्वती-मंदिर, पणजी :— या संस्थेची स्थापना १९१३ सालीं ऑक्टोबरच्या ९ तारखेस झाली. माजी हिंदु पुस्तकालयांतून गोवा हिंदु क्लबाकडे आलेलीं पुस्तकें क्लबाच्या पुस्तकांसहित या संस्थेस मिळालीं. पुस्तका-

लयाचे ४०० रुपयेही तिला देण्यांत आले. राजधानींत मध्यवर्ती जागेंत असल्यामुळें, वाचकांच्या संख्येच्या दृष्टीनें मंदिर गोमंतकांत अग्रमानाचें आहे. ग्रंथसंख्या सहा हजारांजवळ असून ४० नियतकालिकें येतात. १९१६ सालीं संस्था रजिस्टर झाली आहे. दरसाल स्थापनेच्या दिवशीं एकाद्या सुप्रसिद्ध वाङ्मयभक्ताचें व्याख्यान होत असतें. संस्थेनें इमारतीसाठीं सुमारें दोन हजार रुपये किंमतीची जागा खरेदी केली असून स्थायिक फंड सुमारें तीनचार हजार रुपये आहे. मडगांव, म्हापसें इत्यादि ठिकाणीं सभा वगैरे भरवायची झाल्यास सार्वजनिक संस्थांच्या इमारतींचा उपयोग होऊं शकतो. परंतु पणजीसारख्या राजधानींत मात्र केवळ श्रीमहालक्ष्मीच्या सभामंडपाशिवाय दुसरें साधन नाहीं, ही गोष्ट कशीशीच वाटते. ही उणीव मंदिरानेंच भरून काढणें योग्य आहे. "विद्यार्थ्यांना ज्ञानप्राप्तीचीं साधनें सुलभ" करून देण्याचा जो हेतु तिच्या रिपोर्टांत उल्लेखिलेला आहे तो पूर्णपणें सिद्धीस गेल्याचें मंदिरांत वाचनासाठीं येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या भरगच्च संख्येवरून दिसून येतें.

श्रीशारदा विद्यालय, कुंभारजुवें:— १९१३ सालीं स्थापन झालेल्या 'शिक्षण-प्रसारक मंडळ' या संस्थेतर्फे हें विद्यालय त्याच सालीं सुरू झालें. ता. २६-१-२० रोजीं तें सरकारांत रजिस्टर झालें. प्रारंभीं तें भाड्याच्या घरांत भरत असे. परंतु तूर्त तिची १४।१५ हजारांची विस्तीर्ण इमारत असून तींत तें भरतें. ज्या ज्या वेळीं विद्यालयांत जावें त्या त्या वेळीं कांहींतरी नावीन्य त्यांत दिसतें. येथें होणाऱ्या मुलांच्या तयारीच्या तोडीची तयारी लेखकाला अजून दुसरीकडे दिसली नाहीं. प्रत्येक विषयांतील प्रावीण्याबद्दलचीं जीं बक्षिसें असतात कांनां नेहमींच पडतो अशी चढाओढ विद्यार्थ्यांत लागलेली असते. गणित विषयांत तर एकदां गणितदृष्ट्या बरोबर पण व्यवहारतः असंभाव्य उदाहरणें परीक्षकांनीं घातलीं असतां सोडविलेल्या उदाहरणाखालीं 'हें तुमचें उदाहरण संभवनीय नाहीं' असा शेरा देणारीं मुलेंही सांपडलीं! शिक्षकांनींच मुलांच्या सहाय्यानें बनविलेल्या शिक्षण-साहित्याचाच मुख्यत्वेंकरून हें विद्यालय उपयोग करतें हा त्याचा दुसरा विशेष होय. मुलांना शिक्षण उत्तम मिळतें म्हणून इतर ठिकाणचे पालक बिऱ्हाडानें येथें राहतात व बाहेरगांवचीं मुलें १ रुपया फी देऊन परीक्षेसाठीं या विद्यालयांत येत असतात. त्याचप्रमाणें कुंभारजुवेंच्या रहिवाशांना मराठी शिक्षणासाठीं मुद्दाम बाहेरून येणाऱ्या आपल्या नातेवाईकांच्या मुलांना आश्रय द्यावा लागतो हा तिसरा विशेष आहे. शारीरिक शिक्षण येथें परीक्षेचा आवश्यक विषय मानला जातो. बालवर्ग व पहिली इयत्ता एकाच वर्षांत पूर्ण करण्याचा यशस्वी प्रयोग या विद्यालयांत तूर्त दोन वर्षें चालला आहे. १९३६ सालीं तिसवाडी नगरपालिकेनें वार्षिक १८० रुपयांची मदत दिली आहे त्यांतून मराठीबरोबर पोर्तुगीज शिक्षणाचा उपक्रम यंदा केला आहे. अभ्यासक्रम ५ इयत्तांचा आहे. शाळेंत ५ शिक्षक काम करीत असून ११२ मुलगे व ४५ मुली अशीं १९३६ सालीं शिक्षण घेत होतीं. शारदोत्सव, गीताजयंति, दासनवमी इत्यादि बरेच उत्सव विद्यालयाकडून होतात. गोमंतकांतील विद्यालयांत याचा क्रमांक शिक्षणाच्या दृष्टीनें बराच वरचा आहे. १९३६ सालीं येथें ९ ख्रिस्ती विद्यार्थी होते व प्रारंभापासून कोणताच भेदभाव न ठेवतां येथें हरिजन विद्यार्थीही शिक्षण घेत असतात. तूर्त संस्थेचे सभासद ४० असून वार्षिक उत्पन्न सुमारें हजार रुपयांचें आहे. शाळेचे रिपोर्ट प्रसिद्ध होत

श्रीशारदा वाचनमंदिर, रायबंदरः- ही संस्था शके १८३५ कार्तिक शु. ११ शी रोजीं (१९१३ नवंबर) स्थापन झाली. १९२० सालापर्यंत ती चालत असल्याचें रिपोर्टावरून समजतें. श्री. रामचंद्र नारायण प्रभु लवंदे हे तिचे आरंभापासूनचे सेक्रेटरी होते. १९२० सालीं प्रसिद्ध झालेल्या रिपोर्टांत श्री. पुरुषोत्तम प्रभु न्हावेलकर यांकडे ४०० रुपयांचा कायम फंड होता असें दिसतें. पुस्तकांची संख्या रिपोर्टांत दिलेली नाहीं. पण नियतकालिकें २३ येत होतीं.

श्रीसरस्वती-लक्ष्मी विद्यालय व वाचनमंदिर, सांवरकटें-कुंकळळीः— ही संस्था १९१५ त स्थापन झाली. श्री. नारायण केशव केणी या उदार सद्गृहस्थांनीं स्वतः सुमारें २००० रुपये खर्चून बांधून दिलेल्या इमारतींत ही चालते. १९३० सालीं वाचनमंदिरांत ४०० पुस्तकें होतीं. शाळेंत ८५ मुलें व दोन शिक्षक आहेत. संस्थेकडून सरस्वत्युत्सव व लक्ष्मीपूजनोत्सव असे दोन उत्सव होतात. शिक्षण मराठी चार इयत्तांपर्यंत चालतें.

श्रीभवानीशंकर विद्यालय, कालापूरः — ही संस्था १५ जून १९१५ रोजीं स्थापन झाली. तूर्त हिचे चालक श्री. अनंत सं. देसाई हे आहेत. ९१ मुलें व एक शिक्षक तूर्त आहे. गरीब मुलांकडून फी घेण्यांत येत नाहीं. शिक्षण मराठी चार इयत्तांपर्यंत चालतें.

श्रीदामोदर विद्याभुवन, मडगांवः— ही संस्था, शाळा, वाचनालयें, सरस्वत्युत्सव, लक्ष्मीपूजन इत्यादि सार्वजनिक उपयोगाच्या कार्यांना जागा तयार करून देण्याच्या उद्देशानें स्थापन झाली. सुमारें ३०।४० हजार रुपये खर्चून या संस्थेनें एक भव्य इमारत बांधली आहे. श्रीदामोदर वाचनमंदिर येथेंच आहे.

सर भांडारकर विद्यालय, चिखली-(बार्देश):— या संस्थेची स्थापना ता. ६ जून १९१६ रोजीं झाली. विद्यालयाची स्वतःची इमारत आहे. सभासद १२ आहेत. तूर्त ४६ मुलें व एक शिक्षक असून अभ्यासक्रम मराठी चार इयत्तांपर्यंत आहे. फीचें उत्पन्न, वर्गणी वगैरे मिळून सुमारें २५० रु. वार्षिक उत्पन्न व तेवढाच खर्च. एखाद्या शिक्षणविषयक मध्यवर्ती संस्थेनें हें विद्यालय हातीं घ्यावें, अशी चालकांची इच्छा असल्याचें सेक्रेटरी श्री. श्रीराम गणेश आमोणकर हे कळवितात.

हडफडें विद्यावर्धक समाज, हडफडें:— या समाजाची स्थापना ता. ६ नवंबर १९३६ रोजीं झाली. मुलांचें प्राथमिक शिक्षण चांगल्या रीतीनें होण्यासाठीं या संस्थेची उत्पत्ति झाली. तूर्त हडफडें येथें 'श्रीरामकृष्ण विद्यालय' नांवाची शाळा आहे. १९३२ सालीं त्यांत ३५ मुलें व एक शिक्षक होता. ही शाळा याच समाजानें चालविली आहे कीं कसें तें समजत नाहीं.

वेलिंग विद्याप्रसारक संघ, वेलिंगः— ही संस्था १९१७ सालीं स्थापन झाली. श्रीमती सरस्वतीबाई वेलिंगकर या बाईनीं शाळेला इमारत बांधून दिली आहे. शाळेचें नांव श्रीसरस्वती विद्यालय असें आहे. शिक्षण मोफत आहे. मात्र किरकोळ खर्चासाठीं प्रत्येक मुलाला एक आणा द्यावा लागतो. अभ्यासक्रम चार इयत्तांचा असून ४७ मुलें व एक शिक्षक तूर्त आहे. विद्यार्थ्यांत ख्रिस्ती व मुसलमानदेखील आहेत.

श्रीवेताळ-प्रासादिक ज्ञानमंदिर, असोळणें:— ही संस्था २१ मे १९१७ रोजीं स्थापन झाली. ग्रंथसंग्रह सुमारें दोन हजार असून निवडक आहे. १५ नियतकालिकें येत

असतात. वाढदिवसाप्रीत्यर्थ दरसाल दोनतीन व्याख्यानें होत होतीं, पण तूर्त तीं बंद आहेत.

श्रीदामोदर वाचनमंदिर, मडगांव:- १९१७ सालीं मंदिराची स्थापना झाली. श्रीदामोदर विद्याभुवनाच्या माडीवरील दोन दालनांत हिचा संसार थाटलेला आहे. श्रीसरस्वतीसेवक मंडळातर्फे सरस्वत्युत्सव होऊन दरसाल तीनचार व्याख्यानें होत असतात. १९३० सालीं ग्रंथसंख्या सुमारें तीन हजार होती व २५।३० नियतकालिकें येत होतीं. रोजची वाचकसंख्या सुमारें ५०।६० असते.

श्रीदामोदर विद्यालय, जांबावली:— ही संस्था १९१८ सालीं स्थापन झाली. देवालयाच्या अभ्रशाळेंतच ही चालते. अभ्यासक्रम ३ इयत्तांचा असून, बालवीर चळवळ, लाठी, लेजीम, सांघिक व्यायाम इत्यादि बाबी सुरू आहेत. तूर्त एक शिक्षक व २८ विद्यार्थी आहेत.

आत्मोद्धार संघ, सांखळी:— १९१९ सालीं या संघाची स्थापना झाली. इमारतीचें बांधकाम तूर्त चालू आहे. संघ दोन शाळा व एक वाचनालय चालवितो. वाचनालयांत सुमारें अकराशें ग्रंथ व आठ नियतकालिकें येतात. रोजची वाचकसंख्या २०-२५ असते. तूर्त ३० तहाहयात सभासद असून सुमारें ४५० रु. उत्पन्न आहे. सांखळी बाजारांत एक व विठ्ठलपूर येथें एक अशा दोन शाळा १९२७ त स्थापन झाल्या. उभय शाळांत मिळून १०५ विद्यार्थी व तीन शिक्षक आहेत.

दैवज्ञ ब्राह्मण मोफत वाचनालय, म्हापसें:— १९१९ सालीं वाचनालय स्थापन झालें. सभासद दैवज्ञ ब्राह्मण आहेत. सुमारें दोन हजारांवर ग्रंथ व २५ नियतकालिकें १९३० सालीं होतीं. रोजची वाचकसंख्या २०-२५ होती. स्वत:ची इमारत आहे तिची किंमत पांच हजार रुपये आहे.

युवक-संघ, मडगांव:— ही संस्था १९२० सालीं 'बालचमू' या नांवानें स्थापन झाली. हिचें एक स्वयंसेवक-पथक होतें व त्यानें अनेक सार्वजनिक कार्यांत व्यवस्था राखण्याची कामगिरी केली होती. १९२३ सालीं संस्थेचें नांव 'युवकसंघ' असें ठेवण्यांत आलें. एक व्यायामशाळा या संघानें १९२९ पर्यंत चालविली होती व साप्ताहिक व्याख्यानेंही हिच्यामार्फत होत असत. तूर्त या संस्थेची हालचाल दिसत नाहीं.

बालोन्नति समाज, केपें:— ता. ८ नोव्हेंबर १९२० रोजीं समाजाची स्थापना झाली. मराठी शाळा व वाचनालय अशीं दोन कार्यें समाज चालवितो. संस्थेतर्फे पूर्वी व्याख्यानमाला होत असे. पण आतां ती बंद आहे. वाचनालयांत सुमारें पांचसहाशें पुस्तकें असून ५।६ नियतकालिकें येतात व शाळेंत शिक्षक एकच असून मुलें २५ आहेत. अभ्यासक्रम ४ इयत्तांचा आहे.

श्रीकृष्ण विद्यालय, मांद्रें:— १९२१ सालीं विद्यालय स्थापन झालें. जुन्या देवरहित देवालयांत हें चालतें. तूर्त एक शिक्षक व ५३ विद्यार्थी आहेत. 'गोमंतक मराठा समाज' मुंबई याकडून मासिक १० रु. मदत मिळते. अभ्यासक्रम ४ इयत्तांचा आहे.

Centro Promotor de Instrução, काणकोण:— ता. २८ डिसेंबर १९२२ रोजीं स्थापना झाली. "काणकोण गांवांत शाळा, वाचनालयें, संमेलनें यांचे द्वारा शिक्षणप्रसार करण्याचें" संस्थेचें ध्येय आहे. संस्था सरकारांत रजिस्टर झाली असून काणकोण म्युनिसिपालिटीकडून तिला वार्षिक १८० रुपयांची मदत मिळते. तूर्त हिचे ७२ सभासद

आहेत. १९३१ पासून 'श्रीमल्लिकार्जुन विद्यालय' सुरू केलें असून त्यांत १९३४ सालीं एक शिक्षक व ४० विद्यार्थी होते. ता. ४ मार्च १९३७ रोजीं संस्थेनें 'स्वस्तिक वाचनालय' स्थापन केलें आहे. उपरोक्त १८० रुपयांशिवाय वर्गणीचे ३०० व फीचे १२० रु. असें उत्पन्न असून सुमारें २२५ रु. खर्च आहे. स्वतःच्या मालकीची इमारत बांधणें व पुढें लिसेवच्या तिसऱ्या वर्षापर्यंत शिक्षणाची सोय करणें असे पुढील बेत आहेत.

मराठी शाळा, माशेलः— ता. १५ जुलै १९२३ रोजीं ह्या शाळेची स्थापना झाली. जागेच्या अभावामुळें ही शाळा कधीं एका देवालयांत, तर कधीं मांडवांत भरत आहे. वेळोवेळ तिला चांगल्या शिक्षकांची जोड मिळाल्यामुळें शिक्षण चांगलें होतें. चालकांच्या मनांत इमारतीचा प्रश्न अत्यंत तीव्रतेनें बोंचत असून तूर्त इमारतीसाठीं सुमारें चार हजार रुपये जमविल्याचें समजतें. शाळेंत आजला दोन शिक्षक काम करीत असून ६१ मुलगे व २५ मुली शिकतात.

दैवज्ञ ब्राह्मण समाज, मडगांवः— ता. १४ सप्टेंबर १९२३ रोजीं श्रीगणेशचतुर्थीच्या दिवशीं ही संस्था स्थापन करण्यांत आली व १९३३ सालीं सरकारांत रजिस्टर करण्यांत आली. सभासद तीस आहेत. त्यांकडून येणारी वर्गणी व फंडाचें व्याज यांतून संस्थेचा खर्च चालतो. संस्थेच्या वाचनालयांत तूर्त दोन हजार पुस्तकें आहेत. श्रीगणेशोत्सवाबरोबरच वाढदिवससमारंभ होत असतो. प. वा. नाना शंकर शेट यांची पुण्यतिथीही साजरी करण्यांत येते. श्रीयुत वेर्लेकर बंधूंनीं आपल्या मातोश्री श्रीमती सत्यभामाबाई यांच्या स्मरणार्थ मठग्रामस्थ हिंदुसभेकडे एक हजार रुपये ठेवून त्यांच्या व्याजांतून दैवज्ञ ब्राह्मण ज्ञातींतील अनाथ-प्रेतसंस्काराची सोय केली आहे व या-संबंधींचा कारभार प्रस्तुत समाजाच्या कार्यवाह मंडळाकडे दिला आहे.

विद्याप्रसारक समाज, मोर्जी (पेडणें):— समाज १९२४ सालीं स्थापन झाला. सुमारें ६००० रुपयांची इमारत असून संस्था सरकारांत रजिस्टर झाली आहे. श्रीदेवी मोरजाईच्या देवालयांतून सालिना १०० रुपयांची मदत मिळते. मराठी ४ थी-पर्यंत अभ्यासक्रम असून शाळेंत दोन शिक्षक व ८५ विद्यार्थी आहेत.

विद्याप्रसारक मुष्टिफंड संस्था, लोलयें:— ही संस्था १९२६ सालीं स्थापन झाली. लोलयें, माशें, शेळ व बोरूस अशा आरंभीं तिच्या चार शाळा चालत होत्या. १९३६ सालीं शेळींतील शाळेशिवाय बाकीच्या तीन चालतात असें ऐकिवांत आहे. साऱ्या शाळा देवालयांच्या अग्रशाळांतून भरतात. वार्षिक खर्च ४०० रुपये आहे. तिन्ही शाळांत मिळून ५३ मुलगे व २० मुली आहेत व प्रत्येक शाळेंत एक शिक्षक आहे. अभ्यासक्रम ४ इयत्तांचा आहे. लोलयें येथें पोर्तुगीज मराठी सरकारी शाळा नव्हती तेव्हां संस्थेनें प्रिमेर ग्रावच्या शिक्षणाची सोय केली होती. मूठमूठ तांदळाच्या वर्गणीनें शाळा चालतात. तूर्त सुमारें २ हजार रुपये फंड आहे.

गोमंतक मराठा समाज-मुंबई, शाखा गोमंतकः— गोमंतकीय मराठा समाजांत शिक्षणप्रसार व्हावा व त्या कामीं येणाऱ्या अडचणी निवारतां याव्या यासाठीं मुंबईच्या मुख्य संस्थेनें ही शाखा गोमंतकांत ठेवली आहे. मराठा समाजांतील विद्यार्थ्यांना व शाळांना ही शाखा मदत करते. मुख्य संस्थेचें कार्य बहुविध प्रकारचें चालतें. पण तें गोमंतकाबाहेर चालत असल्यानें प्रस्तुत लेखांत दिलें नाहीं.

ज्ञानप्रसारक संघ, म्हाडुकटें, कुंकळळी:— १९२८ सालीं संघाची स्थापना झाली. १९०८ सालीं प. वा. अनंत नारायण पै वेर्णेकर यांच्या परिश्रमानें श्रीशांतादुर्गा वाचनमंदिर नांवाचें वाचनमंदिर स्थापन झालें होतें व तें १९१५ सालीं चालत असलेलें लेखकानें पाहिलें होतें. मध्यंतरीं या मंदिराचें कार्य मंदावलें होतें. संघ स्थापन होतांच त्यानें वाचनमंदिर ताब्यांत घेतलें व श्रीशांतादुर्गा विद्यालय नांवाची शाळा सुरू केली. मंदिरांत १९३० सालीं ३५० पुस्तकें व २० नियतकालिकें येत होतीं व शाळेंत १९२२ सालीं ६९ मुलें होतीं. अभ्यासक्रम ४ इयत्तांपर्यंत होता. अद्यावत् माहिती मिळाली नाहीं.

श्रीशांतादुर्गा वाचनमंदिर, रेइज्मागुश्:— हें मंदिर गौड सारस्वत ब्राह्मणांनीं १९२८ सालीं स्थापन केलें. १९३० सालीं त्यांत ८०० पुस्तकें व १४ नियतकालिकें येत होतीं. पुढील माहिती मिळाली नाहीं.

नूतन मुलांमुलींची शाळा, सावईवेरें:— ही शाळा श्रीमती केशरबाई वेरेंकरीण या महिलेनें स्वतःच्याच घरांत १९२९ सालीं स्थापन केली. स्वतः केशरबाई काम करितात. शाळेंत २६ मुलें आहेत व अभ्यासक्रम तीन इयत्तांपर्यंत आहे. व्यायामाचें शिक्षण देण्यांत येतें. शाळेचें फीचें उत्पन्न मासिक ४ रुपये आहे.

गोमंतक साहित्यसेवक मंडळ, पणजी:— मंडळ १९२९ सालीं स्थापन झालें. मंडळाचे सभासद अवघे १५।२० आहेत. १९३० सालीं मडगांव येथें भरलेलें १५ वें महाराष्ट्र-साहित्य-संमेलन याच संस्थेतर्फे भरलें होतें. ता. १७।१८ मार्च १९३४ त 'सारस्वत ब्राह्मण समाजा'तर्फे भरलेल्या 'गोमंतकीय वाङ्मयोपासक संमेलना'च्या ठरावास संमति देऊन ता. ११ व १२ मे १९३५ त मंडळानें श्री. विष्णु स. खांडेकर यांच्या अध्यक्षतेखालीं 'पहिलें गोमंतक-साहित्य-संमेलन' भरविलें. प्रतिवर्षी महाराष्ट्र-साहित्य-संमेलनाला मंडळातर्फे एक प्रतिनिधि पाठविण्याचा उपक्रम करण्यांत आला आहे. मंडळानें महाराष्ट्र शब्दकोशाला प्रादेशिक शब्द पुरविले आहेत. गोमंतकाच्या इतिहासाचीं साधनें जुळविण्याचें काम मंडळानें हातीं घेतलें असून एक ग्रंथसंग्रहालयही स्थापन केलें आहे.

Centro Educador de Priol, प्रियोळ:— ही संस्था १९२९ मध्यें प्रियोळच्या तरुणांनीं स्थापन करून सरकारांत रजिस्टर केली. संस्थेची स्वतःची इमारत असून एक वाचनमंदिर व एक शाळा संस्थेतर्फे चालतात. सभासद सुमारें ४० आहेत. उत्पन्न ३०० रुपये असून तेवढाच खर्च आहे. मंदिरांत ३०० पुस्तकें असून १५ नियतकालिकें येतात. शाळेंत १ शिक्षक व ५० विद्यार्थी आहेत.

शिवाजी युवक-संघ, पणजी:— ही संस्था १९३० सालीं पणजींतील कांहीं तरुणांनीं स्थापन केली. एक व्यायामशाळाही संस्था चालवीत असून श्रीशिवजयंत्युत्सवाप्रीत्यर्थ दरसाल एखाद्या वक्त्याचें व्याख्यान होत असतें. संस्थेस स्वतःची इमारत नसल्यानें मुष्टिफंड संस्थेच्या मळ्यांतील इमारतींतच तिचे कार्यक्रम होत असतात.

श्रीराम विद्यालय, पोंबुर्पे:— १९३१ सालीं ही शाळा मराठा क्षत्रिय शिक्षणोत्तेजक समाजानें स्थापन केली. अभ्यासक्रम तीन इयत्तांचा असून १ शिक्षक व ३९ मुलें आहेत.

हिंदु विद्यार्थी-गृह, मडगांव:— प्रो. दत्तात्रय व्यंकटेश पै व प्रो. शांताराम सूर्याजी शिंगबाळ यांनीं हें गृह १९३३ सालच्या जून

महिन्यांत उघडलें. परगांवच्या विद्यार्थ्यांना जेवणाराहण्याची व अभ्यासास मदत मिळण्याची सोय करून देणें हा त्याचा उद्देश आहे. हें गृह दोघांच्याच मालकीचें आहे. तरी पण त्याचा उपयोग शिक्षणासाठीं व हरएक सार्वजनिक कार्यासाठीं होत आला आहे. सार्वजनिक कार्याची आवड व तळमळ असणाऱ्या परगांवच्या कार्यकर्त्यांना हें गृह नेहमीं मदत करीत आलें आहे. मडगांवांत गेल्या डिसेंबरांत भरलेल्या अध्यापन-वर्गाकरतां आलेल्या बाहेरगांवच्या शिक्षकांची व चालकांची सोय गृहानेंच केली होती. गृहांत मुलांचें शिक्षण चांगलें होतेंच. पण नियमितपणा व उपयुक्त संवयी मुलांना लागण्यासाठीं गृहाइतकी नमुनेदार व्यवस्था दाखवणें बरेंच कठीण आहे. प्रत्येक वस्तूला ठराविक जागा व ठराविक काम हें गृहाचें सूत्रवाक्य आहे. गृहाच्या तिसऱ्या वृत्तांतावरून, गृहांत राहणारे ३९ विद्यार्थी व केवळ शिक्षण घेणारे ३९ मिळून ७८ मुलांनीं गृहाचा फायदा घेतल्याचें दिसून येतें. गृहांत शिक्षण घेणाऱ्यांत शेंकडा ८० मुलें परीक्षेंत पास झालीं.

समाजसेवा-संघ, मडगांव:— १९३३ सालीं (विजयादशमीच्या दिवशीं) ही संस्था स्थापन झाली. व तिनें श्रीदामोदर विद्यालयांतील मुलींचा 'खास वर्ग' आणि श्री. जयराम भि. राऊत यांची 'कन्याशाळा' हीं एकत्र करून ताब्यांत घेतलीं व **महिला-विद्यालय** स्थापन केलें. सुरुवातीस श्रीदामोदर विद्यालयाशीं सहकारितेनेंच महिला-विद्यालय चालत होतें आणि स्वतःच्या व दामोदर विद्यालयाच्या मिळून १८४ मुलींच्या शिक्षणाची जबाबदारी २ शिक्षकिणी व ४ शिक्षक ठेवून त्यानें पत्करली होती. १९३५।३६ सालीं हें सहकार्य सुटल्यामुळें विद्यालय स्वतंत्र जागेंत गेलें. शिक्षणाची सोय मराठी ४ थीपासून सातवीपर्यंत असून दुय्यम भाषा या नात्यानें पोर्तुगीज किंवा इंग्रजी यांपैकीं कुठल्या तरी भाषेला मराठी ४ थींत सुरुवात होत असते व व्हर्नाक्युलर फायनलपर्यंत पोर्तुगीज सेगुंद ग्राव किंवा इंग्रजी तिसरी पूर्ण करण्यांत येते. याखेरीज शिवणकला, गायनवादन, कशिदा, चित्रकला, गृहजीवनशास्त्र वगैरे उपयुक्त विषयांचेंही शिक्षण देण्यांत येत असतें. जून १९३५ मध्यें संघानें **नूतन मराठी विद्यालय** स्थापन केलें. सुरुवातीपासून मुली एकाच सुसूत्र धोरणानें शिक्षण मिळालेल्या असाव्या म्हणून पहिल्या तीन इयत्तांपर्यंत नूतन मराठी विद्यालयांत मुलामुलींना सहशिक्षण देण्यांत येतें. चौथ्या इयत्तेंत मुली महिला-विद्यालयांत जातात व मुलगे नूतन मराठी विद्यालयांत ६ वीपर्यंत राहून पोर्तुगीज सेगुंद ग्रावपर्यंत शिक्षण घेऊं शकतात, अशी ही जोड योजना आहे. १९३५ मार्चमध्यें महिला-विद्यालयानें व्ह. फा. साठीं ६ मुली पाठविल्या होत्या त्यांतून ४ पास झाल्या. व त्यांत एकीला एकंदर मुलींत ९ वा नंबर मिळाला. १९३६ मार्चमध्यें एकच मुलगी पाठविली ती पास झाली. पोर्तुगीज प्रिमैर ग्रावाच्या परीक्षेस १९३६ मध्यें तीन मुली पाठविल्या त्यांतून दोन पास झाल्या. यंदां सहा मुली पाठविल्या होत्या त्यांतून २ सेकंड क्लास पास व ३ नुसत्या पास झाल्या व नूतन मराठी विद्यालयांतून दोन मुलगे पाठविले होते त्यांतून १ पास झाला. खास महिला-विद्यालयांत तूर्त १८ मुली असून नूतन मराठी विद्यालयाच्या ४७ मिळून ६५ मुलींचें शिक्षण विद्यालयामार्फत होतें. नूतन मराठी विद्यालयांत याखेरीज ७२ मुलगे आहेत. दोन्ही विद्यालयें मिळून दोन अध्यापिका व ६ अध्यापक आहेत. या व्यवस्थित अभ्यासक्रमाशिवाय संघानें गरजू मुली व स्त्रिया यांकरतां कलाशिक्षणाचे खास वर्ग, मुलींच्या साप्ताहिक वादविवादाच्या सभा, आरोग्यशास्त्रावरील व्याख्यानें, विद्यार्थी-वाचनालय, खेळांसाठीं पटांगण, नवीन पद्धतीच्या

बांकांची सोय वगैरे उपक्रम केले आहेत. संघाचें काम तरुण मंडळीकडे असून तें फार समाधानकारक रीतीनें चाललें आहे. प्रस्तुत लेखकासारख्या उताराला गाडी लागलेल्याला, तरुणांचें हें कार्य पाहून समाधान वाटलें.

विचार-विलास मंडळ, मडगांव:- ता. १ जानेवारी १९३४ रोजीं प्रो. रामचंद्र शंकर नायक यांच्या अध्यक्षतेखालीं सभा भरून मंडळाची स्थापना झाली. दर आठवड्यास एकाद्या विषयावर व्याख्यान व मग त्यावर चर्चा करावयाची व तेणेंकरून विचार-जागृतीची ज्योत समाजांत तेवत ठेवावयाची इतकाच या संस्थेचा उद्देश असल्यामुळें सभासद, वर्गणी वगैरे भाग मंडळाला नाहीं. प्रारंभीं मंडळाच्या सभा हिंदु विद्यार्थी-गृहांत भरत होत्या. आतां मडगांवांत विजेचा पुरवठा झाल्यापासून 'सारस्वत ब्राह्मण समाजा'च्या सभा-गृहांत भरत आहेत.

सेवासमिति, मडगांव:—१९३४ सालीं समिति स्थापन झाली व लागलीच सरकारांत रजिस्टर होऊन तिला मडगांव म्युनिसिपालिटीची मासिक ३५ रुपयांची मदतही मिळाली. समितीनें स्टेशनासमोरच पांथस्थांसाठीं एक धर्मशाळा बांधली असून **आदर्श वनिता-विद्यालय** या नांवाची मुलींची शाळा स्थापन केली आहे. सुमारें सोळा हजार रुपये खर्चून शाळेला भव्य व प्रेक्षणीय इमारत बांधली असून सुमारें तीन हजार रुपयांचें फर्निचर व शिक्षणोपयोगी साहित्य आणलें आहे. मराठी पहिलीपासून सातवीपर्यंत, पोर्तुगीज सेगुंदग्राव, इंग्रजी तिसरीपर्यंत, गायन-वादन, कशिदा, शिवणकाम, व्यायाम, लेजीम, सांघिक व्यायाम व खेळ इत्यादि अभ्यासक्रम इयत्तावार विभागलेला असून स्वतंत्रपणें शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठीं स्वतंत्र व्यवस्थाही आहे. ब्याडमिंटन, व्हॉली बॉल, रिंग बॉल, सायकल इत्यादींसाठीं सुंदर पटांगणांची व्यवस्था आहे. गेल्या वर्षापासून म्युनिसिपालिटीची मदत मासिक तीनशें रुपयांची झाली आहे. विद्यालयांत विद्यार्थिनी-वाचनालय असून तें इयत्तावारीनें वांटून शिक्षकांकडे दिलें आहे. व वार्षिक परीक्षांत "अवांतर वाचना"चें सदर असतें. शिक्षक-वाचनालय, हें विद्यार्थिनी-वाचनालय आणि यंदां सुरू केलेलें वनिता-वाचनालय मिळून एकंदर ९८६ पुस्तकें आजला संस्थेंत आहेत. १९३४-३५ मध्यें ४५ मुली, १९३५-३६ मध्यें ९३ मुली व १९३६-३७ मध्यें १२१ मुली अशी विद्यार्थिनींच्या संख्येंत दरसाल वाढ होत गेली आहे. शिक्षकिणी ८ आहेत. १९३६ मार्चमध्यें व्ह. फायनलला ५ मुली गेल्या होत्या, त्यांतून ४ पास झाल्या; १९३७ त ७ गेल्या होत्या त्यांतून तीन पास झाल्या. यंदां पोर्तुगीज प्रिमैरग्रावच्या परीक्षेस ८ मुली गेल्या, त्यांतून ७ पास झाल्या व सेगुंदग्रावला ४ गेल्या होत्या त्या सर्व पास झाल्या व तिघींना डिस्टिंक्शन मिळालें. १९३५ पासून शाळेला स्वतंत्र वसति-गृहाची जोड दिली आहे. त्यापूर्वी प्रो. द. व्यं. पै यांच्या हिंदु विद्यार्थी-गृहांत त्यांनीं सोय करून घेतली होती. १९३७-३८ या वर्षीं पौरस्त्य व पाश्चात्य संगीताचें शिक्षण देण्याची सोय करण्यांत आली आहे.

नवीन मराठी शाळा, पाळोलें, काणकोण:— १९३४ सालीं ही शाळा स्थापन झाली. शाळेला स्वतःचें शाळागृह आहे. मराठी चार इयत्ता व पोर्तुगीज सेगुंद ग्रावपर्यंत शिक्षणाची सोय शाळेंत केली आहे. मराठी शाळेंत दोन शिक्षक व ४८ मुलें असून पोर्तुगीज विभागांत एक शिक्षक व १०।१२ मुलें असतात.

नूतन मराठी विद्यालय, कुर्डी-सांगें:- ही शाळा १९३५ सालीं स्थापन झाली. मराठी तीन इयत्ता शिकविल्या जातात. शाळेंत एक

शिक्षक व १७ विद्यार्थी आहेत. ही शाळा गायक समाजाची असून मुंबईच्या गोमंतक मराठा समाजाकडून शाळेला मासिक ८ रुपयांची मदत मिळते.

गोमंतकीय मराठी शिक्षण-संमेलन, तूर्त कचेरी मडगांव:— मठग्रामस्थ हिंदुसभेतर्फे हें संमेलन मडगांव येथें ता. २९ व ३० एप्रिल १९३३ या दिवसांत सनशाइन बिल्डिंगमध्यें प्रो. रामचंद्र शंकर नायक यांच्या अध्यक्षतेखालीं भरलें. गोमंतकांतील मराठी शिक्षणांत एकसूत्रीपणा आणावा व मराठी शिक्षणाचा युरोपियन भाषांच्या हुय्यम शिक्षणाशीं मेळ घालून गोमंतकाच्या गरजेप्रमाणें अभ्यासक्रमांत बदल करावा, या हेतूनें १९१६ पासून जे प्रयत्न गोव्यांत चालले होते, त्यांचें दृश्य फळ म्हणूनच हें संमेलन भरविलें गेलें. या अधिवेशनांत, मराठी चार इयत्तांपर्यंत अभ्यासक्रम आंखणें, परीक्षांतून एकसूत्रीपणा आणण्यासाठीं संमेलनपुरस्कृत परीक्षकांची यादी जाहीर करणें व गोमंतकीय शाळांची खानेसुमारी, हे महत्वाचे ठराव झाले. ता. २९।३० आगस्ट १९३६ या दिवसांत फोंडें येथील आल्मैद कॉलेजमध्यें प्रो. दत्तात्रय व्यंकटेश पै यांच्या अध्यक्षतेखालीं संमेलनाचें दुसरें अधिवेशन झालें. त्यांत वरील ठरावांशिवाय पांचव्या इयत्तेचा अभ्यासक्रम आंखणें, क्रमिक पुस्तकांची निवड, शालेय दफ्तर कसें ठेवावें व शिक्षकांसाठीं हंगामी अध्यापनवर्ग काढणें हे ठराव महत्वाचे होते. अभ्यासक्रम आंखणें, पुस्तकांची निवड, परीक्षांत व अभ्यासक्रमांत एकसूत्रीपणा आणणें, हंगामी अध्यापनवर्ग काढून यशस्वी करून दाखविणें वगैरे ठराव अमलांत आले. अध्यापनवर्गासाठीं ७७ शिक्षक आले होते. "सारस्वत ब्राह्मण समाजा"नें वर्गाला आपलें सभागृह दिलें होतें.

União Académica, पणजी:— दोनतीन वर्षांमागें ही संस्था पणजी येथें लिसेव, नॉर्माल वगैरे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनीं स्थापन केली. गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना मदत, विद्यार्थ्यांच्या शारीरिक व बौद्धिक प्रगतीस आवश्यक असलेलें सहाय्य करणें, मर्दानी खेळ, व्यायाम वगैरेची व्यवस्था करणें, विद्यार्थ्यांत परस्पर सहकार्य वाढविणें, विशेषतः त्यांच्यांत समाजसेवेची आवड उत्पन्न होईल असे कार्यक्रम करणें, इत्यादि तिचे उद्देश तिच्या कार्यावरून दिसून येतात. संस्थेकडून प्रसंगोपात चांगल्या चांगल्या वक्त्यांचीं ज्ञानवृद्धिपर व्याख्यानेंही होतात. स्थायी फंड दीड हजार आहे. सभासदांतील उत्साह, त्यांची आजवरची कामगिरी, परस्पराभिमान व आत्मविश्वास पाहतां ही संस्था भावी समाजसेवक तयार करणारी शाळा होईल अशी आशा वाटते. तूर्त हिचे सुमारें ९० सभासद आहेत.

याच प्रकारची **Grémio Literário Hindu** या नांवाची संस्था पणजी येथें १९१० ते १९१७ चे दरम्यान चाललेली लेखकास माहीत आहे. ग्रेमियुतर्फे दर आठवड्यास वादविवादोत्तेजक सभा भरत असत व शारीरिक शिक्षणाकरतां **Associação Atlética Goana** नांवाची उपसंस्थाही ग्रेमियुनें काढली होती.

कन्याशाळा, पणजी:— ता. १ नवंबर १९३६ रोजीं श्री. लवंदे यांच्या माडीवर सभा भरून या शाळेची स्थापना झाली. मराठी ४ थ्या इयत्तेपर्यंत शिक्षण घेऊन घरीं राहणाऱ्या मुलींच्या पुढील शिक्षणाची स्वतंत्र तरतूद करण्यासाठीं हिचा जन्म आहे. सन १९३६ सालीं १२ मुली मराठी पांचवीं इयत्ता शिकत होत्या. शिवणकला, चित्रकला, हस्तकौशल्य यांवर विशेष भर दिला जातो. इतर शिक्षणाबरोबरच मुलींना पोर्तुगीज व इंग्रजी भाषांचें शिक्षण दिलें जातें.

मठग्रामस्थ हिंदुसभा, मडगांवः— पूर्वीच्या " धाजाण " नांवाच्या केवळ धार्मिक संस्थेचेंच हें रूपांतर आहे. व तें १९२७ सालीं करण्यांत आलें. श्रीदामोदर विद्यालय तूर्त हिच्या शिक्षणमंडळातर्फे चालतें. जांबावलीचा शिशिरोत्सव व मडगांवच्या हिंदु समाजाची स्मशानव्यवस्था यांचीं सूत्रें या संस्थेकडे आहेत. ही संस्था १९२७ सालींच सरकारांत रजिस्टर करण्यांत आली.

गोमंतक गीता-धर्म-मंडळ, मडगांवः— या मंडळाच्या कार्याचा संबंध मराठी शाळांकडे येत असल्यामुळें, धार्मिक संस्थांचा समावेश या लेखांत करावयाचा नसतांही हिचा उल्लेख करणें भाग पडतें. १९२७ सालीं मंडळाची स्थापना झाली व तिचें काम पुण्यांतील मुख्य संस्थेलाही इतकें भरीव वाटलें कीं, तेव्हांपासून "गोव्यांतील गीताजयंति' हें पोटसदर त्यांच्या अहवालांत स्वतंत्रपणें येऊं लागलें आहे. गीतेची सामान्य ओळख तरी मंडळाच्या कार्यामुळें जनतेंत पसरत आहे. गीतेंतील कर्मयोगाची शिकवण मंडळानें समाजांत प्रसृत केलेली लौकरच दृष्टीस पडेल अशी आशा आहे. १९३४ सालच्या अहवालावरून पाहतां सुमारें ४६ शाळांतून मंडळाच्या प्रेरणेमुळें गीताजयंत्युत्सव साजरा केला गेला.

श्रीशारदामंदिर, माशेलः— ता. ३१ मार्च १९३० रोजीं वर्षप्रतिप्रवेच्या मुहूर्तावर संस्थेची स्थापना झाली. प्रारंभीं सहा वर्षे मंदिर खासगी मालकीच्या जागेंत तात्पुरतें चालत होतें. सातव्या वर्षाच्या सुरुवातीस श्रीमल्लिनाथ देवालयाच्या अग्रशाळेंत मंदिर तूर्त तरी कायमचें आलें आहे. चालकांच्या मनांत स्वतंत्र इमारतीचा प्रश्न घोळत आहे. ता. २६ जून १९३३ रोजीं संस्था सरकारांत रजिस्टर झाली आहे. सातव्या वर्षाच्या अखेरीस ३७ सभासद होते व त्यांची वर्गणी ६९ रुपये होती. एकंदर जमा ११३ रुपये असून खर्चही तेवढाच होता. पुस्तकसंग्रह १३०० असून २७ नियतकालिकें येत होतीं. वाचकसंख्या एकंदर १४३५ होती. मंदिराकडून शारदोत्सव साजरा होत असून तन्निमित्त व्याख्यानेंही होतात.

तात्पुरती माहिती मिळालेल्या शाळा

या वर दिलेल्या संस्थांशिवाय ज्यांची अगदीं थोडी माहिती मिळाली त्या शाळांचा उल्लेख पुढें केला आहेः- श्रीहनुमान विद्यालय, मळें, पणजी-३५ मुलें; श्रीमंगेश विद्यालय, मळें, पणजी-५२ मुलें; नवीन मराठी विद्यालय, भाटलें-पणजी-३७ मुलें; श्रीपांडुरंग विद्यालय, दिवाडी-१२ मुलें; श्रीसरस्वती विद्यालय, दिवाडी -२८ मुलें; श्रीशिवाजी विद्यालय, रायबंदर-५० मुलें; श्रीरामदास विद्यालय, रायबंदर-२५ मुलें; श्रीगणपति विद्यालय, ताळगांव-४२ मुलें; श्रीदत्तप्रासादिक विद्यालय, हळदुणें-४८ मुलें; श्रीशांतादुर्गा विद्यालय, कळंगूट-४१ मुलें; मराठा क्षत्रिय भंडारी समाज, हणजूण-४० मुलें; श्रीशांतादुर्गा विद्यालय, कांदोळी-५१ मुलें; श्रीरामनाथ विद्यालय, रैज्माग-४० मुलें; श्रीशांतादुर्गा विद्यालय, वेरें-बार्देश-६० मुलें; श्रीवेताळ विद्यालय, असोळणें - ४० मुलें; श्रीमहालक्ष्मी विद्यालय, कांसावली - ४२ मुलें; श्रीलक्ष्मी विद्यालय, सकलें कतें - कुंकळळी - ३४ मुलें; श्रीसांतेर मराठी शाळा, कुळवाडो - कुंकळळी - २८ मुलें; श्रीरामनाथ विद्यालय, लोटली - २३ मुलें; श्रीसांतेरी विद्यालय, पारोडें - २५ मुलें; मुरगांव शिक्षणसंघ, बंदर, मुरगांव - ६० मुलें; श्रीदत्तात्रय विद्यालय, वास्को - ७० मुलें; श्रीदामोदर मराठी शाळा, वास्को-५० मुलें; श्रीसरस्वती विद्यालय, हरमल-३६ मुलें; श्रीसीताराम विद्यालय, पेडणें-१७५ मुलें, श्रीकुमळेश्वर विद्यालय, कोरगांव-६० मुलें; श्रीनारायण विद्यालय, कोरगांव-३० मुलें, श्रीमहालक्ष्मी विद्यालय, केरी-पेडणें–३९

मुलें; श्रीपांडुरंग विद्यालय २ शाखा, कुंडई-५३ मुलें; श्रीशारदासेवक मंडळ, फातर्पे- ३० मुलें; श्रीसरस्वती विद्यालय, काकोडें-४० मुलें; श्रीशारदा विद्यालय, काकोडें-३५ मुलें; श्रीसरस्वती विद्यालय, सांगें-२८ मुलें; श्रीशांतादुर्गा विद्यालय, सांवर्डे-४३ मुलें; श्रीविमलेश्वर प्रासादिक मराठी शाळा, रिवण-३० मुलें; श्रद्धानंद विद्यालय, पैंगण-९ मुलें; यांखेरीज सुमारें दीडशांवर शाळांची माहिती मिळाली नाहीं.

तात्पुरती माहिती मिळालेलीं वाचनमंदिरें

मुरगांव साहित्य-सेवा-संघ, वास्को; शीलोन्नति समाज, पेडणें; श्रीहनुमान वाचनालय, मोर्जी; श्रीमहालक्ष्मी वाचनमंदिर, मांद्रें; श्रीभगवती मोफत वाचनालय, पार्से; श्रीराम वाचनालय, मांद्रें; श्रीमहात्मा वाचनमंदिर, कोरगांव; लोकसेवक समाज, हरंबल; श्रीमुरलीधर वाचनालय, सांखळी; श्रीशांतादुर्गा ग्रंथसंग्रह, श्रीक्षेत्र कवळें- ६०० पुस्तकें व कित्येक नियतकालिकें; महाराष्ट्र-सारस्वत वाचनालय, फोंडें; श्रीसरस्वती वाचनमंदिर आणि मराठी ग्रंथसंग्रहालय, कवळें; बालसंस्था वाचनमंदिर, म्हाडदोळ; श्रीमांगिरीश वाचनालय, श्रीक्षेत्र मंगेशी- ८०० पुस्तकें व कित्येक नियतकालिकें; श्रीमहालक्ष्मी वाचनमंदिर, मंगेशी; श्रीविठ्ठल वाचनमंदिर, कुंडई; श्रीसरस्वती वाचनमंदिर, मडकई; श्रीकामाक्षा वाचनमंदिर, शिरोडें; श्रीभूमिपुरुष वाचनालय, फोंडें; श्रीसरस्वती वाचनालय, दाभाळ (सांगें); श्रीमहालक्ष्मी वाचनालय, नेतुर्ली; श्रीशारदासेवक मंडळ, फातर्पे; सरस्वतीसेवक समाज, काणकोण; नवहिंदु वाचनालय, चिंबल; अखिल दैवज्ञ ब्राह्मण समाज, मडगांव; श्रीशांतादुर्गा वाचनालय, कळंगूट; नूतन वाचनालय, डिचोली; बालसमाज वाचनमंदिर, पाळोलें–काणकोण. याखेरीज कित्येकांचीं नांवें मिळालीं नाहींत.

थोडासा खुलासा

ज्या खेड्यांत सुमारें ४०० हिंदु वस्ती असेल तेथें शाळा नाहीं, अशीं गांवें गोमंतकांत अगदींच थोडीं आहेत. व आहेत तींदेखील सह्याद्रीलगतच्या, जंगलानें व्याप्त व म्हणूनच वाईट हवापाण्याच्या प्रदेशांत आहेत. शाळांची जी माहिती वर दिली आहे, तींत मराठी चौथीपर्यंतचा अभ्यासक्रम असलेल्या शाळाच फार आहेत. ज्या शाळांतून पांचवी इयत्ता शिकविली जाते, किंवा चौथीपेक्षां कमी इयत्ता शिकविल्या जातात, त्यांचा स्वतंत्र निर्देश केला आहे. बहुतेक शाळांतून गोमंतकीय मराठी शिक्षण संमेलनानें ठरविलेला अभ्यासक्रम व पाठ्य पुस्तकें चालू आहेत.

आमचीं वाचनालयें सर्वांना मोफत असतात. वाचनालय म्हटलें कीं, तें मोफतच असलें पाहिजे ही भावना जणूं काय अलिखित कायद्याप्रमाणें येथें दृढमूल झालेली आहे.

संस्थेचें नांव ज्ञातिविशिष्ट असें दिसतांच, परोपदेशे पांडित्यं करणारे कित्येक महात्मे "गोमंतकांत ज्ञातिद्वेष बोकाळलेला आहे" असें म्हणतात. परंतु त्यांत मुळींच तथ्य नाहीं. आमच्या संस्थांतून ज्ञात्यभिमान असलाच, तर तर तो समाजाकरितां त्याग कोणीं करावा, यासाठीं लागलेल्या चुरशीचा अर्थात् अत्यंत स्पृहणीय व समाजहितकारीच आहे. संस्थेचा फायदा कोणीं घ्यावा व अधिकार कोणीं गाजवावा या हीन स्वरूपाचा तो मुळींच नाहीं. आमच्या विद्यालयांतून ब्राह्मणांपासून शूद्रांपर्यंत सर्व जातींचे शिक्षक असतात व ब्राह्मणांपासून अस्पृश्यांपर्यंत सर्व हिंदूंचीं व मुसलमान आणि ख्रिस्त्यांचीं मुलेंदेखील शिकत असतात.

लेखांतील माहितीवरून असें दिसून येतें कीं, **(१) मूठभर तांदळांच्या वर्गणीनें चालेल्या, (२) हजारों रुपये खर्चून उभार-**

लेल्या, (३) केवळ एका गरीब बाईनें स्वतःच्या घरांत स्वतः चालविलेल्या अशा बहुविध त्यागाचे नमुने, या १४०० चौरस मैलांच्या व अडीच लाख हिंदु वस्तीच्या टापूंत दिसतात. सवादोनशें शाळांतून सुमारें आठ हजार मुलें शिकत असतात आणि ७०।८० वाचनालयें वाचनाची भूक मोफत शमवितात! म्युनिसिपालिट्यांकडून मदत मिळणाऱ्या संस्था अगदींच थोड्या असून केवळ लोकाश्रयावरच हा संसार चाललेला आहे!

पुढारलेल्या (!) महाराष्ट्राच्या मतें जो गोमंतक मागासलेला आहे त्याच्याकडून संस्कृतिरक्षण व संवर्धन यासाठीं चाललेल्या कार्याचा पसारा हा एवढा आहे.

प्रमुख प्रमुख शाळांमधून मिळणारें शिक्षण, नेहमीं मराठी बोलणाऱ्या व ऐकणाऱ्या महाराष्ट्रांतील शाळांच्या तोडीचेंच नव्हे तर त्याहीपेक्षां सरस असल्याची ग्वाही, परीक्षांसाठीं येणाऱ्या एज्युकेशनल इन्स्पेक्टर व विद्वान शिक्षकांनीं दिली आहे. या गोष्टींचें श्रेय गोमंतकीय चालकांइतकेंच आमच्या शिक्षक बंधूंनाही आहे.

राजकीय संस्था

प्रागतिक संघः— गोमंतकाची परिस्थितीच अशी चमत्कारिक आहे कीं, त्याला स्वतंत्रपणें सामाजिक किंवा राजकीय चळवळ करणें शक्यच नाहीं. तरीदेखील गरज पडतांच हिंदुसमाजानें ही संस्था १९२० सालीं फोंडें येथें स्थापन केली. थोड्याच कालावधींत संघानें आपला दरारा इतका बसविला होता कीं, सुशिक्षित हिंदु व्यक्तीला संघाशीं फटकून वागणेंच काय, पण त्याच्याबाहेर राहणेंसुद्धां अशक्य झालें होतें. व ज्या ख्रिस्ती समाजावर त्यानें आपला पहिला मोर्चा लावला, तो समाज संघाच्या पुढाऱ्यांकडे अजीजीची भाषा वापरूं लागला होता. राजकीय निवडणुका लढविण्याच्या बाबतींत अनन्यसाधारण यश आणि तें थोडक्याच कालावधींत संघानें मिळविलें होतें. निवडणुकांशिवाय इतर राजकीय कार्यें त्यानें मुळींच केलीं नाहींत म्हटलें तरी चालेल. १९२६ सालापासूनच्या नव्या मनूंत, निवडणुकांचें स्वरूप व क्षेत्र हीं दोन्ही बदललीं आणि तेव्हांपासून संघ तूर्त सुप्तावस्थेंतच आहे.

'सारस्वत ब्राह्मण समाजा'चें वैशिष्ट्य

वास्तविक 'सारस्वत ब्राह्मण समाजा'चें कार्यक्षेत्र वाचनालयापुरतेंच आहे, असा सामान्य समज असणें रास्त आहे. खरी गोष्ट मात्र तशी नाहीं. त्याच्याकडून ज्ञानप्रसाराशिवाय इतर अनेक प्रकारची सेवा गोमंतकाला लाभली आहे. केवळ वाचनालयच घेतलें, तर इतर तत्सम गोमंतकीय संस्थांत तें ठळकपणें नजरेंत भरण्यासारखे त्याचे विशेष आहेतः ग्रंथसंपत्ति नऊ हजारांजवळ आहे; नियतकालिकें व वाचक यांची संख्या दांडगी; स्वतःच्या मालकीची, मध्यवर्ती जागेंत, विस्तीर्ण सभागृहयुक्त इमारत त्याच्याच वाचनालयाची आहे. त्याची व्याख्यानमाला, विषय, व्याख्याते, व्याख्यानसंख्या इत्यादि दृष्टींनीं पाहातां, पहिल्या दर्जाची आहे. गोमंतक आणि महाराष्ट्र यांतील विस्कळीत झालेला दुवा बळकट होण्यासाठीं आणि गोमंतकाविषयीं बाहेर प्रचलित असलेल्या अवास्तव प्रवादांना आळा घालण्यासाठीं जे अनेक बनाव व प्रयत्न झाले आहेत त्यांत या व्याख्यानमालेचा उल्लेख प्रामुख्यानें करावा लागेल. **समाजा**च्या व्याख्यान सप्लाईंग एजंटाच्या प्रचारकौशल्यामुळें या व्याख्यानमालेंत टिळकपक्षीय, प्रागतिक, गांधीभक्त, हिंदुसभावाले, एकांडे शिलेदार वगैरे सर्व रंगांचे व्याख्याते, आणि धार्मिक व्याख्यानापासून धर्मोच्छेदकांपर्यंत सर्व पातळींतील

विषयांची हजिरी लागली आहे. नांवाजलेल्या गोमंतकीय वक्त्यांत **समाजा**च्या व्याख्यानमालेंत भाग न घेतलेला वक्ता मिळणें बरेंच कठीण होईल.

इतर दृष्टीनें पाहातांही **समाजा**नें बरीच कामगिरी केली आहे. १५ व्या महाराष्ट्र-साहित्य-संमेलनास त्याच्या सभासदांची फार मदत झाली. त्याच्यातर्फे भरलेल्या गोमंतकीय वाङ्मयोपासक-संमेलनांतूनच गोमंतक-साहित्य-संमेलन उत्पन्न झालें व त्याचें प्रथमाधिवेशन त्याच्याच सभागृहांत भरलें. गोमंतकीय शिक्षण-संमेलनाचें कल्पनाचित्र काढणाऱ्या मंडळींत **समाजा**चे बरेच सभासद होते. शिक्षण-संमेलनाच्या द्वितीय कार्यकारी मंडळानें भरविलेला हंगामी अध्यापन-वर्ग **समाजाच्या** सभागृहांतच भरला. नूतन मराठी विद्यालय व महिला-विद्यालय चालविणारा समाजसेवा-संघ **समाजा**च्याच घरचा आहे. १९२४ सालीं जो शिक्षणप्रसारक संघ श्रीदामोदर विद्यालय चालवीत होता, त्यांत **समाजा**च्या सभासदांची मदत मोठी होती. अस्पृश्य हरिदास गोमंतकांत आले, त्यावेळीं **समाजा**नें आपल्या सभागृहांत त्यांचें कीर्तन करवून सामाजिक समेटाचा संदेश हिंदुसमाजाला दिला.

पण लेखकाला यांत 'समाजा'चें वैशिष्ट्य दिसत नाहीं. जुन्या चालीरीतींवर व्याजोक्ति, उपहास, व्यंगोक्ति इ. मार्गांनीं, व्याख्यानद्वारा किंवा अन्य तऱ्हेनें जे कोरडे ओढले जात व ज्यांच्यामुळें या प्रकारांना बराच आळा पडला त्यांत त्याचा पहिला विशेष आहे; बाहेरून भक्कम दिसणारा लब्धप्रतिष्ठितांचा डोलारा पोकळ असल्याचें जगाला दाखवून तरुणांच्या मनावरच्या त्यांच्या पकडीची सांखळी तोडण्याचें जें धैर्य दाखविलें तो त्याचा दुसरा विशेष होय. सन्माननीयांचा सन्मान करून, विद्वानांच्या ज्ञानाचा लाभ घेण्यासाठीं समाजसेवेची लहानमोठी एकही संधि न गमावतां, अहर्निश झटायाचें हें त्याचें तिसरें वैशिष्ट्य होय.

परंतु कळसादाखल सांगायचें तर, **समाजा**वरील संकट स्वतःच्या व्यक्तीवरील संकट होय, **समाजाच्या** हितापुढें व्यक्तिहिताची परवा नाहीं, अशी जी मनोभावना त्यानें आपल्या सभासदांत उत्पन्न केली तींतच **समाजा**च्या यशाचें बीज आहे. या मनोभावनेमुळेंच, आलेल्या प्रत्येक गंडांतरांतून **समाज** सुरक्षितपणें पार पडला आहे.

उपसंहार

आमचें मडगांव शहर म्हणजे पक्षोपपक्षांचें माहेरघर होय असें त्याचा इतिहास सांगतो. जांबावलीचा शिशिरोत्सव व मडगांवचा रामजन्मोत्सव हीं या पक्षाभिनिवेशाचीं जुनीं स्थंडिलें होतीं. संगीत विरुद्ध प्रोज, कॉंग्रेतपक्ष विरुद्ध लॉयॉलपक्ष, कीस कंपनी इत्यादि त्यांचीं जुनीं स्वरूपें होतीं. आजही येथें असे पक्षोपपक्ष आहेत. परंतु शिशिरोत्सव व नाट्यसंस्था, यांच्याऐवजीं, शाळा, वाचनमंदिरें, स्त्रीशिक्षण, प्रदर्शनें इत्यादि प्रगमनशील अधिष्ठानें या पक्षांनीं आज घेतलीं आहेत. प्रस्तुत लेखकासारख्या, बालपणापासून मडगांवशीं निकट संबंध असलेल्या व या पक्षोपपक्षांतून उत्पन्न झालेल्या घडामोडींची वेळोवेळ झळ लागलेल्यालाही गोमंतकांतील इतर शहरांपेक्षां मडगांव आवडतें. एवढ्याचसाठीं कीं, प्रत्येक झगड्यांतून जुन्या संस्था मोडण्याऐवजीं नवोनव संस्थांची जोड मात्र मडगांवला अखंड होत चाललेली दिसते. स्वपक्षाच्या अभिमानामुळेंच कां होईना, पण मडगांवच्या प्रत्येक पक्षांतील कार्यकर्ते अपेक्षित कार्यासाठीं जो त्याग करीत असतात, जी घस सोशीत असतात व जे श्रम काढतात, ते पाहतांच मन कौतुकानें भरून जातें. मडगांव शिशिरोत्सवप्रिय आहे असें इतरेजन म्हणोत

परंतु लेखकाला मात्र मडगांवांत युद्धप्रवृत्ति – व तीदेखील अडचणींशीं टक्कर देऊन त्यांतूनच धडाडीनें मार्ग काढणारी युद्धप्रवृत्ति दिसते.

समाजाच्या कार्यकर्त्यांनीं ही प्रवृत्ति वारंवार आत्मसात् करून उपयोगिली आहे. याच प्रवृत्तीच्या जोरावर व वर उल्लेखिलेल्या मनोभावनेच्या सहाय्यानें समाज आजवरच्या अडचणींतूनही प्रगतच होत आला आहे.

गेल्या पंचवीस वर्षांत समाजाचें कार्य जें एकसारखें चालत आलें, त्याच्या कार्यांत खंड पडला नाहीं, किंवा त्याच्या प्रगतींत नागमोडी रेषा उत्पन्न झाल्या नाहींत त्याचें कारण काय तें पाहून हा लेख संपवूं.

असें सातत्य असायला संस्थांना तन, मन व धन हीं तीन साधनें सारखीं व सारख्याच शक्तीचीं असावीं लागतात. हीं तीन अंगें संस्थापक व चालक वर्गांत भक्कम होतीं. तनूनें समाजगृह झाडण्यापासून समारंभांत खुर्च्या वगैरे ठेवण्याचेंही शारीरिक श्रमाचें काम इतर कामांबरोबरच पत्करलें, मनानें वार्षिकोत्सवाचीं व्याख्यानें तयार करण्यापासून सुतानें स्वर्ग गांठून समाजाच्या इमारतीसाठीं जागा मिळविण्यापर्यंत कामगिरी केली. व धनानें स्वप्रांतीं परप्रांतीं आपहस्तें परहस्तें फंड जमविला.

रजत-महोत्सव करण्याचें भाग्य लाभलेल्या संस्था गोमंतकांत थोड्याच आहेत. **समाजा**ची तनमनधन संपत्ति आजच्याप्रमाणेंच पुढें हीरक-महोत्सव साजरा करण्यासाठीं संस्थापक वर्गांत कायम राहो अशी प्रार्थना करून हा लांबलेला लेख संपविण्यांत येत आहे.

ಚಿತ್ರ ೨೦ ಗಿರಿಜಾಪತಿ ಅಳಿಯ

गोमंतकीयांची साहित्यसेवा

श्री. सुभाष रामकृष्ण सामंत

मानवी कर्तृत्वाचीं क्षेत्रें विविध असलीं तरी त्यांतील साहित्यक्षेत्रांतील त्याच्या कर्तृत्वाची महति फार आहे. कारण, तेवढें चिरंजीवित्व दुसऱ्या कोणत्याही कर्तृत्वाला नाहीं. जे समाज इतिहासकालांत नामशेष झाले त्यांपैकीं ज्यांनीं आपल्या साहित्यकृति मागें ठेवल्या त्यांनीं आपली स्मृतीच तेवढी मागें ठेविली असें न होतां आपली सांस्कृतिक सत्ताही मागें ठेविली असें होतें. आणि त्यामुळें ते समाज सदैव आदराचे विषय होऊन राहतात. ग्रीक, रोमन, संस्कृत, इत्यादिक साहित्यांतील कृतींमुळेंच ते ते समाज आज जगांत आदरणीय गणले जात आहेत.

गोमंतकीय समाजाच्या कर्तृत्वाचा आढावा घेणाऱ्या ह्या निबंधमालिकेंत त्याच्या साहित्यविषयक कर्तबगारीचा आढावा घेण्याचें महत्व वर दिलेल्या कारणामुळेंही स्पष्ट होणारें आहे. हा आढावा केवळ पांचपंचवीस वर्षांपुरता घेण्यानें त्याचें खरें स्वरूप आपल्याला कळणार नाहीं. त्याच्या जवळजवळ शात असलेल्या एकंदर साहित्याचा संक्षेपतः आढावा काढण्यानेंच तें कार्य विशेष मार्गदर्शक होणारें आहे. आणि म्हणूनच ह्या आढावा घ्यावयाच्या कालाची मर्यादा गोमंतकांतील शात अशा सर्व साहित्याच्या उगमाशीं नेऊन भिडविण्याची ह्या लेखांत खटपट केली आहे. असो.

'गोमंतकाची साहित्यांतील कर्तबगारी अगदीं अलीकडील असली पाहिजे. मराठी शाळांचा प्रसार, महाराष्ट्रांतील वृत्तपत्रांची व मासिकांची ओळख व वाचन, महाराष्ट्रांतील लेखकांची किंवा व्याख्यात्यांची ये-जा, वाचनालयांची व इतर तत्सदृश संस्थांची स्थापना, इत्यादिक गेल्या अर्ध्या पाव शतकांतील वाऱ्यामीन उलाढालींतूनच गोमंतकसाहित्याची वाढच नव्हे तर उत्पत्तिही झाली असली पाहिजे;' असें अंतःकरणपूर्वक मानणारा महाराष्ट्रांत बराच मोठा वर्ग आहे. अशा वर्गाला, शिवाजीच्या जन्मापूर्वीही पांचपंचवीस वर्षें गोमंतकीय साहित्यिकांनीं निर्मिलेलें उत्कृष्ट साहित्य परिचित झाल्यास, आणि त्याची सुरसता कळून आल्यास केवढें सानंदाश्चर्य वाटेल बरें! आणि त्या काळींही असे साहित्यिक अगदींच विरळा होते किंवा त्या साहित्याची चहा करण्याला येथील समाज मागासलेला किंवा अरसिक होता असेंही नव्हे. तर दोहोंचीही भरती, महाराष्ट्रांतील इतर भागांतल्या तत्कालीन समाजाशीं तुलना केल्यास, गोमंतकांतच अधिक आढळली असती. ह्याला कारणें अशीं कीं, पोर्तुगिजांच्या जुलूमजबरदस्तीचें एक शतक ओसरल्यावर, पुढचा म्हणजे सतराव्या शतकांतील काल गोमंतकांतील समाजाला हिंदुस्थानांतील इतर भागापेक्षां कमी घाल-

मेलीचा व विशेष स्वास्थ्याचा सर्व मेळा होता. भूमीची स्वाभाविक समृद्धता; जनसंख्येची मर्यादित वाढ—कारण तत्पूर्वी बरीच गोमंतकीय संख्या परागंदा झालेली होती. —मराठे-मुसलमान यांच्यांतील यादवीमुळें महाराष्ट्रभर जें अस्थैर्य माजलें होतें त्यापासून अलिप्तता; आणि एकाच स्वरूपाची व स्थिर अशी राजवट इत्यादि कारणसमुच्चयानें गोमंतकांत राहिलेली, किंवा पुनरेव परत आलेली जी ब्राह्मणवैश्यादिक वर्गांतील वरचढ मंडळी, त्यांनीं आपल्या व्यापाराच्या व जमीनदारीच्या, त्याचप्रमाणें विद्याव्यासंगाच्या पारंगततेमुळें आपलें गेलेलें बस्तान पुनश्च बरेंच बसविलें होतें; आणि त्या योगानें लाभणारें जें सरकारदरबारांतील महत्व तेंही संपादन केलें होतें. अर्थात् अशा समाजाचें लक्ष पूर्ववत् आपल्या उच्च संस्कृतीकडे ओढणें आणि तिचा पुनरुद्धार करण्याकडे लागणें किंवा त्यांत रमणें हें अगदीं स्वाभाविक होतें. आणि अगदीं साहजिकपणेंच तें घडून येऊं लागलेंही. ह्याचेंच द्विविध फळ म्हणजे गोमंतकांत त्या कालीं आलेलें कविजनांचें पीक आणि महाराष्ट्रांतील तत्कालीन कवींच्या कृतींची होऊं लागलेली प्रसृति हें होय. ही दुहेरी वाङ्मयसेवा किंवा हें वाङ्मयसेवेचें दुहेरी स्वरूप फार महत्त्वाचें आहे. ह्यानेंच गोमंतकीय साहित्यिकांची परंपरा एकपक्षीं वर्तमानकालाशीं आणून भिडविली तर, दुसरे पक्षीं, महाराष्ट्रसाहित्याशीं गोमंतकीय समाज निगडित झालेला जो आज दिसून येत आहे तो तसा होण्यास सहाय्य केलें. हा प्रकार घडून आला नसता तर खिस्ती समाजाप्रमाणें हिंदु समाजही स्वसाहित्यपराङ्मुख व त्या प्रमाणांत स्वसंस्कृतिपराङ्मुख बनत जाण्याचा बराच संभव होता.

अशा ह्या संधिकालांत ज्या कविसाहित्यिकांनीं साहित्यद्वारा समाजाची सेवा केली त्यांत तुकारामबाबा वर्दे ह्यांचा उल्लेख प्रथम केला पाहिजे. तत्पूर्वकालीन गोमंतकसाहित्य कांहीं निर्माण झालें असल्यास तें काय असावें हें कळणें आज दुरापास्त आहे. कवि बाबा वर्दे ह्यांचें लेखन इ. स. १६१० च्या मागेंपुढें झालें असावें. त्यापूर्वीच्या शंभर वर्षांत गोमंतकांत पोर्तुगिजांनीं धर्मप्रसाराच्या निमित्तानें पुष्कळच ग्रंथसाहित्य भस्मसात् केल्याची गोष्ट सर्वश्रुतच आहे. त्यांत गोमंतकसाहित्य कांहीं असल्यास नष्ट झालें असेलही. एवढी गोष्ट खरी कीं, जो साहित्यिक क्षेत्रांतील द्विविध कामगिरी वर वर्णन केली आहे ती, त्या मध्यंतरींच्या धुमकुळापूर्वी चालू असावी आणि ज्याप्रमाणें पुढील काळांत वामन, मोरोपंत, मुक्तेश्वर, रामदास प्रभृति तत्तत्कालीन कविकृतींची प्रसृति व अनुकृति गोमंतकांत जारी असल्याचें दिसून येतें, त्याचप्रमाणें तत्पूर्वकालीन ज्ञानेश्वर, नामदेव, मुकुंदराज प्रभृति आद्य कवींच्या कृतींचा व्यासंग व अनुकारही गोमंतकांत रूढ झाला असावा, असें मानल्यावांचून पुढच्या साहित्याच्या उद्गमाची संगतीच लागत नाहीं. एवढें तर्कावर विसंबून म्हटल्यावर आतां प्रत्यक्ष अस्तित्वांत असलेल्या साहित्याकडे वळूं.

अशा तऱ्हेनें प्रस्तुत उपलब्ध असणाऱ्या साहित्यांत वर उल्लेख केलेल्या वरें कवींनाच बहुशः आद्यकवित्वाचा गोमंतकापुरता मान मिळाला पाहिजे. ह्यांची प्रकाशित पण मुखोद्गत अशी बरीच कविता असून प्रकाशित कवितेंत ह्यांच्या 'सुभाषितरत्नावली'चा बोलबाला बराच आहे. ही भर्तृहरीच्या शतकत्रयाचें मराठी भाषेतील समश्लोकी भाषांतर होय. पण वामनपांडितांपेक्षांही बाबांचें भाषांतरांतील कौशल्य कित्येक विद्वन्मंडळींना अधिक वाखाणण्यासारखें वाटणारें आहे. ह्यांची इतर कविताही प्रासादिक असून पुन्हा विद्वत्त्वदर्शक आणि अलंकारिक असल्याची ख्याति आहे. ही साहित्यसेवेची वाट बाबांच्या मागून बरीच चोखाळली गेल्याचें दिसून येतें.

ह्याच मालिकेंतील पण भक्तिरसात्मक काव्याबद्दल लोकप्रियता लाभलेले कवि नायकस्वामी नांवानें नांवाजले गेले. हे संन्यस्त वृत्तीनें राहणारे असून इ. स. १६५० सालीं समाधिस्थ झाले. ह्यांनीं शिवगीतेवर कविताबद्ध टीका लिहिली आहे. ह्यांचीं भक्तिपर पदें गोमतकांत उत्सवांत गायिलीं जात; व अजून गातात. त्यांवरून त्यांची सुरसता टिकाऊ असली पाहिजे हें उघड होतें.

रा. पांगारकर ह्यांनीं ज्यांच्या कविता आपल्या 'मोरोपंतचरित्रांत' उद्धृत केल्या आहेत, आणि ज्यांचीं 'शुकरंभासंवाद,' 'कबीरकथा', 'वामनचरित्र' इत्यादि आर्याबद्ध प्रकरणें प्रसिद्ध आहेत ते केरकिर विठ्ठल कवि हे ह्याच परंपरेंतील आणखी एक साहित्यिक होत. 'द्रौपदीस्वयंवरा'चे कर्ते पांडोबा कैसरे ह्यांची कविताही तशीच आकर्षक असून, समर्पक शब्दयोजना, वृत्तांची शुद्धता, अनुप्रास, वर्णनशैली इ. आपल्या गुणांनीं ती वाचकांना चटका लावणारी असल्याबद्दल श्री. य. सू. सरदेसाई ह्या सहृदय लेखकांनीं तिची फार तारीफ केली आहे. कैसरे हेही त्याच परंपरेतील कवि होत. 'सुवृत्तमुक्तामाला' काव्याचे कर्ते हरिपंडित हे पुढील काळीं होऊन गेलेले पांडोबा दुभाषी, लक्ष्मण पांडुरंग केंकरे, हिरबा नाईक हेही आपल्यापरी कवित्वाबद्दल बरीच कीर्ति व बऱ्याच काव्यकृति मागें ठेवून गेलेले पूर्वपरंपरेंतील साहित्यिक होते. ह्यांपैकीं पंडित ह्यांचा काल अठराव्या शतकाचा मध्य होय. बाकीचे कवि हे त्यानंतरच्या कालांत चमकून गेले. ही परंपरा थेट ह्या शतकाच्या द्वारापर्यंत आणून भिडविणारे कवि म्हणजे 'अनेकार्थध्वनिमंजरी'चे' कर्ते पेडणें येथील राघोबा प्रभु देसाई, 'दत्तजन्मकथा'कर्ते नारायण रघुनाथ देसाई, 'महाडदळची यात्रा' ह्या वर्णनात्मक काव्याचे कर्ते माधव पांडुरंग वैद्य, पेडणें येथील रावराजे ह्यांच्या चिरंजीवांच्या व्रतबंधोत्सवाचें काव्यमय सुंदर वर्णन ज्यांच्या लेखणीनें लिहिलें ते पणशीकरशास्त्री इ. इ. कवि होत. पणशीकरशास्त्री ह्यांच्या हातून वरील सुरस काव्याशिवाय पुष्कळ नीतिपर आणि समाजजागृतिकर अशी कविता लिहिली गेली आहे. ह्यांची भाषा शुद्ध व ओघवती असून सहजकवित्वदर्शक अशी आहे. विष्णु रंगाजी शेळेडकर, संतबाबा ह्या

कवाच्या 'पूर्णसार' ग्रंथाचे प्रकाशक, ह्यांनीही 'पद्यसुंदरी', 'देवचरितामृत', चंद्रेश्वरमहात्म्य इत्यादि काव्यलेखनानें व प्रकाशनानें गोमंतकीय साहित्यसेवेंत भर घालण्याचें श्रेय संपादिलें आहे. जिवबादादा बक्षींचें चरित्र लिहिणारे काकोडकर; रानडेतेलगांचीं आर्याबद्ध चरित्रें लिहिणारे भांडारे; भारदस्त, शुद्ध, अशी स्फुट कविता लिहिणारे देशपांडे ऊर्फ 'वज्रदेही' इत्यादि कवींनीं जुनी कविता व अर्वाचीन कविता ह्यांना जोडणाऱ्या दुव्याच्या स्वरूपाची कामगिरी केलेली आहे.

बळवंत पांडुरंग ऊर्फ अण्णा किर्लोस्कर यांना नाट्यस्फूर्ति देणारे ह. भ. कृष्णभट्ट बांदकर ह्यांचा उल्लेख स्वतंत्रपणें केला पाहिजे; ह्यांनीं नाटकें रचून, तीं आपल्या गांवच्या मंडळीकडून बसवून त्यांचे प्रयोग करण्याचें कामही अण्णा किर्लोस्करांपूर्वीच सुरू केलें होतें. कृष्णभट्ट व अण्णा यांच्यामध्यें पुरातन नाट्यकलेचा अर्वाचीन तऱ्हेनें उद्धार करण्याच्या बाबतींत विचारविनिमयही होऊन गेल्याची माहिती स्थानिक लोकांस आहे. कृष्णभट्टांच्या गोड चालींच्या भावनोत्कट कवनांची चहा गोमंतकीय भजनी मंडळींत अजूनही फार आहे. आणि त्यांची रससंपन्नता लक्षांत घेतां ती कमी होण्याचीही शक्यता नाहीं. यांचा 'स्वात्मतत्वामृत' हा वेदांतपर छोटा ग्रंथ विषय सुलभ तऱ्हेनें आणि काव्यवाणीनें वर्णिणारा अवश्य वाचनीय आहे.

सहेतुक अर्थात् विशिष्ट हेतुपर कविता करणारे कवि या नात्यानीं श्री. रामचंद्र पांडुरंग राजवैद्य—'दादा वैद्य' या नांवानें वैद्यकीय क्षेत्रांत गोमंतकांत ज्यांचें नांव आबालवृद्धांस ज्ञात आहे ते; श्री. रामचंद्र वामन नाईक करंडेशास्त्री—ज्यांना शास्त्रीबुवा याच नांवानें जनता संबोधीत आली आहे ते; 'स्वयंसेवक' मासिकाचे संपादक श्री. वि. का. प्रियोळकर—'देमांदमहात्म्य' या उपहासात्मक काव्याचे कर्ते, आणि, प्रसंगपरत्वें ज्यांनीं समाजांतील वादळी चळवळींवर आपल्या काव्यस्फूर्तीनें विनोदी ओव्यांचे फवारे सोडले आहेत असे कांहीं निनांवी कवि, यांचा उल्लेख करणें अवश्य आहे. यांपैकीं वैद्य यांनीं समाजांतील अनेक व्यंगस्थलांवर कवितारूपानें टीका करून त्यांचें हिडीस स्वरूप समाजाला दाखवून दिलें आहे. करंडे शास्त्री यांनीं त्याहून गंभीर स्वरूपानें समाजजागृतिपर अंसें आपलें कवित्व प्रगट करून आणि त्यांतही श्लेषयमकादि गुणांनीं आपली विद्वत्ता तशीच निरीक्षणशक्तीही प्रत्ययाला आणून दिली आहे.

'देमांदमाहात्म्य' हें काव्यही उल्लेखनीय आहे. प्रादेशिक कथांप्रमाणें प्रादेशिक काव्य, असें ह्याचें एक वैशिष्ट्य दाखविण्यासारखें आहे. इतर प्रसंगोपात्त लिहिलीं गेलेलीं व समाजांत प्रसार पावलेलीं विडंबनात्मक किंवा उपहासात्मक काव्यप्रकरणें हीं त्या त्या प्रसंगापुरतींच महत्वाचीं होत. त्या प्रसंगामागून त्यांतील रहस्य वाचकांना कळणेंही नाहीं व रमविणेंही शक्य नाहीं. परंतु 'देमांदमाहात्म्य' ह्याची गोष्ट तशी नाहीं. त्यांतील विडंबन-विषय जो कजेखोरपणा

तो सार्वत्रिक आणि सार्वकालिक अशा स्वरूपाचा आहे. अर्थात्, जोंवर समाजांत कजेदलाली चालू आहे—आणि ती नाहींशी होणें नाहीं, फार तर तिचें रूपांतर होईल आणि तें फक्त राजवट बदलेल तेव्हांच,—तोंवर अशा काव्यांची रुचि वाचकांना वाटल्याशिवांचून राहाणार नाहीं. असें काव्य भिन्न लोकस्थितीच्या व भिन्न कायदेकानूंच्या क्षेत्रांत,अर्थात् ह्या प्रांताबाहेर मात्र वाचकांना गम्य किंवा रम्य वाटणार नाहीं एवढें खरें.

गोमंतकीय साहित्यवृक्षाच्या अशा या जून पण जीवस काव्यशाखेला नवनवी पालवी येणें आणि त्यांतून काव्यकलिका उमलणें हा क्रम तसाच चालू आहे ही समाधानाची गोष्ट होय. सरदेसाई यांची 'हिरवळ' बोरकर यांची 'प्रतिभा' आणि कारे यांचा 'नंदादीप' इत्यादिक कवितासंग्रह हे अशा पालवीचे, कलिकांचे आणि पुष्पांचे नमुने होत. श्री. कारे यांचा 'नंदादीप' हा कवितासंग्रह तर कोणत्याही महाराष्ट्रीय अर्वाचीन कवीच्या कवितांशीं हृदयंगमतेंत स्पर्धा करणारा आहे. गोमंतकीय जनता अद्यापि तेवढीशी अर्वाचीन काव्याभिमुख झालेली नाहीं. पण ती तशी होऊं लागली आहे. आणि ती जसजशी तशी होत जाईल तसतशी तिला अभिनव काव्यप्रकाराची अधिकाधिक गोडी वाटणार आहे.

साहित्याच्या क्षेत्रांत खुद्द महाराष्ट्रांतच नवीन दृष्टिकोन उत्पन्न होत आहेत. सहेतुक साहित्याऐवजीं निर्हेतुक साहित्य, म्हणजेच 'साहित्याकरतां साहित्य' (ज्याप्रमाणें कलेकरतां कला) अशा दृष्टीनें पाहाणारा तो दृष्टिकोण होय. अशा साहित्यांत भावनाविष्कार हाच साध्याच्या ठिकाणीं असतो. चारित्र्यानें भावनांवर मिळविलेला जय हें त्याचें साध्य नसतें. भावनाविष्कार ज्या मानानें साधला त्या मानानें साहित्यकृति हृदयंगम झाली असें मानण्यांत येऊं लागलें आहे. हृदयाच्या भावात्मक उसळ्या जशा उठतील तशा उघड करणें, हें ह्या अभिनव साहित्याचें स्वरूप आहे. हें जसें काव्यांत तसें गद्यांतही प्रगट होऊं लागलें आहे. आणि तें जसें इतरत्र महाराष्ट्रांत तसेंच तें गोमंतकांतही होत आहे.

ज्यांना गोमंतकांतील अगदीं नव्या वाङ्मयाकडे वळायाचें असेल त्यानें ही वर वर्णन केलेली स्थिति किंवा साहित्यांतील सूक्ष्म क्रांति लक्षांत घेतली पाहिजे. ती पद्याला तशी गद्यालाही लागू आहे.

गोमंतकांतील पद्यसाहित्याप्रमाणें गद्यसाहित्यालाही इतिहास आहे. आणि तो इतर महाराष्ट्रांतील साहित्याशीं समांतरगतिक असा आहे. म्हणजे जीं जीं स्थित्यंतरें त्या साहित्यांत घडून आलीं तींच प्रांतांतरानें ह्या साहित्यांतही घडून आलीं आहेत. साहित्यांत कोठेंही पाहूं गेल्यास पद्य हें गद्यापेक्षां वडिलधारेंच होय. आणि तसेंच तें गोव्यांतही असल्यानें पद्याप्रमाणें गद्य साहित्य शतका–दीडशतकापलीकडचें उपलब्ध नाहीं. नाहीं म्हणावयाला प्रसिद्ध विद्वद्रत्न श्रीमहेश्वरभट्ट सुखठणकर ह्यांचें गद्य लेखन इ. स. १७५० च्या मानाचें झालेलें उपलब्ध आहे. ह्या जाड्या संस्कृतः

पंडितांनीं अमरकोशाची त्या काळांत मराठी टीका केली आणि मोरोपंतकृत मंत्र-भागवताची संस्कृत टीका लिहिली. याहून त्यांचा खरा साहित्यिक प्रयत्न म्हणजे त्यांनीं केलेली 'गीतगोविंद' या परमसुंदर, संस्कृतांतील विख्यात काव्याची महाराष्ट्र टीका ही होय. गीतगोविंदसारख्या रंगेल काव्याचें भाषांतर करणाऱ्या याच पंडितांनीं याच काळीं वेदांत विषयाची ओळखही महाराष्ट्रवाचकांस करून देण्याकरतां आचार्यांच्या 'वाक्सुधे'वर 'पानपात्रचषक' नांवानें महाराष्ट्रटीकाही केली. गोमंतकांतील गद्य-साहित्याचें स्वतंत्र अस्तित्व आणि ऐतिहासिक परंपरा दाखविणाऱ्या या महेश्वर-भट्टांच्या कृति खरोखरच वाखाणण्यासारख्या नाहींत असें कोण म्हणेल? व्याकरण विषयावरील प्रख्यात 'कौमुदी' या संस्कृत ग्रंथाचें मराठी भाषांतर करण्याचाही उपक्रम त्या कालीं या विद्वानांनीं केला होता याहून त्यांच्या साहित्यविषयक चौरस प्रयत्नाची साक्ष ती आणखी कोणती?

ह्यांच्यामागून लगोलग झालेलें गद्य-साहित्य ज्ञात नाहीं. परंतु त्यांच्यामागून साऊण शतकानें म्हणजे स. १८१९ मध्यें गोमंतकांत मराठी व्याकरण तयार झाल्याचा उल्लेख आहे. हें सखाराम नारायण वाघ नांवाच्या गृहस्थांनीं तयार केलें होतें. मराठी व्याकरणग्रंथांत हेंच पुस्तक बहुधा पहिलें असावें. हा ग्रंथ हस्तलिखित स्थितींतच राहिला आणि त्याच स्वरूपांत प्रसार पावला असावा. कारण त्यावेळीं मराठी टाइप निघाला नव्हता. इ. स. १८४७ सालीं गोमंतकांत दोन क्रमिक पुस्तकें मराठींत छापून सरकारी खर्चानें प्रसिद्ध करण्यांत आलीं होतीं. यांचें कर्तृत्व प्रो. सूर्याजी आनंदराव देशपांडे या मराठी व पोर्तुगीज भाषांत सारखेंच प्रभुत्व संपादन केलेल्या विद्वानांकडे होतें. याच विद्वानांनीं १८७५ सालीं पोर्तुगीज भाषेंत मराठी भाषेचा व्याकरण-ग्रंथ लिहून तो सरकारमार्फत प्रसिद्ध करविला. त्याचीं बारीक टाइपाचीं तीनशेंहून जास्ती पृष्ठें आहेत. याच मासल्याचा या विद्वानांनीं अंशतः पार पाडलेला प्रचंड ज्ञानोद्योग म्हणजे 'मराठी–पोर्तुगीज कोश' हा होय. यांत ५३ हजारांवर शब्द आले आहेत. कित्येक शब्दांचा अर्थविस्तार शंभर शंभर ओळींवर गेला आहे. या ग्रंथाच्या दोन भागांपैकीं एक भाग, 'अ'पासून 'थ'-पर्यंत अक्षरानुक्रमानें आलेल्या शब्दांचा असा सरकारनें त्या काळीं छापून काढला. पण पुढचा अप्रकाशितच राहिला. हें काम जसें उद्योगाचें तसेंच प्रचंड साहित्याभिमानाचें दर्शक नव्हे असें कोण म्हणेल? असा अद्वितीय विद्वान्, सरकारी मानमान्यता पावलेला, आणि आपल्या संस्कृतीचा आणि साहित्याचा अभिमानी पुरुष गोमंतकांत तदनंतर दुसरा झालाच नाहीं असें म्हटलें पाहिजे.

स्वतः खिस्ती असूनही महाराष्ट्र–साहित्याविषयीं जबरदस्त आवड दाखविण्यांत आणि तत्प्रीत्यर्थ झीज सोसून कष्ट करण्यांत ज्यांनीं अनेक हिंदूंनाही माना खालीं घालावयास लावल्या असतील अशा बारांव द कुंबारजुव (कुंभारजुव्याचे बॅरन) सारख्या

गृहस्थाचें गोमंतकांतील उदाहरण हें अद्वितीयच म्हणावें लागेल. या खानदानींतल्या खिस्ती गृहस्थांनीं मराठी छापखाना स्वखर्चानें काढून त्यांत रामविजयासारखे ग्रंथ छापिले; सरकारकडून त्या वेळीं न झालेली मराठी शाळा उघडण्याची कामगिरी अंशतः त्याच्याकडून करविली; लोकांनीं आपसांत मराठी भाषा बोलण्याचा परिपाठ ठेवावा याकरतां, आणि संस्कृत भाषेच्या अध्ययनाध्यापनार्थ संस्था उभारली जावी म्हणून करतां स्वतः अंगमेहनतपूर्वक प्रचार केला; ज्यांना मराठी भाषेचें ज्ञान दुरापास्त अशा निकृष्ट खिस्ती वर्गाकरतां कोंकणी भाषेंत प्राथमिक पुस्तकरचना करविली; इ. इ. यांच्या कळकळीचीं आणि निःस्वार्थ बुद्धीचीं कृत्यें ऐकून कोणा गोमंतकीय साहित्यिकाला त्यांच्याविषयीं पूज्यभाव आणि अभिमान वाटल्यावांचून राहील? त्यांच्या या मेहनतीनें त्या काळांत म्हणजे गेल्या शतकाच्या उत्तरार्धांत मराठीचें बस्तान गोव्यांत नीट बसविण्याच्या कामीं तत्कालीन वाङ्मयप्रेमी लोकांना त्यांचें सहाय्य अमोल झालें असलें पाहिजे यांत शंका नाहीं. याच कुंभारजुवें गांवांत पुढें म्हणजे या शतकाच्या सुरवातीला 'सत्संग' मासिकाच्या छत्राखालीं जी वाङ्मयसेवक मंडळी एकत्र झाली व त्यांनी जो महाराष्ट्र-साहित्याप्रीत्यर्थ वाखाणण्यासारखा प्रयत्न केला आणि गोमंतकांतील उत्कृष्ट मराठी साहित्याला सुरवात करून दिली, त्या मंडळीच्या त्या उद्योगाला ती भूमि तयार करून ठेवण्याचें कार्य याच महाभागाच्या पूर्वप्रयत्नांनीं करून ठेवलें असलें पाहिजे, असें म्हटल्यावांचून रहावत नाहीं.

चहा आणि साहित्य यांची सारखीच स्वस्ताई झालेल्या या काळांत, पूर्वी अल्पशाही साहित्यिक चकमकीनें समाजांत केवढी खळबळ उडे, आणि लहानशाही साहित्यकृतीचा समाजजागृतीच्या किंवा समाजचित्तवेधाच्या दृष्टीनें कसा जाज्वल्य मात्रेच्या वळशाप्रमाणें उपयोग होई, याची चांगलीशी कल्पना येणें शक्य नाहीं. आणि म्हणूनच, 'स्तवनार्थ निबंध' या नांवानें जो एक व्याजोक्तियुक्त निबंध त्या काळीं एका पोर्तुगीज उच्च न्यायाधिकाऱ्याच्या हिंदु धर्माच्या आणि चालीरीतींच्या कुचेष्टेच्या टीकेला प्रतिटीका या अर्थानें लिहिला गेला, त्याचें महत्त्व आज वर्णूनही कळणार नाहीं. मूळांत हें प्रतिटीकारूपी उत्तर पोर्तुगीज भाषेंत लिहिलें गेलें होतें व त्याचें कर्तृत्व गंगाराम प्रभु सिनारी नामक गृहस्थांकडे होतें असें कळतें. वरील 'स्तवनार्थ निबंध' हा मराठी तर्जुमा दुसऱ्या एका गृहस्थानें केला होता. ही जी टीका-प्रतिटीकारूपी लहानशीच चकमक उडाली ती आपल्या समाजांत स्वत्वविषयक जागृति होऊं लागल्याची आणि पोर्तुगीज निंदकांस उत्तरें देण्याची धमक अंगीं आल्याची सूचक होय. याच काळांत महाराष्ट्रांतील स्वाभिमानी साहित्ययुगाला सुरवात झाली होती. हें साहित्ययुग बहुतेक नियतकालिक वाङ्मयाच्या रूपानें चमकलें. जसें महाराष्ट्रांत तसें गोमंतकांतही समाजसुधारणेच्छु किंवा देशसुधारणेच्छु छापाचें हें साहित्य

एकसमयावच्छेदेंकरून प्रगट होऊं लागलें होतें. फरक एवढाच कीं, महाराष्ट्राच्या महत्क्षेत्रामुळें त्यांचें स्वरूप आणि कार्य मोठें होतें आणि त्या कार्याचे धुरंधरही तसेच महत्तर होते; आणि गोमंतकाच्या क्षेत्रमर्यादांमुळें त्यांचें कार्य लहान व कर्तेही लघुतर होते. परंतु, ध्येय आणि मार्ग यांतील सादृश्य मात्र कोणालाही सहज कळून येण्यासारखें होतें.

अशा या चळवळी साहित्याच्या काळांत गोमंतकांत अनेक नियतकालिकें जन्माला आलीं. आणि समाजसुधारणेकरतां किंवा देशसुधारणेकरतां धडपडूं लागलीं. परिस्थितीच्या प्रतिकूलतेविरुद्ध जन्माला येणारीं हीं नियतकालिकें परिस्थितीच्या प्रतिकूलतेंतच लयालाही जात. पण त्यांच्या 'पुनरपि जननं पुनरपि मरणं' क्रमाला मात्र खंड पडत नसे. तत्कालीन परिस्थितीही त्यांच्या वाढीला विघातक होत असे. त्यामुळें बहुतेकांनीं परिस्थिति-जयद्रथाच्या लाथा खाऊन अभिमन्यूप्रमाणें धारातीर्थीं देह ठेवले! ह्यांच्या नुसत्या नांवांचा उल्लेख केला तरीही त्यांचें ध्येय आणि कर्त्यांचें साध्य व तळमळ हीं दिसून येतात. १८७२ सालीं जन्मलेलें पहिलें नियतकालिक 'देशसुधारणेच्छु' ह्याचे दोन जन्म व दोन मृत्यु झाले! पहिल्या जन्मांत हें मासिक रूपांत अवतरलें. पण आपल्या लांबलचक नांवाच्या अक्षरसंख्येच्या अध्यर्धानेंही महिने त्यानें पाहिले नाहींत. संपादक आ. पु. सुखठणकर ह्यांनीं ध्येय न सोडतां पुनश्च चारपांच वर्षांनीं त्याला साप्ताहिक स्वरूपांत जन्म दिला आणि एक वर्षाच्या आंत त्याचा मृत्युही पाहिला. त्यानंतरचा 'गोवामित्र' १८८२ सालीं जन्मला. आणि ८३ साल धड न पाहतांच पडला. 'गोवात्म्या'नें १८८५ सालीं जडदेह धारण केला आणि त्यानें चार वर्षें अवतारकार्य करून देह ठेवला! यालाच समकालीन असें गोव्याच्या उत्तरविभागांत 'गोवापंच' या नामधेयानें आणखी एक साप्ताहिक लोकजागृति कशी घडवून आणावी याच्या पंचाइतीनें जन्मलें. यालाही चारपांच वर्षांनीं जगण्याचीच पंचाईत पडूं लागून, तेंही गेलें. 'गोमांतक' या नांवानें १८९० सालीं आणखी एका मासिकानें जन्म घेतला आणि बारावा महिना न पाहतांच विसावा घेतला. या नियतकालिकांच्या या नुसत्या नांवांवरूनही त्यांतील साहित्य कोणत्या स्वरूपाचें असावें याची, आम्ही वर म्हटल्याप्रमाणें, वाचकांना कल्पना येईल. त्या सगळ्यांवरून एक गोष्ट मात्र स्पष्ट कळण्यासारखी आहे; आणि गोमंतक व महाराष्ट्र ह्यांचा अर्वाचीनकालीन इतिहास तुलनात्मक तऱ्हेनें जे पाहणारे असतील त्यांना एकदम स्पष्ट होणारी आहे; ती हीच कीं, महाराष्ट्रांत व गोमंतकांत त्या त्या काळीं त्या त्याच स्वरूपाच्या साहित्यिक चळवळी झाल्या आहेत. कारण महाराष्ट्रांतही वर वर्णिलेला काळ हा नियतकालिकरूपी साहित्यानें लोकजागृति व देशसुधारणा करण्याची खटपट करणाऱ्या साहित्याचा होता. यांत त्या त्या प्रांताला आत्मोन्नतीची लागलेली तळमळ दिसून येते. यशाचा

यशाचा विचार न करतां कार्याला वाहण्यांत वरील नियतकालिकांशिवाय 'आर्यबंधु', 'जॉर्नाल द नॉव्हश कोंकीश्तश्' (मराठी विभाग असलेलें पेडणें येथील भागांत १८८२ ते ८६ पर्यंत चार वर्षें चाललेलें साप्ताहिक), 'न्यायचक्षु', 'गाझेत द पेडणें' (पोर्तुगीज-मराठी पाक्षिक), 'कालिकादर्शन' 'हितचिंतक', 'सुदर्शन' इत्यादि नियतकालिकांनींही भाग घेतला. यांपैकीं 'सुदर्शन' मासिक १९०० सालीं जन्माला येऊन त्यानें त्या शतकाची अखेर झाली. आणि त्याबरोबरच तुलनात्मक दृष्ट्या ज्याला जुनें नियतकालिक साहित्य म्हणतां येईल तें संपलें.

नवीन शतकाला आणि त्याचबरोबर गोमंतकांतील वाङ्मयीन नवयुगाला सुरुवात झाल्याची साक्ष पूर्वी उल्लेख केलेल्या 'सत्संग' मासिकापासून झाली. सुरवातीपासूनच या मासिकानें एका विशिष्ट दर्जाचें आणि विशिष्ट दृष्टिकोनाचेंच लेखन प्रसिद्ध केलें. या मासिकाचें साहित्यिक कर्णधार श्री. रा. वा. नायक करंडे शास्त्री,--ज्यांचा मागें उल्लेख येऊन गेला आहे--हे होते. यांनीं या मासिकाचे द्वारें शुद्ध आणि स्फूर्तिप्रद मराठी भाषेचा नमुना लोकांपुढें ठेवला. यांत थोडथोड्या प्रमाणांत अनेकविध विषय येत. त्यांत राजकीय दृष्ट्या, सामाजिक दृष्ट्या आणि साहित्यिक दृष्ट्याही समाजाला योग्यायोग्य पारखण्याची दृष्टि यावी असेंच धोरण सांभाळून लेख येत असत. ह्याचा आकार मोठा नव्हता (आणि मोठमोठ्या आकाराच्या मासिकांची त्या. वेळीं शक्यताही नव्हती); कागदही साधाच असे; परंतु त्यांतील भाषेंत सोडाच, पण छपाईतसुद्धां दोष क्वचितच आढळे. या मासिकाचे अंक अजूनही वाचले तरी भाषेच्या व विचारांच्या दृष्टीनें ओजस्वी वाटतात. शास्त्रीबुवांशिवाय, श्री. द. ज. बोरकर, श्री. शां. कृ. सू. सरदेसाई हेही यांत लिहीत असत. आणि हे दोन्ही लेखक उत्कृष्ट दर्जाचें लेखन लिहीत. भारदस्त विनोद, भारदस्त टीका आणि भारदस्त विचार असे या छोटेखानी मासिकाएवढे गोमंतकांतील नंतरच्या किंवा पूर्वीच्या दुसऱ्या कोणत्याही नियतकालिकांत क्वचितच आले. या मासिकानें गोमंतकांतील साहित्याला नवी आणि चांगली दिशा लावली असें मानावयाला प्रत्यवाय नाहीं. या मासिकांतील कांहीं लेखांतून आपल्यावर प्रच्छन्नपणें टीका होत असल्याचा इंग्रज सरकारच्या तीक्ष्ण घ्राणेंद्रियाला किंचित् वास येऊं लागल्यानें त्या सरकारनें मासिकाला ब्रिटिश हिंदुस्थानांत बंदी केली. आणि त्यामुळें तेथील वर्गणीदार बुडाल्यानें मासिक बंद पडलें.

याच मासिकाच्या धोरणानें निघालेलीं आणि याच मासिकाच्या विचारांनीं भारलेल्या मंडळीनीं सुरुवातीला पुरस्कृत केलेलीं 'प्रभात' व 'भारत' हीं साप्ताहिकें होत. यांपैकीं पहिल्याचे संपादक डॉ. शिरगांवकर हे होते. यांची लोककल्याणाविषयींची आणि विशेषतः हिंदुसमाजाविषयींची तळमळ अपरंपार होती. परंतु यांच्यांत आणि इतर पुरस्कर्त्यांत कांहीं बाबतींत मतभेद उत्पन्न

होऊन त्यांच्या सहकार्याला हे मुकले. आणि त्या मंडळींनीं 'भारत' नांवाचें नवीन साप्ताहिक अस्तित्वांत आणलें. या पत्राचें धोरण विशेषतः गोमंतकांतील हिंदु समाजांत एकी घडवून आणून राजकीय पक्ष-संघटना घडवून आणावी आणि खिस्ती राजकीय पक्षांना शह द्यावा असें होतें. पुढें यांतही धोरणाबाबत मतभेद उत्पन्न होऊन तें पत्र अखेरीला श्री. हेगडे देसाई यांच्या एकाकी मालकीचें आणि धोरणाचें पोर्तुगीज—मराठी साप्ताहिक बनलें. ही घडामोड म्हणजे 'प्रभात' व भारत' वृत्तपत्राचे जन्म व स्थित्यंतरें, इ. रिपब्लिकच्या स्थापनेपासून तों जवळ जवळ महायुद्धाच्या अखेरपयतच्या सातआठ वर्षांच्या अवधींत घडून आली. ह काळ हिंदुस्थानांत विशेष घालमेलीचा गेला नाहीं. आणि गोमंतकांतही वैचारिक किंवा आचारिक अशी विशेष क्रांति कोणतीही त्या अवधींत घडून आली नाहीं. नाहीं म्हणावयाला रिपब्लिकच्या स्थापनेबरोबर कितीएक लोकांत ज्या आकांक्षा उत्पन्न झाल्या होत्या; त्यांचें वैफल्य मात्र हळूहळू दूरदर्शी लाकांना कळून येऊं लागलें होतें. तरी पण राजकीय पक्ष स्थापून राजकारणांत शिरकाव करून घेण्याच्या धोरणाचें लिखाण या काळांत बरेंच लिहिलें जात होतें. पण पुढें ही मुत्सद्देगिरीही व्यक्तिगत हितावाटे समाजहिताला गोत्यांत आणणारी होय, अशी जनतेची सकारण अकारण समजूत होत जाऊन तसल्या लिखाणाचें महत्त्व कमी होऊन छापही पडेनाशी झाली.

महाराष्ट्रांतही या कालावधींत असेच राजकीय पक्ष स्थापून त्या वाटे राजकीय हक्क संपादण्याची हमरीतुमरी लागलेली होती. मेमस्त राजकीय पक्ष, राष्ट्रीय राजकीय पक्ष, होमरूल लीगपक्ष, बेझंट होमरूल पक्ष, जिना होमरूलपक्ष, पूर्ण सहकारपक्ष, असे अनेक पक्षोपपक्ष आपापलीं शिष्टमंडळें घेऊन स्टेट सेक्रेटरीच्या लंडनच्या कचेरींत येरझारा घालीत होते. आणि तसल्या राजकीय धोरणाचें लिखाण इकडे लिहिलें जात होतें. परंतु थोड्याच कालावधीनंतर सरकारचें खरें स्वरूप कळून येऊन आणि मॉंटफोर्ड राजकीय सुधारणांपेक्षां रौलॅट ॲक्टाच्या वरवंट्याचींच दहशत अधिक लागून जनतेचे डोळे उघडले आणि एकदम निराळ्याच दिशेनें चळवळ सुरू होऊन गांधींच्या असहकारयुगाला आणि तद्दर्शी विचारांना जोराची चालना मिळाली व जुन्या धोरणाचें लिखाण मागें पडलें. आणि या नव्या धोरणाच्या लिखाणाला व साहित्याला उकळी फुटली. याच वेळीं गोमंतकांतही स्वसंस्कृतीसंबंधीं व स्वत्वासंबंधीं विशेष अभिमानपूर्वक जागृति करण्याकडे लोकांची प्रवृत्ति होत चालली होती; आणि तशा प्रकारचें लिखाण प्रसिद्ध होऊं लागलें होतें व लोकांना रुचूं लागलें होतें. या वेळीं झालेल्या व्याख्यानमालांतून किंवा अन्यत्र प्रकट होणारे विचार हे त्याचेच निदर्शक होते. याच विचारांच्या लाटेंतून पुढें सुकेरकर यांनीं सुरू केलेला श्री. द. व्यं. पै यांच्या संपादकत्वाखालीं प्रसिद्ध होणारा 'हिंदु' सुरू झाला. यांतील लेखनाचें धोरण वर सांगितलेल्या स्वरूपाचें

असे. याचा लोकमतावर परिणाम होत असावा असें म्हटल्यावांचून राहवत नाहीं. या वृत्तपत्राची महाराष्ट्रांतही चांगलीच प्रसिद्धि होती. परंतु गोमांतकाची मर्यादित वाचक किंवा वर्गणीदारसंख्या व प्रसाराचें मर्यादित क्षेत्र या योगानें हें पत्रही मालकांना पदरमोड करूनच चालवावें लागे. त्यामुळें तें सात आठ वर्षें चालविल्यावर मालकांना बंद करावें लागलें. तूर्त साप्ताहिक वृत्तपत्र या दृष्टीनें 'भारत' या मराठी –पोर्तुगीज वृत्तपत्राचाच तेवढा उल्लेख केला पाहिजे. याचें पोर्तुगीज सदर नेहमीं तडफदारपणेंच संपादक श्री. हेगडे देसाई यांनीं चालविलें आहे. मराठी सदरही अलीकडे श्री. महाबळेश्वरराव देसाई यांच्याकडे आल्यापासून विशेष एकसूत्रीपणानें चालविलें जात आहे. या पत्रानें वीसांपेक्षां जास्ती वर्षें पाहिल्याचें सर्व श्रेय त्याचे संपादक–मालक श्री. हेगडे देसाई यांच्याच चिकाटीला द्यावें लागेल. एकंदरींत मराठी वृत्तपत्रांत लेखांचें धोरण, भाषा, ध्येयदृष्टि वगैरे दृष्टींनीं 'हिंदु' साप्ताहिकालाच सर्वांत वरची जागा द्यावी लागेल. त्यानें हिंदुजनतेची दृष्टि स्पष्टपणें व कष्ट सोसून प्रगट केली.

आतां, वर वर्णिलेल्या लोकजागृतीवर वृत्तपत्रांशिवाय इतर स्वरूपाच्या साहित्याचीं नियतकालिकेंही अनेक प्रसिद्ध केलीं गेलीं व बंदही झालीं, त्यांत 'पथ्यबोध' हें मासिक आरोग्यविषयक व वैद्यकीय विषयांना वाहिलेलें आणि त्या दृष्टीनें समाजांतील दोष दाखविणारें असें होतें. हें प्रसिद्ध भिषग्वर दादासाहेब वैद्य हेच चालवीत होते. त्यांचा उल्लेख वर कवित्वासंबंधानें आला आहे. व्यवहारिक जनांना उमजेल अशा तऱ्हेच्या यांच्या विषयमांडणीनें हें मासिक बरेंच लोकप्रियता पावलें होतें. व बरेंच लोकोपयोगीही झालें होतें. हें १९०४ ते १९०८ पर्यंत चाललें. 'चित्ताकर्षण' हें मासिक श्री. शि. ब. राव यांनीं १९०६ साली सुरू केलें होतें. त्यांतील लेख व धोरण मनरंजनपर असत. यांत श्री. कारापुरकूर यांची 'मालिनी' नावाची व कै. जि. द. महात्मे यांची 'स्वदेशी चाकू' ह्या नांवाची अशा दोन कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या. हें दोन वर्षें चाललें. १९०९ ते १९१४ पर्यंत चाललेल्या 'प्राचीप्रभा' मासिकाचें धोरण विशेष गंभीर स्वरूपाचें होतें. याच्या पोर्तुगीज सदरांत हिंदी संस्कृतिविषयीं पोर्तुगीजांना योग्य ज्ञान व्हावें असें धोरण ठेवून लेखन येत असे. आणि मराठी सदरांतही अधून मधून श्री. द. वि. आपटे, इतिहाससंशोधक राजवाडे प्रभृतींचे लेख येत. याचें संचालकत्व श्री. दादासाहेब वैद्य यांच्याकडेच होतें व पोर्तुगीज सदराचें संपादन कार्य श्री. सी. वि. केरकर हे करीत असत. याच धोरणाचें 'विद्याप्रसार' मासिकही श्री. वैद्य यांनींच कांहीं काळ चालविलें होतें. यांत समाजसुधारणापर व शिक्षणविषयक लिखाण प्रसिद्ध होई. वर उल्लेख येऊन गेलेलें ' देमांदमाहात्म्य ' नांवाचें काव्य ज्यांतून प्रसिद्ध झालें त्या 'स्वयंसेवका'चा उल्लेखही वरील मासिकांच्या वर्गांत केला पाहिजे. यांत कित्येक महाराष्ट्रीयांचे

लेखही येत असत. सर्वसाधारणपणें यांतील लेखांचा दर्जा बरचा व त्यांची भाषा वगैरे चांगल्यापैकींच असे.

दरम्यानच्या कालांत 'प्रगति', 'गायक-मित्र', 'नापितोदय' इ. कांहीं ज्ञातिविशिष्ट धोरणाचीं नियतकालिकें जन्माला आलीं व कमजास्ती काळ चालून बंद झालीं. शिवाय, 'नवजीवन', 'सुबोध' इत्यादि मासिकें वाङ्मयप्रसारार्थ अवतीर्ण झालीं होतीं. ह्यांपैकीं दुसरें अलीकडील असून त्यानें नवीन तऱ्हेचें साहित्य-प्रसारांत आणण्याची खटपट केली. प्रस्तुत चालू असलेल्यांत 'कला', 'प्रभात', व 'भारतमित्र' ह्या मासिकांचा उल्लेख केला पाहिजे. 'कलेचें धोरण सर्वसाधारणतः नवमतवादी असून त्यांत सर्व महाराष्ट्रीय लेखकांच्या लघुकथा, कवितादि प्रसिद्ध होत असतात. चित्ताकर्षक किंवा संपादकांच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे 'कलात्मक, विचारप्रवर्तक आणि आटोपशीर' असेंच लिखाण या मासिकांत येत असतें. संपादकांची उमेद उत्तेजनार्ह आहे. हें श्री. एफ्. बाबुराव आगशीकर या तरुण गृहस्थांच्या संपादकत्वाखालीं आणि प्रकाशकत्वाखालीं चाललें आहे. 'प्रभात' मासिक हें त्याहून किंचित् निराळ्या धोरणानें चालविलें जात आहे. यांतील लेखकवर्ग बहुशः स्थानिक असून विषयही कित्येकदां स्थानिक स्वरूपाचे असतात. याचे मालक-संपादक श्री. पिसुर्लेकर यांची उमेदही वाखाणण्यासारखी आहे. 'भारतमित्र' मासिकही त्याचे संपादक श्री. नाईक यांनीं चिकाटीनें चालविलें आहे.

हा नियतकालिक साहित्याचा केवळ उडता उडता विचार झाला. यांत एक गोष्ट उघड झाल्यावांचून राहात नाहीं. आणि ती हीच कीं, तुलनात्मकदृष्ट्या पाहतां जें स्वरूप महाराष्ट्रांतील नियतकालिकांचें असे तेंच स्वरूप त्या त्या कालीं बहुशः गोमंतकांतील नियतकालिकांतील साहित्याचेंही असे. फक्त आकारमानांत आणि क्षेत्रमानांत मात्र स्वाभाविकपणेंच फरक राही. हाच प्रकार कमजास्ती प्रमाणांत ग्रंथरूपी साहित्यांतही दिसून येतो. ज्या वेळीं महाराष्ट्रांत शैक्षणिक पुस्तकांना सुरवात झाली, त्याचवेळीं ती गोमंतकांतही झाली. व त्याप्रमाणें क्रमिक पुस्तकें, व्याकरण, तसेंच गोमंतकाचा इतिहासही त्याकाळीं उपलब्ध असलेल्या माहितीप्रमाणें लिहिला गेला. हा इतिहास १८७३ सालीं रा. वागळे व दणाईत यांनीं लिहिला होता. त्यापूर्वीच्या कालांत एक गोमंतकाची बखर जुन्या काळीं बहुगुण कामत नामक संशोधकांनीं लिहिलेली वर उल्लेखिलेल्या 'प्राची-प्रभा' मासिकांत येऊन गेली आहे. याशिवाय कैवल्यपूर मठाचा इतिहास, सप्तकोटेश्वर देवस्थानचा इतिहास, वगैरे विशिष्ट स्थानांचे इतिहासही लिहिले गेले आहेत शांतादुर्गा देवस्थानचा इतिहासही असाच चांगल्याप्रकारें श्री. शेळडेकर बंधूनीं लिहिला आहे. अशाच मासल्याचे इतर कांहीं त्याच प्रमाणें पोर्तुगालच्या इतिहासविषयक केलेले प्रयत्न अजून प्रकाशांत यावयाचे आहेत.

वर उल्लेख केलेल्या मराठी पोर्तुगीज कोशाशिवाय श्री. घाटकर यांची पोर्तुगीज

भाषांतरमाला, श्री. शांबाराव सरदेसाई यांनीं शुद्ध करून प्रसिद्धींत आणलेला पण अर्धवट राहिलेला पोर्तुगीज मराठी कोश, श्री. द. व्यं. पै यांनीं पोर्तुगीजप्रवेशार्थ लिहिलेलीं पुस्तकें वगैरे शिक्षणविषयक प्रयत्न हे एकाच सदरांत येणारे होत.

गोमंतकाची परिपूर्ण माहिती ह्या दृष्टीनें श्री. बा. वा. सांवर्डेकर यांच्या गोमंतकपरिचय' या पुस्तकाचा अवश्य उल्लेख केला पाहिजे. गोमंतकविषयक एकंदर प्रकारची एवढी माहिती एकत्रित दुसरीकडे कोठेंही मिळणार नाहीं. वर उल्लेख केलेल्या नियतकालिकांविषयींची माहितीही साधारण अशी त्याच पुस्तकांतून घेतली आहे. रा. पै यांचा महाराष्ट्र सांवत्सरिकांतला "गोमंतका"वरील निबंध प्रादेशिक वर्णनाचा उत्कृष्ट नमुना आहे.

नाट्य, कादंबरी इत्यादि शुद्ध साहित्यिक प्रयत्नांत जुन्या पिढींत जुन्या वळणावर व नव्या पिढींत नव्या वळणावर पुस्तकें लिहिलीं गेलीं आहेत. जुन्याचा नमुना रामाणी यांच्या 'गंगी आणि सूर्यराव 'साध्वी तारा', आजगांवकर यांच्या- 'लफंगा सरदार'; 'रंगी आणि 'रंगराव' वगैरे पुस्तकांतून मिळणारा आहे.

नवीन कादंबरी वाङ्मयांत श्री. य. सू. सरदेसाई ह्यांची 'रुमेला जुमेला' श्री. कंटक यांची 'आर्य स्त्री' आणि अलीकडे प्रसिद्ध झालेले व होत असलेले लघुकथासंग्रह ह्यांचा समावेश केला पाहिजे. लघुकथांत श्री. लक्ष्मणराव सरदेसाई ह्यांच्या कथांची वाहवा बरीच झालेली आहे. 'कल्पवृक्षाच्या छायेंत' ह्या त्यांच्या पुस्तकांत वाचकांना अगदीं अर्वाचीन धर्तीवर लिहिलेल्या अशा कांहीं हृदयंगम लघुकथा आढळतील. श्री. जयवंतराव सरदेसाई यांनीं आपल्या कथासंग्रहांत लोकनिरीक्षणात्मक व घरगुती चित्रांच्या अशा सुंदर कथा लिहिलेल्या आहेत. श्री. कंटक व श्री. का. पुं. घोडे यांनींही आपल्या कथा गोमंतकीय समाजांतील सामाजिक चित्रणांनीं वाचनीय केल्या आहेत.

श्री. वि. स. सुखठणकर यांचा 'सह्याद्रीच्या पायथ्याशीं' हा कथासंग्रह वरील कथांच्या पूर्वी प्रसिद्धीला आला होता. प्रादेशिक कथा ह्या दृष्टीनें ह्या कथा फारच चांगल्या झाल्या आहेत. त्या बहुतेक कथांचा हेतूच लघुकथारूपानें गोमंतकीय समाजाचें व प्रदशाचें यथातथ्य वर्णन द्यावें असा होता. आणि तो हेतु त्यांनीं चांगल्या प्रकारें पार पाडला आहे आणि कथाही आकर्षक केल्या आहेत.

नाट्यवाङ्मयांत पूर्वीच्या पद्धतीनें लिहिलेलीं 'हेममुक्ता संवाद' आणि त्यानंतरचीं ताटेकर यांचीं 'हरिश्चंद्र' 'बाजीराव मस्तानी' 'संगीत गवळणकाला' प्रभृति नाटकें ह्यांचा उल्लेख केला पाहिजे. अलीकडे श्री. वैद्य यांनीं व श्री. मुकुंदराव सांवर्डेकर यांनीं कांहीं नाट्यकृति प्रसिद्ध केल्या आहेत. तरी पण प्रयोगदृष्ट्या अर्वाचीन रंगभूमीला योग्य अशा नाट्यकृति प्रसिद्ध व्हावयाच्याच आहेत असें म्हणावें लागतें. तथापि नाट्यसाहित्याची आणि नाट्यप्रयोगाची

गोमंतकांत फारच आवड आहे हें प्रसिद्धच आहे.

इतर चर्चात्मक वाङ्मयांत श्री. शांताराव सरदेसाई, कै. श्री. द. ज. बोरकर ('अवतार—रहस्य', 'वाक्कुठार' वगैरेचे लेखक), श्री. य. सू. सरदेसाई, श्री. द. व्यं. पै, श्री. वा. वा. सांवर्डेकर, श्री. हेगडे देसाई, श्री. आंगले, श्री. भेंब्रे, श्री. व्यं. वि. वैद्य प्रभृति लेखकांचा उल्लेख केला पाहिजे. प्रस्तुत लेखकानेंही या विभागांत लेखद्वारा व 'हिंदी लोक व फिरंगी संस्कृति' हा प्रबंध प्रसिद्ध करून कांहीं खटपट केली आहे. तथापि ह्या विभागांत पूर्वकालांत श्री. करंडेशास्त्री, श्री. दादासाहेब वैद्य, श्री. शांताराम सू. सरदेसाई, श्री. बोरकर, श्री. य. सू. सरदेसाई, श्री. रघुनाथ ग. तळवडकर यांची कामगिरी सादर उल्लेख करण्यासारखी आहे.

याशिवाय गोमंतकाबाहेर प्रसिद्धी पावलेलें गोमंतकीयांचें वाङ्मय शिलक आहेच. त्यांत श्री. प्रियोळकर, ज्यांनीं रघुनाथपंडित यांच्या 'नलदमयंती' काव्यावर फारच मेहनतपूर्वक व उद्बोधक ग्रंथ लिहून अलीकडेच प्रसिद्ध केला आहे; त्याचप्रमाणें बौद्ध धर्माविषयीं आणि पालीज्ञानाविषयीं ज्यांचा हिंदुस्थानभर लौकिक झालेला आहे आणि ज्यांनीं त्या विषयांवर आणि तशाच अन्य विषयांवर ग्रंथ लिहिले आहेत ते प्रो. धर्मानंद; वैद्यक विषयावर पुस्तकमाला लिहिणारे डॉ. ग. पां. काळोखे हे आणि तसेच इतरही कांहीं महाराष्ट्राच्या स्वतंत्र परिचयाचे झाले आहेत. या बाबतींत मुंबईचे वर्दे वालावलीकर,—ज्यांनीं कोंकणी साहित्य शास्त्रशुद्ध पायावर निर्माण करण्याची खटपट चालविली आहे त्यांचा उल्लेख केला पाहिजे. त्यांनीं कोंकणी भाषेचा अवलंब केला असला तरी त्यांचें कांहीं इतिहाससंशोधनात्मक, तसेंच कांहीं सामाजिक चर्चात्मक साहित्य गोमंतकीय साहित्यांत अवश्य धरणें भाग आहे. आणि सर्वस्वी शुद्ध हेतूनें आणि तळमळीनें ते लिहीत असल्यानें त्यांत परिणामकारक भागही बराच आहे. पूर्वकालींही बरेच गोमंतकीय मुंबईत साहित्यिक कामगिरी करते झाले आहेत. त्यांत डॉ. भाऊ दाजी ह्यांचें नांव सर्वांत ज्यास्त दुमदुमलेलें होय. गो. ना. माडगांवकर, माधव चंद्रोबा, डॉ. नारायण दाजी ह्यांनींही फारच महत्त्वाचें लेखन करून आपली कीर्ति केली आहे. श्री. ग. वि. लाड (महाराष्ट्र सारस्वताचे संपादक), न्यायशास्त्री सुखठणकर, प्रभृति अनेकांचा उल्लेख आदरपूर्वक केला पाहिजे.

गोमंतकीय साहित्यासंबंधानें जो लेखी भाग वर वर्णन करीत आलों, तसाच अनेक विषयांवरच्या व्याख्यानादि रूपानें होणारा ऊहापोह आणि त्यायोगानें साहित्याचा होणारा प्रसार ह्याचाही थोडा विचार करणें भाग आहे. गोमंतकांत अनेक संस्थांतून अनेक प्रसंगीं व्याख्यानमाला गुंफण्यांत येतात. ह्यांत मडगांव येथील सारस्वत समाज, दामोदर वाचनालय, सारस्वत विद्यालय म्हापसें वगैरे संस्थांचें कार्य फारच वाखाणण्यासारखें झालें आहे. महाराष्ट्र साहित्यसंमेलनाच्या योगेंही साहित्यासंबंधानें लोकांत

आवड व उत्साह उत्पन्न करण्याच्या बाबतींत फार चांगली कामगिरी केली आहे.

गोमंतकीय साहित्यासंबंधानें पूर्वी 'सत्संग' मासिकांत, 'महाराष्ट्र साहित्यांतील श्री. ब. सू. सरदेसाई यांच्या सुंदर लेखांत, 'गोमंतक-परिचय' ह्या श्री. सांबर्डेकर यांच्या पुस्तकांत, श्री. शांबाराव देसाई यांच्या महाराष्ट्र सा. संमेलनांतील भाषणांत, वगैरे वगैरे ठिकाणीं जी माहिती आलेली आहे तिचा उपयोग करूनच हा लेख लिहिला आहे. परंतु एक गोष्ट कबूल केली पाहिजे कीं ह्या विषयावर निरनिराळ्या काळच्या जुन्या नव्या, गद्यपद्य वगैरे ग्रंथांतील उतारे घेऊन जर कोणी ग्रंथ प्रसिद्ध करील तर तो वाचनीय व अभ्यासू लोकांना उपयुक्त होईल. प्रो. पिसुर्लेकर यांनीं गोमंतकांत सरकारी दप्तरांतून जे ऐतिहासिक लेख आपल्या संशोधनकार्यांत मिळविले आहेत त्यांचेहि उतारे अशा ग्रंथांत पाहिजेत. अशी मोठी कामगिरी कोणी हातीं घेईपर्यंत ह्या लेखासारख्या त्रोटक नामनिर्देशावरच त्या साहित्याची बोळवण होत जाणार आहे.

गोमंतकांत एकंदरींत साहित्याकडे जनतेचा ओढा पूर्वीपासूनच आहे, व तो दिवसेंदिवस वाढत जात आहे, आणि जसजसा नवीन धर्तीवर मराठी शिक्षणाचा प्रसार होत जाईल तसतसा तो आणखीही वाढणार आहे ह्यांत शंका नाहीं.

९

गोमंतकाची खानेसुमारी व तिजवरून निघणारीं कांहीं अनुमानें

श्री. विट्ठल सदाशिव सुखठणकर

१ प्रास्ताविक.

प्रत्येक देशाच्या लोकसंख्याविषयक प्रश्नांच्या अभ्यासाकडे अर्थशास्त्रज्ञ व समाजशास्त्रज्ञ यांचें लक्ष प्रत्यहीं जास्त जास्त वेधत असल्याचें आपल्याला दिसून येत आहे. आणि ही प्रवृत्ति साहाजिक व समर्थनीय आहे. कारण कीं, उत्पादनाचा प्रभावी घटक व सर्व अर्थोत्पत्तीचा एकमेव उपभोक्ता या दुहेरी नात्यानें अर्थशास्त्रांत अथपासून इतिपर्यंत मनुष्याचाच संचार दिसतो. समाजाची सुरक्षितता व सांपत्तिक सुस्थिति हीं मनुष्यबलावर अवलंबून आहेत व मनुष्यबलांत वाढ झाल्यास राष्ट्रही बलवान होऊन तेथील जमिनीच्या लागवडीस किंवा इतर उत्पादनकार्यास अधिक लोकांचे श्रम उपलब्ध होतील हें उघडच आहे. मनुष्यांची संख्या त्यांच्या वाढीचें मान, त्या वाढीचा उत्पादनकार्यावर परिणाम, मनुष्याचें समाजांतील राहणीचें मान, इत्यादिनक बाबींचा परस्पर संबंध अत्यंत निकट आहे. अर्थात् कोणत्याही देशाच्या आर्थिक व सामाजिक स्थितिविषयीं अनुमानें काढतांना लोकसंख्येच्या प्रश्नांचा अभ्यास अत्यंत आस्थापूर्वक व प्रामुख्यानें केला गाहिजे हें स्पष्ट होतें.

नियमित कालावधीनंतर लोकसंख्येची गणना किंवा खानेसुमारी करण्याची पद्धति व खानेसुमारीच्याच अनुषंगानें स्त्रीपुरुषभेद, वैवाहिक स्थिति, उद्योगधंदा, सांपत्तिक स्थिति, धर्मभेद, जन्मस्थान, शारीरिक व्यंगें, साक्षरता, इ. इत्यमवार माहिती गोळा करण्याची पद्धति प्रस्तुत सुधारलेल्या सर्व देशांमध्यें प्रचलित आहे. एकसमयावच्छेदेंकरून व एकाच पद्धतीनें गणती केला जाणारा सर्वांत मोठा लोकसमुदाय हिंदुस्थानांतला होय. आणि केवळ लोकसंख्येच्या परिमाणावरून भिन्न भिन्न राष्ट्रांचा दर्जा निश्चित करावयाचा असच म्हटल तर हिंदुस्थान देश जगांतील सर्व देशांत दुसरें स्थान पटकावील. या बाबतींत चीनचा दर्जा अर्थातच पहिला आहे, कारण त्या राष्ट्राची लोकसंख्या ४० कोटी पेक्षां जास्त आहे. पृथ्वीच्या पाठिवरील सर्व मानवसमाजाच्या सुमारें एक पंचमांश भागाचा अंतर्भाव एकट्या हिंदुस्थानांतच होतो. (१) हिंदुस्थानची खानेसुमारी घेण्यास १८७५ सालापासून सुरवात झाली. प्रथम प्रत्येक प्रांतांत पृथक पृथक खानेसुमारीचें काम करण्यांत येत असे, पण १८८१ मध्यें वरिष्ठ सरकारमार्फत लोकगणतीचें काम करण्यांत आलें. व तीच पद्धति तेव्हांपासून चालू आहे.

---

(१) हिंदुस्थानची लोकसंख्या सन १९३१ च्या खानेसुमारीप्रमाणें ३५.२८.३७.७७० असून एकंदर जगाच्या लोकसंख्येचा अंदाज (१९३३) १.९९.७०.००.००० हा आहे.

गोमंतकाच्या खानेसुमारी संबंधीं कांहीं आलेख



पोर्तुगीज लोकांनीं गोमंतक काबीज केल्यानंतर सुरुवातीचीं दोनअडीच शतकें बरींच धामधुमीचीं व अस्वस्थतेचीं गेलीं. त्यामुळें लोकसंख्या अजमावण्याच्या प्रश्नाकडे राज्यकर्त्यांचें लक्ष वेधूं नये हें साहजिकच होतें. तदनंतर १८ व्या शतकापासून या दिशेनें तुरळक प्रयत्न होत गेल्याचें दिसून येतें. त्या शतकाच्या सुरुवातीपासून पोर्तुगीज हिंदुस्थानची वार्षिक लोकगणती करण्याविषयीं लिस्बनहून अनेक फर्मानें सुटत गेलेलीं तत्कालीन जुन्या दप्तरांत आढळतात. परंतु व्यवस्थित व पद्धतशीर म्हणण्यासारखी खानेसुमारी ब्रिटिश हिंदुस्थानप्रमाणेंच, प्रथम १८८१ सालीं करण्यांत आली व त्यानंतर सहा वर्षांनीं, म्हणजे १८८७ सालीं दुसरी शिरगणती करण्यांत आली. पुढें १७ आगष्ट १८९९ च्या कायद्यानें (Carta de Lei) असें फर्मावण्यांत आलें कीं, पोर्तुगीज साम्राज्यांतर्गत एकंदर वसाहतींत दर दहा वर्षांनीं खानेसुमारी करण्यांत यावी. या कायद्यास अनुसरून १९००, १९११, १९२१ व १९३१ या सालीं पोर्तुगीज हिंदुस्थानांत, म्हणजे गोवा, दमण व दीव येथें लोकगणती करण्यांत आली. अर्थात् १८८१ सालापासून आजतागायत पोर्तुगीज हिंदुस्थानामध्यें सहादां खानेसुमारी करण्यांत आली असून त्यांपैकीं १९३१ ची खानेसुमारी हीच शेवटची होय. या खानेसुमारीचा सरकारी रिपोर्ट बऱ्याच उशिरां म्हणजे जवळजवळ एक वर्षामागें प्रसिद्ध झाला असून त्यांत दिलेल्या माहितीच्या आधारानेंच पोर्तुगीज हिंदुस्थानची व विशेषेंकरून गोमंतकाची लोकस्थिति अजमावण्याचें व तिजवरून निघणारीं कांहीं ठोकळ व महत्वाचीं अनुमानें प्रस्तुत लेखामध्यें सादर करण्याचें योजिलें आहे.

२. लोकसंख्येच्या वाढीसंबंधीं सर्वसाधारण विचार

सन १९३१ च्या गणतीवरून एकंदर पोर्तुगीज हिंदुस्थानची म्हणजे गोवा, दमण व दीव यांची लोकसंख्या ५,७९,९७० किंवा जवळजवळ ५,८०,००० भरली. पैकीं

गोवा	....	५,०५,२८१
दमण	....	५८,००१
दीव	....	१६,६८८

म्हणजे पोर्तुगीज हिंदुस्थानच्या लोकसंख्येशीं एकंदर हिंदुस्थानच्या लोकसंख्येचें गुणोत्तर ६०८ पडतें व गोमंतकाच्या लोकसंख्येशीं जवळजवळ ७०० पडतें. अर्थातच सबंध हिंदी द्वीपकल्पासारख्या प्रचंड भूप्रदेशाच्या लोकस्थितीवरून जे निष्कर्ष व अनुमानें निघूं शकतील तींच तंतोतंत गोमंतकासारख्या अत्यंत आकुंचित प्रांताला लागू करणें योग्य होणार नाहीं. तथापि जनवर्णनशास्त्रांतील (Demography) सर्वसाधारण नियमांस व संकेतांस अनुसरून कांहीं निष्कर्ष काढणें व अंदाज करणें अप्रस्तुत होणार नाहीं.

उपरिनिर्दिष्ट सहाही खानेसुमाऱ्यांचे आंकडे अवलोकन केले तर १८८१ ते १९३१ या अर्धशताब्दीच्या कालखंडांत गोमंतकाच्या लोकसंख्येंत झालेले चढउतार आपल्या ध्यानांत येतील. (आलेख नं. १ पहा.)

वर्ष		लोकसंख्या
१८८१	....	४,१३,७२७
१८८७	....	४,८४,८०२
१९००	....	४,७५,५१३
१९११	....	४,८६,७५२
१९२१	....	४,६९,४९४
१९३१	....	५,०५,२८१

वरील आंकड्यांवरून असें दिसून येईल कीं, १८८१ ते १८८७ या सहा वर्षांच्या अल्पावधींत

गोमंतकाच्या लोकसंख्येंत ७१,०७५ ची वाढ झाली, म्हणजे अवघ्या सहा वर्षांत शेंकडा १७ या प्रमाणांत लोकसंख्या फुगली. ही वाढ अनैसर्गिक असल्यामुळें तिच्या सत्यत्वाबद्दल व ग्राह्यतेबद्दल त्या त्या खानेसुमारीच्या रिपोर्टांत शंका प्रदर्शित करण्यांत आली असून या शंकेचीं कारणेंही दाखविण्यांत आलीं आहेत. तीं कारणें शोधण्यास ता. २६ डिसेंबर १८७८* च्या पोर्तुगीज सरकार व ब्रिटिश सरकार यांच्यांत झालेल्या तहनाम्यामुळें उद्भवलेल्या परिस्थितीकडे आपल्याला लक्ष देणें भाग आहे. या तहनाम्याची अंमलबजावणी १५ जानेवारी १८८० पासून करण्यांत आली. व त्यांतील अटींबरहुकूम पोर्तुगीज हिंदुस्थानांत उत्पन्न होणाऱ्या मिठाचा खास मक्ता ब्रिटिश सरकाराकडे राहून पोर्तुगीज मुलखांतील रहिवाशांची गरज भागविण्यासाठीं दर माणशीं १४ पौंडांप्रमाणें मीठ पुरविण्याची हमी ब्रिटिश सरकारनें घेतली. १८८१ व १८८७ च्या लोकगणतीच्या बाबतींत या तहनाम्याचे परिणाम परस्परविरोधी दिसून आले. म्हणजे तहनाम्याच्या अंमलबजावणीच्या सुरुवातीसच झालेल्या खानेसुमारींत नवीन कर लादले जाण्याच्या भीतीमुळें शिरगणतीपासून अलग राहण्याची प्रवृत्ति प्रजाजनांत ज्याप्रमाणें दिसून आली त्याचप्रमाणें, सहा वर्षांनंतर ही भीति निराधार ठरतांच, कुटुंबांतील मिठाचा पुरवठा वाढविण्याच्या उद्देशानें अनेक कुटुंबांतील मुख्यांची, कुटुंब-पत्रिका (Boletim de familia) भरतेवेळीं त्यांतील व्यक्तींची संख्या फुगविण्याकडे प्रवृत्ति दिसून आली. या परस्परविरोधी प्रवृत्तींचे परिणाम साहजिकपणें असे झाले कीं, १८८१ च्या खानेसुमारीच्या वेळीं वास्तविक लोकसंख्येपेक्षां कमी संख्या दर्शविण्यांत आली व १८८७ सालीं तीच संख्या बेसुमारपणें फुगविण्यांत आली.

तेव्हां तुलनात्मक दृष्टीनें विचार करावयाचा झाल्यास, १८८१ व १८८७ च्या खानेसुमारींत उपलब्ध झालेल्या आंकड्यांच्या ग्राह्याग्राह्यतेबद्दल आपल्याला साशंक वृत्तीच धारण करणें भाग असल्यामुळें ते आंकडे दृष्टीआड करून तदनंतरच्या खानेसुमारींत गोळा झालेल्या आंकड्यांपुरताच विचार करणें भाग आहे.

सन १९०० ते १९३१ च्या दरम्यान, ३१ वर्षांच्या कालावधींत, ज्या चार खानेसुमाऱ्या झाल्या त्यांच्यावरून गोमंतकाच्या लोकसंख्येंत पुढीलप्रमाणें वाढ किंवा तूट झालेली दिसून येते.

कालखंड	शेंकडा वाढीचें प्रमाण
१९००-१९११	+ २·४
१९११-१९२१	− ३·४
१९२१-१९३१	+ ७·६

किंवा सन १९०० ते १९३१ पर्यंतच्या कालांतील वाढीपुरता विचार केल्यास तेवढ्या मुदतींत गोमंतकाच्या लोकसंख्येच्या शेंकडा वाढीचें प्रमाणें ६·२ पडतें.

वर दिलेल्या कालखंडांतील सबंध हिंदुस्थानासंबंधींचे आंकडे अवलोकन केल्यास पुढीलप्रमाणें फरक आपल्याला दिसून येतात.

	१९०१	१९११	१९२१	१९३१
लोकसंख्या....	२९,४३,६१,०५६	३१,५१,५६,३९६	३१,८९,४२,४८०	३५,२८,३७,७७८
शेंकडा वाढीचें प्रमाण		७·१	१·२	१०·६

आणि १९०१ ते १९३१ या तीस वर्षांच्या मुदतींत एकंदर हिंदुस्थानची लोकसंख्या शेंकडा १९.८ या प्रमाणांत वाढल्याचें दिसून येतें.

* हा तहनामा "लूझो-ब्रिटिश व्यापारविषयक तहनामा" म्हणून प्रसिद्ध असून त्याची १२ वर्षांची मुदत संपतांच ता. १५ जानेवारी १८९२ रोजीं त्याची अंमलबजावणी बंद करण्यांत आली.

तेव्हां ह्या वाढीच्या बाबतींत सबंध हिंदी द्वीपकल्पाची गोमंतकाशीं तुलना केल्यास गोमंतकांतील लोकवृद्धि अल्प प्रमाणांत झाल्याचें दिसून येतें. सकृद्दर्शनीं पहातां हें लोकसंख्येच्या वाढीचें प्रमाण जरी आपल्याला अस्वाभाविक दिसलें तरी त्यामुळें बिचकून जाण्याचें कारण नाहीं किंवा गोमंतकीय प्रजेच्या प्रजननशक्तीचा कोणत्याही प्रगट किंवा अप्रगट कारणांमुळें ऱ्हास होत चालला आहे असेंही अनुमान करण्याचें कारण नाहीं. एक तर अखिल हिंदी द्वीपकल्पासारख्या अवाढव्य क्षेत्रांतील लोकसंख्याविषयक स्थितीची तुलना गोमंतकासारख्या आकुंचित प्रदेशांतील लोकसंख्याविषयक स्थितीशीं करून त्यावरून कोणतेही ठोकताळे काढणें हें अशास्त्रीय आहे हें विसरून चालतां येणार नाहीं. शिवाय पृथ्वीवरील कोणत्याही प्रदेशांतील लोकवाढीचे चढउतार घडवून आणणाऱ्या निर्गमागमादि हालचाली व इतर कारणें यांचाही गोमंतकाच्या लोकसंख्याविषयक फेरबदलांच्या बाबतींत विचार करणें जरूर आहे.

कोणत्याही देशांतील लोकसंख्येची वाढ त्या देशांतील जननसंख्या व मृत्युसंख्या यांच्यांतील अंतरावरून ठरवितां येते. तथापि येथें एक गोष्ट दृष्टीआड करतां कामा नये कीं, केवळ लोकवृद्धीवरूनच अमुक एका देशाची भरभराट होत आहे असा निष्कर्ष काढणें चुकीचें होईल. ज्या प्रकारानें ही वृद्धि घडून आली असेल त्याजकडे लक्ष दिलें पाहिजे. म्हणजे एका विशिष्ट कालखंडांत कोणत्याही देशांत फार मोठी जननसंख्या व फार मोठी मृत्युसंख्या किंवा अल्प जननसंख्या व अल्प मृत्युसंख्या यांपैकीं कोणताही प्रकार घडून आला तरीही लोकसंख्येंत वाढच होईल. परंतु पहिला प्रकार हा त्या देशांतील अवनत स्थितीचा निदर्शक म्हणून समजतां येईल, तर दुसरा प्रकार सुस्थितीचें द्योतक मानतां येईल. म्हणजे पहिल्या प्रकारांत अनेक अशक्त व व्याधिग्रस्त लोकांच्या जन्ममरणापासून समाजास व नागरिकांस फार नुकसान सोसावें लागतें तर दुसऱ्या प्रकारांत तें कमी होऊन वाढीचें ऐन मान मात्र कायम रहातें.

सन १९२१ ते १९३० या दशकांतील जनन-मरणासंबंधींचे उपलब्ध असलेले आंकडे खालीं दिल्याप्रमाणें आहेत:—

वर्ष	जन्मसंख्या	मृत्युसंख्या	ज.सं.व मृ. सं. यांतील अंतर
१९२१	१५,८०५	१३,१६३	+२,६४२
१९२२	१६,९८३	१२,३९३	+४,५९०
१९२३	१७,१४१	१२,०४१	+५,१००
१९२४	१७,१७१	११,५५१	+५,६२०
१९२५	१५,०११	१०,९२२	+४,०८९
१९२६	१६,८७७	१२,१८४	+४,६९३
१९२७	१४,३८२	११,६८९	+२,४९३
१९२८	१६,४४८	१२,२३०	+४,२१८
१९२९	१५,९८१	११,७६१	+४,२२०
१९३०	१७,६२७	११,९३०	+५,६९७

वरील आंकड्यांवरून असें दिसून येतें कीं, १९२१ ते १९३० या दशवार्षिक कालांत एकंदर गोमंतकांत मृत्युसंख्येपेक्षां जननसंख्या ४३,३६२ या आंकड्यानें जास्त भरते.* त्याच-

* मि. मार्टेन (J. T. Marten, M. A., I. C. S.) यांनीं १९२५ च्या मार्च महिन्यांत "रॉयल सोसायटी ऑफ आर्टस्, इंडियन सेक्शन" या संस्थेस सादर केलेल्या निबंधांत असें प्रतिपादन केलें आहे कीं, दुष्काळ, मनुष्यसंहारक सांथ वगैरे आपत्ति न ओढवल्या तर एका दशकांतील लोकसंख्येच्या वाढीचें शेंकडा ८ हें स्वाभाविक मान धरून चालतां येईल. गोमंतकीय लोकसंख्येच्या वाढीचें मान यापेक्षां थोडें जास्त म्हणजे शेंकडा ९ पडतें.

प्रमाणें १९२१ व १९३१ या दोन्ही सालांतल्या खानेसुमारीवरून उपलब्ध झालेल्या आंकड्यांची, ब्रिटिश प्रजाजनांचे आंकडे वगळून (अनुक्रमें ५०३९ व ७६७९) तुलना केली असतां ३३,१४७ चा फरक आपल्याला दिसून येतो. सकृद्दर्शनीं या दोन्ही संख्यांतील अंतर म्हणजे १०,२१५ हीच संख्या गोमंतकाची वरील दशकांतील निर्गत लोकसंख्या असें म्हणतां येईल. मात्र या बाबतींत निर्णयात्मक विधान करणें हें निर्गत लोकसंख्याविषयक विश्वसनीय आंकड्यांच्या अनुपलब्धतेमुळें, प्रस्तुत तरी आपल्याला शक्य नाहीं. तेव्हां वरील निष्कर्षाच्या बाबतींत गणिती तंतोतंतपणाची अपेक्षा करणें योग्य होणार नाहीं. तर तें विधान केवळ एक संभाव्य सत्य आहे एवढेंच धरून चाललें पाहिजे.

या ठिकाणीं एकंदर परदेशगत किंवा परप्रांतगत गोमंतकीयांच्या संख्येविषयीं अल्प विचार क्रमप्राप्त आहे. निर्गत लोकसंख्येपैकीं फार मोठा भाग ब्रिटिश हिंदुस्थानांत जात असल्यामुळें व ब्रिटिश हिंदुस्थानांत वास्तव्य करण्याच्या उद्देशानें जात असलेल्या प्रजाजनांसाठीं पासपोर्ट, परवाना वगैरे कोणत्याच प्रकारचे निर्बंध प्रस्तुत अस्तित्वांत नसल्यामुळें, निर्गत लोकसंख्येचा निश्चित आंकडा काढणें शक्य नाहीं. आणि या बाबतींतही केवळ अंदाजावरच निर्वाह करणें भाग आहे.

पोर्तुगीज हिंदुस्थानाचे खानेसुमारीचे आंकडे पहातां, गैरहजर असलेल्यांची संख्या ५०८५२ भरत असून, गोमंतकापुरतेंच पाहिल्यास ती संख्या ४८,५०० भरते. पण खरी संख्या याच्याहीपेक्षां बरीच मोठी असली पाहिजे. कारण गैरहजर असलेल्यांचा, विशेषेंकरून निर्वाहानिमित्त परप्रांतांत वास्तव्य करण्यासाठीं गेलेल्यांचा उल्लेख न होण्याचाच संभव फार करून दिसून येतो.

ब्रिटिश इंडियाच्या सेन्सस रिपोर्टावरून असें दिसून येतें कीं, पोर्तुगीज हिंदुस्थानांतून तिकडे रहाण्यासाठीं गेलेल्यांचा किमान अंदाज ६८,०००* असून, त्यांपैकीं फार मोठ्या लोकसंख्येचें वास्तव्य मुंबई इलाख्यांत होत असतें. पण या अंदाजापेक्षांही खरी निर्गत लोकसंख्या बरीच मोठी असली पाहिजे. कारण कीं, रोजगाराच्या निमित्तानें परप्रांतांत निवास करण्यासाठीं गेलेल्या आपल्या प्रांतबांधवांच्या मार्गांत राजवटीच्या भिन्नत्वामुळें उत्पन्न होणाऱ्या हरएक अडचणींकडे लक्ष पुरविलें म्हणजे अनेक परप्रांतगत गोमंतकीयांची आपलें आगमस्थान लपविण्याकडे प्रवृत्ति झाली तर त्यांत नवल नाहीं.

कांहीं वर्षांपूर्वी प्रस्तुत नामशेष झालेल्या कॉंग्रेस प्रोव्हिंसियालनें (Congresso Provincial da India Portuguesa) आपल्या दुसऱ्या अधिवेशनाच्या प्रसंगीं परदेशगमनाविषयींच्या चर्चेचा अंतर्भाव आपल्या कार्यक्रमांत करून तद्विषयक निबंधांची मागणी केली होती. त्यावेळीं अनेक अभ्यासकांनीं सादर केलेल्या निबंधांवरून परप्रांतगत व प्रत्यंतगत पोर्तुगीज इंडियांतील प्रजाजनांची संख्या ७५,००० व १,००,००० च्या दरम्यान असावी असा अंदाज करण्यांत आला होता. हे आंकडे सर्वस्वी ग्राह्य मानण्यासारखे नसले तरी ते सत्यापासून फारसे दूर नाहींत यांत संशय नाहीं. आणि त्या आंकड्यांतील किमान किंवा कमाल यांपैकीं कोणताही अंदाज ग्राह्य मानला तरी, एकंदर लोकसंख्येच्या मानानें, निर्गत लोकसंख्येचें प्रमाण फारच मोठें आहे हें कबूल

* Census of India, 1931 - Vol. I. India - Part I. Report - by J. H. Hutton, C. I. E., D. SC., F. A. S. B.- पृ. ६८.

केलें पाहिजे. परंतु लोकसंख्येच्या मानानें शेतजमीन, पाणीपुरवठा वगैरे नैसर्गिक संपत्तीचें अत्यंत मर्यादित प्रमाण व उपलब्ध मनुष्यबलाचा व नैसर्गिक संपत्तीचा अधिकांत अधिक उत्पादक मार्गानें विनियोग करण्यास आवश्यक असलेल्या भांडवल, संघटनाचातुर्य, शास्त्रीय ज्ञान इत्यादि साधनसामुग्रीचा सर्रास असलेला तुटवडा ध्यानांत आणल्यास, निदान प्रस्तुत तरी, गोमंतकीय लोकसंख्येंत आणखी वाढ होणें हें एक सामाजिक व आर्थिक अरिष्टच असल्यामुळें, येथील प्रजाजनांचें निर्गमन ही एक इष्टापत्तीच होय, या गोमंतकीय वैचारिक क्षेत्रांत प्रचलित असलेल्या मतास दुजोरा देणें भाग आहे.

२. लोकसंख्येची दाटी.

येथपर्यंत सबंध गोमंतकांतील लोकसंख्ये-विषयींचें क्षेत्रफळनिरपेक्ष विवेचन झालें. परंतु क्षेत्रफळाच्या दृष्टीनें एकंदर गोमंतक व गोमंतकांत समाविष्ट होणारे निरनिराळे विभाग यांतील लोकवस्तीचा विचार होणें आवश्यक आहे.*

एकंदर पोर्तुगीज हिंदुस्थानाचें क्षेत्रफळ १,४६० चौरस मैल असून, फक्त गोमंतकाचें क्षेत्रफळ १,३१२ चौरस मैल आहे. अर्थात् सबंध पोर्तुगीज हिंदुस्थानाचें दर चौरस मैलाशीं लोकसंख्येचें सरासरी प्रमाण ३९७ पडतें व फक्त गोमंतकाचें तेंच प्रमाण ३९२ पडतें.

तुलनात्मक दृष्टीनें विचार करण्यासाठीं जगांतील निरनिराळ्या प्रमुख देशांसंबंधींचे आंकडे खालीं दिले आहेत, त्यांवरून त्या त्या देशांतील क्षेत्रफळाशीं एकंदर लोकसंख्येचें प्रमाण किती पडतें याची स्पष्ट कल्पना होईल.

क्षेत्रफळाशीं (दर चौरस मैलाशीं) लोकसंख्येचें सरासरी प्रमाण

बेल्जम	७०२	पोर्तुगाल	२०२
ग्रेटब्रिटन व उत्तर आयर्लंड	४६८	जपान	३५२
		अमेरिका	३६
फ्रान्स	१९७	न्यूझीलंड	१३
जर्मनी	३६६	हिंदुस्थान (ब्रह्मदेशासह)	१९५
नेदर्लंड	६२७		
आस्ट्रिया	२१०	कोंकण	३३०
स्पेन	१२०	गोमंतक	३९२

वर दिलेल्या आंकड्यांवरून त्या त्या देशांतील किंवा प्रदेशांतील क्षेत्रफळाशीं लोकसंख्येचें असलेलें सरासरी प्रमाण दिसून येतें. परंतु त्या त्या देशाच्या विवक्षित प्रांतांत व प्रत्येक प्रांताच्या विशिष्ट भागांत हें प्रमाण सर्व देशाच्या किंवा प्रांताच्या सरासरीहून फारच भिन्न असलेलें दिसून येतें. हिंदुस्थानापुरताच विचार केला तर निव्वळ ब्रिटिश हिंदुस्थानांत तें प्रमाण २४७ असून, संस्थानी मुलखांत तें ११४ आहे. विशिष्ट प्रदेश किंवा त्यांचे विशिष्ट विभाग यांच्यासंबंधीं विचार केल्यास असें दिसून येईल कीं सिंध, राजपुताना व बलुचिस्थान यांमधील कित्येक भागांत मनुष्यवसति जवळजवळ अशक्यच होते. बलुचिस्थानचें लोकसंख्येचें क्षेत्रफळाशीं सरासरी प्रमाण ६·५ असून, त्याच प्रांतांतील चगई तालुक्यांत तर हीच सरासरी दर चौरस मैलास एक मनुष्य एवढ्यापर्यंत उतरते. परंतु नैर्ऋत्य किनाऱ्यावरील कांहीं प्रदेश व बंगाल्यांतील कांहीं विभाग असे आहेत कीं, त्यांत दर चौरस मैलास २००० पर्यंत

* पोर्तुगीज अंमलाखालील मुलखांत दशमान पद्धति प्रचलित असल्यामुळें क्षेत्रफळासंबंधीं उपलब्ध असलेल्या सर्व आंकड्यांसाठीं चौरस किलोमीटर्स हेंच परिमाण धरलें जातें. प्रस्तुत लेखांत, ब्रिटिश हिंदुस्थानांतील वाचकांच्या सोयीसाठीं, क्षेत्रफळासंबंधींचे आंकडे चौरस मैलांनीं दिले आहेत. १ चौरस किलोमीटर = ०·३८६१ चौरस मैल.

लोकवस्तीची दाटी आढळते. सबंध कोचीन संस्थानची — कीं ज्यांत अतिशय दाट वस्तीचा किनाऱ्याकडील प्रदेश व अत्यंत विरळ वस्तीचा डोंगराळ प्रदेश अशा दोहोंचाही अंतर्भाव होतो — सरासरी दर चौरस मैलास ८४२·२ असून, त्याच संस्थानांतील एका खेड्यांत तर तें प्रमाण जगांतील कोणत्याही निव्वळ कृषिप्रधान प्रदेशांतील प्रमाणापेक्षां जास्त, म्हणजे दर चौरस मैलास ४,००० एवढें आहे. बंगाल्यांतील डाका विभागामध्यें लोहजंग ठाण्यांत ३,२२८ ही सरासरी आहे आणि मुन्शीगंज सबडिव्हिजनमध्यें तीच सरासरी २,४१३ आहे. भौगोलिक दृष्ट्या गोमंतकाचा समावेश ज्या कोंकण विभागांत होतो त्यांतील लोकसंख्येची सरासरी दर चौरस मैलास ३३० आहे हें वर दिलेंच आहे. हीच सरासरी गोमंतकालगतच्या सावंतवाडी संस्थानांत २३८ असून, रत्नागिरी जिल्ह्यांत ३३१ आहे. म्हणजे गोमंतकाच्या लोकसंख्येची दाटी सावंतवाडी संस्थान, रत्नागिरी जिल्हा किंवा सबंध कोंकण विभाग यांच्याहीपेक्षां थोडीशी जास्तच आहे.

गोमंतक हा क्षेत्रफळाच्या दृष्टीनें पाहतां आकुंचित असा प्रांत आहे, पण त्यांतील निरनिराळे राजकीय विभाग किंवा अकरा महाल यांतील लोकवस्तीच्या विभागणीचें सूक्ष्म निरीक्षण केलें तर तीही भिन्नभिन्न असल्याचें दिसून येतें. असे कांहीं महाल आहेत कीं, जेथें लोकवस्तीच्या दाटीची जवळजवळ पराकाष्ठा झाली आहे. परंतु कांहीं कांहीं महालांतून क्षेत्रफळ व लोकसंख्या यांचें प्रमाण अत्यंत व्यस्त आहे. पुढील आंकड्यांवरून याविषयीं वाचकांना नीट कल्पना होईल.

महाल	क्षेत्रफळ (चौ. मैल)	लो.सं.चें क्षे. फ.शीं प्रमाण
बार्देश	८६ ९०	१,२१२
तिसवाडी	५८·४३	१,०७३
सासष्टी	१०२·५०	१,०४८
मुरगांव	२७·६०	८३०
फोंडें	९७·४०	५३२
पेडणें	९३·६०	४४६
सांखळी	९३·३०	३६५
केपें	१३३·६०	१७०
काणकोण	१३४·५०	१४२
सत्तरी	१६९·८०	१०५
सांगें	३१४·६०	६१

वर दिलेल्या मनुष्यवस्तीच्या दाटीसंबंधींच्या आंकड्यांच्या निरीक्षणान्तीं आणखी एक गोष्ट आपल्या नजरेंत येते ती ही कीं, जुन्या काबिजादी व नव्या काबिजादी असे जे गोमंतकाचे दोन भाग पाडण्यांत येतात, त्यांपैकीं जुन्या काबिजादींतील लोकवस्तीचें प्रमाण दर चौरस मैलास १,०६२ पडतें, तर नव्या काबिजादींत तेंच प्रमाण १९९ पडतें. अथवा या दोन्ही भागांच्या क्षेत्रफळाचें प्रमाण १:४ असून लोकवस्तीच्या दाटीच्या बाबतींत तेंच प्रमाण ५:१ इतकें व्यस्त पडतें. (आलेख नं. २ पहा). किंवा असाही निष्कर्ष काढतां येईल कीं, जुन्या काबिजादींतील लोकवस्तीच्या दाटीच्याच प्रमाणांत नव्या काबिजादींतील लोकवस्तीची वाढ झाली, तर संबंध गोमंतकांत जवळजवळ १४ लक्ष लोकसंख्या होईल किंवा हल्लींच्या लोकसंख्येंत आणखी ९ लक्षांची भर पडेल.

परंतु ही भर म्हणजे केवळ गणितावर आधारलेली कल्पनाच आहे व ती सत्यसृष्टींत उतरणें हें प्रस्तुतच्या परिस्थितींत तरी केवळ अशक्य कोटींतलीच गोष्ट आहे हें विसरतां कामा नये. जुन्या काबिजादी या नांवाखालीं ओळखण्यांत येणाऱ्या भूप्रदेशांत शेतजमिनीचा विस्तार, सुपीकपणा, पाणीपुरवठा, नवीन जमिनी

लागवडीस आणण्याच्या बाबतींत शेतकीच्या पैदाशीस सोइस्कर अशी भौगोलिक रचना, वाहतुकीच्या बाबतींतील सवलती, शेतकीखेरीज इतर धंद्यांत रोजगार मिळण्याच्या सोई, इत्यादि जीवितयात्रा सुरळीतपणें पार पाडण्यासाठीं व सामुदायिक जीवनक्रमाची उदात्तता राखून तिची जोपासना करण्यासाठीं आवश्यक असलेल्या साधनांची अनुकूलता दिसून येते. पण याच्या अगदीं उलट नवीन काबिजादींत डोंगराळ व दऱ्याखोऱ्यांनीं व जंगलांनीं व्यापलेल्या आणि लागवडीस नालायक ठरलेल्या क्षेत्रफळाचें फार मोठें प्रमाण, त्यांतच जमिनीचा उतरता कस, कृषिविषयक सुधारणांचा अभाव, उद्योगधंद्यांची अवनत स्थिति, निर्वाहाच्या साधनांच्या अपुरेपणामुळें व मलेरिया व इतर रोगराईंमुळें घडून आलेलें रहिवाशांचें शरीरदौर्बल्य व निरुत्साह इत्यादि कारणांची भर पडल्यामुळें, निदान प्रस्तुतच्या हलाखीच्या व असहाय्य स्थितींत तरी त्या प्रदेशाला वाढत्या लोकसंख्येचा ताण सहन करणें शक्य नाहीं, असेंच कबूल करणें भाग आहे.

४. स्त्रीपुरुषभेदानुसार लोकसंख्येची विभागणी

स्त्रीपुरुषभेदानुसार विशिष्ट प्रदेशांतील लोकवस्तीची पहाणी हा जनवर्णनशास्त्रांतील एक महत्वाचा विषय होय. स्त्री किंवा पुरुष यांपैकीं कोणत्याही वर्गाच्या आधिक्यावर अनेक आर्थिक, किंबहुना राजकीय बाबीसुद्धां अवलंबून असतात.

ज्या समाजांत एकविवाहपद्धतीला प्राधान्य असेल, तेथें संख्येच्या बाबतींत उभय वर्गांची समसमानता हीच आदर्श विभागणी मानावी लागेल. याच्याही पलीकडे जाऊन असें म्हणतां येईल कीं, अनेक प्रचलित सामाजिक निर्बंधांमुळें पुरुषवर्गाची वैवाहिक वयोमर्यादा बहुतेक सर्वत्र वाढलेली असल्यानें, पुरुषांचें थोडेंसें आधिक्य हेंच सर्वसाधारणपणें समाजस्वास्थ्याच्या दृष्टीनें अपेक्षणीय ठरेल. याविषयीं वस्तुस्थिति काय आहे ती आपल्याला पाहिली पाहिजे.

लोकसंख्येंतील स्त्रिया व पुरुष यांची तुलना करण्याच्या दोन पद्धति आहेत. प्रत्येक वर्गाची एकंदर लोकसंख्येशीं शेंकडेवारी दाखवावयाची, ही एक. आणि स्त्रिया व पुरुष यांचें परस्परांतील प्रमाण दाखवावयाचें, ही दुसरी.

या दृष्टीनें पाहतां, स्त्रीपुरुषभेदानुसार सबंध गोमंतकांतील आणि निरनिराळ्या महालांतील लोकसंख्येची विभागणी पुढील तक्त्यावरून दिसून येईल. (आलेख नं. ३ पहा)

एकंदर लोकसंख्या	एकंदर लोकसंख्येशीं शेंकडेवारी		दर १०० स्त्रियांशीं पुरुषसंख्येचें प्रमाण
	पुरुष	स्त्रिया	
गोमंतक	४७.९	५२.१	९१.८
तिसवाडी	४९·१	५०·९	९६·४
सासष्टी	४६·३	५३·७	८६·२
बार्देश	४३·५	५६·५	७७·२
मुरगांव	५३·७	४६·३	११५·७
पेडणें	४६ ३	५३·७	८६·१
सांखळी	४९·९	५०·१	९९·६
सत्तरी	५२·४	४७·६	११०·४
फोंडें	५०·५	४९·५	१०१·९
सांगें	५२·९	४७·१	११२·७
केपें	५०·५	४९·५	१०१·७
काणकोण	५०·०	५०·५	१००·०

ह्या तक्त्यावरून सहज ध्यानांत येईल कीं, तिसवाडी, सासष्टी, बार्देश, पेडणें आणि सांखळी या महालांत स्त्रियांचें आधिक्य दिसत असून, त्याच्या उलट मुरगांव, सांगें, सत्तरी, केपें आणि फोंडें या महालांत पुरुषवर्गाचें आधिक्य दिसतें. आणि काणकोण महालांत उभय वर्गांचें प्रमाण सारखेंच दिसून येतें. किंवा असेंही म्हणतां येईल कीं, मुरगांव महाल खेरीज करतां जुन्या काबिजादींत स्त्रियांचें आधिक्य आहे, तर पेडणें वजा करतां, नव्या काबिजादींत पुरुषांचें आधिक्य दिसतें. त्याचप्रमाणें सबंध गोमंतकाच्या आंकड्यांच्या निरीक्षणांतीं पुरुषांची न्यूनता दिसून येत असून त्यांमधील फरक शेंकडा ८·२ असल्याचें दृष्टोत्पत्तीस येतें. सन १९०० पासूनच्या चारही गणतींत उपलब्ध झालेल्या आंकड्यांची तुलना केल्यास स्त्रीपुरुषांचें प्रमाण, एकंदर प्रांताचेंच नव्हे, तर महालानिहायसुद्धां, जवळजवळ सारखेंच असल्याचें दिसून येतें.

या बाबतींत इतर देशांतील आंकड्यांचें अवलोकन उद्बोधक झाल्याशिवाय राहाणार नाहीं. तेव्हां त्या दिशेनें थोडा प्रयत्न करूं.

यापूर्वी एक गोष्ट लक्षांत ठेवणें जरूर आहे कीं, कोणत्याही विवक्षित लोकसमाजांतील स्त्रीवर्गाचें आधिक्य हें अर्थशास्त्रीय दृष्ट्या सर्वसाधारणपणें एक प्रकारें कमी उत्पादनक्षम लोकसंख्येचें आधिक्य असें समजलें जातें. परंतु त्याबरोबरच हीही गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे कीं, सामाजिक दृष्ट्या विचार केल्यास, स्वतःच्या उच्च कर्तव्याची जाणीव असलेला व त्या दृष्टीनें ज्याची योग्य तयारी झाली आहे असा स्त्रीवर्ग म्हणजे समाजांत सर्व दृष्टींनीं समतोलपणा राखणारी एक महत्वाची शक्ति असून, त्या बाबतींत स्त्रीवर्गाचें आधिक्य अपकारक होऊं शकणार नाहीं.

युरोपखंडांतील एकंदर लोकसंख्येविषयींच्या आंकड्यांचें निरीक्षण केल्यास आपल्याला असें आढळून येईल कीं, बहुतेक स्त्रियांची संख्याच सर्वत्र जास्त भरते. युरोपांतील मुख्य मुख्य देशांसंबंधींचे आंकडे राष्ट्रसंघाच्या १९३३ च्या सांवत्सरिकावरून पुढें दिले आहेत, त्यांवरून ही गोष्ट स्पष्टपणें दृष्टोत्पत्तीस येईल.

देशाचें नांव	दर १०० स्त्रियांशीं पुरुषांचें प्रमाण
पोर्तुगाल	९१·२
इंग्लंड	९१·२
फ्रान्स	९२·३
जर्मनी	९३·७
स्पेन	९४·१
डेन्मार्क	९५·०
नॉर्वे	९५·०
बेल्जम	९६·९
ग्रीस	९८·३
नेदर्लंड्स्	९८·७
रुमेनिया	९९·०
इटली	९९·१
बल्गेरिया	१००·२
आयर्लंड (फ्रीस्टेट)	१०२·७

वरील आंकड्यांवरून असा निष्कर्ष निघतो कीं, युरोपांतील मुख्य मुख्य देशांपैकीं स्त्रियांचें जास्तींत जास्त संख्याधिक्य पोर्तुगाल, इंग्लंड, फ्रान्स व जर्मनींत दिसतें, तर तेंच प्रमाण रुमेनिया आणि इटली या देशांत कमींत कमी आढळतें. आयर्लंड (फ्रीस्टेट) व बल्गेरिया येथें मात्र पुरुषांचें संख्याधिक्य आहे.

आतां लिंगभेदाप्रमाणें लोकसंख्येच्या विभागणीच्या बाबतींत हिंदुस्थानची परिस्थिति काय आहे त्याचें अल्प दिग्दर्शन करूं.

सर्वसाधारणपणें असें म्हणतां येईल कीं, युरोपांतील मुख्य मुख्य देशांत ह्या बाबतींत

। प्रकार दिसून येतो त्याच्या अगदीं उलट कार आशिया खंडांतील ज्या देशांसंबंधींचे ांकडे उपलब्ध आहेत त्यांत दिसतो. म्हणजे । देशांत पुरुषसंख्येचेंच आधिक्य आढळून तें. हिंदुस्थानांत तर या प्रकाराचा अतिरेकच ाला आहे असें म्हणतां येईल.

सन १९३१ च्या गणतीवरून सबंध हिंदी ापकल्पाची जी ३५,२८,३७,७७८ लोकसंख्या ारली तिची १८,१८,२८,९२३ पुरुष व ।७,१०,०८,८५५ स्त्रिया अशी विभागणी ोते. म्हणजे एकंदर लोकसंख्येंत पुरुष आणि त्रया यांचें दर शेंकडा प्रमाण अनुक्रमें ५१·५ । ४८·५ हें असून दर १०० स्त्रियांशीं पुरु-ांच्या संख्येचें प्रमाण १०६·३ आहे. म्हणजे असें कीं, युरोपांतील अधिकांत अधिक पुरुष-संख्येचें प्रमाण जेथें आढळून येतें त्या आयर्लंड (फ्रीस्टेट) च्या पुरुषांच्या प्रमाणापेक्षांही हिंदु-स्थानचें प्रमाण ४·४ नीं जास्त भरतें. आणि सन १९०१ पासून दर दशकांत पुरुषसंख्येचें हें प्रमाण जास्त जास्तच फुगत असल्याचें दिसून येतें. त्यापूर्वी, सन १८८१ च्या गणतींत हें प्रमाण १०४·८ होतें, तेंच पुढील दोन दशकांत १०३ पर्यंत उतरलें होतें.

हिंदुस्थानच्या लोकसंख्येच्या विभागणीच्या बाबतींतल्या ह्या वैशिष्ट्याचीं कारणें निरनिराळ्या तज्ज्ञांनीं निरनिराळ्या प्रकारचीं दाखविलीं आहेत.

वेस्टरमार्कच्या * मतें हिंदुस्थानांत प्रचलित असलेली जातिपद्धति ही पुरुषांची संख्या वाढ-ण्यास बऱ्याच अंशीं कारणीभूत झाली असावी. आणि या मताच्या पुष्ट्यर्थ त्यानें डॉ. नेजल व इतरांनीं केलेले अनेक वनस्पतींसंबंधींचे व निर-निराळ्या जनावरांसंबंधींचे असे कांहीं प्रयोग दिले आहेत कीं, ज्यांवरून सजातीय जोड-प्यांच्या विवाहाची प्रथा पुरुषबालकसंख्येच्या वाढीस उपकारक होते असा निष्कर्ष निघतो. आणि या बाबतींतली ही समजूत अगदींच नवीन नाहीं; कारण यहुदी लोकांचा प्राचीन धर्मग्रंथ तालमूद यांतसुद्धां संमिश्र विवाहांपासून केवळ स्त्रीबालकांचीच उत्पत्ति होते असा उल्लेख आढळतो. परंतु त्यावरून संमिश्र विवाहपद्धति स्त्रीप्रजेच्या वृद्धीस हमखास उपकारक होते असें सर्रहा विधान करणें बरेंच धोक्याचें ठरेल. कारण कीं, कांहीं कांहीं प्रदेशांतील आंकड्यां-वरून थेट याच्या विरुद्ध बाजूनेंही अनुमानें काढतां येतील. उदाहरणार्थ, अंदमान बेटांत असा प्रकार दिसतो कीं, तेथील मूळ प्रजेंतील अस्सल वंशाचा जो भाग आहे त्यांत स्त्रियांचें आधिक्य असून, कमअस्सल प्रजेंत पुरुषसंख्या जास्त आहे. असाच प्रकार कोचीन येथील यहुद्यांसंबंधींही आढळून येतो. म्हणजे यांतील अल्पसंख्याक व शुद्धवंशीय वर्ग जो गोरे यहुदी या नांवानें ओळखला जातो, त्यांत स्त्रियांची संख्या जास्त असून, काळे यहुदी, कीं ज्या वर्गांत वंशाचा अस्सलपणा थोड्याफार प्रमाणांत नष्ट झाला आहे, त्यांत पुरुषांची संख्याच अधिक आढळते. त्याचप्रमाणें अँग्लोइंडियन वर्गांतही पुरुषांची संख्या स्त्रियांच्या मानानें जास्त आहे.

हिंदुस्थानामध्यें पुरुषांचें संख्याधिक्य केवळ हिंदु समाजापुरतेंच मर्यादित आहे असें नाहीं. जातिभेदातीत अशा समाजांतही तें आढळतें. परंतु या बाबतींत असें म्हणतां येईल कीं, मुसलमान, एतद्देशीय ख्रिश्चन किंवा काळे यहुदी हे धर्मांतरित हिंदु असल्यामुळें हिंदूंच्या मूळ आनुवंशिक प्रवृत्तींचा त्यांच्यामध्यें लोप झालेला नाहीं. जनवर्णनशास्त्राचा असा एक सिद्धांत

* History of Human Marriage या Westermark च्या ग्रंथावरून हें मत J. H. Hutton यांनीं Census of India, 1931- Report मध्यें उद्धृत केलें आहे.

आहे कीं, नैसर्गिक रीत्या स्त्रीबालकांची जीवनक्षमता पुरुषबालकांच्या जीवनक्षमतेच्या मानानें जास्त असते. तथापि, हिंदुस्थानांत स्त्रीप्रजेच्या वृद्धीस अनुकूल असलेली ही निसर्गाची प्रवृत्ति अनेक कारणांमुळें निष्फल होते. विदेशीय तज्ज्ञांकडून या बाबतींत जी कारणमीमांसा करण्यांत आली आहे, तींत शैशवावस्थेंत होणारी स्त्रीप्रजेची आबाळ या गोष्टीवर बरीच भर देण्यांत आली आहे. आणि ही गोष्ट कांहीं अंशीं तरी सत्य आहे हें निर्विवाद होय. हिंदुस्थानांतील कांहीं कांहीं भागांत स्त्रियांच्या उत्पत्तीच्या विरुद्ध रूढ झालेले पूर्वग्रह इतके बळावलेले दिसतात कीं, स्त्रीबालकांच्या जन्माचा संभव जास्त भासल्यास गर्भपातादि निंद्य प्रकारांचाही अवलंब केला जातो. जयपूर संस्थानांतील कछवाह रजपूत वंशांतील शेखावत शाखेंत दर १०० पुरुषांशीं ५३ स्त्रिया हें प्रमाण या बाबतींत ताबडतोब लक्षांत भरण्यासारखें आहे. ग्वाल्हेर संस्थानांतील भादौरिया व तोन्वार या रजपूत शाखांतही जवळजवळ हाच प्रकार (स्त्रियांची शेंकडेवारी अनुक्रमें ६३ व ६२) दिसून येतो.*

तथापि कांहीं एतद्देशीय अभ्यासकांच्या मतें गर्भपात, स्त्रीबालकांची आबाळ इ. कारणांमुळें स्त्रीसंख्या घटत चालल्याविषयींचीं अनुमानें काढण्यांत हिंदीतर लेखकांकडून व मिशनरी वगैरे लोकांकडून अतिशयोक्ति होत आहे. वरील प्रकारांचें अस्तित्व मान्य करूनही असें म्हणतां येईल कीं, त्यांचें प्रमाण एकंदर लोकसंख्येच्या मानानें फारच अल्प आहे व दर पिढीला वरील प्रकारांचा लोप होत चालल्याचें स्पष्टपणें निदर्शनास येत आहे.

वास्तविक पहातां स्त्रीसंख्या घटण्याचीं मोठीं महत्वाचीं कारणें म्हणजे प्लेग, इन्फ्ल्युएंझा वगैरे संसर्गजन्य रोगांचा प्रसार व बालविवाह व त्यापासून संभवणारी अकालिक मातृपदप्राप्ति हींच होत असें हिंदी तज्ज्ञ लेखकांचें मत आहे.* यासंबंधीं हिंदुस्थानविषयीं उपलब्ध असलेल्या आंकड्यांचें निरीक्षण केल्यास असें दिसून येतें कीं, मुलींची मृत्युसंख्या वयाच्या १० व्या वर्षापासून वाढत जाऊन ती वाढ ५४ व्या वर्षापर्यंत टिकलेली दिसते. आणि जन्मापासून वयाच्या १०व्या वर्षापर्यंत व ५५ व्या वर्षापासून पुढें पुरुषांची मृत्युसंख्या जास्त असल्याचें सर्वसाधारणतः दिसून येतें.

असो. तपशीलवार माहितीच्या अनुपलब्धतेमुळें स्त्रीपुरुषसंख्येच्या प्रमाणाच्या बाबतींत गोमंतक व ब्रिटिश हिंदुस्थान यांतील परिस्थितीचें साद्यंत व सूक्ष्मदर्शी विवेचन या ठिकाणीं करणें आपल्याला शक्य नसलें तरी, वर दिलेल्या माहितीवरून साधारणपणें असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं कीं, हिंदुस्थानांत स्त्रीसंख्या घटविणारीं जीं अनेक कारणें दिसून येतात त्यांचें अस्तित्व या प्रांतांतही अंशमात्रेंकरून मान्य करावें लागलें, तरी त्या कारणांना तिकडच्या मानानें इकडे फारच थोडा वाव असल्यामुळें, गोव्याच्या लोकसंख्येची स्त्रीपुरुष भेदानुसार विभागणी, निर्गमागमादि हालचाली जमेस धरल्यास, विशेष अनैसर्गिक मानतां येणार नाहीं.

---

* The Census of India, by M. S. Kamath, with a Foreword by Annie Besant; The Population Problem in India, by P. K. Wattal, M. A.; Population Problem in India, by B. T. Ranadive, M. A., इ. इ.

५. लोकगणतींत वयोमानाचें महत्व.

कोणत्याही राष्ट्रांतील उत्पादनक्षमता आणि त्या राष्ट्रांतील लोकसंख्येची वयोमानानुरूप रचना यांचा परस्पर संबंध अत्यंत घनिष्ठ आहे. अर्थात् या विषयाचा अभ्यास अर्थशास्त्रवेत्ते व जनवर्णनशास्त्रवेत्ते या उभयतांच्या दृष्टीनें अत्यंत आवश्यक होय यांत संशय नाहीं.

वयोमानानुसार लोकसमूहाच्या रचनेचा अभ्यास किती महत्वाचा आहे याचें नीट आकलन होण्यास पुढील आर्थिक व सामाजिक बाबींकडे लक्ष दिलें पाहिजे.

जन्मापासून ५ वर्षें वयापर्यंत मृत्युसंख्या जास्तींत जास्त भरते. सामान्यपणें सहाव्या वर्षाच्यापुढें सुधारलेल्या राष्ट्रांतून प्राथमिक शिक्षणाची सुरवात होते; एकविसाव्या वर्षापासून पुढें नागरिकांना कायदेशीर सज्ञानता प्राप्त होते, आणि निरनिराळ्या वयोमानाप्रमाणें त्यांची कायदेशीर जबाबदारीही बदलते. सैन्यभरतीच्या दृष्टीनें २० व्या ते ४० व्या वर्षापर्यंतच्या पुरुषसंख्येला अत्यंत महत्व आहे. गुन्हेगार लोकांची संख्या जास्तींत जास्त साधारणतः २० व्या ते ५० व्या वर्षांच्या दरम्यान आढळून येते. अर्थशास्त्राच्या दृष्टीनें पहातां १५ वर्षांच्या आंतील व ६५ वर्षांच्या पुढील वयाची जनसंख्या प्रायः अनुत्पादक किंवा कमी उत्पादनक्षम म्हणून समजण्यांत येते. विशिष्ट प्रदेशांतील वृद्धांच्या लहान किंवा मोठ्या संख्येवरून त्या प्रदेशांतील आरोग्यविषयक स्थिति अजमावतां येते व दीर्घजीवी प्रजेचें प्रमाण काढतां येतें. शीघ्रतेनें वृद्धि पावणाऱ्या लोकसमाजांत उत्पादनक्षमतेच्या दृष्टीनें असमर्थ अशा अज्ञान प्रजेचें प्रमाण फार मोठें असल्यास त्या समाजाची सर्वसाधारण स्थिति असमाधानकारकच समजली जाते. कारण, उत्पादनक्षम घटकांकडून निर्माण करण्यांत आलेल्या साधनांचा एक महत्वाचा भाग परोपजीवी व्यक्तींच्या पोषणासाठीं खर्च होऊन, त्या भागाचा जीवनक्रमांतील विविधता, आनंद व राहाणीचें उच्चत्व वाढविण्याच्या कामीं उपयोग होऊं शकणार नाहीं. एवंच वयोमानविषयक आंकडेवारी लोकस्थितीचें आकलन करण्याचें एक अत्यंत विश्वसनीय गमक आहे हें निर्विवाद होय.

वयोमानावरून लोकस्थितीचा अंदाज बांधण्यासाठीं निरनिराळे अर्थशास्त्रज्ञ व समाजशास्त्रज्ञ भिन्नभिन्न कसोट्या वापरतात. त्यांपैकीं सर्वांचा निर्देश येथें न करतां बेर्तिल्यॉं (Bertillon) या १९ व्या शतकांतील आंकडेशास्त्रज्ञानें सुचविलेल्या कसोटीपुरताच विचार करूं. बेर्तिल्यॉंनें लोकसंख्येच्या विभागणीसाठीं तीन गट कल्पिले असून त्यांच्या मर्यादा पुढीलप्रमाणें दिल्या आहेत:— पहिला गट - १५ व्या वर्षाच्या आंतील प्रजा. २ रा गट - १५ ते ५० व्या वर्षांतील प्रजा व ३ रा गट - ५० वर्षांपेक्षां जास्त वयाची प्रजा. पहिला व तिसरा गट म्हणजेच परोपजीवी लोकसंख्या, अर्थात् दुसऱ्या गटांतील लोकसंख्येच्या श्रमांवर अवलंबून असणारी प्रजा होय.

संडबॉर्गनें (Sundbarg) हीच वर्गवारी मान्य करून तिच्या आधारानें असें अनुमान काढलें आहे कीं, कोणत्याही नियमित लोकसमाजामध्यें जवळजवळ अर्धी प्रजा दुसऱ्या गटांत म्हणजे १५ ते ५० व्या वर्षांच्या दरम्यानच्या गटांत समाविष्ट झाली पाहिजे. या बाबतींत संडबॉर्गनें लोकसंख्येची, पुरोगामी (Progressiva), स्थिर (Estacionária) व प्रतिगामी (Regressiva) अशी वर्गवारी केली असून वरील तीन गटांपैकीं पहिल्या म्हणजे कमी वयाच्या गटांतील मनुष्यसंख्या शेवटच्या म्हणजे तिसऱ्या गटांतील

संख्येच्या दुप्पट भरेल तेव्हां ती लोकसंख्या पुरोगामी म्हणावी, प्रथम गटांतील संख्या या मर्यादेच्या जराशी खालीं उतरल्यास ती लोकसंख्या स्थिर व ३ ऱ्या गटांतील लोकसंख्या १ ल्या गटांतील संख्येपेक्षां अधिक भरल्यास ती लोकसंख्या प्रतिगामी समजावी असें मानलें आहे.* ही कल्पना स्पष्ट होण्यास पुढील कोष्टकाचा उपयोग होईल.

लोकसंख्येची वर्गवारी

वयोमाना-प्रमाणें गट	लोकसंख्येची शेंकडेवारी		
	पुरोगामी वर्ग	स्थिर वर्ग	प्रतिगामी वर्ग
०-१४	४०	३३	२०
१५-४९	५०	५०	५०
५० व पुढें	१०	१७	३०

वरील कोष्टकावरून असें दिसून येईल कीं, त्यांतल्या तीनही प्रकारांत मध्यम वयाच्या प्रजेचें प्रमाण सारखेंच आहे आणि प्रत्येक वर्गाचें भिन्नत्व १५ व्या वर्षाच्या खालच्या किंवा ५० वर्षांपेक्षां जास्त वयाच्या लोकसंख्येवर अवलंबून असतें. परंतु व्हीपल्नें Secessive व Accessive या दोन निराळ्या वर्गांचा उल्लेख करून पहिल्यांत निर्गमनामुळें मध्यम वयाच्या प्रजेचें प्रमाण घटलेल्या लोकसंख्येचा अंतर्भाव करून दुसऱ्यांत आगत प्रजेच्या आधिक्यामुळें तेंच प्रमाण वाढलेल्या लोकसंख्येचा समावेश केला आहे.

आतां गोमंतकीय लोकसंख्या या कसोटीला कितपत उतरते तें पाहूं.

वयोमानाप्रमाणें शेंकडेवारी

	०-१४ वर्षें	१५ ते ४९ वर्षें	५० वर्षें व त्याच्यावरील
गोमंतक	३५·०१	५०·४	१४·५
तिसवाडी	३४·४	५०·८	१४·८
सासष्टी	३४·०	५१·५	१४·५
बार्देश	३३·१	४९·१	१७·८
मुरगांव	३२·६	५६·३	११·१
पेडणें	३८·७	४७·४	१३·९
सत्तरी	३८·८	४७·१	१४·१
सांगें	३७·२	५२·६	१०·२
केपें	३७·३	५२·२	१२·५
काणकोण	३६·१	५१·४	१२·५

वरील आंकड्यांवरून आपल्या चट्कन लक्षांत येईल कीं, सबंध गोमंतकांतील किंवा गोमंतकाच्या निरनिराळ्या महालांतील लोकसंख्या संडबार्गच्या कोष्टकाप्रमाणें पुरोगामी या सदराखालीं येऊं शकतात. जिज्ञासू वाचकांसाठीं यापुढें हिंदुस्थानच्या निरनिराळ्या विभागांतील लोकसंख्येचे संडबार्गच्या वर्गवारीबरहुकूम आंकडे दिले आहेत ते त्यांनीं गोमंतकाच्या आंकड्यांशीं पडताळून पहावे.

* Vital Statistics, by G. C. Whipple - 2nd. Edition.

ब्रिटिश हिंदुस्थानची वयोमानाप्रमाणें शेंकडेवारी

इलाखा किंवा स्टेट	०-१४ वर्षे	१५ ते ४९ वर्षे	५० वर्षे व पुढील
अजमीर-मारवाड	३८·८	५२·०	९·२
अंदमान व निकोबार बेटें	२८·७	६३·६	७·७
आसाम	४२·२	४९·८	८·०
बलुचिस्तान	२४·९	७०·९	४·२
बंगाल	४०·८	५१·१	८.१
बिहार व ओरिसा	४०·२	५०·२	९·६
मुंबई (एडन खेरीज करून)	३९·७	५१·२	९·१
एडन	२६.२	६६.३	७·५
ब्रह्मदेश	३७·४	५१·३	११·३
मध्यप्रांत व वऱ्हाड	४०·१	५०·०	९·९
कुर्ग	३५·०	५७·२	७·८
दिल्ली	३६·३	५५·९	७·८
मद्रास	३८·९	५०·५	१०·६
सरहद्दप्रांत	४१·०	५०·४	८·६
पंजाब	४१·२	४८·१	१०·७
संयुक्त प्रांत	३८·९	५१·३	९·८
बडोदा स्टेट	३९·१	५०·४	१०·५
सेंट्रल इंडिया एजन्सी	४०·१	५१·५	८·४
ग्वाल्हेर स्टेट	३९·४	५२·०	८·६
हैद्राबाद स्टेट	३९·९	५०.०	१०·१
जम्मू व काश्मीर स्टेट	४०·६	५०·३	९·१
कोचीन स्टेट	४१·७	४८.२	१०·१
त्रावणकोर स्टेट	४२·६	४७·७	९·७
म्हैसूर स्टेट	४०·१	४९·९	१०·०
पंजाब स्टेट्स् एजन्सी	३९·९	४९·३	१०·८
राजपुताना एजन्सी	४०·७	४९·५	९·८
सिक्कीम स्टेट	४०·९	४७·६	११·५
वेस्टर्न इंडिया स्टेट्स् एजन्सी....	४२·०	४७·९	१०·१
एकंदर हिंदुस्थान	**३९·९ ....**	**५०·५ ....**	**९·६**

वरील तक्त्यांतील वर्गवारी संडबार्गच्या वर्गवारीबरहुकूम करण्यांत आली आहे हें स्पष्ट केलेंच आहे. पण सर एडवर्ड गेट यांनीं १९११ च्या हिंदुस्थानच्या खानेसुमारीच्या वेळीं आपलें असें मत प्रदर्शित केलें होतें कीं, हिंदुस्थानांतील प्रजेच्या आयुर्मानाची सरासरी

लक्षांत घेतां, संडबार्गनें ठरविलेल्या वयाच्या गटांत ०-१०,१५-४० व ६० वर्षांच्या वरील असा फरक करणें जरूर आहे; म्हणजे १० ते १५ व ४० ते ६० व्या वर्षापर्यंतची लोकसंख्या हिशेबांत धरूं नये. हें मत संमत धरल्यास वरील तक्त्याच्या रचनेंत बराच फरक होणार आहे.

६. वैवाहिक जीवन

वैवाहिक जीवन या सदराखालीं गोमंतकाच्या लोकसंख्येंतील अविवाहित, विवाहित व विधुर या वर्गांप्रमाणें विभागणी दाखवून तत्संबंधींच्या आंकड्यांचा विचार करावयाचा आहे. गोमंतकाच्या लोकगणतींत या तीन वर्गांखेरीज काडीमोड केलेल्यांचें (Divorciados) व कोर्टाकडून ज्या नवरा-बायकांची फारकत करण्यांत आली आहे (Separados judicialmente), अशांसंबंधींचेही आंकडे निराळे देण्यांत आले आहेत. ब्रिटिश हिंदुस्थानांत वरील तीन मुख्य वर्गांतच एकंदर लोकसंख्येची विभागणी करण्यांत आली आहे; कारण कीं, राहिलेल्या दोन वर्गांचा समावेश विधुरांमध्येंच करण्यांत यावा अशी सूचना खानेसुमारीच्या वेळीं गणतीदारांना देण्यांत आली होती. गोमंतकासंबंधींच्या आंकड्यांचा विचार करतांनाही, काडीमोड केलेल्यांची व कायद्यानें फारकत केलेल्या विवाहितांची संख्या फारच कमी असल्यामुळें (अनुक्रमें १२४ व ६), ब्रिटिश हिंदुस्थानांतल्याप्रमाणेंच त्यांचाही समावेश विधुरांमध्येंच करणें विशेष सोइस्कर होणार आहे.

लोकसंख्येच्या अभ्यासांत वैवाहिक अवस्थेसंबंधींचा विचार ही एक फार महत्वाची बाब आहे. कारण कीं, अनेक सामाजिक घडामोडी व हालचाली, विवाहित, अविवाहित किंवा विधुर यांच्या भिन्नभिन्न प्रमाणांवर अवलंबून असतात.

प्रो. बेंतु कार्केज या अर्थशास्त्रज्ञानें आपल्या "पोर्तुगीज जनता" या ग्रंथांत पोर्तुगालांतील गुन्हेगारीसंबंधानें एका अभ्यासकानें केलेल्या संशोधनाचा उल्लेख केला आहे. त्यांत १९०३ ते १९०८ या पंचवार्षिक कालांत पोर्तुगालांत शिक्षा झालेल्या गुन्हेगारांचें प्रमाण त्या त्या अवस्थेंतील लोकसंख्येच्या मानानें दर हजारीं पुढीलप्रमाणें पडतें असें दाखविलें आहे:- अविवाहित, ५·७; विवाहित ३·८; आणि विधुर २·०. मारो (Marro) या इटालियन आंकडेशास्त्रज्ञानें त्यापूर्वी (१८९०-१८९५) इटालींतील गुन्हेगारांसंबंधीं हेंच प्रमाण सिद्ध केलें होतें.

यावरून असा निष्कर्ष निघतो कीं, वैवाहिक स्थिति ही गुन्हेगारीकडील प्रवृत्ति घटविण्याच्या बाबतींत उपकारक ठरते. अर्थात् वाढत्या वयोमानाचाही परिणाम या बाबतींत झाल्याशिवाय रहाणार नाहीं. गुन्हेगारी घटविण्याच्या कामीं वैवाहिक स्थितीचा कोणत्या प्रमाणांत उपयोग होतो व वाढत्या वयोमानाचा किती होतो हें निश्चयात्मक रीतीनें ठरविणें कठीण आहे. सॉकेट (Socquet) नें १० लक्ष विवाहितांचें व १० लक्ष विवाह्य अविवाहितांचें निरीक्षण करून दर १०० अविवाहित गुन्हेगारांशीं ४९·२९ विवाहित गुन्हेगार — म्हणजे एक द्वितीयांशपेक्षांही कमी — आढळतात असा निष्कर्ष काढला आहे.

सामान्य नीतिमत्ता वाढविण्याच्या कामींच केवळ नव्हे तर आयुर्मान वाढविण्याच्या आणि आत्महत्येकडील प्रवृत्ति कमी करण्याच्या बाबतींतही वैवाहिक स्थिति उपकारक होते असें दिसून येतें. विवाहितांपैकीं संतति असलेल्यांत आत्महत्येचें प्रमाण संतति नसलेल्यांच्या मानानें कमी आढळून येतें. सन १९३१ च्या खानेसुमारीवरून वैवाहिक जीवनाविषयीं गोमंतकांतील लोकसंख्येची विभागणी पुढीलप्रमाणें दिसून येते:-

वर्ग	एकूण	पुरुष	स्त्रिया	एकंदर लोक-संख्येशीं शेंकडेवारी	पुरुष व स्त्रिया यांची परस्परांतील शेंकडेवारी	
					पुरुष	स्त्रिया
अविवाहित	२,४६,७९५	१,३८,३४१	१,०८,४५४	४८·८	५६·०५	४३·९५
विवाहित	१,९६,९९९	९२,८७८	१,०४,१२१	३८·९	४७·२	५२·८
विधुर	६१,४८७	१०,७१७	५०,७७०	१२·३	१७·४	८२·६

सन १९०० पासून करण्यांत आलेल्या चारही दशवार्षिक लोकगणतींवरून उपलब्ध झालेल्या आंकड्यांच्या आधारानें पुढील तक्ता देण्यांत आला आहे.

खानेसुमारीचें वर्ष	शेंकडेवारी		
	अविवाहित	विवाहित	विधुर
१९००	४७·६०	३९·८०	१२·६०
१९१०	४६·७०	४०·६०	१२·७०
१९२१	४८·६०	३८·८८	१२·५२
१९३१	४८·६५	३९·८६	११·४९

तुलनात्मक अभ्यासासाठीं ब्रिटिश हिंदुस्थानासंबंधींचे आंकडे पुढें देण्यांत येत आहेत :—

वर्ग	एकंदर लोकसंख्या *	पुरुष	स्त्रिया	एकंदर लो. सं. शीं शेंकडेवारी	पुरुष व स्त्रिया यांचें दर शेंकडा प्रमाण	
					पुरुष	स्त्रिया
अविवाहित	१४,६०,३६,०४४	८,६३,३८,००१	५,९६,९८,०४३	४१·८	५९·२	४०·८
विवाहित	१६,७८,१५,६९०	८,४२,०८,४६७	८,३६,०७,२२३	४७·९	५०·१	४९·९
विधुर	३,५९,०७,५८४	९६,५९,११६	२,६२,४८,४६८	१०·३	२६·९	७३·१

वैवाहिक स्थितीच्या दृष्टीनें गोमंतक व ब्रिटिश हिंदुस्थान यांची तुलना करतां वाचकांच्या सहज लक्षांत येईल कीं, अविवाहित व विधुर यांचें प्रमाण गोमंतकांत जास्त असून, विवाहितांची संख्या बरीच कमी आहे. या बाबतींत हिंदुस्थान व युरोप – विशेषेंकरून पश्चिम युरोप – यांची तुलना केल्यास हिंदुस्थानचें वैशिष्ट्य ठळकपणें आपल्याला पुढील गोष्टींत दिसून येईल:— (१) विवाहितांचें सार्वत्रिकत्व, (२) अल्पवयी विवाहितांचें आधिक्य आणि (३) विधवांचें फार मोठें प्रमाण.

* येथें हिंदुस्थानच्या एकंदर लोकसंख्येंतून ३०,७८,४६० एवढी संख्या, तपशीलवार माहितीच्या अभावीं, वजा करण्यांत आली आहे.

६. साक्षरता

कोणत्याही देशांतील जनतेच्या बौद्धिक दर्जाचा त्या देशाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीवर फार परिणाम होत असतो. शिक्षण-प्रसार व सामाजिक उत्कर्ष यांचा परस्परसंबंध निकट आहे. परंतु समाजाचा मानसिक दर्जा अजमावण्यास केवळ साक्षरतेचीच कसोटी पुरेशी होईल असें निश्चयात्मक विधान करणें धाडसाचें ठरेल. विशिष्ट प्रदेशांतील प्रजेस मिळणाऱ्या शिक्षणाच्या योग्यतेचें माप वाचणाऱ्यांच्या आणि लिहिणाऱ्यांच्या संख्येवरून बिनचूकपणें काढतां येणार नाहीं. किंबहुना असेंही म्हणतां येईल कीं, राष्ट्रीय उत्पादन-कार्याच्या दृष्टीनें आपल्या व्यवसायांत तरबेज असलेले धंदेवाईक लोक तुटपुंजें शिक्षण किंवा केवळ अक्षरओळख झालेल्या नागरिकांपेक्षां समाजाला जास्त उपयोगी ठरूं शकतात.

साक्षरता या शब्दाचा अर्थ कांहींसा संदिग्ध असल्यामुळें खानेसुमारीच्या अधिकाऱ्यांनीं त्याची व्याख्या कोणत्याही भाषेंत एखादें पत्र लिहितां येणें व लिहिलेलें पत्र वाचतां येणें अशी ठरविली आहे. १९३१ च्या अगोदरच्या लोकगणतींत कोणत्याही भाषेंत साक्षर असलेल्यांचे आंकडे सरसकट गोळा करण्यांत येत असत. परंतु १९३१ च्या खानेसुमारींत पोर्तुगीज हिंदुस्थानांतील राजभाषेच्या ज्ञानाचा प्रसार अजमावण्याच्या हेतूनें पोर्तुगीज भाषेंत साक्षर असणाऱ्यांच्या संख्येचीही मोजदाद करण्याची प्रथा पाडण्यांत आली.

गोमंतकांतील साक्षरांची संख्या ८९,४५४ असून त्यांपैकीं ५९,२५७ पुरुष आणि ३०,१९७ स्त्रिया आहेत. म्हणजे साक्षरांचें दरशेंकडा प्रमाण १७·७ असून, पुरुष साक्षरांची शेंकडेवारी ११·७ व स्त्री साक्षरांची ६·० आहे. परंतु एकंदर लोकसंख्येंतून ७ व्या वर्षापर्यंतचीं मुलें वगळून साक्षरतेचें प्रमाण काढल्यास साक्षरांचें दर शेंकडा प्रमाण २०·१३ दिसून येतें, किंवा पुरुष साक्षरांची शेंकडेवारी २८·२२ व स्त्रियांची १२·७८ दिसून येते.

पोर्तुगीज भाषाप्रसाराचे दृष्टीनें पहातां एकंदर गोमंतकांत राजभाषा जाणणारांची संख्या ४२,८५८ असून, त्यांपैकीं २७,७६५ पुरुष व १५·०९३ स्त्रिया आहेत. म्हणजे एकंदर लोकसंख्येंत पोर्तुगीज जाणणारांची शेंकडेवारी ८·५ असून त्यांपैकीं पुरुषांची शेंकडेवारी ५·६ व स्त्रियांची २·९ आहे.

पृष्ठ १४९ वर दिलेल्या तक्त्यांत महालवार साक्षरता दाखवण्यांत आली आहे. (आलेख नं. ४ पहा).

या तक्त्यांतील आंकड्यांवरून गोमंतकांत महालवार साक्षरतेचा प्रसार कसा झाला आहे हें दिसून येईल. या बाबतींत बार्देश महाल अग्रभागीं असून तेथील लोकांची साक्षरता (पुरुषांत ३४·४ व स्त्रियांत १९·२) इतर महालांपेक्षां जास्त आहे. बार्देशच्या मागोमाग तिसवाडीचा अनुक्रम लागत असून, सर्वांत कमी साक्षरत पेडणें आणि सत्तरी येथें दिसून येते. (आलेख नं. ४ पहा.)

धर्मभेदाप्रमाणें महालवार साक्षरतेची विभागणी पृष्ठ १५० वर दिलेल्या तक्त्यावरून दिसून येईल.

त्या तक्त्यावरून असा निष्कर्ष निघतो कीं हिंदूंमध्यें एकंदर लोकसंख्येशीं साक्षरांचें संख्येचें प्रमाण पुरुष दर शेंकडा २१·७ स्त्रिया ६·२ व ख्रिश्चनांमध्यें तेंच प्रमाण पुरुष २६·८ व स्त्रिया १६·१ हें आहे.

महालवार साक्षरतेचा तक्ता

महालाचें नांव	सर्वसामान्य साक्षरता						पोर्तुगीज भाषेंतील साक्षरता					
	एकूण संख्या	शेंकडेवारी	पुरुष	शेंकडेवारी	स्त्रिया	शेंकडेवारी	एकूण संख्या	शेंकडेवारी	पुरुष	शेंकडेवारी	स्त्रिया	शेंकडेवारी
गोमंतक	८९,४५४	१७·७	५९,२५७	११·७	३०,१९७	६·०	४२,८५८	८·५	२७,७६५	५·६	१५,०९३	२·९
तिसवाडी	१५,६१५	२४·८	९,९९४	३२·४	५,६२१	१७·४	१०,०२९	१६·०	६,३२३	२०·५	३,७०६	११·६
सासष्टी	२०,६११	१९·२	१३,५००	२७·१	७,१११	१२·२	१४,४९६	१३·४	९,३६८	१८·८	५,१२८	८·८
बार्देश	२७,२३५	२५·८	१५,८१०	३४·४	११,४२५	१९·२	११,४७९	१०·८	६,६००	१४·३	४,८७९	८·२
मुरगांव	४,३९५	१९·१	३,१६१	२७·३	१,२३४	११·६	२,००७	८·७	१,३१५	१०·६	६९२	३·५
पेडणें	३,२०७	७·६	२,६३७	१३·६	५७०	२·५	३९१	१·०	३४२	०·८	४९	०·१
सांवळी	४,२९४	१२·६	३,४५४	२०·९	८४०	४·९	९२७	२·७	७५०	४·४	१७७	१·०
सत्तरी	१,०५२	५·९	८३३	८·९	२१९	२·५	२३४	१·३	१९०	२·०	४४	०·५
फोंडा	७,३१९	१४·१	५,४३०	२०·७	१,९४९	७·६	१,६०७	३·१	१,३८५	५·२	२२२	०·८
सांगें	१,६८७	८·७	१,२९८	१२·६	३८९	४·२	५१९	२·६	४६७	४·५	५२	०·५
केपें	२,०१०	८·८	१,६०५	१३·८	४०५	३·५	७५२	३·३	६४७	५·६	११२	१·०
काणकोण	१,९६९	१०·९	१,५३५	१६·१७	४३४	४·५	४१०	२·१	३७८	३·९	३२	०·३

महाल	साक्षरांची संख्या			
	हिंदु		ख्रिश्चन	
	पुरुष	स्त्रिया	पुरुष	स्त्रिया
तिसवाडी	३,९२९	१,१६०	५,८१२	४,३९२
सासष्टी	२,८७३	९९६	१०,३१६	६,०७७
बार्देश	५,५६५	१,२४६	१०,१३९	१०,१५३
मुरगांव	१,२०६	२६४	१,५९६	९१५
पेडणें	२,२८८	४८१	३३७	८४
सांखळी	३,०६३	६५४	२७२	१७३
सत्तरी	६४४	१७०	८३	४३
फोंडा	४,८६२	१,७१५	४३६	२०४
सांगें	१,०७४	३३१	१७९	४९
केपें	१,१०१	२६७	३९८	१२२
काणकोण	१,३०८	३९०	१८१	३६
गोमंतक	२७,९१३	७,६७४	२९,७४९	२२,२४८

ब्रिटिश हिंदुस्थानांत साक्षरतेचें सर्वसाधारण प्रमाण दर शेंकडा ९·५ असून, पुरुषांच्या साक्षरतेची शेंकडेवारी १५·६ व स्त्रियांची २·९ आहे. परंतु हें प्रमाण काढतेवेळीं ५ व्या वर्षापर्यंतची लोकसंख्या वगळण्यांत आली आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. अर्थात् एकंदर लोकसंख्येच्या दृष्टीनें हें प्रमाण याच्याहीखालीं उतरणार हें स्पष्ट आहे. ब्रह्मदेशांत साक्षरतेचें प्रमाण हिंदुस्थानांतील इतर सर्व प्रांतांहून अधिक म्हणजे दर शेंकडा ३६·८ असून त्याच्या मागोमाग कोचीन (३३·७), त्रावणकोर (२८·९) व बडोदा (२०·९) हीं संस्थानें येतात. परंतु राजपुताना, ग्वाल्हेर, बिहार, ओरिसा, काश्मीर वगैरे विभागांत साक्षरतेचें प्रमाण दर शेंकडा ४ व त्याच्याहीपेक्षां कमी आहे. स्त्रियांच्या साक्षरतेच्या बाबतींत हिंदुस्थानासंबंधींच्या आंकड्यांचें निरीक्षण केल्यास, बहुतेक सर्वत्र स्त्रियांमध्यें साक्षरतेचा प्रसार फारच अल्प झाला असल्याचें दिसून येतें. मात्र केरळ आणि बडोदा येथें स्त्रीशिक्षणाचें पाऊल बरेंच पुढें पडल्याचें दिसतें. कोचीन संस्थानांत दर दोन साक्षर पुरुषांशीं एक साक्षर स्त्री असें प्रमाण असून, त्रावणकोरमध्येंही जवळजवळ तेंच प्रमाण आहे. मलबारमध्यें दर तीन साक्षर पुरुषांशीं एक साक्षर स्त्री असें प्रमाण असून बडोद्यांत त्याच्यापेक्षां थोडेंसें कमी आहे.

७. धर्मभेदाप्रमाणें लोकसंख्येची विभागणी.

गोमंतकांतील लोकसंख्येची धर्मवार विभागणी दर्शविणारे आंकडे पुढील तक्त्यांत दिले आहेत. (आलेख नं. ५ पहा).

धर्म	पुरुष	स्त्रिया	एकूण
हिंदु	१,२८,२१७	१,२२,२२६	२,५०,४४३
ख्रिश्चन	१,०९,५४१	१,३८,०२९	२,४७,५७०
मुसलमान	४,००२	२,९७९	६,९८१
इतर धर्म	१७६	१११	२८७
गोमंतक	२,४१,९३६	२,६३,३४५	५,०५,२८१

वरील आंकड्यांवरून असा निष्कर्ष निघतो कीं, गोमंतकीय लोकसंख्येची धर्मवार शेंकडेवारी हिंदु – ४९·५, ख्रिस्ती – ४८·९ व मुसलमान व इतर – १·६ ही आहे.

१९३१ च्या पूर्वीच्या तीन खानेसुमारींत हिंदु व ख्रिश्चन यांची संख्या पुढीलप्रमाणें होती:-

	हिंदु	ख्रिश्चन
१९०० —	२६०,१४४	२६२,६४८
१९१० —	२७०,१०५	२६८,३९८
१९२१ —	२७४,१८७	२४७,४७८

सन १९२१ ते १९३१ या दशकांत धर्मवार विभागणीच्या बाबतींत झालेली एक महत्वाची घटना म्हणजे ख्रिस्ती गावड्यांचें शुद्धीकरण ही होय. या घटनेमुळें हिंदूंच्या संख्येंत जवळजवळ १० हजारांची भर पडली आहे. तथापि शुद्धीकृत गावडे हे केवळ नाममात्रेंकरूनच ख्रिस्ती होते हें विसरतां कामा नये व त्या दृष्टीनें त्यांचें हिंदु धर्मांत प्रत्यागमन हें एका परीनें अपरिहार्य होतें असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. आतां यापुढें परदेशगमनादि हालचालींमुळें होणारे चढउतार वगळले तर, धर्मवार विभागणीच्या बाबतींत गोमंतकीय लोकसंख्येंत विशेष महत्वाचीं स्थित्यंतरें होण्याचा संभव नाहीं असें अनुमान काढण्यास हरकत नाहीं.

येथपर्यंत गोमंतकाच्या खानेसुमारीवरून उपलब्ध झालेल्या मुख्य माहितीच्या आधारानें आमच्या लोकस्थितीविषयीं कांहीं अनुमानें काढण्याचा यथाशक्ति प्रयत्न करण्यांत आला आहे. सांपत्तिक स्थिति, धंदा, शारीरिक व्यंगें इ. इतर सदरांविषयीं या लेखांत विवेचन करण्यांत आलेलें नाहीं. कारण या सदरांविषयीं उपलब्ध झालेल्या माहितीच्या बाबतींतील अवलोकनदोष व संकलनदोष हे जमेस धरल्यास त्या माहितीवरून विश्वसनीय विधानें करणें फारच कठीण व जोखमीचें झालें असतें. आंकडेशास्त्राच्या दृष्टीनें लोकस्थितीचा अभ्यास हा विषय फार महत्वाचा असून प्रस्तुत लेखकापेक्षां जास्त साक्षेपी व चाणाक्ष अभ्यासक या विषयावर सर्वांगपरिपूर्ण लेख लिहूं शकला असता हें प्रांजलपणें कबूल करणें भाग आहे. अशा प्रकारच्या व्यासंगी व सूक्ष्मग्राही अभ्यासकाकडून या बाबतींत अधिक तलस्पर्शी प्रयत्न होईपर्यंत हा लेख निदान सामान्य वाचकांस अंशतः तरी उपयुक्त वाटेल अशी आशा आहे.



आग्वादचा किल्ला

१०

गोमंतक आणि स्त्रीशिक्षण

श्री. शिवा फटू पै आंगले

प्रास्ताविक

कोणत्याहि समाजाची खरी कल्पना त्यांतील स्त्रियांच्या शिक्षणाचा प्रश्न घेतल्याविना कदापिहि करतां येणार नाहीं. कोणी म्हणतात की स्त्री व पुरुष हीं संसाररथाचीं दोन चाकें आहेत तर कोणी संसाररथावरील स्त्री ही सारथ्याप्रमाणें असून पुरुष हा धनुर्धर आहे, अशी कल्पना करतात. मला तरी या उपमा अपुऱ्याच वाटतात. वरवर पाहाणाऱ्याला स्त्रीजात व पुरुषजात अशीं समाजाचीं दोन अंगें किंवा दोन भाग कल्पितां आले, आणि त्यांच्या स्वतंत्र कार्यक्षेत्रांचा विचार करतां आला तरी खरी वस्तुस्थिति अशी आहे कीं ज्याप्रमाणें स्त्रीजातीच्या अस्तित्वावांचून समाजाच्या अस्तित्वाचा विचारच करणें हास्यास्पद होईल त्याचप्रमाणें स्त्रियांच्या कृर्तृत्वावांचून पुरुषांच्या कर्तृत्वाचा विचार करणेंहि अशक्य आहे, इतकें या उभय वर्गांचें कर्तृत्व अभिन्न होय. शिळी असली तरी स्त्रीवर्ग अशिक्षित असलेल्या समाजाला दिलेली अर्धांग वायूचा झटका झालेल्या इसमाची उपमा मात्र मला अधिक सार्थ वाटते. कारण त्यावरून रोग्याची असहाय्यता बरोबर अजमावतां येते. ही उपमा पसंत व्हावयाला मला दुसरेंहि एक कारण आहे. तें असें कीं आयुर्वेदाचार्यांचें असें म्हणणें आहे कीं डावें अंग लुलें पडतें तेव्हां मेंदूंत उजव्या बाजूला विकृति झालेली असते. अर्थात् एक अंग तेवढेंच कमकुवत आहे, असा सूर त्या उपमेतून निघत असतो आणि खरें कारण कोणत्या बाजूला आहे, तेंहि ध्वनित होतें! असो.

गोमंतकीय समाज म्हणून ज्याला संबोधावयाचें तो कोणता! असा एक प्रश्न आजच्या गोमतकाकडे पाहून उपस्थित होतो. गोमंतकाची अर्धी जनता ख्रिस्ती तर अर्धी हिंदु (इतर अल्पसंख्याक वगळले जातां) असें म्हणावयास हरकत नाहीं. आणि हे समाजाचे दोन भाग जसे धर्मानें तसेच संस्कृतीनेंहि परस्परांपासून अत्यंत भिन्न आहेत. पोर्तुगीज अंमलापूर्वीची परंपरा एक असली तरी मागाहून या दोन समाजांच्या जीवनास जें राजसत्तेचें बळ मिळावयाचें तें एकास मारक झालें तर दुसऱ्यास निराळ्याच दिशेनें प्रेरक झालें आहे. यामुळें हिंदु स्त्रियांच्या निरिक्षणावरून काढलेलीं अनुमानें ख्रिस्ती स्त्रियांस लागू करणें सर्वथैव अनुचित होय.

याशिवाय हिंदु स्त्रियांचा सामाजिक आणि राजकीय दर्जा, अर्थात त्यांचे कायदेशीर हक्क ख्रिस्ती स्त्रियांच्या हक्काहून भिन्न नाहींत. ब्रिटिश अंमलांतील स्त्रियांच्या हक्कांपेक्षां तर ते फारच मोठे आहेत. नवऱ्याच्या संपूर्ण मालमत्तेचा अर्धा हिस्सा बायकोचा आहे. मुलींचा वारसाहक्क सर्वतोपरी मुलांच्या हक्काच्या बरोबरीचा आहे. त्यावरून त्यांस स्वतःच्या या परिस्थितीची योग्य जाणीव होण्याचा ते-

वढा काय तो अवकाश, तो झाल्याबरोबर त्यांच्या जीवनपथांत कोणत्याहि प्रकारच्या अडी अडचणी राहिलेल्या नसल्यानें त्यांच्या प्रगतीचा विकास अप्रतिबंध आणि सुखकर होईल यांत काय संशय ?

या एकंदर विवेचनावरून असें दिसून येईल कीं स्त्रियांच्या शिक्षणाचा विचार करतांना प्रथमतः ऐतिहासिक स्थित्यंतरांकडे वळलें पाहिजे आणि नंतर ख्रिस्ती स्त्रियांचा व हिंदु-स्त्रियांचा पृथक विचार करून या उभय समाजांचा तुलनात्मक विचार केला पाहिजे. अशा रीतीनें प्राप्त परिस्थितीचें दर्शन घेतल्यानंतरच मला आपल्या आकांक्षांविषयीं दोन शब्द शेवटीं सांगावयाचे आहेत.

पूर्वकाल

वेदकाळीं स्त्रियांचा दर्जा पुरुषांइतकाच होता. पुरुषांप्रमाणेंच स्त्रियांचें उपनयन होत असून त्या वेदाध्ययनहि करीत असत. परंतु, स्मृति-पुराण काळाच्या पूर्व भागांत उपनयन संस्कार हा केवळ नाममात्र अस्तित्वांत राहिला. वेदाध्ययन वगैरे मागें पडलें व अशा रीतीनें स्त्रीशिक्षणाची अवनती सुरू झाली. बनारस येथील हिंदु युनिव्हर्सिटीचे अध्यापक डॉ. अनन्त सदाशिव अळतेकर यांच्या मतें "स्त्रियांच्या अवनतीचें खरें कारण आर्येतर स्त्रियांशीं विवाह करण्याची पद्धत होय." ह्या विवाहपद्धतीमुळें असंस्कृत स्त्रियांशीं संबन्ध आल्यामुळें उपनयनविधि जो नाममात्र होता तोहि कालांतरानें नष्ट झाला. याचा परिणाम असा झाला कीं विवाहकालमर्यादा संपुष्टांत येऊं लागली. ऋतुप्राप्तीनंतर दोन तीन वर्षांच्या आंत मुलीचें लग्न करावें हें धर्मसूत्रकारांचें मत मागें पडलें. बारा वर्षें लग्नाची वयोमर्यादा ठरविणारा मनु हा योग्य वराच्या अभावीं, मरेपर्यंत मुलीला अविवाहित ठेवावी असें सांगतो. परंतु हें मतसुद्धां मागें पडून कोणी रजोदर्शनापूर्वी तर कोणी ७ व्या किंवा ८ व्या वर्षी केलेले विवाह प्रशस्त मानूं लागले. अशा परिस्थितीमुळें स्त्रियांचें शिक्षण साहजिकच संपुष्टांत आलें.

वेदाध्ययन जरी मागें पडलें तरी कांहीं काळपर्यंत [इ. स. नन्तरच्या दोन चार शतकांत] कुलीन व संपन्न घराण्यांत मुलींना थोडेंबहुत वाङ्मयात्मक शिक्षण दिलें जात असे. या काळीं कांहीं स्त्रिया प्राकृताचा अभ्यास करीत असत व त्या भाषेंत कांहीं कवयित्रीही होऊन गेल्या. हालाच्या गाथासप्तशतींत ७ कवयित्रींचा उल्लेख आलेला आहे. शीलभट्टारिका, देवी, विजयांका ह्या कवयित्री बऱ्याच प्रसिद्ध होत्या. राजशेखरानें विजयांकेची तुलना सरस्वतीशीं केली आहे. 'रुसा' या नांवाच्या एका हिंदु विदुषीनें स्त्रीरोगावर एक पुस्तक लिहिलें होतें व त्याचें ८ व्या शतकांत आरबी भाषेंत भाषांतर करण्यांत आलें होतें. यावरून असें दिसून येतें कीं स्त्रियांना प्राचीनकाळीं पुरुषांप्रमाणेंच शिक्षण देण्यांत येत होतें पण कालांतरानें त्यांचा वेदाध्ययनाचा अधिकार नष्ट झाल्यामुळें त्यांमध्यें साक्षरतेचें प्रमाण घटत गेलें. मुसलमानी अमदानींत तर हें प्रमाण अगदींच खालीं गेलें. कांहीं उच्च कुलांतील स्त्रियांस, विशेषें करून क्षात्रकुलांतील स्त्रियांस, राज्यकारभाराचें त्याचप्रमाणें लष्करी शिक्षणहि दिलें जात होतें. पण ह्या गोष्टी अपवादात्मक होत्या. एकंदरींत स्त्रियां-

ाक्षरतेचें प्रमाण कमी साले असलें साधारण समाज असंस्कृत होता असें ृणतां यावयाचें नाहीं. कारण त्याच लोकभाषेंत ग्रंथनिष्पत्ति होऊं लाग- पुराणांच्या द्वारें अगर संतकवींच्या ामुळें हिंदुसंस्कृतिविषयक ज्ञानास ब- माज पारखा झाला नव्हता.

ांगितलेली परिस्थिति मुसलमानी अ- । अखेरपर्यंत अखिल भारतवर्षाची पाश्चात्यांच्या आगमनानें मुसलमानी ंपुष्टांत आला. १४९८ सालीं वास्को ानें जलमार्गें येऊन हिंदुस्तानच्या कि- र पाय ठेवला व १५१० त आल्बुके- तमाजीच्या सहाय्यानें गोवा बेटाला घातली. थोड्याच कालांत इतर लग- ांतहि पोर्तुगिजांच्या ताब्यांत आला ासून गोमंतकाच्या इतिहासाला निरा- ग लागलें. गोमंतकाचा जो भाग प्रथ- र्तुगिजांच्या ताब्यांत गेला तो जुम्या ादी [Velhas Conquistas] या संबोधिला जातो व त्यांत तिसवाडी, आणि बार्देश असे तीन महाल संभ- मागाहून ताब्यांत गेलेल्या प्रांतास काबिजादी (Novas Conquistas) ांव पडलें. नव्या काबिजादी पोर्तुगि- संपूर्णपणें हातीं गेल्यास अद्याप २०० झालीं नाहींत.

र्तुगिज अंमल स्थापन झाल्यानंतर कांहीं धार्मिक चळवळ फार जोरांत सुरू

र्मिक आक्रमणाची ही झळ नव्या काबि- ा लागली नाहीं. नव्या काबिजादी पोर्तु- च्या ताब्यांत ज ण्याच्या आधीच, गो- मंतकांतील धार्मिक जुलूम नष्ट झाला. असें जरी असलें तरी पण तेथील शैक्षणिक परिस्थिति कशी होती हें सांगणें कठीण आहे. खासगी रीतीनें कोणाहि श्रीमंताच्या घरीं किंवा ग्रामसंस्थेच्या मार्फत एखाद्या देवालयाच्या ''सोंडिया''वर कांहीं मुलें जमवून ''शेणैमाम'' त्यांना लिहिण्या वाचण्यास शिकवित असण्याचा बराच संभव आहे. तथापि मुलींनां शिक्षण दिलें असतां त्यांच्या भविष्यत्कालास धोका आहे, ही हिंदूंमधें पसरलेली सार्वत्रिक कल्पना येथेंहि होती.

स्त्रीशिक्षणासाठीं ख्रिस्तीलोकांनीं केलेले प्रयत्न

पोर्तुगिज सत्ता स्थापन झाल्यानंतर गोमंतकाचा संबंध भारतवर्षाशीं सर्वथैव तुटलेला नसला तरी ती सत्ता स्थापन झाल्यापासून गोमंतकाच्या इतिहासास निराळें वळण लागलें व तेथपासूनच त्याचा स्वतंत्र इतिहास सुरू झाला हें निर्विवाद होय.

पोर्तुगिज सत्तेनंतर गोमंतकांत दोन समाज ठळकपणें दिसूं लागले. एक हिंदु व दुसरा ख्रिस्ती. पहिल्यानें आपली भाषा व संस्कृति कायम ठेवली व दुसऱ्यानें आपला धर्म सोडला त्याबरोबरच संस्कृतीचाहि त्याग केला व पर्यायानें परकी भाषेचाहि स्वीकार केला. सरकारकडून किंवा इतर धार्मिक संस्थांकडून जे शिक्षणासंबंधीं प्रयत्न झाले त्यांचा फायदा ख्रिस्ती लोकांनाच जास्त मिळाला. आणि स्त्रियांच्या बाबतींत पाश्चात्यांचा दृष्टीकोण आपल्यांतील दृष्टीकोणापेक्षां विशेष उदार असल्यामुळें त्या प्रयत्नांचा फायदा ख्रिस्ती स्त्री-

वर्गास बराच मिळाला तेव्हां त्या प्रयत्नांचें संक्षिप्त आलोचन केल्याशिवाय पुढें जाणें इष्ट नाहीं.

आपल्या सत्तेचा अंमल स्थीर झाल्यावर दोन वर्षांच्या आंतच आलबुकेर्कनें पोर्तुगीज भाषा व संकृति यांच्या प्रसारासाठीं त्याचप्रमाणें नोकरवर्ग तयार करण्यासाठीं कांहीं शाळांची योजना केली. परंतु ३० वर्षांच्या आंतच सर्व शिक्षणसंस्था धार्मिक सत्तेच्या हातीं गेल्या.

१५९८ सालीं "Recolhimento de Serra" या संस्थेची स्थापना झाली. हीच स्त्रियांप्रीत्यर्थ करण्यांत आलेली पहिली योजना होय. या संस्थेंत चांगल्या वर्तनाच्या मुलींनांच प्रवेश मिळे. अधिकाऱ्यांच्या हुद्यांवर कुलीन विधवांची अगर एखाद्या सधवा स्त्रीची नेमणूक होण्यास हरकत नसे. परंतु क्वचित् प्रसंगीं गव्हर्नरसाहेब अधिकारातिक्रम करून नवऱ्याशीं न पटणाऱ्या स्त्रियांसहि आपल्या मर्जीनुसार तिकडे पाठवीत असत. ह्या मुलींचा बहुतेक काळ धार्मिक विधि, व्रतें वैकल्यें, उपोषणें यांतच जात असून, राहिलेला काळ थोडें शिवणकाम, धार्मिक स्तोत्रांचें पठण, थोडेंसें गाणें [धार्मिपद्धतीचें असावें] वगैरे व्यवसायांत जात असे. लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे ज्यांचे आईबाप हिंदी असतील त्यांना या संस्थेंत प्रवेश मिळण्यास मज्जाव असे. यावरून सदर संस्थेची व तिच्या कार्याची कल्पना करतां येईल.

१६०६ सालीं "Mosteiro de Santa Mónica" ह्या मठाची स्थापना झाली. ज्या स्त्रियांना भ्रम करावयाचें नसून आमरण अविवाहित राहावयाचें होतें त्यांना येथें दिक्षा दिली जात असे.

१६९४ सालीं Conde de Alvor या व्हायसरायनें एक जाहिरनामा काढून असें फर्मावितें कीं "देशी स्त्रियांचीं लग्नें गोऱ्या लोकांशीं होण्यांसाठीं व त्याचप्रमाणें धर्मप्रसारासाठीं व कांहीं काळानंतर आपली मातृभाषा सोडून सगळ्यांनीं सरसकट एकच भाषा वापरावी यासाठी ३ वर्षांच्या आंत एकंदर गोमंतकीय जनतेनें पोर्तुगीज भाषा शिकावी. ह्या मुदतीनंतर दुसरी भाषा वापरण्यांत येणार नाहीं व वापरणारास कडक शिक्षा फर्मावि-ण्यांत येईल." ह्या सरकारी हुकमास अनुसरून १७४५ सालीं आर्चबिशप D. Frei Lourenço de Santa Maria यानीं एक आज्ञारायस प्रसिद्ध कला. त्याचा आशय असा की "ज्या कोणास धार्मिक दिक्षा घ्यावयाची असेल त्यांना व त्यांच्या गोतावळ्यांतील माणसांस-पुरुष व स्त्रिया मिळून-पोर्तुगीज भाषा माहित असल्याचा दाखला दिल्याशिवाय ती दिक्षा देण्यांत येऊं नये व न शिकलेल्या लोकांचा विवाह होण्यास मनाई असावी."

अशा या जुलमी व अव्यवहार्य फर्मानांचा परिणाम म्हणण्यासारखा झाला नसल्यास आश्चर्य नाहीं. पण एक गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी होय ती हीच कीं, कोणत्याहि कारणामुळें कां असेना, स्त्रियांना निदान भाषाशिक्षण देण्याचा प्रयत्न त्या काळीं करण्यांत आला होता. तरी गेल्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंत स्त्रीवर्गांत पोर्तुगिज शिक्षणाचा प्रसार म्हणण्यासारखा झाला नव्हता व खुद्द पोर्तुगिजांचे

णून संबोधल्या जाणाऱ्या वर्गातील स्त्रियांची पोर्तुगिज भाषा "मासले-होती, असें तत्कालिन लेखकांनी माहितीवरून समजतें.

शतकाच्या पूर्वार्धाच्या शेवटाच्या स्त्रीशिक्षणासंबंधीं व्यवस्थित प्रयत्न डून करण्यांत आले. १८४१ सालीं व फक्त मुलींसाठींच प्राथमिक शाळा च्या मुख्य ठिकाणीं स्थापन करण्याचा सिद्ध झाला व त्यांच्या खर्चाची तरतूद ाकडून करविण्यांत आली.

४ सालीं पोर्तुगाल सरकारकडून शि-टणेचा कायदा करण्यांत आला. त्या ं मुलींच्या प्राथमिक शाळांच्या अ-मांत पुढील विषय घालण्यांत आले. वाचन व गणित, नीतिविषयक मूल-ख्रिस्ती धर्माचीं मूलतत्वें, सभ्यतेचीं व साधें शिवणकाम.

विक ह्या शाळांपैकीं पहिली शाळा येथें १८४६ त स्थापन होऊं शकली. शाळांसाठीं योग्य अशा शिक्षकिणीच वेळीं उमेदवार म्हणून पुढें आल्या

५४ सालीं मडगांव व म्हापसें येथें ठीं आणखी दोन शाळा उघडण्यांत

७१ च्या डिसेंबरच्या १ ल्या तारखेस ा जेराल" (Junta Geral) च्या ा Visconde de S. Januário हर्नरनें तिसवाडी, सासष्ठी व बार्देस क मुलींची शाळा स्थापन करण्याचा बेत जाहीर केला. यांपैकीं पहिली शाळा स्थापन करण्यासाठीं गोव्यांत व माकाव [चीनमधील पोर्तुगीज वसाहत] येथें फंड जमा करण्यासाठीं कमिट्या नेमण्यांत आल्या. माकाव येथून रु. ५२३८-३-८ची मदत आली. पण तेवढ्यानेंच कामभागण्यासारखें नव्हतें म्हणून "सांता मोनिक" (Santa Mónica) या नामशेष झालेल्या मठाच्या उत्पन्नांतून कांहीं खर्च वरील शाळेसाठीं करण्यांत यावा असा हुकुम काढण्यांत आला. परंतु त्या योजनेस मूर्त स्वरूप आलें नाहीं. वरिष्ठ सरकारकडून ही योजना मान्य करण्यांत आली नाहीं व मठाच्या उत्पन्नाची विल्हेवाट इतर मार्गाने करण्याचा हुकुम देण्यांत आला.

१८८१ सालीं स्थानिक सरकारकडून शिक्षणाची पुनर्घटना करण्यांत आली व कित्येक प्राथमिक शिक्षणाच्या मुलींच्या शाळा उघडण्यांत आल्या. मुलींसाठीं शिवणकाम, भरतकाम, सूपशास्त्राची माहिती वगैरे जादा विषय ठेवण्यांत आले.

D. Aires de Ornelas या नांवाच्या ख्रिस्ती धर्माधिकाऱ्यानें (Arcebispo) स्त्रीशिक्षणासाठीं कांहीं प्रयत्न चालविले, परंतु त्याची इच्छा सफल झाली नाहीं. पोर्तुगालहून शिक्षकिणीचें काम करण्यासाठीं कांहीं "दोरोतेय" पंथी बाया मागविण्यांत आल्या, परंतु खुद्द पोर्तुगालांतच मुलींच्या शिक्षणासाठीं या बायांची संख्या अपुरी पडत असल्याचें उत्तर आलें.

ह्याच सुमारास सासष्ठी येथील नगरपालिकेनें एक मोठी जाहीर सभा भरवून "Instituição Ornelas" या नावांची स्त्रीशिक्षणाची संस्था मडगांव येथें स्थापन करण्याचा

ठराव केला. सासष्टी येथील प्रख्यात लोकाग्रणी José Inácio de Loiola यांनीं १८८२ सालीं "Junta Geral de Provincia" या सरकारी विधिमंडळांत तिसवाडी (Ilhas), सासष्टी व बार्देस येथें स्त्रीशिक्षणाच्या संस्था स्थापन करण्याचा ठराव पास करून घेतला, व त्याप्रमाणें सरकारी हुकुमहि प्रसिद्ध करण्यांत आला. परंतु हे सगळे ठराव व हुकुम कागदावरच राहिले.

१८८१ सालीं "Santa Casa da Misericórdia" या संस्थेनें आपल्या अनाथालयांत दिल्या जाणाऱ्या शिक्षणाची सुधारणा करण्यासाठीं १७५० रुपयांच्या वार्षिक वेतनाची एक बाई पोर्तुगालहून आणविली व तिला २०० रु. वेतनाची एक मदतनीस दिली. पण मुख्य शिक्षकीणच आपल्या कामास नालायक असल्यावरून तिला सोडचिठ्ठी देणें भाग पडलें!

१८८७ सालीं वर निर्देशिलेल्या "Santa Casa" या संस्थेच्या आश्रयाखालीं "फ्रांसीस्कन" पंथी बायांनीं रायबन्दर नजीक चिमल येथें "Colégio da N. S. da Piedade" या नांवाची स्त्रीशिक्षणाची संस्था स्थापन केली व थोड्याच कालानंतर तिचें पणजी येथें स्थलांतर करण्यांत आलें. ता. १८ एप्रिल १९०१ च्या कायद्यानें, १८३५ च्या कायद्याच्या प्रधान हेतूस बगल देऊन धार्मिक पंथीयांस गोमंतकांत प्रवेश मिळूं लागला व वरील संस्थेवर व तींत दिल्या जाणाऱ्या शिक्षणाच्या अभ्यासक्रमावर सरकारी नियंत्रण ठेवण्यांत आलें. त्याच्या आधीं व ती संस्था सरकारी मालकीच्या इमारतींत आणण्यांत आली होती. आणि तेथें ती १९१० पर्यंत म्हणजे राजसत्ताक पद्धति नष्ट होऊन प्रजासत्ताक पद्धति स्थापन होईपर्यंत कायम राहिली. प्रजासत्ताक पद्धति अमलांत आल्यानंतर धार्मिक सत्तेचें प्रस्थ बरेंच कमी झालें व त्यामुळें धार्मिक पंथी कांही संस्था नष्टप्राय झाल्या.

१८९२ साली Ferreira do Amaral या वसाहतीच्या प्रधानानें शिक्षणाच्या पुनर्घटनेचा कायदा प्रसिद्ध केला. त्या कायद्यानें प्राथमिक शिक्षणाच्या शाळांत मुलींसाठीं कांहीं जादा विषय ठेवण्यांत आले.

वर उल्लेखलेल्या सरकारी प्रयत्नांबरोबरच कांहीं खासगी प्रयत्नहि स्त्रीशिक्षणासंबंधीं करण्यांत आले होते. १८९४ सालीं Manuel Agostinho Lourenço (सुविख्यात Dr. Agostinho Vicente Lourenço या गोमंतकीय शास्त्रज्ञाचे पुतणे) यांनीं कांहीं होतकरू मित्रांच्या सहाय्याने "Instituto Dona Amélia d'Orleans" या नांवाची एक स्त्रीशिक्षणाची संस्था मडगांव येथें स्थापन केली. थोड्याच कालानन्तर Lourenço हे ब्राझीलला गेले व त्यांच्या पश्चात योग्य चालकांच्या अभावीं संस्थेवर समाधि घेण्याची पाळी आली.

५ अक्टोबर १९१० रोजीं पोर्तुगालांत प्रजासत्ताक राज्याची स्थापना झाली व Dr. Couceiro da Costa हे पोर्तुगिज हिंदुस्तानचे गव्हर्नर झाले. प्रजासत्ताक राज्याच्या कायद्यामुळें फ्रांसीस्कन पंथी बायांना देशत्याग करणें प्राप्त झालें व मागें उल्लेखलेली Colégio de N. S. da Piedade ही संस्था बंद झाली. अशा परिस्थितींत स्त्रीशिक्ष-

णाची गैरसोय होऊं नये म्हणून, ता. ४ जानेवारी १९११ च्या फर्मानानें Dr. Couceiro da Costa या गव्हर्नरनें "Escola Nacional do Sexo Feminino" ही संस्था निर्माण केली व तिला एक वसतिगृह जोडण्यांत आलें. ह्या शाळेंत पोर्तुगिज प्राथमिक शिक्षणाशिवाय, पोर्तुगीज, फ्रेंच व इंग्लिश ह्या भाषा, आणि गायन-वादन, चित्रकला, शिवणकला इत्यादि विषयांचें ऐच्छिक शिक्षण दिलें जातें.

वैद्यकीय शाळा (Escola Médica) व लिसेव, या शिक्षणसंस्थांतून जें शिक्षण दिलें जातें त्याचाहि फायदा कमी अधिक प्रमाणांत स्त्रीवर्गाकडून घेतला जातो, असें जरी असलें तरी त्या संस्था मुद्दाम स्त्रीवर्गासाठींच निर्माण केलेल्या नाहींत हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

नोर्मल स्कूल हें प्राथमिक शाळांचे शिक्षक व शिक्षकिणी तयार करण्यासाठींच असल्यानें, या शिक्षणसंस्थेचा फायदा खिस्ती स्त्रीवर्गाकडून भरपूर घेतला जात आहे. तूर्त सरकारी प्राथमिक शाळांच्या शिक्षकांची संख्या १७३ आहे त्यांपैकीं ६९ शिक्षकिणी आहेत.

हिंदु स्त्रियांच्या शिक्षणासाठीं झालेले प्रयत्न

येथवर गोमंतकांत पोर्तुगिज सरकारानें स्त्रीशिक्षणासंबंधी केलेल्या प्रयत्नाचें विवेचन संकलित स्वरूपांत करण्यांत आलें. परंतु हे सगळे प्रयत्न पोर्तुगिज भाषेतून झाल्यामुळें त्यांचा फायदा हिंदु जनतेस बिलकुल झाला नसल्यास आश्चर्य नाहीं.

हिंदूंचे आचारविचार व संस्कृति राजकर्त्यांचे आचारविचार व संस्कृति यांपासून भिन्न आहेत. ही गोष्ट लक्षांत घेऊन स्त्रीशिक्षणासंबंधी जे प्रयत्न गोमंतकांत हिंदुलोकांकडून करण्यांत आले त्यांचें थोडेसें दिग्दर्शन करणें अवश्य आहे. गुरुवर्य धोंडो केशव कर्वे यांच्या प्रयासांमुळें महाराष्ट्रांत स्त्रीशिक्षणासाठीं जे प्रयत्न करण्यांत आले त्यांची थोडीशी लाट गोमंतकांतील विचारी हिंदु सुशिक्षितांच्या मनांत उसळल्याशिवाय राहिली नाहीं. परंतु ही लाट बरींच वर्षें मनांतच राहिली. तिचा फलयुक्त परिणाम म्हणण्यासारखा दिसला नाहीं. गोमंतकाचे एक सुपुत्र प्रो. धर्मानंद कोसंबी यानीं मागें एक मुलींची शाळा काढण्याचा प्रयत्न केला होता. पण तो मूर्त स्वरूपांत आला नाहीं.

१९२२ सालानंतर कांहीं वर्षेंपर्यंत गोमंतकीय हिंदु महिलांच्या शिक्षणाची तरतूद झाल्याचें आढळून येत नाहीं. स्त्रीशिक्षणासंबंधीं विचार पुष्कळ सुशिक्षित व्यक्तींकडून खासगी रीतीनें व जाहिर सभांतूनहि मांडण्यांत येत होते पण त्या विचारांनां वाचा फुटली नव्हती.

१९३१ सालच्या डिसेंबरांत भरलेल्या "Congresso Provincial" च्या अधिवेशनांत हिंदु मुलींच्या शिक्षणासंबंधीं कांहीं ठराव करण्यांत आले. प्रांतिक कांग्रेसच्या इतर पुष्कळशा ठरावांप्रमाणें त्याहि ठरावांची वासलात लागली असल्यास त्यांत नवल नाहीं. ही कांग्रेस जरी सगळ्यांची असली तरी तींत मुख्यत्वें भाग घेणारे आमचे खिस्ती बांधवच होत. हिंदुविषयी आपलेपणा दाखविण्यासाठीं खास हिंदूंसाठीं म्हणून कांहीं विषय चर्चेस घेतले जात असत. अशाच विषयांपैकी "हिंदु स्त्रियांचें शिक्षण" हा एक विषय १९३१ च्या

'कांग्रेस' मध्यें घेण्यांत आला व त्यासाठीं श्री. डॉ. आत्माराम गोविंद बोरकर व श्री. शांबासव सरदेसाई यांकडून चालक मंडळानें योजना मागवून घेतल्या. त्या दोन्हीं योजनांचा सारांश असा कीं हिंदु मुलींच्या मराठी प्राथमिक शिक्षणानंतर व विवाहपूर्व मध्यकालांत त्यांस दुय्यम शिक्षण देण्यासाठीं खास स्थानिक परिस्थिति व गरजा लक्षांत घेऊन, पुणें येथील महिलाविद्यापीठास जोडल्या गेलेल्या शाळांच्या धर्तीवर सरकारनें येथें शाळा स्थापन कराव्या. या शाळांत दिलें जाणारें शिक्षण मराठींतून असावें व तें हिंदु शिक्षक किंवा शिक्षकिणींकडून दिलें जावें. आपल्या योजनांचें भरपूर समर्थन दोघांनींहि केलें होतें. परंतु त्यांत 'कांग्रेस' मधील कांहीं ख्रिस्ती गृहस्थांस व खुद्द हा विषय चर्चेस घेण्यांत येणाऱ्या शाखाअधिवशना अध्यक्ष यांस त्या योजना "प्रतिगामी व प्रतिक्रियात्मक" (retrógradas e reaccionárias) वाटल्या. ह्या विषयावर बरीच चर्चा झाली. अखेरीस खालील ठराव पास करण्यांत आले:

१ गोमंतकांतील हिंदु स्त्रियांचें शिक्षण मराठींतून दिलें जावें, व त्यांत हिंदु समाजाच्या गरजांकडे विशेष लक्ष पुरविण्यांत यावें.

२ फोंडें येथें हिंदु मुलींसाठीं विवाहपूर्वकालांत शिक्षण देण्याकरितां एक महिलाविद्यालय स्थापन करण्यांत यावें व त्यांत दिलें जाणारें शिक्षण मराठींतूनच, मुख्यत्वें हिंदु शिक्षक अगर शिक्षकिणींकडून दिलें जावें.

वरील ठराव हे कांग्रेसनें केलेल्या इतर पुष्कळशा ठरावांप्रमाणें कागदावरच राहिले असल्यास त्यांत नवल नाहीं.

"सारस्वत ब्राम्हण समाजाच्या नवीन इमारतीच्या उद्घाटन प्रसंगीं भरलेल्या सभेंत, कांहीं वक्त्यांकडून स्त्रीशिक्षणाचा जोरानें पुरस्कार करण्यांत आला होता व त्याच संस्थेच्या २० व्या वाढदिवसप्रसंगीं प्रस्तुत लेखकाकडून समारंभाचा अध्यक्ष या नात्यानें समाजाच्या गरजांचा उहापोह करतांनां स्त्रीशिक्षणावर विशेष भर देण्यांत आला होता. त्यापुढील वर्षी व्याख्यानमालेच्या प्रसंगीं चर्चेसाठीं सुद्धां हाच विषय घेण्यांत आला होता.

या गोष्टी समाजांत स्त्रीशिक्षणाबिषयीं जोराचे विचारप्रवाह चालू होते, यांचें एक लक्षण होत्या, असें म्हणावयास हरकत नाहीं.

त्यानंतर मडगांव शहरांत स्त्रीशिक्षणासंबंधी संघटित असे दोन निरनिराळे प्रयत्न करण्यांत येऊन सेवा समितीचें "आदर्श वनिता विद्यालय" व समाजसेवासंघाचें "महिला विद्यालय" ह्या दोन स्त्रीशिक्षणास वाहिलेल्या संस्था अस्तित्वांत आल्या. ह्या दोन्ही संस्था तूर्त भरभराटींत आहेत व त्यांच्या कार्याचा समाजावर जो परिणाम झाला किंवा होत आहे त्याचा आढावा घेण्याची अद्याप वेळ आलेली नाही. पणजी येथें गेल्या सालापासून "महिला विद्यालया"चा उपक्रम करण्यांत आला आहे.

तुलनात्मक विचार

येथवर जी माहिती देण्यांत आली तिजवरून स्त्रीशिक्षणार्थ गोमंतकांत सरकारी किंवा खाजगी स्वरूपाचे प्रयत्न कसकसे करण्यांत आले याची स्थूलमानानें वाचकांस कल्पना येईल. सरकारकडून किंवा ख्रिस्ती लोकांकडून

जे प्रयत्न झाले व होत आहेत त्यांचा फायदा हिंदु जनतेला कोणत्याच प्रकारें झाल्याचें दिसून येत नाहीं. आणि त्याचें कारण म्हणजे तें शिक्षण पोर्तुगीज भाषेतून व युरोपियन संस्कृतिप्रसारार्थ देण्यांत येत आहे हेंच होय. हिंदु स्त्रियांच्या गरजा त्यांत लक्षांत घेतल्या जात नाहींत. कालाच्या ओघामुळें गोमंतक ज्या स्थितीप्रत पोंचला आहे, त्या स्थितींत परकी भाषा व परकी संस्कृति या दोन्हीं गोष्टींशीं समरस होणें हिंदु पुरुषवर्गास साधले नाहीं (व ते त्यांस इष्टहि नाहीं) तें स्त्रीवर्गास कसें साध्य होईल? कायद्यानें कांहीं हिंदु स्त्रीवर्गास वरील शिक्षणाचा उपयोग करून घेण्यास मज्जाव केला नाही ही गोष्ट जरी खरी असली तरी पण तें शिक्षण हिंदु स्त्रीवर्गाच्या आजच्या गरजा भागभागविण्यास अगर त्यांच्या आकांक्षा पुरविण्यास काडिमात्र उपयोगी नाहीं. पोटांत जाणाऱ्या अन्नाचें पचन झालें पाहिजे. नाहींतर त्याचा काय उपयोग? स्वभाषेंत दिलें-जाणारें शिक्षण हेंच आमच्या स्त्रीवर्गास मानवणारें आहे. "करकोचानें खीर तयार करून बाटलींत घातली ती फक्त आपल्यासाठींच होती असें त्याचें म्हणणें नव्हतें. ती कोल्ह्यासाठींहि होती. परंतु कोल्ह्याला मात्र तिचा उपयोग झाला नाहीं. त्याला जर ती योग्य भांड्यांतून दिली गेली असती तर तिचा त्यानें अवश्य फायदा करून घेतला असता." ही श्री. शांबारावजींनीं Congresso Provincial मधें हिंदु स्त्रियांच्या परिस्थितीचें वर्णन करताना दिलेली उपमा सर्वथैव योग्य आहे, असें कोण म्हणणार नाहीं?

आम्हांला आमच्या मुलींनीं पोर्तुगिज शिक्षण घेऊन डाक्टरिणी, शिक्षकिणी अगर कोणत्याहि खात्यांत प्रवेश करून तेथें अधिकाराच्या जागा पटकाऊन स्पर्धाक्षेत्रांत प्रवेश करूं नये असें वाटत नाहीं. ऊलट ख्रिस्ती स्त्रीवर्गाप्रमाणें त्यांनींहि निरानिराळ्या क्षेत्रांत पुढें यावें असेंच वाटतें. परंतु त्या पुढील गोष्टी आहेत. चालू परिस्थितींत एवढें स्थित्यंतर घडून येणें अशक्यप्राय आहे. तूर्त पायरी पायरीनेंच पुढें जावें लागणार. सर्वसाधारण स्त्रीवर्ग सुशिक्षित व्हावा व कन्या, पत्नि व माता या तीन स्थितींत त्यांच्यावर येऊन पडणाऱ्या जबाबदाऱ्या योग्य रीतीनें त्यांजकडून कशा पार पडाव्या, यासाठीं पहिला प्रयत्न त्यांच्यांत साक्षरतेचें प्रमाण वाढविणें हा होय.

हें साक्षरतेचें प्रमाण वाढविण्यासाठीं समाजाच्या अगदीं खालच्या वर्गापर्यंत शिक्षणाचें लोण पोंचविणें अगत्याचें आहे व तें शिक्षण फलदायक होण्यासाठीं मात्रभाषेंतूनच दिलें पाहिजे हें निर्विवाद होय.

१९३१ च्या म्हणचे शेवटच्या खानेसुमारीवरून ख्रिस्ती महिलांच्या मानानें हिंदुमहिलांच्या साक्षरतेचें प्रमाण किती कमी आहे हें ठळकपणें दिसून येतें. यासाठीं वाचकांनीं पुढील तक्ता पाहावा. त्यांत फक्त पोर्तुगिज भाषा जाणणाऱ्यांचीच संख्या घेतली नसून कुठल्याहि भाषेंतून लिहितां वाचतां येणाऱ्यांची घेतलेली आहे. हें लक्षांत ठेवावें. त्याबरोबर आणखी एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे ती ही कीं कुठल्याहि भाषेंत लिहितां वाचतां येणारा गोमंतकीय हिंदु (स्त्री अगर पुरुष) मराठी भाषा जाणतोच.

	ख्रिस्ती		हिंदु	
	पु.	स्त्री	पु.	स्त्री
तिसवाडी (Ilhas)	५८१२	४३९२	३९२९	११६०
सासष्टी	१०३१६	६०७७	२८७३	९९६
बार्देस	१०१३९	१०१५३	५५६५	१२४६
मुर्गांव	१५९६	९१५	१२०६	२६४
पेडणें	३३७	८४	२२८८	४८१
सांखळी	२७२	१७३	३०६३	६५४
सत्तरी	८३	४३	६४४	१७०
फोंडें	४३६	२०८	४८६२	१७१५
सांगें	१७९	४९	१०७४	३३१
केपें	३९८	१२२	११०१	२६७
काणकोण	१८१	३६	१३०८	३९०
	२९७४९	२२१४८	२७९१३	७६७४

गोमंतकाची लोकसंख्या १९३१च्या खानेसुमारीप्रमाणें ५०५२८१ आहे.* ह्या लोकसंख्येशीं साक्षरतेचें प्रमाण पाहण्यास वरील संख्येंतून सात वर्षांखालील मुलांची संख्या वजा करण्याचा प्रघात आहे. ७ वर्षांखालील मुलांची संख्या १००७०६ आहे ती एकंदर लोकसंख्येंतून वजा जातां ४०४५७५ संख्या शिल्लक राहते. ह्या संख्येशीं साक्षर लोकांची तुलना केल्यास पुढील प्रमाणें निष्कर्ष काढतां येतो.

* गोमंतका पुरताच विचार प्रस्तुत लेखांत करावयाचा असल्यामुळें दमण व दीव ह्या प्रांतांची लोकसंख्या जमेस धरली नाहीं.

शेंकडाकांतील ख्रिस्ती साक्षरांचें एकंदर लोकसंख्येशीं शेंकडावारी प्रमाण १२,८२ असें आहे तर हिंदुसाक्षरांचें प्रमाण ८,८० आहे.

ख्रिस्ती साक्षरांची तुलना ख्रिस्ती साक्षर स्त्रियांशीं केल्यास त्यांचें शेंकडावारी प्रमाण ४२,६७ इतकें भरते. म्हणजे पुरुषवर्ग जितका साक्षर आहे तितकाच जवळ जवळ स्त्रीवर्गहि आहे.

आतां हिंदु साक्षरांची तुलना हिंदु साक्षर स्त्रियांशीं केल्यास त्यांचें शेंकडावारी प्रमाण १४,७८ असें आहे. म्हणजे. हिंदु साक्षरांपैकीं दर शेंकडा ८५ पुरुष आहेत व फक्त १५ च स्त्रिया आहेत असें दिसून येईल

अलीकडे कांहीं हिंदु मुली पोर्तुगीज प्राथमीक शिक्षण घेत असलेल्या आढळून येतात पण त्यांची संख्या, इतर ख्रिस्ती मुलींशीं तुलना करतां अगदींच थोडी असल्याचें खालील १९३६-१९३७ शैक्षणिक सालाच्या सरकारी प्राथमिक शाळांतील एकंदर मुलांमुलींच्या तक्त्यावरून दिसून येईल. ह्या तक्त्यांत दमण व दीव येथील मुलांमुलींचा समावेश झाला आहे.

	ख्रिस्ती		हिंदु		मुसलमान		
	पु.	स्त्री	पु.	स्त्री	पु.	स्त्री	एकंदर
बालवर्ग	१०४६	९०५	२९०	२७	१३	—	२२८१
१ ली इयत्ता	९७४	८१८	२१५	२२	१२	—	२०४१
२ री इयत्ता	११५५	८४८	२५६	२५	११	—	२२९५
३ इयत्ता (1. grau	१११९	७४३	३३०	१०	८	—	२२०२
४ इयत्ता (2. grau	८८९	४८१	३७०	१६	८	—	१७६४
	५१७५	३७९५	१४६१	१००	५२	—	१०५८३

वरील तक्त्यावरून आपणास असें दिसून येतें कीं पोर्तुगिज प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या हिंदूंची संख्या ख्रिस्ती मुलांपेक्षां बरीच कमी आहे. आणि ख्रिस्ती व हिंदु मुलींच्या संख्यांची तुलना केल्यास तींत जमीन अस्मानाचा फरक दिसून येतो.

वर दिलेले आंकडे सरकारी शाळांतून शिकणाऱ्या मुलांमुलींचे आहेत. ह्याशिवाय खाजगी अगर संस्थांनीं चालविलेल्या बिनसरकारी शाळांतून पुष्कळशीं मुलें शिकतात व त्यांत हिंदु मुलीहि असण्याचा संभव आहे, परंतू त्यांची संख्या जमेस धरल्यास सुद्धां तितक्याच पटीनें ख्रिस्ती मुलीहि खाजगी शाळांतून शिकतें असल्यावरून, वरील तुलना

त्मक प्रमाणांत विशेष फरक पडण्यासारखा नाहीं.

अगदीं अलीकडे ४।५ हिंदु मुली लिसेवचें शिक्षण घेत असलेल्या दिसून येतात. व अजून पर्यंत लिसेवची परीक्षा उत्तीर्ण झालेली एकहि हिंदु मुलगी नसल्यानें, नोर्मल स्कूल किंवा मेडिकल स्कूल यांचा उंबरठा ओलांडलेली एकहि हिंदु स्त्री नसल्यास आश्चर्य नाहीं. मात्र पोर्तुगिज माध्यमाची अडचण दूर करून देशी भाषेंत सुईणीचा वर्ग सरकारतर्फे उघडला असतां कांहीं हिंदु भगिनीनीं त्याचा फायदा घेतला व त्या आज स्वतंत्र रीत्या स्वतःची उपजीविका व समाजाची सेवा करीत आहेत. अशा परिस्थितींत, स्पर्धाक्षेत्रांत प्रवेश करून पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून स्त्रियांनीं जबाबदारीचीं कामें अंगावर घेण्याचें काम बाजूसच राहिलें.

आशेची प्रभात

वरील निवेचनावरून कोणाचीहि कल्पना होण्याचा संभव आहे कीं, गोमंतकांतील हिंदु स्त्रीवर्ग अगदींच अशिक्षित असून अज्ञानगर्तेत लोळत पडलेला आहे. गोष्ट सकृद्दर्शनी दिसते तितकी खरी नाहीं. बऱ्याच वर्षांपासून आणि विशेषेंकरून गोमंतकांतील ब्राम्हण वर्गातील कित्येक स्त्रियांना लिहितां वाचतां येत असे. "शेणै मामां"कडून किंवा अन्य प्रकारें त्या लिहिण्यावाचण्यास शिकत होत्या. त्यांना पोथ्यापुस्तकें वाचतां येत असे. कांहीं धार्मिक स्तोत्रें त्या पठण करीत असत व बऱ्याचशा साधुसंतांचीं पदें त्यांना मुखोद्गत असत. अशा स्त्रियांत क्वचित भक्तिरर काव्यरचना करणाऱ्याहि आढळून येतात. त्यामुळें त्यांच्यांत आपल्या संकृतीविषयीं अभिमान होता. बाह्य जगाच्या उलाढाली त्यांनां माहित नसत. पण आपल्या घरगुती जगाच्या हालचाली त्यांनां पारख्या नसत. अशी जरी स्थिति होती तरी सर्वसाधारण ज्ञान मिळविण्यासाठीं पुरुषांप्रमाणें स्त्रियांसहि व्यवस्थित शिक्षण देण्याची आवश्यकता होती. अशाकाली जुनी 'शेणै मामी' पद्धति निरुपयोगी ठरून ती नामशेष होण्याच्या पंथास लागली असतां, व ब्रिटीश हिंदुस्थानांत चालू असलेल्या शाळांप्रमाणें येथेंहि शाळा स्थापन करून त्यांतून व्यवस्थित प्रकारचें शिक्षण देण्याची जरूरी दिसूं लागल्यामुळें, नव्या पद्धतीवर कित्येक शाळा उघडण्यांत आल्या.

१९०८ सालीं जी ब्रिटीश हिंदुस्थानांत जागृतीची लाट उसळली त्या लाटेचे धक्के येथवर पोंचले होते व त्यामुळें ठिकठिकाणीं शाळा व वाचनालयें स्थापन करण्यांत येऊं लागलीं व त्यांतच ५ अक्टोबर १९१० रोजीं पोर्तुगालांत प्रजासत्ताक राज्यपद्धति स्थापन झाल्यामुळें हिंदु लोकांना आपल्या आकांक्षा पुरविण्यास वाव मिळाल्यासारखें वाटलें. गेल्या २५ वर्षांत गोमंतकांत मराठी शाळा इतक्या वाढल्या कीं विचारी लोकांनां त्यांत दिल्या गेलेल्या शिक्षणांत एकसूत्रोपणा आणण्याची जरूरी भासूं लागली व त्याचेंच मूर्त स्वरूप म्हणजे आजचें "गोमंतकीय मराठी शिक्षण संमेलन" होय. शाळांच्या या वाढल्या संख्येबरोबर मुलांप्रमाणेंच मुलीचेंहि प्रमाण वाढत राहिलें. कित्येक शाळांत कांहीं वर्ग असे आहेत कीं त्यांत मुलींची संख्या मुलांपेक्षांहि अधिक आहे. खालील तक्त्यांत कांहीं प्रमुख शाळांतील इयत्तावार मुलांमुलींचें प्रमाण पाहण्यास मिळेल.

	५ वी इयत्ता		४ थी इयत्ता		३ री इयत्ता		२ री इयता		१ ली इयत्ता		बालवर्ग	
	पु.	स्त्री	पु.	स्त्री	पु	स्त्री	पु.	स्त्री	पु.	स्त्री	पु.	स्त्री
सारस्वत विद्यालय म्हापसें			२०	८	२९	९	१६	१०	११	११	२१	८
ज्ञानप्रसारक मंडळी म्हापसें			९	३	१८	१८	२९	१६	२५	१९	२३	२३
विद्यावर्धक मंडळ डिचोली			७	—	१६	४	२७	३	२१	९	३४	७
श्री शारदाविद्यालय कुंभारजुवें			१६	५	१७	९	३३	१०	२२	५	३५	९
श्री दामोदर विद्याल मडगांव ❀	४	३	३५	११	५०	१२	७९	२८	५३	३२	८८	४५
मुष्टीफंड संस्था: श्रीमहालक्ष्मी वि.			३	४	१२	१०	२८	२७	२२	१७	१७	१६
श्रीसरस्वती विद्यालय			८	९	१३	११	१८	२०	१८	३०	३०	१३

ठिकठिकाणीं आजच्या मराठी शाळा, संस्थांकडून अगर खासगी रितीनें चालविल्या जात आहेत, त्यांची संख्या सुमारें २०० च्या वर आहे. म्हणजे ही संख्या सरकारी पोर्तुगिज प्राथमिक शाळांपेक्षांहि जास्त भरते. त्यावरून असा अंदाज करण्यास हरकत नाहीं की कांहीं वर्षांनी हिंदु साक्षरांचें प्रमाण आतांच्या पेक्षां बरच पुढें जाईल गेल्यावर्षी १०० मुली पोर्तुगिज प्राथमिक शिक्षण घेत होत्या हें पाहिलें म्हणजे स्त्रीवर्गाच्या उन्नतीचा प्रभातकाल गोमंतकांत झाला आहे असें म्हटलें पाहिजे.

❀ येथील मुलांमुलींच्या संख्येंत दिसणाऱ्या फरकाचें कारण मुलींच्या खास शाळांचें अस्तित्व असावें, असें वाटतें.

आजच्या आमच्या आकांक्षा

मागें सांगितल्याप्रमाणें आमच्या स्त्रीवर्गाचा भविष्यकाल उज्ज्वल होणार अशी आशा धरण्यास जागा आहे. परंतु स्त्रीशिक्षणासंबंधीं आमच्या आजच्या आकांक्षा काय आहेत त्याचा विचार करणें जरूर आहे. नदीचा ओघ वाहत

असला म्हणजे त्यांत हात धुऊन मोकळें होणें फार सुलभ आहे; परंतु त्या पाण्याचा शेतकामासाठीं उपयोग करण्यास, नदीला बंधारा घालून इष्ट स्थळीं पाणी नेण्याचे विशेष प्रयत्न करावे लागतात. आम्हांला आमच्या मुलींनीं काय व्हावें अशी आमची अपेक्षा आहे, हें आधीं पाहिलें पाहिजे. सार्वत्रिक शिक्षणाच्या दृष्टीनें आजच्या शाळा स्त्रीशिक्षणाचें काम करीत आहेत. ज्यांनां पोर्तुगीज शिकावयाचें आहे त्यांनां सरकारनें केलेल्या सोयींचा उपयोग करून घेतां येईल. परंतु आमच्या मुलींच्याबाबतींत आम्हीं काय अपेक्षा करावी याचा विचार झाला पाहिजे.

आजच्या आमच्या मराठी शाळांतून ४ इयत्तांपर्यंत शिक्षण देण्यांत येतें. ५ इयत्ता शिकविणाऱ्या शाळा अपवादात्मक होत. आणि प्रस्तुत लेखकाचा असा समज आहे कीं ३ इयत्ता उत्तीर्ण झालेल्या मुलांपैकीं फारच थोडे चवथींत प्रवेश करतात. याला एक मुख्य कारण असें आहे कीं पोर्तुगीज प्राथमिक शाळेंत प्रवेश मिळण्यास वयाची अट घातलेली असल्यामुळें तीन इयत्तांचेंच मराठी शिक्षण पदरांत घेऊन आमचीं मुलें पोर्तुगीज शाळेंत प्रवेश करतात. यावर उपाय योजना वगैरे दाखविण्याचें स्थळ हें नसून तें प्रस्तुत लेखाच्या कक्षेंत येत नाहीं. मुख्य गोष्ट एवढीच कीं साधारणपणें ४ इयत्तांचें शिक्षण आमच्या मुलांमुलींनां मराठी शाळांतून मिळत असतें आणि इतक्यांत त्यांची १०।१२ वर्षांची वयोमर्यादा पुरी होते. अलीकडे कांहीं मुली (मागें सांगितल्याप्रमाणें) पोर्तुगीज प्राथमिक शिक्षण घेण्यासाठीं सरकारी अगर खासगी पोर्तुगीज शाळांत जातात. परंतु त्या मानानें लिसेवांत प्रवेश केलेल्या मुली फारच थोड्या आहेत. पोर्तुगीज प्राथमिक शिक्षण (1.° grau आणि 2.° grau) घेतल्यानंतर किंवा मराठी ४ इयत्ता शिकल्यानंतर आमच्या मुली काय करतात ? दहा बारा वर्षांच्या मुलींचीं लग्नें झालेलीं अलीकडे दिसून येत नाहींत. प्रौढविवाह आपोआपच रूढ झालेला आहे. अशा परिस्थितींत १५।१६ वर्षांच्या खालीं मुलींचीं लग्नें फार अल्प प्रमाणांत झालेलीं दिसून येतील. दहा बारा वर्षांनंतरचा पण विवाहपूर्व हा जो मुलींच्या आयुष्यांतील काल आहे, त्या कालाचा उपयोग मुलींच्या शिक्षणासाठीं होणें अत्यावश्यक आहे. ज्यांनां शक्य असेल त्यांनीं आपल्या मुलींनां पोर्तुगीज प्राथमिक व दुय्यम शिक्षण देऊन त्यांनां स्पर्धाक्षेत्रांत प्रवेश करण्यास वाव द्यावा. परंतु सगळ्यांनांच ह्या गोष्टी शक्य नाहींत. ज्यांनां स्त्रियांनां पोर्तुगीज दुय्यम शिक्षण देणें शक्य नसेल त्यांनीं पोर्तुगीज प्राथमिक शिक्षण देण्याच्या भरीस पडूं नये. शिक्षण म्हणजे कांहीं फक्त भाषाशिक्षण नव्हे. निरनिराळ्या विषयांची ज्यांनां मराठी ४ इयत्ता शिकतांनां माहिती झाली आहे, त्यांनां पोर्तुगीज प्राथमिक शिक्षणांत विशेष कांहीं आढळून यावयाचें नाहीं. आणि ह्या प्राथमिक शिक्षणांत जी पोर्तुगीज भाषा तयार होते ती बिलकूल स्त्रियांच्या व्यवहारास किंवा ज्ञानसंवर्धनास उपयोगी पडण्यासारखी नाहीं. म्हणून प्रस्तुत लेखकाचें असें मत आहे कीं ज्यांनां पोर्तुगीज दुय्यम शिक्षण संपादन करावयाचें नाहीं त्यांनीं पोर्तुगीज प्राथमिक शिक्षण घेण्याच्या भरीस पडूं नये. कारण त्यांत निरर्थक कालापव्यय होत असतो. ह्या कालाचा—म्हणजे मराठी प्राथमिक शिक्षणानंतरचा व विवाहपूर्व कालाचा—योग्य उपयोग होण्यासाठीं उपाययोजना करणें जरू-

रीचें आहे.

आज तरी सर्वसाधारण हिंदुस्त्रीवर्गाची प्रवृत्ति, स्वतंत्र रीतीनें कोणताहि व्यवसाय करून, आपली उपजीविका करण्याची नाहीं. आमच्या हिंदु समाजांत स्त्रिया अविवाहित राहण्याची वहिवाट नाहीं. म्हणजे साहजिकच त्यांचा विवाह झाला पाहिजे, म्हणजे विवाहपरंपरा चालू असणार असेंच गृहित धरून चालावयाचें आहे. ह्या दृष्टीनें स्त्रीवर्गाच्या तीन अवस्था धरल्या पाहिजेतः कन्या, पत्नि आणि माता. या तीनहि अवस्थांत त्यांनां योग्य रीतीनें आपलीं कर्तव्यें पाळतां आलीं पाहिजेत. अर्थात् तीं पाळण्याची पात्रता त्यांच्यांत आणण्यासाठीं त्यांनां द्यावयाचें शिक्षण याच हेतूस अनुकुल असें असणें क्रमप्राप्त आहे.

आतां असा प्रश्न उद्भवण्याचा संभव आहे कीं आजपर्यंत आमच्या स्त्रीवर्गानें आपापलीं कर्तव्यें योग्य रितीनें पाळलीं नाहींत काय? ह्याला थोडक्यांत उत्तर असें देतां येईल कीं, आमच्या म्हणजे आजच्या पुरुषवर्गाच्या वडील माणसांनीं आम्ही घेतों त्याप्रकारच्या शिक्षणापेक्षां कमी शिक्षण घेऊन आपला संसार नीटनेटका चालवून दाखवला असतां आम्हीं त्यांचा मार्ग सोडून, प्रतिदिनीं, दुय्यम, उच्च, उच्चतम अशा शिक्षणाचा अधिक जोरानें ध्यास घेत असतों याचा विचार केला असतां वरील प्रश्नाचें उत्तर मिळेल. समाजाच्या गरजा दिवसेंदिवस वाढत आहेत, ह्या वाढत्या गरजा पुरविण्यासाठीं मनुष्याची धडपड चालू आहे. आजपर्यंत जमा झालेल्या ज्ञानांत मानवी प्राणी आपला हातभार लाऊन त्यांत भर टाकीत आहे. जगाच्या ह्या वाढत्या व्यवहाराकडे लक्ष न पुरवितां आपण मागें राहिल्यास ह्या जीवनार्थ कलहांतून सहिसलामतपार पडतां येणार नाहीं म्हणूनच ज्ञानप्राप्तीसठीं आपणांला शिक्षण संपादन केल्याशिवाय राहतां येणार नाहीं. आणि स्त्री व पुरुष यांचे हितसंबंध अभिन्न असल्यावरून तिच्याहि ज्ञानांत भर घालणें हें आमचेंच कर्तव्यच आहे. सुशिक्षित तरुणाला आपली सहचारिणीहि सुशिक्षितच असावी असें वाटणें साहजिकच आहे. ख्रिस्ती समाज आमच्या डोळ्यांपुढें असतो. त्या वर्गातील स्त्रियांचें शिक्षण, त्यांची स्वावलंबी वृत्ति, त्यांची गृहव्यवस्था, टापटीप ही कोणासहि आदर्शवत् वाटेल. आपलीं जमीनजुमल्याचीं कामें, सरकारी खात्यांतलीं कामें वगैरे नवऱ्याच्या गैरहजीरींत अगर विधवावस्थेंत, स्वतः जाऊन उरकून घेणारी एकहि हिंदु स्त्री नाहीं. पणजीहून मडगांव किंवा म्हापसें अगर एखाद्या जवळच्या ठिकाणीं, स्वतंत्रतेनें प्रवास करणारी हिंदु स्त्री आढळणें विरळा. म्हणून आमच्या मुलींनां संसारांत आढळणाऱ्या हरएक अडचणींनां तोंड देतां येईल व त्या सुकन्या, सुपत्नि व सुमाता होतील अशाप्रकारचें सर्वसाधारण शिक्षण देण्यांत यापुढें कसूर करतां नये.

मराठी प्राथमिक ४ इयत्तांच्या शिक्षणानंतर ज्यांनां पोर्तुगीज प्राथमिक, दुय्यम अगर उच्च शिक्षण घेणें असेल, त्या मुली वगळल्यास, इतर मुलींनां मुलांपेक्षां निराळें शिक्षण देणें अगत्याचें आहे, त्यांत संगीत, चित्रकला, शिवणकाम, हस्तकौशल्याचीं कामें, या कलात्मक विषयांबरोबर, गृहव्यवस्था, अपत्यसंगोपन, आरोग्यविषयक माहिती हे विषय शिकविले पाहिजेत. वाङ्मयविषयक ज्ञानाचीहि त्यांत भर घातली पाहिजे. हें सगळें शिक्षण मराठींतून दिलें पाहिजे. व शक्य झाल्यास पोर्तुगीज अगर

इंग्लिश यांपैकी कोणत्याहि एका भाषेचा त्यांत ऐच्छिक विषय म्हणून समावेश केला पाहिजे. तात्त्विकदृष्ट्या या विषयांचा मी उल्लेख करतों, तपशिलांत तज्ज्ञानीं शिरावें.

गोमंतकीय हिंदुस्त्रीवर्ग आजच्या स्थितींत आहे तिला कारणीभूत झालेल्या घटणांचा विचार प्रस्तुत लेखांत झालेलाच आहे. योग्य परिस्थिति आली असतां गोमंतकीय स्त्रिया प्रगतिपथाक्रमणांत मागें राहतील असें दिसून येत नाहीं. आमच्या ख्रिस्ती भगिनीनीं आपली कर्तृत्वशक्ति दाखविली आहेच. आज ख्रिस्ती स्त्रीवर्गांत ७ डॉक्टरिणी आहेत व ८ फार्मासेवतीक आहेत. आजपर्यंत नोर्मल स्कूलांतून बाहेर पडलेल्या स्त्रिया १५० च्या वर असून, त्यांतील ६९ आज शिक्षाकिणीच्या कामावर आहेत.

गोमंतकांत वास्तव्य करून असलेल्या हिंदुस्त्रीवर्गांत ख्रिस्ती स्त्रीवर्गाप्रमाणें पुढें आलेल्या विदुषी नाहींत हें जरी खरें असलें तरी पण कित्येक स्त्रियांनीं गोमंतकाबाहेर आपलें नांव काढलेलें आहे. सौ. माणकबाई कोसंबी सारखी विदुषी अमेरिकेंतील विश्वविद्यालयाची बी. ए. पदवी घेऊं शकते, तर आमच्या कपिलेश्वरकर व बोरकर भगिनी डॉक्टरिणी होऊं शकतात. इतकेंच नव्हे तर श्री. प्रमिला कपिलेश्वरकर ह्या मुंबई युनिव्हर्सिटीची M. D. पदवी घेऊं शकते व कु. तळावलीकर मट्रिकच्या परिक्षेंत संस्कृत भाषेंत प्राविण्य दाखवून स्कालर्शिप मिळवूं शकते.

ह्यावरून गोमंतकीय स्त्रीवर्गाचा भविष्यकाल आशादायक आहे असें अनुमान आजच करण्यास प्रत्यवाय नाहीं. पुरुषवर्गानें मात्र ह्या बाबतींत हातपाय आखडून न बसतां आपल्या भगिनीवर्गाच्या उन्नतीसाठीं प्रयत्न करणें अगत्याचें आहे.

उपसंहार

गोमंतकांतील स्त्रीशिक्षणासंबंधीं विचार केल्यानंतर विषयाची परिसमाप्ती करून फलश्रुतीसाठीं उपसंहारात्मक दोन शब्द सांगणें इष्ट आहे.

येथवर मांडलेल्या विचारांवरून आपणास खालीलप्रमाणें निष्कर्ष काढतां येईल.

१ गोमंतकीय स्त्रियांचें (हिंदु व ख्रिस्ती) साक्षरतेचें प्रमाण असामाधानकारक नसून तें वाढतें आहे.

२ हिंदु व ख्रिस्ती स्त्रियांची तुलना केल्यास, हें साक्षरतेचें प्रमाण हिंदु स्त्रियांत बरेंच कमी आहे.

३ हिंदु स्त्रियांत साक्षरतेचें प्रमाण कमी असलें तरी त्यांस असंस्कृत म्हणतां येणा नाहीं.

४ पोर्तुगिज अमदानींत स्त्रीशिक्षणासंबधीं बरेच प्रयत्न झाले पण ते पोर्तुगीज भाषेंत व पाश्चात्य संस्कृतिसंवर्धक झाल्यामुळें त्यांचा फायदा हिंदु स्त्रियांस मिळाला नाहीं, व ख्रिस्ती स्त्रियांनीं त्याचा फायदा घेतला.

५ १९०८ सालानंतर व विशेषेंकरून १९१० नंतरच्या मनूंत (म्हणजे प्रजासत्ताक राज्यपद्धतीची प्राणप्रतिष्ठा झाल्यानंतर) मराठी शाळांचें प्रमाण वाढल्यामुळें मुलांबरोबरच मुलींच्या प्राथमिक शिक्षणास ज्यास्त वाव मिळाला.

१९१८ ते १९२२ या कालावधींत हिंदु मुलींसाठीं स्वातंत्र शाळा स्थापन करण्याचे प्रयत्न

प्रो. धर्मानंद कोसंबी यांजकडून करण्यांत आले, पण त्यांची योजना तडीस गेली नाहीं.

७ 'Congresso Provincial' च्या १९३१ च्या अधिवेशनांत हिंदु मुलींसाठीं स्वतंत्र कन्याशाळा पाहिजे व तींत दिलें-जाणारें शिक्षण मराठींतून व प्रामुख्येंकरून हिंदु शिक्षकांकडून दिलें जावें असा ठराव पास झाला पण हा ठराव शिफारसवजा असल्यानें कागदावरच राहिला.

८ गेल्या ५।६ वर्षांपूर्वी निरनिराळ्या सभा व्याख्यानांतून स्त्रीशिक्षणविषयक विचार मांडण्यांत येऊन त्यांवर भरपूर चर्चा करण्यांत आली.

९ मडगांव येथें 'सेवा समिति' या संस्थेकडून 'आदर्श वनिता विद्यालया'ची स्थापना करण्यांत आली.

१० त्याच शहरांत 'समाज सेवा संघ' या संस्थेकडून 'महिला विद्यालयाची' स्थापना करण्यांत आली.

११ पणजी येथें १९३६ च्या नवंबर महिन्यांत महिला विद्यालयाची स्थापना करण्यांत आली.

१२ आमच्या मुली सुकन्या, सुपत्नि व सुमाता व्हाव्या ह्याच दृष्टीनें सर्व साधारण स्त्रीशिक्षणाची योजना झाली पाहिजे

१३ ज्यांनां दुय्यम व उच्च शिक्षण घेऊन स्वर्धाक्षेत्रांत प्रवेश करावयाचा आहे त्यांनां मार्ग मोकळा असावा.

१४ हिंदुस्त्रियांच्या गरजा व त्यांची विशिष्ट परिस्थिति लक्षांत घेऊन जर सरकारकडून कन्या शाळा उघडण्यांत आल्या असत्या तर त्यांची स्थिति सुधारून, गोमंतकीय मुली ब्रिटिश हिंदुस्थानांत जाऊन शिक्षण घेऊन पुढें आल्या त्याचप्रमाणें येथील मुली येथेंच शिक्षण घेऊन पुढें आल्या असत्या.

१५ अलीकडे कांहीं मुली पोर्तुगिज प्राथमिक शिक्षण घेत असून लिसेव मध्येंहि त्यांचा प्रवेश झाला आहे व त्याचप्रमाणें मराठी प्राथमिक शिक्षणांतहि मुलींचें प्रमाण बरेंच वाढतें असून, कांहीं वर्गांत मुलींची संख्या मुलांपेक्षांहि जास्त आढळून येते हें लक्षण आशादायक आहे असें निःसंशय म्हणतां येईल.

***

सारस्वत ब्राम्हण समाजाच्या रौप्यमहोत्सवप्रसंगीं स्त्रीशिक्षणावर निबंध लिहिण्याची कामगिरी चालकांनीं मजवर टाकली. ह्या जबाबदारींतून मी कितपत मोकळा झालों हें मला समजत नाहीं. परंतु प्रस्तुत लेखांत उपयुक्त असें जर कांहीं असेल तर ज्यांनीं मला हें काम करण्याची संधि दिली त्यांच्याच हातावर यशाचें श्रेय टाकून मी मोकळा होतों.

'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाच न'

"श्रीमद्भगवद्गीता."

सारस्वत ब्राह्मण समाजाच्या वार्षिकोत्सवांचे अध्यक्ष



श्री. भार्गवराम विठ्ठल वरेरकर
(१९३४)

श्री. शांबाराव कृष्णाजी सूर्यराव सरदेसाई
(१९३५)

श्री. विठ्ठल सदाशिव सुखठणकर
(१९३६)

डॉ. बाळकृष्ण दत्ताराम साखरदांडे
(१९३७)

११

पंचवीस वर्षांचें गोमन्तक

श्री. यशवंत सूर्यराव सरदेसाई.

पंचवीस वर्षें म्हणजे जवळजवळ एका पिढीचा काळ असें म्हणतां येईल. सुधारणांच्या बाबतींत एका पिढीच्या दरम्यान फारसें अंतर पडलेलें दिसत नाहीं. स्वाभाविकपणें कोणत्याही प्रगतीचीं चक्रें फिरतांना त्यांची गति मंद असते. वातावरणाच्या आधीन असलेली पवनचक्की नेहमींच एका दमानें काम करते असें नाहीं, उलट ती वाफेच्या यंत्रावर बसविली तर अहोरात्र सारख्याच नेटानें फिरूं शकते, तद्वत् परिस्थितीच्या चक्रनेमिक्रमानें जो समाज प्रगत होत असतो त्याचें स्वरूप बदलण्यास पुष्कळ पिढ्या लागतात, पण कायद्यानें होणारी सुधारणा एकाच पिढींत फळ देऊं शकते. गोमन्तकांतील परिस्थिति जी आज हालचालीची दिसते ती सभोंवतालच्या चळवळींच्या परिणामानें व स्थानिक लोकांच्या इच्छेनें घडून आलेली आहे यांत शंका नाहीं. या परिस्थितीचें दिग्दर्शन हिंदु समाजापुरतेंच तेवढें करणें हा या लेखाचा विषय आहे.

गोमंतकीय हिंदु समाज जागृत होऊन नव्या मनूंत सामुदायिक रीत्या जी हालचाल करूं लागला ती १९०५ सालापासून असें म्हणतां येईल. जपाननें रशियाचा अस्वल उलथून पाडल्यावर पूर्वेकडील सर्व राष्ट्रांत एक प्रकारचा आत्मविश्वास व नवें चैतन्य निर्माण झालें. वंगभंगामुळें सारा बंगाल खडबडून जागा झाला. बंगालचें उदाहरण महाराष्ट्रास स्फूर्तिजनक झालें. बाहेरच्या प्रदेशावरचे वारे गोमन्तकीय वस्तूंतही डोल उत्पन्न करूं लागले. मराठा बोलूं लागल्याबरोबर गोवेबाबू हालूं लागला. अन्यायाचा प्रतिकार करणें व आपलें म्हणणें जाहीरपणें बोलून दाखविणें या प्रयत्नाची सुरुवात या वेळीं होऊं लागली. सन १९०५ हें साल हिंदु समाजाच्या दृष्टीनें नव्या स्थित्यंतराचें असें समजण्यास हरकत नाहीं.

हा मुद्दा विशद होण्याकरतां पूर्वस्थितीचें थोडेंसें वर्णन करणें भाग आहे. शिक्षण, संपत्ति, अधिकार व राजकृपा या बाबतींत क्रिस्ती समाज गोमंतकांत हिंदूपेक्षां वरचढ होता व अजूनही आहे. फिरंगी सरकार क्रिस्तधर्मीय व सनातनी वृत्तीचें. अर्थात् क्रिस्ती धर्म व त्यांचे आचारविचार या गोष्टींस महत्व होतें. राजशाहीच्या काळांत सरसुभेदारावर आर्चबिशपचें इतकें वजन होतें कीं, धर्माधिकाऱ्यांच्या मुरवतीखातर अन्य धर्मीयांवर जुल्मूम करण्यास सरकार सहज तयार होई. पणजीच्या महालक्ष्मीच्या देवळांतली पहांटेची नौबत डोंगरावर राहणाऱ्या आर्चबिशपची साखरझोंप मोडते म्हणून बंद करण्यांत आली होती. क्रिस्ताच्या अज्ञातवासां-

तील चाळीस दिवसांत अन्य धर्मीयांचे कोणतेही उत्सव होत नसत. रामनवमी, चैत्र पौर्णिमा हे उत्सव वैशाखानंतर साजरे करण्यांत येत. म्हापसेंच्या मारुतीचें दर्शन राजरस्त्यावरून घेणें शक्य नव्हतें. चंद्रेश्वराची पालखी पारोडेच्या क्रिस्तमंदिरासमोरून जाण्याची बंदी झाली होती. जुन्या काबिजादींत नवीं देवालयें अगर मशिदी बांधणें अशक्य होतें. एवढा मोठा हिंदु समाज, मोठमोठे श्रीमंत त्यांच्या वर्गात,पण संघटना नव्हती, जुलमाचा प्रतिकार करण्याची इच्छा–तयारी–चळवळ नव्हती. एखादा सुस्वभावी व परोपकारी हिंदु जमीनदार स्वतःच्या खाजगी वजनाचा उपयोग करून एखाद्या सहृदय युरोपियनामार्फत अगर एखाद्या दिलदार क्रिस्ती मित्रामार्फत तात्पुरतें सामुदायिक कार्य साधून घेई, पण इतरांच्या डोळ्यांत भरण्यासारखें, स्वतःचें अस्तित्व शाबीत करण्यासारखें,व सर्व जनतेवर वजन-वचक बसण्यासारखें सार्वजनिक कार्य मोठ्या प्रमाणावर होऊं शकलें नाहीं. आपली परिस्थिति पाहून तळमळणाऱ्या व गोमंतकाच्या अभिवृद्धयर्थ प्रयत्न करणाऱ्या कांहीं व्यक्ति मागच्या पिढींत झाल्या,त्यांपैकीं पुष्कळांच्या खिशास चट्टा बसून त्यांचें प्रापंचिक जीवन धोक्याचेंही झालें. लेख, नियतकालिकें, सभा यांच्याद्वारें शक्य तशा चळवळी करणें व लोकशिक्षणाप्रीत्यर्थ धडपड चालू ठेवणें हीं कामें मागच्या पिढींतील कांहीं लोकांनीं केलीं हें त्यांचें ऋण कबूल करणें भाग आहे.इतकेंच नव्हे तर आज कित्येक ठिकाणीं कार्याचे थोडेसे मळे जे दिसतात त्यांची जमीन याच वेळीं प्रतिकूल परिस्थितीच्या आगीनें भाजून निघाली होती हें लक्षांत घेतलें पाहिजे. सार्वजनिक कार्याला आज जी अनुकूलता दिसते ती काल व शिक्षण यांच्या वाढीमुळें असल्यानें पूर्वीइतकी कष्टदायक नाहीं. सभा ठरवली तर घरोघर जाऊन मंगल कार्याच्या आमंत्रणाप्रमाणें अत्याग्रह करणें, सभेची एकंदर व्यवस्था ठेवणें, सर्व भाषणें तयार करून घोळवून ठेवलीं पाहिजेत म्हणून मोठ्या लोकांच्या हातांत कांहीं दिवस अगोदर देणें, क्वचित्प्रसंगीं तीं वाचवून घेणें, ठरावाचे मसुदे वगैरे निश्चित करणें आणि हीं सगळीं कामें स्वतः पडद्यांत राहून कोणतीच जाहिरात अगर वाच्यता न करतां उरकणें, असला उद्योग जुन्या पिढींतील या पुढाऱ्यांनीं केलेला आहे. मागील इतिहास पहातां 'हिंदु सार्वजनिक सभा' भरली हाच काय तो पहिला सामुदायिक प्रयत्न झालेला दिसतो. रामचंद्र पांडुरंग वैद्य व पंढरीनाथ केळेकर यांच्या प्रयत्नामुळें ता. २९ जानेवारी सन १८८८ रोजीं मंगेश देवस्थानांत प्राथमिक सभा भरून 'सार्वजनिक सभे'ची प्राणप्रतिष्ठा करण्याचें ठरलें. नंतर तिचें पहिलें अधिवेशन श्रीमंत संवदेकर राजेसाहेब यांच्या अध्यक्षतेखालीं पणजीस झालें. वर्तमानपत्रें व मासिक पुस्तकें यांच्याद्वारें लोकशिक्षणाचें कार्य यथाशक्य आमची जुनी पिढी करीत होतीच पण त्याचें स्वरूप कांहींसें हौसेचें होतें. हें वारें १९०५ पासून बदलण्यास सुरुवात झाली. आणि त्यावेळीं जी पिढी सार्वजनिक क्षेत्रांत शिरली तिचाच विस्तार आतां विशेष स्वरूपांत दृष्टीस पडतो, असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं.

हिंदु समाजाला जागृत होण्यासारखी आणखी एक घटना १९१० सालीं घडून आली.

ती लोकसत्तेची स्थापना होय. यामुळें धार्मिक स्वातंत्र्य ताबडतोब मिळालें व त्याचा परिणाम इतका झाला कीं, बंधनांतून मोकळ्या प्रदेशांत आलेल्या मनाला जी सुखाची भावना प्राप्त होते ती हिंदु समाजांत उत्पन्न झाली. आतां आपल्या कर्तबगारीस वाव मिळेल असें वाटून त्याला आत्मविश्वास आला व धर्म, शिक्षण व सरकारदरबार यांत मिळालेल्या समतेचा हिंदु समाजानें पूर्ण उपयोग करून घेतला. सर्व क्षेत्रांत जे हिंदु आज दिसतात त्याची सुरुवात याच वेळीं झाली. यानंतर सारस्वत, वैश्य, दैवज्ञ, भंडारी, भट्टप्रभु इ. जातींच्या परिषदा झाल्या, आणि सामाजिक रीत्या गोमन्तकाचें इतर महाराष्ट्राशीं दळणवळण वाढलें. इतर महाराष्ट्राला गोमन्तकाचा प्रत्यक्ष परिचय झाला व गोमन्तकीयांनीं बाहेरच्या प्रदेशांतील स्वजनांशीं आपला संबंध जोडून मनोभूमिकेच्या मर्यादा विस्तृत केल्या. इकडचे लोक जाऊन बाहेर व्याख्यानें देऊं लागले, तिकडचे वक्ते इकडे येऊं लागले, इकडचे लेखक तिकडील नियतकालिकांतून लिहूं लागले आणि तिकडचे लेखक येथील मासिकांतून आपलें लिखाण प्रसिद्ध करूं लागले. महाराष्ट्र-साहित्य-सम्मेलनाचें अधिवेशन भरून या वाङ्मयीन स्नेहसंबंधास शिक्कामोर्तब झालें. बाहेरचे व्यापारी येऊन या प्रांतांत व्यापार करीत,पण आतां इकडच्या व्यापाऱ्यांनीं तिकडच्या प्रदेशावर स्वाऱ्या चालविल्या आहेत. तात्पर्य या पंचवीस वर्षांत अशा अनेक घडामोडी सांगतां येतील कीं ज्यांमुळें गोमंतक-भूमीच्या मर्यादा विस्तृत होत आहेत व तेथील लोकांच्या विचारक्षेत्राचें व कर्तबगारीचें स्वरूप अधिकाधिक व्यापक बनत आहे. ही वाढ कसकशी होत गेली हें पहाणें मोठें मनोरंजक तसेंच अभ्यसनीय होईल.

पोर्तुगीज शिक्षणाचे बाबतींत पहातां हिंदु समाज पूर्वी बराच मागसलेला होता. लिसेवचें शिक्षण घेतलेले गृहस्थ अत्यंत दुर्मिळ होते. डॉ. सखाराम लाड हे एकटेच गृहस्थ वैद्यकीय शाळेंतून पदवी घेऊन बाहेर पडले होते. पं. सूर्याजी आनंदराव देशपांडे हे एकटेच विद्वान् गृहस्थ लिसेवांत मराठीचे प्रोफेसर म्हणून गाजत होते. लिसेवाचे रैतोर होण्याचाही मान त्यांना मिळाला होता. पण भाताच्या शेतांतून मिरविणाऱ्या तुरीच्या कणसाप्रमाणेच ही स्थिति असल्यानें पोर्तुगीज शिक्षणाच्या क्षेत्रांत हिंदूंची खरी प्रगति अशी १९१० नंतरच झाली, हेंच खरें आहे. स. १९०२–३ सालीं लिसेवच्या पांचव्या वर्षास एकच विद्यार्थी नारायणराव बांदोडकर, चवथ्या वर्षास जिवाजी दत्तू महात्मे व आजचे न्यायाधीश शिवराम बळवंतराव देशपांडे, तिसऱ्या वर्षास आठदहा हिंदु अशी स्थिति होती. याच कालांत पहिल्या वर्षास हिंदूंचा अधिक भरणा दिसत होता. जुन्या लिसेवाचा अभ्यास संपवून वैद्यकीय पाठशाळेंत असलेले दोतोर काशीनाथ लाड व दोतोर भास्कर बोरकर हे दोनच तरुण काय ते त्यावेळीं दिसत होते. लिसेवाची पुनर्घटना होण्याचे पूर्वी निरानिराळ्या विषयांचे व भाषांचे स्वतंत्र कोर्स होते, त्यांतून कांहीं हिंदु पास होऊन धंद्यास लागले होते; पण इतर धर्मीयांच्या नजरेत भरण्यासारखी त्यांची स्थिति

नव्हती. यावेळीं पोर्तुगीज भाषेंतून अस्खलितपणें संभाषण करणारे कांहीं गृहस्थ होते, पण त्यांची तपश्चर्या प्राथमिक शिक्षणापर्यंतच होती. यामुळें हिंदूंच्या शिक्षणाचें स्वरूप कौतुकाच्या स्थितींत होतें. विद्वत्तेच्या कक्षेंत तें आलें नव्हतें. एका हिंदु विद्यार्थ्याचें सुंदर अक्षर पाहून लिसेवांतील पाद्री प्रोफेसरास आनन्द झाला व त्यानें त्या हर्षभरांत "Você tem bôa caligrafia. Você há-de ser bom escrivão da Comunidade." असे उद्गार काढले. हिंदूच्या नोकरीची उडी ग्रामसंस्थेच्या कुळकर्ण्यापलीकडे जाणार नाहीं ही त्याची खात्री होती. जेथें मराठी भाषा व जमाखर्चाचा प्रसंग येतो तेथेंच हिंदूची गरज लागलेली व याच क्षेत्रांत हिंदूंनीं कर्तबगारी दाखविलेली त्यानें पाहिली होती. यामुळें लिसेवाच्या इमारतींत हिंदूंचा पहिला मोठ्या संख्येचा लोंढा शिरतांच हिद्वितर शिक्षक व विद्यार्थी यांना ती गोष्ट विस्मयकारक वाटणें स्वाभाविक होतें. शिक्षणमंदिराच्या जागेंतील आपल्या मिरासदारींत हे नवे लोक घुसल्यामुळें कित्येक क्रिस्ती विद्यार्थ्यांना विषाद वाटला व ते हिंदु विद्यार्थ्यांचा नाना प्रकारचा छळ करूं लागले. पावसांतून भिजलेलीं पायतणें घेऊन ते आंत शिरतात व यामुळें वर्गांतील जागा घाणेरडी होते म्हणून तक्रारी सुरू झाल्या. टोप्या उडविणें, शेंड्या ओढणें, थुंकी आंगास लावून बाटविण्याचा फार्स करणें, आचारधर्मावर टीका करून चिडाविणें, यांसारख्या अनेक चेष्टा करून हिंदु विद्यार्थ्यांना 'नको हा लिसेव' अशी परिस्थिति ते उत्पन्न करीत. याचा प्रतिकार करण्याइतकी बहुसंख्या अगर संघटना अगर वजन हिंदूंत नव्हतें. अशा स्थितींत त्यांच्याशीं दोन हात करण्याचें धैर्य कांहीं विद्यार्थी दाखवीत असत. रामचंद्र मंगेशराव देशपांडे, बाळकृष्ण वामन सांवडेंकर, सांवळोबा पार्सेकर हे या बाबतींत प्रमुख असत. एकदां तर अशी गोष्ट घडून आली कीं, त्यामुळें या क्रिस्ती विद्यार्थ्यांच्या अत्याचारास बराच आळा बसला. एक हिंदु विद्यार्थी पावसांतून आल्यामुळें त्याचें जुनें जुतें तळातळांतून भिजलेलें होतें. तसाच तो जिना चढूं लागल्यामुळें पायऱ्यांवर पायतणानें आपले ठसे व्यवस्थितपणें उमटविले. हें पाहून एका युरोपियन विद्यार्थ्यानें मागाहून जाऊन त्याच्या पायास छत्रीच्या दांडीचा विळखा घातला. व त्यास धाड्दिशीं खालीं पाडलें. आवाज झाल्याबरोबर शेजारींच असलेला कार्यालयांतील कारकून धांवत बाहेर आला, पण तोही गप्प राहिला. कारण पडणारा हिंदु व पाडणारा युरोपियन आणि त्यांतही एका मिलिटरी ऑफिसराचा मुलगा! कारकुनानें पुनः आपलें अंग आंत ओढून घेतलें आणि युरोपियन विद्यार्थ्याच्या सोबत्यांनीं केलेला जयजयकार आंतूनच ऐकला! हिंदु विद्यार्थी उठला, आपलें पायतण हातांत घेतलें व तिरीमिरीच्या स्थितींत असतां जोरानें त्यानें या विद्यार्थ्याच्या पाठीवर दोन जुतीं लगावलीं! पांढऱ्या सफेत कपड्यांवर भिजलेली माती वहाणांचा आकार घेऊन उठून दिसूं लागली. हिंदु विद्यार्थी जुतें पायांत घालून वर्गांत गेला व युरोपियन विद्यार्थी कपडे बदलण्यास घरीं चालता झाला. ही पहिली

सलामी इतकी परिणामकारक झाली कीं, हिंदूंतील बऱ्याच विद्यार्थ्यांनीं आपापले गट तयार केले. आणि इतर विद्यार्थीही त्यांच्या वाटेस जाईनासे झाले. हळुहळू ही स्थिति बदलत गेली. हिंदु विद्यार्थ्यांचा बुद्धिमत्ता जसजशी अनुभवास येऊं लागली तसतसा शिक्षक व विद्यार्थी यांचा समज बदलत जाऊं लागला. कांहीं काळानें तर अशी परिस्थिति निर्माण झाली कीं, नेटिव व युरोपियन विद्यार्थ्यांचे घरीं शिकवणीकरतां अनेक हिंदु जाऊं लागले आणि परस्पर परिचयामुळें एकमेकांना त्यांना ओळखतां आलें. स. १९१० नंतर तर परिस्थिति साफ बदलली. हिंदूंना प्राथमिक शिक्षक होण्याची बंदी होती ती निघून गेल्यामुळें या क्षेत्रांत शिरून हिंदूनीं तें काबीज केलें. इतकेंच नव्हे तर हे शिक्षक तयार करण्याच्या पाठशाळेंत एक हिंदु अध्यापक झाला.पांच हिंदु लिसेवाचे प्रोफेसर आहेत. पोर्तुगालांतील विश्वविद्याल-यापर्यंत जाऊन शिक्षण संपादन करण्याचा धाडसी प्रयत्न दोतोर शि. ब. राव यांनीं प्रथम केला. व बाशारेल शिरवईकर व नाडकर्णी, इंजिनीयर खंवटे,संस्कृताचे प्राध्यापक तळाव-लीकर असे पोर्तुगालांतील शिक्षण घेतलेले तरुण आज हिंदु समाजांत दिसूं लागले आहेत.गोमन्तकांतिल वरिष्ठ शिक्षणाच्या सर्व विद्यालयांतून हिंदु विद्यार्थी आज प्रमुखत्वानें दिसतात. कित्येक हिंदु तरुणांनीं शिक्षणाच्या खासगी संस्था चालविल्या आहेत आणि पोर्तुगीज भाषा अगर नव्या मनूंतील ज्ञान-संपादन या बाबतींत हिंदूंचा तयारी स्पृहणीय होत आहे यांत शंका नाहीं.

नोकरीपेशाच्या बाबतींत पंचवीस वर्षां-पूर्वीची स्थिति निराळी होती. त्या कालीं नोकरी करणें हें लाजिरवाणें असें वाटत होतें. ज्याला स्वतःचें असें हक्काचें कांहीं नाहीं, अगर ज्याला कष्ट करून स्वतःच्या मनगटानें कांहीं मिळवितां येत नाहीं त्यानें नोकरीपेशांत जावें अशी विचारसरणी पूर्वी होती. ग्रामसंस्थेचा कुळकर्णीपणा हा मान मात्र आपला वडिलोपार्जित आहे अशी समजूत ब्राह्मणवर्गापुरती असल्यानें बहुतेक गांवचे escrivães das comunidades ह्या समाजांतील होते. फाजेंदांतील रसीबदोर, न्यायकोर्टातील दुभाषा अशा कांहीं जागांवर हिंदु दिसत. जमीनमोजणी खात्याचें काम मोठ्या प्रमाणावर सुरू झाल्यानंतर सरकारी नोकरीच्या प्रदेशांत याद्वारें हिंदूंचा मोठा जथा शिरला,आणि तेव्हांपासून हिंदु सरकारी कचेऱ्यांतील क्षेत्रांतून दिसूं लागले. जमाबंदी, टपाल, जकात वगैरे कचेऱ्यांतून हिंदूंची वर्णी लागत गेली. न्यायखात्यांत कारकुनाप-र्यंत (refrendarios) त्यांचा प्रवेश झाला होता. क्रिस्ती सरकारकुनाच्या हाताखालीं खर्डेघाशी करणें हेंच त्यांचें काम होतें. युरोपियन अधिकाऱ्यांचे कृपेनें दोनचार इसमांना सरकारकुनाची बढती मिळाला होती. पण नव्या तरुणांनीं आपल्या कर्तब-गारीनें या जागा मोठ्या प्रमाणावर व्यापल्या व एकानें तर सरकारी वकिलापासून न्याया-धीशापर्यंत मजल गांठली. आज सरकारी कचेऱ्यांतून मोठमोठ्या जबाबदारीच्या जागां-वर हिंदु लोक काम करतात आणि पोर्तुगाल व आफ्रिका येथें जाण्याची

धडाडी ते दाखवितील तर कोणत्याही खात्यांचे मुख्य अधिकारी होण्यापर्यंत त्यांची मर्यादा गेल्याशिवाय राहणार नाहीं. सरकारी कचेऱ्यातून मेंदूचें व परिश्रमाचें काम हेच करतात; पण शिस्त, आत्मविश्वास व लकब यांच्या अभावीं कष्टाप्रमाणें कार्याचें श्रेय यांना मिळत नाहीं. वैद्यकीय क्षेत्रांत हिंदूंनीं बरीच आघाडी मारली असून या बाबतींत त्यांची प्रगति समाधानकारक आहे कायद्याच्या क्षेत्रांत अजून त्यांना पुष्कळ वाव आहे, आणि अभ्यासू वृत्ति व श्रमसहिष्णुता दाखविल्यास याही बाबतींत ते नांव कमावतील यांत शंका नाहीं.

पोर्तुगीज शिक्षणावरोबर या भाषेंतील प्रावीण्य अगर प्रभुत्व हिंदूंना अजून म्हणण्यासारखें साधलेलें नाहीं. आपला विषय समर्पक रीतीनें मांडणारे अगर अस्खलितपणें संभाषण करणारे कांहीं गृहस्थ दिसतात, पण शिक्षितांच्या संख्येच्या मानानें हें प्रमाण अल्प आहे. याचें कारण असें कीं, गरजेपुरतें पोर्तुगीज भाषेचें ज्ञान मिळवल्यावर नंतर तें वाढीस लावण्याकडे हिंदूंची उपेक्षा होते. व्यवहाराचा गाडा चांगला चालतो इतक्यांतच ते समाधान मानून घेतात. ज्ञानाच्या भुकेकरतां ते या वाङ्मयाचें परिशीलन करीत नाहींत. याशिवाय आणखी एका गोष्टीमुळें हिंदु समाजाचें या भाषाभ्यासाकडे दुर्लक्ष झालेलें आहे. मराठी वाचनाची अलीकडे फार प्रवृत्ति झालेली आहे, आणि व्यवहार सांभाळून जें वाचन करावयाचें त्याची वेळ मराठीनें घेतल्यामुळें पोर्तुगीज ग्रंथसंपत्तीकडे हिंदूंना लक्ष देण्यास फुरसत नसते. नव्या तरुणांत जी बुद्धिमत्ता दिसते तिचा उपयोग पोर्तुगीज साहित्याच्या व्यासंगांत झाला तर त्या क्षेत्रांत ते सहज नांव कमावतील. हिंदु आचारधर्मावर किरिस्तांवांकडून वेळींअवेळीं टीका करण्यांत येते. त्यांना आपलें म्हणणें पटवून देण्याकरतां ज्ञानाबरोबर भाषेची तयारी असली पाहिजे. मागें श्रीधर प्रभु महांबरे, शांबाराव सरदेसाई, सखाराम राया धुमे, डॉ. भास्कर म्हाबळू बोरकर, भास्कर प्रतापराव सरदेसाई, सीताराम विश्वंभर केरकर, गोपाळ कृष्ण गुडे प्रभृति जुन्या पिढींतल्या अनेक गृहस्थांनीं क्रिस्ती लोकांचे हल्ले परतवून लावले आहेत. कृष्णराव केणी यांनीं Faíscas प्रसिद्ध करून 'जशास तसें' वागण्याची हिंदूंची तयारी दाखविली होती. हिंदु धर्म, वाङ्मय, मूर्ति, चालीरीती यांची थट्टा करण्याकडे अजूनही कांहीं क्रिस्ती लेखकांचा कल वळतो,पण आतां उलट मारा होण्याची त्यांना भीतीही असते. राज्यकर्त्यांच्या भाषेंत ज्यांची तयारी होते त्यांच्या म्हणण्यास सरकारदरबारांत मान मिळतो. Congresso Provincial च्या अधिवेशनांत हिंदूंनीं भाग घेतला होता; पण ज्यांना पोर्तुगीज भाषेंतून अस्खलितपणें आपले विचार मांडतां आले त्यांनींच सभेवर विशेष छाप टाकली.

पोर्तुगीज शिक्षणाच्या वाढीबरोबर अलीकडे इंग्रजी शिक्षणाचीही हिंदूंत पुष्कळ वाढ झाली आहे. पूर्वी गोव्याबाहेर जाऊं इच्छिणारा तरुणच इंग्रजी शिक्षण घेई. आतां तो इकडे असला तरीही ज्ञानाकरतां अगर व्यवहाराकरतां ही भाषा शिकण्याकडे त्याची प्रवृत्ति दिसते. इंग्रजी वर्तमानपत्रें वाचण्याची

गोडी लागल्यामुळें व तिकडील चळवळींची जिज्ञासा असल्यामुळें इंग्रजीचा प्रसार पुष्कळ झालेला आहे. लिसेवांत इंग्रजी ही दुय्यम भाषा शिकविण्यांत येते, त्यामुळें लिसेवच्या पदवीधराला ही भाषा बरीच अवगत असते. शिवाय पोर्तुगीज भाषेच्या विद्यार्थ्यास युरोपियन भाषा थोड्याशा परिश्रमानें हातासतां येतात. फ्रेंच, स्पानिश, इटालियन या भाषांतील वाङ्मयाचा परिचय अजून कोणाही महाराष्ट्रीयानें मराठींतून करून दिलेला नाहीं. तें व्यंग गोमन्तकीय लेखकाला भरून काढतां येईल. वरील तीनही भाषांत जें कथात्मक वाङ्मय विशाल नदनद्यांप्रमाणें आहे, त्याचा एखादा लहानसाच ओघ वळवून आणला तर अनेक पुष्पसंभारांचे ताटवे व विविधतर फळांनीं नटलेले वृक्ष निर्माण होऊन महाराष्ट्र-सरस्वतीचें उद्यान खात्रीनें अधिक चित्ताकर्षक व संपन्न होईल. गोमन्तकांत इंग्रजीचा प्रसार बार्देश प्रांतांत पूर्वी अधिक होता. तेथील क्रिस्ती लोक इंग्रजी हिंदुस्थानांत अधिक जात. तिसवाडी व सासष्टी यांतील क्रिस्ती पोर्तुगाल व त्याच्या वसाहती यांतून नोकरी करीत. हडफडें येथें इंग्रजीची एक शाळा होती. आणि याच शाळेंत इंग्रजीचा अभ्यास करूं इच्छिणारा विद्यार्थी जाई. गोव्यांत पोट भरेपर्यंत हिंदु पोर्तुगीज शिकला, पण नंतर तोही इंग्रजीचा आश्रय घेऊं लागला. शिक्षित कुटुंबांत आज एक पोर्तुगीज तर दुसरा इंग्रजी विद्यार्थी असून यापुढें इंग्रजी अधिकाधिक जागा व्यापील हें उघड दिसतें. गांवोगांव आतां इंग्रजी शाळा उघडल्या असून कित्येक मुंबई विश्वविद्यालयानें मान्य केलेल्या आहेत. यामुळें इंग्रजीचें शिक्षण सुलभपणें मिळूं लागलें आहे.

मराठी शिक्षणाची वाढही या पंचवीस वर्षांत झपाट्यानें होत चालली आहे. पूर्वीच्या मराठी शिक्षणास शाणैमामी शिक्षण असें नांव दिलें तर आतांचें मास्तरी असें म्हणतां येईल. शाणैमाम ही व्यक्ती शिक्षणाबरोबर इतर बाबतींतही उपयोगी असे. ज्या कुटुंबांत तो राही त्यांच्या मुलांना शिकविण्यापासून माडांचे नारळ काढून घेण्यापर्यंत तो अगत्य दाखवी. आपल्या गरीब व सोशीक वृत्तीनें तो लोकप्रियता मिळवी. त्याचें शिक्षणही बेताचें असे. 'घोर हा नको फार कष्टलों', 'वनीं पोंवळी गाय माझी पळाली', मनाचे श्लोक, गणपतीच्या आरत्या, इत्यादि कविता मोठे हेल काढून मुलांना शिकविल्या म्हणजे शाणैमामाची शाळा गाजत असे. परवडीचा हलकल्लोळ चालू झाला, म्हणजे शाळेची जाहिरात गांवभर होई. वामन-मोरोपंतांच्या कांहीं कवितांचा अन्वयार्थ समजून देणें इतकी काव्याची मर्यादा या शिक्षणांत होती. गद्य वाङ्मयाच्या बाबतींत क्रमिक पुस्तकें झाल्यावर मोडी जुनीं पत्रें वाचवून घ्यावीं व दोन्ही अक्षरें वळणदार करावीं इतकीच कामगिरी शाणैमामाची असे. श्री. करंडेशास्त्री मराठी शिकण्याकरतां खानापुरास होते. ते माशेलांत आल्यावर वडिलांनीं त्यांना गांवच्या शाळेंत पाठविलें. शाणैमामांनीं त्यांना गणित किती झालें आहे म्हणून विचारलें. माझा भागाकारपर्यंत झाला आहे असें विद्यार्थ्याचें उत्तर ऐकून शाणैमामांनीं त्याला पहिल्या

नंबरास बसण्यास सांगितलें. आपल्याला आणखी कोणतेच प्रश्न न विचारतां अगर अभ्यासाची चांचणी न करतां एकदम पहिला नंबर कसा दिला याचें करंडे बटूस आश्चर्य वाटलें. पण शणैमामाचें गणित गुणाकारापर्यंत झालेलें समजतांच विद्यार्थ्यास हें कोडें उलगडलें. तात्पर्य अशी स्थिति पूर्वी होती. मास्तरी शिक्षण झाल्यापासून ही स्थिति बदलली. मराठी शिक्षणाचे इंग्रजी हिंदुस्थानांतल्या शाळांप्रमाणें पद्धतशीर प्रयत्न सुरू झाले. म्हापसें येथें आजरेकर, मडगांव येथें रेडकर, पणजीस खानोलकर हे मास्तरी शिक्षण देणारे पहिले पुरुष असें म्हणतां येईल. या खासगी प्रयत्नाची वाढ संस्थांच्या स्वरूपांत झाली. आज २५।३० वर्षांत गोमन्तकांत पुष्कळ संस्था मराठी शिक्षणाचें कार्य करीत आहेत. मराठी शिक्षकांची जागा मात्र अजून गोमन्तकीयांनीं भरून काढलेली दिसत नाहीं. तथापि गोमन्तकीय शिक्षण-संमेलन, शिक्षकांच्या सभा व गोमन्तकाच्या इतिहास–भूगोलावरील पुस्तकें यामुळें येथील शिक्षणांत प्रादेशिकता पूर्वीपेक्षां अधिक दिसू लागली आहे. मराठी शिक्षणाचा दर्जा जसजसा वाढत जाईल तसतसें सरकारदरबारांत त्याला महत्व येईल यांत शंका नाहीं. बाहेरच्या जिल्ह्यांतून देशी भाषेंतील अर्ज अगर हिशेब न्यायकचेरींत शाबीत होतात, हें पाहिलें म्हणजे आपल्या मराठी भाषेची मजल अजून किती लांब आहे तें ध्यानांत येतें.

मराठी भाषेच्या अभिवृद्धयर्थ प्रयत्न चालू असतां कोंकणी भाषेनेंही आपलें मस्तक उन्नत करून चालण्यास सुरुवात केली आहे. ख्रिस्ती समाजांत या भाषेंतून पुस्तकें व वर्तमानपत्रें निघत होतीं. पण तीं रोमन लिपींत. तिला देवनागरी पोषाकांत नटवून नागर बनविण्याचे प्रयत्न आतां हिंदूंकडून चालू आहेत. या भाषेंतून कांहीं सुंदर व विद्वत्ताप्रचुर ग्रंथ निर्माण होतात, इतक्यांत हिंदी भाषा सरस्वतीमन्दिराचीं दारें ठोठावूं लागली आहे. एक काळ असा होता कीं, कोंकणी भाषा रोमन लिपींतून व मराठी भाषा कानडी लिपींतून या प्रांतांत चालू होती. आतां सर्व देशी भाषांना देवनागरी लिपि आत्मसात् करणार असून यापुढें गोमन्तकीयांना अनेक भाषांचें ज्ञान संपादन करणें भाग होईल. राजकीय भाषा म्हणून पोर्तुगीज, व्यापाराकरतां म्हणून इंग्रजी वैद्यक-रसायनशास्त्राच्या अभ्यासाकरतां फ्रेंच बोली म्हणून कोंकणी, महाराष्ट्रीयत्वाकरतां मराठी, राष्ट्रीय भाषेकरतां हिंदी, शिवा व्यापारी दळणवळणाकरतां गुजराथी कानडी या इतक्या भागांचा संसर्ग गोमंतकास लागतो ! मध्यंतरींच दुसरा कोणी आ तर त्याची भाषा कपाळीं येणारच ! तात्प अनेक भाषांचें अध्ययन या ठिकाणीं प्र असल्यामुळें हें 'खतखतें' गोमन्तकीयांच आवडीचें होईल यांत शंका नाहीं !

लेखनाच्या दृष्टीनें पहातां या पंचवर्षांत प्रगति आहे. पोर्तुगीज भाषेंत हिंदूंनीं केलेली ग्रंथनिष्पत्ति अगदींच थो आहे. ही परकीय भाषा त्यांच्या वळण अजून आलेली नाहीं हें त्याचें कारण हो पण मराठी लेखनाच्या बाबतींत हिं बरीच आघाडी मारली आहे. मासिकां लेख व लघुकथात्मक वाङ्मय इतक्यापुर

आज मर्यादा आहे. इतिहास, शास्त्र, कला, वाङ्मय या विषयांत त्यांची लेखणी अजून चमकलेली नाहीं. अ. का. प्रियोळकर यांनीं नलाख्यानावर जो टीकापर ग्रंथ निर्माण केला आहे तसल्या योग्यतेचें लिखाण प्रसिद्ध झाल्याशिवाय गोमन्तकीयांना मराठी सरस्वतीच्या मंदिरांत भूषणास्पदरीतीनें मिरवितां येणार नाहीं. थोडेसें लेखन करून प्रसिद्धी मिळाल्यावर अभ्यासाकडे दुर्लक्ष करणें व याच प्रौढींत स्वतःची फार मोठी कल्पना करून घेणें, या वृत्तीमुळें हिंदु लेखक कांहीं काळ गेल्यावर निर्फळ ठरतो. या बाबतींत क्रिस्ती समाजांतील पुष्कळ विद्वान गृहस्थ आपल्यास मार्गदर्शक होतील. क्रिस्ती सुशिक्षित विद्वान नसतो, त्याला विचार करण्याची शक्ति नसते इ. गैरसमज कित्येक मराठी वाचकांनीं करून घेतलेले दिसतात, त्यांनीं ग्रंथालयांत जाऊन जरूर आपल्या क्रिस्ती बांधवांचें लिखाण अभ्यासावें म्हणजे हा त्यांचा भ्रम निघून जाईल. हा भ्रम उत्पन्न करण्यांत पत्रकारही जबाबदार आहेत. परधर्मीयांचें सगळेंच तिरस्करणीय, ही वृत्ती जशी क्रिस्ती जनतेंत वावरते तशीच ती हिंदूंतही आहे. आणि या वृत्तीमुळें शेजारीं शेंकडो वर्षें राहूनही ते एकमेकांना ओळखूं शकत नाहींत. विशाल दृष्टीनें अवलोकन करणें व सभोंवतालीं उच्च व शुद्ध वातावरण निर्माण करून त्यांत सुखानें श्वासोच्छ्वास करीत रमून जाणें ही गोष्ट ध्यानांत न आल्यानें कुंपणाच्या कांटीवरल्या सरड्या सारखी आपली स्थिती झालेली आहे. घरामागच्या राखेच्या ढिगांवर डौलानें उभा राहून लालभडक गाल आणि कुंचा हालवीत कोंबडा आरवतो व आपल्या राज्याची द्वाही जाहीर करतो तशी आमची स्थिति होत आहे! गोमन्तकाच्या मर्यादा आतां विस्तृत झाल्या आहेत. जसा अनेक भाषांकडे आमचा संबंध येतो, तसाच तो अनेक धर्मांकडे अनेक राष्ट्रांकडे व अनेक प्रकाच्या समाजांकडे आला आहे ही गोष्ट स्पष्टपणें नव्या पिढीवर बिंबविण्याचें काम लेखकांचें व वृत्तपत्रकर्त्यांचें आहे. अव्वल इंग्रजी अंमलांत महाराष्ट्रांत जी पहिली पिढी झाली तिनें पुष्कळ बाबतींत इंग्रजीचें अनुकरण केलें. याचे कांहीं दुष्परिणामही झाले. पण शिस्त, शोधक बुद्धि, राष्ट्राभिमान, वक्तशीरपणा, पुढें घुसण्याची हिंमत, इत्यादि गुणही इंग्रजाकडून घेतल्यानें सुसंकृत मन, प्रगल्भ विचार व सुधारणेची तळमळ हीं त्यांच्यांत उत्पन्न झालीं, हें सत्य लपवून ठेवण्यांत अर्थ नाहीं. गोमंतकीय क्रिस्ती समाज धर्मानें निराळा असला तरी रक्तानें, परंपरेनें व राष्ट्रीय भावनेनें आपलाच आहे. त्यांच्यांतील चांगले गुण अनुसरण्यास हिंदूंना दिक्कत वाटतां कामा नये. संसारांतील दक्षता, शिक्षणाची आवड, सामाजिक सभ्यता, धर्मश्रद्धेतलें गांभीर्य, व्यवहारांतला सरळपणा, साशंक मनोवृत्तीचा अभाव, स्वार्थ साधून घेण्याची हातोटी, दर्जा सांभाळून राहण्याची वृत्ति, इत्यादि क्रिस्ती समाजांतील गुण लक्षांत घेतले व आपल्या उन्नतीस पोषक अशीं त्यांचीं तत्वें शहाणपणानें अमलांत आणलीं तर हिंदूचा व्यवहार सुरळीत चालण्यास हरकत नाहीं क्रिस्ती समाजांत कित्येक स्त्रिया उच्च शिक्षण घेतलेल्या आढळल्या तरी एकंदरींत स्त्रीशिक्षणानें प्राथमिकतेच्या पलीकडे विशेषशी

मजल मारलेली नाहीं. तथापि आपला प्रपंच नीटनेटका करून अधिकाधिक सुखाचा उपभोग कसा घ्यावा हें त्यांना समजतें. नवऱ्याचा सामाजिक दर्जा त्यांना ओळखतां येतो. त्याच्या कार्यास मदत करण्याची धमक त्यांना असते. मुलांना शिक्षण देणें, त्यांच्यावर देखरेख ठेवणें, त्यांच्या आयुष्यास योग्य वळण लावणें हीं कामें किती अगत्याचीं व महत्वाचीं आहेत. हें त्यांना कळतें. प्रपंचांतल्या व्यवहाराच्या बाबतींत नवऱ्याला पूर्ण निष्काळजी त्या ठेवूं शकतात. नवऱ्यानें पैसा मिळवावा, बाहेर राबून संपत्ति कमवावी, नोकरी व्यापार अगर इतर बाहेरचें काम यांत बुद्धि खर्च करावी; त्याला घरांत आल्यावर सर्व तयारी आयती वाढून ठेवलेली असते. घरकामाकरतां लागणाऱ्या जिनसा, नवनव्या फ्याशनप्रमाणें नवऱ्याचे, आपले व मुलांचे कपडे तयार ठेवणें, नोकरांकडून दक्षतेनें काम उरकणें, घराची सफाई, शृंगार व इतर गोष्टींकडे नेहमीं लक्ष पुरविणें याबाबतींत क्रिस्ती बाई खरी गृहलक्ष्मी असते. नवऱ्याच्या मृत्युनंतर तिची दिशाभूल होत नाहीं. घरची स्थिति सांभाळून मुलांचें शिक्षण त्या करूं शकतात व पुनः संसाराची घडी बसवितात. त्यांच्या मजूरवर्गातदेखील ज्या कित्येक गोष्टी दिसतात त्या हिंदूंच्या वरच्या वर्गांत दुर्मिळ असतात. नव्या हिंदूंनीं त्यांचा समाज अभ्यासून चांगल्या गोष्टींचें अनुकरण करणें योग्य आहे. पोर्तुगीज वर्तमानपत्रांतून जुळाऱ्याचें काम प्रथमतः हिंदु करीत. क्रिस्ती लेखक जें लिखाण लिहून देतात तें खिळ्यावर जुळवून त्याचें, हाच त्यांचा उद्योग होता. नंतर त्यांची बढती छापखान्याच्या मालकीमुळें प्रकाशकापर्यंत झाली. जुन्या काळांतल्या वर्तमानपत्रांतून अर्धा भाग पोर्तुगीज व अर्धा मराठी असे; केवळ मराठी असें प्रथमतः 'हिंदु' पत्र व केवळ पोर्तुगीज असें 'प्रकाश' पत्र असावें, असें वाटतें. क्रिस्ती लोकांनीं हिंदुधर्मावर व हिंदुसमाजावर टीका केली, तर त्याला हिंदुपेक्षां एखादा विद्वान् उदारमतवादी क्रिस्ती अधिक झणझणीत उत्तर देई. या बाबतींत सि. मिनोझिश ब्रागांस यांची कामगिरी स्पृहणीय व सर्व हिंदूनीं ध्यनांत धरण्यासारखी आहे. हिंदु समाजाच्या हिताप्रित्यर्थ निघणाऱ्या वर्तमान पत्रांत डॉ. शिरगांवकर यांचा 'प्रभात', देशपांडे यांचें 'हिंदुमत' व हेगडे देसाई यांचें 'भारत' यांनीं पोर्तुजीज लिखाण प्रसिद्ध करून क्रिस्ती लोकांवरोवर लढाई दिली. या पंक्तीं 'भारत' आज सुदैवानें अनेक गण्डांतरांतून जिवंत असून त्यांतील पोर्तुगीज लेखांचा धाक सर्वांना वाटतो. 'प्रकाश' पत्राचे मुख्य लेखक अन्य धर्मीय असले तरी त्याची मालकी सर्वस्वी हिंदूची आहे. या पत्रानें क्रिस्ती जनतेंत उदार विचारांचें नवें युग सुरू केलें आहे असें म्हटल्यास, अतिशयोक्ति होणार नाहीं. वर्तमानपत्रांच्या धंद्यांत क्रिस्ती संपादक—प्रकाशकांपेक्षां हिंदु पुष्कळ मागसलेला आहे. याचें कारण वर्तमानपत्र व्यापारी पेशानें व सुरक्षित कसें चालवावें हें हिंदूंना अजून समजत नाहीं. अनेक सबबी सांगून वर्गणी न देण्याकडेही हिंदूंची प्रवृत्ति असते आणि स्थानिक नियतकालिकांना तर ही अधिक बाधते. वर्गणी बुडाल्यामुळें व वर्तमानपत्राचे हिशेब शिस्तवार न पाहिल्या-

मुळें हे धंदे बहुतेक प्रकाशक-संपादकांच्या आंगलट आले आहेत. यामुळें एका संपादकानें एक मौजेची टूम काढली होती. दर अंकांत एकेका श्रीमंताचें नांव छापून तो त्यांना अर्पण करावा व त्यांकडून छपाईचा खर्च घ्यावा, असें त्यानें केलें. पण यानेंही अक फारसे निघाले नाहींत. एखाद्या श्रीमंतानें छपाईचा खर्च न दिल्यामुळें पुढें अंक बंद करावे लागले असें वाटतें. तात्पर्य हा धंदा हौसेखातर करण्यांतच हिंदूंचा काल जात आहे.

वर्तमानपत्रांतील वाङ्मयांतून एकमेकांच्या उखाळ्यापाखाळ्या, व्याकरणाच्या चुका, वाक्यरचनेंतील दोष काढणें, या गोष्टी पूर्वीप्रमाणेंच चाललेल्या दिसतात. पण कांहीं विषयांत कालमानाप्रमाणें बदल झाला आहे. विषय, भाषा व क्षेत्र यांत फरक होत आहे. पूर्वी श्रीमंताचें लग्न, एकादी जत्रा, एकादें भाषण हाच अग्रलेखाचा विषय होता. लेख मोठा असला तर कापून स्फुटें करणें व लहान असला तर त्याला अग्रलेखाचा मान देणें ही गोष्ट अजूनही दिसते. स्थानिक व ताज्या विषयाच्या बाबतींत 'हिंदु'पत्राची जागरूकता दिसत होती. कांहीं जुन्या पत्रांच्या फायली चाळल्या तर त्यांतून पुष्कळ मजकूर आज आपली मोठी करमणूक करील. हवामान ह्या सदरांत 'गोवापंचां'त पुढील मजकूर प्रसिद्ध झाला होता:—"सचोटीची हवा पालटून ठकबाजीचा वारा वहात आहे. द्यूतकार मंडळीची पर्जन्यधार वाढली असल्यामुळें दारिद्र्याचीं पिकें चांगलीं येत आहेत. हल्लींच्या हल्लीं सुरादेवीच्या सांथीनें ८।९ माणसें जायां झालीं. सध्याचे दिवस उद्योग औषधीचे नसल्यामुळें थंडीबाजीचा आजार बराच दृष्टीस पडतो. गांजाअफूचे बाजारभावांत कांहीं फरक नाहीं. खोटें बोलण्याचा दर फारच उतरला आहे. व दानधर्माकडे दुष्काळाची नजर गेल्या पासून गरीबगुरीबांच्या हालांस तोटा नाहींसा झाला आहे.....

परद्रव्यदाराभिलाषतरु झपाट्यानें वाढत चालले आहेत व त्याचमुळें अलीकडील हवेंत वैषम्य व कृतिमत्व या दोन वायूंचे अंश जास्त दृष्टीस पडतात."

एका कवितेचा मासला पहा:—

"माडा तुझे अमित हे उपकार होती ॥
गोमन्तकस्थ जन सर्व असेंच गाती ॥
गातील नित्य जनिं या असूं दे खरा हो ॥
विश्रास मात्र सुदया स्वमनांत राहो ॥
फळें गाभा गाथा काथ्या चुडत शिपटें
नारळ इति ॥
तुझीं अंगें सारीं करिति कविराया उपकृति ॥
अशा या साधुत्वा कवण नर तो गाइल पुरा ॥
मनूजां ज्ञानीकां परि तुं गमतें धन्यचि खरा ॥

विषय, भाषा, अभ्यास, विचारसरणी या दृष्टीनें या पंचवीस वर्षांत वृत्तपत्रीय क्षेत्रांत पुष्कळच अंतर पडलें आहे. आज जसें जुनें वाङ्मय पाहून आम्हांस मौज वाटते तसें आमचें लिखाण पाहून, आणखी २५ वर्षांनीं येणारी पिढी आपली करमणूक करून घेईल. म्हणून शेकडों वर्षें टिकणारें व कालास हार न जाणारें असें अबाधित वाङ्मय प्रसवणारे जे साहित्यकार तेच खरे धन्य व चिरंजीव होत!

विद्वत्तेच्या बाबतींत पहातां, पूर्वी वेदा-

भ्यासी संस्कृत पंडितांना विद्वान् असें समजण्यांत येई. दशग्रंथी, घनपाठी असे अनेक ब्राह्मण गोमन्तकांत होते. रत्नागिरी, कारवार, बेळगांव, मुंबई, इत्यादि ठिकाणाहून यज्ञयागाकरतां व इतर मोठ्या धर्मकार्याकरतां या ब्राह्मणांस निमंत्रण येई. वैदिकांत संस्कृत भाषेचें अध्ययन सर्वत्र असे, पण गृहस्थ वर्गांतदेखील संस्कृताचा मुद्दाम अभ्यास केलेली पुष्कळ मंडळी होती. या भाषेतील काव्यें व नाटकें यांचें परिशीलन रसिकतेकरतां करणारे गृहस्थ जुन्या पिढींत अनेक होते. धुपकर, पित्रे, पणशीकर, सुखठणकर, कामत दाखनकर, करंडे इ. शास्त्री मंडळी व सुब्राव लक्ष्मण नायक, आनंदराव विश्वासराव देसाई वगैरे गृहस्थ मंडळी संस्कृत विद्वान् म्हणून प्रसिद्ध होती. मराठी जुन्या वाङ्मयांतील ज्ञानेश्वर, मोरोपंत, वामनपंडित, सोहिरोबा यांचे ग्रंथ लावणारे विद्वान् पुष्कळ होते. मोरोपंतांचे भक्त तर गांवोगांव होते. आर्यांची कूटें सोडविण्यांत व साध्या संभाषणांतून आर्यांचे संदर्भ उपयोजिण्यांत ही मंडळी तरबेज होती. रायूबाब धेंपे, लाडूबाब कुंडईकर, सदाशिव नाईक मुख्य सरदेसाई इत्यादि श्रीमंतांना तर मोरोपंतानें वेड लावलें होतें. नारायणबुवा साखरदांडे यांसारखे कीर्तनकार मोरोपंती वाङ्मयांत तज्ज्ञ समजले जात. यांचा मुक्काम वरलि श्रीमंतांचे घरीं दोनदोन महिने पडे व सांजसकाळ अनेक मंडळी जमून आर्या लावण्यांत येत. या पंचवीस वर्षांत काव्यात्मक वाङ्मयाची अभिरुचि ओसरली व ती जागा गद्यानें घेतली. महाराष्ट्रांतील वर्तमानपत्रें, मासिकें व पुस्तकें यांचें वाचन केल्यामुळें गोमन्तकांतील हिंदूंत महाराष्ट्रीय वातावरण निर्माण झालें. वर्तमानपत्रांत 'काळ', 'केसरी' व मासिकांत 'मनोरंजन', 'नवयुग' यांचा खप अधिक होता. एखाद्याच्याच खिशांत 'विविधज्ञानविस्तारा'चा अंक दिसे. कादंबरी, नाटकें यांचा खप तर पुष्कळ असे. नव्या युगांत मराठी भाषेतून बरेच विद्वान व लेखक निर्माण झाले. या बाबतींत 'सत्संग' मासिकाला मानाची जागा द्यावी लागेल, असें त्यांतील कविता, लेख, टीका, परीक्षणें वगैरे पाहिलीं म्हणजे आपणास म्हणण्यास हरकत नाहीं. जोग, सावंत इत्यादि कांहीं कीर्तनकार गोमन्तकीय झाले. पण या क्षेत्रांत गोमंतकीयांना चिकाटी धरून अजून यश मिळवितां आलें नाहीं प्रवचनकारांचीही तीच स्थिति आहे. मराठी वक्तेही अलीकडे बरेच आहेत. ज्या प्रांतांत दिवसरात्र कोंकणी भाषेंत श्वासोच्छ्वास करावा लागतो, तेथें सभेंत आपले विचार मराठी भाषेतून अस्खलितपणें मांडणाऱ्याचें कोणीही कौतुक करील. जुन्या पिढीपेक्षां मराठी शुद्ध उच्चार करून बोलणारे, इतकेंच नव्हे तर पुण्यामुंबईच्या सभेंत परिणामकारक वक्तृत्व करणारे अधिक लोक निपजत आहेत.

मराठी पत्रें लिहितांना पूर्वी त्यांना संस्कृत शब्दांची योजना करणें हें विद्वत्तेचें लक्षण समजत असत. पणजीहून निघून रात्रौ पानवेलीस राहिलों, आज कुंभारजुव्यास जेवण करून उद्यां बोकडबागांत जाणार आहें. हीं वाक्यें पत्रांतून, 'प्रपितामहीची यात्रा करून रात्रभागीं पर्णवेलींत निवास केला. आज कुलालद्वीपांत आत्मा तृप्त करून सूर्योदयीं

मेषवनाचेठायीं गमन करणार आहें', अशीं लिहीत. साधीं वाक्यें संस्कृतप्रचुर लिहिणें ह विद्वत्तेचें लक्षण समजण्याची मनःस्थिति अजूनही कित्येक लेखकांत दिसते. आपल्या महाराष्ट्रांतील लेखकाचा आदर्श धरून लिहिण्याची कित्येकांची प्रवृत्ति असल्यानें लेखनाचें वळण त्या नमुन्यावर जातें. मिळविलेलें ज्ञान आत्मसात् करून तें आंगिक भावानें लेखणींतून उमटविण्याचें सामर्थ्य हेंच खरें प्रशंसनीय होय ! पुण्यामुंबईचीं पत्रें वाचून त्याप्रमाणें पक्षविशिष्ट मतें बनविणें, तेथील पुढाऱ्यांना आवडीच्या लेखांच्या चष्म्यांतून पाहाणें व तेथील परिस्थितीचा प्रत्यक्ष परिचय नसतां घरीं बसून मत देणें यामुळें कित्येकांचें वर्तन हास्यास्पद होत आहे ! यामुळें गोमन्तकीयांकडून आणखी एक गोष्ट स्वाभाविकपणें होत आहे. ती म्हणजे गोमन्तक प्रांताच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष होय ! नवी पिढी अभ्यासांत दक्ष राहून ही उणीव भरून काढील, अशी आशा करणें बरें.

या पंचवीस वर्षांत सामाजिक परिवर्तन झपाट्यानें झालें आहे. १९१० सालीं म्हापसें येथें भरलेल्या संयुक्त परिषदेनें ग्रामण्याचें कंबरडें पहिल्यांदां मोडलें. पूर्वी एकदां सुपें प्रकरण म्हणून मोठें ग्रामण्य माजलें होतें. सुपें येथें चुकून गोमांस खाल्ल्याबद्दल एका कुटुंबास बहिष्कृत करण्यांत आलें होतें. यावेळीं गोमन्तकांत दोन मोठे पक्ष झाले. पण पुरुषोत्तमबाबा केंकरे या थोर गृहस्थांनीं तें हातास गुंडाळून जातीनें कष्ट घेतले व ही अस्वस्थता मोडून काढली. संयुक्त परिषदेनंतर सुधारणा प्रत्यक्ष आचरणांत आणण्याचें धैर्य तरुणांत आलें. दैवज्ञ, भट्टप्रभु या जातींतील पोटभेदांचें एकीकरण झालें व इतर समाजांतही ही चळवळ पसरली. जातिभेदाचीं बंधनें पुष्कळ शिथिल झालीं. प्रत्येक जातींत स्वाभिमान, जागृति व उन्नतीची इच्छा उत्पन्न झाली. सारस्वतांबरोबर वैश्य, दैवज्ञ, मराठा, भंडारी इ. जातींस सामाजिक दर्जा प्राप्त झाला. मागासलेल्या म्हटल्या जाणाऱ्या जाती शिक्षणानें अलंकृत झाल्याबरोबर त्यांची लायकी सिद्ध झाली. पूर्वी जातिभेदाची तीव्रता होती; पण जातिमत्सर दिसत नव्हता. आतां जातिभेद खिळखिळा झाला आहे; पण जातिमत्सरास असूयेचें स्वरूप आलेलें दिसतें. सामाजिक चालीरीतीकरतां स्पर्धा असली तरी एकंदरींत परस्पर जातींत शुद्ध स्नेह दृष्टीस पडे. आतां त्या स्नेहास औपचारिकतेचें स्वरूप आलेलें दिसतें. आपापला आचार पाळण्याविषयीं प्रत्येक जात दक्ष असल्यामुळें परस्परांचा उपहास करण्याची प्रवृत्ति पूर्वी नव्हती. आज उत्क्रांतिकालाच्या स्थितींत सगळ्या जाती व समाज असल्यानें एकमेकांच्या विरोधास सौम्य स्वरूप आलें आहे, पण खासगी बैठकींत व्यक्त होणाऱ्या मनाच्या तेढी अजून बुजलेल्या दिसत नाहींत. देवस्थानें, ग्रामसंस्था, जातिसंघटनेचे समाज या बाबतींत जातिभेदाचें स्वरूप स्पष्ट दिसतें. लौकिक वर्तनांत जातिभेदाला आज महत्व नाहीं, पण सर्व जाती समान पातळीवर येण्यास अजून अवकाश आहे. या पंचवीस वर्षांत सारस्वत ब्राह्मणांच्या मागोमाग पोर्तुगीज शिक्षणाच्या बाबतींत

वैश्य समाज येत आहे; दैवज्ञ ब्राह्मणांत त्याचप्रमाणें मराठा, नापित, भंडारी, तारी या समाजांतून बरीच जागृति झाली आहे, व त्यांत पुष्कळ पदवीधर दिसत आहेत; पण या नापित समाजोन्नतीचें मूळ नानू तारकर पेडणेंकर यांनीं घातलें व भंडारी ज्ञातींतील जागृति लक्ष्मण काशिनाथ खर्डे यांनीं केली.पण या सर्वांपेक्षां मराठा गायक समाजाची प्रगति अधिक वेगाची आहे. या पंचवीस वर्षांतच त्यांनीं आपला स्वतंत्र दर्जा प्रस्थापित केला. कलेच्या बाबतींत त्यांची प्रसिद्धि सर्वत्र होती. पण आधुनिक शिक्षणानें अलंकृत होऊन व आपल्यांतील अनिष्ट चालीरीतींना त्याज्य ठरवून या समाजानें जी कामगिरी केली ती विशेष वाखाणण्यासारखी होय. 'भारत'कार हेगडे देसाई यांच्या मदतीनें स. १९१३ सालीं मोतीराम बा. जांबावलीकर, राजाराम कांत जांबावलीकर, राजाराम पैंगिणकर, आनंद काकोडकर इत्यादि अनेक तरुणांकडून हें वीं प्रथमतः लावण्यांत आलें. व्यंकटेश सूर्यराव सरदेसाई यांचेंही आरंभापासून या चळवळीस प्रोत्साहन होतें. मुरारी का. शिरोडकर हे मुंबईस काम करीत. कृष्ण सगुणजी फातर्पेकर यांच्या कर्णधारपणामुळें व सखाराम रामनाथकर, पांडुरंग शिरोडकर इ. पुष्कळ मंडळीच्या परिश्रमामुळें याचा जोमदार वृक्ष झालेला दिसतो. समाजसेवकांचे कळकळीचे प्रयत्न व उदार धनिकांचें पैशांचें भरपूर पाठबळ यामुळें ही चळवळ लवकरच फोफावली यांत शंका नाहीं. या कामीं इतर जातींतील उदारमतवादी गृहस्थांचीही सहानुभूति मिळाली होती. पण आपल्या पायावर उभें राहून आत्मोद्धाराचा मार्ग चोखाळण्यांत या जातीनें दाखविलेली धडाडी स्तुत्य आहे. आज मुंबई शहरांत ह्याच गोमन्तकीय मराठा समाजांतून अनेक बंधुभगिनी डॉक्टर, वकील, इंजिनियर होऊन स्पृहणीय रीतीनें वावरतांना आणि त्यांना बोट दाखवून आमचे गोमन्तकीय तरुण आपल्या प्रांताचा अभिमान वागवितांना दिसत आहेत !

नवें शिक्षण व नवे संस्कार यांपासून सर्वस्वी अलिप्त असा समाज द्राविड ब्राह्मणांचा तेवढा राहिला आहे. या समाजांत एकदोन पदवीधर आहेत, पण पुढाऱ्यांच्या प्रयत्नाप्रमाणें व स्वार्थत्यागानुसार फळ आलेलें दिसत नाहीं. जुने आचार, वैदिक वृत्ति अगर गरिबी हींही त्याचीं कारणें असतील. पण वस्तुस्थिति जी आहे ती सांगणें भाग पडतें.

आचाराच्या बाबतींत तर पुष्कळ क्रांति झाली आहे. खाणावळी, चहाचीं दुकानें, प्रवासाचीं साधनें यामुळें आचारधर्म, सोवळेंओवळें, स्नानसंध्या यांत पुष्कळ शिथिलपणा आला आहे. पूर्वी खाणावळींत जेवणें म्हणजे भ्रष्ट होणें असें समजत. जेवण्याचा प्रसंग आला तर ओलें वस्त्र अगर तेथील सार्वजनिक मुकटा नेसून लोक जेवीत असत. एखादा बाहेरचा माणूस ओंवळ्यानें बसला तर त्याचें पान निराळें मांडण्यांत येई. व तो सर्वांच्या टीकेस पात्र होई. जुन्या चालीचे लोक शहरांत आल्यावर खाणावळीचें अन्न टाळण्याकरतां उदार धनिकाचे घरीं लांबच्या नात्यामुळें, परिचयामुळें अगर घरधन्याच्या चांगुलपणामुळें जात व त्यांना जेवण व राहण्यास जागा

व्यांत अशीं परोपकारी व अन्नदा-
प्रसिद्ध कुटुंबें ठिकठिकाणीं असत.
राहणीमुळें या खाणावळी घरंदाज
तिरस्करणीय वाटत. पुनः पुनः
या शेणजमिनीवरील कांहीं काड्यांच्या
सांधलेल्या चाळणीसारख्या पत्रा-
णारांचें अन्न गोमय-मिश्रणानें शुद्ध
त व यामुळें त्यांचें धर्माचरणही
जात असे. माधवाश्रमानें ताट-
आणून हिंदूंचें जेवण थाटदार
ा प्रयत्न केला. त्याबरोबरच
च्या पंक्ती दिसेनाशा झाल्या. आज
सह सर्वत्र बसण्याची वहिवाट चालू
मेजावरील 'राइसप्लेटी' सुरू झाल्या
चहाच्या दुकानांमुळेंही भक्ष्याभक्ष्याचा
कळा झाला. पूर्वी पणजींत एकच
चहाचें दुकान होतें. मुंबईस जाणाऱ्या
करतां येथें चहा खपे. ब्राह्मण
कीं नव्यानेंच कांहीं तरुण चोरून या
त शिरत. या गोष्टीस अनुलक्षून एक
णतोः—

"ये काल कसा विपरीत अहा ॥
शूद्रसदनीं द्विज पीति चहा ॥
.....
अभक्ष्यभक्षण नित्य महा ॥"

डॉ. शिरगांवकर, केणी, भोबे यांच्या
नें नवें चहाचें ब्राह्मणी दुकान थाट-
आलें व बेळगांवचा भटजी आणून
हातचे पदार्थ तयार करण्यांत आले.
ं या दुकानाचा विषय पणजींत इतका
ा व महत्वाचा झाला कीं, त्यामुळें
भोबे या कवीची काव्यस्फूर्ति जागृत
व त्यांनीं या ब्राह्मणी चहा-कॉफीच्या
दुकानावर त्यावेळीं नवीनच शारदा नाटकां-
तील प्रसिद्ध झालेल्या पदांच्या चालीवर
अनेक पद्यें रचलीं. नव्या वाचकांना तीं
ऐकून मोठी करमणूक होईल. आधींच
गोमन्तकांत काव्याची अभिरुचि, त्यांत
चहाकॉफी पक्कानें अशासारखे गोड विषय
आणि रचणार कवि 'भोबे' मग त्यांचा
आस्वाद घेतल्याशिवाय जनता कशी राहील?
कवि म्हणतो:—

पोरांसह थोर किती ।
ब्राह्मणींत नित्य येति ।
चहाकॉफी कोणि पिती ॥
+ + +
घंटेनें सूचविती ॥
हलवा द्या कोणि म्हणति ॥
+ + +
कांहीं न दिसे येथ कमती ॥
बर्फ ते उणें ॥

चहाकॉफिच्या दुकानाची मालकी आतां
ब्राह्मणेतरांकडून क्रिस्ती लोकांच्या हातांत
जात असून सोंवळ्या कुटुंबांतील मंडळीस
इकडेच तयार झालेले पदार्थ मागविण्यास
संकोच वाटत नाहीं. बाजारांतून घरीं आल्या-
वर कपडे बदलण्याची चाल आतां नामशेष
झाली आहे. हरिजनांचा स्पर्श आज प्रेमाचा
निदर्शक समजण्यांत येतो. इतकें परिवर्तन
आचारविचारांच्या बाबतींत घडून आलें
आहे. सर्व जातींचीं सहभोजनें जाहीरपणें
अजून सुरू झालेलीं नाहींत. पण खाणावळी-
तून जातिभेद विशेष पाळलेला दिसत नाहीं.
ब्राह्मण तरुणांच्या गळ्यांतील जानव्यास
सुताची किंमत आली असून पुष्कळांनीं ती
उपाधि गळ्यांत बांधण्याचें सोडून दिलें आहे.

जानव्यानें आतां नवीन प्रांत काबीज केला असून तें ब्राह्मणेतर समाजाच्या खांद्यावरून भूषणास्पद रीतीनें मिरवीत आहे. स्नानाची बदली आचारधर्मावरून शुद्धिकर्माच्या जागेवर झाली आहे. आणि संध्या हा शब्द संस्कृत भाषेंत अगर कवींच्या काव्यांतूनच ऐकण्यास मिळतो. डोक्यावरील शेंडीचा आकार आतां गाईच्या पावलाचा राहिला नसून एखादें लहानसें वासरूं बसेल असें तिचें क्षेत्र वाढलें आहे. मिशांची मर्यादा हळुहळू संकुचित होत आतां त्यांना कायमचें हद्दपार होण्याची वेळ आली आहे. प्रतिज्ञा पुरी करण्याकरतां द्यावयाच्या शपथेप्रीत्यर्थ 'एक मिशी उतरीन' या शब्दांऐवजीं 'एक मिशी वाढवीन' हा नवा वाक्प्रचार भाषेंत रूढ होऊं पहात आहे. क्रिस्ती लोकांत मिशा कातरण्याचें काम अशिक्षित मजूर करीत व हिंदूंत तें सुतकाचें चिन्ह समजण्यांत येई. आतां ओंठावरील मिशांना साध्या केंसाइतकें देखील सुशिक्षित समाजांत महत्व राहिलें नसून, मिशांची पुरवणी, कल्ले हीं चिन्हें मागसलेल्या समाजांत दिसतात! एखादा जुना गृहस्थ, क्षत्रिय, मराठा अगर शिपाई पेशांतला तरुण आज मिशांचा जोड राखून असतो, पण त्यांकडे पाहून आदर व भीति उत्पन्न होण्याचे दिवस गेले. राग, आवेश अगर स्वाभिमान दाखविण्याचें चिन्ह म्हणून मिशांकडे हात जाण्याची प्रवृत्ति आजच्या तरुणांत नाहीं. पूर्वी हजामत सकाळची करीत. व ती झाल्यावर आंघोळ झाल्याशिवाय घरांत येण्याची बंदी होती. आतां कोणत्याही वेळीं ती करण्यास संकोच वाटत नाहीं. सफाईचें काम कोणत्याही वेळीं करावें अशी वृत्ति दिसून येते.

पोषाखाच्या बाबतींत तर फारच बदल झाला आहे. जुन्या काळीं धोतर, लांब झगा व डोक्यास मोठा चक्रीदार रुमाल अगर तांबडी टोपी हीं वापरीत. नंतर झगा व रुमाल यांचे आकार लहान झाले. अंगावरील उपरणीचें स्थान हातरुमालानें पटकाविलें. नंतर रुमालाचे ऐवजीं टोपी घालणें सुलभता व काटकसर या दृष्टीनें रूढ झालें. हळूहळू धोतराची जागा पायघोळ लेंग्यानें व्यापली. मस्तकावरील टोपीचें राज्य आतां टोपीवाल्याच्या राज्याप्रमाणें हळूहळू संपुष्टांत येत असून कोणासही माथ्यावर बसूं न देण्याचा आजच्या तरुणांचा निश्चय दिसतो. या क्रांतीमुळें सनातनी तांबडी टोपी अपमानानें लालभडक झाली असून कित्येक जुन्या लोकांच्या आधारावर ती जीव जगवून आहे. पण तिचें शरीर ताठ उभें असें पूर्वीसारखें दिसत नाहीं, यावरून तिचें आयुष्य थोडेंच आहे असें वाटतें. वस्त्र उपवस्त्र घेऊन उघड्या अंगानें फिरण्याची छाती आज कोणीही दाखवीत नाहीं; एखादा खेडवळ तशा स्थितींत शहरांत आला तर त्याला पोलीस कचेरींत जाण्याची भीति कायद्यानें उत्पन्न केली आहे. श्रीमंतांच्या घरचीं नागपुरी धोतरें आतां सोवळ्या पीतांबराची सोबत करीत पेट्यांतून वनवास भोगीत आहेत. पुष्कळ घरांतून त्यांचीं अंगें व पदर मुलांच्या गोधड्या सुशोभित करण्याच्या उपयोगी पडल्या आहेत. जाड वस्त्रांना आतां गोण-

पाटाइतकीही किंमत कोणी देत नाहीं. तलम वस्त्रांचा वापर सर्वत्र सुरू आहे. जाड धोतरें देवांच्या मूर्तीला नवसादाखल मिळत आहेत, जणूं काय या दगडी अंगास हीं वस्त्रें सहन होतील अशी भक्तांची कल्पना आहे. बायकांच्या पेहरावांतही असाच बदल झाला आहे. लुगड्यांऐवजीं पातळें, चोळ्यांऐवजीं पोलकीं चालू आहेत. खोबरेल तेलाची जागा सुवासिक तेलानीं घेतली आहे. केशरचनेंत विविधता आली आहे. वेणी घातलेली बाई पुजारी वैदिक ब्राह्मणाची व तीही अगदीं आजीबाई झालेली अशी दिसते. सैल अंबाडा बांधण्याची चाल सरसकट रूढ झाली असून तो केव्हां खालीं तर केव्हां वर इतक्यापुरताच हलत असतो. अंबाड्याभोंवतीं उरलेल्या केसाच्या शेपटाची वेणी गुंडाळण्याऐवजीं आतां केसांच्या वेण्या करून त्यांचाच अंबाडा बांधण्याची चाल पडत आहे. कृत्रिम केंसाच्या पुरवणीनेंही अंबाडा सजविण्यांत येतो. पुरुषांच्या कपाळावर जुन्या सनातन्यांपुरेंत क्वचित गंध दिसतें. भस्म अगर गोपिचंदन या शब्दांचे अर्थ गृहस्थाश्रमांत सप्रयोग वावरत असल्यामुळें तें धार्मिक भूषण अंगावरून मिरविण्याचा जरुरी राहिली नाहीं असें वाटतें. भस्माचा राख व गोपीचंदनाची माती यांचा खप खत व औषध याप्रीत्यर्थच तेवढा आज होत असतो. नवऱ्याच्या पांचही प्राणांची जाहिरात करणारी कुंकवाची विशालता आज क्वचितच दिसते. एका कानापासून दुसऱ्या कानापर्यंत जाणारा कुंकवाचा पट्टाही आज नेमक्याच कुटुंबांत दिसतो. चन्द्राची कोर तर आकाशांतच पाहून घ्यावी लागते. आजच्याकालीं कुंकूमतिलकानें भालप्रदेशांतील मध्यभागीं आपलें ठाण मांडलें असून त्याचें अंग मात्र हळूहळू नाजूक बनत आहे. आधुनिक तरुणांच्या शरीरप्रकृतीकडे पहातां सौभाग्यचिन्हांचा हा नाजूकपणा अर्थबोधक आहे. असें म्हणावयास हरकत नाहीं. भर पावसांत अगर उन्हांत छत्री अगर पायतण पूर्वी बायकांच्या नशिबांत नव्हतें, आज स्त्रीसमाजांत पायतण सरसहा वापरण्यांत येतें; छत्रीचें स्वातंत्र्य अजून त्यांना मिळालेलें नाहीं. पण चारचौघांत त्यांच्यावर छत्र धरण्यास नवऱ्याची तयारी असते. पुरुषांच्या पोशाखांत आणखी एक क्रांति झाली आहे. नोकर वर्गांतील, बहुतेक हिंदूचा पोषाख कांहीं सक्तीमुळें, कांहीं भिडेमुळें, तर कांही हौसेमुळें पाश्चात्य वळणावर गेला आहे. आणि कचेरींची वेळ संपली तरी बदलण्यास त्याला श्रम घ्यावे लागतात म्हणून तोच अंगावर ठेवण्याची कामदार वर्गाला संवय होत चालली आहे. शिवाय या पोषाखांत असल्यावर इतर जनांवर, मजूरवर्गावर व क्रिस्ती युरोपियन समाजावर वजन पडतें असा अनुभव आहे. यामुळें देवळांत, उत्सवांत, क्वचित लग्नमुंजींत हाच वापरणें सुखसोईचें झालें आहे. बरोबर सौभाग्यवती असली म्हणजे हें धेडगुजरी जोडपें पाहून पूर्वी अचंबा वाटत होता, पण आतां लोकांच्या डोळ्यांस तशी संवय झाली आहे. वैदिक घराणीं, जुने सनातनी गृहस्थ, साधारण कुटुंबांतले तरुण व अशिक्षित लोक यांच्या ठिकाणीं अजून जुना आचार व पोषाख शिल्लक आहे पण त्यांतही बदलतें स्वरूप दिसतेंच!

पोषाखाची वाढ झाली पण दागिन्याची संख्या संपुष्टांत आली आहे. पूर्वी लहान मुलांचे काम, हात, पाय, कंबर, गळा, डोकें सगळे अवयव मढवून काढीत. आज फार तर कान व गळा या दोनच स्थानीं सोन्याचा स्पर्श होतो. कान टोंचण्याचें लक्षण अजून चालू आहे इतकेंच! पुरुष पूर्वी, कानांत भिकबाळ्या, हातांत पेट्या, गळ्यांत कंठी, कमरेंत गोप असे दागिने घालीत. अगोदरची खानदानी पिढी कानांत चौकडे वापरी. आतां दागिने वापरणें अशिक्षितपणाचें दर्शक मानण्यांत येतें. घड्याळाचे छडे अगर आंगठ्या क्वचित्च दिसतात. बायकांच्या दागिन्यांपैकीं निरनिराळ्या घाटदार वस्तु मोडून विकणें अगर दुसऱ्या करून घेणें सुरू झाल्यामुळें मोठमोठे करंडे रिकामे झाले आहेत. केगदाची जागा गुलाबाच्या फुलानें कांहीं दिवस घेतली होती, पण तेंही आतां गळून पडल्याचें दिसतें. अंबाड्यावर विराजमान होणारे दोन्ही 'गंडभैरव' पक्षी उडून गेले असून एखाद्या गरजवंत पारध्याच्या भक्षस्थानी ते पडले असावे, असें वाटतें. नवऱ्याचा फोटो लॉकेटांत घालून 'माळण्या'ची हौस एकदोन स्त्रियांनीं दाखविली होती, पण ही पतिभक्ति प्रस्तृत झाली नाहीं. नवऱ्याला डोक्यावर बसवून घेण्याचे आजचे दिवस नाहींत हें उघड आहे. कानांतली बुगडयांची जागा कांहीं दिवस 'पख्यां'नीं घेतली होती, पण आतां मोत्याचीं अगर हिऱ्याचीं कुडीं हींच कर्णभूषणें म्हणून मिरवत आहेत. गळ्यांतला मुहूर्तमणी रोडलेला असला तरी अजून त्याची गरज भासते व त्याच्या सोबतीस आणखीही वस्तु दिसतात. एखादी कंठी अगर 'सरपळी' हींच आतां गळ्यांत घातलीं जातात. बोरमाळ मध्यम वयाच्या बायका घालतात. हातांतल्या गोटपाटल्या हळुहळू नाहींशा होत असून तेथें बारीक बांगड्या येत आहेत. पायांतील तोडे हा जिन्नस मराठमोळ्यापैकीं झाला आहे. हें सुशिक्षित श्रीमंत समाजाची स्थिति. अशिक्षित व निर्धन यांना दागिन्यांची हौस असणें स्वाभाविक आहे, पण 'जायां'च्या आणतांनादेखील पूर्वीच्या करंड्याचा आश्रय घेतला जात नाहीं, यावरून दागिन्याच्या आवडीनिवडींत किती फरक पडला आहे हें दिसून येतें. कंबरपट्टा, बाजूबंद, वांक्या 'बायखुरी' हे दागिने आतां शब्दकोशांतून शिल्लक राहतील. संपत्तीच्या बाबतींतल्या आजच्या कालची विषमता पहातां, हिऱ्यामोत्यांचे अगर सोन्यारुप्याचे दागिने आधींच दुर्मिळ झाले आहेत आणि त्यांतही नव्या प्रकारपरवडीमुळें या वस्तूंचें उच्चाटन आयतें पथ्यावरच पडलें आहे.

आहारांतही असाच बदल होत आहे. चहाकॉफीचें प्रस्थ आतां मजूरवर्गापर्यंत व स्वयंपाकघरांतील उपवास करणाऱ्या सोंवळ्या आजीबाईपर्यंत वाढलें आहे. पूर्वी वैष्णव ब्राह्मणांत शाकाहाराची पद्धत होती. आतां शाळिग्रामाचें पूजन असलेल्या घरांतूनही विष्णूच्या पहिल्या अवतारानें प्रवेश झाला आहे. देसाई वगैरे क्षत्रिय वृत्तीच्या सारस्वत ब्राह्मण कुटुंबांत पूर्वी बकऱ्याची सागोती अगर शिकारी जनावराचें मांस खाण्याचा प्रघात होता, आतां 'तांबडी भाजी' सर्वत्र उपयोगिलेली दिसते. 'पेज', 'खतखतें' हे जिन्नस आज मजूरवर्ग

पुरतें काम करतात. सुशिक्षित वर्गांत दुपारचें एकच जेवण पुरे होतें. रात्रौ भाजी, चपाती अगर चटणीभाकरी खाण्यांत येत असून सारा दिवस जिभेचे चोंचले पुरविण्याकडे अधिकाधिक प्रवृत्ति दिसते. रताळ्याचे, रव्याचे अगर धान्याचे पदार्थ करून घरांत ठेवण्याची पद्धति कमी होत असून, आयत्या प्रसंगीं दुकानांतून, तयार जिन्नस आणवून देण्याची चाल विशेषतः शहरांतून पडत चालली आहे. लोणचें, पापड, कुटलेल्या चटण्या आतां पानाची शोभा वाढवित नाहींत. 'खळआमली' तर तापाच्या माणसाकरतां पेज घेतांना शोधून आणावी लागते!

कष्टाविषयींची सर्वत्र अनास्था असल्यामुळें सुशिक्षित जनता अधिकाधिक परावलंबी होत आहे. नवें 'भाट' निर्माण करण्याचें सामर्थ्य नव्या पिढींत दिसत नाहीं, पण असलेल्या जमिनींत 'कवाथे' लावण्याचे श्रम तरुणांकडून होत नाहींत. केळीं, लिंबू, पपई यासारख्या अल्पायुषी झाडांना किंमत आली असून आंबा, फणस, माड यांकडे दुर्लक्ष होत आहे. पूर्वीचे लोक पाणी काढणें, भांडीं घासणें, वस्त्रें धुणें या बाबतींत स्वावलंबी असत. आतां जिवंत राहणें भाग म्हणून तोंडापर्यंत हात नेण्यांत येतो असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. बाजारहाट करणें हें नव्या तरुणांना लाजिरवाणें वाटतें. पूर्वी जेवणांतले बहुतेक जिन्नस घरच्या बागेंत तयार होत, त्यांतले कांहीं विकून त्याच्या बदला गरजेच्या इतर वस्तु आणण्यांत येत. पांढरपेशा समाजांतून ही कष्टाची वृत्ति व जमिनींतून फळें काढण्याची बुद्धि नाहींशी झाली आहे.

पंचवीस वर्षांपूर्वी समाजांत श्रीमंत घराण्यांकडे पुढारीपणा होता. Aristocracia वर्गांत दानधर्म, परोपकार, सुस्वभाव, शांत वृत्ती इ. गुण असल्यावरून शिवाय 'सर्वे गुणां कांचनमाश्रयंति' या न्यायानुसार हाच वर्ग समाजाच्या अग्रभागीं चमकत होता; नंतर ही जागा Burocracia नोकरशाहीनें पटकावली. अधिकारी वर्गाच्या हातांत प्रापंचिक गरजा भागविण्याचें काम असल्यानें या वर्गाची चलती अजून कित्येक ठिकाणीं चालू आहे. Democracia जनता वर्गांतून स्वार्थत्यागानें, तपश्चर्येनें व राष्ट्रीय कार्याच्या दृष्टीनें पुढें आलेल्या माणसाकडे आतां पुढारीपणाचा मान चालून जाण्याचे दिवस असून वरील दोन्हीं वर्ग त्याचा अधिकार मानण्यांत आनन्दच मानतील. संपत्ति अगर अधिकार नसतांना केवळ लोकसेवा पूर्णपणें बजावून त्याचें बक्षीस म्हणून लोकांचा धनी होणें यासारखी भूषणास्पद स्थिति नाहीं हें खचित!

पूर्वी आडनांवें व नांवें कोंकणी-पोर्तुगीज वळणावर होतीं. आतां मराठी वळणावर जात आहेत. Camotim, Quencró, Sambari या ऐवजीं Camat, Quencrê, Sambarê अशी शुद्धि होत आहे. स्त्रियांच्या नांवास ईण प्रत्यय लावून तीं विशेषतः पोर्तुगीज भाषेंत लिहिण्याची पद्धत होती. नायकाची बायको नायकीणी, कामत–कामतिणी, पै पैणी, असें सरकारदरबारांतून लिहीत. आडनांवांत शेणवी, भट, शेट, गाण (गाणारा वर्ग म्हणून) अशीं उपपदें वापरीत, आतां तीं लावण्याची पद्धति नाहीं. मुलींना नांवें फुलांचींच होतीं. व आजही तीं ठेवतात. पण

आबोलें, शेंवतें, ओंवळ या कोंकणी शब्दांऐवजीं गुलाब, कमल, कुमुद या मराठी शब्दांनीं ठेवण्यांत येतात. कुष्ट, मतों अगर सदोजी, सूर्याजी हीं नांवें मुलांना आतां कोणी ठेवीत नाहीं. महाराष्ट्रावरून आतां बंगालकडे आईबापांची दृष्टि गेली आहे. मद्रास प्रांत जवळ असला तरी तेथील नांवें सुटसुटीत नसतात. पार्थसारथी, विजयराघवाचार्य अशीं नांवें प्रचारांत आलीं तर तीं क्रिस्ती नांवांप्रमाणें लांबलचक दिसतील यांत शंका नाहीं. आईला आवं–बा–वरून आई व बापास बाप्पा–दादा–वरून बाबा म्हणण्यापर्यंत मजल आली आहे. पापा हा पोर्तुगीज शब्द कांहीं घरांतून ऐकूं येतो. टोपण नांवाचा प्रचारही आतां लोपत आहे. फोंडू शास्त्री, दादा वैद्य, बोंबी नाईक, काका दणाईत अशामुळें मूळ नांव समजण्यास अडचण पडे. आतां मुख्य नांवानेंच हाक मारण्याची पद्धति दिसते.

पूर्वीची अविभक्त कुटुंबपद्धति आतां क्वचितच दिसते. पूर्वी कुटुंबबळ पाहून सोरगत करीत; आतां द्रव्यबळाकडे लक्ष देण्यांत येतें. पूर्वी सासूसासरा असावा अशी हौस होती; आतां विठ्ठलरखुमाईचा प्रपंच आवडूं लागला आहे. पूर्वी संततीस महत्व होतें, आतां संततिनियमनाची भाषा ऐकूं येते. 'होतील बाळ तर फेडतील काळ' अशी म्हण पूर्वी रूढ होती, आतां 'पुष्कळ बाळें आईबापांचें तोंड काळें' अशी स्थिति झाली आहे. पूर्वी वरदक्षिणा सक्तीची नव्हती, आतां नवऱ्यांच्या किंमती बेसुमार वाढल्या आहेत; पूर्वी मोठ्या धंद्यांना महत्व होतें, आतां बारीक उद्यम ऊर्जितावस्थेंत आहेत. पांढरपेशा वर्गाची स्थिति खालावली असून मजूरवर्गाची सुस्थिति आहे. घराची रचना नव्या परिस्थितीप्रमाणें बदलली असून आंतबाहेर घरांत उजेड पडण्याची व्यवस्था होत आहे. आरोग्याच्या कल्पना विशेषपणें समजुतींत आल्या आहेत, पण अनियमित वागणुकीमुळें आरोग्यशास्त्र ग्रंथांतच पडून राहिलें आहे.

समाजांतील द्विजवृत्ति नष्ट होत आहे. यज्ञकर्मावरील श्रद्धा दिवसेंदिवस कमी होत आहे. अग्निहोत्राचें कार्य चुलीकडून होतें तेवढेंच. क्षत्रियवृत्तीची स्थिति अशीच उपहासास्पद झाली आहे. सर्व व्यवहार वैश्यवृत्ति व शूद्रवृत्ति यांनींच व्यापला असून या वृत्तींशीं समरस न होणारा माणूस आत्मघातकी, व्यवहारशून्य व नालायक ठरत आहे. स्वतंत्र पेशापेक्षां नोकरीकडे जमीनदार वर्गातील तरुणांचेंदेखील लक्ष लागलें असून कष्टाळूपणाच्या पाठीवर परिस्थिति अधिक दडपण घालीत आहे. खरी धर्मश्रद्धा अगर भक्तिप्रेम यांचें स्वरूप कर्मकांडाच्या रूपानें व्यक्त होत आहे. आर्थिक विषमतेमुळें प्रसाद, ज्योतिष यांचें बंड माजलें असून जिव्हाळ्याची देवभक्ति सांपडणें कठीण होऊन बसलें आहे. दिड्या, सप्ताह, जत्रा, उत्सव या सर्वांत कला, हौस, करमणूक ही दृष्टि अधिक दिसते. स्पर्धेच्या गोष्टी या नात्यानें पूर्वी गांवोगांव नाटक मंडळ्या होत्या. नंतर भजनी सप्ताह झाले, आतां दिड्यांचा काळ आला आहे. सत्संगकर्ते यांनीं या सप्ताहांवर टीका केली होती कीं,

गांवोगांव झाला सप्ताहाचा थाट ॥
देवाकडे घांट फुटकीच ॥

खिशांत पुनः येऊन शिरण्याची त्याची तयारी नसते इतक्यापुरतेंच वाईट वाटतें.

प्रवासाच्या साधनांत वेग उत्पन्न झाल्यामुळें इह-परलोकामधील अंतर तोडण्यास आज फार काल लागत नाहीं. आकाश व पृथ्वी यांच्या पोकळींत आज विमानाचें युग सुरू झाल्यामुळें प्रसंग पडला तर स्वर्गवासी होण्यास आत्म्याला आत्मगतिके (automóvel) पेक्षां कमी वेळ खर्च होतो. या वेगवान् परिस्थितीमुळें प्रपंचरहाटीही जोरानें फिरूं लागली आहे. एखादें घराणें उदयास येण्यास तसेंच नामशेष होण्यास पूर्वी पुष्कळ काळ व अनेक पिढ्या लागत, आज एखादा पुरुष हां हां म्हणतां पुढें येतो व पहातां पहातां नाहींसा होतो. माणूस, वस्तु, शब्द, तत्व सर्वांनाच अल्पायुष्य व अस्थिरता प्राप्त झाली आहे.

या २५ वर्षांत निरनिराळ्या क्षेत्रांत चमकलेले असे अनेक गृहस्थ होऊन गेले, त्यांना शेवटीं वाङ्मयतिलांजलि देणें कर्तव्य ठरतें. यांतील अनेकांशीं माझा जिव्हाळ्याचा संबंध होता, आणि कित्येकांनीं प्रेमाची पांखर घालून मला नेहमीं आपलासा मानलें होतें. गतेतिहासांत समाविष्ट झालेल्या या गृहस्थांचीं नांवें विस्मृतींत गेलीं तर भावी पिढीकडून अन्याय झाला असें होईल या दृष्टीनेंही उल्लेखनीय असे गृहस्थ अनेक आहेत. म्हापसेंचे पांडुरंग सदाशिव दणाईत, रवळू शंभु खलप पणजीचे डॉ. शिरगांवकर, नारायण पांडुरंग आगशीकर, पुंडलीक अनंत केणी, जीवाजी दत्तू महात्मे, सदाशिव शे. सुखठणकर, फोंड्याचे नारायण अनंत बांदोडकर, कवळेंचे विनायक रामचंद्र सरज्योतिषी, मडगांवचे यशवंत (बोंबी) नाईक, शंभु पै पाणंदीकर, प्रो. व्यंकटेश नाईक, शंकर बाबली वेलेंकर, केपें येथील गोविंद शे. शिरवईकर, काशीनाथ घनःशाम शिरवईकर, दत्ताराम जगन्नाथ बोरकर, घनःशाम सांब व सोहिरोबा मळकर्णेकर बंधु, बाबन शेणवी शिरवईकर, पारोडेचे पुरुषोत्तम श्रीनिवास सुकेरकर, कुर्डीचे गोविंद ज. देसाई यांसारखे सार्वजनिक चळवळींतून स्वार्थत्यागपूर्वक व उत्साहानें भाग घेणारे, पेडण्याचे आत्माराम वासुदेव देशप्रभु, यशवंतजी जसवंतराव, घनःशाम रघुनाथ देसाई, मडगांवचे सुब्रह्मण्यानंदतीर्थ, कुंभारजुव्याचे फटवा बाबूराव केंकरे यांसारखे जुने विद्वान्, पणजीचे विष्णुबाबा धेंपे, हिरू कामत घाणेकर, कृष्ण नाईक सुकेरकर, पानदेलीचे पुंडलीक के. कामत, बांदिवड्याचे भाऊसाहेब मुख्य सरदेसाई, डिचोलीचे सखाराम सूर्यराव देसाई यांसारखे परोपकारी व सत्प्रवृत्त गृहस्थाश्रमी, लामगांवचे नानासाहेब देसाई, सांखळीचे आप्पासाहेब राणे, गांवठणकर देसाई, जुवेकर राणे, आरोबेकर रा. साहेब, केरकर नानासाहेब, वाडीचे विठोजी प्रतापराव यांसारखे शूर, धाडसी व रुबाबदार गृहस्थ यांचें स्मरण करणें योग्य आहे.

गोमंतकांतील एकंदर चळवळींचें सिंहावलोकन करतांना प्रागतिक संघाबद्दल दोन शब्द लिहिल्याशिवाय पुढें जातां येणार नाहीं. या संस्थेमुळें राजकीय क्षेत्रांतील निवडणुकांच्या बाबतींत हिंदु समाजाची संघटना घडून आली व त्यांच्यांत आत्मविश्वास उत्पन्न झाला. एखाद्या क्रिस्ती जमिनदारानें, पाद्रीनें अगर एखाद्या वकील डॉक्टरानें सांगावें व हिंदूंनीं निमुटपणें आपलें मत कोणासही द्यावें, किंबहना ते

स्थिति वडिलांची झाली आहे. कौटुंबिक ममतेवरून सामाजिक हितावर आज दृष्टि वळली असून विचारी जनता या मार्गावर धडपडत चालली आहे. पूर्वी एखाद्या श्रीमंतावर अगर गांवच्या शिक्षितावर अवलंबून आपले व्यवहार चालविण्याची समाजांत प्रवृत्ति होती; आतां प्रत्येक माणूस आपल्या पायावर उभा राहण्यास शिकत आहे. पूर्वीचे लोक संकटाला घाबरून दुर्बळ बनत नसत. कारण त्यांच्या पाठीमागें अनुभविक माणसाचे धीराचे शब्द व परमेश्वरावरील अचल श्रद्धा उभी असे. आज संकटांनीं गांगरून सोडल्यावर डोळ्यांसमोर शहरांतच अरण्य दिसूं लागतें. पूर्वी सगेसोयरे प्रेमानें वागून एकमेकांना आपुलकीच्या भावानें मदत करीत; आज सोयऱ्याची सोय पहाण्यापेक्षां त्याच्या आयुष्यांतील गैरसोय वाढविण्याकडे प्रवृत्ति दिसते. ज्ञानाचा आनंद उपभोगण्यापेक्षां विद्वत्तेचा पसारा मांडण्याची बुद्धि सर्वत्र दिसते. 'परोपकार न बोले । न मिरवी अभ्यासिलें' ही वृत्ति आतां मागें पडत असून अनेक साधनांनीं स्वतःची व स्वतःला प्रिय अशा कंपूची जाहिरात करण्याची पद्धति अनुसरली जात आहे. दुसऱ्याचें चित्त व वित्त हा गुप्त ठेवा आहे व तो आपणाकडे दिल्यास तसाच काळजीपूर्वक सांभाळावा ही बुद्धि दिसून येत नाहीं. क्रिस्ती समाज या बाबतींत श्रेष्ठ आहे. हिंदु समाजाचें सात्विक स्वरूप दिवसेंदिवस नष्ट होत असून त्याला रजतमाचें वळण पडत चाललें आहे. पुढारी म्हणून मिरविणारे गृहस्थ आपला दर्जा अंतर्मुखतेनें पाहातील तर त्यांच्यावर केवढी जबाबदारी आहे तें कळून येईल. मनाचें औदार्य कमी होत असून शब्दपांडित्यानें तें भरून काढण्याची धडपड चालू आहे. 'घरोघरीं झालें अवघें ब्रह्मज्ञान । परी मेळवण बहु माजी ॥ निरें कोणापाशीं आहे एक रज । तरी द्यारे मज दुर्बळासी' असें म्हणण्याची पाळी भावनाप्रधान माणसावर येते. स्नेहाच्या 'बाबतींत जीवांत जीव घालावा' ही वृत्ति आज क्वचितच दिसते. धर्मशाळेंतल्या प्रवाशांसारखा स्नेह सर्वत्र जाणवूं लागला आहे. आर्थिक परिस्थिति हें याचें एक कारण असूं शकेल, पण मानसिक स्थित्यंतराचेंही तें निदर्शक आहे यांत शंका नाहीं. नीतिअनीतीच्या व्याख्याही आज बदलल्या आहेत. पण कालचक्राच्या गतिमानाप्रमाणें तसें होणें स्वाभाविक असतें !

या पंचवीस वर्षांत प्रवासाचीं साधनें पार बदलून गेलीं आहेत गोमन्तकांत सर्वत्र नद्यांचें जाळें पसरलें असल्यानें होड्या हेंच प्रमुख साधन होतें. जामिनीवरून 'अष्टपदी' (माचील), सारवट बैलगाड्या, घोड्यांच्या बग्गी, यानंतर आतां सरसहा मोटारींचा सुळसुळाट झाला आहे. रस्ते सुधारल्यानें प्रवासाची उमेद वाढली आहे. एखादी जाणारी होडी पाहून निघावें, वारा पाणी यावर अवलंबून राहावें व गेलेला इसम परत येण्याच्या वाटेस डोळा लावून घरच्या माणसांनीं बसावें, असें आतां नाहीं. प्रवासाच्या साधनांमुळें देवस्थानें, जत्रा, उत्सव या ठिकाणीं गर्दीचें प्रमाण वाढत असून एकंदर जीवन उत्साहवर्धक दिसत आहे. मोटारीच्या धांवेप्रमाणें पैसाही वाटोळाच असल्यामुळ गिरक्या घेत फिरण्याची त्याची स्वाभाविक वृत्ति आहे. नव्या पिढीच्या

खिशांत पुनः येऊन शिरण्याची त्याची तयारी नसते इतक्यापुरतेंच वाईट वाटतें.

प्रवासाच्या साधनांत वेग उत्पन्न झाल्यामुळें इह-परलोकामधील अंतर तोडण्यास आज फार काल लागत नाहीं. आकाश व पृथ्वी यांच्या पोकळींत आज विमानाचें युग सुरू झाल्यामुळें प्रसंग पडला तर स्वर्गवासी होण्यास आत्म्याला आत्मगतिके (automóvel) पेक्षां कमी वेळ खर्च होतो. या वेगवान् परिस्थितीमुळें प्रपंचरहाटीही जोरानें फिरूं लागली आहे. एखादें घराणें उदयास येण्यास तसेंच नामशेष होण्यास पूर्वी पुष्कळ काळ व अनेक पिढ्या लागत, आज एखादा पुरुष हां हां म्हणतां पुढें येतो व पहातां पहातां नाहींसा होतो. माणूस, वस्तु, शब्द, तत्व सर्वांनाच अल्पायुष्य व अस्थिरता प्राप्त झाली आहे.

या २५ वर्षांत निरनिराळ्या क्षेत्रांत चमकलेले असे अनेक गृहस्थ होऊन गेले, त्यांना शेवटीं वाङ्मयतिलांजलि देणें कर्तव्य ठरतें. यांतील अनेकांशीं माझा जिव्हाळ्याचा संबंध होता, आणि कित्येकांनीं प्रेमाची पांखर घालून मला नेहमीं आपलासा मानलें होतें. गतेतिहासांत समाविष्ट झालेल्या या गृहस्थांचीं नांवें विस्मृतींत गेलीं तर भावी पिढीकडून अन्याय झाला असें होईल या दृष्टीनेंही उल्लेखनीय असे गृहस्थ अनेक आहेत. म्हापसेंचे पांडुरंग सदाशिव दणाईत, रवळू शंभु खलप पणजीचे डॉ. शिरगांवकर, नारायण पांडुरंग आगशीकर, पुंडलीक अनंत केणी, जीवाजी दत्तू महात्मे, सदाशिव शे. सुखठणकर, फोंड्याचे नारायण अनंत बांदोडकर, कवळेंचे विनायक रामचंद्र सरज्योतिषी, मडगांवचे यशवंत (बोंबी) नाईक, शंभु पै पाणंदीकर, प्रो. व्यंकटेश नाईक, शंकर बाबली वेलेंकर, केपें येथील गोविंद शे. शिरवईकर, काशीनाथ घनःशाम शिरवईकर, दत्ताराम जगन्नाथ बोरकर, घनःशाम सांब व सोहिरोबा मळकर्णेकर बंधु, बाबन शेणवी शिरवईकर, पारोडेचे पुरुषोत्तम श्रीनिवास सुकेरकर, कुर्डीचे गोविंद ज. देसाई यांसारखे सार्वजनिक चळवळींतून स्वार्थत्यागपूर्वक व उत्साहानें भाग घेणारे, पेडण्याचे आत्माराम वासुदेव देशप्रभु, यशवंतजी जसवंतराव, घनःशाम रघुनाथ देसाई, मडगांवचे सुब्रह्मण्यानंदतीर्थ, कुंभारजुव्याचे फटवा बाबूराव केंकरे यांसारखे जुने विद्वान्, पणजीचे विष्णुबाबा धेंपे, हिरू कामत घाणेकर, कृष्ण नाईक सुकेरकर, पानदेलेचे पुंडलीक के. कामत, बांदिवड्याचे भाऊसाहेब मुख्य सरदेसाई, डिचोलीचे सखाराम सूर्यराव देसाई यांसारखे परोपकारी व सत्प्रवृत्त गृहस्थाश्रमी, लामगांवचे नानासाहेब देसाई, सांखळीचे आप्पासाहेब राणे, गांवठणकर देसाई, जुवेकर राणे, आरोबेकर रा. साहेब, केरकर नानासाहेब, वाडीचे विठोजी प्रतापराव यांसारखे शूर, धाडसी व रुबाबदार गृहस्थ यांचें स्मरण करणें योग्य आहे.

गोमंतकांतील एकंदर चळवळींचें सिंहावलोकन करताना प्रागतिक संघाबद्दल दोन शब्द लिहिल्याशिवाय पुढें जातां येणार नाहीं. या संस्थेमुळें राजकीय क्षेत्रांतील निवडणुकांच्या बाबतींत हिंदु समाजाची संघटना घडून आली व त्यांच्यांत आत्मविश्वास उत्पन्न झाला. एखाद्या क्रिस्ती जमिनदारानें, पाद्रीनें अगर एखाद्या वकील डॉक्टरानें सांगावें व हिंदूंनीं निमुटपणें आपलें मत कोणासही द्यावें, किंबहुना ते

देतील ती चिठी पेटींत टाकावी ही बौद्धिक गुलामगिरी नष्ट झाली. नवविचारी, उत्साही व आपलें स्वतंत्र अस्तित्व सिद्ध करण्याची महत्वाकांक्षा असलेले तरुण प्रागतिक संघाच्या झेंड्याखालीं गोळा झाले. आणि संघानें बऱ्याच निवडणुका स्वतंत्रपणें लढविल्या. राजकीय वातावरणाच्या आंदोलनांत प्रागतिक संघानें आपला विक्रम चांगलाच दाखविला होता असें म्हणण्यास हरकत नाहीं.

पंचवीस वर्षांत मागें काय झालें हें सांगतांना पुढें काय होईल या गोष्टीकडे मन व दृष्टि ताणून पहाण्याचा मोह कोणास होणार नाहीं? पूर्वीपेक्षांही आतां प्रगतीचा वेग अधिक आहे यांत शंका नाहीं. बैलगाडीपासून मोटारीपर्यंत आम्ही आलों आहों. यापुढें विमानाची वर्दळ मोठ्या प्रमाणावर सुरू होईल. माणसाचा वेग सारखा वाढत आहे, तशीच त्याची बुद्धि बरेवाईट असे नानाप्रयोग करून नवनवे शोध लावीत आहे.जगाच्या सर्व व्यवहारांशीं आपला गोमन्तक एकजीव हळूहळू होत असून पूर्वीची स्थिति सर्व प्रकारें बदलून त्या ठिकाणीं नवी निर्माण होणार हें उघड आहे. यापुढें जातिभेद इतिहासांत जमा होईल, आचारांतील धर्मभेद घरांतूनच वावरतांना दिसेल. देवळांतल्या मूर्ति हृदयसंपुटांत सामावतील,स्त्रिया केवळ संसाररथाचीं चाकें न बनतां देशाचें सारथ्यही बजावतील. आजचा हरिजन समाज स्वदेशाचा जगांतला निकृष्टपणा धालवील.ब्राह्मणांनीं पूर्वीच्या ऋषींनें अनुकरण केलें तरच त्यांची प्रगति राहील, आणि सगळ्यांचे आचारविचार समान भूमिकेवर आल्यानें उच्चनीच भावाला मूठमाती मिळेल. यापुढें आपला हा विशाल भारत अधिक विशाल,अधिक उन्नत व अधिक समर्थ होईल– परमेश्वर हेंच घडवून आणील यांत शंका नाहीं.

पंचवीसतीस वर्षांची स्थिति याप्रमाणें थोडक्यांत सांगितली. हें विहंगमावलोकन आहे. अर्थात् लांबून दृष्टीच्या टप्प्यांत जितके विषय, पदार्थ अगर वस्तु आल्या तितक्या ध्यानांत घेतल्या आहेत. पुष्कळ गोष्टी अजून निर्देश झाल्याशिवाय राहिल्या आहेत म्हणून त्या महत्वाच्या नव्हेत असें म्हणतां येणार नाहीं. थोड्या वेळांत जें क्षणिक दृष्टिक्षेपानें जें दिसलें तें भराभर वेंचून घेतलें आहे. आमची आजची तरुण पिढी शिक्षणसंपन्न व नव्या उमेदीनें उठावदार अशी होत आहे. सभांतून, सार्वजनिक क्षेत्रांतून, देवस्थानांतून अगर इतर संस्थांतून तिचे प्रतिनिधि चमकूं लागले, व स्वार्थत्याग,कर्तव्यनिष्ठा, ध्येयशुद्धि व कोणतेंही कार्य करून दाखविण्याची हिम्मत त्यांनीं धरली तर पुढील पंचवीस वर्षांच्या लेखकाची लेखणी रौप्यमहोत्सवापेक्षां सुवर्णमहोत्सवांत अधिक सार्थवती होईल. अजून पुढें पुष्कळ काम आहे, पुष्कळ प्रांत काबीज करावयाचा आहे. जुन्या पिढीनें 'आफरामेंत' करून ठेवले असून त्यांत नवनवीं बीजें लावून सर्व भूमि श्रीमंत व समर्थ करण्याचें काम पुढेंच आहे. गोमन्तकाबद्दल, तेथील लहान मोठीं कार्यें करणाऱ्या सर्व देशसेवकांबद्दल, व प्रगतीच्या चालत्या रथास हातभार लावणाऱ्या सर्व सज्जनांबद्दल प्रस्तुत लेखकास नेहमींच आदर आहे. जागेचा अभाव, कामाची गर्दी व बुद्धीची दुर्बलता या माझ्या व्यंगामुळें यांत ज्या उणीवा असतील त्यांबद्दल सर्वांकडे क्षमा मागण्याचा हक्क तेवढा बजावून हा लेख संपवितों.

हिंवाळ्यांत थाहीपेक्षां खालीं जातें व तेथें पाऊसही जोराचा पडतो. झाडी फारच घनदाट आणि सपाट जमीन फार कमी आहे. त्यामुळें सापेक्षत: हे प्रदेश इतर प्रदेशांपेक्षां रोगट हवेचे आहेत.

लोकसंख्या

१९३१ या शिरगणतीप्रमाणें गोमंतकाची लोकसंख्या २४१९३६ पुरुष व २६३३४५ स्त्रिया मिळून एकंदर ५०५२८१ होती. या बाबतींतिल विस्तृत माहिती या ग्रथांतील लोकसंख्याविषयक स्वतंत्र लेखांत दिली आहे.

इतिहास

गोमंतकाचा सोपपत्तिक इतिहास अजून लिहिला गेला नाहीं. त्याचीं जुन्या काळचीं साधनें हवीं तितकीं उपलब्ध नाहींत. पोर्तुगीज अमदानीपासूनचीं साधनें मात्र भरपूर तयार झालीं आहेत.

जुन्या काळीं हा प्रदेश, कदंब, चालुक्य, राष्ट्रकूट, यादव व विजयनगरचे राय इत्यादि हिंदु राजघराण्यांच्या सत्तेखालीं होता. त्यानंतर मुसलमानांच्या ताब्यांत हा प्रदेश ५०–६० वर्षांपेक्षां कमी काल राहिला.

पोर्तुगिजांनीं सन १४९८ सालीं हिंदुस्थानचा जलमार्ग शोधून काढला. तेव्हांपासून त्या सालच्या ता. २० मे रोजीं त्यांनीं कालिकत बंदरांत पाऊल ठेवलें. सन १५१० पर्यंत पोर्तुगिजांची सत्ता केवळ दर्यातील व्यापाराशिवाय खुष्कीवर मुळींच नव्हती. १५१० सालीं फेब्रुवारी महिन्यांत आफोंस द आल्बुकेर्क यानें विजयनगरच्या तिमय्या नांवाच्या सरदारच्या सहाय्यानें पणजीचा किल्ला व गोवें शहर घेतलें. नंतर १५२० सालीं रूइ द मॅलु यानें सासष्टी, बार्देश व फोंडें हे महाल घेतले. १५३४ त इब्राहिमशहाच्या पक्षानें हे प्रांत परत मुसलमानी राज्यास जोडले. परंतु इब्राहिमशहाच्या विरुद्ध मल्लूला मदत करण्याच्या बोलीवर आसदखानानें ते प्रांत परत पोर्तुगिजांना दिले. दरम्यान १५११, १५१६ व १५२० या सालांत तीनदां गोवें शहर परत घेण्याचे निष्फळ प्रयत्न आदिलशहानें केलेलेच होते. पुन: १५५७ मध्यें सासष्टी व बार्देश यांवर मुरादखान व नाझीर मलीक यांच्या आधिपत्याखालीं स्वाऱ्या झाल्या. परंतु पोर्तुगिजांनीं उभय सरदारांचा मोड केला. १५७० त पुन: आदिलशाहा व निजाम यांच्या जोड सैन्यानें पोर्तुगिजांवर स्वारी केली होती. परंतु १० महिन्यांच्या घनघोर युद्धानंतर तह होउन सासष्टी व बार्देश ह्या महालांवरचें पोर्तुगिजांचें स्वामित्व कायमचें मान्य करण्यांत आलें.

१६०३ मध्यें डच लोकांनीं गोव्याला वेढा घातला.परंतु एका महिन्यानेंच तो परत उठला- १६१० मध्यें मुसलमानांच्या मदतीनें पुन्हां डच लोकांनीं गोव्याला वेढा घातला व १६४३ त मुरगांववर मारा केला.

१६८३ मध्यें छत्रपति संभाजी महाराजांनीं बार्देशवर स्वारी केली व रायतूरच्या किल्ल्यावर धाड घातली. हा हल्ला इतका जोराचा होता कीं, त्यावेळचे व्हाइसराय कौंद द आल्व्होर यांनीं राजदंडदेखील सां फ्रांसीश्कु शाव्हियेर याच्या थडग्यावर ठेवला, मोंगलांकडून खास मराठ्यांच्या मुलखावर

परिशिष्ट

भौगोलिक व ऐतिहासिक माहिती

जुन्या काळीं गोमंतकाची उत्तर सीमा मालवणपर्यंत व दक्षिण सीमा मुडगेरी-पर्यंत जात असे. परंतु पोर्तुगिजांच्या ताब्यांत आज असलेल्या गोमंतकाच्या सीमा उत्तरेस तेरेखोलची नदी व सावंतवाडी संस्थान, पूर्वेस सह्याद्रि, दक्षिणेस कारवार जिल्हा व पश्चिमेस अरबी समुद्र अशा आहेत. याची उत्तर--दक्षिण लांबी ६५ मैल, पूर्व-पश्चिम रुंदी ३७ मैल व क्षेत्रफळ १४७२ चौरस मैल आहे. याचे उत्तर अक्षांश १५.४८ ते १४.५३ असून पूर्वरेखांश ७३.४५ ते ७४.२५ आहेत.

बारदेशचें आग्वाद भूशिर व सासष्टीचें मुरगांव भूशिर यांमुळें बनलेल्या मधल्या जागीं तारवांना उत्कृष्ट निवाऱ्याची जागा येथें मिळते. या आखाताच्या मधोमध ताळगांवचें भूशिर असल्यामुळें येथें दोन बंदरें निर्माण झालीं आहेत. पणजीचें बंदर व मुरगांवचें बंदर. या उभय बंदरांत मोठ्या आगबोटी येऊं शकतात. त्यांतल्या त्यांत पणजीच्या बंदराचा दरवाजा मे अखेरपासून सप्टेंबर पर्यंत नैर्ऋत्य मॉन्सून वाऱ्याच्या दंगलींत बंदच असतो. त्यामुळें तेथें मोठीं जहाजें जाऊं शकत नाहींत. मुरगांवचें बंदर सर्वकाळ खुलेंच असतें. व तें धक्का, क्रेन वगैरे आधुनिक सामुग्रीनें सज्ज असें आहे. एकाच वेळीं या धक्क्याला ८ - १० आगबोटी लागूं शकतात.

भूगर्भशास्त्रदृष्ट्या गोमंतकाची रचना तृतीय थरांतील आहे असें मानण्यांत येतें. सह्याद्रीच्या पायथ्यालगतचा भाग ग्रेनाईट दगडांनीं युक्त असा असून, जसजसें पश्चिमेस यावें तसतसे त्यांत अपूर्ण स्थितींतील स्लेटीचा दगड, ट्रॅप दगड, आयर्न हेमेटाईट, ल्याटराइट व गार (कुपाथर) असे दगड सांपडतात.

उंचवटयांच्या दृष्टीनें गोमंतकाचे सामान्यतः दोन निरनिराळे विभाग पाडतां येतात. ते म्हणजे जुनी काबिजाद किंवा सपाट भाग व नवी काबिजाद किंवा डोंगराळ भाग. हा डोंगराळ भाग सह्याद्रीच्या माथ्यावर सुरू होऊन मांडवी व जुवारी या दोन खोऱ्यांपर्यंत पसरला आहे. गोमंतकांतील सर्वांत उंच पर्वत सोंसोगड हा असून त्याची उंची युनिव्हर्सल जॅग्राफिकल डिक्शनरींत १६६६ मेत्र म्हणजे ५०४८ फूट दिली आहे. त्याच्या खालोखाल काल्लांची मावली हाही सत्तर प्रांतांतच असून त्याची उंची ३६३६ फूट आह. सत्तर प्रांतांतच वाघेरी व मोलेंगड हे दोन पर्वत मोलें गांवाजवळ असून त्यांची उंची अनुक्रमें २१२७ व २००७ फूट आहे. मादय नदीच्या कांठीं करंझोळ गांवीं ओळंग डोंगर १७५४ फूट उंचीचा आहे. बाळळी महालांत मोरपीर्ला हा पर्वत १४५४ फूट उंचीचा आहे. फोंडें महालांत बोरी या गांवांत सिद्धनाथ पर्वत असून त्याची उंची १२४२ फूट आहे. शेवटीं, पारोडें गांवांत चंद्रनाथ

हिंवाळ्यांत थाहीपेक्षां खालीं जातें व तेथें पाऊसही जोराचा पडतो. झाडी फारच घनदाट आणि सपाट जमीन फार कमी आहे. त्यामुळें सापेक्षत: हे प्रदेश इतर प्रदेशांपेक्षां रोगट हवेचे आहेत.

लोकसंख्या

१९३१ या शिरगणतीप्रमाणें गोमंतकाची लोकसंख्या २४१९३६ पुरुष व २६३३४५ स्त्रिया मिळून एकंदर ५०५२८१ होती. या बाबतींतिल विस्तृत माहिती या ग्रथांतील लोकसंख्याविषयक स्वतंत्र लेखांत दिली आहे.

इतिहास

गोमंतकाचा सोपपत्तिक इतिहास अजून लिहिला गेला नाहीं. त्याचीं जुन्या काळचीं साधनें हवीं तितकीं उपलब्ध नाहींत. पोर्तुगीज अमदानीपासूनचीं साधनें मात्र भरपूर तयार झालीं आहेत.

जुन्या काळीं हा प्रदेश, कदंब, चालुक्य, राष्ट्रकूट, यादव व विजयनगरचे राय इत्यादि हिंदु राजघराण्यांच्या सत्तेखालीं होता. त्यानंतर मुसलमानांच्या ताब्यांत हा प्रदेश ५०–६० वर्षांपेक्षां कमी काल राहिला.

पोर्तुगिजांनीं सन १४९८ सालीं हिंदुस्थानचा जलमार्ग शोधून काढला. तेव्हांपासून त्या सालच्या ता. २० मे रोजीं त्यांनीं कालिकत बंदरांत पाऊल ठेवलें. सन १५१० पर्यंत पोर्तुगिजांची सत्ता केवळ दर्यातील व्यापाराशिवाय खुष्कीवर मुळींच नव्हती. १५१० सालीं फेब्रुवारी महिन्यांत आफोंस द आल्बुकेर्क यानें विजयनगरच्या तिमय्या नांवाच्या सरदारच्या सहाय्यानें पणजीचा किल्ला व गोवें शहर घेतलें. नंतर १५२० सालीं रूइ द मॅलु यानें सासष्टी, बार्देश व फोंडें हे महाल घेतले. १५३४ त इब्राहिमशहाच्या पक्षानें हे प्रांत परत मुसलमानी राज्यास जोडले. परंतु इब्राहिमशहाच्या विरुद्ध मल्लूला मदत करण्याच्या बोलीवर आसदखानानें ते प्रांत परत पोर्तुगिजांना दिले. दरम्यान १५११, १५१६ व १५२० या सालांत तीनदां गोवें शहर परत घेण्याचे निष्फळ प्रयत्न आदिलशहानें केलेलेच होते. पुन: १५५७ मध्यें सासष्टी व बार्देश यांवर मुरादखान व नाझीर मलीक यांच्या आधिपत्याखालीं स्वाऱ्या झाल्या. परंतु पोर्तुगिजांनीं उभय सरदारांचा मोड केला. १५७० त पुन: आदिलशाहा व निजाम यांच्या जोड सैन्यानें पोर्तुगिजांवर स्वारी केली होती. परंतु १० महिन्यांच्या घनघोर युद्धानंतर तह होउन सासष्टी व बार्देश ह्या महालांवरचें पोर्तुगिजांचें स्वामित्व कायमचें मान्य करण्यांत आलें.

१६०३ मध्यें डच लोकांनीं गोव्याला वेढा घातला. परंतु एका महिन्यानेंच तो परत उठला- १६१० मध्यें मुसलमानांच्या मदतीनें पुन्हां डच लोकांनीं गोव्याला वेढा घातला व १६४३ त मुरगांववर मारा केला.

१६८३ मध्यें छत्रपति संभाजी महाराजांनीं बार्देशवर स्वारी केली व रायतूरच्या किल्लयावर धाड घातली. हा हल्ला इतका जोराचा होता कीं, त्यावेळचे व्हाइसराय कौंद द आल्व्होर यांनीं राजदंडदेखील सां फ्रांसीस्कु शाव्हियॅर याच्या थडग्यावर ठेवला. मोंगलांकडून खास मराठ्यांच्या मुलखावर

त्यावेळीं धाड आल्यामुळें छत्रपतींनीं वेढा उठविला व पोर्तुगीज सत्तेचा त्यामुळें आपोआप बचाव झाला. हा दैवी चमत्कार सां फ्रांसीश्कु शाव्हियॅर यानेंच केला असें त्यावेळीं पोर्तुगिजांस वाटलें.

१७०६ मध्यें पोर्तुगिजांनीं सावंतवाडीकरांचे खोरजुवें व पनेळें हे दोन किल्ले घेतले.

१७३९ त बाजीरावानें सबंध पोर्तुगीज मुलखावर स्वारी केली व व्यंकटराव घोरपड्यानें सबंध गोमंतक सर केलें. आग्वाद व रेइज्माग हे दोन किल्ले मात्र पोर्तुगिजांकडे राहिले. परंतु पोर्तुगालहून कौंद द येरिसैर ह्यांच्या आधिपत्याखालीं कुमक आल्यावर त्यांनीं परत हल्ला करून गेलेले प्रांत परत मिळविले. आणि सावंतवाडीकरांनीं पोर्तुगिजांचें स्वामित्व पत्करून त्यांना खंडणी देऊं केली.

सौंधेकर राजानें मराठ्यांच्या विरुद्ध पोर्तुगिजांची मदत घेऊन त्यांना हटकोळण, (फोंडें महालांतील उत्तरेचें टोंक), तळवडें (कुंकळळीजवळचें गांव) व पारोडें हे तीन गांव देऊं केले. परंतु हा करार सौंधेकरांनीं न पाळतां पोर्तुगिजांविरुद्ध इंग्लिशांचीच उलट मदत घेतली. व त्यांना कारवारचें बंदर बहाल केलें. तेव्हां पोर्तुगिजांनीं काणकोण महालांतील पिरो व शिरोडे हे किल्ले घेऊन फोंड्यावर हल्ला केला. परंतु फोंडें त्यावेळीं मराठ्यांच्या ताब्यांत होतें. त्यांनीं हा हल्ला कापून काढला व पोर्तुगिजांचा सेनापति कौंद द आल्व्ह ह्याला ठार केलें.

१७४६ त पोर्तुगिजांनीं पुनः उचल करून आखाडो, तेरेखोल, रेडी व नावटी हे किल्ले मराठ्यांकडून घेऊन सत्तरी प्रांत आपल्या अंमलाखालीं आणला.

१७६३ त कौंद द येग यांनीं मर्दनगडावर हल्ला करून तो सर केला व लागलीच किल्ल्याचा नाश केला. व ताबडतोब जांबावली व केपें हे महाल सर केले आणि कौंद द आल्व्ह यानें गमावलेले काणकोण महालांतील किल्ले घेऊन रामाच्या भशिरावरचा किल्लाही घेतला.

१७५५ ते १८२४ पर्यंत सत्तरी प्रांतांत १४ वेळां बंडें झालीं. पुढें १८५२ पर्यंत सत्तरी जरा शांत होता. या सालीं प्रसिद्ध दिपाजी राण्याचें बंड झालें. तें १८५५ पर्यंत चाललें. पुनः १८६९ त कुष्टोबा राण्याचें बंड झालें. त्याचा शेवट १८७१ मध्यें, प.वा. वामन सदाशिव सांबर्डेकर यांनीं कुष्टोबाचा वध करविल्यानंतर थांबलें. १८९५ सालीं दादा राण्याचें बंड झालें त्याच्या शमनासाठीं खास राजबंधु दों आफोंस याच्या नेतृत्वाखालीं पोर्तुगालहून सैन्य आलें होतें. त्यानंतर १९१२ मध्यें कुमेरीच्या उत्पन्नाच्या जबर आकारणीच्या कारणामुळें पुनः बंड झालें तें गोव्हेर्नादोर कौसैर द कॉश्त यांनीं आफ्रिकेहून लांडींची एक पलटण आणून तिच्या सहाय्यानें मोडलें. तेव्हांपासून आजवर सत्तरी प्रांत शांत आहे.

१५३४ त गोवा शहरांत बिशपची गादी स्थापन होऊन धर्मच्छलास आरंभ झाला व तो १७६३ पर्यंत सारखा चालला. पुढें त्याला उतरती कळा लागली. तरीदेखील राजसत्ता चालू असेपर्यंत क्याथोलिक धर्माला राजधर्माचें स्थान मिळालें असल्यामुळें त्याखेरीज इतर धर्मांना त्रास होतच गेले. पण

रिपब्लिक स्थापन झाल्यापासून मात्र हे त्रास बंद पडले.

प्रेक्षणीय स्थळें

सृष्टिसौंदर्याच्या बाबतींत गोमंतक फारच संपन्न आहे आणि त्याची ग्वाही येथें येणाऱ्या सर्व प्रवाशांनीं दिलेली आहे. जलमार्गानें गोमंतकांत येणाऱ्या प्रवाशाचें स्वागत करण्यासाठीं आग्वाद, ताळगांव व मुरगांव येथील सुंदर भूशिरांच्या रूपानें गोमंतदेवीनें आपले दूत पुढें ठेवलेले दिसतात. आणि प्रवासी आंत शिरतांच त्याच्या आरामासाठीं कल्पवृक्ष अर्थात् नारळीचीं सुंदर झाडें त्यांवर चंवऱ्या ढाळीत असतात. मागें नीलवर्ण अथांग सागर व पुढें सकाळच्या प्रहरीं पडलेल्या कोवळ्या उन्हामुळें सोन्याची लकाकी धारण केलेली वृक्षराजी, मधूनमधून वर डोकावणारीं पांढरींशुभ्र घरें हा देखावा नयनमनोहर असतो. संध्याकाळच्या वेळीं या देखाव्यावर सूर्याच्या मावळत्या किरणांची तांबूस छटा पसरलेली असल्यामुळें त्याकडे वळलेली दृष्टि खिळूनच रहाते. उलट खुष्कीनें गाडींतून प्रवासी क्यासलरॉक स्टेशन सोडून येतांच समोरच्या खोल दरींतून दिसणारी ती वनशोभा पाहतांना गोमंत-वनदेवीचें तें रम्य व नयनमनोहर स्वरूप पाहून थक्कच होतो. ही सुंदर शोभा त्याला निरखून पहावयाची इच्छा असली तरी गाडीच्या वेगामुळें भिनेमांतील दृश्यांप्रमाणें ती त्याच्या इच्छेला न जुमानतां खोडकर बालिकेप्रमाणें चंचल चालीनें अदृश्य होते. कित्येक अंधाऱ्या बोगद्यांतून जाण्याची किंमत द्यावी तेव्हांच दूधसागराची त्यावर कृपा होते. "माझी गोमंतमाता तुझ्या स्वागतासाठीं नेहमीं तयार आहे व तिचें हृदय इतकें स्नेहपूर्ण आहे कीं, तुमच्यासाठीं मजसारखे दुधाचे पाटदेखील त्यांतून निघतात." असें जातां जातां त्रिवार सांगून तो दिसेनासा होतो. प्रेक्षणीय देखावे गोमंतकांत नाहींत कोठें, हाच प्रश्न प्रवाशाला पडण्याजोगीं त्यांचें वैभव आहे. चंद्रेश्वराच्या देवळाजवळून सारा सासष्टी प्रांत पावसाळ्यांत एकाद्या हिरव्या गालिच्यासारख्या शेतांनीं भरलेला दिसतो. सिद्धनाथावरून तर मुरगांवचें बंदर, जुवारी नदीचें पात्र व सारा उत्तर गोमंतक दृष्टिपथांत येतो. एका बाजूनें धीरगंभीर समुद्र व दुसऱ्या बाजूस गगनचुंबी सह्याद्रीची हरिद्वर्ण शिखरमालिका, मधूनमधून रजत-मेखलांप्रमाणें शोभणारे जुवारी व मांडवीच्या शाखोपशाखांचे प्रवाह, त्यांच्या उभय किनाऱ्यांवर लांबवर पसरलेलीं पिवळीं शेतें, मधेंच कोठेंकोठें वृक्षराजींतून आपलें शुभ्र मस्तक वर करून स्वर्गाकडे नजर लावणारीं चर्चें व वरून पसरलेली नीलवर्ण मेघडंबरी, असें हें उभय डोंगरांवरून दिसणारें मनोहर दृश्य आम्हां गोमंतकीयांना नेहमींचेंच असलें तरीदेखील आकर्षण करतें. मग दख्खनच्या माळभूमीवरून ज्यांनीं त्यांत नव्यानेंच प्रवेश केला असेल त्यांना तें रम्य वाटलेंच पाहिजे. चांदण्या रात्रीं, वर असंख्य तारागणांनीं वेष्टित शोभणारा मनोहर रजनीकांत ज्यावेळीं आमच्या नद्यांवर आपल्या चंद्रिकेचा वर्षाव करतो त्या वेळीं वल्ह्याच्या तालबद्ध आवाजांत नद्यांतून सहल करण्याची संधि ज्यांना मिळाली आहे ते प्रवासी तर त्या वेळचा देखावा

कधींच विसरूं शकत नाहींत.

मानवनिर्मित रम्य दृश्यें देखील गोमंतकांत थोडींथोडकीं नाहींत. म्हाडदोळच्या देवळांतील चौक प्रेक्षकाला जुन्या कलाकुसरीचा नमुना दाखवील आणि सांखळीचें बिहलाचें नूतन देवालय सिमेंट कॉंक्रीटच्या अद्यावत् शिल्पाची महति दाखवील.

कवळेंचा घूड, मंगेशींची दीपमाळ, नागेशाची तळी, म्हाळसेचा चौक ही मुळीं म्हणच होऊन बसली आहे. जुन्या गोव्यांतील भव्य चर्चें १६ व्या शतकांतील जेसुईट शिल्पाचे उत्कृष्ट नमुने असून ते पाहाण्यासाठीं दरसाल बाहेरून शेंकडों प्रेक्षक येत असतात. त्यांतही सांत कायतानचें चर्च रोमच्या सेंट पॉलच्या चर्चच्या नमुन्यावरून बांधलेलें आहे तें फारच प्रेक्षणीय आहे.

गोमंतकांतील शहरें विस्तारानें लहान असलीं तरी स्वच्छता, नीटनेटकेपणा, टुमदारपणा इत्यादि बाबतींत, एकदोन अपवाद सोडले तर महाराष्ट्रांतील कोणत्याही शहरापेक्षां शोभिवंत आहेत.

पणजी शहराच्या टेकडिवरून पूर्वेकडील मधल्या शेतांचा व मिठागरांचा देखावा बुद्धिबळाच्या एखाद्या प्रचंड पटाप्रमाणें दिसतो. मधूनमधून त्यांत पांढरेकाळे मिठाचे ढीग मोहऱ्यांप्रमाणें दिसतात. आणि पश्चिमेस अथांग सागराची भव्य व मनोहर शोभा सायंकाळीं एखाद्या विस्तीर्ण गालिच्याप्रमाणें दिसते.